# The Drinched Book

UNIVERSAL
LIBRARY
OU_196122
UNIVERSAL
LIBRARY

—29-4-72—10,000.

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

M181.45
G31J

Accession No. M249

गोडबोले, हरि गणेश.

जीवित विद्या.

k shou ' be re ned on or before the date last marked below.

# जीवितविद्या

हा ग्रंथ


## हरि गणेश गोडबोले, बी. ए.

[ आत्मविद्या ग्रंथाचे कर्ते ]


ह्यांनी लिहिला.


प्रकाशक

**बळवंत गणेश दाभोळकर**

नारायण पेठ, घर नंबर ४६८, पुणें सिटी.

पुणें पेठ शनिवार, मेहुणपुरा येथें केशव रावजी गोंधळेकर ह्यांनीं आपल्या " जगद्धितेच्छु " छापखान्यांत छापिला.

शकवर्ष १८३६—इ० सन १९१४.

रा० ब० सीताराम विश्वनाथ पटवर्धन

यांस हा ग्रंथ

परमादरानें नजर केला असे.

## पुढील ग्रंथ

आमचे ग्रंथमालेंतील पहिलाच ग्रंथ "नीतिशास्त्राचीं मूलतत्त्वें" हा दुरुस्त करून छापणार आहों. सदर्हू ग्रंथ १८९१ सालीं छापला होता, तो १८९२ सालापासून मिळेनासा झाला व आमचे कायम वर्गणीदारांस मुळींच मिळालेला नाहीं, सबब त्यांजकडे रीतसर रवाना होईल.

## नीतिशास्त्राचीं मूलतत्त्वें

हा ग्रंथ प्रोफेसर चिंतामण गंगाधर भानु, बी. ए. ह्यांनीं लिहिलेला असून डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनें पसंत केलेला आहे. पृष्ठसंख्या सुमारें पावणेचारशें; किंमत १॥ रुपया.

बळवंत गणेश दाभोळकर, ग्रंथप्रकाशक.

---

## आजपर्यंतचे माझे ग्रंथ

☞ किंमत न दिलेल्यांच्या प्रती शिल्लक नाहींत.

१. **नीतिशास्त्राचीं मूलतत्त्वें.**
२. **न्यायतत्त्वें**–किं० २ रु०; ट० हं० ८३
३. **ज्योतिर्विलास**–किं० १॥ रु०; ट० हं० ८३
४. **संसारसुख**–किं० १॥। रु०; ट० हं० ८३
५. **शास्त्ररहस्य.**

६. आत्मनीतीचीं तत्त्वें आणि परोपकार.
७. नीतिसिद्धांत–किं० १॥। रु०; ट० हं० ८३
८. धर्ममीमांसा–नैसर्गिक धर्म आणि भौतिक धर्म.
९. राजनीतीचीं मूलतत्त्वें–किं० २॥ रु०; ट० हं० ८३
१०. अज्ञेयमीमांसा.
११. धर्ममीमांसा–पितृमूलक धर्म आणि आध्यात्मिक धर्म–किं० २॥ रु०; ट० हं० ८३
१२. जीवनशास्त्र.
१३. ज्ञेयमीमांसा [ पूर्वार्ध ]
१४. भारतवर्षीय भूवर्णन.
१५. ज्ञेयमीमांसा [ उत्तरार्ध ]
१६. जीवितकर्तव्य–किं० २॥ रु०; ट० हं० ८३
१७. राणीचे राज्याचा इतिहास–किं० २रु०; ट० हं० ८३
१८. आत्मविद्या—किं० २॥ रु०; ट० हं० ८३
१९. समाजशास्त्राचे मूलसिद्धांत.
२०. समाजशास्त्राचे अनुभवजन्य सिद्धान्त व गृहसं०
२१. जननमरणमीमांसा–किं० १॥। रु०; ट० हं० ८३
२२. राजकीय संस्था–किं० २॥ रु०; ट० हं० ८३
२३. निबंधरत्नमाला—किं० २॥ रु०; ट० हं० ८३
२४. विधिसंस्था व धर्मविषयकसंस्था–किं० २॥ रु०; ट० हं० ८३
२५. उद्योगसंस्था व धंदेसंस्था–किं० २॥ रु०; ट. हं. ८३
२६. सुख आणि शांति–किंमत २॥ रु०; ट० हं० ८३
२७. मानसशास्त्राचीं तत्त्वें–किंमत २॥ रु०; ट० हं० ८३
२८. मानसशास्त्राची संघटना–किं० २॥ रु०; ट० हं० ८३
२९. जीवितविद्या–किंमत २॥ रुपये; ट. हं. ८३

# प्रस्तावना

' अध्यात्म विद्या विद्यानां ' असें वचन भगवद्गीतेमध्यें आढळतें. अखिल विश्वांतील अनंत विभूतींचें वर्णन करितांना भगवान् म्हणतात कीं सर्व विद्यांमध्यें अध्यात्मविद्या हें माझें रूप आहे. यावरून ही विद्या सर्वांत श्रेष्ठ असून तिच्या लाभानें महात्मेलोक कृतकृत्य झाले आहेत. तेव्हां:अशा विद्येचें अध्ययन करून तदनुरूप अनुभव घेण्यांत उपलब्ध कालाचा व्यय करणें प्रत्येक समंजस मनुष्याचें कर्तव्य होय.

या विषयाचें श्रुतिबोधित व शास्त्रोक्त ज्ञान देशबांधवांस व्हावें एतदर्थ आत्मविद्या हा ग्रंथ रचिला होता व तो सर्वमान्य होऊन त्याची तिसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली आहे. भारतीय आर्य लोकांनीं प्रतिपादिलेलें जें श्रेष्ठ अद्वैत मत त्याचा प्रभाव इंग्लंद देशांतील तत्त्वज्ञानविषयक विचारांमध्यें कसा दृष्टोत्पत्तीस येऊं लागला आहे, हें जेम्स ॲलन यांचा ' From poverty to power ' व मन्मथ मल्लिक यांचा ' Problem of Existence ' या प्रबंधांवरून सिद्ध होतें. शिवाय या प्रबंधांत अध्यात्मविद्येस व्यवहार्य स्वरूप उत्कृष्ट रीतीनें दिलें आहे. म्हणून त्यांमध्यें दाखविलेल्या दिशेनेंच प्रस्तुत ग्रंथ रचिला आहे.

मनुष्याच्या जीविताशीं ज्या ज्या शक्तींचा, व्यवहारांचा व सृष्टिव्यापारांचा संबंध येतो आणि ज्यांच्या नियमनावर मानवी व्यक्तींचें, समाजाचें व राष्ट्राचें कल्याण अवलंबून असतें, त्या त्या शक्तींचें, व्यवहारांचें व सृष्टिव्यापारांचें ज्ञान देशबांधवांस व्हावें या उद्देशानें हा ग्रंथ लिहिला आहे. एकंदर ग्रंथ आर्य पद्धतीनें लिहिला असून जीवितरहस्याविषयीं पाश्चात्य विचारसरणी कशी आहे हें समजण्याकरितां उपसंहार या प्रकरणामध्यें Pope's Essay on man या काव्यांत योजिलेल्या पद्धतीचा स्वीकार केला आहे. मानवी जीविताविषयीं जे नाना प्रकारचे प्रश्न उद्भवतात त्यांचें परिज्ञान या ग्रंथाच्या वाचनानें होईल अशी आशा आहे.

ह० ग० गो०.

---

## साभार स्वीकार

आमचे ग्रंथमालेस मदतीकरितां लेफ्टनंट कर्नल डॉक्टर कान्होबा रणछोडदास कीर्तीकर ह्यांनीं रुपये ५० पाठविण्याचें अभिवचन दिलें आहे. शेट रामदयाळ नेवटिया ह्यांनीं रुपये १० व रा. सा मुकुंदराव श्रीखंडे ह्यांनीं रुपये ५ पाठविले आहेत. आणि रा. सा. श्रीनिवासराव कपूर, चीफ इंजिनीयर ह्यांनीं शिलकी ग्रंथांच्या प्रत्येकीं २ प्रती विकत घेऊन मदत केली आहे. ह्या सर्व देणग्यांचा आभारपूर्वक स्वीकार करितों.

ब० ग० दाभोळकर, ग्रंथप्रकाशक.

# अनुक्रमणिका

## भाग १–जीवितरहस्य


प्रकरण पृष्ठ

१. उपोद्घात .... .... .... .... १
२. मनुष्याचें स्वरूप .... .... .... २१
३. बाल्यतारुण्यादि अवस्था .... .... ४३
४. शारीर वेग आणि मनोवेग .... .... ६७
५. षडूर्मि .... .... .... .... .... ८३
६. जड आणि चैतन्य .... .... .... ९७
७. शाश्वतसुखाचे पंथ .... .... ....१०९
८. बंध आणि मोक्ष .... .... ....१२५
९. निर्वाण .... .... .... ....१३९


## भाग २–जीवनसंग्राम


१. संग्राम व त्याचें स्वरूप .... ....१५९
२. श्रेष्ठ-कनिष्ठ भाव .... .... ....१७१
३. जयाचीं साधनें व अपजयाचीं कारणें ....१८१
४. कर्तव्यबुद्धि .... .... .... ....२०५
५. राष्ट्राविषयीं कर्तव्य .... .... ....२१३
६. विद्यावृद्धि .... .... .... ....२५१
७. राष्ट्रीय शिक्षण.... .... .... ....२६७
८. संग्राम-समाप्ति .... .... .... ....२७९

## भाग ३—जीवितसुख

१. सिद्धीचे उपाय .... .... ....२८७
२. अभ्युदयाचे मार्ग .... .... ....२९९
३. ज्ञान व तप .... .... .... ....३४९
४. प्रकाशोत्पत्ति .... .... .... ....३७१
५. उपदेशपर कथा .... .... ....३८१
६. प्रधान तत्त्वें .... .... .... ....४०३
७. उपसंहार .... .... ....४२९–४६०

# भाग १

## जीवितरहस्य

# प्रकरण १

## उपोद्घात

( श्लोक )

तरवोऽपि हि जीवन्ति । जीवन्ति मृगपक्षिणः ॥
स जीवति मनो यस्य । मननेन हि जीवति ॥१

( आर्या

जगतांति वृक्ष पशुहि पक्षीहि तसे सजीव होतात ॥
मानव तयास म्हणाति मननिं सदा मन यदीय हो, तात ॥१

# प्रकरण १

## उपोद्घात

उत्क्रांतितत्त्वाप्रमाणें सृष्टीची घडामोड समजण्यास घन, प्रवाही व वायुरूप हें वर्गीकरण अत्यन्त उपयोगी आहे. परमात्म्याच्या इच्छेनुरूप तमोगुण अहंकारापासून प्रथम आकाशाची (ether) उत्पत्ति झाली, नंतर क्रमानें वायु (motion), अग्नि (fire), आप (fluid), पृथिवी (solid),: ओषधि (vegetable)—अशी सृष्टि निर्माण होत गेली. ओषधि म्हणजे वनस्पति यांच्यापासून उत्क्रान्तीनें मनुष्यप्राणि बनला. हा आर्यग्रंथांत वर्णिलेला सृष्टिक्रम आधुनिक शास्त्रांच्या शोधाप्रमाणेंहि अगदीं बरोबर आहे. केवळ शक्ति म्हणजे सत्त्व, आकर्षण व अपसरण म्हणजे रज आणि घटकद्रव्यें म्हणजे तम—हे जडसृष्टींतील गुण होत. ह्यांच्याच योगानें गतिरूप उष्णतेपासून द्रवरूप अशा क्रमानें सृष्टीची उत्पत्ति झालेली आहे. प्रथम सूर्य व त्याची ग्रहमाला हीं सर्व मिळून एकच केवळ धगधगीत अग्नीचा एक अतिशय प्रचंड गोल होता, म्हणजे त्या वेळीं हें जग अग्निरूप होतें. पुढें तो गोल निवत निवत जाऊन त्याच्यापासून गुरुशुक्रादिक ग्रहमाला बनली. गुरु, शनि हे अजून द्रवरूपच आहेत. तशीच पृथ्वीहि होती, म्हणजे त्यावेळीं तिचें आप हें रूप होतें. त्यानंतर हल्लींचें कठिण कवच बनत चाललें. प्रथमप्रलयानंतर समुद्र होऊन त्यांत मत्स्य, कांसव वगैरे जलचर

निर्माण होऊन, पृथ्वीवर वनस्पति होत होत सरपटणारे ( सर्प ) प्राणि, वराह ( डुकर ) वगैरे स्थलचर होऊन, अह्लोसारस म्हणून भयंकर प्राणि जमिनींवर, समुद्रांत व आकाशांतहि संचार करीत असत. दुसऱ्या प्रलयानंतर डोडो वगैरे पक्ष्यांची व मम्मॉथ वगैरे चतुष्पाद प्राण्यांची वस्ती पृथ्वीवर झाली आणि पक्षी, चतुष्पाद व मनुष्य अशी सृष्टीची उत्क्रान्ति झाली. तिसऱ्या प्रलयानंतर विविध प्रजा निर्माण होत गेली.

विश्वरचनेचें ज्ञान होण्यास घन, प्रवाही व वायुरूप हें वर्गीकरण जसें उपयोगी पडतें, तसेंच सृष्टपदार्थांचे भेददर्शक व अवान्तर गुणधर्म लक्षांत येण्यास खनिज, वनस्पति व प्राणि हें वर्गीकरण अत्यंत बोधप्रद आहे. सर्व वस्तु देहधारी आहेत. पाषाणादि जडपदार्थांस चेतना नाहीं, गति नाहीं, वाढहि नाहीं व त्यांपासून पुनरुत्पत्ति होत नाहीं. कधीं कधीं रासायनिकक्रियेनें निर्जीव वस्तूंची वाढ होते व त्यांपासून पुनरुत्पत्ति करितां येते, पण हा सामान्य नियम नसून अपवाद समजला पाहिजे.

वृक्षादि वनस्पतींस गति नाहीं, तथापि त्यांस चेतना असून मर्यादित वाढहि आहे. वनस्पतींना चेतना म्हणजे प्राण असला, तरी संवेदना (sensation) नाहीं अशी आजपर्यंत समजूत होती, तथापि प्रो० बोस यांनीं केलेल्या नवीन शोधाप्रमाणें उद्भिज्जकोटींस सुखदुःखादि भावना असाव्या असें सिद्ध होऊं पहात आहे. ज्याप्रमाणें मनुष्यादि सचेतन प्राण्यांच्या हृत्पिंडावर त्यांच्या सुखदुःखादि भावनांचा परिणाम घडून तो त्यांच्या कृ-

तींत स्पष्ट दिसतो, तसाच परिणाम वनस्पतींमध्येंहि त्यांच्या कृतीच्या रूपानें रेखाचित्रांच्या (photograph) साहाय्यानें दाखवितां येतो. तसेंच, जडद्रव्यापासून ओषधिसृष्टि बनवितां येत नाहीं. व वनस्पतींस जरी चेतना आहे, तरी आपोआप गति हें जीवाचें प्रधान लक्षण असल्यामुळें, जीवसृष्टींत वनस्पतींचा अंतर्भाव होऊं शकत नाहीं.

मनुष्यादि प्राण्यांस चेतना, आपोआप गति व मर्यादित वाढ हीं आहेत आणि त्यांपासून पुनरुत्पत्ति होते. परमेश्वरानें जीवसृष्टींत एकदांच जीवतत्त्व पेरून ठेविलें आहे, म्हणून जडपदार्थांपासन किंवा वनस्पतींपासून रासायनिक किंवा अन्य क्रियेनें नवीन जीवाची उत्पत्ति न होतां, सजीवापासूनच सजीव निर्माण होतो.

सकल प्राण्यांस ईश्वरानें उपजतबुद्धि ( instinct ) दिलेली आहे, तेणेंकरून जीवनपरिचर्येस अवश्य तेवढेच व्यवहार करण्याचें ज्ञान मनुष्येतर प्राण्यांस असतें, म्हणजे आहार, निद्रा, भय, मिथुनीभाव एवढ्यानें त्यांचा सर्व व्यवहार आटोपतो, परंतु मनुष्यवर्गाची स्थिति तशी नाहीं. प्राण्यांच्या अंगीं उत्तरोत्तर श्रेष्ठ गुण आणण्याचें काम ईश्वराच्या इच्छेनें कोट्यवधि वर्षें चालून शेवटीं मनुष्य निर्माण झाला, तरी तो एक पशूच असून त्यास बुद्धिहि नव्हती व वाचाहि नव्हती. पुढें त्यास वाचा येऊन बुद्धि उत्पन्न झाली व विकास पावली, आणि ईश्वराच्या सृष्टींतील एक महत्कार्य तडीस गेलें. मनुष्य उत्पन्न झालेला पाहून ईश्वरास परमानंद झाला हें अगदीं साहजिकच आहे.

मनुष्याच्या अंगीं सांप्रत जें अद्भुत सामर्थ्य आलें आहे, त्याला कारण ईश्वर-इच्छा तर खरीच, तथापि ईश्वरी तेजाचा अंश जी बुद्धि ( reason ) ही मनुष्यांत विकसित झाली हेंहि प्रधान कारण होय. पशुरूपांत होता तोंपर्यंत त्याची उन्नति करण्याची जबाबदारी ईश्वरानें आपणाकडे घेतली होती, परंतु त्या पशुदेहास कालान्तरानें मनुष्यरूप मिळालें आणि बुद्धीचा प्रकाश प्राप्त झाला, तेथपासून ईश्वराची जबाबदारी संपली आणि मनुष्यास आपल्या बऱ्या वाईट कर्माप्रमाणें उन्नति किंवा अवनति मिळावी अशी योजना त्यानें केली. वाचा देऊन आणि बुद्धिहि देऊन ईश्वरानें मनुष्यास इच्छा-स्वातंत्र्य ( Freedom of Will ) दिलें हेंच ईश्वरी ज्ञानाच्या आकाशांत यथेच्छ उडण्यास पंख दिले असें म्हटलें तरी चालेल.

जीवाची उत्पत्ति होण्यास शरीर व चैतन्य (mind) यांचा संयोग व्हावा लागतो. या दोहोंचीं घटकद्रव्यें व गुणधर्म हे अगदीं विरुद्ध आहेत तथापि एकावांचून दुसऱ्याचें अस्तित्वच होऊं शकत नाहीं. अनेक प्रलय होतात तेव्हां सृष्टीच्या आरंभीं कोणी तरी आदिपुरुष निर्माण होतो, तो पुरुष आत्मारूप अथवा चैतन्यरूप असून त्याच्या स्वरूपापासून क्रमानें त्याच्या देहाची उत्पत्ति होते. अशा रीतीनें शरीर व चैतन्य यांची परस्परसाहाय्यकारक जोडी जमून त्यांचा कायमचा संयोग बनून जातो. त्या वेळेस तो पुरुष एकटाच प्रकाशमान व पहाणारा असून त्यास पहावयास कांहींच उरत नाहीं. तेव्हां

स ईक्षांचक्रे । बहुस्यां प्रजायेयेति ।

—छांदोग्य

म्हणजे,—त्यास वाटतें कीं आपण पुष्कळ व्हावें व आपली विशेषेंकरून उत्पत्ति व्हावी. आदिपुरुषास असें वाटून अनंत प्रजा निर्माण होते. अशा रीतीनें निर्माण झालेल्या नानाविध प्रजेमध्यें भिन्न शक्ति ( force ) उत्पन्न होतात आणि उत्पत्तिकाळच्या व परिस्थितीच्या वेगवेगळ्या अवस्थांमुळें त्या शक्तींमध्यें विशिष्ट गुणधर्म अनुस्यूत होतात. येणेंप्रमाणें विविध शक्तींचा संयोग होत होत अनेक निरनिराळ्या प्रकारची असंख्य प्रजा निर्माण होते, पण चमत्कार असा होतो कीं, मूलप्रजेचे कितीहि गुणधर्म तदुत्पन्न प्रजेमध्यें उतरले, तथापि एकहि व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीशीं पूर्णपणें समता पावत नाहीं; इतकेंच नव्हे तर जनकव्यक्तीचे गुणधर्म साक्षात् तदुत्पन्न व्यक्तीमध्यें देखील सर्वांशीं उतरत नाहींत. येणेंप्रमाणें आदिपुरुषाच्या अतर्क्य प्रतिभेमुळें व उत्पादकशक्तीमुळें जे जे गुणधर्म अस्तित्वांत आले त्यांपैकीं कमी-जास्त प्रमाणानें कांहींचा लाभ होऊन अनन्त विविध प्रजा निर्माण होऊन तद्रूप शक्तींचें हें अखिल विश्व बनलें आहे.

ईश्वराच्या सृष्टींत अनेक प्रलय होतात व तदनुरूप वेगवेगळ्या विविध प्राण्यांची उत्पत्ति होऊन त्यांच्या अंगीं भिन्न भिन्न गुणधर्म व शक्ति दृष्टीस पडतात. पूर्वीच्या युगांत स्त्रीशोणिताशिवाय पुरुषवीर्यानेंच प्रजोत्पत्ति होत होती असें वर्णन आढळतें. पुरुषामध्येंच प्राण ( positive ) व रयि ( negative ) अशा दोन्ही

शक्ति विद्यमान असतात आणि या तत्त्वावरून प्राचीन काळच्या अद्भुत प्रजेची उत्पत्ति होते. महादेवाची अर्धनारीनटेश्वर अशी जी कल्पना आहे तिचा उलगडा याच तत्त्वावरून होतो. सृष्टिकर्ता प्रजोत्पत्तीच्या विचारांत निमग्न असतां, त्याचें शरीर एकाएकीं दुभंग झालें, आणि त्यापासून एक मिथुन ( जोडपें ) निर्माण झालें. त्या उत्पन्न झालेल्या जोडप्यांत जो पुरुष होता तो स्वायंभुव मनु असून, तो पुढें जगाचा अधिपति झाला. स्त्री होती ती शतरूपा असून पुढें स्वायंभुव मनूची पट्टराणी झाली. ह्यांपासूनच मैथुनजन्य सृष्टीचा आरंभ झाला व प्रजावृद्धि होऊं लागली. अशी जी कथा पुराणान्तरीं आढळते तिचें बीज आतां सहज लक्षांत येईल. ही गोष्ट प्राणिशास्त्राची ( zoology ) झाली. वनस्पतिशास्त्रांत ( Botany ) देखील हीच स्थिति आढळते. कांहीं पुष्पांत पुंकेसरच असून कांहींमध्यें स्त्रीकेसरच दृष्टीस पडतात आणि दोहोंच्या मिश्रणानें इतर वनस्पतींची उत्पत्ति होते. तसेंच कांहीं पुष्पांत दोन्ही प्रकारचे केसर असून, त्यांपासून अन्य वनस्पति निर्माण होतात.

शरीराशिवाय चैतन्य राहूं शकत नाहीं व चैतन्याशिवाय देहाचें अस्तित्व संभवत नाहीं. जडपदार्थांमध्यें कांहीं कालपर्यन्त द्रव्यमय भाग ( matter ) रहातो, पण चैतन्यवियुक्त असल्यामुळें तो पदार्थ टिकत नाहीं. म्हणून चैतन्यव्यतिरिक्त पदार्थाचा नाश झालाच पाहिजे. त्याप्रमाणेंच शरीरापासून विभक्त झालेलें चैतन्य संभवत नाहीं. कोणी म्हणतात कीं देह व चैतन्य यांच्या

संयोगाच्या अभावीं देखील भूतपिशाच्चादि सृष्टि दृष्टिगोचर होऊं शकते. परंतु या विधानावरूनच त्यांचा सिद्धान्त खोटा ठरतो, कारण शरीराशिवाय कोणताहि पदार्थ ज्ञानेंद्रियांस गोचर होणारच नाहीं. अनन्त विविध जीवसृष्टीमध्यें मानवी बुद्धीस आकलन न झालेले व न होणारे असंख्य जीव असूं शकतील. आज जी विद्यमान सृष्टि आहे तिजमध्यें शरीराच्या आकारमानावरून व बुद्धिसामर्थ्यावरून वेगवेगळया अशा जीवाच्या असंख्य पायऱ्या आहेत. त्यांपैकीं कांहीं प्राणि इतके सूक्ष्म आहेत कीं त्यांचें ज्ञान सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्यावांचून होतच नाहीं व कांहीं अति विशाल असून त्यांपैकीं ममॉथ व डोडो हे प्राणि प्रस्तुतकालीं विनष्ट देखील होऊन गेले आहेत असें शास्त्रकारांचें मत आहे. कांहीं जीव इतके सूक्ष्म असतात कीं मनुष्यादिक प्राण्यांच्या पायांखालीं प्रत्येक क्षणीं किती तुडविले जात असतील व अन्नपाण्याबरोबर किंवा श्वासाबरोबर किती त्यांच्या पोटांत नष्ट होत असतील याची गणती करणें कठिण आहे. अशा प्रकारची जीवहत्या अजाणपणें देखील आपल्या हातून घडूं नये म्हणून—

तैसे परमाणु पांगुतले ॥ जाणूनि जीव सोनुले ॥
तेथ कारुण्यामाजि पाउलें ॥ लपवूनि चाले ॥ १

—ज्ञानेश्वरी

या वचनाप्रमाणें साधुपुरुष भूमीवर चालतांना पावलें जपून टाकितात, जैन व बौद्ध लोक आपलें मुख आच्छादित ठेवितात आणि मारवाडी लोक पाणी गाळून पितात व रात्रीं जेवीत नाहींत.

दृष्टिपूतं न्यसेत्पादम् ।
वस्त्रपूतं पिबेज्जलम् ॥
—सुभाषित

म्हणजे, चालतांना पुढें पाहून पाय ठेवावा, पाणी गाळून घ्यावें इत्यादि वचनें सर्वमान्य झालेलीं आहेत. मनुष्यापेक्षां आकारमानानें व मनःशक्तीनें श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असे असंख्य जीव ईश्वराच्या सृष्टींत असूं शकतील यांत शंका नाहीं. या विश्वांत मानवी शास्त्रास अगम्य असे अनेक जीव असतीलच, कारण मनुष्यबुद्धीस पूर्वीं आकलन न झालेले असे प्राणि गोचर होऊं लागले आहेत.

ईश्वरानें आपल्या स्वरूपापासून असंख्यात प्रजा निर्माण करून अनन्त नामें व अनन्त रूपें धारण केलीं आहेत, तथापि आपल्या स्वरूपाची, गुणांची, शक्तींची व ऐश्वर्याची प्रतिमा म्हणजे मनुष्य यास उत्पन्न केल्यावर ईश्वरास अत्यन्त समाधान वाटलें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. खरोखर पहातां सृष्टिघटक ईश्वराचे नियम व आपणांमधील ईश्वरी तेजाचा अंश जी बुद्धि तदनुरूप वर्तन ठेविलें असतां नरका नारायण होईल यांत संदेह नाहीं. परंतु

चांगलं तुझपणुं ।
माझ्या जिवाला करवतु ।
चांद गलिनं हिंडतु ॥

या म्हणीप्रमाणें जितक्या जितक्या मनुष्यास ईश्वरापासून देणग्या मिळत गेल्या, तितकी तितकी त्याची अवस्था कष्टतर होत चालली. इतर जीवांची केवळ भोगयोनि असल्यामुळें उपजतबुद्धीवरच त्यांचा सर्व व्य-

वहार आटोपतो आणि तेणेंकरून ईश्वरी नियमांचा भंग न होतां निसर्गसिद्ध मार्गानें व संचिताप्रमाणें ज्या काय शारीरयातना होतील तेवढ्या भोगल्या म्हणजे झालें व त्यांस कांहीं मानसिक दुःखें सोसण्याची गरज रहात नाहीं. पण मनुष्याची स्थिति तशी नाहीं. इच्छाशक्ति, ज्ञानशक्ति, क्रियाशक्ति—या तर त्याच्यामध्यें एकवटल्या आहेत. उत्तम प्रकारची विवेकशक्ति असून स्वस्वरूपाविषयीं आंधळा झाल्यामुळें केवळ विषयसुखासाठीं मनुष्य रात्रंदिवस झटत असतो, सुख म्हणजे काय या गूढ प्रश्नाचा तत्त्वज्ञानदृष्टीनें विचार करितो, आणि कांहीं ठरीव सिद्धान्तांवर दृढ विश्वास ठेवून वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय अशा नियमांनीं बद्ध होतो व पशूंप्रमाणें केवळ उपजतबुद्धीनेंच आयुष्याचे दिवस कंठितो. कार्लाईल या इंग्लिश ग्रंथकारानें प्रज्ञेचें (genius) असें लक्षण केलें आहे कीं—अपरिमित श्रम करण्याची जी संवय तीच प्रज्ञा होय. अशा प्रज्ञेचा व्यवसाय करून वागणारे लोक थोडेच असतात, आणि स्फूर्तीनें काम करणारे लोक तर फार विरळा आढळतात. कृत्रिम संवयी, कृत्रिम गरजा, कृत्रिम दळणवळणाचे मार्ग, कृत्रिम सुखोत्पत्तीचीं साधनें—अशांनीं मनुष्याचे आचार, विचार, उच्चार ओथंबलेले असतात आणि तेणेंकरून सृष्टीच्या ज्या सत्यस्वरूपाकरितां तो तत्त्वज्ञानाची कांस धरितो तें हातीं न लागतां, असत्यानें गुरफाटलेलें विश्वाचें रूप मात्र नजरेस येतें आणि मनुष्य गोंधळून जाऊन जीविताचें खरें रहस्य त्यास कळत नाहीं.

प्राचीन काळीं जीविताचें रहस्य समजण्यास फारशी

अडचण पडत नसे, कारण धर्मग्रंथांवरून व सृष्टीच्या अवलोकनानें ईश्वरी नियमांचें ज्ञान होऊन तद्नुरूप मनुष्याची वागणूक होत असे. अर्वाचीन कालीं त्या धर्मग्रंथांची अवहेलना होऊन मनुष्याची वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीय रहाणीच कृत्रिम बनलेली आहे, आणि जीवितार्चे रहस्य तेणेंकरून अज्ञेय होत चाललें आहे. तेव्हां आधुनिक कालींहि त्या रहस्याची फोड होण्यास दिसण्यांत दुर्घट अशा उपायांचा अवलंब केला पाहिजे. निरंतर व्यासंग व विचार केल्याशिवाय,—ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें व मन यांचें नियमन करण्याची संवय असल्याशिवाय, लौकिक व्यवहार करीत असतांना स्वार्थपरवृत्तीवर दाब ठेविल्याशिवाय, जीविताचें रहस्य व सृष्टीचें खरें स्वरूप समजणें अशक्य आहे.

दुसरें असें कीं, जीविताचें रहस्य समजण्याकरितां त्याचा पाया जो विरोध किंवा द्वैत त्याचें स्वरूप उत्कृष्ट कळलें पाहिजे. पांढरेंच जर नसेल तर काळ्याची कल्पना होणार नाहीं, व उलट, काळें नसेल तर पांढरें लक्षांत येणार नाहीं. जर अपयश कधीं आलेंच नाहीं, तर यशाची आशा कोण करील? जर असत्य प्रचारांत नसेल, तर सत्याची मुळींच किंमत रहाणार नाहीं. सत्य व असत्य यांची जगांत अशी भेसळ होऊन गेली आहे कीं असत्यांतून सत्य निवडणें बहुतेक दुर्घट झालें आहे.

तिसरें असें कीं, ज्ञानाचा प्रकाश एकदां अन्तःकरणावर पडला म्हणजे न्यायाच्या व सत्याच्या मार्गानें जाण्यास धर्माचा किंवा कायद्याचा धाक दाखविण्याचें प्रयोजन नाहीं. तथापि हा प्रकाश मिळेतोंपर्यंत प्रा-

पंचिक व्यवहार करितांना क्रमानें शिक्षण देऊन मनानें व क्रियेनें स्वार्थत्याग करण्याकडे सर्व मानसिक शक्तींस वळण लाविलें पाहिजे. कर्तव्यकर्म करण्यांत यत्किंचित् कसूर न होतां स्वार्थत्याग झाला असतां आपोआप ज्ञान-प्रकाश होतो आणि सत्य-असत्य, बरें-वाईट, माझें-तुझें—इत्यादि द्वंद्वांचें मिथ्यात्व अन्तःकरणास कळून येतें.

मनुष्याचे जीविताशीं ज्या ज्या शक्तींचा, व्यवहारांचा व सृष्टिव्यापारांचा संबंध येतो व ज्यांच्या नियमनावर मानवी व्यक्तींचें, समाजाचें व राष्ट्राचें कल्याण अवलंबून असतें, त्या त्या शक्तींचें, व्यवहारांचें आणि सृष्टिव्यापारांचें ज्ञान सर्वांस व्हावें या उद्देशानें हा ग्रंथ लिहिला आहे. ज्या स्थितींत मनुष्य जन्मास आलेला असतो तीस अनुरूप अशीं कर्तव्यें त्यास करणें भाग आहे. व त्या स्थितीस अवश्य अशा गोष्टींबद्दल त्यास जबाबदार झालें पाहिजे. एकाद्या व्यक्तीचीं कर्तव्यकर्मैं व जबाबदारीचीं कामें दुसऱ्या व्यक्तीपेक्षां संख्येनें अधिक व महत्त्वानें जास्त जोखमीचीं असतील; तसेंच एकाद्या समाजाच्या विशिष्ट रचनेमुळें त्याच्या नियमनासाठीं कांहीं व्यक्तींस अधिक महत्त्व प्राप्त झालें असेल; तथापि विशाल राष्ट्राच्या घटनेमध्यें एकंदरींत सर्व व्यक्तींची सारखीच अवश्यकता आहे हें उघड आहे, कारण ईश्वरकृत व मनुष्यकृत अनेक विरोध व भेद असल्याशिवाय कोणत्याहि राष्ट्राचें जीवित टिकणार नाहीं.

मनुष्याच्या शरीरांत अनेक भाग असून प्रत्येक भागास विवक्षित काम करावें लागतें व त्या त्या कामामुळें त्या भागाचें महत्त्व प्रस्थापित होतें, आणि त्या भागानें

आपलें काम केल्याशिवाय इतर भागांस त्यांचीं कामें करितां येतच नाहींत. हीच गोष्ट एकंदर मानवी जीवितास व समाजास लागू पडते. जोंपर्यन्त एकादी व्यक्ति किंवा समाज अधिक महत्त्वाचा मानिला जातो, तोंपर्यन्त दुसऱ्या व्यक्ति किंवा दुसरे समाज गौण समजले जातात, तथापि एकंदर राष्ट्रघटनेस सर्व व्यक्तींची व समाजांची सारखीच आवश्यकता आहे हें कोणताहि दूरदृष्टि मनुष्य कबूल करील. त्याप्रमाणें जसजशी कामांची योग्यता वाढत जाते, तसतशीं तत्संबंधी कर्तव्येंहि अधिक दर्जाचीं व जबाबदारीचीं होऊं लागतात, आणि तीं कर्तव्यें जर नीट बजावलीं नाहींत किंवा त्यांचा जर दुरुपयोग केला तर त्यापासून मनुष्यमात्रास अगणित दुःखें भोगावीं लागतात.

अखिल विश्व निर्माण करण्यांत परमेश्वराचा कांहींहि हेतु असो, व त्या विश्वाच्या नियमनासाठीं ज्या ज्या प्रगमनशील किंवा नाशकारक शक्ति योजिल्या आहेत त्यांचें स्वरूप कसेंहि असो, एवढी गोष्ट खरी आहे कीं भूतमात्राच्या जीविताचा उद्देश सुखप्राप्ति हाच असून पुढेंहि तोच कायम राहणार. प्रत्येक प्राण्यास परमेश्वरानें जीं ज्ञानसाधनें दिलीं आहेत त्या साधनांस अनुरूप अशा रीतीनें तो प्राणि सुखप्राप्ति करून घेत असतो. जसें शिक्षण मिळालें असेल व जसा अनुभव घडला असेल त्या मानानें दिनचर्येच्या बाबतींत मनुष्य वागत असतो, यासाठीं ईश्वरदत्त साधनांचा उपयोग करून व सुखप्राप्तीकरितां आपल्या पूर्वजांनीं जे जे उपाय शोधून काढिले असतील त्यांपैकीं श्रेष्ठ व शाश्वत

कोणते हें निश्चित करण्याचा प्रयत्न प्रत्येकानें केला पाहिजे. प्रत्येक पिढींत उत्पन्न झालेल्या लक्षावधि मनुष्यांपैकीं कांहीं सहस्त्र मनुष्यें मात्र स्वजातीयांच्या धोपट मार्गाचें अतिक्रमण करून आपल्या स्वतःच्या उन्नतीकरितां व सुखप्राप्तीकरितां नवीन कल्पना काढून जातिबांधवांस ती कल्पना शिकविण्याचा प्रयत्न करितात. असा प्रयत्न करणाऱ्या सहस्त्रांपैकीं अगदीं थोड्या व्यक्ति मात्र स्वतःपुरता तरी इष्ट हेतु साध्य करूं शकतात असें म्हणतां येईल, तथापि आपण शोधून काढिलेला सुखप्राप्तीचा मार्ग इतरांस शिकवून तेणेंकरून त्यांची इष्टकार्यसिद्धि करून देण्यास त्या व्यक्ति समर्थ होत नाहींत. शिवाय अतीत काळीं जीवितक्रमाच्या नानाविध शाखांमध्यें सुखप्राप्तीचा खरा उपाय जरी अगदीं थोड्या महाशयांनीं शोधून काढिला असला, तरी तीव्र विरोध करणाऱ्या दुष्मानांनीं त्यांच्या जिवलग मित्रांस देखील त्या खऱ्या उपायाचा अंगीकार करून आपल्या जन्माचा फायदा करूं दिला नाहीं असे इतिहासांत दाखले सांपडतात.

प्रत्येक प्राण्याचा जडांश ( material portion ) त्याच्या पार्थिव जनकांपासून प्राप्त झालेला असतो व कांहीं नियमित मर्यादेच्या पलीकडे त्या देहांत फरक करितां येत नाहीं, परंतु मन व आत्मा एतद्रूपी जो चैतन्यांश ( spiritual portion ) उरतो त्याची उत्पत्ति मात्र ऐहिक जनकांपासून होत नाहीं. तथापि मनुष्याच्या जन्मापासून त्याच्या चैतन्यांशावर परिस्थितीचा अमर्याद परिणाम घडत असतो. ह्या चैतन्यांशाचा उ-

गम साक्षात् परमेश्वरापासून होतो आणि भूलोकीं निर्माण होऊन त्याची वाढहि तेथेंच झाल्यामुळें तो मर्यादित असतो, तथापि जशी दिशा लागेल त्या मानानें बरें किंवा वाईट बनण्याचा या अध्यात्म अंशाचा कल असतो. सजीव प्राण्यांचे हे जे जडांश व अजडांश आहेत त्यांचा विचार स्वतंत्र रीतीनें करितां येत नाहीं, कारण चैतन्यांशाशिवाय पार्थिवांशाचें अस्तित्वहि संभवत नाहीं. येणेंप्रमाणें दोन्ही अंशांचा अति निकट संबंध असून व पार्थिवांशाचा दुसऱ्या अंशावर कमीजास्त संस्कार घडत असून देखील, मनुष्याचें अस्तित्व त्याच्या आत्म्यावर अवलंबून राहतें; कारण, बाह्य उपाधीमुळें स्फटिकामध्यें जसे निरनिराळे रंग दृष्टिगोचर होतात तसे परिस्थितीचे संस्कार जरी आत्म्यावर भिन्न प्रकारानें घडत असतात, तथापि अशा क्षणिक विक्रियेनें आत्म्याचे स्वरूपांत बदल होऊं शकत नाहीं. परंतु अति निकट परिचयानें आत्मस्थितीवर कायमचा परिणाम घडला असेल तर मात्र गोष्ट निराळी.

मनुष्याच्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणीं पार्थिवांशांत फरक होत असतो आणि तो समजण्यांत तर बहुतकरून येत नाहीं, परंतु जेणेंकरून देहावसान होईल असा फरक मात्र कांहीं विवक्षित काल गेल्यावर हळू हळू नजरेस येऊं लागतो, आणि हा काल मनुष्याच्या भिन्न अवस्थांच्या मानानें निराळा असूं शकतो. पार्थिवांश व अजडांश हे जोंपर्यंत एकत्र आहेत तोंपर्यंत त्यांजमध्यें इतका निकट संबंध असतो कीं, केवळ चैतन्यांशाच्या क्रियेनें साक्षात् देहावसान जरी घडलें नाहीं,

तरी त्या क्रियेनें देहावसानावर विलक्षण परिणाम घडूं शकतो. मानवी चैतन्यांशाची उत्पत्ति कशी होते व लय कसा होतो हें तर कळतच नाहीं, म्हणून तो अनादि व अनन्त असलाच पाहिजे; याकरितां त्याची जोपासना इतकी जपून केली पाहिजे कीं निसर्गतः त्याजमध्यें असणारें जें अमरत्व त्यास दुसऱ्या विलोभनीय गुणांचीं जोड मिळून त्या मनुष्याचें जीवित त्यास अत्यंत उपकारक होऊन इतरांसहि त्याच्या अनुकरणानें आपलें जीवितसाफल्य सुलभरीतीनें संपादितां येईल. मनुष्याचा जडांश अन्य देहाशीं संयोग पावून कोणत्या तरी रूपानें मागें राहो अगर न राहो, इतकी गोष्ट खरी आहे कीं, तो पार्थिवांश देहावसानाबरोबर विनष्ट होऊन त्याचीं घटकद्रव्यें पंचमहाभूतांमध्यें लय पावतात, परंतु चैतन्यांश म्हणून जो आहे तो, त्या मनुष्याच्या संततीच्या रूपानें जरी शाश्वती पावला नाहीं, तरी जडांशाचा विनाश झाला असतांहि लिंगदेहानें मागें रहातो व शरीराच्या सान्निध्यांत असतां ज्या ज्या व्यक्तींस त्यांजपासून ज्ञानप्राप्ति झाली असेल त्या त्या व्यक्तींच्या उन्नत अध्यात्म रूपानें सातत्य पावतो.

मनुष्यमात्राच्या जीवितार्चें रहस्य काय आहे याविषयीं अनेक युगांमध्यें महापंडितांनीं नानातऱ्हेचे विचार प्रकट केले आहेत. हे विचार म्हणजे केवळ कल्पना किंवा शक्य वस्तूंचा निर्देश याच्या पलीकडे कांहीं असूं शकणार नाहीं. आपल्या आद्यंताविषयीं मनुष्यास कांहीं एक ज्ञान होणें नाहीं. प्रत्येक जीव जन्माच्या अगोदर कोण होता व मृत्यूनंतर त्याचें काय होणार

या दोन्ही गोष्टी मानवी ज्ञानाच्या बाहेरच्या आहेत. जन्ममृत्यूच्या दरम्यान कांहीं वर्षें जें मनुष्याचें चरित्र होतें व ज्याचें परिमाण व महत्त्व परिस्थितीच्या मानानें कमी-जास्त असतें तेवढ्याचें ज्ञान मात्र मनुष्यास प्राप्त होतें व भूगोलावरील त्याच्या जीवितावर या चरित्राचा अवश्य परिणाम घडतो. आपण कोण आहों, आपण कोणत्या स्थितीस पोहोंचण्यास पात्र आहों, आपण काय करण्यास समर्थ आहों, व जगाच्या उत्पत्तीपासून ज्या उच्च स्थितीविषयीं व इतिकर्तव्यतेविषयीं मनोराज्य करण्यांत मनुष्य गुंग असतो पण जी त्यास कधीं प्राप्त नाहीं, त्या स्थितीस किंवा इतिकर्तव्यतेस पोहोंचण्यास आपण काय केलें पाहिजे—इत्यादि गोष्टींविषयीं कांहीं एक निश्चित ज्ञान किंवा विचार न होतां बहुतेक व्यक्ति जशा जन्मास येतात तशाच मृत्युहि पावतात. अशी जरी खरी स्थिति आहे, तरी प्रत्येक मनुष्य आपल्या देशबांधवांची बऱ्याकडे किंवा वाइटाकडे प्रवृत्ति करण्यास आपआपल्या मगदुराप्रमाणें समर्थ होतो. प्रत्येक युगांत किंवा पिढींत दुसऱ्यास बुद्धिपूर्वक पीडा करावी असें जरी फारच थोड्या लोकांस वाटत असलें, तरी एकंदर प्रवृत्ति चांगल्याकडेच करण्यास मनुष्य कां समर्थ होत नाहीं—हें एक जीविताचें असें रहस्य आहे कीं त्याचा उलगडा होणें मानवी शक्तीच्या बाहेरचें काम आहे. तथापि प्राणिमात्राची पाहिजे तिकडे प्रवृत्ति करण्यास समर्थ अशी जी प्रधानशक्ति आहे, ती सर्व काल सर्व युगांमध्यें जीविताच्या हव्या त्या परिस्थितींत या रहस्यामध्यें नजरेस येते. भूमंडळावरील जी-

विताची संचालक शक्ति हीच होय आणि या शक्तीच्या पायावर अखिल सृष्टि उभी आहे. आर्य लोकांचा प्रणवरूप ओंकार किंवा सोऽहं भावना देखील हीच शक्ति होय. या भावनेवांचून एकहि जीव राहूं शकत नाहीं. या शक्तीशिवाय कोणतेंहि बरें-वाईट कृत्य, कोणताहि मनांतील विचार, किंवा कोणत्याहि इंद्रियाचें प्रत्यक्षीकरण प्रकाशित होत नाहीं. हें आत्मज्ञान म्हणजे एक निराळी सत्ताच होय. सर्व जीवित निजबोधावर अवलंबून रहातें, या ज्ञानास आळा घालितां येत नाहीं, आणि नाना युक्तींनीं आत्मानुसंधान व आत्मसंयमन केलें असतां व्यक्तिमात्राची उपयुक्तता वाढत जाते. म्हणून प्राण्याचा जडांश पंचभूतांमध्यें लीन झाला असतांहि, योग्य संयमनानें आत्मानुसंधान राखून पुष्ट झालेला चैतन्यांश आपल्या अशाश्वत उपाधींपासून वियुक्त झाला तरी बऱ्या-वाइटाचें ज्ञान त्यामध्यें कायम रहातें.

अशा रीतीनें शेंकडो किंवा हजारों वर्षांमागें पार्थिव शरीरांत जे चैतन्यांश अनुस्यूत होते ते अजून त्यांच्या अध्यात्म वंशजांत सजीव आहेत. प्रत्येक जड वस्तु रूपान्तर पावून नष्ट होते, परंतु जडाशीं मिलाफ होऊन गोचर होणाऱ्या चैतन्यांशाचें अस्तित्व कायम रहातें. या चैतन्यांशामध्यें (१) प्रत्यक्षीकरण (perception), ( २ ) विभावना ( conception ), ( ३ ) प्रतिभा अथवा स्फूर्ति ( intuition ), ( ४ )निश्चयात्मकता ( decision )—हे गुण अनुस्यूत असतात. नित्याच्या दिनचर्येमध्यें शिक्षण व अनुशासन हीं जशीं कोणत्याहि वर्तनक्रमांत अवश्य आहेत, त्याप्रमाणेंच

केवळ जडांशाच्या परिपोषाकरितां नव्हे तरि तन्निष्ठ चैतन्यांशाच्या अभिवृद्धीकरितां, वर लिहिलेल्या चार शक्तींची जोपासना व विकास इतक्या पूर्णतेनें व्हावयास पाहिजेत कीं त्यांमध्यें प्रत्यक्ष चैतन्य उत्पन्न होऊन तो पुरुष परमानंदांत राहून इतर सर्व लोकांमध्यें चैतन्य व प्रकाश यांचा विस्तार करण्यास समर्थ होईल. पण ह्या शक्ति जर तशाच गुप्त राहूं दिल्या व त्यांचा विकास होऊं दिला नाहीं, तर मात्र त्याचा परिणाम अन्य व्यावहारिक गोष्टींप्रमाणें असा होईल कीं, आलस्य व निद्रा यांची संवय लागून कांहीं कालानें संपूर्ण चेतना नष्ट होईल.

# प्रकरण २

## मनुष्याचें स्वरूप

( श्लोक )

स्वयं नृत्यसि किं प्रीतो । विपत्तौ विकलेंद्रियः ॥

क्षणं निश्चलमासीनः । पश्य संसारनाटकम् ॥ १

( आर्या )

काय सुखीं नाचसि वा दुःखीं उद्विग्न सत्य परिसावें ॥

निश्चल रहा क्षणभरी नाटक संसार हेंचि देखावें ॥ १

# प्रकरण २

## मनुष्याचें स्वरूप

सर्व प्राण्यांच्या जीविताचा उद्देश सुखप्राप्ति हा आहे आणि सृष्टिनिरीक्षणावरून असा सिद्धान्त ठरतो कीं, कांहीं तरी आनंदाचा लाभ झाल्याशिवाय प्राणिमात्राचें जगणें किंवा अभिवृद्धि पावणें अगदीं अशक्य आहे.

तत्कोह्येवान्यात्कः प्राण्यात्
यद्याकाश आनन्दो नस्यात् ।

—तैत्तिरीयोपनिषत्

म्हणजे, जर अन्तःकरणांत केव्हां तरी आनंद वाटला नाहीं, तर कोण जगेल किंवा प्राण धारण करील? याकरितां मनुष्य कोणत्याहि विपन्न स्थितींत असो, त्यास इष्टजनवियोग होवो, दारिद्र्य येवो, बंदिवास भोगावा लागो, ईश्वरी सत्तेनें कांहीं तरी समाधान वाटून त्यास अवश्य विश्रान्ति मिळते. सुखप्राप्तीच्या मार्गांतील अडचणी केवळ मनुष्यकृतीच्या असतात.

आर्य लोकांच्या मतीं मनुष्य उत्पन्न झाल्याबरोबर त्यामध्यें विवक्षित अवयव, इंद्रियें व तदन्तर्गत शक्ति निर्माण होतात आणि जड व अध्यात्म या दृष्टीनें त्यांचें वर्गीकरण येणेंप्रमाणें होतें:—

( १ ) नानाप्रकारचे संकल्पविकल्प करणें, अनुसंधान करणें, विवेचन करणें, व निश्चय करणें—या शक्तींनीं युक्त असें चैतन्य ( mind ).

( २ ) शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पांच वि-

षयांचीं ग्राहक अशीं कर्ण, त्वचा, चक्षु, रसना, घ्राण हीं पांच ज्ञानेंद्रियें.

( ३ ) भाषण, देणें-घेणें, गति, मूत्रोत्सर्ग, विष्ठोत्सर्ग ह्या क्रिया करणारीं अशीं जिव्हा, हस्त, पाद-उपस्थ, गुद हीं पांच कर्मेंद्रियें.

( ४ ) प्राण, अपान, व्यान, उदान व समान—हे पांच वायु. हे वायु नियमित स्थलांमध्यें संचार करून शरीरांत जीवनशक्ति उत्पन्न करितात आणि शरीराच्या निरनिराळ्या भागांतील अवयवांस व इंद्रियांस आपआपलीं कामें करण्यास समर्थ करितात. बाहेरचा वायु फुप्पुसांत घेणें हा प्राणवायूचा धर्म आहे; शरीरांत ज्या वायूंची गरज नाहीं ते बाहेर टाकणें हा अपान वायूचा धर्म आहे; व्यान वायु हा नखशिखान्त शरीराच्या सर्व भागांत व नाडींत फिरून व शरीराची आकृति कायम ठेवून प्रत्येक इंद्रियाला तरतरी आणितो; उदान वायूचा धर्म घशाखालीं उतरलेलें अन्न जठराग्नीस पोहोंचविणें व वाचाशक्ति उत्पन्न करणें हा आहे. शरीरांतील पचनक्रिया करून त्याच्या प्रत्येक भागास अन्नरस पोहोंचविणें व रुधिराभिसरण करणें हें समान वायूचें काम आहे. हे पांच वायु जीवनवेगाचींच रूपें आहेत.

हे अवयव, इंद्रियें व वायु, आणि पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश ह्यांनीं बनलेला पंचभूतात्मक जड भाग—इतकीं मिळून शरीर होतें. तें शरीर भूलोकावर कांहीं कालपर्यन्त भूतमात्रास अतर्क्य अशा अद्भुत जीवनवेगाच्या सामर्थ्यानुरूप नाना रूपें धारण करून आ-

पला व्यापार करीत असतें. देहामध्यें मुख्य चालक चैतन्य ( mind ) होय.

पादपः पवनेनेव देहश्चित्तेन चाल्यते ॥

—योगवासिष्ठ

म्हणजे, वायूच्या योगानें वृक्षाला चलनवलन होऊन त्याच्या शाखोपशाखा हालतात व त्याची स्थिरता नष्ट होते, त्याप्रमाणें चित्त हें देहाला चळविणारें आहे. वर सांगितलेले अवयव व इंद्रियें हीं मनाचीं साधनें आहेत व त्यांच्या साहाय्यानें तें मन आपलीं कामें करीत असतें. मन हें आत्म्याचेंच कार्य होय. आत्मा मनास त्याचीं कामें करण्यास समर्थ करितो, पण त्या कर्मांविषयीं स्वतः उदासीन रहातो. ही आत्म्याची स्थिति सूर्याप्रमाणें किंवा अग्नीप्रमाणें आहे. सूर्य क्षितिजावर असे तोंपर्यन्त त्याच्या प्रकाशानें व तो मावळल्यावर अग्नीच्या तेजानें मनुष्यमात्र व इतर प्राणि आपापलीं कामें करण्यास समर्थ होतात, पण सूर्य किंवा अग्नि त्या कामांविषयीं उदासीनच असतो. त्याप्रमाणें मन इंद्रियां करवीं कांहीं करो, आत्म्यास त्याची क्षति मुळींच वाटत नाहीं.

मन जेव्हां उत्पन्न होतें तेव्हां त्याबरोबर अनेक पूर्वग्रह (prejudices) हि असतात, त्यांस कोणी उपजतबुद्धि म्हणतात, व अन्यरूपांत किंवा परिस्थितींत जन्म पावल्याचें हें प्रमाण कोणी समजतात. मनाला बऱ्यावाइटाचें, सुखदुःखाचें व जीवात्म्याचें मर्यादित ज्ञान असतें. ह्या वासना किंवा पूर्वग्रह तदंगभूत असून देखील कार्यांच्या योग्यतेप्रमाणें हऱ्या त्या प्रकारचें रूप धा-

रण करण्याची शक्ति मनाला असते. पार्थिव शरीरांत प्रवेश झाल्यापासून मनावर अनेक संस्कार घडूं लागतात, व ते संस्कार आपल्या सामर्थ्यानुरूप मनास विशिष्ट प्रकारचें वळण लावितात. मनास जर सुखकारक परिस्थिति व उच्च ध्येयें ( ideals ) प्राप्त झालीं तर मनुष्यास साऱ्या जन्मभर महत्त्वाची व श्रेष्ठ प्रतीची कामगिरी करण्याचें सामर्थ्य येतें, तेणेंकरून ज्याशीं म्हणून त्याचा संबंध घडतो त्याच्या मनास उत्कृष्ट वळण लागतें. मनाच्या अंगीं प्रत्यक्षीकरणाची व विभावनेची अद्भुत शक्ति असल्यामुळें नाना प्रकारच्या विषयांवर त्याचा अंमल चालतो, पण जेव्हां एकच पदार्थ मनाच्या सर्व शक्तींचा केंद्र होतो, तेव्हां ज्या परमात्मस्वरूपापासून त्याची उत्पत्ति झालेली असते त्याचें सामर्थ्य चैतन्यास प्राप्त होतें. सर्व शक्तिमान् परमेश्वरापासून निर्माण झालेलें चैतन्य सर्व व्यक्तींत सारखें असून त्या व्यक्ति आपले हेतु पूर्ण करण्यास अपात्र कां ठरतात, आणि एकाच उगमापासून जन्म पावून व सारख्याच शक्तींनीं संपन्न असून सर्व मनुष्यांच्या अन्तःकरणांत अखिल वस्तूंचें एकसारखें स्वरूप कां येत नाहीं, तसेंच सर्व मनुष्य आपआपले हेतु साध्य करण्यास एकमेकांस साहाय्य कां करीत नाहींत व एकाचा लाभ तोच सर्वांचा लाभ असें कां मानीत नाहींत—या प्रश्नांचा उलगडा कसा करावयाचा हें एक सामान्य मनुष्यांस अतर्क्य असें जीविताचें रहस्य होय. यावरून हें उघड आहे कीं मनुष्याचें जीवित नाना प्रकारांनीं व्यक्त होतें. एकत्व हा त्या स्वरूपाचा पाया होय, कारण एकाच

उगमापासून म्हणजे केंद्रीभूत उत्पादक शक्तीपासून सर्व प्रकारच्या शारीर व अध्यात्म, दृश्य व अदृश्य, ज्ञात व अज्ञात–अशा शक्ति उदय पावतात. सर्व शक्तींचा कल एकाच उद्दिष्टाकडे असतो, तें कोणतें म्हणाल तर आत्मप्रतिष्ठापन किंवा अहंवृत्तीचा पुरस्कार (self-assertion) हें होय. हा हेतु साध्य करण्यांत प्राणिमात्राची उत्पत्ति, स्थिति व लय हीं संपून जातात. प्रत्येक जीवास असें वाटत असतें कीं, इतर सर्व प्राणि केवळ आपल्या गरजा पुरविण्यासाठीं उत्पन्न झालेले आहेत आणि एकट्या आपणास सुख व्हावें व इतर प्राण्यांपुढें आपली प्रतिष्ठा मिरवावी एवढ्याच करितां सर्व जग निर्माण झालेलें आहे. वास्तविक सर्व प्राणि एका अविनाशि ज्योतीच्याच ठिणग्या असून यदृच्छेनें प्राप्त झालेल्या द्रव्यांपासून अचिंत्य शक्तीच्या प्रभावानें उत्पन्न होऊन त्यास नाना रूपें, आकृति व गुणधर्म प्राप्त होतात व मानवी गणनेनें कमी-ज्यास्त कालपर्यंत सृष्टीमध्यें संचार करितात, आणि त्याच ज्योतीमध्यें लय पावतात, व त्याच उगमापासून त्याच शक्तीच्या प्रभावानें फिरून निर्माण होऊन तेथेंच लीन होतात. अशा रीतीनें सर्व जगाची रहाटी चालू आहे व तीस उत्कृष्ट उपमा म्हटली म्हणजे पर्वतांतून वहाणाऱ्या जलप्रवाहाचीच देणें योग्य आहे. एकादा निर्झर विशाल पर्वतांत उगम पावतो आणि मार्गांत येणाऱ्या उच्चनीच प्रदेशांतून वर-खालीं वहात वहात समुद्रास मिळतो, नंतर सूर्याच्या तापानें समुद्राच्या पाण्याची वाफ होऊन अन्तरिक्षांत जाते व ती फिरून पर्जन्याच्या रूपानें प-

र्वतावर पडून त्याचा दुसरा निर्झर बनतो. येणेंप्रमाणें आरंभ कोठें होतो व अंत कोठें होतो याचा पत्ता न लागतां जीविताचें चक्र सारखें चालू रहातें, आणि एकादे स्थळीं दृश्यपणें व दुसरे स्थळीं अदृश्यपणें क्षणमात्र मोठी खळबळ उडवून देतें; तथापि त्याच्या अस्तित्वाचें नियमन करणारी शास्त्रमर्यादा अज्ञातपणें संभाळून त्याचा सर्व व्यापार उदासीनपणें घडत असतो.

या जगांत प्रचलित असणाऱ्या अनंत व विविध शक्तींपैकीं एक अशी आहे कीं तिला निसर्गतः अग्रस्थान प्राप्त होतें. ही शक्ति शुभ व अशुभ या दोहोंकडेहि मनुष्यास प्रवृत्त करिते व सहचारि शक्तींस सुद्धां वळण लावण्यास समर्थ होते, आणि या सामर्थ्यामुळें हिच्या अंगीं जगत्कर्तृत्व संभवतें. ही शक्ति म्हणजे मन होय.

मनोहि जगतां कर्ता मनोहि पुरुषः स्मृतः ॥

—योगवासिष्ठ

म्हणजे, हें अखिल विश्व मनामुळेंच भासमान होतें, म्हणून मनच जगताचा कर्ता आहे. मनाच्या योगानें जगाचा उदय होतो, याकरितां मनाला पुरुष अशी संज्ञा देतात. हें मन कसें उत्पन्न होतें, भूगोलावर त्याचा उदय होण्यापूर्वीं तें कोठें असतें आणि पार्थिवांशापासून वियोग पावल्यानंतर तें कोठें जातें—या प्रश्नांची उपपत्ति विचारी महात्म्यांनीं भिन्न कालीं अनेक प्रकारांनीं केलेली आहे. ह्या रहस्याचा उलगडा मानवी विचारानें होत नाहीं, व त्याचें विवरण प्रत्येक मनुष्यास आपल्या स्वतःच्या समाधानापुरतें मात्र विशिष्ट मार्गानें करितां येतें. जडदेहामध्यें असतांना हें कोडें सोडविण्यास

जेव्हां एकाद्याचें मन समर्थ होतें, तेव्हां इहलोकींच्या हलक्या मित्रापासून तें दूर रहातें आणि ज्या अनन्त अपार तत्त्वापासून त्याची उत्पत्ति झाली त्यामध्येंच निमग्न होऊन जातें. मग मर्त्य प्राण्यास अगम्य अशा हिमालयासारख्या पर्वताच्या माथ्यावरील एकान्त व अत्युच्च शिखरावर बसून तें परमात्मस्वरूपीं निमग्न झालेलें मन संसार-नाटकाचें निरीक्षण करीत असतें. त्या नाटकांत बतावणी करणारीं पात्रें हीं त्याचेच देशबांधव असतात व ते बांधव अज्ञानानें किंवा अभिमानानें अंध होऊन आपल्याच मनोराज्यांतील अंधकारांत चांचपडत असतात. प्रत्यक्ष आपणामध्यें समीप असणाऱ्या परमेश्वरास न जाणून देव देव करीत अनेक तीर्थें, पर्वत, गुहा इत्यादि स्थळीं ते बांधव भटकत फिरतात व परमेश्वरप्राप्तीसाठीं अनेक भोंदू गुरूंची कांस धरितात, परंतु त्यांस कांहीं देव भेटत नाहीं. मग ते बांधव निराधार होऊन आपला पोषाख, स्वभाव, व दानत देखील बदलून टाकितात, आणि भलभलते उद्योग करून एका जन्मांतून दुसऱ्या जन्मांत अशा रीतीनें जीविताचें आक्रमण करितात; पण हें बंधन तोडणें त्यांच्याशिवाय कोणाचे हातीं नसतें.

बीजापासून वृक्षाची उत्पत्ति होते आणि तें बीज त्याच जातीच्या दुसऱ्या झाडाच्या फुलापासून झालेलें असतें. एथें कार्य कोणतें व कारण कोणतें हें या क्रियेचा जो जसा विचार करील तशा विचारावर अवलंबून असतें. शिवाय दुसरींहि आनुषंगिक कारणें असतात, कीं जेणेंकरून वृक्षास पुष्पच येत नाहीं किंवा बीजापासून

वृक्षाची उत्पत्ति होत नाहीं. अशीच मनुष्याच्या मनाची स्थिति आहे. मनुष्याचा जडदेह कसा उत्पन्न होतो हें सर्वांस ठाऊक असतें, कारण पृथ्वीवरील आईबापांवर तें अवलंबून असतें. तेथेंहि एक पित्याचें बीज कालेंकरून दुसऱ्या बीजाचें जनक होऊं शकतें. एक मनुष्य आपल्या आयुष्यांत अनेक कामें करितो असें वर्णन आढळतें, पण असें कोणाच्या लक्षांत येत नाहीं कीं एकच मनुष्य एकाच कालीं परस्परांहून अगदीं भिन्न व विरुद्ध देखील व्यवहार संभाळीत असतो आणि असल्या व्यवहारांचें नियमन केवळ मनाच्या समतेनेंच तो करूं शकतो. पहा, एक मनुष्य एकाच कालीं एका आईबापांचा मुलगा होतो, दुसऱ्या कोणाचा किंवा एकाद्या बहिणीचा भाऊ होतो, एकाद्या मुलाचा किंवा मुलीचा बाप होतो, एकाद्या नातवंडाचा आजा होतो; तसेंच एकच स्त्री एकाची मुलगी, दुसऱ्याची बायको, तिसऱ्याची बहीण, चवथ्याची आई, होऊं शकते. येणेंप्रमाणें प्रत्येक व्यक्तीचे नाना तऱ्हेचे संबंध होतात आणि तो मनुष्य हुशारीनें व शहाणपणानें एकाच काळीं सर्वांचा कोणी ना कोणी तरी बनून जातो. अडाणी मनुष्याचे मनांत देखील हे भिन्न व विरुद्ध व्यवहार ओळखण्याची अक्कल कशी उत्पन्न होते व ती कशी वृद्धि पावते ह्याचा कोणास चमत्कार वाटेल, पण मनुष्याची विलक्षण अवधारणाशक्ति आणि संवईचा व शिक्षणाचा परिणाम हीं लक्षांत आणिली असतां यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

हे भिन्न संबंध मनुष्यकृतीचे नसतात. जीवितरूपी

नाटकांत कांहीं काल सोंगाची बतावणी करण्याकरितां शरीररूपी पोषाख चढविल्यावर मनुष्याचें मन आपली कामगिरी योग्य रीतीनें बजावण्याकरितां आपल्या बरोबर कांहीं वृत्ति घेऊन येत असतें. त्या मनोवृत्ति येणें प्रमाणें आहेत:—( १ ) आदर ( २ ) अनुराग ( ३ ) भय ( ४ ) औदासिन्य ( ५ ) क्रोध ( ६ ) द्वेष. मनाच्या चरित्रास आरंभ झाल्यापासून ज्या वृत्तीस अधिक उत्तेजन मिळतें ती अतिप्रबळ होते आणि भूगोलावरील मनाच्या कामगिरीस निराळेंच वळण देते व संगतीप्रमाणें प्रत्येक मनोवृत्तीचें पोषण होतें. तसेंच ह्या मनोवृत्तीपासून कांहीं वासना व मनोवेग उत्पन्न होतात आणि त्या वासनांचा व वेगांचा जोर अथवा दौर्बल्य देखील परिस्थितीवर अवलंबून रहातें. ज्या मूल प्रकृतीपासून जीवित निर्माण होतें व जी प्रकृति जीविताचें बीज मानिली जाते, ती जर प्रबल असेल, तरच वर सांगितलेल्या मनोवृत्तींस यथेष्ट संचार करण्यास वांव सांपडतो. हें बीज म्हणजेच जीवात्मा होय. जीवात्म्याचा उगम कांहींहि असो, तो निर्माण झाला तरच निराळें मन किंवा निराळी व्यक्ति संभवते. एकाद्या इमारतीमध्यें अनेक भिंती घातल्या असतां, एका आकाशाचे किंवा स्थलाचे जसे अनेक विभाग होतात, त्याप्रमाणें जीवात्मभावामुळें एक मन अनेक मनांपासून विभागलें जातें. हा जीवात्मभाव ज्या मानानें समृद्धीस किंवा विलयास पावतो, त्या बरहुकूम अनुक्रमें मनाचें स्वतंत्र अस्तित्व स्थापित होतें किंवा मनच परमात्मस्वरूपांत निमग्न होऊन जातें. हा जीवात्मभाव जर अन्तःकरणांत प्रबल

झाला आणि जन्मकालीं व नंतर त्याचा योग्य परिपोष झाला, तर त्या मनुष्याचें मन प्रपंचांत गढून जातें, आणि प्रत्येक गोष्टींत त्यास सुखदुःखाचें भान होऊं लागतें; मग अहंकारानें अंध होऊन व प्रत्येक क्षणीं सुखदुःखांनीं व्याप्त होऊन भूगोलावरील त्याच्या चरित्राची समाप्ति होते. उलटपक्षीं हा जीवात्मभाव जर दुर्बल झाला, तर स्वतंत्र अस्तित्वाची भावना नष्ट होते आणि त्या मनुष्यास असें वाटूं लागतें कीं आपण परमात्म्याचाच एक अंश आहों. अशी जर एकदां मनाला जाणीव झाली, तर तो मनुष्य अशाश्वत जगाकडे सर्वदा उदासीनपणेंच पाहील.—

न केचन जगद्भावास्तत्त्वज्ञं रंजयन्त्यमी ॥
नागरं नागरीकांतं कुग्रामललना इव ॥

—वार्तिक

याचा अर्थ असा कीं—शहरांतील पुरुषास खेडेगांवची स्त्री जशी आवडत नाहीं, तद्वत् तत्त्वज्ञ पुरुषाचें मन जगांतील कोणताहि पदार्थ पाहून रममाण होत नाहीं. ज्ञानसंपन्न पुरुषाच्या मनाचा समतोलपणा कोणत्याहि गोष्टीनें ढळत नाहीं. अशा पुरुषाला प्रत्येक वस्तु जीविताच्या लाटेंतील बुडबुड्याप्रमाणें वाटेल, आणि संपत्तिं प्राप्त झाली असतां गर्वानें फुगून न जातां व विपत्ति आली असतां उद्विग्न न होतां प्रशान्त मनानें आयुष्याची मर्यादा असेल तोंपर्यंत भूगोलावर आपला काल घालवील. ज्या परमात्मस्वरूपाच्या बुडबुड्याप्रमाणें सर्व वस्तु आहेत त्याचेंच भान सर्वदां त्या पुरुषास राहील. तेव्हां, प्रपंचांत सर्व काल निमग्न असणें व आत्मज्ञाना-

च्या योगानें पूर्णपणें उदासीन रहाणें—या ज्या दोन अन्तिम अवस्था आहेत त्यांच्या दरम्यान अशा अवस्था आढळून येतात कीं त्यांमध्यें प्रपंचोन्मुखता व औदासिन्य यांचें अनेक प्रमाणानें मिश्रण झालेलें असतें. जगताचें किंवा जीवात्म्याचें विस्मरण झालें असतां जें अपूर्व सुख होतें, तें सुख दिवसाच्या चोवीस तासांत कांहीं कालपर्यन्त सुद्धां होत नाहीं अशी एकहि अवस्था नाहीं, कारण असें विस्मरण जर न घडेल तर शरीराचा व चैतन्याचा संबंधच रहाणार नाहीं. प्राण्याच्या जीवितास आनंद अवश्य आहे. कांहीं लोक स्वस्थ बसण्यांत किंवा विश्रान्तीमध्येंच आनंद मानितात, कांहीं शृंगारांत व इष्कांत, कांहीं नानाप्रकारच्या उद्योगांत, बहुतेक लोक तर द्रव्याशेची तृप्ति करण्यांत सुखप्राप्तीचा यत्न करितात. अशा रीतीनें कोणत्या तरी प्रकारानें जनसमाज सुखलाभाची इच्छा करोत, अखिल प्राण्यांचें निदानचें सुखसाधन निद्रा होय, कारण निद्रा ही शरीरापेक्षां मनासच अधिक विसांवा देते. जर निद्रेमध्यें मनास विश्रान्ति प्राप्त झाली नाहीं, तर स्वप्नें पडतात. स्वप्नें देखील अनेक प्रकारचीं असतात. कांहीं कांहीं स्वप्नें शान्तिप्रद असून त्यांपासून आनंद होतो, कांहीं स्वप्नांत सांसारिक चिन्ता व काल्पनिक दुःखें भरलेलीं असतात व त्यांपासून, जागृतावस्थेंत संसारापासून होणाऱ्या पीडेपेक्षां, अधिक पीडा मात्र होते. योग्य रीतीनें कळकळीचा प्रयत्न केला तरच जागृतींत किंवा स्वप्नांत निर्विकार शान्तीचा लाभ होतो. ही शान्ति संपादन करण्याकरितां प्रपंचाचा त्याग करून अरण्यांत

जाण्याची गरज नाहीं, किंवा ज्या स्थितींत आपणास जन्म आला असेल त्या स्थितींतील कर्तव्यकर्माचा त्याग करणें नलगे, किंवा ज्यास प्रापंचिक उद्योग म्हणतात त्यांतून क्षणभर देखील मन काढून घेण्याची आवश्यकता नाहीं. अशा स्पृहणीय शान्तीचा लाभ हवा असेल तर फक्त मनास चांगलें वळण द्यावें, ज्यास सुशिक्षण म्हणतात तें संपादावें, थंडपणा ज्याला समजतात तो सर्वकाल अंगीं आणावा, जीस कुलीनतेचा किंवा सौजन्याचा परिणाम मानितात अशा कलेमध्यें निष्णात व्हावें—कोणी कितीहि चेतविलें तरी मनाची समता कधींहि ढळूं देऊं नये, किंवा कांहीं काल हलकट लोकांशीं संबंध आला असला तथापि त्यांची बरोबरी करून हलकटपणा करूं नये. चित्ताची शुद्धि कायम राखण्याकरितां हलकट लोकांशीं संबंध होईल तितका थोडा आणावा, कारण मनाची घटनाच अशी आहे कीं दोन मनुष्यांचा परस्परसंबंध जडला असतां एकाचा दुसऱ्यावर कांहीं तरी संस्कार घडलाच पाहिजे, तो दुसरा अगदींच निष्क्रिय असेल तर मात्र गोष्ट निराळी. याकरितां विद्वान् लोक अशिक्षितांपासून सर्वदा दूरच रहाण्याचा प्रयत्न करितात, धार्मिक लोक अधार्मिकांचा सहवास करीत नाहींत, कर्तव्यदक्ष व निरपराधी मनुष्यें दुष्ट माणसांचा प्रसंग टाळतात, आणि बडे लोक जनसमाजाशीं शारीर किंवा मानसिक संबंध वर्ज करितात, कारण ते असें समजतात कीं, सामान्य जनांचें रक्त पिढ्यानुपिढ्या अशुद्धच रहातें व तें शुद्ध होण्यास योग्य परिपोषण मिळत नाहीं आणि त्यांचे अंगीं मन

कह्यांत ठेवण्याजोगें सौजन्यहि नसतें. वास्तविक पहातां, एका विशिष्ट जातींत किंवा कुटुंबांत मनाचे उत्कृष्ट गुण दृष्टीस पडावे असा भेदभाव मनुष्याचे जन्मापूर्वी मनाचें नियमन करणाऱ्या शक्तींमध्यें मुळींच नसतो.

भिकाऱ्याचि वेषें गुरुत्वासि पावे ।
प्रतिष्ठा शरीरा मनानेंचि धांवे ॥

या वचनांतील सत्यता सर्वत्र प्रतीतीस येते. जीविताच्या पाहिजे त्या अवस्थेमध्यें आपल्या कुलास व जातीस भूषविणारीं मनें उत्पन्न होतात, तसेंच कलंक लावणारींहि निर्माण होतात. हा विरोध म्हणजे भूगोलावरील चालक नियमच समजला पाहिजे. अंधकाराशिवाय प्रकाशाची किंमत कळत नाहीं, बेरंगी वस्तूशिवाय रंगाला कोणी विचारीत नाहीं, अज्ञानाशिवाय सुशिक्षणाला महत्त्व नाहीं, अशक्तपणाशिवाय बलाची आवड होत नाहीं, स्त्रीशिवाय पुरुष योग्यतेस चढत नाहीं, एकटा पुरुष अगदीं फुकट म्हणून स्त्रियांची योग्यता वाढते. भूलोकीं मनाची श्रेष्ठ स्थिति प्राप्त होण्यास हा जो विरोधाचा किंवा द्वैताचा नियम सांगितला तो पूर्णपणें लक्षांत आणून कह्यांत ठेविला पाहिजे. म्हणजे त्यामुळें आपला विचार किंवा आचार बिघडूं देतां कामा नये, आणि सृष्टीचा अव्याहत क्रम चालण्याकरितां परस्परविरुद्ध वस्तु अवश्य आहेत या सिद्धान्ताची बालंबाल खात्री झाली पाहिजे.

मनःकृतं कृतं राम । न शरीरकृतं कृतम् ॥

—**योगवासिष्ठ**

म्हणजे, जें कृत्य मनःपूर्वक केलें त्यालाच आपण कृत्य

केलें असें म्हणावयाचें, केवळ शरीराकडून जी क्रिया घडली ती आपल्याकडून घडली असें म्हणतां येत नाहीं. अनेक पंडितांचीं मनासंबंधी अशींच वचनें आहेत. तीं अशीं कीं—मनाची शक्ति अशी विलक्षण आहे कीं, बसल्या जागीं स्वर्गाचें पाताल व पातालाचा स्वर्ग तें करूं शकतें. चांगलें किंवा वाईट असें जगांत कांहींच नाहीं, कारण तें ठरविणारें मन होय. ज्या उद्देशानें पदार्थ निर्माण झाले आहेत, तो उद्देश एकीकडेच राहून मन त्यांना पाहिजे तें रंगरूप चढवितें. अशुद्ध अथवा अपवित्र कांहींच नाहीं; जो एकादी वस्तु अशुद्ध किंवा अपवित्र मानितो त्यालाच ती तशी दिसते. धर्मशास्त्रांत हेंच मत मान्य केलेलें आहे. जेव्हां एकादा मनुष्य कांहीं एक क्रिया करण्याचें मनांत आणितो व ती जाणून बुजून सिद्धीस नेतो, तेव्हांच ती क्रिया केल्याबद्दल त्यास जबाबदार समजतात.

अशा रीतीनें विचार करितां सकल सृष्टीचें व विशेषतः मनुष्याच्या नशिबाचें कर्तृत्व मनाकडेच येत असूनहि, तें मन आपणास इतकें क्षुल्लक कां मानितें, अग्नितेजापासून स्फुलिंगाप्रमाणें, परमात्म्यापासूनच आपली उत्पत्ति झाली आहे ही गोष्ट तें कां विसरतें व आपल्याच कल्पनातरंगांमध्यें सर्वदां गुंग कां रहातें, साक्षात् परमेश्वरापासून जन्म पावल्यामुळें प्राप्त झालेल्या उच्च स्थानापासून तें आपणास भ्रष्ट कां करितें आणि देहादि नश्वर वस्तूंची बरोबरी करून आपली योग्यता कां कमी करून घेतें—अशा प्रश्नांचा बारकाईनें शोध करणें अवश्य आहे.

प्राचीन ऋषींनीं असें ठरविलें आहे कीं, एका ज्योतीपासून जसे असंख्यात दीप प्रज्वलित होतात, तशा भिन्न भिन्न मनोरूप व्यक्ति सर्वव्यापक परमात्म्याच्या चिदाकाशापासून निर्माण होतात. आपण व्यवहारांत असें पाहतों कीं, मनुष्य वयांत येऊन जाणता झाल्याशिवाय अमक्या आईबापापासून आपण झालों हें देखील ज्ञान त्याला होऊं शकत नाहीं. त्याचे आईबाप कितीहि थोर कुळांतील असोत, त्याचा जन्म कितीहि उच्च स्थितींत झालेला असो, मनुष्यजातीची उन्नति किंवा अवनति करण्याचे कितीहि प्रसंग त्याला आलेले असोत—त्याची थोरवी किंवा उच्च पदवी त्याला योग्य रीतीनें समजून देईपर्यन्त आणि अनेक वर्षे उत्कृष्ट शिक्षण मिळून त्याची योग्यता त्याला कळेपर्यन्त—कमी प्रतीच्या देशबांधवांप्रमाणेंच आपल्या योग्यतेसंबंधानें तो अज्ञान रहातो, परिस्थितीविषयीं अंध असतो, आणि हलकट लोकांच्या संगतीनें हलकट स्थितींतच लोळत पडतो. आपले आईबाप थोर आहेत, तेव्हां आपली पदवीहि श्रेष्ठ आहे ही जाणीव एकदां त्याला झाल्याबरोबर आपल्या मित्रांपेक्षां व अनुयायांपेक्षां आपण वरच्या दर्जाचे आहों असें त्यास वाटूं लागतें. आपल्या हातून काय काय होण्यासारखें आहे तें त्यास कळूं लागतें आणि परमेश्वरानें आपल्या अंगीं ज्या ज्या शक्ति निर्माण केलेल्या आहेत त्यांचा पूर्ण उपयोग करण्यास तो झटूं लागतो.

ही स्थिति साध्य होण्यास जें शिक्षण हवें आहे तें संपादन करण्यास बहुत काल व श्रम अवश्य आहेत.

पण उंच पर्वतावर चढणाऱ्यास कांहीं कालानन्तर जसें शिखर नजीक दिसूं लागतें, तसें अनेक वर्षें अध्ययन व दीर्घ प्रयत्न केल्यानन्तर त्याचीं गोड फळें एकदम नजरेस येऊं लागतात. अशीच मनाची स्थिति आहे. अचिंत्य शक्तीच्या प्रभावानें आपल्या सर्वव्यापक जनकापासून जेव्हां मनाचा वियोग होतो, तेव्हां आपलें सामर्थ्य व स्वरूप जाणण्यास त्याचे अंगीं योग्यता रहात नाहीं. आपण क्षीण, अशक्त व निराधार आहों असें त्यास भासूं लागतें आणि क्षणिक संकल्पविकल्पांनीं ग्रस्त होऊन, आपल्या कष्टमय जीविताचें देखील त्याला ओझें वाटूं लागतें. भूगोलावरील आपला मार्ग क्रमण्यासाठीं ज्या पार्थिव शरीराचा आश्रय मन करीत असतें त्यापासून देखील त्याची संसारोन्मुखता व दुःखें यांचीच भरती होते. सृष्टीचें कार्य चालण्यास शरीर अत्यंत अवश्य आहे आणि त्यावांचून मन कांहीएक करूं शकत नाहीं. तथापि जर शरीरास नसतें महत्त्व दिलें तर अन्तर्यामीचें सत्त्व शोषून जाण्याची भीति रहाते; बरें जर शरीराची अनास्था केली आणि त्यामुळें त्याचा नाश झाला, तर त्याचे परिणाम मालकास भोगावयास लागून शक्य तितकें परहित साधण्याचा मार्गच अजीबात बंद पडतो. तेव्हां अडचण काय ती एवढीच आहे कीं, शरीराचें प्रस्थ कोठवर माजवावयाचें? याची अशी मर्यादा ठरवावयाची कीं त्या मर्यादेपलीकडे शरीराची प्रतिष्ठा चालविली तर त्याचा अमरबंधु जें चैतन्य त्याचा हटकून नाशच होईल. समतोलपणा राखिला असतां, उत्कृष्ट पद्धतीनें चाललेल्या इतर वस्तुस्थितीप्रमाणें, शा-

रीर व चैतन्य यांस आपआपली खरी स्थिति कळूं लागेल व परस्परांमध्यें विरोध नाहीं असें अनुभवास येईल, आणि एकाचें कल्याण तेंच दुसऱ्याचें कल्याण याची जाणीव होईल, तर जी मर्यादा हवी आहे ती सहज ठरेल व दोहोंचा जुटीनें कारभार चालून दोघांचें कायमचें कल्याण होईल.

पृथ्वीपासून परंपरेनें होणाऱ्या अनेक कणांपासून शरीर बनतें व ज्यांस पुरुष व स्त्री असें म्हणतात अशा शक्तींच्या क्रियेनें शरीर अस्तित्व पावतें. अशा रीतीनें एकत्र झालेल्या परमाणूंपासून जी आकृति उदयास येते, तिजमध्यें हजारों स्नायु, अस्थि, मज्जातंतु, नाड्या व मांसपिंड असतात, पांच ज्ञानेंद्रियें व पांच कर्मेंद्रियें असतात, अन्तर्बाह्य शारीरव्यवस्था रहाण्यास पांच वायु असतात आणि या सर्वांवर अनेकशक्तियुक्त चैतन्याचें अधिष्ठान असतें. शिवाय, ज्या देवतेस महाशय लोक आत्मा, अमर चैतन्य, आकाश, चिद्रूप असें म्हणतात, त्याच्या सर्वव्यापक निष्क्रिय प्रकाशाच्या आश्रयानेंच हें मन रहातें.

निष्क्रियं शान्तं निरवद्यं निरंजनम् ।

येणेंप्रमाणें या प्रकाशाचें वर्णन आढळतें. कारण सर्व लोकांस आपल्या प्रकाशानें उद्योग करण्यास समर्थ करून स्वतः अलिप्त रहाणाऱ्या सूर्याप्रमाणें हा आत्मा तदन्तर्गत विविध शक्तींस स्वसामर्थ्यानें उद्योग करण्यास उद्युक्त करितो.

# प्रकरण ३

## बाल्यतारुण्यादि अवस्था

बालस्तावत्क्रीडासक्तस्तरुणस्तावत्तरुणीरक्तः।
वृद्धस्तावच्चिन्तामग्नः परे ब्रह्मणि कोऽपि न लग्नः ॥१

**—शंकराचार्य**

(आर्या)

बालपणीं तंव क्रीडेमाजीं आसक्त तरुण ललनेशीं ॥
चिन्तामग्न सदा तो वृद्धपणीं कधिं न सक्त परमेशीं ॥१

# प्रकरण ३

## बाल्यतारुण्यादि अवस्था

मातेच्या उदरामध्यें नऊ महिने बंदिवासांत घालविल्यानंतर सर्वावयवसंपूर्ण, रूपानें सुंदर व पृथ्वीवरील जीवयात्रेस अवश्य अशा इंद्रियसामग्रीनें संपन्न अशी मनुष्याची आकृति बाहेर पडते. नऊ महिने उदरांत असतांना प्राण्यास अति दुःख होतें आणि ह्या अनुभवाचा उद्देश जणूं काय असा दिसतो कीं, जीवात्म्यानें आपलें अमरत्व व स्वस्वरूप विसरून जाऊन भूगोलावर असेतोंपर्यन्त क्षुद्र व निराधार देहामध्येंच सारा जन्मभर बुडून जावें किंवा प्राचीन आर्यांच्या मतांप्रमाणें पूर्वजन्मकृत अपराधांच्या व पापांच्या क्षालनाकरितां अनेक यातना भोगाव्या आणि त्या दुःखांची विचारणा करावी. चमत्कारिक व अद्भुत गोष्टी ऐकल्या म्हणजे ज्याला त्याला परम आश्चर्य वाटतें, परंतु नित्य क्षणोक्षण स्त्रीपुरुषांचा साहजिक संबंध घडून पुढें जो परिणाम होतो त्यापेक्षां अधिक चमत्कार कोणताच नाहीं, व हा परिणाम सुखदुःखांचे प्रसंगाशिवाय कोणाचे लक्षांत सुद्धां येत नाहीं. असें पहा कीं, एका साध्या व साहजिक क्रियेनें मनुष्याकृति असा जीव निर्माण होतो कीं तो आत्मा व बुद्धि यांनीं सुसंपन्न होऊन त्याच्यामध्यें जें अध्यात्म बल उत्पन्न होतें, त्याची योग्य जोपासना केली असतां सर्वशक्तिमान् परमेश्वराचे जवळ जवळ सामर्थ्य त्या जीवाच्या अंगीं येऊं शकतें. सृष्टी-

तील वनस्पतींमध्यें लहानसें बीज असतें, पण त्यांत अशी शक्ति प्रादुर्भूत होते कीं, शेंकडों वर्षें किंबहुना युगेंच्या युगें टिकणारें असें झाड बनतें, व मोठ्या काळजीनें व युक्त श्रमानें वाढविलेल्या आकृतींचे पुढें अत्यन्त तेजस्वी व रमणीय वृक्ष बनतात.

मानवी शरीरामध्यें मर्यादित शक्ति असतात. मनुष्याच्या वजनाच्या अर्धें वजन त्यास उचलण्याची मारामार पडते, पण आपला देह सहज उचलून वाटेल तिकडे वागाविण्याचें सामर्थ्य त्याला असतें. मनुष्याच्या मेंदूमध्यें मनाचें अधिष्ठान असतें व त्या मेंदूंत अपरिछिन्न कल्पनाशक्ति, निर्णायकशक्ति व ग्राहकशक्ति असतात, तथापि स्वतःचें ज्ञान होण्याची योग्यता त्याला नसते. शरीरामध्यें असणारीं पांच ज्ञानेंद्रियें जरी बाह्यतः केवल पार्थिवरूपी साधनें दिसतात, तरी त्यांच्यामध्यें शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यांचें परिज्ञान होण्याची शक्ति असते. अशा सशक्तिक देहास प्रथमतः कांहीं वर्षें तान्हेंपण व बाळपण या परस्वाधीन स्थितींमध्यें काढावीं लागतात. विशेषेंकरून या स्थितींमध्यें व बहुतेक सर्व जन्मभर शरीराची वाढ आणि जीवित देखील तीन कारणांवर अवलंबून असतें:—

( १ ) नाजुक व लहानग्या देहाची जोपासना.

( २ ) अन्न.—हें अन्न योग्य नसलें तर देहाचा व मनाचा वियोग तत्काल होतो.

( ३ ) देहास संचार करावी लागणारी बाह्य परिस्थिति.

आतां ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, पूर्व शिक्षण व बाह्य परिस्थिति यांचा जीवितावर जितका परिणाम घडतो तितका शरीर जन्म पावलेल्या कुलाचा मुळींच पडत नाहीं. ही गोष्ट स्पष्ट समजण्यासाठीं आपण असें पहावें कीं, उपजल्यापासून धारणाशक्ति प्राप्त होईपर्यन्त जर एकाद्या मुलास आईबापापासून वेगळें केलें व परकीय दंपतीच्या स्वाधीन करून हेच खरे आई-बाप अशी त्याची समजूत केली, तर खऱ्या आई-बापावर जितकी त्याची ममता व श्रद्धा बसली असती तितकी या नवीन आई-बापावर बसेल यांत संशय नाहीं. हीच गोष्ट तिर्यग्योनीसहि लागू पडते. मनुष्य वयानें मोठा झाल्यावर त्याच्या अनेक ओळखी होतात आणि त्यांवर त्याची ममता व विश्वास कमी-जास्त प्रमाणानें बसतात; परंतु दीर्घ कालाच्या संवईनें हा विश्वास दृढ झाल्याशिवाय, त्या मित्रांची आणि त्याची ताटातूट झाली असतां त्याच्या मनाचा समाधानवृत्तीवर फारसा परिणाम घडणार नाहीं. तसेंच जन्मास आल्याबरोबर जर एकादें मूल त्याच्या आई-बापापासून दूर केलें आणि दुसरेंच एकादें मूल आई-बापांना नकळत त्याचे जागीं ठेविलें तर आपल्या मुलाप्रमाणेंच परक्या मुलावर त्यांची ममता जडेल यांत शंका नाहीं. आपण आणखी एक उदाहरण घेऊं. समजा, कीं एकाद्या पितापुत्रांचा किंवा दोघां जिवलग मित्रांचा फार दिवस वियोग होऊन ते प्रवास करूं लागले, आणि वाट चालत असतां एका धर्मशाळेंत दोन खोल्यांत उतरले, पण परस्परांस स्नेहसंबंध मुळींच माहित नाहीं. रात्रीं एका खोलींत भयंकर

आरोळी ऐकूं येऊन शेजारच्या खोलींत निजलेल्याची झोंपमोड होते. स्नेहसंबंध माहीत नसल्यामुळें निजलेल्या मनुष्यास शेजारच्या मनुष्याची कींव न येतां उलट त्याची पीडा होऊं लागते, आणि धर्मशाळेच्या व्यवस्थापकानें त्या मनुष्यास घालवून द्यावें अशी तजवीज करण्यास तो चुकत नाहीं. पण दुसरे दिवशीं सकाळीं परस्परांचा स्नेहसंबंध कळल्याबरोबर दोघांची मनोवृत्ति अगदीं बदलून जाते व रात्रीं मदत न केल्याबद्दल परस्परांस दुःख होतें.

यावरून असें सिद्ध होतें कीं, उपजल्यापासून मरेपर्यंत मनुष्याच्या मनास जी कांहीं आवड नावड उत्पन्न होते ती खऱ्या स्थितीमुळें किंवा निसर्गसिद्ध वृत्तींमुळें होत नसून, फक्त प्रासंगिक-शिक्षणाचेंच तें फल होय. बाळपणीं पुरेसें अन्न व यथेच्छ झोंप एवढ्या गरजा पुरविल्या म्हणजे सुखास पारावार नाहीं. तथापि जागेपणीं बालकाच्या अन्तःकरणावर असे संस्कार घडत असतात कीं, त्यांचा अंमल त्याच्या सर्व चारित्रावर घडतो. या अवस्थेमध्यें—ज्ञान अज्ञान, खरें खोटें, घाण स्वच्छता, सुंदर कुरूप—यांचें भान त्यास मुळींच असत नाहीं आणि भय म्हणजे काय याची कल्पनाहि नसते. म्हणून या अवस्थेस निरुपाधिक स्थिति म्हणणें योग्य आहे. बालक अगदीं निरुपद्रवी व निराधार असल्यामुळें, बाह्य संस्कारांचा परिणाम या कालीं फारच घडतो आणि त्याचें भविष्यत्कालीन कल्याण किंवा अकल्याण या संस्कारांच्या जोरावर व स्वरूपावर अवलंबून असतें. प्रौढ मनुष्यास त्याच्या कृत्यांबद्दल जबाबदार समज-

तात, पण त्याच्या चरित्राच्या आरंभीं त्याच्या खुषी-वांचून जें शिक्षण किंवा जो समागम घडला असेल, त्यावर हीं कृत्यें बहुतेक अवलंबून असतात ही गोष्ट कोणाच्या लक्षांत देखील येत नाहीं. दुष्टपणा किंवा पाप याचें ज्ञान सुद्धां मुलांस कधीं होऊं देतां उपयोगी नाहीं; तीं वयांत आल्यावर जेव्हां त्यांचें शील बनेल व सुसंस्थापित होईल, तेव्हां मात्र वाईट गोष्टी त्यांच्या कानावर आल्या तरी फारसें नुकसान होणार नाहीं, कारण त्या वेळीं त्यांस अक्कल येते, शिवाय वाईट गोष्ट मुळींच टाळणें या जगांत तरी अशक्य आहे. जे लोक मुलांचीं मनें दुष्टपणाकडे व हलकटपणाकडे प्रवृत्त करितात त्यांजवर मुलांच्या पुढील कृत्यांबद्दल सर्व जबाबदारी येऊन पडते, तसेंच मुलांस चांगलें वळण लावून जो त्यांचा आयुष्यक्रम सुखकर व सफल करितो तो प्रतिष्ठेस पात्र होतो. बहुतेक व्यक्तींविषयीं असें म्हणावें लागतें कीं, लहानपणीं मुलांना वळण लावून ज्यांनीं उत्कृष्ट कामगिरी केली असें मानितात, तेच पुढें त्या मुलांचे हाडवैरी बनतात असें घडून येतें, आणि हा एक सृष्टींतील अद्भुत चमत्कार नजरेस येऊन, ईश्वर हव्या त्या शक्तींचा पाहिजे तो उपयोग करून घेतो हें तत्त्व सिद्ध होतें.

कुमार व पौगंड या अवस्था संपून किशोर स्थिति प्राप्त झाली असतां हळू हळू समंजसपणा उत्पन्न होऊन शरीराची वाढ होऊं लागते आणि त्याबरोबर पदार्थांचें प्रत्यक्ष ज्ञान अधिकाधिक होऊं लागतें. ह्याहि अवस्थेमध्यें संगतीच्या व शिक्षणाच्या मानानें चांगले

किंवा वाईट गुण अंगीं जडतात आणि मनुष्य मोठा झाल्यावर जरी बाह्य गोष्टींचा परिणाम कमी कमी होत जातो, तरी निर्भेद्य अन्तःकरणावरहि कांहीं तरी संस्कार घडल्याशिवाय रहात नाहीं. याकरितां साधुपुरुष असें म्हणतात कीं, मनुष्याचें कल्याण किंवा अकल्याण केवळ समागमावर अवलंबून असतें, आणि एका व्यक्तीस दुसरीपासून जसा केवळ स्पर्शानें एखादा रोग जडतो, तसा एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याच्या शुभ किंवा अशुभ वागणुकीचें अवश्यमेव अनुकरण करितो.

या कारणांकरितां सुधारलेले लोक अशिक्षित लोकांचा सहवास चुकवितात, ईश्वरनिष्ठ पुरुष दुष्टांची संगति टाळतात आणि कुलीन लोक हलकट मनुष्यास दूर करितात. वास्तविक पहातां, आजपर्यंन्त जें पाप म्हणून लोक मानीत आले आहेत, त्याचें निर्मूलन झाल्याशिवाय किंवा सदाचारी लोकांनीं अशा पापाचा अव्हेर केल्याशिवाय, देशांतील पुष्कळ लोक देखील उत्तम प्रकारचे व परिपूर्ण होण्याचा संभव नाहीं, मग एकंदर मनुष्यांची गोष्ट तर बोलावयासच नको.

उत्तम प्रकारचे शारीरिक, मानसिक व अध्यात्म उद्योग पुढील आयुष्यक्रमाचा पाया सुप्रतिष्ठित करण्यांत किशोरदशा घालवावी म्हणजे दुसऱ्याच्या आधारावरच रहाण्याची संवय कमी होत होत आत्मविश्वासाचा प्रभाव दिसूं लागतो. ही दशा संपल्यावर यौवनावस्थेस आरंभ होतो. कुमारदशेंत मनुष्य अगदीं निराधार असतो म्हणून या अवस्थेंत दुसऱ्यानेंच त्याचें अत्यंत काळजीनें पोषण केलें पाहिजे. पौगंड व किशोर

या अवस्थांमध्यें सुशिक्षण संपादावें आणि आत्मविश्वासाचा पाया बसविला पाहिजे. या अवस्थांचें निर्णायक असें पुढील वचन आहे.—

( श्लोक )

कौमारं पंचमाब्दान्ते । पौगंडं दशमावधि ॥
कैशोर मापंचदशात् । यौवनं तु ततः परम् ॥१

—योगवासिष्ठ

म्हणजे, पांच वर्षांचें वय होईपर्यन्त कुमारावस्था, दहा वर्षेपर्यन्त पौगंडावस्था, पंधरा वर्षेपर्यन्त किशोर अवस्था आणि तदनंतर यौवनावस्था. ही यौवनावस्था प्राप्त झाली म्हणजे निराळ्याच मार्गाचे आक्रमणास आरंभ होतो. कुमारदशेंत प्रबल विकार म्हणजे अन्नाची वासना व ती तृप्त झाल्यावर जी लहर येईल किंवा जो छंद लागेल त्याप्रमाणें वागण्यांत मौज वाटते. पौगंड व किशोर अवस्थांमध्यें क्षुधाशान्तीपेक्षां खेळण्यांतच अतिशय सुख होतें व या अवस्थांमध्यें जर योग्य काळजी घेतली नसेल किंवा परिपोषण नीट झालें नसेल, तर यौवनावस्थेमध्यें कोणा तरी स्त्रीची किंवा पुरुषाची मैत्री करण्यांत जीविताचें सर्वस्व आहे असें वाटूं लागतें. या दशेंत सर्व इंद्रियांची व शक्तींची पूर्ण वाढ होत जाते व पुढील मार्ग रेखण्यांत आणि जीवितकर्तव्यता साध्य करण्यांत मन गुंतून रहातें. तारुण्यांत जी तयारी होते तीच प्रौढपणीं कायम होऊन परिपक्क स्थितीस पोहोंचते.

बहुतकरून असें पहाण्यांत येतें कीं, जन्मापासून उत्तम शिक्षण मिळाल्यामुळें कांहीं बुद्धिमान् मनुष्यें आपल्या तारुण्याचा व उमेदीचा असा उत्कृष्ट उप-

योग करितात कीं, तेणेंकरून त्यांची प्रतिष्ठा वाढून साऱ्या जन्मभर त्यांच्या बांधवांस व इष्टमित्रांस सुखच प्राप्त होत जातें. भूलोकीं बुद्धि, मान्यता, संपत्ति, अधिकार वगैरे ज्या गोष्टी स्पृहणीय वाटतात त्यांचा लाभ होणें ज्यांच्या नशिबीं येतें त्या मंडळींत असे बुद्धिमान् पुरुष क्वचित् आढळण्यांत येतात. ज्या आईबापांस जीवनकलह मोठा दुर्घट वाटला असेल व ज्यांच्या अंगीं त्या कलहांतून पार पडून टुमटुमित रहाण्याचें सामर्थ्य आलें असेल अशाच आईबापांच्या पोटीं असले बुद्धिमान् पुरुष निपजूं शकतात. अगदीं प्राचीनकाळापासून ह्या काळापर्यन्त सर्व देशांत मनुष्यमात्राचें निरीक्षण निष्पक्षपातपणें केलें असतां, ज्या ज्या अवस्था मनुष्यास श्रेष्ठ व विलोभनीय अशा वाटतात, त्या अवस्थांमध्यें अशी बुद्धिमत्ता सांपडणें कठीण आहे. शिवाय, विलक्षण प्रतिभा अथवा प्रज्ञा उत्पन्न होण्यास कांहीं विशिष्ट प्रकारचीं नैसर्गिक अथवा प्रासंगिक कारणेंच अवश्य आहेत, आणि हें एक जीविताचें अद्भुत रहस्य असून त्याचें विवरण मानवी शक्तीबाहेरचें काम आहे. प्रज्ञावान्, महाशय किंवा विजयसंपन्न पुरुषांच्या मुलांस मित्रमंडळीच्या उपयोगीं पडण्याचे किंवा त्यांच्यामध्यें प्रतिष्ठा मिळविण्याचे प्रसंग पुष्कळ येऊं शकतील आणि मनाच्या दुर्बलतेमुळें व पूर्वविचाराच्या अभावामुळें आपल्या स्नेहीसंबंध्यांस ते विनाशाच्या पंथास नेऊं शकतील. परंतु अशीं मुलें आईबापांच्या योग्यतेचीं झालीं किंवा निदान आईबापांस शोभतील अशीं झालीं—हीं उदाहरणें इतिहासांत क्वचित् आढळतात.

हीच गोष्ट राष्ट्रांस व जातींस ( races ) लागू पडते, कारण जाति व राष्ट्रें झालीं तरी व्यक्तींचेच समुदाय असतात. भूलोकावरील अशा चमत्कारिक स्थितीचा उलगडा हाच आहे कीं, मनुष्यास अवगत असलेल्या इतर नैसर्गिक किंवा रासायनिक शक्तींप्रमाणेंच, प्रज्ञावान् अथवा प्रतिभासंपन्न महात्मे लोक अदृश्य वेगानें प्रचलित होणाऱ्या अनेक शक्तींचींच कार्यें असतात, किंवा पुनर्जन्माच्या मताप्रमाणें कांहीं स्वतंत्र मनोदेवता जगाचें रहाटगाडगें चालविण्यासाठीं निर्माण झालेल्या असतात व निरनिराळीं रूपें धारण करून त्या देवता मनुष्यसमाजास सामान्यपणें पूर्ण अवस्थेस पोहोंचवितात आणि मनुष्यांमध्यें पुनर्जन्म घेण्यांत त्यांस विशेष प्रकारचा आनंद वाटत असतो. तेव्हां या चमत्काराचें विवरण कांहींहि असो, मनुष्यापुढें जसा प्रकाश पडेल तसें वस्तुदर्शन होतें आणि व्यवस्थितपणें मर्दानी प्रयत्न केला असतां पाहिजे त्या कामांत साध्य असेल तर जय मिळतो यावरून असें दिसतें कीं, मानवी सुख व पूर्णता हीं जर साध्य असतील तर तारुण्यामध्यें ज्या उमेदीचा व साहसाचा विकास होण्यास आरंभ होतो त्यांच्याच प्रभावानें हीं प्राप्त होतात.

कुमारपणीं नीट पोषण झालें असतां आणि पौगंड व किशोर दशेंत चांगल्या देखरेखीखालीं योग्य वळण लागलें असतां, जीवितकर्तव्य व सुख यांच्या लाभाकडे जाणारा यौवनाचा मार्ग सहजगत्या सुखकर होतो. कुमारदशेंतील परिपोषण म्हणजे पोटभर पाचक अन्न, नीटनेटकें वस्त्रप्रावर्ण, व प्रेमानें कुरवाळणारीं माणसें—हें-

च बहुशः समजलें जातें, आणि पौगंड व किशोर दशें-तील देखरेख याचा अर्थ शरीरास कोणत्याहि प्रकारची इजा न होण्याबद्दल खबरदारी असा समजावयाचा. अशा प्रकारची शक्य तेवढी तजवीज जरी केली, तथापि चमत्कार असा आहे कीं याहून अधिक महत्त्वाची जी मुलांच्या आचार संबंधाची आस्था तिचा मात्र हवाला हरवक्त दैवावरच सोंपविला जातो. आईबापांस कर्तव्याची चाड असेल व मुलांच्या गरजांकडे लक्ष देण्यास फुरसत असेल तर मात्र गोष्ट निराळी,—बाकी परकी पालकांच्या ताब्यांत आपलीं लाडकीं मुलें देणारेच बहुतेक आईबाप असतात. हे पालक पोटाकरितां धंदा करणारे असतात, म्हणून ज्या गोष्टींवर मुलांचें जन्माचें कल्याण अवलंबून रहातें अशा गोष्टींकडे त्यांचें लक्ष लागण्याचा संभव कमी असतो; मग हे पालक देवमनुष्य असतील किंवा त्यांचा पूर्वेतिहास साधुवृत्तीचा असेल तर मात्र गोष्ट निराळी समजली पाहिजे.

मोठेपणीं उत्तम रीतीनें आयुष्य घालविण्याकरितां मुलांस किंवा मुलींस शिक्षण देण्याच्या कामांत आईबापांनीं किंवा पालकांनीं प्राविण्य संपादिलें पाहिजे व तें काम फारच जपून केलें पाहिजे. कारण ते जर अज्ञान किंवा निष्काळजी असतील, तर इतरांनीं शिक्षणाच्या कामांत केलेले सर्व परिश्रम फुकट जातील. लक्षावधि मनुष्यांपैकीं दहा-पांचच थोर महात्मे निपजतात याचें तरी बीज हेंच असलें पाहिजे. मोठेपणा व थोरपणा अंगीं येण्यास ईश्वरदत्त असंवेद्य गुण अवश्य असून कुमार दशेंत बुद्धिमान् व हुशार लोकांकडून परिपोषण मिळालें

पाहिजे; पौगंड व किशोर दशेंत उन्नतिकारक शिक्षण व परिस्थिति असावी लागते; आणि यौवनावस्थेंत अत्युत्तम समागम झाला पाहिजे. तारुण्यांत बरे किंवा वाईट गुण अंगीं जडतात हें संगतीचें सामर्थ्य होय. वर लिहिलेल्या गोष्टींशिवाय तरुणपणीं ग्रंथवाचनाचाहि परिणाम अन्तःकरणावर घडत असतो आणि साऱ्या जन्मभर ज्या ठरीव मतांच्या अनुरोधानें मनुष्य वागत असतो तीं सुद्धां याच अवस्थेंत बनतात. जीवित-संग्रामांत विजय मिळविण्यासाठीं जर अभेद्य कवच हवें असेल, तर तारुण्यांत स्पृहणीय ज्ञान संपादन करून त्याचा अनुभव घेतला पाहिजे आणि सत्समागमांत सर्व कालाचा व्यय केला पाहिजे. जर दीर्घायुष्य पाहिजे असेल व त्याचा जनसमुदायास पूर्णपणें उपयोग व्हावा अशी इच्छा असेल, तर एक क्षण देखील फुकट न दवडितां, क्षुल्लक किंवा हलकट विचार मनांत देखील आणतां कामा नये. मनुष्याचें दीर्घायुष्य म्हटलें म्हणजे शंभर वर्षें होय, त्यापैकीं एकतृतीयांश निद्रेंत अवश्य समजून घातलाच पाहिजे, दुसरा तृतीयांश बाळपणांत व वार्धक्यांत पराधीनतेमुळें फुकटच जातो आणि राहिलेल्या तृतीयांशाचा पुष्कळ भाग अपरिहार्य दुखण्याबहाण्यांत व सामाजिक कर्तव्यांत घालविणें जरूर आहे. तेव्हां पूर्णायुष्य जरी प्राप्त झालें, ( व असें क्वचितच घडतें ) तरी ज्ञानप्राप्तीसाठीं आणि ज्या प्रकाशाचा एकदां लाभ झाला असतां अंधकाराकडे मनाचा कल कधींच होत नाहीं, अशा ज्ञानप्रकाशांत चित्त रममाण होण्यासाठीं थोडींच वर्षें उरतात. विषप्रयोगासारख्या अनेक भौ-

तिक संकटांपासून आपलें व स्वकीयांचें संरक्षण करणें हें सर्वसाधारण आहे, परंतु मूलतत्त्वांतच म्हणजे ठरीव मतांतच ( principles ) विषाचा शिरकाव झाला असतां भौतिक विषापेक्षां शतपटीनें अधिक भयंकर परिणाम घडून येतात ही गोष्ट बहुतेक लोक विसरतात. भौतिक विषाची बाधा नियतकालिक असते आणि ज्या शरीराचा कधीं तरी अवश्य क्षय व्हावयाचा त्याचाच त्यापासून नाश होतो; परंतु मानसिक किंवा अध्यात्म भागांत प्रविष्ट झालेल्या विषापासून विषयुक्त मनुष्याला जन्मभर पीडा भोगावी लागून त्याच्या स्नेहीसंबंध्यांसहि त्रास होतो, आणि जर देहाबरोबर चैतन्याचा नाश होत नसेल तर अनन्तकालपर्यन्त परंपरेनें दुःखाचा प्रसार होत जातो.

याकरितां सदाचारसर्वस्वाकडे व आध्यात्मिक पूर्णतेचें संपादन करण्याकडे तारुण्यदशेंतच सर्व पौरुषाचा व प्रयत्नांचा रोख असला पाहिजे. बुद्धीनें पदार्थाचें प्रत्यक्षीकरण ( perception ) होत होत दृढ झालेल्या संवयीपासून व शिक्षणापासून सदाचाराचा व नीतीचा उगम होतो. भूलोकावरील सांप्रतची स्थिति अवलोकन करितां दुःखाचा अजीबात प्रतिकार होणें असंभवनीय आहे, आणि ज्या अर्थीं त्याचा समूळ नाश होणें अशक्य आहे त्या अर्थीं अनेक युगांमध्यें महात्म्यांनीं जनसमूहास ज्या पूर्णावस्थेप्रत नेण्याचा प्रयत्न केला आहे त्या अवस्थेस पोहोंचणें मनुष्यमात्रास अशक्य आहे; तथापि कांहीं व्यक्तींस योग्य दिशेनें शिक्षण मिळाल्यास निदान त्यांच्या पुरतें तरी अनन्त अपार सुख प्राप्त हो-

ण्यास कांहीं हरकत नाहीं, आणि बिघडलेल्या देशबांधवांस ताळ्यावर आणून व शाश्वत सुखाची दिशा दाखवून कधीं काळीं त्या सुखाचा अनुभव करून देणें अशा व्यक्तींस खरोखर सुलभ आहे. आधिभौतिक व अध्यात्म संपत्तीमध्यें असें अन्तर आहे कीं पहिली संपत्ति एकाची कमी झाल्याशिवाय दुसऱ्यास प्राप्त होणें नाहीं, परंतु दुसरी संपत्ति एकानें दुसऱ्यास देतां येते, आणि चमत्कार असा आहे कीं या वांटणीमध्यें देणाराचा कांहीं एक तोटा न होतां उलट तो अधिक संपन्न व सुखी होऊन जातो.

कुमार, पौगंड, किशोर, यौवन, प्रौढ, 'वृद्ध, स्थविर— या सर्व दशांमध्यें सकल मनुष्यांस अत्यन्त प्रिय अशी अवस्था म्हटली म्हणजे यौवनदशा होय. स्वर्गांतील रहिवाशी याच दशेंत सर्वकाल असतात असें जें वर्णन अनेक ग्रंथांत आढळतें त्याचें तरी बीज हेंच आहे. शरीर आणि चैतन्य यांच्या संयोगानें जीवाची उत्पत्ति होते असें पूर्वीं सांगितलें आहे, तेव्हां अर्थात् शरीराच्या स्थितीप्रमाणें मनाची अवस्था होणें स्वाभाविक आहे. शरीर तरतरीत असेल तर मनास हुशारी वाटते. तथापि शरीराच्या अवस्था बदलल्या असतांहि, म्हणजे शरीर वृद्ध झालें तरी, मनाचें तारुण्य कायम असणें ही जीविताची श्रेष्ठ स्थिति मानिली जाते.

( श्लोक )

शैशवं वार्धकं ज्ञेयं । तिर्यक्त्वं मृतिरेव च ॥
तारुण्यमेव जीवस्य । जीवितं तद्विवेकि चेत् ॥१

—योगवासिष्ठ

म्हणजे, बाळपण व वार्धक्य ह्या दशा पराधीनतेमुळें व्यर्थ जातात. या अवस्थांमध्यें फलद्रूप असा कांहींच उद्योग घडत नाहीं, म्हणून पशुपक्ष्यांच्या जीविताप्रमाणें हा काल फुकट गेल्यामुळें मृत्यूसारखाच समजला पाहिजे. परंतु मनुष्य जर विवेकसंपन्न असेल, तर सर्वदा तो तरुणच असतो. विवेकसंपन्नतेमुळें जर एवढा चमत्कार घडतो, तर प्रज्ञा व प्रतिभा ही जोडी जागरूक राहिल्यास वार्धक्य व मृत्यु यांस पूर्णायुष्य भरेपर्यंत तर दूरच राहिलें पाहिजे. उपासनासिद्धीमुळें जरा व मृत्यु यांचा लय होतो, ह्या आर्यधर्मांतील तत्त्वाचें रहस्य हेंच होय.

तारुण्य संपल्यानंतर प्रौढावस्था प्राप्त होते. या अवस्थेंत सर्व शारीरिक व मानसिक शक्ति, इंद्रियें व अवयव पूर्ण विकास पावतात, आणि तारुण्यांतील मदावर दाब ठेवण्याकरितां संथपणा व सहनशीलता या प्रतिबंधक गुणांचा उपयोग करण्यास मनुष्य समर्थ होतो. कौमार्यापासून यौवनदशा सरेपर्यन्त मध्यंतरींच्या कालाचा योग्य उपयोग केला असेल व छिचोरपणांत किंवा दुष्ट संगतींत हा काल फुकट दवडिला नसेल, तर पूर्वीं संपादन केलेलें ज्ञान प्रौढावस्थेंत व मध्यम वयांत शाश्वतसुखप्राप्तीकडेच लावितां येतें, आणि खऱ्या मार्गाचें ठळक उदाहरण जगापुढें ठेवितां येतें. या वेळेस शुभ व अशुभ या दोन समकालीन व समानशक्तिक प्रवाहांतून जावें लागतें. ज्या मानानें एक प्रवाह आंवरून धरावा, त्याच मानानें दुसरा प्रवाह अधिक वेगानें वाहूं लागतो. जर अशुभ प्रवाह सबंध आंवरितां आला, तर

शुभ प्रवाह अखंड चालू राहून जिकडे तिकडे सुखाचाच फैलाव होतो. अशुभ प्रवाह आंवरून धरण्याकडे मानवी प्रयत्न सर्वकाल चालू आहे, परंतु हा प्रयत्न इतका कमकुवतीचा व धरसोडीचा असतो आणि त्याचा शेवट अहंकारानें इतका ग्रस्त झालेला असतो कीं, आपण अशुभ प्रवाहाच्या पार पडलों असें थोड्या लोकांसच फक्त अन्तर्यामीं वाटत असतें, परंतु सामान्य मनुष्यास तो मुळींच आंवरितां येत नाहीं, आणि आज सुख तर उद्यां दुःख अशा विचित्र स्थितीमध्यें जनसमूहास आयुष्याचे दिवस कंठावे लागतात.

शुभाशुभ प्रवाहांतून पार पडल्यानंतर मनाचा मार्ग तीन दिशांनीं फुटतो. त्यांपैकीं पहिलीस सत्त्वभूमिका म्हणतात. या दिशेनें गेलें असतां सत्य, ज्ञान, परोपकार, स्वार्थत्याग, प्रसाद व शान्ति हे टप्पे लागतात. सत्त्वभूमिका साध्य झाली असतां अखिल विश्व परमात्मस्वरूप आहे आणि परमात्मा सर्व विश्वांत भरलेला आहे या भावनेमध्यें अहंकार लीन होऊन जातो. या जाणिवेमुळें अहंकाराचें प्रतिष्ठापन आणि इतर प्राण्यांवर अंमल चालविण्याची किंवा त्यांस पीडा करण्याची आकांक्षा या वृत्तींचें वैयर्थ्य अनुभवास येतें. ह्या भावनेबरोबर सर्वव्यापक आणि सर्वत्र भरलेला असा जो परमात्मा त्याचा अनुभव येऊं लागतो. हा अनुभव एकदां कायम झाला म्हणजे ज्या परमात्म्यापासून जीवाची उत्पत्ति होते, त्याचें शक्तिमत्त्व जीवास प्राप्त होतें आणि मग तो जीव इच्छामात्रेंकरून सर्व जडावर आणि चैतन्यावर सत्ता चालवूं शकतो. हें जें संपूर्ण

जीवबांधवांवर अध्यात्मदृष्टच्या अधिकार चालविण्याचें सामर्थ्य येतें, तें ऐहिक व्यवहारांत देखील वारंवार नजरेस पडतें, फरक इतकाच कीं प्रापंचिक सामर्थ्य परमात्मभावनेमुळें निर्माण होत नाहीं, तरि अधिकारी पुरुषाचें परमात्मस्वरूपाशीं अंशतः तादात्म्य होऊन आत्मस्वरूपाशीं वैषम्य पावलेल्या अधिकृत पुरुषाशीं संबंध झाला असतां, हें सामर्थ्य विकास पावतें. शिवाय आपणापेक्षां निर्बल पुरुषांवरच ही सत्ता चालते, पण समानशक्तिक किंवा प्रबलतर पुरुषांशीं संबंध जडला असतां, हें सामर्थ्य थिजून जातें किंवा निःसत्त्व होतें.

सत्त्वगुणाधिष्ठित पुरुषाचा स्वभावच असा असतो कीं लोकांस साहाय्य करून त्यांचें कल्याण करावें व असें करितांना पारितोषिकाची किंवा स्तुतीची आशा त्याला बिलकुल नसते, शिवाय कायावाचामनेंकरून दुसऱ्यास तो कधींहि पीडा करीत नाहीं.

दुसऱ्या दिशेस रजोभूमिका म्हणतात. या दिशेनें गेलें असतां असें वाटतें कीं जगाचें पाऊल जेणेंकरून पुढें पडेल, असे नाना प्रकारचे उद्योग करावे आणि अधिकाधिक विषयप्राप्तीनें व ऐहिक उन्नतीनें जगाचें सुख वाढेल. ह्या दिशेनें जाऊन सिद्धि हवी असेल तर पहिल्या भूमिकेंतील सर्वत्र ब्रह्मभावना थोडी तरी पाहिजे, परंतु या भूमिकेमध्यें आध्यात्मिक सामर्थ्यावर आणि पावित्र्यावर सर्वस्वीं अवलंबून न रहातां मनाचा कल जडाकडे फार असतो, तसेंच परमात्मभावनेमध्यें दुर्बल अशा प्रतिबंधक शक्तींशीं झगडूनच विजय मिळवावा लागतो. या मार्गामध्यें जसजशी चिकाटी जास्त व प्र-

यत्न दीर्घ तसतसें अधिक यश संपादन होतें, परंतु असें बहुधा अवलोकनांत येतें कीं हा प्रयत्न जर भिन्न भिन्न प्रकारांनीं केला असेल तर ऐकाग्र्याचा अभाव घडून उपयोजित शक्ति प्रसरण पावते आणि तेणेंकरून जयप्राप्ति अनिश्चित व संशयात्मकच रहाते. तथापि एकसमयावच्छेदेंकरून एकाच केंद्राकडे प्रयत्नाचा ओघ फिरविला असतां, सत्त्वभूमिकेमध्यें आध्यात्मिक प्रकरणांत जशी यशस्विता संपादन होते, तद्वत् आधिभौतिक विषयांमध्यें या भूमिकेंत सिद्धि प्राप्त होते.

रजोऽधिष्ठित पुरुष आपलें कर्तव्य करीत असतो, आणि असें करण्यांत तो कोणास भीत नाहीं किंवा कोणाच्या मर्जीला जुमानीत नाहीं. देशबांधवांच्या सुखाच्या आड येऊन किंवा त्यांचें नुकसान करून स्वार्थ साधण्याची तो कधीं इच्छा करीत नाहीं. असा पुरुष आपलें कर्तव्य करून देखील तें गुप्त ठेवण्याची खबरदारी घेतो, आणि फलाची किंवा कृतज्ञताबुद्धीची हांव धरीत नाहीं.

तिसऱ्या कनिष्ठ दिशेस तमोभूमिका म्हणतात. या दिशेनें गेलें असतां मनुष्य आळशी व स्तिमित बनतो आणि परमात्मस्वरूपाची जाणीव नष्ट होते. प्रमाद, आलस्य, जाड्य, निरुत्साह, ग्लानि, संशय, अनिश्चितपणा, भित्रेपणा, उन्माद, भय, मोह—हीं या भूमिकेचीं नानाविध लक्षणें आहेत. परिश्रमानें जो शीण येतो त्याचा प्रतिकार नियमित निद्रेनें करितां येतो. तथापि निद्रेसाहि कांहीं मर्यादा पाहिजे. कारण

(श्लोक)

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ॥
हविषा कृष्णवर्त्मेव । भूयो भूयोऽभिवर्धते ॥१

—भगवद्गीता

या वचनाप्रमाणें काम, क्रोध, भय ह्या मनोवृत्ति जशा उपभोगानें वाढतात, तद्वत् निद्रेची तृप्ति जसजशी करीत जावी, तसतशी ती वाढतच जाते आणि शेवटीं पौरुष किंवा वीर्य नष्ट होतें. श्रमाचें काम किंवा उद्योग करीत असतां उत्पन्न होणारा शारीरिक किंवा मानसिक त्रास जर टाळतां आला, तर हळू हळू संवय करीत गेल्यानें थोडक्या झोंपेनें समाधान मिळणें शक्य आहे, पण फार झोंप घेऊन व आळस वाढवून मानसिक शक्ति पूर्ण जोमांत राखणें अशक्य आहे.

सत्त्व, रज, तम या तीन भूमिकांपैकीं एकीमध्येंच पूर्णपणें अधिष्ठित असे पुरुष सांपडणें कठिण आहे. ज्याप्रमाणें, कुलीन, सुशिक्षित, गर्विष्ठ असे बडे लोक सामान्य हलक्या प्रतीच्या माणसांच्या वाऱ्यासहि उभे रहात नाहींत, त्याप्रमाणें, पहिल्या श्रेष्ठ भूमिकेंत असे कांहीं लोक असतात कीं, ते साधारण प्रतीच्या मनुष्यांचा संसर्ग चुकविण्याकरितां दूर रहातात आणि आपलें पुण्य व सत्त्वगुण कायम राखण्याकरितां एकान्तवासाचा किंवा गिरिगव्हरादि गुप्त स्थानांचा आश्रय करितात. राजस गुणाधिष्ठित मनुष्यांमध्यें देखील तमोगुणाचा वाराहि न लागलेले असे पुरुष आढळणें दुरापास्त आहे; दुसरे पक्षीं कमजास्त प्रमाणानें पहिल्या भूमिकेंतील गुणांनीं युक्त असेहि लोक दुसऱ्या वर्गांत सांपडतील.

सूक्ष्म निरीक्षणानें असें कळतें कीं बहुजन समाजाचे अंगीं पहिल्या दोन भूमिकांपेक्षां तिसरींतीलच गुण अधिक व्यक्त होतात. परंतु तामस लोकांमध्यें पहिल्या दोन भूमिकांतील गुण मुळींच दृष्टीस पडत नाहींत असें नाहीं, अर्थात् एकाद्या उन्मादानें मानसिक शक्ति बिघडून केवळ तामसी बनलेले लोक या वचनास अपवाद होत.

येथवर शुभाशुभ मार्गांचें व सत्त्व, रज, तम या गुणांचें बारकाईनें निरूपण करण्याचा उद्देश हाच कीं, तारुण्यदशा अत्यंत महत्त्वाची असल्यामुळें त्या दशेंत अनेक नानाविध प्रसंगांमुळें मनुष्याचें मन या मार्गांचा व गुणांचा आश्रय करितें आणि अचिंत्य शक्तींच्या किंवा देहप्रारब्धाच्या जोरानें कांहींचा पगडा विशेष बसून मानवी स्वभाव न कळत बनून जातो व प्रौढावस्थेंत तो स्पष्टपणें नजरेस येतो. यासाठीं आईबापांनीं किंवा पालकांनीं यौवन दशेंतील मुलांच्या वागणुकीवर फारच सूक्ष्म रीतीनें देखरेख ठेविली पाहिजे. मनुष्याचा स्वभाव ज्या विविध कारणांवर अवलंबून रहातो, त्याचें वास्तविक परिज्ञान होणें हें जीवितांचें परम रहस्य होय.

तारुण्यामध्यें मनुष्य पूर्णपणें कसास लागतो, त्यास नाना प्रकारचे अनुभव येतात आणि जीविताच्या खऱ्या संग्रामासाठीं तो सज्ज होतो. तारुण्यानन्तर प्रौढदशा उत्पन्न झाली असतां, कांहीं भाग्यवान् लोकांची गोष्ट खेरीज करून, ज्ञानप्राप्तीची किंवा शारीरिक व आध्यात्मिक गुण संपादन करण्याची संधि बहुशः नाहींशी होते. या अवस्थेमध्यें कोणी कुटुंबाच्याच विवंच-

नेमध्यें असतो व नानातऱ्हेचीं सुखदुःखें भोगीत जीवापाड कष्ट करीत रहातो. कोणी दुसऱ्याची चाकरी पतकरून किंवा उत्तम प्रकारचे व जगमान्य गुण संपादून ख्यातीस चढतो. मानवी आशा व प्रयत्न पूर्णत्वास न पावतां नेहमीं निष्फल होतात म्हणून त्यांच्या वैयर्थ्याबद्दल खात्री पटून, कोणी जीविताचा असा मार्ग काढितात कीं तेणेंकरून बाह्य विपत्तींचें भान देखील त्यांस होत नाहीं आणि ते सर्वदा सुखदुःखातीत पदाचाच आश्रय करून रहातात. हे जे आयुष्यक्रमाचे अनेक प्रकार सांगितले, त्यांपैकीं एकाद-दुसऱ्या मार्गानेंच सर्व लोक आपली प्रौढ दशा घालवितात, आणि जो तो आपआपल्या समजुतीप्रमाणें व योग्यतेच्या मानानें आपला हेतु सिद्धीस नेतो हें म्हणणें भाग आहे.

प्रौढ दशा सुरू झाली असतां शरीराची व अध्यात्म शक्तींची पूर्ण वाढ होते, अनिश्चितपणाची व संशयाची वेळ निघून जाते आणि नौका जशी सुरक्षित बंदरावर पोहोंचते तशी स्थिति येऊन, ज्या अवस्थांमधून सुखरूपपणें आपण बाहेर निसटलों त्यांतूनच जाणाऱ्या देशबांधवांचा मार्ग सुखकर करण्याची योग्यता मनुष्याच्या अंगीं येते. प्रौढ मनुष्याचीं मुख्य कर्तव्यें दोन आहेत, एक तर आपल्या आध्यात्मिक म्हणजे पारमार्थिक कल्याणाविषयीं सर्वकाल सावध असणें—तें अशाकरितां कीं प्रतिकूल प्रसंगांमुळें पूर्ववयांत प्राप्त झालेल्या ज्ञानाचा विसर पडण्याचा मोह उत्पन्न होऊं नये व अनिष्ट परिस्थितीमुळें निश्चित मार्गापासून भ्रष्ट होण्याची वेळ येऊं नये. दुसरें कर्तव्य असें कीं—पूर्व वयांत

आपणांस मिळालेला धडा तरुण मुलांच्या अन्तःकरणावर ठसविला पाहिजे, म्हणजे तेणेंकरून प्रत्येकाच्या मार्गांत येणाऱ्या अडचणी त्यांस टाळतां याव्या. अशा रीतीनें आपलीं कर्तव्यें बजावल्या नंतर आणि बाळ मंडळीस आपले विचार चालू ठेवण्याबद्दल वळण लाविल्यानंतर, निम्मे संसारांत व निम्मे संसाराबाहेर अशा अर्ध संन्यासाचा अवलंब करावा. ही स्थिति अशी कीं तो पुरुष अजून घरांतील कामकाज पहातो व कुटुंबांतील माणसांतच रहातो, पण तेथें तो केवळ आपली सल्ला देण्याकरितां व कांहीं बिघडलें असतां नीट करण्याकरितांच असतो. अशा रीतीनें प्रसंग पडेल तेवढ्या पुरता जरी तो प्रपंचांत मन घालीत असला, तथापि आयुष्याच्या शेवटच्या दिवसांत पूर्ण शान्ति मिळावी एवढ्याकरितांच तो संसाराच्या घोटाळ्यांतून शरीर व मन हळू हळू काढीत असतो. आपण शिक्षण दिलेल्या तरुण मंडळीच्या देखरेखीखालीं सर्व कांहीं व्यवास्थितपणें चालूं लागलें आणि आपण घरांत राहिल्यानें त्यांच्या आत्मविश्वासाच्या परिपोषास मात्र व्यत्यय येईल असें त्या मनुष्यास वाटूं लागल्याबरोबर त्यानें जगाच्या त्रासांतून एकदम आपली सुटका करून घ्यावी आणि राहिलेला काळ एकान्तवासांत व मृत्यूनंतर येणाऱ्या स्थितीच्या विचारांत घालवावा. या अन्तिम अवस्थेमध्यें जर सर्व प्रकारच्या प्रापंचिक घोंटाळ्याचा त्याग केला नाहीं आणि शरीराची व मनाची पूर्ण शान्ति संपादन केली नाहीं, तर आयुष्याचे शेवटचे दिवस कंठण्याचें देखील ओझें वाटेल, नाना तऱ्हेच्या शारीरिक व मा-

नसिक विपत्ति उत्पन्न होतील, त्या विपत्ति दूर करण्याचें सामर्थ्य रहाणार नाहीं आणि वाऱ्यांत उडालेल्या वाळलेल्या पानांप्रमाणें इकडून तिकडे व तिकडून इकडे अशा प्रकारचे गोते खात चित्त सर्वकाल पडून राहील.

# प्रकरण ४

## शारीरवेग आणि मनोवेग

( श्लोक )

कामक्रोधौ लोभमोहौ देहे तिष्ठन्ति तस्कराः ॥
ज्ञानरत्नापहाराय । तस्माज्जाग्रत जाग्रत ॥ १

( आर्या )

कामक्रोध पहा रे देहीं फिरताति लोभ मोह तसे ॥
नेण्यासि ज्ञानरत्ना जागा राहीच भी मनीं न वसे ॥ १

# प्रकरण ४

## शारीरवेग आणि मनोवेग

सृष्टिकार्यामध्यें चैतन्याचा शरीराशीं अति निकट संबंध जडल्यामुळें, चैतन्याचा उपयोग होण्याकरितां शरीर सुरक्षित व बळकट राहिलें पाहिजे. तसेंच चित्ताचीं कामें नीट चालण्यास व त्याचा पूर्ण विकास होण्यास शरीराची काठी सुदृढ व जोमाची असणें अवश्य आहे. आरोग्य व कुवत राखण्याकरितां मोठाले तालीमबाजीचे किंवा चपलतेचे पराक्रम करण्याचें वळण शरीरास अवश्य नाहीं. याकरितां कोठें तरी मर्यादा ठरविणें इष्ट आहे, आणि स्नायूंची फाजील वाढ झाली असतां जे परिणाम होतात ते मनांत आणितां, शरीरांत अतिरिक्त बळाचे ऐवजीं थोडीशी अशक्तताच असलेली बरी असें वाटूं लागतें. अशक्त किंवा दुखणाईत शरीरामध्यें मनाचें दार्ढ्य राखणें कदाचित् कठिण पडेल, परंतु शरीरांतील पीळदार व घन अशा स्नायूंकडेच सर्वदा लक्ष्य वेधेल तर मनाचा योग्य विकास होणें अशक्य आहे. व्यायाम वाजवीपेक्षां जास्त घेतला असतां त्यापासून शरीरास व मनास अपाय घडतो व दोन्ही इतर व्यवसाय करण्यास असमर्थ होतात. देहाच्या आरोग्यासाठीं व मनाच्या उत्साहासाठीं, योग्य आहार व मोकळ्या हवेंत चित्त प्रसन्न राहील असा व्यायाम एवढीच काय तीं आवश्यक आहेत. पण असें सर्वदा लक्षांत वागवावें कीं मनुष्याकरितां अन्न केलेलें आहे, अ-

न्नाकरितां मनुष्य निर्माण झालेला नाहीं. जीविताच्या रक्षणाकरितां अन्न खाणें योग्य आहे, पण अन्न खाण्याकरितांच जगणें ठीक नाहीं. गोड गोड अन्न खाण्यानें देहाचे अवयव लठ्ठ होतात, पण बुद्धि अगदीं मंद होते. चमचमित अन्न खाणें हाच जर जीविताचा हेतु असेल व असल्या अन्नांतच कायतें सुख आहे अशी जर मनाची समजूत झाली असेल, तर इतर चैनीच्या पदार्थांप्रमाणें, तें मिळेल तेव्हां सुख होईल पण मिळेनासें झालें म्हणजे दुःख होणारच. तेव्हां एकंदरींत अशा प्रकारच्या अन्नापासून देहाची स्थिति बिघडणारच आणि देहाच्या समतोल रक्षणावर तर चित्ताचें शाश्वत कल्याण अवलंबून असतें. पुरेसें अन्न न मिळाल्यास देह पडेल किंवा त्यास आजार जडेल, तसेंच फाजील अन्न खाल्लें असतांहि तोच परिणाम होणार. फाजील अन्न खाल्ल्यानें पुढें उपवास पडतात, त्याप्रमाणें प्रत्येक बाबतींत स्वातंत्र्याचा दुरुपयोग केला असतां शेवटीं बंधन कपाळीं येतें. याकरितां शहाणपणाचा मार्ग म्हटला म्हणजे नियमित अन्नाचें सेवन करावें व तें केवळ उपभोगाकरितां नसून आरोग्य व शक्ति यांसाठींच असावें. अन्नाची इयत्ता अशी असावी कीं देह आणि त्याचा स्वामी जें मन त्यांचें यथायोग्य पोषण जेणेंकरून होईल इतकेंच अन्न भक्षावें. शिवाय असेंहि वारंवार पहाण्यांत येतें कीं अमुक अन्न शरीरास अपायकारक आहे असें जरी ठाऊक असलें तरी संवयीमुळें तेंच अन्न अत्यन्त आवश्यक होऊन बसतें. पंडुरोग्यास जसें अधिकाधिक अन्न खावेंसें वाटतें किंवा जेणेंकरून रोग वाढेल अशाच

खाद्य पदार्थावर एकाद्या आजारी मनुष्याची भक्ति बसावी, त्यासारखीच ही गोष्ट आहे. उत्कृष्ट शिक्षण मिळालें असतां अशा संवयी कधीं जडत नाहींत आणि यदाकदाचित् जरी जडल्या तरी क्रमाक्रमानें त्या सुटून जातात.

जीविताच्या रक्षणासाठीं अन्न पाहिजे, ज्ञानप्राप्तीसाठीं जीवित पाहिजे, जीविताचें रहस्य कळण्यासाठीं ज्ञान पाहिजे आणि हें रहस्य एकदां समजलें म्हणजे शाश्वत आनंद होतो आणि क्षणिक कारणांवर अवलंबून नसल्यामुळें ह्या आनंदास पारावारच रहात नाहीं.

अन्नाप्रमाणें शरीरास व्यायाम अवश्य पाहिजे. जे लोक आहारविहारांत नेमस्त रहातात व दिनचर्येच्या सर्व व्यवहारांत सुव्यवस्थित असतात, त्यांना शरीरस्वास्थ्याकरितां फारसा व्यायाम अवश्य नाहीं, परंतु सामान्य नियम असा आढळून येतो कीं सर्व प्रकारचीं शारीरिक व मानसिक बैठीं कामें करणारांस मोकळ्या हवेमध्यें नियमित व्यायाम करणें अवश्य आहे. कारण तेणेंकरून शरीरांत ताकद येऊन चित्तास हुशारी प्राप्त होते, आणि ज्या विषयांच्या चिंतनानें मनास त्रास होतो किंवा पापाकडे प्रवृत्ति होते, असले विषय मनांत कदापि येत नाहींत. तसेंच कोणतीहि गोष्ट मर्यादेबाहेर गेली, तर ती अपायकारक होते आणि हा सिद्धान्त व्यायामास व इतर सर्व चांगल्या गोष्टींस लागू पडतो, म्हणून प्रत्येक व्यक्तीनें किती व्यायाम केला असता आपल्या शरीराचें हित होईल तें अजमावून ठरविलें पाहिजे. कांहीं लोक लहानपणापासून तालीमबाजींत व कसरतींत तयार होतात, व बुद्धिसामर्थ्यांत गा-

जलेल्या इतर लोकांप्रमाणें, शक्य तितक्या सर्व प्रकारच्या मर्दानी खेळांत ते नेहमीं पटाईत असतात. परंतु अशा लोकांची संख्या सर्वदा अल्पच असणार, म्हणून आपल्यापेक्षां कमी कसलेल्या बांधवांस अवघड कसरतीचे प्रकार करण्यास त्यांना लावतां येणार नाहीं व यदाकदाचित् आलें तरी त्यांनीं तसें करूं नये. अन्न व व्यायाम या क्रियाशक्तींशिवाय विशेषेंकरून यौवनावस्थेंत एक निष्क्रिय अथवा कर्मसहिष्णु ( passive ) शक्ति उत्पन्न होत असते; ती गुप्त राहून बहुधा समजण्यांत येत नाहीं आणि तिजपासून शरीराच्या व मनाच्या वाढीस फारच अपाय घडतो. ती कोणती म्हणाल तर काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर या मनोविकारांच्या तृप्तीची अनिवार इच्छा ही होय. ही शक्ति पौरुष-नाशाचें आदिकारण होय. क्षुधा किंवा अन्नाची वासना कह्यांत ठेवितां येते, पण तिचा अजीबात त्याग करितां येणार नाहीं. क्षुधा जर अत्यन्त प्रबल झाली, तर मानसिक शक्तींची वाढ खुंटेल आणि त्या शक्तींपासून घडणारीं श्रेष्ठ कार्यें सिद्धीस जाणार नाहींत; दुसरे पक्षीं क्षुधा कमी करीत करीत अगदीं क्षीण झाली, तर देहांत सामर्थ्य उरणार नाहीं आणि चैतन्यांशच सत्त्वहीन होईल. ही क्षुधावेगाची गोष्ट झाली, पण वरील मनोविकारांची स्थिति अगदीं निराळी आहे. या विकारांचा शरीराच्या हिताशीं अर्थाअर्थी संबंध नाहीं; नीट ताब्यांत असतील तर यांपैकीं कांहींचा उपयोग करून घेतां येईल, पण मनावर जर त्यांचा पगडा बसेल तर त्यांपासून हटकून अनर्थ ओढवेल

यांत संशय नाहीं. कधीं कधीं योग्य प्रसंगीं स्वतः-च्या फायद्याकरितां नव्हे, तर दुसऱ्यानें आपला घात करूं नये किंवा आपला नाश करून स्वहित साधूं नये म्हणून कांहीं मनोविकारांचा उपयोग करावा लागतो, पण ज्या अर्थीं दुष्टांच्या शासनाकरितांच हा मार्ग स्वीकारावयाचा आहे, त्या अर्थीं सामान्य व्यवहारांत त्यांचा उपयोग करूं नये व सुशिक्षितांनीं तर त्यांच्या मुळींच नादीं लागूं नये हें उघड आहे. अत्युत्तम प्रतीच्या लोकांत या विकारांचा सर्वथव त्या-गच केला जातो, आणि त्यांचा पूर्णपणें नायनाट झाला नाहीं तरी शक्य असेल तितका त्यांचा परिस्फोट न करणें हेंच सुशिक्षणाचें लक्षण मानितात. मानव जाती-च्या अभिवृद्धीसाठीं एका वासनेची नियतकालिक शा-न्ति करणें अवश्य आहे, पण असें करण्यांत देखील तिचा वाजवी उपयोग नियमबद्धच केला पाहिजे; आणि ही गोष्ट थोर लोकांच्या आचरणावरून सिद्ध होते, कारण शारीरिक किंवा मानसिक आरोग्यास यत्किंचित् पीडा न होईल अशाच रीतीनें त्या वासनेचा ते उपयो-ग करितात. खरें पौरुष अशांतच आहे कीं मनोविकार पूर्णपणें कह्यांत ठेवून अत्यन्त जरूरीच्या प्रसंगीं त्यांचा उपयोग करावा व तो करिते वेळीं अशी खात्री बाळ-गावी कीं वासना ह्या केवळ मनाच्या दासी आहेत व मनास त्यांचा दास कधीं होऊं देऊं नये.

क्षुधा, तृषा वगैरे शारीरवेग आणि कामक्रोधादि मनोवेग यांमध्यें असें अन्तर आहे कीं क्षुधा, तृषा यां-च्या अतिसेवनानें एकाच्या देहाचें आरोग्य नष्ट होतें

पण तेणेंकरून दुसरा सावध होतो, आणि काम क्रोधादि तुच्छ व तिरस्कार्य मनोवेगांस उत्तेजित केल्यानें एकाची तर अब्रू जातेच पण दुसऱ्या मित्रांस देखील वाईट प्रकारचें उदाहरण घालून दिल्यासारखें होतें.

क्रोध या विकारास सर्वदां कह्यांत ठेवणेंच इष्ट आहे. एकाद्या दांडग्या घोड्यास बेफाम भडकूं दिला असतां त्याचा नाश होऊन वर बसणारा खालीं येतो, शिवाय गरीब बिचाऱ्या वाटसरांसहि इजा होते,—हीच उपमा क्रोधाविष्ट पुरुषास उत्कृष्ट लागू पडते. क्रोधाचा अवरोध केला नाहीं, तर मन समुद्राप्रमाणें क्षुब्ध होऊन अग्नीप्रमाणें सर्वभक्षक बनून जातें. ज्यांची समजूत होत नाहीं किंवा बुद्धिवादास जे वश होत नाहींत अशा लोकांस ताब्यांत ठेवण्याकरितां कांहीं प्रसंगीं क्रोधाचा आवेश आणावा लागतो. प्राचीन आर्यग्रंथांत असें सांगितलें आहे कीं—कोणी घरास आग लाविली असतां, विषप्रयोग केला असतां, सशस्त्र हल्ला केला असतां, सुवर्ण, जमीन किंवा बायको चोरून नेली असतां, चुगलखोरपणा केला असतां व वरिष्ट अधिकाऱ्यांकडे खोटी फिर्याद केली असतां, क्रोधाचा आव घालणें अवश्य आहे, परंतु आव घालण्या पलीकडे जर मजल गेली आणि आत्मसंयमनानें क्रोधाचा वेग शान्त केला नाहीं, तर मागला पुढला विचार न रहातां मनाचा समतोलपणा नाहींसा होतो. मग क्रोधास पात्र झालेल्या इसमापेक्षां क्रोधाविष्ट होणाराचेंच नुकसान होऊन त्याची स्थिति फार अनुकंपनीय दिसूं लागते. क्रोधावेगास वश झालेला पुरुष म्हणजे कांहीं काल तमाशाच

बनून रहातो आणि मग तमासगिरांची चंगळ होते. इतर मनोविकारांपैकीं कांहींचा चाणाक्षपणानें व योग्य दिशेनें प्रयोग केला असतां नेहमीं त्यापासून हितच होण्याचा संभव आहे, पण क्रोधापासून कधींच फायदा झालेला दिसत नाहीं.

क्रोधाची उत्पत्ति व उपक्रम येणेंप्रमाणें होतात:— ज्याचें मन सर्वकाल ऐहिक उपभोगांमध्यें गुंतलेलें असतें, तो पुरुष स्वार्थपरायण होऊन विषयानन्दांतच निमग्न होतो. वास्तविक पहातां विषयानन्द हें केवळ आत्मानंदाचें द्वार होय, पण हें तत्त्व न समजून मनुष्य स्वार्थपरायण झाला म्हणजे त्याला उपभोग्य पदार्थ मिळविण्याची चिन्ता लागते. इष्टप्राप्ति होऊन जर ही चिन्ता दूर झाली नाहीं, तर क्रोध येतो, क्रोधापासून संमोह होतो, संमोहापासून स्मृतिभ्रम, स्मृतिभ्रमापासून बुद्धिनाश, व बुद्धिनाशापासून सर्वस्वहानि होते आणि तो मनुष्य केवळ पशुतुल्य होऊन जातो.

लोभ या मनोविकाराची इमारत आशा, ममकार व अहंकार यांवर जरी रचलेली आहे, तरी त्यास निसर्गसिद्ध मानण्यापेक्षां संवयीचा व शिक्षणाचाच तो परिणाम आहे असें म्हणावें लागतें. सांप्रत कालीं मनुष्याचें जीवित अधिकाधिक कृत्रिम स्वरूपाचें बनत चाललें आहे, म्हणून त्याच्या सुखाकरितां जे जे पदार्थ अवश्य आहेत अशी मनाची समजूत होऊन गेलेली असते, ते ते पदार्थ संपादन करण्याकरितां अधिकाधिक कनकाची अपेक्षा होऊं लागली आहे. एक महात्मा म्हणतो कीं कनकानें सर्व जगास दास्यांत बद्ध करून

सोडिलें आहे. दुसरा साधु म्हणतो कीं मनुष्यमात्र कनकाचा गुलाम बनला आहे, पण कनक मात्र कोणाच्या दास्यांत सांपडलेलें नाहीं, कारण तें कोणापाशींहि दीर्घकाल पर्यंत टिकत नाहीं. तिसरा सत्पुरुष म्हणतो कीं—ईश्वर व कनक यांची भक्ति एकसमयावच्छेदेंकरून होणें अशक्य आहे. मनाला ज्या गोष्टी हव्याशा वाटतात त्यांचा विनिमय जर घडला नाहीं, तर केवळ कनकाचा किंवा कनकरूपी संपत्तीचा कांहीं एक उपयोग नाहीं. हवा तितका पैसा देऊनहि जर इष्ट पदार्थ मिळाले नाहींत, तर कनकाचीहि किंमत नाहींशी होऊन, तें मातीच्या मोलाचें होऊन जातें. इतकी गोष्ट खरी आहे कीं कनकाची अपेक्षा असो, द्रव्याची असो किंवा दुसऱ्या कशाचीहि असो, मनाची प्रबल वासना म्हटली म्हणजे तत्कालीन परिस्थितीच्या मानानें ज्या अवस्थेमध्यें कशाचीहि उणीव भासण्याचा संभव नाहीं अशा अवस्थेचा लाभ व्हावा हीच असते. दुसऱ्यास कांहीं एक पीडा न होतां जर ही वासना तृप्त झाली तर ती अवश्यमेव क्षम्य असते, आणि कांहीं विशिष्ट स्थितीमध्यें तर ती स्तुत्य आहेच. देशबांधवांच्या हिताकरितां ऐहिक संपत्तीचा उपयोग कसा करावा हें पूर्णपणें जाणणारे कार्निगी सारखे महात्मे असतात व जेणेंकरून लोकांचें कल्याण घडवून आणितां येईल अशा स्थितीची ते मुद्दाम इच्छा करितात, पण अशा बुद्धीचे व स्वभावाचे पुरुष विरळाच आढळतात. स्वतःस द्रव्यलाभ झाला असतां सुखाचीं साधनें अपरिमित ताब्यांत येतात एवढ्याच आशेनें बहुतेक लोक लोभ या विकाराची तृप्ति कर-

ण्यास झटत असतात. असें पहा कीं कोणताहि लाभ करून घेणें असेल तर ईश्वरदत्त मानसिक शक्तींचा प्रयोग करावा लागतो आणि त्या शक्तींचें जर यथायोग्य अनुसंधान राखिलें, तर अर्थसिद्धीविषयीं शंकाच रहात नाहीं. असें जरी आहे तथापि, स्वार्थ साधून घेण्याची एकदां कां चटक लागली म्हणजे बहुशः अहंकारवृत्तीला अतोनात बळ येऊं लागतें, तेणेंकरून मनुष्यास बरें कोणतें, वाईट कोणतें हें सुद्धां समजेनासें होतें, हातीं घेतलेल्या कामाचा शेवट फायदेशीर होईल किंवा नाहीं हें कळण्याचें सामर्थ्य नाहींसें होतें आणि आपली वासना तृप्त करण्यासाठीं पाहिजे त्या मार्गाचें अवलंबन करण्यास मनुष्य तयार होतो.

वास्तविक पहातां शारीरिक व मानसिक श्रम करून लोभ विकाराची यथाशास्त्र तृप्ति केली असतां अपाय होण्याचा मुळींच संभव नाहीं. जीवितरक्षणासाठीं स्वार्थपर उद्योग करणें अवश्य आहे, ज्ञानप्राप्तीकरितां जीविताचें रक्षण जरूर आहे, सर्वकाल विशुद्ध व अविनाशी सुखासाठीं ज्ञान पाहिजे—हें जरी खरें आहे, तरी जगाची वास्तविक स्थिति अशी आहे कीं बहुतेक लोक केवळ जीविताच्या संरक्षणासाठीं जेवढें अगदीं अवश्य आहे तेवढेंच मिळविण्यासाठीं उद्योग करीत नाहींत, तर कांहीं तरी ऐहिक लाभाकरितां सतत उद्योग करीत रहाणें हाच जन्माचा हेतु समजतात. असाच जीविताचा हेतु मानिला म्हणजे अत्यंत अनिष्ट परिणाम घडतात, ते असे कीं—नैतिकबुद्धि व अध्यात्मशक्ति नष्ट होतात, ज्या देशबांधवांचा आपणास उपयोग हो-

ण्यासारिखा नसतो ते केवळ शत्रूसारखे दिसूं लागतात, अशा बांधवांस जबरीनें किंवा छलानें बुचाडण्यांत मौज वाटून त्यांतच आळ्यता मिरविण्याची संवय लागते, आणि यदाकदाचित् या कामांत अपयश आलेंच तर लागलींच क्रोध येतो आणि मग बुद्धिभ्रंश होण्यास उशीर लागत नाहीं.

संमोह म्हणून एक मनाची अवस्था आहे, तिजमध्यें खऱ्याखोट्याची भेसळ होऊन विवेचकबुद्धि ( Reason ) व सदसद्विवेकशक्ति यांची सांगणी रुचत नाहीं, चाललेली घटिका हीच आयुष्याची मर्यादा भासूं लागते आणि बेफामपणानें चैनींत निमग्न व्हावेंसें वाटून अशी चैनबाजी किती दिवस टिकणार हें समजण्याची अक्कल देखील उरत नाहीं. ऐहिक गोष्टींविषयींचा हा संमोह कायम रहाण्याची दोन विशेष कारणें आहेत. एक तर जीविताचें रहस्य उकलणें सामान्य बुद्धीस अशक्यच होय, दुसरें असें कीं युगेंच्या युगें पिढ्यानुपिढ्या चालत आलेल्या चमत्कारिक शिक्षणामुळें अहंवृत्तीचें प्राबल्य फार वाढतें, आणि देशबांधवांच्या कल्याणापेक्षां स्वहित साधण्याचीच विलक्षण हांव सुटते.

मत्सर हा विकार शुद्ध पापाचें व अज्ञानाचें कार्य होय आणि त्यापासून मत्सरी मनुष्याचें किंवा ज्याचा मत्सर होतो त्याचें—कोणाचेंच हित होत नाहीं. दुसऱ्याला प्राप्त झालेली वस्तु स्वतः मिळविण्याचें सामर्थ्य अंगीं नसलें म्हणजे त्याची ती वस्तु नाहींशी करण्याची वासना उत्पन्न होते, म्हणून मत्सर हें अहंकारप्रतिष्ठापनेचें ( Self-assertion ) अत्यंत दुष्ट स्वरूप होय.

ही दुष्ट भावना क्रमानें वाढत जाऊन हेवा, निन्दा, द्वेष, हाडवैर अशीं तिचीं रूपान्तरें होतात. ह्या वृत्ति एकाच प्रकारच्या असतात, तथापि तदन्तर्गत दुष्ट बुद्धीच्या कमजास्त प्रमाणांवरून त्यांस भिन्न नांवें प्राप्त होतात. मत्सराशींच संबद्ध असलेला स्पर्धा ( Emulation ) म्हणून एक विकार आहे व तो दुष्टबुद्धीपासून निर्माण झालेला असूनहि श्रेयसाशीं मिश्रित होतो म्हणून त्याचीं गोड फळें अनुभवास येतात, म्हणजे स्पर्धेचा उद्देश दुसऱ्याचें नुकसान करण्याचा नसून स्वतःचा फायदा करून घेण्याचाच असतो.

क्षुधा या प्राणधर्माप्रमाणेंच काम हा विकार प्राणिमात्रास सर्वसाधारण आहे. आजपर्यंतच्या अवलोकनावरून उद्भिज्जकोटीमध्यें तो नसतोच असें म्हणतां येत नाहीं, कारण वनस्पतिशास्त्रांत पुंकेसर व स्त्रीकेसर असें वर्गीकरण आढळतें. कामविकारास कह्यांत ठेविलें नाहीं तर हटकून नुकसान होतें, व कह्यांत ठेविलें असतां अनुराग किंवा प्रेम अशी त्यास संज्ञा प्राप्त होते, आणि प्राणिवर्गाच्या वृद्धीस तर तो अत्यन्त अवश्य आहे. महा बुद्धिमान् व योगविद्येमध्यें कुशल अशा लोकांप्रमाणें, शरीरानें व मनानें कामजय केला असतां, वाटेल तितकी आयुष्याची मर्यादा वाढविली जाते आणि चैतन्यशक्तीस अद्भुत सामर्थ्य प्राप्त होतें. त्याशीं संबद्ध असलेल्या क्रोध व लोभ या वृत्तींप्रमाणें, कामविकाराचा दुरुपयोग होऊन मनुष्यजातीमध्यें असंख्यात विपत्ति, रोग व अपमृत्यु घडलेले आहेत. इतर विकारांपासून उद्भवणारे दुष्परिणाम फक्त कर्त्यासच भोगावे लागतात,

पण कामविकाराचें तसें नाहीं, कारण या विकाराच्या तृप्तीपासून जें क्षणिक सुख होतें, त्याच्या लाभासाठीं प्रयत्न करण्यांत जे लोक अज्ञानामुळें गर्क होतात त्यांसच या विकाराचे दुष्परिणाम भोगावे लागतात असें केवळ नसून कर्त्यांची गरीब बिचारी संतति त्या दुष्परिणामास बळी पडते आणि तेणेंकरून सर्व जगत् कामविकारापासून होणाऱ्या विपत्तीमध्यें ग्रस्त होतें. यदाकदाचित् दैवयोगानें सत्यज्ञानाचा प्रकाश मिळालाच, तर मात्र ह्या दुष्परिणामांपासून सुटका करून घेतां येते.

( श्लोक )

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ॥
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एव स वर्धते ॥ १

—भगवद्गीता

या वचनाप्रमाणें, कामविकाराची तृप्ति करीत सुटल्यानें त्याची शान्ति होत नाहीं, उलट आगींत तूप ओतल्यानें जसा जास्तच भडका उडतो, तद्वत् या विकाराच्या सतत तृप्तीनें त्याची अधिकाधिक वृद्धि होत जाते.

एवढावेळपर्यन्त ज्या वेगांचें अथवा विकारांचें वर्णन झालें, त्यांचा परिणाम कुलशीलाच्या व शिक्षणाच्या मानानें कमजास्त प्रमाणांत सर्व मनुष्यांच्या अन्तःकरणावर घडतो. परंतु मद हा जो विकार आहे त्याचा अंमल सर्व व्यक्तींवर सारखाच होतो व जसें जसें मन सुसंस्कृत होतें तसा तसा तो क्षीण होत जातो, पण तो अगदीं नाहींसा कधींच होत नाहीं व पूर्णपणें कह्यांतहि येत नाहीं. आपणाकडे दुसऱ्याचें लक्ष वेधावें म्हणून आपण खरोखर आहों त्यापेक्षां चांगलें दिसावें

ही जी दुष्ट खोड प्रत्येकास जडलेली असते, तिचा पाया अहंकार व आपणास इष्ट असलेल्या वस्तूंची गोडी इतरांस लावण्याची इच्छा—हीं होत. ह्या गोष्टी जर उदात्त व स्तुत्य असतील तर मद हा विकार क्षम्य होईल, परंतु असें नेहमीं पहाण्यांत येतें कीं श्रेष्ठ पदवी पावल्यानंतर थोर महात्मे देखील आपल्या विचारांचा अंमल, पुढच्या पिढीवर तर नाहींच, पण निकट संबंधाच्या कमी दर्जाच्या माणसांवर देखील चालवूं शकत नाहींत; पृथ्वीवरील सर्व जातींचीं मनुष्यें एकाच क्षेत्रांत एकसारखीं फिरत रहातात, पण त्यांच्यामध्यें थोडा देखील फरक किंवा प्रकार नजरेस पडत नाहीं, त्यांच्यामध्यें नवीन स्फूर्ति दिसत नाहीं, आयुष्यक्रमाचा जो धोपट मार्ग एकदां ठरलेला आहे त्यापेक्षां अधिक श्रेयस्कर किंवा सुखकर मार्ग समजण्याची किंवा शोधून काढण्याची अक्कल देखील कोणामध्यें दृष्टीस पडत नाहीं, उलटपक्षीं जसजसा काळ लोटेल तसतशा दुष्ट संवयी मात्र वृद्धिंगत होत जातात आणि प्रशंसनीय वासना दबून जातात किंवा क्षय पावतात,—असें घडलेलें जेव्हां आपण पहातों तेव्हां असेंच म्हणावें लागतें कीं सर्व मिथ्या आहे.

मनुष्यामध्यें जे जे वेग अथवा विकार उत्पन्न होतात, त्यांस कह्यांत ठेवणें अत्यन्त इष्ट आहे. राक्षसाची शक्ति अंगीं असली तरी हवीच आहे, पण दुसऱ्यानें चेतविल्याखेरीज त्या शक्तीचा उपयोग करणें मात्र भयंकर आहे. परमेश्वरानें जे वेग व विकार निर्माण केले आहेत, त्यांचा उद्देश हाच कीं त्यांस क-

ह्यांत वागवून आपल्या पौरुषाचा व सामर्थ्याचा उपयोग करण्याची संधि मनाला मिळावी. दुसरें असें कीं ईश्वरानें मनोविकारहि उत्पन्न केले आहेत आणि त्यांवर दाब ठेविला नाहीं तर अनर्थ होतो म्हणून त्याबरोबर त्यांचा जोर कमी करण्याकरितां उताराहि देऊन ठेविला आहे, त्याचें नांव बुद्धि. जितकी शत्रूची शक्ति अधिक तितका त्यांवर मिळविलेला जय अधिक प्रशस्त होय. आपणास कोणी शत्रु नसावा व आपली परिस्थिति सर्वकाल निराकुल व सुखकर असावी अशी इच्छा करणें हेंच स्तिमितपणाचें व आळसाचें लक्षण होय. आपल्या बांधवांमध्यें प्रतिष्ठा गाजवावी असें ज्याला वाटतें त्यानें असें मनांत वागवावें कीं आपल्या अन्तर्यामींचे शत्रु जर जिंकितां आले, तरच ही प्रतिष्ठा मिळविण्याचा त्याला हक्क पोहोंचतो, कारण कामक्रोधादिकांवर जय मिळविल्याखेरीज नुसत्या बाह्यविजयानें जरी लोक फसले, तरी तो विजय केवळ पोकळ व अशाश्वत समजला पाहिजे.

# प्रकरण ५

## षड्रूमि

( श्लोक )

कामक्रोधादयः शान्तिदांत्याद्या लिंगदेहगाः ॥

ज्वरा द्वयेऽपि बाधन्ते प्राप्त्याऽप्राप्त्या नरं क्रमात् ॥ १

( आर्या )

कामक्रोधादिक जे प्राप्तीनें दुःख सर्व ते देती ॥

शान्त्यादिक हे दुःखद अप्राप्तीनेंच सर्वदा होती ॥ १

# प्रकरण ५

## षडूर्मि

प्राचीन संस्कृत ग्रंथांमध्यें षडूर्मि ही संज्ञा दोन प्रकारच्या विकारांस अभेदपणें योजिलेली आढळते, म्हणजे क्षुधा, तृषा, शोक, मोह, जरा व मरण या सहांस आणि काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर या सहांस षडूर्मि म्हणतात. यासाठीं दोन्ही षट्कांची माहिती बारकाईनें देणें इष्ट आहे. पहिलें क्षुधादि षट्क सर्व स्थिरचर प्राण्यांस बहुधा लागू करण्याचा परिपाठ आहे. खनिज कोटि वगळून उद्भिज्ज व प्राणिकोटींस जीव आहे. प्राणाचे धर्म क्षुधा व तृषा, मनाचे धर्म शोक व मोह, आणि शरीराचे धर्म जरा व मरण हे होत. उद्भिज्ज कोटीस मन नसल्यामुळें शोक मोह हे धर्म असत नाहींत, तथापि क्षुधा, तृषा, जरा व मरण हे आहेतच. प्राणिमात्रास क्षुधा, तृषा, शोक, मोह, जरा व मृत्यु या उर्मि असून, शिवाय निद्रा किंवा विश्रान्ति, भय आणि मिथुनीभाव हे धर्म असतात.

यावरून पहातां, क्षुधा, तृषा, शोक, मोह, जरा, मृत्यु, निद्रा, भय व मिथुनीभाव हे आधिभौतिक धर्म सकल प्राण्यांत आविर्भूत होतात, तथापि मनुष्यामध्यें व इतर प्राण्यांमध्यें या धर्मांचा प्रभाव अगदीं भिन्न स्वरूपाचा आढळतो. पशुपक्ष्यादिकांमध्यें केवळ उपजतबुद्धि ( instinct ) असून विचार करण्यास समर्थ अशा चैतन्याचा ( mind ) अभाव असतो, म्हणून शोक व मोह यांची बाधा त्यांस फारशी होत नाहीं. बाकी

राहिलेले क्षुधा, तृषा, जरा, मृत्यु, निद्रा, भय व मिथुनीभाव—यांसंबंधानें मनुष्य व इतर प्राणि यांमध्यें जो फरक नजरेस पडतो, तो जीवितरहस्याचा अत्यन्त रमणीय भाग होय यांत संदेह नाहीं.

पूर्वी सांगितलेंच आहे कीं प्रथमतः जेव्हां आदिपुरुष निर्माण होतो, तेव्हां तो केवळ आत्मारूप अथवा चैतन्यरूप असतो आणि त्याच्या स्वरूपापासून देहाची उत्पत्ति क्रमाक्रमानें होऊं लागते. शरीरांतील राजा जो प्राण तो जेव्हां शरीरांत संचार करूं लागला, तेव्हांच क्षुधा तृषा हीं उत्पन्न झालीं. नंतर मुख, तालुस्थान व रसनेंद्रिय हीं क्रमानें निर्माण झालीं, आणि क्षुधा व तृषा यांच्या शान्तीकरितां नानाप्रकारचे अन्नरस उत्पन्न झाले. त्या अन्नपानादिकांच्या योगानें मनाला संतोष व शरीराला पुष्टि प्राप्त होतात. तथापि प्राणाचे धर्म जे क्षुधा व तृषा त्यांच्या शान्तीच्या क्रियेंत मनुष्यामध्यें व इतर प्राण्यांमध्यें फारच तफावत दृष्टीस पडते. जे जे निसर्गसिद्ध पदार्थ शरीरास अवश्य व पुष्टिकारक असतात तेवढेच भक्षण करून पशुपक्ष्यादि आपल्या क्षुधेची शान्ति करितात व ईश्वरनिर्मित उदकानें तृषेची शान्ति करून घेतात आणि ही क्रिया उपजतबुद्धीनेंच घडते. शिवाय, क्षुधातृषांचे वेग येतील तेव्हांच अन्नपाण्याच्या शोधास तिर्यग्योनी लागतात व आहाराविषयीं सायंप्रातश्चिन्ता त्यांस मुळींच नसते, म्हणून खाऊन उरलेल्या पदार्थांचा संग्रह करण्याची वासनाच त्यांना होत नाहीं. जें कांहीं ते करीत असतात, त्याचा उपयोग दिनचर्येच्या सिद्धतेच्या पलीकडे मुळींच होत नाहीं.

पण मनुष्यप्राण्याची गोष्ट अगदीं निराळी आहे. ईश्वरानें त्यास अप्रतिम बुद्धि व सारासारविचारशक्ति दिल्यामुळें आणि आधुनिककाळीं तर त्याची महत्त्वाकांक्षा अपरिमित वाढल्यामुळें, सुधारणा व प्रगति याशिवाय त्याला कांहींच दिसत नाहीं. या सर्वांचा असा कांहीं विलक्षण परिणाम झाला आहे कीं कृत्रिम तऱ्हेनें व रासायनिक प्रयोगानें खाण्याचे पदार्थ विपुल झाले आहेत, अन्न खाण्याच्या वेळा वाढल्या आहेत व संपत्ति अत्यन्त समृद्ध झाली आहे. तेणेंकरून आरोग्यशास्त्रावर सतत परिश्रम केल्याशिवाय, रासायनिक सिद्धान्तांचें सूक्ष्म ज्ञान असल्याशिवाय व विचित्र व्यायामप्रकारांचें अवलंबन केल्याशिवाय, शरीरप्रकृति नीट रहाणें दुरापास्त होऊन गेलें आहे. सांप्रतकालीं अन्नाच्छादनाचा व एकंदर रहाणीचा कृत्रिमपणा इतक्या थरास पोहोंचला आहे कीं, निसर्गावस्था म्हणजे काय, वस्तुस्वभाव म्हणजे काय,—याचें अज्ञान सर्वत्र पसरून गेलें आहे, आयुष्याचा क्षय होत चालला आहे, आणि रोगांची तर समृद्धि होत चालली आहे.

आतां जो म्हणून देहधारी आहे त्याला जरा, मृत्यु, निद्रा व भय हे धर्म आहेतच, त्यांसंबंधानें मनुष्य व इतर प्राणि यांच्यामध्यें म्हणण्यासारखा विशेष भेद नाहीं.

मिथुनीभाव या धर्माविषयीं तर मनुष्य व इतर प्राणि यांच्यामध्यें जमीनअस्मानचें अन्तर आहे. तिर्यग्योनीमध्यें ऋतुकाळींच मिथुनीभाव घडतो आणि गरोदरपणीं तर कधींच घडत नाहीं, तेणेंकरून अकालीं वीर्यपात न होतां, शरीरसामर्थ्य कधींच ढळत नाहीं.

परंतु यासंबंधानें मनुष्यप्राण्याची स्थिति अत्यंत शोचनीय आहे असें जाणूनच, जसा बाप सदय अन्तःकरणानें आपल्या मुलांस उपयुक्त ज्ञानाचा उपदेश करितो, त्याप्रमाणें परमेश्वरापासून वेद निर्माण झाले. मनुष्याची विषयाकडे स्वाभाविक प्रवृत्ति आहे म्हणून विषयवासना इतकी तीव्र असते कीं **श्रीमद्विद्यारण्यांनीं** जीवन्मुक्तिविवेक नामक ग्रंथांत म्हटलें आहे—

( श्लोक )

मात्रा स्वस्रा दुहित्रा वा नैकशैय्यासनोभवेत् ॥
बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥ १

म्हणजे, पुरुषानें मातेस, बहिणीस किंवा मुलीस घेऊन कधींहि एका शय्येवर निजूं नये किंवा एका आसनावर बसूं नये, कारण इंद्रियांची प्रवृत्ति इतकी जोरदार आहे कीं मोठ्या विद्वानास सुद्धां वेड लावील. तेव्हां सर्वदां स्त्रीकामुक जो पुरुष त्याचे हातून योनिसंकर घडूं नये म्हणून वेदशास्त्रांनीं प्रथमतः मनुष्याच्या गुणकर्मांप्रमाणें वर्णाश्रमधर्म निर्माण केले आणि नंतर त्यांच्यामध्यें वर्णसंकर टाळण्यासाठीं विवाहधर्माची स्थापना केली. विवाहाविषयीं निर्धार असा केला कीं सातवी व पांचवी पिढी सोडून, सवर्ण पण असगोत्र व असपिंड अशा कन्यकेचें पाणिग्रहण पुरुषानें करावें. सपिंड ही संज्ञा धर्मशास्त्रांत फार महत्त्वाची असल्यामुळें, तिचें निरूपण करणें अवश्य आहे.

( श्लोक )

बध्वा वरस्य वा तातः कूटस्थाद्यदि सप्तमः ॥
पंचमी चेत्तयोर्माता तत्सापिंड्यं निवर्तते ॥१

पंचमात्सप्तदूर्ध्वं मातृतः पितृतस्तथा ॥

—निर्णयसिंधु

याचा अर्थ असा कीं—सपिंड कोण हें ठरविणें असेल तर कूटस्थ म्हणजे एक पूर्वज ध्यावा, तो जर पुरुष असेल तर त्यापासून सहा पिढ्या, व स्त्री असेल तर चार पिढ्या—एथपर्यंत सपिंड ही संज्ञा लागू पडते. म्हणजे वधू व वर यांस सोडून त्यांचा पिता जर कूटस्थापासून सात पिढ्या मोजतांना आढळला नाहीं किंवा त्यांची माता जर पांच पिढ्या मोजतांना आढळली नाहीं—तर तीं वधुवरें सपिंड होत नाहींत, म्हणून त्यांचा विवाह होण्यास हरकत नाहीं.

तेव्हां अशा तऱ्हेनें असपिंड, समान वर्णाची व भिन्न गोत्राची, रूपयौवन संपन्न, वयानें लहान, अशा कन्येशीं तिच्या बापाच्या संमतीनें, देव, द्विज व अग्नि यांच्या साक्षीनें पुरुषानें विवाह करावा अशी वेदशास्त्राची अनुज्ञा आहे. अशा धर्मपत्नीशींच पुरुषानें मिथुनीभावानें रहावें; शिवाय दिवस व रात्रीचा पहिला प्रहर वर्ज करून ऋतुकालीं प्रजोत्पत्तीसाठीं स्वदार मिथुनीभावाचा अंगीकार करावा. अशा आचरणानें ब्रह्मचर्य कायम राहून पिंडस्थैर्य उत्पन्न होतें आणि तदुत्पन्न प्रजा सुदृढ व सदाचारसंपन्न बनते.

अशा तऱ्हेचा विवाहनिर्बंध स्वतःप्रमाण ज्ञानमय श्रुतिशास्त्रामध्यें केला असल्यामुळें, भरतखंडांत व परंपरेनें सर्व पृथ्वीवरील देशांत व्यभिचारनिषेध दृष्टीस पडतो व तेणेंकरून मानव जातीचें अपरिमित कल्याण झालेलें आहे. यासाठीं शुद्धबीजाच्या प्राप्तीकरितां वेद-

शास्त्रांची आज्ञा शिरसा वंद्य मानून तन्निरूपित सिद्धान्त सर्व जातींच्या लोकांनीं अंमलांत आणावयाचा प्रयत्न जारीनें करावा, म्हणजे सांप्रतच्या धुमाकुळास कांहीं तरी आळा बसेल व मानव जातीची स्थिति सुधारेल यांत शंका नाहीं.

एथपर्यंत मनुष्य व इतर प्राणि यांस सर्वसाधारण ज्या आधिभौतिक उर्मी अथवा वेग यांचें निरूपण झालें. आतां षडूर्मि ही संज्ञा ज्या मनोविकारांस लावितात त्यांविषयीं विवेचन करूं. उर्मी या शब्दाचा मूळ अर्थ लाटा हा असून, ह्या व इतर समानार्थक शब्दांचे अनेक प्रकारचे लाक्षणिक प्रयोग व विविध रूपकें प्रचलित आहेत. उदाहरणार्थ, विचारसागर ह्या हिंदी ग्रंथांत परमात्मस्वरूप हा समुद्र कल्पून विष्णु, महेश इत्यादि देवता त्याच्या लाटा होत असें प्रतिपादन केलेलें आढळतें.

(दोहा)

अब्धि अपार स्वरूप मम । लहरी विष्नु महेस ॥
रवि, विधि, चंदा, वरुन, यम। सक्ति, धनेस, गनेस ॥ १

त्याप्रमाणेंच शरीर व तदन्तर्गत वायु हा समुद्र कल्पून त्यांमध्यें जे वेग अनुभवास येतात त्या लाटा होत असें मानून क्षुधा, तृषा, शोक, मोह, जरा, मृत्यु, निद्रा, भय, मिथुनीभाव यांस उर्मी असें म्हणण्याची रीत आहे. तसेंच अन्तःकरण हा समुद्र कल्पून काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर ह्या उर्मी मानिल्या आहेत. शिवाय या विकारांस लाटा मानणें हें दुसऱ्या रीतीनेंहि सयुक्तिक व मनोरंजक आहे. अन्तःकरण क्षुब्ध झालें किंवा अन्तःकरणाचा क्षोभ झाला असे प्रयोग पाहिल्याबरो-

बर समुद्राची कल्पना मनांत येते. काम, क्रोध वगैरे विकार लाटांप्रमाणें मानिले म्हणजे चित्तास समुद्र न कल्पितां इतर पदार्थांस सुद्धां समुद्राची उपमा दिलेली आढळते. कधीं कधीं संसारास समुद्र मानून, कामक्रोधादि लहरी ज्ञानतारू बुडवून टाकितात असे प्रयोग पहाण्यांत येतात. कधीं कधीं कामक्रोधादिकांस तस्कराची उपमा देऊन, ते ज्ञानरत्न चोरावयास टपलेले असतात अशीहि कल्पना केलेली आढळते.

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे विकार शुद्ध स्वरूपांत असतांना, त्यांपासून मनुष्याचें रक्षण होऊन हित होतें आणि सृष्टींतील ईश्वराचे हेतु सिद्धीस जातात. क्षुधातृषादि शारीर वेगांपैकीं मिथुनीभाव म्हणून जो वर सांगितला आहे त्याचें मानसिक प्रतिरूप ( counterpart ) कामविकार होय आणि तो शुद्धावस्थेंत असतां अत्यन्त सुखावह असून, तेणेंकरून प्राणिवर्गाची वृद्धि होते, जीवित सफल होतें आणि ईश्वराची इच्छा तृप्त होते. प्रजोत्पत्तिसाधक जें उपस्थेंद्रिय त्याची तर वेद, शास्त्र, पुराण यांमध्यें अपूर्व महती गाइली आहे.

प्रजातिरमृतमानंद इत्युपस्थे ॥

हें वचन तैत्तिरीयोपनिषदामध्यें आढळतें व याच अर्थाचा श्लोक श्रीमद्भागवतांत येणेंप्रमाणें आहेः—

निरभिद्यत शिश्नोवै प्रजानंदामृतार्थिनः ॥
उपस्थ आसीत्कामानां प्रियं तदुभयाश्रयम् ॥ १

म्हणजे आदिपुरुषास अपत्य लाभाची, रतिसुखाची व शाश्वतसुखाची इच्छा झाली, त्या समयीं शिश्न उत्पन्न झालें, तेथें उपस्थ हें इंद्रिय व प्रजापति ही देवता नि-

र्माण झालीं, व त्या दोघांच्या आश्रयानें रतिसुख हा विषय उत्पन्न झाला. येणेंप्रमाणें वर्णिलेल्या उपस्थेंद्रियाची खरी योग्यता न जाणल्यामुळें पृथ्वीवर सर्वत्र अनर्थ कोसळला आहे आणि या इंद्रियाच्या शान्तीसंबंधानें वेदशास्त्रप्रणीत, निर्णायक व सर्वार्थसंपादक आज्ञा भरतखंडांत प्रचलित नसत्या व त्यांचा प्रसार परंपरेनें सर्व पृथ्वीवर झाला नसता, तर या अनर्थास पारावारच राहिला नसता.

वरील वेदवचनांतील व भागवतांतील अमृत या पदाचा अर्थ सामान्य लोकांस अज्ञेय असल्यामुळें, त्याचें विवरण अवश्य आहे. भरतखंडांत योगशास्त्राच्या अभ्यासामुळें, जरामरणापासून निवृत्ति, ईश्वरप्रणिधान, चित्तैकाग्र्य, अखंड सुखावाप्ति वगैरे अत्यंत विलोभनीय अवस्थांचा अनुभव घडत आहे हें सुप्रसिद्ध आहेच. उपस्थेंद्रियापासून वीर्यपातानें जर अप्रतिम आनंद होऊं शकतो, तर जन्मापासून उत्पन्न झालेल्या वीर्याचें विधियुक्त मार्गानें रक्षण केलें असतां देहास किती कान्ति चढेल वा दार्ढ्य प्राप्त होईल याची गणना करणें कठीण आहे.

(**श्लोकार्ध**)

युवा भवति वृद्धोऽपि। सततं मूलबंधनात्॥

**—योगप्रदीपिका**

म्हणजे प्राणायामास अवश्य जो मूलबंध त्याच्या सतत अभ्यासानें चिरकाल यौवनाचा लाभ होतो.

सुगंधो योगिनो देहे जायते बिंदुधारणात्॥
यावद् बिंदुः स्थिरो देहे तावत्कालभयंकुतः॥१

एवं संरक्षयेद् बिंदुं मृत्युं जयति योगवित् ॥
मरणं बिंदुपातेन जीवनं बिंदुधारणात् ॥२

—योगप्रदीपिका

म्हणजे, बिंदु स्थिर राहिला असतां देहामध्यें बल उत्पन्न होऊन स्थैर्य प्राप्त होतें आणि जीविताविषयीं भय म्हणून कसें तें रहात नाहीं. याकरितां बिंदूचें रक्षण करून योगी लोक मृत्यूला जिंकून टाकितात. बिंदुपात होणें हेंच मरण असून बिंदूचें उत्तम प्रकारें रक्षण होणें हेंच अमृतत्व होय.

शुद्ध अवस्थेंत असतां कामविकारापासून मनुष्याचें हित कसें होतें व ईश्वराचा सृष्टींतील उद्देश कसा सिद्धीस जातो हें आतां वाचकांच्या लक्षांत चांगलें येईल. त्याप्रमाणेंच क्रोध या विकाराच्या शुद्ध स्वरूपापासून मनुष्याचें रक्षण व हित हीं कशीं होतात तें पाहूं. क्रोध हा मनोवेग ईश्वरानें दिला आहे म्हणून मनुष्याच्या जीविताचें, संपत्तीचें व कुटुंबांतील मनुष्याच्या जीविताचें रक्षण होतें हें उघड आहे. आपणास जर क्रोध आला नाहीं तर डोकीवर पागोटें सुद्धां उरणार नाहीं, किंवा बायकापोरांच्या अंगावर वस्त्रप्रावर्ण देखील रहाणार नाहीं किंवा घरामध्यें सुतळीचा तोडाहि मिळणार नाहीं. तेव्हां क्रोध हा वेग अवश्य आहे हें सिद्ध होतें.

हीच गोष्ट लोभ विकारास लागू आहे. लोभ म्हणजे द्रव्य किंवा कोणताहि उपयुक्त पदार्थ मिळविण्याची इच्छा होय, म्हणून लोभ नसेल तर आपणांस व कुटुंबांतील माणसांस खावयास अन्न व ल्यावयास वस्त्रसुद्धां मिळणार नाहीं. शिवाय मनाचा थोरपणा परहित सा-

धण्यांत असून, द्रव्याचा व उपयुक्त वस्तूंचा सांठा असल्याशिवाय परहित साधणें अशक्य आहे. दुसऱ्यावर उपकार केला असतां पुण्यप्राप्ति होते, व दुसऱ्यास पीडा करण्याचें फल पाप होय. म्हणून आत्मीय व कुटुंबीय रक्षणास व परोपकारास द्रव्य अवश्य आहे, आणि द्रव्याची चिन्ता मनांत बाळगल्याशिवाय व तदर्थ प्रयत्न केल्याशिवाय, द्रव्य मिळणारच नाहीं, तेव्हां लोभ हा विकार शुद्धावस्थेंत असतां मनुष्याच्या हितास अवश्य आहे हें सिद्ध होतें.

मद, मोह, मत्सर या तीन विकारांचे एका विशिष्ट प्रकारचें शुद्ध स्वरूप बनलें असतां व्यक्तीचें व समाजाचें हित अवश्य होतें. मद हें एक अहंकाराचें रूप असून, अहंकारामुळें कधीं कधीं जगांतील मोठमोठीं कार्यें घडून येतात. अवतारी पुरुष म्हणून जे जे मानिले जातात त्यांचे हातून समाजाचें अनेक प्रकारचें हित झालेलें दृष्टीस पडतें. श्रीमत् शंकराचार्य किंवा ज्ञानेश्वर महाराज हे सत्पुरुष म्हणजे अशा प्रकारचें जगाचें हित साधणारीं ठळक उदाहरणें होत. आपणाकडे दुसऱ्याचें लक्ष वेधावें ही जी शुद्ध अहंकारवृत्ति कधीं कधीं बनते तिचा पाया आपणास ज्या जनहितकारक गोष्टी आवडतात त्यांची गोडी इतरांस लावावी ही सदिच्छा होय. देशभक्त दादाभाई नवरोजी किंवा माधवराव रानडे हे पुरुष अशा प्रकारचें देशहित साधणारे उत्कृष्ट नमुने होत.

मोह हें जरी केवळ अज्ञानाचें कार्य आहे, तरी त्याच्या एक प्रकारच्या शुद्ध स्थितींत व्यक्तीचें व स-

माजाचें हित होऊं शकतें. आपणाकडे दुसऱ्याचें लक्ष वेधावें यासाठीं मदाची जी शुद्ध अहंकारवृत्ति कधीं कधीं बनते म्हणून वर सांगितलें, तिशीं सापेक्षसंबंधानें रहाणारी मोहाची एक शुद्ध स्थिति आहे, तिजमध्यें मग्न असतां, अनेक व्यक्ति, एकाद्या अवतारी पुरुषाच्या किंवा जनहितैषी पुरुषाच्या नादीं लागतात व त्या पुरुषाच्या आज्ञा ईश्वरतुल्य मानून त्यास व्यवहार्य स्वरूप देण्यास कायावाचामनेंकरून रात्रंदिवस झटत असतात. अशा व्यक्तींचे पुष्कळ समाज बनून, राष्ट्राचें कल्याण झाल्याचें हवे तितके दाखले सांपडतात.

तसेंच, अन्यगुणद्वेष म्हणजे दुसऱ्याच्या गुणाचा द्वेष हा जरी मत्सर या शब्दाचा वास्तविक अर्थ असला, तरी मत्सराशींच संबद्ध असलेला स्पर्धा म्हणून जो विकार आहे, तो श्रेयसाशीं मिश्रित होऊन अत्यन्त हितकारी होऊं शकतो. आपणास इष्ट असा एकादा गुण किंवा पदार्थ दुसऱ्यापाशीं दृष्टीस पडला असतां, स्वकीय शुभ किंवा अशुभ मनोवृत्तीची तत्काल परीक्षा होते, ती अशी कीं जे लोक हुशार व उत्साहपूर्ण असतात ते अशा वेळीं नानाप्रकारचे उद्योग व साहस करून इष्टगुण किंवा पदार्थ मिळवूं शकतात, परंतु जे लोक खुनशी, दुष्ट व निरुद्योगी असतात ते मात्र दुसऱ्याचे गुण किंवा पदार्थ नष्ट होण्याबद्दल आटोकाट प्रयत्न करितात. स्पर्धा ( Emulation ) व मत्सर ( Envy ) यामध्यें फरक असा आहे कीं स्पर्धासंपन्न पुरुष दुसऱ्याच्या पातळी इतका स्वतः उंच होण्यास झटतो व मत्सरग्रस्त पुरुष दुसऱ्यास आपल्या पातळीइतका खालीं

ओढण्याचा प्रयत्न करितो. ज्ञानी पुरुष विषयांतील सदोष भाग काढून टाकून मनुष्यमात्रास हितकारक अशा त्याच्या अमृतवटी तयार करूं शकतात, त्याप्रमाणें अन्यगुणद्वेषापासूनच जन्म पावून स्पर्धा ही अमोलिक वल्ली मनुष्यास उत्कृष्ट गुणसंपन्न करून कीर्तिशिखरास पोहोंचविते. मत्सर या विकाराच्या शुद्ध अवस्थेपासून हा अत्युत्तम लाभ घडतो व त्याचीं अनेक उदाहरणें मर्मज्ञ वाचकांस सहज आढळतील. कामक्रोधादि षड्विकारांस रिपु समजून तुच्छ मानण्याचा सर्वत्र संप्रदाय असल्यामुळें या विकारांच्या शुद्धस्वरूपाचें वर्णन विस्तृत रीतीनें केलें आहे.

# प्रकरण ६

## जड आणि चैतन्य

( श्लोक )

नाहं देहस्य नो देहो मम नायमहं तथा ॥
इति विश्रान्तचित्ता ये ते मुने पुरुषोत्तमाः ॥१

( आर्या )

देह नसे हा माझा मीहि नसे याचि देहाचा ॥
ऐसें वागवि चित्तीं उत्तम तो पुरुष होतसे साचा ॥१

# प्रकरण ६

## जड आणि चैतन्य

मानवी देहास पुढील पांच अवस्थांतून आयुष्य क्रमावें लागतें:—( १ ) जन्मापासून नऊ वर्षेपर्यंत स्तनंधयत्व व बाळपण, ( २ ) दहा पासून पंचवीस वर्षेपर्यंत ज्वानी किंवा विद्यार्थिदशा, ( ३ ) सव्वीस पासून पन्नास वर्षेपर्यंत प्रौढ व कुटुंबीय अवस्था, ( ४ ) पन्नास पासून पासष्ट वर्षेपर्यंत मध्यम संन्यास ( ५ ) पुढील आयुष्य पूर्ण संन्यास किंवा विश्रान्ति. ह्या ज्या अवस्थांच्या मर्यादा दिल्या आहेत, त्यांमध्यें शरीर व चैतन्य यांच्या निरनिराळ्या स्थितींमुळें कांहीं फरक होऊं शकेल, तथापि वर जें वयाचें मान ठरविलें आहे, त्याप्रमाणें मानवी जीवनसंग्रामाच्या, प्रयत्नाच्या, विश्रान्तीच्या व शान्तीच्या दर्शक अशा सरासरीनें अवस्था आहेत असें आढळून येईल.

स्पष्टभेददर्शक गुणधर्मांवरून व वयोमानाच्या अवधींचा पूर्ण विचार करून, वर ज्या अवधि लिहिल्या आहेत त्यांनीं परिमित अशा भिन्न अवस्थांतून मानवी देहास आक्रमण करावें लागतें. वास्तविक पहातां, प्रत्येक श्वासाबरोबर किंबहुना आयुष्याच्या प्रत्येक क्षणीं मानवी शरीरांत फरक होत असतो. अखिल भौतिक विश्व निश्चयानें हळू हळू नाश पावतें आणि त्याच दर्शनत किंवा त्याच शरीरांत फिरून कधींहि दृष्टीस पडत नाहीं. देहांतील अविनाशि भाग कधींहि मरत नाहीं

किंवा जगांतून कधींहि नष्ट होत नाहीं, तथापि ज्या अन्तर्गत शक्तींनीं तो अनुविद्ध झाला आहे, त्यांचा बनलेला देह सर्वकाल चढउतार पावत असतो, नाशाकडे प्रवृत्त होत असतो आणि जो परिणाम टाळण्यासाठीं मनुष्य जीवापाड झटत असतो त्याच परिणामामध्यें लीन होतो. सर्वांत अद्भुत असें जीविताचें रहस्य हेंच आहे कीं आपण जन्मास कसें येतों याचें ज्ञान लौकिकवार्तेखेरीज मनुष्यास कदापि होत नाहीं, तसेंच इतर माणसें मरतांना आपण पहातों यावरून होणारें अनुमान किंवा भविष्य याखेरीज आपण कसें मरतों याचेंहि ज्ञान मनुष्यास कधीं होत नाहीं. हें जें जन्माचें व मृत्यूचें कोडें तें सर्वदा मनुष्यास अज्ञात रहातें, कारण इहलोकीं आयुष्यक्रमणाच्या पूर्वीं व नंतर ज्या अवस्था प्राप्त होतात, त्या तिरोहित असतात, तेणेंकरून आपण अमर आहों अशा समजुतीनेंच मनुष्य वागत असतो. मोठाल्या संकटांत, भयंकर दुखण्यांत किंवा प्राणोत्क्रमणापूर्वीं कांहीं क्षण देखील, आपलें शरीर निर्जीव होऊन पडणार असा मनाचा निश्चय सहसा होत नाहीं. पराकाष्ठेचें शारीरिक किंवा मानसिक दुःख झालें असतां जीव जाईल तर बरें असें मनुष्याला वाटत असतें, परंतु प्रत्यक्ष आत्महत्येचे कांहीं अपवाद खेरीज करून पहातां, ज्या लोकीं एकदां गेलें असतां परत येण्याची आशाच नाहीं अशा सांपरायांत प्रवेश करण्याची इच्छा कोणीहि जाणून बुजून करीत नाहीं. आत्महत्येविषयीं सुद्धां असा विशेष आहे कीं, तें कृत्य तात्कालिक खुळेपणाचें आहे असें धर्मशास्त्रांत व व्यवहारांत समजलें

जातें, आणि अशा हत्येचें अन्यवहित म्हणजे अगदीं पूर्वींचें कारण मृत मनुष्याच्या बांधवांसहि समजत नाहीं. पौरुष पराक्रमाच्या सर्व शाखांमध्यें वीर म्हणून जे गणिले जातात, ते मात्र या नियमास अपवाद होत, कारण जगाचें रहस्य व त्याचा अवश्यंभावि नाश जाणूनच, असे पुरुष धर्माकरितां, देशाकरितां, कीर्तीकरितां किंवा ज्या गोष्टींकरितां जीव देणें उचित आहे असें त्यांच्या मनानें घेतलेलें असतें अशा गोष्टींकरितां आपले प्राण खर्चीं घालितात. परंतु इतकें असूनहि ज्या कार्याकरितां ते आपल्या जीवावर उदार झाले, त्याचा मोठेपणा न समजून कित्येक लोक ह्या प्रवृत्तीस देखील उन्मादच समजतात.

येणेंप्रमाणें जड द्रव्यें सर्वकाल विक्रियादशेंत व संक्रमण स्थितींत असून शेवटीं विनाश पावतात आणि ह्या रूपान्तराचें नियमन हवें तेव्हां करणें मानवी शक्तीबाहेरचें काम आहे, तथापि चैतन्याचें ( mind ) स्वरूप अगदीं भिन्न आहे. शरीराच्या उत्पत्तीपासून अन्तापर्यंत, तदधिष्ठित चैतन्य विकार पावत नाहीं आणि ह्या अविकार्य व अविनाशि स्वरूपाची त्याला जाणीव असते शरीर, ज्ञानेंद्रियें किंवा कर्मेंद्रियें निष्क्रिय असतील, परंतु चैतन्य कधींहि निर्व्यापार रहात नाहीं. गाढ निद्रेमध्यें सुद्धां चैतन्य चिदात्म्याशीं संबद्ध असतें आणि तेवढ्या आधारानें जीविताची ऐहिक कामगिरी बजावण्यासाठीं उत्तेजन पावतें. मनांतील विचार व संस्कार बदलूं शकतील, मानसिक शक्ति व गुणधर्म भिन्न होतील आणि शारीरिक अशक्ततेच्या किंवा सा-

मर्य्यांच्या मानानें, पूर्वीपेक्षां अशक्त किंवा समर्थ होतील; परंतु प्रत्यक्षीकरणानें ( Perception ) पदार्थज्ञानास आरंभ झाल्यापासून चैतन्याचा पूर्ण लय होईतोंपर्यंत, आपलें सत्त्व कायम आहे असा त्यास पूर्ण अनुभव येत असतो. आरंभापासून शेवटपर्यंत चैतन्य एकच रहातें. या गोष्टीवरून साधु पुरुष असा सिद्धान्त ठरवितात कीं पृथक् व भिन्न रूपानें असूनहि, प्रत्येक चैतन्य अमर आहे, अग्नींतून ठिणगी उडावी तशी परमात्म्याच्या चिदाकाशापासून त्याची उत्पत्ति झालेली आहे. आणि

( श्लोक )

वासांसि जीर्णानि यथा विहाय ।
नवानि गृह्णाति नरोऽपराणि ॥
तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही ॥१

या गीतावचनाप्रमाणें, मनुष्य जसा जुनें वस्त्र टाकून नवें घेतो, त्याप्रमाणें संचार करण्यासाठीं चैतन्य एका शरीरांतून दुसऱ्यांत अशा रीतीनें अनेक शरीरांत प्रवेश करितें.

आत्मा व त्याचें साधन जें मन यांनीं बनलेला जीवात्मा पहिलें आच्छादन टाकून, स्वाभाविकपणें दुसरें ग्रहण करण्याची इच्छा करितो. लौकिक व्यवहारांत आपण असें पाहतों कीं मनुष्याची योग्यता, अधिकार किंवा विशिष्ट गुण यांच्या मानानें, प्रासाद किंवा उच्च मंदिरें त्यास रहावयास मिळतात. अशा स्थानांमध्यें जाण्याचा ज्याला हक्क पोहोंचत नाहीं, त्याला प्रतिबंध करण्याकरितां मानवी द्वारपाल हजर असतात. एकाद्या

श्रेष्ठ किंवा स्पृहणीय शरीरांत जीवात्म्यास प्रवेश पाहिजे असेल, तर तेथील पहारेकरी दुसरा कोणी नसून, टाकून द्यावयाच्या शरीरांत असतांना केलेलें कर्मच द्वारपाल बनतें, आणि पूर्व शरीरांत जें पुण्य अथवा पाप त्याच्या खात्यास जमा असेल त्या मानानें तो त्यास उत्तम देहांत प्रवेश करूं देईल किंवा देणार नाहीं हें उघड आहे. ज्या जीवात्म्यानें कायावाचामनेंकरून आपणास यत्किंचित् देखील कलंक लावला नसेल, त्यास पाहिजे त्या शरीरांत प्रवेश करण्यास अधिकार पोहोंचतो. पूर्व शरीरांतील कृतकर्मांप्रमाणें जीवात्म्यास नूतन शरीराची निवड करणें भाग आहे. ज्या वेळेस पापपुण्याची जमा जीवात्म्याच्या. खात्यास मुळींच रहात नाहीं, सृष्टींतील सर्व शक्ति केवळ अपार समुद्राच्या लाटांप्रमाणें भासमान होऊन जीवात्मा परम शान्तीप्रत पावतो, आणि आपण परमात्मस्वरूपाहून भिन्न आहों असें त्यास मुळींच वाटत नाहीं,—अशा वेळेस मात्र इच्छास्वातंत्र्यामुळें व लहरीमुळें हातून घडलेल्या कृत्यांबद्दल प्राप्त होणाऱ्या सुखदुःखांच्या विचित्र प्रसंगांतून मनुष्याची सुटका होते व त्याचा अवतार संपतो.

येणेंप्रमाणें मानवी आयुष्याच्या आरंभापासून शेवटपर्यंत चैतन्याचें स्वरूप कायमच रहातें आणि बाह्य संस्कारांच्या व परिस्थितीच्या मानानें कधीं कर्मशील तर कधीं निष्क्रिय असा त्यांच्या उपाधीमध्यें मात्र भेद दृष्टीस पडतो, तथापि त्याचा चालक व उत्पादक जो आत्मा तो सर्वदा जागृत असतो. आत्मा हा एक असा पदार्थ आहे कीं—तो स्वतः कांहींएक व्यापार करीत

नाहीं व आपणच निर्माण केलेल्या व्यक्तींच्या हातून घडणाऱ्या क्रियांचा तो केवळ साक्षी असतो. जसा एखादा सेनानायक दुय्यम अधिकाऱ्यांच्या द्वारें हुकूम सोडून सैनिकांस युद्धास प्रवृत्त करितो, व आपण मात्र सर्वांत चैतन्य उत्पन्न करूनहि अलिप्त रहातो, तशीच गोष्ट आत्म्याची आहे. आत्म्याला जन्म नाहीं, मृत्यु नाहीं, तो एक असून अद्वितीय आहे, त्याच्यामध्यें भेद अथवा वियोग घडत नाही, तो सर्व पदार्थांस व्यापून त्यांमध्यें रहातो व अपरिमित व अपरिछिन्न आकाशतत्त्वामध्यें तो मिळून गेलेला असतो. सर्व शक्ति त्याच्यापासूनच निर्माण होतात, तरी तो सर्वशक्तिहीन असतो, सर्व इंद्रियांस त्याच्यापासून गति प्राप्त होते, तरी तो निरिंद्रियच असतो. साधूच्या, चांडालाच्या, पुण्यवानाच्या, पाप्याच्या, उद्योगशीलाच्या, निद्रिताच्या— पाहिजे त्याच्या देहांत आत्मा असतो. तो कधीं अग्नीमध्यें स्फुलिंगाप्रमाणें, उदकामध्यें प्रवाहरूपानें, वायूमध्यें श्वासरूपानें, किंवा पृथ्वीमध्यें घनरूपानें रहातो. आत्म्याच्या अस्तित्वामुळें दगड कठीण लागतो आणि लोंकर मृदु भासते. निरनिराळ्या महापुरुषांनीं आत्म्याचें वर्णन नाना प्रकारांनीं व नाना अभिधानांनीं केलेलें आहे. आत्म्यास पाहिजे तें नाव दिलें तरी चालेल, त्याला जाणिलें असतां सर्व कांहीं जाणिलें जातें. आत्म्याचें दर्शन झालें असतां पहावयाचें कांहीं उरतच नाहीं. आत्मा असा कांहीं पदार्थ आहे कीं त्यापासून द्वैताची उत्पत्ति होते. अखिल विश्वाचें आद्यंत आणि वर्तमानभूतभविष्यत् आत्मा होय. आत्मा जीवाच्या द्वारें वि-

श्वांत प्रवेश करितो, जीवाचें साधन अहंकार होय, अहंकार मनाचा रथ बनवितो, मन इंद्रियांस घोडे बनवितें आणि इंद्रियें शरीरान्तर्गत अवयवांच्या द्वारें सर्व व्यापार करीत असतात.

आत्मा निष्काम व अजाण असूनहि सृष्टीचा कर्ता होय. त्याला फलाशा नसून भोक्तृत्वहि नसतें. आत्मा सुखदु:खाचा उपभोग घेण्याकरितां मनाची उत्पत्ति करितो, आणि विचार व निश्चय करण्याकरितां बुद्धि उत्पन्न करितो. अशुभाचा संसर्ग होण्यापूर्वीं मन आत्मारूप असतें, त्यावेळीं सुशिक्षणाच्या तीरांमधून संयमन प्रवाह वहात असतो, आणि भूतमात्रांमध्यें प्रेमाच्या व ममतेच्या लाटा उसळूं लागतात. चित्तशुद्धीसाठीं ह्या प्रवाहांत निमज्जन करणें अवश्य आहे. अशा प्रवाहाच्या तीरापासून बहुतेकांचें चित्त इतकें दूर रहातें व क्षणिक वसतिस्थान जें शरीर त्यामध्यें इतकें गुरफटून जातें कीं त्यास आपल्या उत्पत्तिस्थानाचा विसर पडतो, आपल्या कवचाचें पोषण झालें कीं आपलें पोषण झालेंच अशी त्याची समजूत होते, देहाचा मल धुवून काढिला कीं आपण शुद्ध झालों असें त्यास भासतें, व रोगापासून किंवा इतर पीडेपासून देहाचें रक्षण करण्यांतच आनंदाची पराकाष्ठा वाटूं लागते. परंतु देहास अन्न समर्पण केलें तरी कांहीं काल समाधान वाटतें, पण फिरून अन्नाची गरज आहे ती आहेच. शरीर हवें तितकें धुतलें, तरी फिरून त्यास मालिन्य येतें व धुवावें लागतें. मानवी बुद्धीचा पाहिजे तितका उपयोग करून

शरीराचें रक्षण केलें, तरी रोगाचें निवारण होत नाहीं आणि मृत्यु टाळतां येत नाहीं.

पण चैतन्याची स्थिति याच्या अगदीं उलट आहे. मनास घातलेलें अन्न सर्वकाल कायम रहातें, एकदां तें योग्य रीतीनें शुद्ध केलें असतां फिरून शुद्ध करावें लागत नाहीं. बाहेरील कोणत्याहि रोगाची किंवा पीडेची भीति चैतन्यास होत नाहीं. अपथ्यकारक अन्नाच्या सेवनानें देहास रोग किंवा मृत्यु येतो, पण चैतन्यास अहितकारक अन्न मिळालें असतांहि तें ऐहिक दृष्ट्या जिवंत रहातें, पण हितकारक अन्नाच्या प्राप्तीबरोबर मनाचा लय होऊन परमात्म्याच्या स्वरूपांत तें विरून जातें. चित्त मोहग्रस्त झालें असतां मानसिक शक्ति मूढ होतात, आणि भौतिक वस्तूंशीं संबद्ध होऊन मनास अजाणपण किंवा मौर्ख्य येतें. शरीर वायुग्रस्त झालें किंवा लटकें पडलें असतां, फार झालें तर मनापासून वियुक्त होईल, पण मूर्ख बनणार नाहीं. याकरितां शरीरापेक्षां मनाकडेच अधिक लक्ष पुरविलें पाहिजे, मनासच योग्यरीतीनें शुद्ध व पुष्ट राखिलें पाहिजे. कारण शरीर क्षुद्र व बलहीन असतें, जोराचा वारा देखील त्याच्यानें सोसवत नाहीं,—रोगसंसर्ग, अनियमितपणा किंवा स्पर्शसंचार यांपासून पीडा होऊन तें अशक्त बनतें. शरीराचें सामर्थ्य फक्त चैतन्यावरच अवलंबून असतें, कारण बलवान् जीं पंचमहाभूतें त्यांवरहि पराक्रम गाजवून त्यांस आपले दास करण्याची युक्ति व कल्पना बुद्धीपासूनच साध्य होतात. शरीर व मन यांचा संबंध असेतोंपर्यंत, धनी जें मन त्याची शुश्रूषा

योग्यरीतीनें करण्यास अवश्य तेवढेंच परिपोषण शरीरास असलें म्हणजे झालें.

ऐहिक कार्यासाठीं मनाच्या दोन वृत्ति बनतातः—( १ ) उत्साही व ( २ ) जड. तसेंच शाश्वत व पारमार्थिक कार्यासाठीं मनाच्या दोन वृत्ति होतातः—( १ ) शांत किंवा निवृत्त आणि ( २ ) चंचल किंवा प्रवृत्त. शरीरास एकादे वेळीं रोग होतो आणि त्यापासून मृत्यु जरी प्राप्त झाला नाहीं, तथापि तो बरा होण्यास फार अवधि लागतो, परंतु मनाची स्थिति तशी नाहीं, कारण एका अवस्थेंतून दुसरींत जाण्यास त्यास मुळींच वेळ लागत नाहीं. चंचल वृत्ति ही मनाची नैसर्गिक स्थिति होय, कारण ही वृत्ति नसेल तर जीवित निवृत्तिपर होतें आणि मनाची प्रपंचोन्मुखता व स्वरूप हीं लयास जातात. मूर्ति तितक्या प्रकृति या म्हणी प्रमाणें, जितक्या मानवी आकृति आहेत, तितक्या चंचल वृत्तीच्या अवस्था बनतात आणि चेहरा व बांधा यांप्रमाणेंच एक मानवी आकृति दुसरीस जुळतच नाहीं.

# प्रकरण ७

## शाश्वतसुखाचे पंथ

( श्लोक )

तच्छ्रुतं यत्किल ज्ञप्त्यै सा ज्ञप्तिः समता यया ॥
तत्साम्यं यत्र सौषुप्तिस्थितिर्जाग्रति जायते ॥ १

( आर्या )

श्रवण तयासि म्हणावें जेणें तें ज्ञान सर्वदा जोडे ॥
अखिल पदार्थीं समता होय ज्ञानेंचि मौर्ख्य तें मोडे ॥ १

जाग्रदवस्थेमाजीं अनुभव परिपूर्ण येइ निद्रेचा ॥
जाणावी ती समता ईश्वरभजनींच होइ रत साचा ॥ २

# प्रकरण ७

## शाश्वतसुखाचे पंथ

जेव्हां मनाची वृत्ति चंचल अथवा कर्मशील होते, तेव्हां तें बंधनांमध्यें व शृंखलांमध्यें गुरफटून जातें. या अवस्थेंत तें मन बहिर्मुख होऊन, इतर पदार्थ आपणाहून भिन्न आहेत असें त्यास वाटूं लागतें, पण तीच अद्वैत स्थिति प्राप्त झाली असतां, सर्व बंधनांपासून व तदनुषंगिक संकटांपासून मन निर्मुक्त होतें. प्रपंचोन्मुखता हीच जागृति होय. अहंकारव्याप्ति तेंच स्वप्न समजावें, संकल्पविकल्पातीत होणें ती सुषुप्ति जाणावी आणि आत्मस्वरूपांत सर्वकाल निमग्न रहाणें हीच श्रेष्ठ परमानंदाची स्थिति समजावी.

ऐहिक शृंखलांपासून निर्मुक्त होऊन ही परमानंदाची स्थिति पाहिजे असेल, तर सत्पुरुषांनीं चार उपाय सांगितले आहेत आणि ह्यांपैकीं सर्वांचा नसला तरी कांहीं उपायांचा अवलंब कोणत्या तरी रूपानें सर्व सिद्ध पुरुषांनीं केलेला असतो.

पहिला उपाय साधुसमागम असून, हा अगदीं सुलभ आहे व जो कोणी ह्या उपायाबद्दल यत्न करील त्यास तो खचित साध्य होण्यासारखा आहे. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें व संसाराचे सामान्य निरीक्षणावरून असें समजतें कीं केवळ संगतीनें मनुष्याचें चरित्र सुखकर किंवा दुःखकर होऊन जातें, आणि हा परिणाम याच शरीरास भोगावा लागतो असें नाहीं. कारण, संगतीपासून

जे मनावर अपरिहार्य परिणाम घडतात ते कांहीं शरीरनाशाबरोबर नष्ट होत नाहींत. विरजाहोमानें शरीरांतील पंचमहाभूतांची जरी शुद्धि झाली, तरी चित्ताची शुद्धि निरंजन परमात्म्यामध्यें लीन झाल्याशिवाय होतच नाहीं. तेव्हां अशा रीतीनें चित्त शुद्ध झालें नसेल, तर इतर चित्ताशीं घडलेल्या संसर्गाचा परिणाम तसाच कायम रहातो व तो संस्कार पूर्णपणें नष्ट होतच नाहीं. अशा स्थितीत साधुसमागम एवढाच तरणोपायाचा मार्ग राहिला आहे.

सामान्य मनुष्यास स्वतंत्रतेनें पूर्णता प्राप्त होणें अशक्य आहे. तथापि एकनिष्ठेनें शोध केला असतां, ईश्वरीय मंगलदायक स्वरूपाची कल्पना आणून देणारे महात्मे कधीं कधीं आढळतात यांत संशय नाहीं. याहून कमी महत्त्वाच्या प्रापंचिक गोष्टींत इतर लोक जसे झटून श्रम घेतात, त्याप्रमाणें असे महात्मे जर नेटानें प्रयत्न करितील, तर मनुष्यमात्राचें कल्याण होईल. असे प्रयत्न जेव्हां घडलेले आहेत, तेव्हांच श्रेष्ठ आचार व धर्म उत्पन्न झालेले असतात, आणि तेणेंकरून मनुष्यास बऱ्याच अंशानें शाश्वतसुखाची प्राप्ति झालेली आहे. शरीरास चांगल्या अन्नाची गरज आहे खरी, तथापि ती थोडक्या कालांत भागवितां येते, पण सत्समागमाची आवश्यकता चैतन्यास कायमची आहे. देहाच्या उत्पत्तीपासून विनाशापर्यंत त्याला कितीहि उत्तम अन्न दिलें, तरी फार तर मोठाले रोग किंवा पीडा होणार नाहीं, पण मृत्यूपासून त्याची सुटका कधींच व्हावयाची नाहीं. परंतु साधुसमागम प्रसंगवशात् जर प्राप्त झाला, तर

इहलोकीं व परलोकीं मनुष्यास मोक्षप्राप्ति ठेवलेलीच **आहे.**

मनुष्याचें जीवित सुखकर होण्यास साधुसमागम हें श्रेष्ठ साधन असल्यामुळें, सत्समागम म्हणजे काय व त्याचा लाभ कसा करून घ्यावा हें पहाणें जरूर आहे. जो समागम अथवा उपदेश सर्वांस वंद्य होतो व सदाचरण बनण्यास सहाय होतो तो सत्समागम जाणावा. चांगल्या किंवा वाईट संगतीचा परिणाम मनुष्याच्या संवयींवर आणि तेणेंकरून त्याच्या आचरणावर अवश्य घडतो. ज्या संगतीनें आयुष्यक्रमाचें उच्च व उदात्त ध्येय अन्तःकरणांत भिनून जातें, कर्तव्याची श्रेष्ठ भावना उत्पन्न होते, सत्याचा प्रकाश देदीप्यमान दिसूं लागतो आणि शाश्वत आनंदाचा मार्ग दृग्गोचर होतो— ती सत्संगति होय. सत्समागमानें ध्यानाभ्यास सुकर होतो, पूर्वग्रहापासून व मानभावीपणापासून चित्ताची सुटका होते, आणि भिन्न प्रकारच्या शिकवणीमुळें व कल्पनांमुळें होणारे संस्कार पुसून जातात.

अशाश्वत लौकिक व्यवहारांत देखील सत्समागमापासून चांगला मार्ग लागतो आणि तेणेंकरून कीर्ति व सदाचरण ह्यांपासून होणारा अभ्युदय अनुभवास येतो. निःश्रेयसरूप इमारतीचें शिखर असा जो शाश्वत आनंद तत्प्राप्त्यर्थ केलेल्या बोधाहून हा मार्ग निराळा असत नाहीं आणि कीर्ति व सदाचरण यांचा पाया मजबूत असेल व दीर्घ प्रयत्न केला असेल तर हा शाश्वत आनंद पुढें लब्ध होतोच. आयुष्यक्रमणाच्या पहिल्या टप्प्यावर आई-बाप व पालक यांच्या रूपानें स-

त्समागम सिद्ध असतोच. आई-बाप व पालक जर कर्तव्यतत्पर, थोर मनाचे व सुशिक्षित असतील, तर बालकाचें मन सत्याकडे व कर्तव्याकडे सहज वळेल, पण ते जर अशा प्रकारचे नसतील तर अभ्युदयाची व निःश्रेयसाची आशा व्यर्थ आहे. मानवी स्वभावच असा असतो कीं दोष लावावयाचा दुसऱ्याला आणि यशाचा वांटेकरी मात्र आपण व्हायचें, परंतु मनुष्याला असें समजत नाहीं कीं सत्समागमापासून मिळणारें शिक्षण जर बाळपणापासून प्राप्त झालें नाहीं, तर त्याचा दोष व त्यापासून भोगाव्या लागणाऱ्या यातना त्या व्यक्तीच्याच कपाळीं बसतात आणि ह्या वाईट परिणामांबद्दल जे खरोखर जबाबदार असतात ते अजीबात सुटून जातात. पण जर कदाचित् एकाद्यास बुद्धिमान् व कर्तव्यदक्ष शिक्षक लाभले, तर त्याचें श्रेय त्या व्यक्तींस न मिळून, चांगले परिणाम घडवून आणल्याबद्दल ते शिक्षक यशाचे भागीदार हक्कानें होतातच. यश तेवढें आपण संपादावयाचें आणि दोष दुसऱ्यावर लादावयाचा—ह्याप्रवृत्तीचें बीज केवळ अहंकार होय. अहंकारवृत्ति फाजील झाली म्हणजे असला भित्रेपणाचा प्रकार घडून येतो. असल्या भित्रेपणास वश न होणारे कांहीं थोर लोक असतात, तथापि असला वाईट गुण अंगीं लागूं नये आणि लागलाच तर तो निघून जावा याकरितां बाळपणापासून विशेष बोध अन्तःकरणावर ठसविणें मनुष्याच्या कल्याणास अत्यन्त अवश्य आहे. आपल्या मुलांस विशिष्ट धार्मिक शिक्षण मिळावें व भावी ऐहिक कल्याणासाठीं आपल्या समजुतीनें अवश्य

अशीं त्यांचीं मतें व्हावीं म्हणून बाप अतिशय जपत असतो, परंतु ज्या संगतीनें इहपरलोकीं त्यांचें कल्याण होईल, आणि व्यक्तीचें व समाजाचें श्रेष्ठ प्रतीचें हित साध्य होईल अशी उत्तम संगती त्यांस मिळवून देण्याबद्दल बापाला मुळींच काळजी नसते. सुधारणेचा टेंभा कितीहि मिरविला तरी समाजाची स्थिति इतकी अपक्व आहे कीं, मुलांस व तरुणांस शारीरिक पीडा जे करितात अशा मातापितरांस किंवा इतर परक्या मनुष्यास शिक्षा होते, परंतु मुलांच्या व तरुणांच्या मनांत भाषणाच्या किंवा वाङ्मयाच्या द्वारें मानसिक किंवा नैतिक विष पेरणारे अचानक सुटून जातात. आई बाप व पालक यांशिवाय बालशुश्रूषा करणाऱ्या स्त्रिया, मित्र, शिक्षक आणि पुस्तकें यांचा संस्कार मुलांच्या व तरुणांच्या अंतःकरणावर विशेष घडतो. असेंहि पहाण्यांत येतें कीं, एकाच शिक्षकाच्या शिकवणीनें किंवा एकाच पुस्तकाच्या वाचनानें एकाद्याच्या मनावर चांगला परिणाम घडतो, पण दुसऱ्याच्या अन्तःकरणावर कांहींच घडत नाहीं. अशी गोष्ट कां घडते व एकाद्या मुलाच्या नशिबानें त्याला जन्मापासून उत्तम गुरु कां प्राप्त होतात—या प्रश्नांचीं उत्तरें लोक निरनिराळीं देतात. कोणी म्हणतात कीं या गोष्टी केवळ आकस्मिक होतात, दुसरे म्हणतात कीं या गोष्टी ज्याच्या त्याच्या पूर्वसंचिताप्रमाणें ठरलेल्या असतात. तेव्हां या प्रश्नाचें प्रमाणसिद्ध असें जरी उत्तर देतां आलें नाहीं, तरी एवढें खरें आहे कीं, मनुष्यमात्राचें कल्याण व सुखाची अभिवृद्धि यांकडे सर्व प्रतींच्या लोकांचें लक्ष कमी-जास्त असतें, यासाठीं

उत्कृष्ट समागम व उपयुक्त ग्रंथ यांच्या द्वारें उत्तम शिक्षण मिळण्याची संधि प्रत्येक व्यक्तीस असली पाहिजे आणि त्याकरितां योग्य तजवीज करणें प्रत्येक समाजाचें कर्तव्य आहे.

प्रापंचिक बंधनांपासून निर्मुक्त होऊन परमानंदाची प्राप्ति होण्यास दुसरा उपाय म्हटला म्हणजे बुद्धिसामर्थ्य होय. सत्समागमानें खऱ्या व उपयुक्त शिक्षणाचा पाया मजबूत झाला म्हणजे विवेचकबुद्धि ( reason ) परिपक्व होते. शिक्षणाचा योग्य उपयोग झाला असेल व बाळपणापासून बुद्धिसामर्थ्य वादविण्यास उत्तेजन दिलें असेल, तर जसजसें वय होत जातें, तसतशी विवेचकबुद्धि परिपक्व होत जाऊन सकल पदार्थांचें सत्यस्वरूप प्रकाशित होतें. ह्यासच कोणी स्वपराक्रम किंवा आत्मविश्वास म्हणतात. नांव कांहीहि ठेवा, आणि इतर मानसिकशक्तींप्रमाणें, बुद्धीस वाईट वळण लागल्यास अशुभ कांहींहि घडो, इतकें खरें आहे कीं बुद्धीचा विकास होण्यास उत्तेजन दिलें पाहिजे. कोणत्याहि प्रकारचा बलात्कार न करितां व भय न दाखवितां, प्रत्येक क्रियेचा किंवा विचाराचा शुभ किंवा अशुभ परिणाम स्वतः शोधून काढण्यांत बाळपणापासून पूर्ण स्वातंत्र्य उपभोगिलें असेल, तर विवेचकबुद्धि पूर्णपणें विकसित होते; अशा प्रसंगीं पालकांचें काम एवढेंच असतें कीं संकटापासून मुलांचें रक्षण करावें आणि त्यांच्या परम हिताचा मार्ग मात्र दाखवावा. योग्यरीतीनें बुद्धि परिपक्व झाली नसेल, तर तिर्यग्योनीप्रमाणेंच मनुष्याची गणना होईल. विचारशक्तीमुळेंच मनुष्यास श्रेष्ठत्व येतें

आणि सुखाची प्राप्ति होते, तसेंच क्षणभर सुखकारक पण अंतीं दुःखकारक अशा पदार्थांचा त्याग करावा हेंहि त्याच शक्तीमुळें मनुष्यास समजतें. बाळपणीं व किशोर अवस्थेंत विचारशक्तीचें संगोपन केलें पाहिजे आणि तारुण्यांत पूर्ण वाढ झाल्यानंतर विचारशक्तीचा पूर्ण उपयोग केल्याशिवाय कांहीं एक करितां कामा नये. विचार केल्याशिवाय हलक्या प्रतीच्या किंवा अडाणी लोकांच्या म्हणण्याचा त्याग करूं नये अथवा अधिक योग्यतेच्या लोकांचें म्हणणें ऐकूं नये. बुद्धीचा परिपोष यथायोग्य केला असतां व पदोपदीं उपयोग केला असतां सर्व संकटांपासून सुटका होते, आणि मनोविकारांचा व पूर्वग्रहांचा पगडा न बसतां सौख्यप्राप्ति होऊन स्नेह्यांस व बांधवांस उत्कृष्ट धडा घालून देतां येतो. विचारशक्ति म्हणजे धरसोडपणा किंवा चेंगटपणा असें कोणीं समजूं नये. एकाद्या गोष्टीचा निकाल लावावयाचा असेल आणि अनेक मार्ग पुढें आले असतील तर कोणत्या मार्गाचा स्वीकार करावा हें बुद्धीचा उपयोग करून ठरवावें, तेणेंकरून प्राणिमात्रास सहज समजणारा क्षणिक आत्मलाभ न होतां, शाश्वत सुखाची प्राप्ति होईल.

असें अनेक वेळां नजरेस येतें कीं मानवी व्यवहारांत शुभ व अशुभ यांचें मिश्रण झाल्यामुळें तात्कालिक संकट टाळावें व मग पुढें काय होणार असेल तें होवो, अशा मार्गाचें आचरण करण्याकडे मनुष्याची प्रवृत्ति होते. ही प्रवृत्ति म्हणजे चालता काळ चैनींत घालवावा अशा विचाराचा निवळ आप्पलपोटेपणा असून,

शुद्ध मूर्खपणा व भित्रेपणा होय. खऱ्या स्वार्थपर यणतेनें मनुष्यास वागावयाचें असेल, तर जो मार्ग तत्काळ गोड नसला तरी शाश्वतसुख देणारा असतो अशा मार्गाचेंच अवलंबन केलें पाहिजे, म्हणजेच स्वार्थ साधेल. कारण ज्यापासून सुख होईल असें प्रथम वाटतें त्यापासून अंतीं दुःख होतें आणि ज्यापासून प्रथम श्रम व त्रास होतात, त्यापासून शेवटीं शान्ति व शाश्वत आनंद प्राप्त होतात. मानवी प्रयत्न आरंभीं सिद्धीस जात नाहीं आणि अनेक संकटें व अडचणी सोसल्यानंतर कायमचें यश प्राप्त होतें. सामान्य बुद्धीच्या मनुष्यास स्वतः दीर्घ उद्योग केल्याशिवाय क्षणिक लाभ होणें देखील शक्य नाहीं आणि अहंकारवृत्तीचें यत्किंचित् प्रख्यापन होऊं न देतां विश्वव्यापक परमात्म्याचें अनुसंधान राखून बुद्धिप्रकाशानें उत्तेजित अशा दीर्घ प्रयत्नांवांचून, शाश्वत कल्याण होणें अगदीं अशक्य आहे.

शाश्वतसुखप्राप्तीचें तिसरें साधन समाधानवृत्ति हें होय. भय किंवा संकट, संपत्ति किंवा विपत्ति, जय किंवा पराजय—अशा अनेक प्रसंगीं चित्ताची समता राखणें हेंच समाधानवृत्तीचें लक्षण होय. प्रापंचिक व्यवहाराच्या चंचल स्वरूपामुळें, मनुष्याच्या अन्तःकरणास नाना प्रकारच्या उर्मी, उद्वेग व विकार सहन करावे लागतात,—म्हणजे क्षणांत दुःख तर क्षणांत सुख, आज निश्चय तर उद्यां शंका, केव्हां आशा केव्हां विषाद, कधीं प्रेम कधीं द्वेष, आज शान्ति उद्यां क्रोध, कधीं औदासिन्य तर कधीं चिंता—केव्हां याच विकारांची उलटापालट—अशा उर्मींचे वेग सोसावे लागत अस-

त्यामुळें, साऱ्या जीविताचा जो उद्देश एकाद्यानें ठरावला असेल त्याला जन्मभर चिकटून रहाण्यासाठीं जर कांहीं उपाय असेल, तर समाधानवृत्ति हाच होय. या वृत्तीचा परिपोष फारच काळजीनें करून, ती पूर्णपणें बाणली पाहिजे. समाधानवृत्ति म्हणजे कांहीं क्रियाशून्यता नव्हे, स्तिमितपणा नव्हे, आलस्य नव्हे, किंवा प्रारब्धवाद नव्हे. समाधान म्हणून एक मनुष्याच्या अन्तःकरणाची अवस्था आहे, त्या अवस्थेमध्यें असतां, प्राप्त झालेल्या स्थितींतच मनुष्य आपलें कर्तव्य बजावण्याची पराकाष्ठा करीत असतो, पण यशानें चढून न जातां व अपयशानें उद्विग्न न होतां, सर्वकाल शान्ति व समता राखून, आपल्या तेजानें सर्व दिशा प्रकाशित करितो. ऐहिक दृष्टीनें पहातां, समाधानवृत्तीचा पुरुषच पूर्ण यश मिळवूं शकतो, कारण तो अपयश किंवा निराशा जाणतच नाहीं, आणि यदाकदाचित् त्याची हानि झाली, तरी फिरून यत्न करण्यासाठीं त्याची उमेद कायम रहाते. कांहीं लोकांच्या अन्तःकरणाच्या स्थितीवरून असें दिसतें कीं, ही वृत्ति निसर्गतः जरी नसली, तरी सृष्टिनिरीक्षणानें व बुद्धिशक्तीनें त्रिकालाबाधित सत्याची खरी कल्पना येऊन, समाधानवृत्तीचा लाभ व विकास सहज होऊं शकतात. सत्य म्हणजे काय याची खरी समजूत बहुधा होतच नाहीं, लोक सत्याविषयीं उगीच बडबड मात्र करितात. कांहीं वस्तूंच्या नियतकालिक दर्शनी स्वरूपास लावून पहातां, सत्याविषयींची प्रचारांतील कल्पना बरोबर असेल, पण सामान्य लोकांच्या लक्षांत असें येत नाहीं कीं सत्याम-

ध्यें यत्किंचित् देखील भेदभाव असत नाहीं आणि चित्तास जेव्हां आपला विसर पडतो तेव्हांच ज्याची खरी कल्पना होऊं शकते आणि आत्मा मानवी शरीरास सोडून गेल्यावरच ज्याचें खरें स्वरूप ध्यानांत येतें—— अशा सर्वकाल बदलणाऱ्या क्षणभंगुर जगामध्यें सत्याची अपेक्षा करणें म्हणजे जलामध्यें अग्नि किंवा प्रेतामध्यें प्राण सांपडण्यासारखें आहे. विवेचकबुद्धीच्या प्रकाशानें जो चालतो व पूर्णसमाधानवृत्तीनें जो रहातो अशा मनुष्यास मात्र सत्याचें खरें स्वरूप समजतें.

जीविताचें रहस्य समजण्याकरितां त्याचा पाया जो विरोध किंवा द्वैत त्याचें उत्कृष्ट विज्ञान झालें पाहिजे. पांढरेंच नसेल तर काळ्याची कल्पना होणार नाहीं, उलट काळें नसेल तर पांढरें लक्षांत येणार नाहीं. जर अपयश कधीं आलेंच नाहीं, तर यशाची आशा कोण करील? जर असत्य प्रचारांत नसेल, तर सत्याची मुळींच किंमत रहाणार नाहीं. जर अशक्तपणामुळें निराश्रितपणा आला नाहीं, तर शक्तीची काय प्रतिष्ठा आहे? मन कधीं कधीं उद्विग्न होतें, म्हणून हर्षानें चित्तास समाधान वाटतें, आणि हर्ष झाला नाहीं, तर विषादहि वाटणार नाहीं. इतके जरी अन्तःकरणाचे प्रकार झाले, तरी मनाची स्थिति क्षणिक असते हें लक्षांत देखील येत नाहीं. ज्या कारणामुळें हर्ष झाला, तें जोंपर्यंत नवीन आहे तोंपर्यंतच हर्ष टिकतो. जर हर्षाचा जोर कायम राहील, तर मानवी उद्योगच बंद पडेल, आणि कोणताहि प्रयत्न करण्यास कारणच उरणार नाहीं. जोंपर्यन्त मनास कंटाळा आला नाहीं, तोंपर्यं-

तच हर्ष किंवा सुख टिकतें. काम, क्रोध, लोभ, द्वेष किंवा कोणताहि मनोवेग घ्या, तो एका प्रमाणांत कधीं रहात नाहीं. जर अशी गोष्ट घडेल तर मन त्या एका वेगांतच गढून जाईल आणि एकाग्रचित्तानें उद्देश सिद्धीस गेल्यावर दुसऱ्या हेतूसाठीं प्रयत्न करण्यास मन असमर्थ होईल. दुःख किंवा विपत्ति यांचीहि गोष्ट अशीच आहे. दुःख फारवेळ टिकेल किंवा विपत्ति कायम राहील, तर मृत्यु प्राप्त होईल; कारण शोकाविष्ट चित्त नष्ट होतें. कोणतीहि विपत्ति येवो, भविष्यत्काळीं सुख होण्याचा किंवा चांगलें नशीब उघडण्याचा आशातन्तु शिल्लक असतो. यासाठीं क्षणिक व तात्कालिक कारणांमुळें उत्पन्न झालेली मनाची स्थिति किती चंचल असते तें पाहून, समाधान अथवा शान्ति हीच विलोभनीय वृत्ति आहे असें कबूल करणें भाग आहे, कारण यश किंवा अपयश हीं गुणांवर अवलंबून असल्यामुळें मनाचा प्रक्षोभ त्यामुळें घडत नाहीं. म्हणून

**(अभंग)**

आलिया भोगासि असावें सादर ॥
देवावरि भार घालूं नये ॥ १

हें वचन अनुभवसिद्ध आहे यांत संशय नाही.

शाश्वतसुखप्राप्तीचें चवथें साधन म्हटलें म्हणजे इंद्रियदमन होय. कायदे किंवा अधिकार यांनीं नियमन झाल्याशिवाय, कोणत्याहि अवस्थेंत सुखप्राप्ति होणार नाहीं. जड विश्वामध्यें श्रेष्ठ शक्तींचा अंमल चालतो. ह्या शक्ति नैतिक शक्तींनीं नियमित होतात आणि हे नैतिक नियम तत्कालीन श्रेष्ठ नैतिक बलाचेंच आ-

विष्करण असतात. भौतिक किंवा नैतिक दृष्टीनें स्वातंत्र्याच्या उपभोगांत सिद्धि हवी असेल, तर आत्मसंयमन केलें पाहिजे, कारण खरें स्वातंत्र्य बंधनाच्या अभावांत नसून आत्मसंयमनांतच आहे. चित्ताचें संयमन झालें नाहीं, तर स्वातंत्र्याचे ऐवजी यथेच्छ आचरण, अनियंत्रितपणा व जुलूम अशीं त्याचीं कनिष्ठ रूपांतरें होतात.

दर्शन, श्रोत्र, घ्राण, रसना व त्वक् ह्या इंद्रियांस मनापासूनच बळ आणि उपयोगीं पडण्याची योग्यता हीं प्राप्त होतात. बुद्धीच्या कह्यांत राहून योग्य मार्गानें वागण्याकरितां हीं इंद्रियें निर्माण झालेलीं आहेत. जेव्हां बुद्धीचा अंमल चालत नाहीं, तेव्हां इंद्रियनिरूपित वासना मनास अनावर न व्हाव्या म्हणून दुसऱ्या एकाद्या शक्तीचें साहाय्य घेतलें पाहिजे. डोळ्यांनीं योग्य वस्तु पहाव्या, कानांनीं इष्ट वचनें ऐकावीं, नाकानें सुगंधाचा वास घ्यावा, जिव्हेनें हितकारक वस्तु चाखाव्या आणि गोड शब्द बोलावे, त्वचेनें मृदु पदार्थांस स्पर्श करावा— अशा रीतीनें इंद्रियांस शिक्षण मिळण्याचें साधन अवश्य पाहिजे. शूराच्या हातांतील तलवारीप्रमाणें किंवा बंदुकीप्रमाणें, इंद्रियांचा उपयोग योग्य प्रसंगीं अवश्य वाटेल तेव्हां बुद्धीच्या अनुसंधानानें करावा, म्हणजे स्वार्थाकरितां किंवा दुसऱ्यास इजा करण्याकरितां नसून, केवळ स्वरक्षणार्थ किंवा अनिष्ट व नाश यांच्या निवारणाकरितांच त्यांचा उपयोग करावा. एक महात्मा म्हणतो कीं जिव्हा स्वाधीन ठेवितां येत नाहीं, जीभ हें एक प्राणघातक विषानें भरलेलें मोठें अरिष्ट आहे. जो आ-

पली जीभ कह्यांत ठेवितो तो ईश्वरी स्वरूप पावतो. कांहीं अंशीं उच्च संगोपनानें जीभ हुकुमांत रहाते, आणि असेंहि पहाण्यांत येतें कीं जितकें श्रेष्ठप्रतीचें पालनपोषण मिळेल तितकी जिव्हा अधिक कह्यांत रहाते. इतर इंद्रियांचीहि अशीच गोष्ट आहे. अद्वैतानुभव संपादन झाला असेल, तर इंद्रियें जोमांत राहिलीं असतां हरकत नाहीं, पण द्वैतप्रतीति होऊं लागल्याबरोबर, त्यांचें अंशतः स्तंभन करणें अवश्य आहे. इंद्रियें नियमिलीं किंवा न नियमिलीं, कांहीं झालें तरी, चित्ताची शान्ति ढळत नाहीं अशा रीतीचें श्रेष्ठ वळण इंद्रियांचा अधिष्ठाता जें मन त्यास लागलें असेल, तर मात्र त्यांस शारीरिकदृष्ट्या हुकुमांत ठेवण्याचा मार्ग हाच कीं— नेत्र असून आंधळ्याप्रमाणें पहावें, कान असून बधिराप्रमाणें ऐकावें, जिव्हा असून मुक्याप्रमाणें बोलावें, घ्राणेंद्रिय असून तें नसल्याप्रमाणें हुंगावें, व स्पर्शेंद्रिय असून तें नसल्याप्रमाणें स्पर्श करावा. इंद्रियांस गैरशिस्त वळण मिळालें असेल तर तीं बिघडतील. आणि त्यांस तर सर्व वळण मनाकडून मिळतें. शारीरस्थ अवयवांकडून इंद्रियांचा व्यापार घडतो, त्यांचा पदार्थांशीं संपर्क घडला असतां इंद्रियें तो निरोप मनास पोहोंचवितात, आणि निरोप पावल्यानंतर मन त्या व्यापारास लागतें. जासुदाचें मूळचें कार्य जर शुद्ध असेल, तर यजमानाचें वांकडें पाऊल पडण्याचा संभव कमी असतो; तेंच जर कार्य संशयित असेल, तर मालकावर योग्य नजर ठेविली पाहिजे, नाहीं तर त्याची पापाकडे नकळत प्रवृत्ति होईल. मन जेव्हां अविश्वस-

नीय व पापक्षम होईल, तेव्हां इंद्रियें ताब्यांत ठेवणें अवश्य होईल. तथापि मन व त्याचा अनुभव यांस उत्कृष्ट वळण लागून तीं कह्यांत रहातील, तेव्हां इंद्रियें यथेच्छ वागलीं, तरी हरकत नाहीं. विवेकबुद्धीच्या ताब्यांत मन राहील, तर सर्व वस्तु असूनहि नाहींतशा होतील, आणि ज्यापासून मनाची उत्पत्ति झाली, त्या परमात्मस्वरूपांत मनाचा व अखिल सृष्टीचा लय होईल.

# प्रकरण ८

## बंध आणि मोक्ष

( श्लोक )

बंधुरात्माऽऽत्मनस्तस्य येनाऽऽत्मैवात्मना जितः ॥

अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥ १

( आर्या )

जेणें मन जिंकियलें तो सत्यचि आपुला सखा परिसा ॥

स्वाधीन नसे ज्याचें चित्त तया होइ तोचि शत्रु असा ॥ १

# प्रकरण ८

## बंध आणि मोक्ष

इंद्रियांच्या आधीन झाल्यामुळें जीं संकटें प्राप्त होतात, तीं पांच प्राण्यांच्या दृष्टान्तांनीं व्यक्त करितां येतात. रूपाला मोहित होऊन पतंग दीपज्योतीमध्यें आपला नाश करून घेतो, हरिण व्याधाच्या मधुर स्वरानें मूढ होऊन मृत्यु पावतो, भ्रमर सुगंधमग्न होऊन त्या धुंदींत आपणास कमलांत कोंडून घेतो, मासा आमिषासाठीं लुब्ध होऊन आपली मान गळांत अडकवून घेतो, आणि हत्तिणीच्या स्पर्शसुखाकरितां हत्ती तिच्या मागें लागून खड्यांत पडतो. एकेक इंद्रियाधीन झालेल्यांची जर ही स्थिति, तर पंचविषयरूप अनर्थांनीं व्याप्त झालेल्या मनुष्यानें जर इंद्रियें कह्यांत ठेविलीं नाहींत, तर त्यास सुखप्राप्ति कशी होईल? यासाठीं मोहाचे प्रसंग टाळण्यांत पुरुषार्थ नसून, मोहास प्रतिबंध करून इंद्रियदमन करण्यांतच खरें पौरुष दृष्टीस पडतें.

अहंकारवृत्ति तीन प्रकारच्या व्यक्तींमध्यें नजरेस येते. कांहीं श्रेष्ठ प्रतीच्या मनुष्यांस वगळून, मनुष्यमात्रापासून किडा मुंगीपर्यंत यच्चयावत् प्राण्यांचा अन्तर्भाव पहिल्या वर्गांत होतो आणि ज्या जड शरीरानें सर्व व्यापार चालतात त्यांतच गुरफटून गेलेल्या अहंकारवृत्तीची जाणीव या वर्गांतील व्यक्तींमध्यें सर्वकाल जागृत असते. हस्तपादादि कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें यांनीं युक्त जें नखशिखान्त शरीर त्याच्या जाणिवेंत ह्या व्यक्ति

मुरून जातात, आणि एवढेंच त्यांचें आत्मज्ञान असतें. शरीराचें सुख व इतर बांधवांमध्यें त्याची प्रतिष्ठा हाच त्या वर्गांतील व्यक्तींचा व्यवसाय असतो. वास्तविकपणें देह क्षणभंगुर असून त्याचीं बाह्य व आंतर अंगें प्रत्येकक्षणीं बदलत असतात आणि त्याचे अवयव पंचमहाभूतांमध्यें एकदां लय पावले म्हणजे त्यांचा कायमचा नाश होऊन पुनरावृत्तीची आशाहि रहात नाहीं. एकदां शरीराचा नाश झाला म्हणजे ज्यांनीं तें एकदां पाहिलेलें असतें त्यांस त्याचा दिवसानुदिवस विसर पडत जातो आणि त्याच्या मागून जे लोक जन्मास येतात व ज्यांस त्याचा संसर्गहि नसतो अशा लोकांस—त्यानें जिवंत असतांना जीं कर्में केलीं असतील तदनुरूप उत्पन्न होणाऱ्या सन्मान, भीति, तिरस्कार किंवा औदासिन्य अशा वृत्तींची आठवण—एवढीच कायती ओळख रहाते. अशा आठवणीमुळें भिन्न मनोवृत्तींच्या मनुष्यांमध्यें जे जे कल्पनातरंग उठतील त्यांपासून त्यांचें कांहीं एक शुभ किंवा अशुभ न होतां त्याच्या जड शरीरापासून साक्षात् किंवा परंपरेनें उत्पन्न झालेल्या प्रजेवर जो अनुवंशिक संस्कार घडला असेल व जो इतर शरीराशीं संलग्न होत होत कमी कमी होत जातो—अशा संस्काराखेरीज त्या मृत मनुष्याचा इतर संततीवर बिलकुल परिणाम होत नाहीं. अशी वास्तविक स्थिति असतां, ही मनुष्याकृति आपणास जिवन्तपणीं सर्व जगतामध्यें श्रेष्ठ मानीत असते आणि सृष्टि व तदन्तर्गत नियम व चलनवलनादिक व्यापार हीं सर्व आपल्याच सुखाकरितां निर्माण झालेलीं आहेत असें मानिते, मग तें सुख कि-

तीहि क्षणभंगुर असलें तरी चालेल. ज्या सुखाकरितां मनुष्य इतकी धडपड करितो किंवा जें दुःख टाळण्याकरितां प्रयत्न करीत असतो——त्या सुखदुःखांचाहि परिणाम त्यावर फारसा घडत नाहीं, कारण स्वाभाविकपणें किंवा कृत्रिम तऱ्हेनें तो जर बेशुद्ध झाला, तर त्यास कशाचेंहि भान होत नाहीं आणि त्या सुखदुःखांचा भर प्रतिक्षणीं कमी कमी होत जातो; पण शुद्धि परत आल्यावर त्याचा पहिला क्रम चालू रहातो आणि मृगजलाप्रमाणें असत्य अशा सुखदुःखामागें तो लागलेला असतो. अशा वर्गांतील लोक नेहमीं सुखदुःखाच्या रहाटींत आपलें आयुष्य कंठीत असतात. अशा लोकांकरितां साधूंची उक्ति अशी आहे कीं——सर्व वैषयिकसुखें असत्य आहेत आणि दुःख भोगूनहि ज्याचा परिणाम दुःखच होतो, तें तर सर्वथैव असत्य होय.

दुसऱ्या वर्गांत ज्या लोकांचा अन्तर्भाव होतो, ते असें मानितात कीं सर्व जड पदार्थ विकारी व नाशवंत असून त्याज्य आहेत आणि आपण सर्व मनोरूप भिन्न व्यक्ति आहों. सर्व जीवांची उत्पत्ति व लय पाहून ते असें समजतात कीं जो तो मनुष्य एकटा जन्मास येतो व मृत्यु पावतो आणि त्याचा दुसऱ्याशीं कांहीं एक संबंध नाहीं, तसेंच जन्ममरणाचें रहस्य जरी गुप्त राहिलें तरी सर्व जन्मभर प्रत्येकाचें चैतन्य अभेदरूपच असतें. अशा प्रकारच्या लोकांस अहंकाराची जाणीव विशेष असते, परंतु जडापेक्षां चैतन्यावरच त्यांचा भर असल्यामुळें, त्यांचें जीविताचें ज्ञान अधिक सुयुक्तिक असतें आणि सर्वांचें चैतन्य आपल्याच स्वरूपाचें आहे असें

ते मानितात. अशा प्रकारचे लोक क्षणिक ऐहिक लाभाकरितां आपणास कलंक लावून घेत नाहींत व तेणेंकरून आपणास सुखदुःखांत लोटीत नाहींत आणि सदसद्विवेकबुद्धीनें वागणें हें तर त्यांचें ब्रीदच असतें.

या दोहोंहून उच्च प्रतीचा असा तिसरा वर्ग आहे. ज्या स्वरूपापासून अखिल वस्तूंची उत्पत्ति झाली त्या परमात्मस्वरूपांत निमग्न रहाणें हेंच जीविताचें कर्तव्य होय असें या वर्गांतील लोक मानितात. एकाच अपरिमेय निरंजन परमात्म्यापासून सर्व प्राण व शक्ति उत्पन्न होतात म्हणून अशा पुरुषास भेदज्ञान मुळींच नसतें. अशा पुरुषांच्या मतीं, निराळे उगम असतील तर पृथक् व्यक्ति संभवतील, पण जीव व सत्ता यांचे निरानिराळे उगम नसल्यामुळें, एकाच उगमापासून सर्व वस्तु उद्भव पावून कांहीं काल स्थितीनंतर त्याच उगमामध्यें लय पावतात. एका सर्वव्यापक आत्म्याच्या सत्तेमुळें द्वैत मुळींच संभवत नाहीं. एकापेक्षां अधिक वस्तु संभवतील तर ‘ एक ’ म्हणणें शोभेल, नाहींतर ‘ एक ’ म्हणणें ही चूक आहे. वास्तविक पहातां, सुख किंवा दुःख, जड किंवा चैतन्य, ईप्सित किंवा त्याज्य—असें द्वैतच नाहीं, विरोध नाहीं किंवा भेददर्शक गुणहि नाहीं. हे सर्व क्षणिक आभास आहेत, तेणेंकरून मनाचे उद्देश कांहीं काल सिद्ध होतात. मूळच्या शुद्ध अवस्थेमध्यें, अनुराग किंवा त्याग, वासना किंवा भय ह्या वृत्ति उद्भवत नाहींत, कारण आपणांहून भिन्न असें कांहींच नाहीं. या अवस्थेमध्यें, ज्ञात किंवा अज्ञात अशा सर्व शक्तींचें व्यापक साम्राज्य नांदत असतें, आणि प्रत्येक

शक्ति आपलें नियुक्त कर्तव्य फलाशेशिवाय निर्भयपणें बजावीत असते.

जोंपर्यंत मनुष्य अज्ञानी असतो, तोंपर्यंत जीवितरहस्याची भीति वाटते. ज्ञानप्राप्ति झाल्याबरोबर जगाची भीति नष्ट होते आणि त्याचें सत्यस्वरूप विशद होतें. जेणेंकरून संसारबंधनांत मन फिरून अडकणार नाहीं अशा संस्कृतीस ज्ञान म्हणतात, आणि वासना व भय यांच्या योगानें चित्त आंदोलन पावलें असतां ती स्थिति प्रपंचोन्मुखता समजावी. म्हणून संसारभय नष्ट करावयाचें असेल, तर सत्यज्ञानापासून जो शुद्ध व शान्त प्रकाश उत्पन्न होतो, त्याच्या लाभासाठीं निरंतर प्रयत्न केला पाहिजे. अज्ञान हाच ईश्वराचा शाप होय आणि ज्ञानरूपी पंखांनीं स्वर्गाकडे उडून जातां येतें. सर्वांमध्यें अत्यंत दुष्ट वृत्ति भय होय. पण ज्ञानवृद्धीबरोबर तें कमी कमी होत जातें. भय व संशय यांचा पगडा अज्ञानी व अपराधी अशा मनुष्यावर बसतो. निष्कलंक चित्तास कशानेंहि भय वाटत नाहीं.

प्राचीन संप्रदायाचा व वहिवाटीचा संस्कार मनावर असा घडतो कीं पूर्वग्रह व अज्ञान या अभ्रांनीं आच्छादिलेला मार्ग साफ करण्याकरितां एकादा महात्मा किंवा गुरु ज्ञानदीप पाजळण्यास उत्पन्न झाल्याशिवाय, जुना पंथ सोडणें मोठ्या मुष्किलीचें काम आहे. शिवाय असा उपदेशक भेटण्यास, संशयानें व मोहानें चित्त असें ग्रासलें पाहिजे कीं प्रकाश केव्हां पडेल अशी तळमळ लागावी पण त्याचा साधनमार्ग तर सांपडूं नये. अशा समयीं गुरुवाक्यानेंच ज्ञानप्राप्ति होते, ज्ञानापासून समदर्शना-

चा लाभ होतो, आणि अशा समदृष्टीनें परमानंदाची स्थिति प्राप्त होऊन, सुखदुःखाचें भानच नाहींसें होतें किंवा तीं स्वप्नवत् तुच्छ वाटूं लागतात.

एक महात्मा म्हणतो कीं मृत्यु हें केवल पापाचें फल होय. अडाणी व कोत्या समजुतीच्या सामान्य लोकांस ज्याचें भय सर्वदा वाटत असतें व जो मनुष्यांचे प्राण हरण करितो, तोच येथें मृत्यु शब्दानें उपलक्षित जाणावा. साधुपुरुषाच्या बुद्धीस मृत्यु म्हणजे कांहींच वाटत नाहीं, कारण मृत्यु प्राप्त झाल्यानंतर एकाद्या स्थ-ळीं मनुष्याची गति होते असें ठरलेलें नाहीं. मनावर दुष्ट वासनांचा संस्कार झाला म्हणजे मृत्यु उभा रहातो, पण जेथें अशुभाचा प्रवेशच होत नाहीं, तेथें मनास मृत्यूची जाणीव होत नाहीं. मृत्यु समीप आला असतां भय वाटणें हें दुष्टचरिताचें लक्षण होय. तशीच द्वैतापासून होणारी जी असाधारण अवस्था तेंच पाप होय. जर मनास आपलें स्वरूप समजेल, आपल्या जनकाची ओळख पटेल आणि द्वैत दिसणार नाहीं, तर पाप होणार नाहीं, कारण पाप म्हणजे केवळ अज्ञान होय. ज्ञानाचा कट्टा शत्रु अज्ञान आहे म्हणून त्याला जिंकिलें पाहिजे, त्यापासून प्रज्ञामांद्य होतें, प्रज्ञामांद्यापासून आलस्य उत्पन्न होतें. ज्ञानाशिवाय जीवित फुकट आहे, म्हणून ज्या जीवितांत पाप नाहीं व आत्मज्ञान पूर्ण असतें, तेंच खरें जीवित होय.

मानवी प्राणि ज्याला जीवित म्हणतात त्यानें सर्व विश्व कळासून गेलें आहे, पण जीवितास मृत्यूचें भय सर्वदा वाटत असतें. ज्या जीवितांत भय नाहीं व मृत्यु

नाहीं, अशाचा लाभ होणें हाच सर्व महात्म्यांचा सर्वकाल प्रयत्न असतो. हेंच अखिल मानवांचें ध्येय बनल्याखेरीज पाप नाहींसें होणार नाहीं व मृत्युहि चुकणार नाहीं. ह्या ध्येयाचा मार्ग सुलभ असून, ज्या सांसारिक लाभाकरितां मनुष्य नेहमीं कष्ट सोशीत असतो, त्यापेक्षां तर अधिक सोपा आहे.

या जगतांत ज्या अनेक वस्तु आहेत त्यांमध्यें इष्ट कोणत्या व अनिष्ट कोणत्या हें प्रथम इंद्रियांस समजतें, नंतर तें ज्ञान मनास होतें, आणि अशा क्रियेनें इष्टाविषयीं इच्छा व अनिष्टाविषयीं द्वेष हीं उत्पन्न होतात. तेणेंकरून जीवात्म्याचे ठायीं अहंकारवृत्ति जागृत होते आणि अखिल विश्वाहून आपण वेगळे आहों असें जीवात्म्यास वाटूं लागतें. ह्या वासना शुभ व अशुभ अशा दोन प्रकारच्या असतात. जसजसें मनाचें अज्ञान व मोहक्षमता अधिक तसतसा अशुभ वासनांकडे ओढा जास्त होतो. तसेंच मन जितकें अधिक सुसंस्कृत असेल व चित्प्रकाशाकडे त्याचा कल अधिक होईल, तितकी त्याची अशुभाकडील प्रवृत्ति कमी होईल आणि शुभ प्रवाह वृद्धिंगत होईल. अशुभ वासनेनें प्रेरित झालेल्या मनास उत्कृष्ट उपमा म्हटली म्हणजे निर्दय धन्याच्या चाकराची होय. असलें स्वामित्व धन्याची व चाकराचीहि योग्यता कमी करितें. मनास वासनाक्षयरूपी पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त होईपर्यंत, दयाळू धनी व शुभ वासना यांच्या आश्रयाखालींच रहाणें इष्ट आहे, म्हणून संसारांत शुभाकडेच मनाला वळण लावणें अवश्य आहे. मनाचा शुभ वासनेशीं सतत व निरंतर परिचय झाला

असतां अशुभ संसर्गानें उत्पन्न झालेले अनिष्ट संस्कार हळू हळू नष्ट होत जातात, आणि दृढनिश्चयानें प्रयत्न केल्यावर हे संस्कार पूर्णपणें नाहींसे झाले म्हणजे सद्गुणांचा यथेच्छ विकास होण्यास अवकाश सांपडतो.

शुभ वासनांमध्यें स्वार्थाचा लेशहि नसतो आणि या लक्षणावरून त्याशीं शत्रुत्वानें रहाणाऱ्या ज्या अशुभ वासना त्यांपासून त्या सहज ओळखितां येतात. देशबांधवांच्या हिताची इच्छा करण्यानें व तें हित साधण्यानें आपला यत्किंचित् तोटा न होतां उलट इष्टसिद्धि होते अशी एकदां समजूत झाली म्हणजे स्वतःस सुखप्राप्ति होऊन शक्त्यनुसार दुसऱ्याचें हित साधितां येतें. मनुष्य ज्यांस आपले निकट व जिवलग संबंधी व इष्टमित्र समजतो त्यांच्याकरितां पाहिजे तें नुकसान सोसण्यास तो तयार होतो. भूतदयेचा प्रारंभ स्वगृहींच व्हावा लागतो. एकाद्या राष्ट्राच्या विस्ताराप्रमाणें हा विस्तार वाढला असतां लोकांचें कल्याण करण्याचे प्रसंगहि वाढत जातात आणि त्याबरोबर आपलें व दुसऱ्याचें सुख देखील वृद्धिंगत करणें शक्य होतें. प्रापंचिक व्यवहारामध्यें मनुष्यास श्रमाचा मोबदला मिळण्याची आशा असते, तथापि थोर लोक कर्तव्य केल्याबद्दल मोबदल्याची किंवा पारितोषिकाची अपेक्षा करीत नाहींत. जर ही इष्टसंबंधाची जाणीव फार आकुंचित असेल, तर मोबदल्याची, पारितोषिकाची किंवा कृतज्ञतेची अपेक्षा अधिकच होते. ह्या मोबदल्याच्या अपेक्षेपासून व तज्जन्य बंधनापासून अन्तःकरणाची सुटका करून घेण्यास उत्तम मार्ग म्हटला म्हणजे स्नेहीसंबंध्यां-

ची मर्यादा सर्व जगभर वाढविली पाहिजे. असें केल्याशिवाय स्वार्थबुद्धि नष्ट होणार नाहीं व अन्तःकरणाचीं बंधनेंहि सुटणार नाहींत; कारण आशा हेंच बंधन व निराशा हेंच स्वातंत्र्य होय. स्वार्थपरायणतेपासून सुटण्याचा आणखी एक मार्ग आहे व त्याचा अवलंब महात्मे सर्वकाल करीत असतात, तो हाच कीं भूतकालचा कधींहि विचार करूं नये, कारण तो तर निघून गेला म्हणून निरुपयोगी झाला, आणि भविष्यत्कालाबद्दल कांहीं आशा करूं नये, कारण त्यावर मनुष्याचा अंमल चालत नाहीं; म्हणून विद्यमानस्थितींत असेल तितक्या हिंमतीनें उद्योग करावा, पारितोषिकाची आशा करूं नये, अपयशाची भीति बाळगूं नये, मानवी स्तुतीची किंवा निंदेची पर्वा मानूं नये, कारण ही स्तुति किंवा निंदा दैवाप्रमाणेंच चंचल आहे आणि स्वबुद्धीनें व विवेकशक्तीनेंच आपल्या कृत्याची योग्यता ठरवावी. शिवाय दूरदर्शी लोकांनीं असें स्पष्ट ठरविलें आहे कीं जितकी आशा वाढवावी तितकी वाढतच जाते, आणि आगींत तेल ओतल्याप्रमाणें अधिक पेट घेते. महात्मे व शूर लोक उदात्त व श्रेष्ठ कार्यासाठीं आपले प्राण देखील सहज खर्चीं घालितात अशीं अनेक उदाहरणें सांपडतील. अशी जर वस्तुस्थिति आहे, तर अशुभ वासनांचें नियमन—एवढ्याच स्वार्थत्यागानें शाश्वतसुखाची प्राप्ति होणार असल्यास, तो त्याग फारसा कठिण मानितां येत नाहीं. ज्या स्वातंत्र्याचा परिणाम उच्छृंखलपणांत होऊन अखेर नानाविध जुलुमाचे प्रकार घडतात, अशा क्षणभंगुर व सतत विकार पावणाऱ्या

शरीराच्या काल्पनिक स्वातंत्र्याकरितां मनुष्य आपलें जीवित व सर्वस्व गमावतो, पण इहपरलोकीं मिळणाऱ्या स्वातंत्र्यलाभाचा मुळींच विचार करीत नाहीं. स्वार्थसिद्धीची इच्छा नसणें हें जसें खरें स्वातंत्र्य, तसेंच कर्तव्य टाळण्याची बुद्धि न होणें हें सुद्धां स्वातंत्र्यच होय, कारण विद्यमानस्थितींत कर्तव्य न करण्याची इच्छा धरणें हें अशुभवासनेप्रमाणेंच महत्पाप होय असें लक्षांत ठेविलें पाहिजे.

जीविताबरोबर वासना तयार असतातच, वासनांमुळें कर्माकडे प्रवृत्ति होते, कर्म हातून घडलें कीं लाभ किंवा हानि, पारितोषिक किंवा शासन, हीं ठरलेलीं आहेतच, आणि हा परिणाम भोगण्याकरितां कर्मानुसार जीवात्म्याचा नवीन शरीरांत प्रवेश होणें अवश्य असतें. भूत व भविष्यत् या अवस्थांचें ज्ञान मनुष्यास नसल्यामुळें, पुनर्जन्माचें तत्त्व प्रतिपादणें किंवा सिद्ध करणें अवघड आहे, परंतु या जगांत अशुभ गोष्टी कां घडतात, दुष्ट लोकांस वाईट कृत्याबद्दल शासन कां होत नाहीं, आणि कधीं कधीं दुराचारी लोकांस यशःप्राप्ति कां होते—या प्रश्नांचें समर्पक उत्तर पुनर्जन्मतत्त्वाचा अंगीकार केल्याशिवाय मिळत नाहीं. या गोष्टी घडून येण्याचे मार्ग येणेंप्रमाणें आहेत.—जी वस्तु मनाला आवडते किंवा त्याज्य वाटते त्या वस्तूशीं संसर्ग पावून मनाला ध्यास लागतो, मग ती वस्तु उपादेय किंवा हेय होऊन चित्तावर कायमची ठसून जाते; आणि शरीरत्याग झाल्यावर ज्यामध्यें त्या वस्तूचा निकट संबंध राहील अशा देहाचा जीवात्मा आश्रय करितो.

यासाठीं साधुलोक असा उपदेश करितात कीं कोणत्याहि ऐहिक वस्तूचा अत्यंत अनुराग किंवा द्वेष करूं नये, म्हणजे या जन्मीं चित्तास शान्ति प्राप्त होईल आणि निर्वाण म्हणून निरंतर शान्तीची जी अवस्था आहे तिजमध्यें चैतन्य बुडून जाईल. अशा रीतीनें खरोखर मृत्यु येण्यापूर्वीं, पण मृत्यु केव्हां तरी येणार या कल्पनेनेंच जीविताची स्थिति वर्तुलाकार बनते, म्हणजे शारीरिक बंधनापासून तर सुटका होत नाहीं, परंतु अज्ञान व वासना यांचा नाश पौरुषानें करितां येतो.

# प्रकरण १

## निर्वाण

( चर्पटपंजरी )

त्वयि मयि चान्यत्रैको विष्णुर्
व्यर्थं कुप्यसि मय्यसहिष्णुः ॥
सर्वं पश्यात्मन्यात्मानं
सर्वत्रोत्सृज भेदज्ञानम् ॥ १

( आर्या )

परमात्म्यानें भरिला तूं, मी, तैसाचि सर्व जीव असा ॥
बोध सदा बाणावा न करीं तूं कोप, तत्त्व हें परिसा ॥ १
अपणामध्यें सर्वहि परमात्मा जाण सर्वदा राहे ॥
वास्तव कधिं न करावा हा, तो, ऐसाचि भेद, हें पाहें ॥ २

# प्रकरण ९

## निर्वाण

क्रिया तीन प्रकारची असतेः—कायिक, वाचिक व मानसिक. कांहीं एक उद्देश किंवा हेतु नसतां, कायिक कर्म घडतें, यासाठीं फौजदारी कायद्यामध्यें गुन्ह्याचें स्वरूप व शिक्षा ठरवितांना भेद केला जातो. वाचिक क्रिया देखील अविचारानें घडते, म्हणजे विचार केल्याशिवाय किंवा क्षणिक वेगानेंहि होऊं शकते. ज्या क्रियेबद्दल मनुष्यास जबाबदार धरितात, ती क्रिया खरोखरच मनापासून व्हावी लागते. कायिक व वाचिक कर्म सद्बुद्धिप्रेरित व कह्यांत राहूं शकते—आणि लौकिक व्यवहारांत तर शान्तीचें व एकोप्याचें हेंच मुख्य साधन होय—तथापि मानसिक क्रियेंत हाच सद्विचार अमलांत आणिला नाहीं, तर मनुष्य आपलाच शत्रु बनून नुकसान करून घेतो, याकरितां चित्त शुद्ध ठेवून अशुभ वासना नष्ट केल्याच पाहिजेत.

मृत्यूला जिंकावयाचें असेल तर निष्पाप झालें पाहिजे, निष्पाप होणें असेल तर कायिक, वाचिक व मानसिक या तिन्ही प्रकारांनीं निर्मल राहिलें पाहिजे, विशेषेंकरून मनानें तर फारच शुद्ध असलें पाहिजे. मात्र शारीरिक मृत्यु टाळणें अशक्य आहे. चोवीस तासांपैकीं पुष्कळ तास निद्रेमध्यें मृत्यूच्याच रूपान्तरांत जातात आणि पार्थिव शरीरास पुढील सहा प्रकार अवश्य होतातः—( १ ) अस्ति ( २ ) जायते ( ३ ) वि-

वर्धते ( ४ ) विपरिणमते ( ५ ) अपक्षीयते आणि ( ६ ) विनश्यति. चैतन्यास एकाच प्रकारची निद्रा किंवा मृत्यु येऊं शकतो, म्हणजे बुद्धिशक्ति लुप्त किंवा क्षीण होते. अल्पकालिक भौतिक कारणांनीं शरीरास कांहीं काल पीडा होऊं शकेल व ती तरी जागृतावस्थेंतच होऊन निद्रेंत मुळींच होणार नाहीं; परंतु अन्तःकरणांत बिघाड झाला असतां पश्चात्तापानें त्याचें कारण दूर होईतोंपर्यन्त शरीरास व चित्तास सतत पीडा भोगली पाहिजे.

पश्चात्तापानें परमेश्वराचा कोप शान्त होतो. दुष्ट लोक गाढ निद्रेचें सुख भोगतांना जर आढळले, तर असें समजावें कीं बुद्धिशक्ति व विवेकशक्ति ह्या बोथल्यामुळेंच निद्रा येते, व कांहीं दुष्ट लोक असे असतात कीं ह्या त्यांच्या शक्ति जागृतपणीं सुद्धां बोथट होतात. एकाद्या कोंकरास मारून गट्ट करण्यांत लांडग्यास जसा कांहीं दोष वाटत नाहीं, त्याप्रमाणेंच पापी लोकांस दुष्ट कृत्याचें कांहीं एक वाटत नाहीं. क्षुल्लक आधिभौतिक आपत्तींपासून शरीराचें रक्षण करावें लागतें, पण मनाच्या आपत्ति निराळ्याच प्रकारच्या असतात. एकादें राज्य भरभराटीस आलें असतां वेढा घालून त्याच्या बलाचा व वैभवाचा नाश करण्यास जसा शत्रु तयार असतो, तद्वत् काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर हे विकार प्रबल होऊन मनुष्यास वेड लागण्याची फार भीति असते. सुधारलेल्या राष्ट्रांतील कायद्यांमुळें शरीरास कोणी इजा करूं शकत नाहीं, तथापि शरीरास फारसें स्वातंत्र्य असतें असें म्हणतां येत नाहीं, कारण

अन्न, वस्त्र व विश्रान्ति ह्या आवश्यक गरजा व जीवाचें समाधान होण्याकरितां कृत्रिम रीतीनें उत्पन्न झालेल्या नानाविध गरजा—ह्यांपासून देहाची सुटका कधींच होत नाहीं. परंतु शरीराची स्थिति कशीहि असली तरी एकदां मनाचें स्वातंत्र्य संपादन झालें, म्हणजे भूगोलावरील कोणतीहि सत्ता तें स्वातंत्र्य हिरावण्यास किंवा क्षीण करण्यास समर्थ होत नाहीं.

सामान्य अडाणी मनुष्यास मृत्यूसारखी दुसरी भयंकर गोष्ट मुळींच नाहीं. एक साधु म्हणतो कीं मृत्यु ही जर अवश्य येणारी स्थिति आहे, तर त्याची वेळ येईल तेव्हां तो चुकत नाहीं, याकरितां मृत्यूची भीति कशाकरितां बाळगावी हा मोठा चमत्कार वाटतो. जीवितास व्यापून राहणारें जें रहस्य आहे त्याचा थांग ज्यानें बऱ्याच अंशीं लाविला आहे, त्याला मृत्यूचें भय कधींच वाटणार नाहीं. तसेंच लौकिकव्यवहारामध्यें जे पुरुष वीरश्रीसंपन्न व उदारबुद्धीचे असतात, त्यांसहि मृत्यूचें भय वाटत नाहीं, कारण ते असें मानितात कीं—मृत्यूचें भय सर्वदां वाटत असेल तर अशा जगण्यापेक्षां निर्भय असें जीवित अधिक श्रेयस्कर होय. मृत्यु हा जर भूतमात्राचा अवश्य परिणाम आहे आणि जिवन्त प्राण्याच्या आयुष्यांत हटकून घडणारी गोष्ट आहे, तर मृत्यूचें भय कां वाटावें हें समजत नाहीं. मनुष्याच्या आयुष्यांत जर अशा गोष्टी घडल्या असतील कीं शरीरनाशाबरोबर त्याला मोठें शासन होणार किंवा आतांपेक्षां वाईट जन्म प्राप्त होण्याचा संभव आहे, तर मात्र गोष्ट निराळी. माणूस म्हणजे मृत्यूचें एक खेळणें

आहे असें वर्णन आढळतें, तेव्हां मृत्यूच्या हातांतून सुटण्याचा जरी त्याचा प्रयत्न आटोकाट चाललेला असतो, तरी अज्ञानानें व भ्रमानें तो तर सर्वदां मृत्यूकडेच धांव घेत असतो.

अनेक बाबतींत मनुष्य हा संवयींचा केवळ दास आहे, तथापि त्याला नेहमीं फेरबदल हा हवासा वाटतो. जेव्हां एकाद्या गोष्टीचा नवीनपणा नाहींसा होतो, तेव्हां, लहान मुलास जशा त्याच त्या खेळण्याच्या गोष्टी नकोशा होतात, त्याप्रमाणें मनुष्यास एकाच गोष्टीचा कंटाळा येतो, आणि कांहीं तरी फेरबदल व्हावा असें वाटूं लागतें. जी वस्तु आपणाजवळ नाहीं व जी मिळण्यास अवघड असते, अशी वस्तु प्राप्त करून घेण्याच्या व्यवसायांतच त्याला सुख होतें, आणि ती मिळाल्यावर तिचा विसर पडतो. त्याला कधीं कंटाळा येत नाहीं अशी वस्तु म्हटली म्हणजे त्याचें शरीर होय. आणि आजारीपणांत, मृत्यु आसन्न झाला असतां किंवा संकट आलें असतां शरीररक्षणाचा जो आटोकाट प्रयत्न चाललेला असतो त्यावरून असें दिसतें कीं शरीरांतील द्रव्यांमध्यें जरी एकसारखा फरक होत असतो, तथापि शरीर हें जीवात्म्याचें वसतिस्थान आहे एवढ्या गोष्टीवरून त्याचा जो श्रेष्ठपणा सिद्ध होतो त्याबद्दल मनुष्यास नैसर्गिक ज्ञान असतें. यामुळें देखील त्याला भिण्याचें कारण नाहीं. मृत्यु प्राप्त झाल्यानंतर तीन मार्ग खुले आहेत.—पहिल्या मार्गांत, एका नासलेल्या कुजक्या स्थानाचा कंटाळा आला म्हणजे जीवात्म्यास नव्या सदृढ स्थानांत प्रवेश करण्याची इच्छा होणें स्वा-

भाविकच आहे. जुनें वस्त्र टाकून नवें परिधान केलें तरी जीवात्मा कायमच रहातो. म्हणून अत्यंत इष्ट जें जीवित तें जर चालू रहातें आणि पूर्वींपेक्षां ताजें व बळकट असें जर शरीर मिळतें, तर जीवात्म्यास मुळींच भिण्याचें कारण नाहीं.—दुसऱ्या मार्गांत शरीरांतील द्रव्यांचा पंचमहाभूतांमध्यें लय झाल्याबरोबर चैतन्याचाहि नाश होऊन, शुभाशुभांनीं मिश्रित झालेलें, अनेक रोगांचें व विपत्तींचें घरच, नाटकांतील सोंगाप्रमाणें शुद्ध स्वप्नवत् भासणारें, असें अल्पकालिक जीवित नष्ट झालें असतां, काय हानि होणार आहे ? तिसऱ्या मार्गांत, भक्तीनें व उत्साहानें सत्याचा व ज्ञानाचा प्रकाश लाभला असतां आणि आदिकारण जो सर्वव्यापक परमात्मा त्यामध्यें चित्त बुडालें असतां, यापेक्षां श्रेष्ठ लाभ होणेंच शक्य नसल्यामुळें, कोणतेंहि दुःख वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. अज्ञानतिमिराचा पूर्ण नाश होईतोपर्यंत मोह हा रहाणारच, पण तो अंधकार नष्ट झाल्यानंतर, झोपेंतून जागें झाल्याप्रमाणें, चित्प्रकाशामध्यें चैतन्य मुरून जातें.

जीवित दोन प्रकारचें दृष्टीस पडतें:—एक कर्मरूपानें व दुसरें क्रियाशून्य अथवा उदासीन रूपानें. दीर्घोद्योगामध्यें असतांना सुद्धां नैष्कर्म्याचा किंवा विश्रान्तीचा अनुभव केव्हां केव्हां येतोच, त्याप्रमाणें अत्यन्त स्तिमित किंवा उदासीन आयुष्यक्रमामध्यें सुद्धां केव्हां केव्हां उत्साह नजरेस पडणारच. तसेंच जीविताचें असेंहि स्वरूपवर्णन करितां येईल कीं, त्याच्यामध्यें आत्मा कर्मरूपानें किंवा शान्तिरूपानें प्रकट होतो. ह्यांपैकीं

कोणत्या तरी रूपानें जीवात्मा आयुष्य क्रमण्यास लागतो. यांमध्यें चांगला प्रकार कोणता, सुखकारक कोणता, याचा निर्णय करणें भिन्न वृत्तींच्या मनुष्यांचें काम नाहीं, कारण अशा निर्णयानें ठरीव क्रमाच्या स्वरूपांत किंवा परिपोषांत कांहीं फरक होणार नाहीं. जीवात्मा कोणत्याहि रूपानें असो, त्याचा बहुमान सर्वांनीं करणें योग्य आहे; मग ज्या शाश्वत उगमापासून सर्वांचा उदय होऊन त्यामध्येंच लय होतो—ह्या उन्नत दृष्टीनें बहुमान होवो, अथवा लौकिक व जबाबदारीच्या दृष्टीनें, उच्च किंवा नीच स्थितींत असतांना प्रत्येक व्यक्तीच्या अंगीं शुभाशुभ कृत्यें करून आपलें प्रारब्ध बनविण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें—या दृष्टीनें जीवात्म्याचा बहुमान होवो.

निरंतर अभ्यास व मनन केल्याशिवाय, ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें व मन यांचें नियमन केल्याशिवाय, लौकिक-व्यवहार करीत असतांना स्वार्थपर वृत्तींवर दाब ठेवल्याशिवाय, जीविताचें रहस्य व निसर्गाचें स्वरूप समजणें अशक्य आहे. ईश्वर सृष्टीहून भिन्न आहे अशी सामान्य समजूत असते, परंतु विचारशक्तीला व व्यावहारिक ज्ञानाला ती ग्राह्य होणार नाहीं. ज्या वेळेस कांहीं बुद्धिमान् पुरुषांनीं सदाचार व मानवी कर्तव्य ह्यांविषयीं विचार करून अडाणी समाजाची व्यवस्था व नियमन करण्याकरितां व्यवहारास धर्माचेंच अंग बनवून टाकिलें, अशा वेळेस ही कल्पना निघाली असावी. धर्माचा व व्यवहाराचा एकजीव झाल्यामुळें, प्राचीन व आधुनिक कालीं दुष्ट लोकांची कुमार्गाकडे

फारशी प्रवृत्ति होत नाहीं. आचारभ्रष्ट व उच्छृंखल लोकांकरितां दिवाणी व फौजदारी कायदे केलेले आहेत, तद्वत् अडाणी व पापाकडे प्रवृत्त असणाऱ्या क्षुद्र लोकांकरितां धर्मबंधनें निर्माण केलीं आहेत. सर्व मंगलांचें मंगल,—स्वार्थपरता किंवा अशुभ याचा ज्याला लेशहि स्पर्श करूं शकत नाहीं,—अनेक दोषांनीं व आपत्तींनीं ग्रस्त होऊन अपूर्ण असलेल्या मानवी समाजाहून अगदीं निराळा अशा सर्वसंपूर्ण परमेश्वराविषयीं श्रद्धापूर्वक ध्यान करण्यापासून पाहिजे त्या मनुष्यास अतिशय समाधान होईल हें उघड आहे. या समाधानांत दोष पाहिला तर एकच आढळतो—तो असा कीं, अशा मंगलरूपी व परिपूर्ण परमेश्वराच्या चिच्छक्तीपासून किंवा उत्पादक शक्तीपासून अपूर्ण व सदोष अशी सृष्टि कां उत्पन्न व्हावी ? या प्रश्नाचें समर्पक उत्तर देतां येत नाहीं. धर्मग्रंथांत तर अशा प्रश्नास थारा देखील मिळत नाहीं, आणि या ग्रंथांत फक्त असें सांगितलें असतें कीं—सर्व प्रकारच्या विपत्ति व दोष जेथें नष्ट होतात अशा सर्वव्यापक परमेश्वराकडे सर्वकाल लक्ष ठेवावें. शिक्षणानें व योग्यतेनें श्रेष्ठ पदवीस पोहोंचलेल्या ज्या लोकांस इतर अडाणी लोकांपेक्षां हे विषय चांगले समजत असतील असें वाटतें, त्या लोकांच्या धर्मश्रद्धेचें बीज असें आहे कीं ज्या गोष्टींचें सत्यत्व किंवा उपयुक्तता ठरविण्यास काल नसतो व आपणास योग्यताहि नसते, अशा गोष्टी जशा पूर्वापार चालत आल्या असतील तशाच मानणें भाग आहे, आणि सद्बुद्धि व विवेकशक्ति यांच्या प्रेरणेनें न वाग-

णाऱ्या अशिक्षित जनसमाजास कह्यांत ठेवण्यास धर्माशिवाय साधनच नाहीं, कारण कृतापराधाबद्दल राज्यकर्त्याकडून शासन तर होतेंच, पण त्याशिवाय सदाचाराकडे प्रवृत्ति व पापापासून निवृत्ति करणारा धर्माशिवाय दुसरा आधारच नाहीं.

ज्ञानाचा प्रकाश एकदां अंतःकरणावर पडला म्हणजे न्यायाच्या व सत्याच्या मार्गानें जाण्याकरितां धर्माचा किंवा कायद्याचा धाक दाखविण्याचें प्रयोजनच नाहीं. तथापि हा प्रकाश मिळेतोंपर्यंत, क्रमानें शिक्षण देऊन, व्यवहार करितांना मनानें व क्रियेनें स्वार्थत्याग करण्याकडे सर्व मानसिकशक्तींस वळण लाविलें पाहिजे. कर्तव्यकर्म करण्यांत यत्किंचित् कसूर न होतां स्वार्थत्याग झाला असतां, आपोआप ज्ञानप्रकाश उत्पन्न होतो, आणि सत्य-असत्य, बरें-वाईट, माझें-तुझें, इत्यादि द्वंद्वांचे मिथ्यात्व अन्तःकरणाला कळून येतें, आणि आदिमध्यान्तवर्जित, सर्वव्यापक, अपरिच्छेद्य अशा परमात्म्यामध्यें अखिलसृष्टि व भूत-वर्तमान-भविष्यत् हीं गोचर होऊं लागतात. ही अन्तःकरणाची स्थिति प्राप्त झाली असतां, औदासिन्य प्राप्त होऊन ऐहिक कर्तव्याची हयगय होईल अशी शंका प्रथम उत्पन्न होते. पण हा संशय फुकट आहे, कारण आपल्या पहाण्यांत नित्य असें येतें कीं थोर महात्मे देखील आपलीं कर्तव्यें यथाशक्ति बजावीत असतात, व हीं कृत्यें करण्यांत स्वार्थाचा, प्रतिष्ठेचा अथवा सुखप्राप्तीचा गंधहि त्यांस नसतो, तरि पूर्वप्रवाहानें त्यांचें विहिताचरण स्वभावतः घडत असतें, आणि निषेधाचें परिवर्जन सहजगत्या होत

असतें. आपण अमुक गोष्ट करितों याचें भान देखील त्यांस रहात नाहीं. ज्ञानीपुरुष इंद्रियांच्या वृत्ति न जाणूनच कर्मे करितो व त्याला कर्म, अकर्म किंबहुना अखिल विश्व ईश्वररूप दिसतें. अशा निरतिशय सुखाच्या अवस्थेंत असतां, सृष्टीहून ईश्वर भिन्न आहे असें कदापि वाटणार नाहीं, कारण निराळा परमेश्वर मानिला असतां नाना प्रकारचे प्रश्न उत्पन्न होतात.—ते असे कीं, ईश्वराची उत्पत्ति कशी झाली? त्याचें शरीर व चैतन्य कशाचीं बनलेलीं असतात? निराळा परमेश्वर मानिला तरी ज्या द्रव्यांची सृष्टि बनलेली आहे, तीं कशीं उत्पन्न झालीं? जर जडद्रव्यांच्या मदतीशिवाय, केवळ ईश्वराच्या इच्छामात्रेंकरून सृष्टि उत्पन्न झाली, तर जीं द्रव्यें मनुष्यास गोचर होतात तीं चिद्रूपच असलीं पाहिजेत, कारण भौतिक जडद्रव्यें साक्षात् चिद्रूपापासून उत्पन्न होऊं शकत नाहींत. ह्या सर्वव्यापक एकत्वाविषयीं लोक बोलतात मात्र, पण त्याचें खरें इंगित कोणास देखील समजत नाहीं.

एकमेवाद्वितीयम् ।

या वेदवाक्यामध्यें ही एकत्वाची कल्पना पूर्णपणें प्रतिबिंबित झालेली आहे.

झोंपेमध्यें असतां जशी मनुष्याला स्वप्नें पडतात, त्याप्रमाणें परमेश्वरापासून ज्ञात किंवा अज्ञात अवस्थेमध्यें सृष्टि निर्माण झाली असली पाहिजे. जडदेह व विचारशक्ति हीं जेव्हां निर्व्यापार असतात, तेव्हां परिच्छिन्न असें जें मनुष्याचें मन त्यास स्वप्नावस्था प्राप्त होते. मनाचें स्वरूप व शिक्षण हीं अशा प्रकारचीं अस-

तात कीं त्याचा विचाररूप व्यापाराशीं व इतर संस्काराशीं कमी-जास्त प्रमाणानें संलग्न असणारे पदार्थ स्वप्नामध्यें अवश्य गोचर होतात, आणि जरी तो मनुष्य बिछान्यावर अथवा पलंगावर स्वस्थ पडलेला असतो, तथापि आपलें शरीर कधीं कधीं आकाशामध्यें किंवा पाहिजे त्या देशांत, स्थलांत किंवा परिस्थितींत हिंडत आहे असा त्याला भास होतो. जागें होईतोंपर्यंत स्वप्न खोटें आहे असें त्याला कळत देखील नाहीं, व स्वप्नांत दिसणारे प्राणि खोटे असल्याप्रमाणें त्यांच्या क्रिया घडून येत नाहींत. झोंपेमध्यें व कधीं कधीं जागेपणीं सुद्धां. देश-काल-परिमाण इत्यादिकांनीं परिच्छिन्न अशा मानवी प्राण्यांचे स्वप्नांत जर विचित्र कल्पना व सृष्टि दृष्टोत्पत्तीस येतात, तर देश-काल-क्रिया इत्यादिकांनीं अपरिच्छिन्न—भूत वर्तमान भविष्यत् अशा सकल जीवांस व्यापून रहाणारा—अनन्त विचार व कल्पना यांनीं परिपूर्ण—अशा परमेश्वराचें स्वप्न किती अमर्यादित असेल याचा प्रत्येक जिज्ञासूनें विचार करावा.

अपरिच्छिन्न व परिपूर्ण परमेश्वर, निद्रेंत किंवा अर्धजागृतींत असतां, स्वप्नाचा अनुभव घेतो. क्षुद्र व अपूर्ण मानवापेक्षां ईश्वराचीं स्वप्नें अधिक व्यवस्थित असतात. त्याच्या सर्वशक्तित्वामुळें नानाविध शक्ति व आकृति उदयास येतात. स्वप्नांत भासमान होणाऱ्या वस्तु आपणाप्रमाणेंच खरोखर अस्तित्वांत आहेत असेंच परमेश्वरास वाटतें आणि नानारूप अनंत सृष्टपदार्थांमध्यें आपण संचार करीत आहों असेंहि त्याला वाटत असतें. तसेंच ईश्वराच्या स्वप्नांतील प्राणि खरोखर असत्य

२ ...।, आणि एकामध्यें अनेक प्रकार ८
सर्व प्रकार एकांतच लीन होतात. या सृष्टींतील परिच्छिन्न शरीरें व चैतन्यें त्या त्या जीवांस व स्वप्नकालीं जगदुत्पादकासहि खरीं वाटतात, तथापि निद्रावश मनुष्याच्या स्वप्नांत भासमान होणाऱ्या पदार्थांप्रमाणेंच, हीं देखील असत्यच असतात. जरी ईश्वराच्या स्वप्नांत अपरिच्छिन्न बुद्धि व कल्पना गोचर होतात, तरी मानवी स्वप्नाप्रमाणेंच त्या स्वप्नांत विशिष्ट स्थिति प्राप्त होते, आणि विवक्षित विचार व कल्पना बदलत तोंपर्यंत, तेंच स्वरूप कायम रहातें. याकरितां, मूळचें स्वप्न चालू असे तोंपर्यन्त त्यांत फरक होणें हें सर्वशक्तिमान् परमेश्वराच्याहि शक्तीच्या बाहेरचें काम आहे, कारण परमेश्वर देखील जागृत अवस्थेंत नसून तेवेळीं स्वशक्तीचा उपयोग करण्यास असमर्थ असतो आणि तत्कालीन तंद्रीमध्यें नियमबद्ध होऊन जातो.

या विश्वास व्यापून रहाणारें आकाश तीन प्रकारचें असतें, त्यामध्यें सर्व सृष्टपदार्थ उत्पन्न होऊन चलन पावतात आणि तें आकाश नसेल तर ते सर्व पदार्थ मूळ प्रकृतीमध्येंच लीन होतात. मानवी शास्त्रांत ज्यास ईश म्हणतात तेंच महदाकाश होय व त्यापासून आ-

... दिलेल्या क्रमानें बाहेर येतात.

२५. आकाशाचा गुण शब्द होय; त्यानंतर उत्पन्न होणाऱ्या वायूचे गुण, शब्द व स्पर्श होत; तेजाचे तीन गुण—शब्द, स्पर्श व रूप होत; उदकाचे गुण चार—शब्द, स्पर्श, रूप व रस; आणि पृथ्वीचे गुण पांच—शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध. येणेंप्रमाणें आकाशापासून आरंभ करून जें जें तत्त्व निर्माण झालें, त्यामध्यें त्याच्या पूर्वीं उत्पन्न झालेल्या सर्व तत्त्वांचा योग असतो म्हणून पुढें पुढें एकेक गुण अधिक होत जातो. अशा रीतीनें पांच तत्त्वांपासून सर्व सचेतन जीवांस जडशरीरांतर्गत द्रव्यें आणि कर्ण, त्वचा, जिव्हा, नेत्र व नासिका या अवयवांमध्यें वास्तव्य करणारीं ज्ञानेंद्रियें प्राप्त होतात. या त्रिप्रकारक आकाशाच्या पायावर अखिल सृष्टि अवलंबून रहाते.

परमेश्वराची आकृति, स्वरूप व गुणधर्म हीं प्रत्यक्षरीतीनें जाणण्यास मनुष्य असमर्थ असल्यामुळें, त्याचें ज्ञान होण्यास नानाप्रकारचे द्रव्यगुणविशिष्ट व नीतिगुणविशिष्ट आकार कल्पिले आहेत व ही गोष्ट अगदीं स्वाभाविक आहे. मनुष्याची बुद्धि, शक्ति इत्यादि उत्तम गुण ईश्वरामध्यें आहेत असें कांहीं लोक मानितात

आणि ईश्वरी विद्या व नरत्वारोपविद्या ( Anthropomorphism ) ह्यांमध्यें मुळींच भेद समजत नाहींत. कांहीं लोक नानाविध सृष्टिशक्ति हींच ईश्वराचीं स्थूल रूपें आहेत असें मानून त्यांची पूजा करितात. तसेंच अनंत नानाविध सृष्ट पदार्थांचीं रूपें पाहून, तिसऱ्या प्रकारचे लोक असें मानितात कीं सृष्टिकर्त्यास अनेक हात, पाय, डोकीं असून विलक्षण रूपें असतात आणि तो विलक्षण रूपें अथवा पाहिजे ती आकृति धारण करूं शकतो. चवथ्या प्रकारचे लोक असे आहेत कीं त्यांस वरील तिघांचा बुद्धिवाद ग्राह्य न होऊन, ते असें मानितात कीं परमेश्वर केवळ चिद्रूप असून, विषयग्राहक इंद्रियें अन्तर्मुख केल्याशिवाय त्याचें ज्ञान होतच नाहीं.—ह्या मताचा स्वीकार केल्यानें असें मानणें भाग आहे कीं, ईश्वर जडसृष्टीहून भिन्न असून, या सृष्टीशीं त्याचा संबंध नाहीं आणि ईश्वराशीं संयोग पावणें असेल, तर जडसृष्टीशीं अन्तःकरणाचा संबंध तोडून टाकून, जेथें प्रपंचाचें वारें देखील लागणार नाहीं अशा देवालयांत किंवा अरण्यांत गेल्याशिवाय, तो साध्य होणार नाहीं. पांचव्या प्रकारचे लोक मानितात कीं ईश्वराशीं संयोग पावणें असेल, तर सर्व शारीरिक व मानसिक शक्ति बंद करून प्रपंचाचा सर्वस्वी त्यागच केला पाहिजे.

येणेंप्रमाणें अगदीं प्राचीन काळापासून, ज्या कालीं ईश्वरप्राप्तीपेक्षां कनकप्राप्ति अधिक सुलभ व स्पृहणीय वाटते अशा आधुनिक कालापर्यंत, प्रत्येक समाजानें किंवा पंथानें जो जो युक्तिवाद अथवा जी जी

उपपत्ति प्रतिपादिली आहे, तिचें स्पष्टीकरण व समर्थन करून त्या त्या मतांची सिद्धि करण्याकडे अखिल मानव जातीचें बुद्धिसामर्थ्य खर्च झालेलें आहे, इतकेंच नव्हे तर, शक्य असल्यास मन वळवून किंवा तसें न साधेल तर जबरदस्ती करून सुद्धां तें तें मत इतरांकडून ग्राह्य करविण्याकडे अनेक प्रकारचे मानवी यत्न झालेले आहेत.

ईश्वराचें प्रत्यक्ष ज्ञान किंवा वर्णन किंवा कल्पना होत नाहीं, तथापि जो ईश्वरस्वरूप जाणण्याचा निश्चय करितो व त्या सिद्धीकरितां अवश्य वस्तूंचा त्याग सुद्धां करितो—त्याच्या बुद्धीस ईश्वराचा साक्षात्कार होतो. प्रत्येक पंथांत कमी-जास्त प्रमाणानें ईश्वराचें दयालुत्व व भूतमात्राविषयीं प्रेम—यांचें समर्थन केलेलें असतें, तथापि ईश्वराच्या पवित्र नांवाप्रीत्यर्थ जितका छल, जुलूम, प्राणहानि किंवा रक्तपात झाला असेल--तितका मानवी कल्पनेनें उभारलेल्या पृथ्वीवरील कोणत्याहि संस्थेबद्दल झालेला नसेल. पूर्वींचा छल व जुलूम याविषयींचा उत्साह अन्य दिशेनें लाविला असतांहि, सुधारणेचा झेंडा उभारलेल्या आधुनिक काळांत, धर्मसंबंधाचें परंपरागत स्वरूप कायमच आहे. मनुष्यमात्रामध्यें वैरभावाचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे धर्मपंथच होऊन राहिला आहे. मेंढराच्या कळपाप्रमाणें, मनोविकार, पूर्वग्रह, भय इत्यादिकांनीं ग्रस्त झालेल्या अडाणी लोकांत, स्त्रीपुरुषभेद, संपत्ति आणि दुसऱ्या भेदांवर अवलंबून रहाणाऱ्या आवडी किंवा नावडी असूं शकतात तशाच धर्माधीन सुद्धां अनेक प्रबल आवडी

अथवा नावडी असतात, हें सुयुक्तिक आहे. पण भूलोकीं ज्ञानप्रकाश व पुढाकार यांचा हव्यास असून प्राप्ति सुद्धां ज्यांस झालेली असते, अशा लोकांनीं क्षणिक लोकप्रियता संपादन करण्याकरितां मानवी सुखास प्रतिबंध करणाऱ्या धर्मसंबंधी असहिष्णुतेस व अनुदारतेस उत्तेजन देऊन अशा दुर्गुणांचा प्रसार करावा ही गोष्ट कशी घडते हें समजणें दुर्घट आहे. सहनशीलता व औदार्य हे ईश्वरी गुण असून ते आचरणांत आणण्याचा प्रयत्न मनुष्य वारंवार करीत असतो. तथापि पशुवृत्ति टाकून देऊन ईश्वरी गुणांचा अधिक लाभ झाल्याशिवाय, हा प्रयत्न सफल होणें अशक्य आहे. ईश्वरी गुण अंगीं येण्यास ' माझें व तुझें '—ही भेददृष्टि नाहींशी होत गेली पाहिजे. ज्यांस स्वकीय असें आपण मानितों त्यांच्या हातून घडलेले अपराध किंवा दुष्कृत्यें सहन करून क्षमा केली पाहिजे. नेहमींपेक्षां अधिक सहिष्णुता आचरणांत आणिली असतां, असा अनुभव येतो कीं—चिच्छक्तीची किंवा जडद्रव्याची उपासना केली असो, पशूच्या किंवा मनुष्याच्या आकृतींत ईश्वर मानिला असो, सृष्टींतील अनन्त शक्तींत, चिद्रूपांत, प्रकाशांत किंवा अचेतन पाषाणांत त्याची आराधना होवो,—ईश्वरी स्वरूपाचा अनुभव घेण्याचा यत्न देवालयांत, मशीदींत, अरण्यांत होवो, कोणत्याहि मार्गानें साधक जावो—सर्व धर्मांचें व मतांचें ध्येय हृदयंगम होऊन ईश्वरीस्वरूप प्रकट झालेंच पाहिजे, फक्त शुभेच्छेच्या प्रेरणेनेंच हा अद्वितीय लाभ होणार आहे. ईश्वरप्राप्ति होण्यास कोठेंहि जाण्याचें कारण नाहीं, हृ-

दयस्थित परमात्म्याची ओळख दीर्घ प्रयत्नानें आपणच करून घेतली पाहिजे. अन्तर्यामीं आत्मस्वरूपांत ईश्वराची भेट होते, आणि बाह्यसृष्टींत हवी असेल तर पाहिजे त्या पवित्र ग्रंथांत, सुविचारांत, साधुपुरुषांत किंवा स्त्रियेंत व उत्तम प्रकारच्या पशुपक्ष्यांमध्यें सुद्धां ईश्वराची ओळख होतेच होते.

# भाग २
## जीवनसंग्राम

# प्रकरण १

## संग्राम व त्याचें स्वरूप

( श्लोक )

पौरुषं न परित्यज्यमेतामाश्रित्य धीमता ॥
पौरुषेणैव रूपेण नियातीर्हि नियामिका ॥ १

( आर्या )

होणार तें चुकेना तरि धीरें पौरुषा न सोडावें ॥
पौरुषकर्में नियती घडवी अर्थासि हें मनीं ध्यावें ॥ १

# प्रकरण १

## संग्राम व त्याचें स्वरूप

ज्या सर्वशक्तिमान् तत्त्वापासून भूतमात्राची उत्पत्ति होऊन त्यामध्येंच त्याची स्थिति व लय हीं होतात— त्या महदाकाशाचें एकत्व व सर्वव्यापकत्व आच्छादनांत गुप्त झाल्यामुळें तीं मानवी प्राण्यास अगोचर होतात आणि जीविताचें रहस्य अज्ञेय रहातें. हें आच्छादन दूर झालें कीं त्या तत्त्वाचें ज्ञान होऊं लागतें, ज्या एकत्वामध्यें सर्व शक्ति, समुद्रांतील लाटांप्रमाणें आविर्भूत होतात त्याचा अनुभव येऊं लागतो, आणि ज्या अवस्थेमध्यें संपूर्ण भेदज्ञान नष्ट होऊन पूर्ण शान्तीमध्यें चित्ताचा लय होतो, ती स्थिति अवश्य प्राप्त होते.

भूतमात्रास द्वैतबुद्धीचा अनुभव येतो व त्यापासून जीवनसंग्रामाची उत्पत्ति होते. प्रत्येक जीवास असें वाटतें कीं आपलें जीवित इतरांहून अगदीं भिन्न आहे, तसेंच भोंवतालच्या परिस्थितीवरून त्यास असें ज्ञान होतें कीं जीवितरूप नाटकामध्यें त्याला जरी एकट्यालाच प्रवेश करून निघून जावें लागतें, तथापि जीवितक्रम चालू असतां अनेक व्यक्तींमध्यें संचार करून आपणास अत्यन्त सुखप्राप्तीसाठीं सर्वांशीं झगडावें लागतें. एकदां सुखप्राप्ति झाल्यानंतर तें सुख कायम राहण्याकरितां हा संग्राम कसा चालवावा—ह्या ध्येयाकडे सर्व चतुर व दूरदर्शी पुरुषांचें लक्ष लागलेलें असतें. जे

सुख नष्ट होण्याची भीति असते व ज्याचा कधीं काळीं कंटाळा येऊन पुढें दुःख ठेवलेलेंच असतें—अशाला सुख हें अभिधान शोभत नाहीं. जें प्राप्त झालें असतां इतर सुखाची आशा उरतच नाहीं, त्याला सुख ही संज्ञा योग्य आहे. अशा निरंतर सुखाची प्राप्ति करून घेणें इष्ट आहे असें एकदां मान्य झाल्यावर, त्या लाभाचा मार्ग अत्यन्त तत्परतेनें व उत्साहानें शोधून काढिला पाहिजे.

कोणताहि संग्राम योग्य रीतीनें चालविला असतां, त्यापासून आनंदच होतो. कोणतेंहि काम किंवा श्रम केले असतां जर त्रास झाला नाहीं, तर आनंदच वाटतो. कोणत्याहि कामाची किंवा श्रमाची आवड उत्पन्न होण्यास, त्याच्यापासून स्वार्थलाभाची आशा नसावी, व त्यापासून श्रम करणारास व इतरांस आनंद झाला पाहिजे. सृष्टींतील सर्व शक्ति ( force ) कधीं काळीं कर्मप्रवृत्त होण्यासच निर्माण झालेल्या असतात व इतर प्रसंगीं त्यांस विश्रान्ति घ्यावी लागते. द्वैतभावनेनें त्यांचें अस्तित्व अनुभवास येतें आणि त्या शक्ति उपयोगी व सुखकारक होतात. मनुष्यामध्यें सर्व प्रकारचे शारीरिक व मानसिक गुणधर्म वास करितात, त्यामुळें त्याचीहि स्थिति सृष्टिशक्तींप्रमाणेंच असते. जसें, अन्नाशिवाय शरीर जगत नाहीं, त्याप्रमाणेंच श्रम केल्याशिवाय मनुष्य जगत नाहीं. जर साऱ्या वर्षभर सण होतील, तर श्रमाप्रमाणेंच खेळण्याचाहि कंटाळा येईल. यासाठीं ज्या लोकांस नेहमीं खेळून विश्रान्ति घ्यावयाची असते व काम मुळींच करावें लागत नाहीं, त्यांच्या जीवास

कंटाळा येतो आणि जीविताचें ओझें वाटूं लागतें. शिवाय काम नसेल तर शारीरिक व मानसिक शक्ति स्तिमित होतात, आणि उद्योग नसल्यानें त्या शक्तींचा विनाश सुद्धां होऊन जातो. मानवी सुखाच्या अभिवृद्धीसाठीं या शक्तींचा प्रयोग अवश्य आहे आणि सुख हा तर जीविताचा उद्देश असला पाहिजे, कारण जेव्हां हें सुख निरंतर व अविच्छिन्न होऊं लागतें, तेव्हां ' निर्वाण ' या कल्पनेमध्यें जें माधुर्य रहातें, त्याचा आस्वाद सहज मिळूं शकतो.

मानवी उद्योगाचें ध्येय कांहींहि असो, जीविताच्या कोणत्याहि एका खात्यांत सिद्धि हवी असेल, तर सतत व उत्साहपूर्वक श्रम केला पाहिजे. ज्या लोकांस आपलें काम आवडतें व त्याचा कंटाळा येत नाहीं, त्यांची भरभराट होऊन जाते. अन्तर्यामींच्या स्थितीवर जीवित अवलंबून रहातें, म्हणून उद्योग आनंददायक होणें अगर न होणें—हें परिस्थितीप्रमाणें व शिक्षणाप्रमाणें घडूं शकतें. असें बहुधा आढळून येतें कीं, मनुष्य स्वतःकरितां काम करीत असेल, तर तो खुषीनें व आनंदानें श्रम करितो, आणि देहाला विश्रान्ति घेणें भाग पडेतोंपर्यन्त त्याला कामाचा कंटाळा येत नाहीं; परंतु ज्याचा त्याच्याशीं दूरचा संबंध पोहोंचतो, अशा देशबांधवासाठीं जर त्याला श्रम करावयाचे असतील, तर होईल तितक्या जलदीनें तो तें काम बहुशः आटपून टाकितो आणि परिस्थितीच्या मानानें तेंहि कसेंबसें करून सोडितो. मनुष्यमात्राला निरुद्योगीपणाचा अत्यंत

तिरस्कार वाटतो. मुळींच काम नसण्यापेक्षा स्वार्थपर काम बरें अशी त्याची समजूत असते.

स्वार्थशून्य काम करण्यानें मनुष्यांत दैवी गुण उत्पन्न होतात. श्रमाची योग्यता व थोरवी समजण्यास, मनुष्याच्या अन्तःकरणास उच्च तऱ्हेचें शिक्षण अवश्य आहे, त्याप्रमाणेंच इतर सुखसाधनासाठीं श्रेष्ठ तऱ्हेचें ज्ञान पाहिजे. ह्या ज्ञानास कर्तव्याची चाड असें म्हणतात. भिन्न भिन्न चैतन्यामध्यें हें ज्ञान निरनिराळ्या प्रकारचें असूं शकतें. प्रत्येक प्राण्याचा अहंकार व स्वार्थपरता आणि त्यावर अवलंबून रहाणारी शुभाशुभाची जाणीव—ह्यांचा विकास ज्या प्रमाणावर झाला असेल, त्याशीं हे ज्ञानाचे भेद संलग्न असतात. अत्यंत सुव्यवस्थित अशा मानवी अन्तःकरणांमध्यें कर्तव्याची इयत्ता व उच्च जाणीव हीं एकसारखींच असतात. बरें कोणतें, वाईट कोणतें—याबद्दलचें सामान्यज्ञान बाळपणापासून जपून होऊं दिलें पाहिजे. एकाद्याची बुद्धि ग्राहक व तीक्ष्ण असेल आणि हें ज्ञान योग्य रीतीनें होऊं दिलें असेल, तर त्याच्या निसर्गशक्तींतच कर्तव्याची खरी जाणीव अनुस्यूत होऊन जाते, आणि जीवनसंग्रामांत उत्तम प्रकारची सिद्धि प्राप्त होण्याचें सामर्थ्य उत्पन्न होतें. पहिल्या भागांत प्रतिपादन केल्याप्रमाणें, जितका लवकर होईल तितका ज्ञानप्राप्तीचा आरंभ बालकास घडला पाहिजे, कारण स्तनंधय बालकावर देखील परिस्थितीचे संस्कार घडूं शकतात. आईबाप, पालक, शिक्षक वगैरे लोकांनीं अशी कर्तव्यनिष्ठा व जबाबदारी बाळगली पाहिजे कीं, लहान बालकांमध्यें बऱ्यावाइटाची

जाणीव उत्पन्न होत असतां तिच्या परिपोषास यत्किंचित् प्रतिबंध जेणेंकरून होईल—असें भाषण किंवा वर्तन त्या बालकासमोर करूं नये. तसेंच लहान बालकांचे लाड करून त्यांना बिघडविण्याचा मोह मनुष्यांमध्यें इतका जबरदस्त असतो कीं—अजाणपणें अथवा क्षणिक आनंदाकरितां त्यांच्या जीविताच्या कल्याणामध्यें बिघाड होऊं शकतो. मुलांचे फाजील लाड करणें अवश्य नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्यांच्या अंतःकरणास त्यापासून खरोखर अपाय घडतो. एकदां मुलाला लाडाची संवय लागली कीं तशी लाडीगोडी केल्याशिवाय तें मूल ताळ्यावर येतच नाहीं, आणि जे लोक लाड करीत नाहींत ते त्या मुलाला केवळ शत्रूसारिखे किंवा दायादासारिखे वाटूं लागतात. मुलामध्यें उत्तम प्रकारची कर्तव्यबुद्धि उत्पन्न व्हावी व जीवितामध्यें मोठाल्या व जबाबदारीच्या कामाला त्यानें लायक व्हावें अशी इच्छा असेल, तर अशा प्रकारचें शिक्षण देण्याचा व सांभाळ करण्याचा उत्तम मार्ग हाच कीं—त्याच्याशीं आपली वर्तणूक विधायक न होतां अभावरूपी असावी, म्हणजे त्याच्या वर्तनाच्या बाबतींत आपण मुळींच मन घालूं नये, आपण त्याचे लाड करूं नये व धमकीनें, कानउघाडणीनें किंवा जुलुमानें त्याच्या कारभारांत पडूं नये; तथापि त्याच्या नैसर्गिक बुद्धीचा विकास आपोआप होऊं देण्याची खबरदारी ठेवावी आणि अशी काळजी घ्यावी कीं त्याच्या शरीरास इजा न व्हावी आणि अशुभामुळें त्याची नीति बिघडूं नये; पण ही काळजी घेण्यांत अशी चतुराई साधावी कीं आपण

त्याचा सांभाळ करीत आहों अशी त्याची समजूत होऊं देऊं नये. किंवा हें त्याच्या अनुभवास येऊं देऊं नये. पुढें तें मूल मोठें होऊं लागलें असतां पाहिजे त्या जीवनसंग्रामास योग्य होण्याकरितां अवश्य असें शिक्षण शास्त्रोक्त वचनांनीं व स्वतःच्या उदाहरणानें देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

कर्तव्याची जाणीव पूर्णपणें बाळगिली असतां जीवनसंग्राम दोन तऱ्हेनें चालू रहातो. पहिला मार्ग असा असतो कीं कार्यसिद्धि करितांना इतरास मुळींच इजा द्यावयाची नाहीं; पण दुसऱ्या मार्गांत इतरास होईल तितका इजा न करण्याचा संकेत असला, तथापि जर दुसऱ्यास इजा करण्याचें टाळतां येत नसेल, तर ती झाली असतां हरकत मानावयाची नाहीं. पहिला मार्ग सत्त्वरजोगुणाधिष्ठित असतो, पण दुसऱ्यामध्यें रज व तम यांचें मिश्रण आढळतें. उत्तम प्रकारच्या नैतिक व सात्त्विक स्थितीमध्यें श्रम करितांना व कर्तव्य बजावतांना, सत्याच्या आड येऊन स्वार्थसिद्धीचा देशबांधवांपुढें प्रतिष्ठा मिरविण्याचा किंवा वाहवा मिळविण्याचा उद्देश नसून, फक्त कुलशील, योग्यता किंवा व्यावहारिक परिस्थिति यांस अनुसरून कर्तव्य करण्याची तेवढी हांव असते. अशी श्रेष्ठ स्थिति प्राप्त होण्यास आपल्या सद्सद्विवेकशक्तीची शिफारस मिळविली किंवा विश्वव्यापक परमात्म्याचे अंशभूत जे इतर प्राणि त्यांनीं चांगलें म्हटलें म्हणजे इतिकर्तव्यता झाली---अशी जाणीव व्हावी लागते. संग्राम म्हटला म्हणजे हिताहितसंबंध व समजुती यांतील विरोधाची कल्पना सहज येते--विरुद्ध

शक्तींची कल्पना उत्पन्न होते, परंतु ह्या शक्ति सदाचार प्रेरित असतील तर तो संग्राम वरचढपणासाठीं असत नाहीं. अशा वेळीं नुसती स्पर्धा उत्पन्न होऊन दोन्ही शक्ति एकाच पातळीमध्यें राहूं शकतात. सद्गुण व दुर्गुण, खरें व खोटें, बरें व वाईट, स्वार्थशून्यता व स्वार्थपरता, अशा द्वंद्वांमध्येंच खरा कलह माजूं शकतो. समानशक्तिक सद्गुणांमध्यें संग्राम होत नाहीं. दोन्ही बाजूस दुर्गुण, असत्य व स्वार्थपरता—अशा शक्तींमधील कलह भूमंडळावर वारंवार आढळतो, पण अशा कलहांत एकाद्याचा जय कांहीं काल जरी झाला, तरी सरते शेवटीं दोन्ही पक्षांचा नायनाट होऊन जातो. सात्त्विक कलहामध्यें, एकानें दुसऱ्याच्या दुबळेपणाचा फायदा न घेतां, प्रतिस्पर्धी आपल्या समान होईल असा प्रयत्न अवश्य करावा, आणि आकस्मिक गोष्टींमुळें वरचढपणा न मिळवितां, आपल्या बलावर सर्व मदार ठेवावी. ह्यालाच खरें पौरुष व सामर्थ्य म्हणतात. जीविताच्या सर्व शाखांमध्यें, लहानापासून वृद्धापर्यन्त, एकाचा किंवा अनेकांचा इतर सर्वांवर श्रेष्ठपणा प्रस्थापित करण्याचा प्रघात मनुष्यांमध्यें आढळून येतो. यामुळें मत्सर उत्पन्न होऊन शेवटीं अनिष्ट ठरलेलेंच असतें. यासाठीं विद्यालयांत, खेळखान्यांत, कामधंद्यांत, सुखनिवासांत—श्रेष्ठपणाची इयत्ता एकच असावी आणि मानवी प्रज्ञेचें असें साम्राज्य बनवावें कीं मत्सरास जागा न रहातां, सर्वांमध्यें सहभाव व समभाव हीं नांदत असावीं.

जीवनकलहाच्या दुसऱ्या मार्गाविषयीं विचार क-

रितां, जोंपर्यंत पृथ्वीवर मानवी बुद्धि नीतिदृष्ट्या अपूर्णस्थितींत आहे आणि अशुभाचा प्रचार आहे, तोंपर्यन्त, खऱ्या सद्गुणाचा सर्व अरिष्टांवर जरी सर्वकाल जय होणार, तरी सद्गुण व दुर्गुण यांच्या मिश्रणामध्यें कलह सुरू झाला असतां, सत्य मार्गाचा अवलंब होणें अशक्य आहे. जेव्हां एकजण दुसऱ्याचा घात करण्यास किंवा दुसऱ्यास आपल्या ताब्यांत ठेवण्यास प्रवृत्त होतो, तेव्हां केवळ स्वसंरक्षणासाठीं, जेणेंकरून आपला विनाश टळेल असा उपाय दुसरा जण योजीत असतो. नीतिदृष्ट्या अपूर्ण अशा सृष्टीमध्यें, दोन प्रकृतींमध्यें विरोध झाला कीं कलह सुरू झाला असें समजावें, कारण ज्याच्या चैतन्याचा विकास अधिक झालेला असतो व ज्याला आपली प्रौढी मिरवावयाची संवय लागलेली असते, तो शान्तवृत्तीच्या मनुष्यास स्वस्थ बसूं देणार नाहीं. प्रत्येकजण दुसऱ्याचा पाडाव करण्याचा प्रयत्न करीत असतो, प्रथमतः तो रास्त मार्गानें चालण्यास प्रवृत्त होतो, पण सिद्धीविषयीं शंका आल्याबरोबर, बरे वाईट पाहिजे ते उपाय योजण्यास मागें पुढें पहात नाहीं. मग अशा कलहामध्यें सद्गुण कोणता, खरें कोणतें—याची पर्वा कोणी करीत नाहीं, फक्त जय संपादण्याकरितां दुसऱ्याला कशाची सवड द्यावयाची नाहीं व आपण होऊन दुसऱ्याच्या आधीन व्हावयाचें नाहीं एवढी बुद्धि रहाते.

जीवनकलहामध्यें मनुष्यमात्र तीन मार्ग शोधून काढितो—( १ ) दुर्बळाचा समूळ नाश ( २ ) प्रतिस्पर्ध्यांचा निरंतर वियोग व ( ३ ) दोन्ही पक्षांचा एक-

जीव. यांपैकीं पहिले दोन मार्ग जगांतील व्यवहारांत नेहमीं आढळतात, तिसरा मात्र केवळ सदाचारप्रेरित असतो. पहिल्या मार्गांत वाईट धडा घालून दिल्यामुळें त्याचें अनुकरण होतें आणि तोच मार्ग पुढें चालतो. दुसऱ्या मार्गांत, शुभ परिणाम घडवून आणण्याची सवड आली असून ती फुकट दवडिली जाते. पण तिसऱ्या मार्गामध्यें मात्र मानवी स्वभावाचें दैविक स्वरूप उत्कटपणें नजरेस येतें. सर्व सृष्टीमध्यें असें आढळतें कीं एकाची वरचढ आणि दुसऱ्याची अधोगति ह्या कांहीं निसर्गसिद्ध पद्धति नव्हत. कांहीं प्रसंगीं एकाचा दुसऱ्यावर पगडा बसतो, पण ती अवस्था फार वेळ टिकत नाहीं. प्रतिस्पर्ध्यांचा पाडाव होऊन एकदां सत्ता स्थापित झाली, म्हणजे मनुष्य स्तिमित व आळशी बनतो आणि तेणेंकरून ज्या गुणांनीं त्याला जयप्राप्ति झालेली असते, ते गुणच विनाश पावतात; यदाकदाचित् जिंकलेला प्रतिस्पर्धी फिरून जोरदार बनला, तर पूर्वीच्या पराभवाचें उट्टें काढण्यास तो कमी करीत नाहीं. अशा रीतीनें स्पर्धा, प्रतिपक्षता, तदनुषंगिक दुःखें व संकटें, शारीरबलाचा व दुष्ट मनोवृत्तींचा जोर—इत्यादि आपत्तींचा प्रसार होतो आणि मग शान्तीचा किंवा एकजीव होण्याचा संभव सुद्धां नाहींसा होऊन मनुष्याच्या निसर्गसिद्ध उच्चवृत्तींचा परिपोष होणें दुर्घट होऊन जातें.

# प्रकरण २

## श्रेष्ठकनिष्ठ भाव

( श्लोक )

पत्र-पुष्प-फलांशात्मा यथैकः स्वास्थितो द्रुमः ॥
अनन्त सर्वशक्त्यात्मा ह्येक एक तथा विभुः ॥ १

( आर्या )

फलपत्रपुष्पभारें तरु होई सर्वदाचि नम्र जसा ॥
विश्वव्यापक नित्यहि परमात्मा शक्तियुक्त एक तसा ॥१

# प्रकरण २

## श्रेष्ठकनिष्ठ भाव

श्रेष्ठकनिष्ठ भाव व उच्चनीच भाव—ह्यांपासून ज्या अनेक आपत्ति भोगावयास लागतात, त्या क्षणभर एकीकडे ठेविल्या, तरी त्यांमध्यें कांहीं हेत्वाभास म्हणजे असत्य सिद्धान्त नजरेस पडतात आणि सुशिक्षित लोक ते तसेच चालूं देतात, कारण त्यांस असें वाटत असतें कीं—मनोविकार, पूर्वग्रह आणि अभिमान यांनीं ग्रस्त झालेल्या सामान्य जनांची त्या अपसिद्धान्तांच्या खोटेपणाविषयीं खात्री करणें अशक्य आहे. परंतु मनुष्यमात्राच्या सुखाकरितां, हे हेत्वाभास नीट समजून घेऊन खोडून काढिले पाहिजेत. कोणत्याहि कारणानें कां होईना, या कामीं हयगय केली असतां ती आपत्ति कायमच रहाणार, म्हणून तो भ्रम दूर करण्यांत यत्किंचित् कसूर करितां कामा नये.

अमुक जन्म श्रेष्ठ अगर कनिष्ठ असें म्हणावयाचें असेल, तर ज्या जन्मामुळें मनुष्याचा श्रेष्ठपणा किंवा कनिष्ठपणा ठरवावयाचा असतो, त्या जन्माच्या प्राप्तीसाठीं त्या मनुष्याची अनुमति घेतली असली पाहिजे. अशी अनुमति घेतली असेल, तर येथें पुनर्जन्मविषयक मत लागू पडतें, कारण पूर्वजन्मांतील कर्माप्रमाणेंच नूतन शरीरांत प्रवेश होतांना या अनुमतीचा अंमल होणार असतो. जर पूर्वजन्मांतील कर्माप्रमाणें उच्च किंवा नीच जन्म प्राप्त झाला असेल व नवीन जन्म

त्या कृत्यांचें अनुक्रमें चांगलें किंवा वाईट फल असेल, तर ह्या भेदभावाबद्दल कोणासहि तक्रार करण्यास जागा नाहीं. कारण जर प्रत्येक प्राण्यास ईश्वरानें इच्छास्वातन्त्र्य ( Freedom of Will ) व पाहिजे तसें वागण्याचें स्वातंत्र्य दिलें आहे, तर अशा स्वातंत्र्याचें फलहि भोगलें पाहिजे हें उघड आहे. याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि अभ्युपगमावर ( hypothesis ) अमुक श्रेष्ठ व अमुक कनिष्ठ या मताचें समर्थन होऊं शकणार नाहीं.

बरें, मनुष्यमात्राच्या नेहमी लक्षांत येणाऱ्या विवक्षित अवस्थांमध्यें किंवा परिस्थितीमध्यें जन्म प्राप्त झाल्यामुळें हा श्रेष्ठकनिष्ठ भाव लाधला असेल, तर भूलोकावरील मानवी किंवा इतर प्राण्यांस आतांपेक्षां अधिक चांगला किंवा वाईट जन्म येण्याचा मुळींच संभव नाहीं. मग असें कबूल करावें लागेल कीं, सांप्रत जीं मनुष्यें चांगल्या किंवा श्रेष्ठ कुळांत जन्मास आलेलीं आहेत, त्यांचे पूर्वज सृष्टीच्या उत्पत्तीच्या वेळीं चांगले किंवा श्रेष्ठ असले पाहिजेत आणि जीं मनुष्यें आतां वाईट किंवा कनिष्ठ कुलांत जन्मास आलेलीं आहेत त्यांचे पूर्वज सृष्टीच्या उत्पत्तिकालीं वाईट किंवा कनिष्ठ असले पाहिजेत. हें मान्य केलें असतां, उत्तम व श्रेष्ठ पुरुषांची संतति उत्तम व श्रेष्ठ याहून भिन्न होण्याचें भय कधींहि उत्पन्न होणार नाहीं. ह्या मताचा एका कुटुंबापुरता संकोच केला, तर श्रेष्ठ पूर्वजांप्रमाणेंच त्या कुटुंबांतील सर्व मुलें-माणसें सर्वकाल श्रेष्ठच होतील यांत संशय नाहीं. परंतु, कांहीं मानवी जातींतील किंवा

कुळांतील प्राणि नेहमीं श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असतात अथवा हुशार व सुंदर आईबापांचे मुलगे व मुली नेहमीं हुशार व सुंदर असतात, असें कोणाच्या तरी अनुभवास आलें आहे काय ?

वस्तुस्थिति अशी आहे कीं, प्रत्येक व्यक्ति व प्रत्येक शक्ति—जी जी म्हणून जन्मास येते किंवा अविर्भूत होते, ती ती तशी होण्याचीं कारणें त्या व्यक्तीच्या किंवा शक्तीच्या स्वाधीन असत नाहींत. या भूलोकावर प्रत्येक व्यक्ति कांहीं कालपर्यन्त विवक्षित कार्य करण्याकरितां उत्पन्न झालेली शक्तीच असते; आणि विवक्षित काल गेल्यानन्तर, नेमलेलीं कामें घडोत अथवा न घडोत, ती व्यक्तिरूप शक्ति अनन्त कालामध्यें विनष्ट होऊन जाते. श्रीमंत असो, दरिद्री असो, सुरूप असो, कुरूप असो, विद्वान् असो, मूर्ख असो—सर्वांस काळाच्या स्वाधीन झालें पाहिजे. शिवाय सर्व व्यक्तींचें समानत्व उघड दर्शविणाऱ्या अनेक अवस्था आहेत. जीवितक्रमामध्यें झोंप, दुखणें, शारीरिक किंवा मानसिक विपत्ति—वगैरे प्रसंगांमध्यें निसर्गाचा ( nature ) असा चमत्कार दिसतो कीं, त्यामध्यें सर्व व्यक्तींचें साम्य पहाण्याची व श्रेष्ठपणाचा वृथा भ्रम दूर होण्याची उत्कृष्ट संधि सांपडते.

तसेंच कनिष्ठपणा हा जर जन्मावर किंवा पूर्व स्थितीवर अवलंबून रहात असला, तर एकाद्या व्यक्तीस त्याबद्दल भोगावयास लावणें गैर आहे. मनुष्याच्या जन्मपत्रिकेंत आढळणाऱ्या अनिष्ट प्रसंगांबद्दल त्या व्यक्तीस जबाबदार धरणें अत्यन्त पाप आहे, कारण ते

प्रसंग निसर्गाचेच दोष समजले पाहिजेत आणि अकृतापराधाबद्दल कोणासहि फल भोगावें लागणें अनुचित होय यांत संशय नाहीं.

अशा रीतीनें उच्चनीच भावाविषयीं उपपत्ति करूं लागलें असतां, भवितव्यतेचें समर्थन होतें आणि सर्व प्रकारच्या पौरुष प्रयत्नास अडथळा येतो, कारण कांहींएक उद्योग न करितां श्रेष्ठ ते श्रेष्ठच रहाणार, आणि कनिष्ठ लोकांनीं कितीहि धडपड केली तथापि कनिष्ठपणांतून सुटण्याची त्यांना आशा नाहींच. मानवी देहांतील प्रत्येक अवयवाप्रमाणें, प्रत्येक शक्तीला ( Force ) सृष्टीमध्यें कांही कर्तव्य नियमित केलेलें असतें. या शक्तींमध्यें श्रेष्ठ कोण, कनिष्ठ कोण—हें पाहिजे तर आपसांमध्यें त्या शक्तींनीं ठरवावें, परंतु, हा ठराव होवो न होवो, सृष्टीच्या व्यवस्थेंत अशा अभिमानास थारा मिळावयाचा नाहीं. मानवी समाजांत अशाच प्रकारचे भेद आहेत—जसें, धनी व चाकर, रिणको व धनको, गिऱ्हाइक व दुकानदार इत्यादि. परंतु या द्वंद्वांमध्यें श्रेष्ठ व्यक्ति कोणती व कनिष्ठ कोणती—हें, हजारों वर्षें लोटलीं, तरी मनुष्याच्या बुद्धीस ठरवितां आलें नाहीं. कारण या द्वंद्वांतील दोन्ही व्यक्तींची व्यवहारांत सारखीच अवश्यकता असते, आणि एक दुसऱ्याशिवाय राहूं शकत नाहीं. सामाजिक व्यवस्था चालण्यास दोन्ही व्यक्ति सारख्या व अवश्य आहेत. जोंपर्यंत व्यक्तिशक्तींच्या स्वातंत्र्याचा उपयोग कर्तव्यकर्म योग्य रीतीनें बजावण्यापुरताच होत असतो, तोंपर्यन्त सर्व ठीक चालतें आणि जिकडे तिकडे स्नेहभाव व एकोपा नांदत असतात; पण एक-

जण श्रेष्ठपणाचें प्रस्थापन करूं लागला आणि दुसरा असामी त्या जुलुमाचा निषेध करूं लागला, म्हणजे एक-जण वरचढपणाचे सर्व हक्क आपले व त्याबद्दल जबाबदारी मुळींच नाहीं असें म्हणूं लागला व दुसऱ्या असामीस विपत्ति व निराशा भोगावी लागली, कीं घोंटाळा माजतो व जीवनकलहास आरंभ होऊन जीविताचा तरी शेवट होतो किंवा हातापायांस पक्षघात होऊन किंवा त्यांचा विच्छेद होऊन सुद्धां मानवी शरीरानें उपयोगी पडण्याची आशा धरावी तद्वत्—मानवी पटावरील काळीं किंवा तांबडींच बुद्धिबळें पहाण्याचा प्रसंग येतो.

यावरून पहातां, सृष्टीमध्यें वरचढपणा मुळींच असत नाहीं. प्रत्येक व्यक्तीस विवक्षित कामें करावीं लागतात, पण दोहोंमध्यें अधिक महत्त्वाचें काम कोणतें तें ठरविण्याची योग्यता काम करणारांच्या अंगीं नसते. अहंकारानें प्रेरित होऊन प्रत्येक व्यक्तीस आपल्या महत्त्वाचें प्रतिष्ठापन करण्याची इच्छा होणें स्वाभाविक आहे, परंतु हें प्रतिष्ठापन करण्यापूर्वीं त्या व्यक्तीनें असें ध्यानांत आणिलें पाहिजे कीं—श्रेष्ठपणाबद्दल किंवा महत्त्वाबद्दल ज्यांचा हक्क संशयास्पद असतो तेच लोक त्याबद्दल आपला हक्क सांगतात, आणि असें जर नसेल तर निसर्गानें जें आपणास दिलेलें आहे त्याबद्दल हक्क सांगण्याची गरज नाहीं. सांप्रत काळीं मनुष्यमात्राच्या अन्तःकरणाच्या स्थितीवरून पहातां, मनुष्यानेंच कल्पिलेल्या विचारांवर आणि अवस्थांवर उभारलेला श्रेष्ठपणा अथवा कनिष्ठपणा टाळतां येणें अशक्य आहे.

याविषयीं आपण मानवी शरीराचेंच उदाहरण घेऊं

शरीरामध्यें श्रेष्ठ प्रतीचा अवयव म्हटला म्हणजे मस्तक हाच मानिला आहे, व पाय हा कनिष्ठ प्रतीचा समजला जातो, पण असें मानितांना एकास सोडून दुसऱ्याचें चालावयाचें नाहीं हें आपण अगदीं विसरतों. जर पाय किंवा तंगड्या कापून काढिल्या, तर नुसतें धड व डोकें जिवंत राहूं शकेल आणि प्रत्यक्ष ज्ञान व विचार एतत्संबंधी कामेंहि चालूं शकतील, पण त्याचा शरीरास जो उपयोग व्हावयाचा तो बंद राहील. मेंदूला रोग झाला असतां, पाय इकडे तिकडे फिरूं शकतील, पण ज्या शरीराचा ते एक अवयव आहेत, त्याला त्यांचा फारसा उपयोग होणार नाहीं. जीवतत्त्वाचें व रुधिराभिसरणाचें मुख्य स्थान जें हृदय—त्यापासून मस्तकाला व पायांना रक्ताचा पुरवठा, गुणांमध्यें व प्रमाणामध्यें यत्किंचित् फरक न होतां, सारखा होईलच. मस्तकाचीं व पायाचीं कामें परस्परांहून अगदीं भिन्न आहेत. पायांपेक्षां मस्तकाला बौद्धिक कामें अधिक करावीं लागतात हें तर उघड आहे, शिवाय परस्परांस आपापलीं स्थानें देखील मुळींच बदलतां येत नाहींत; परंतु एवढ्याच मुद्द्यावर जर मस्तक श्रेष्ठपणा मिरवूं लागलें किंवा पायांचा धिक्कार करून त्यांना तुच्छ मानूं लागलें, तर त्यांचें स्वतःचेंच काम बंद पडेल आणि पुनः स्थिवीवर येण्याची आशा देखील उरणार नाहीं. सृष्टींतील सर्व शक्ति व व्यक्ति यांप्रमाणें, व मानवीदेहाच्या इतर भागांप्रमाणें, मस्तक व पाय यांना जीं कामें परमेश्वरानें नेमून दिलेलीं आहेत, तीं त्यांनीं निमूटपणें, निरभिमानपणें व निर्भयपणें बजावलींच पाहिजेत,

आणि केवल या शर्तीवरच अखिल विश्वाची रहाटी चालणार आहे.

म्हणून श्रेष्ठपणा व कनिष्ठपणा हीं परिच्छिन्न मानवी कल्पनेचींच कार्यें आहेत, आणि अहंवृत्तीची क्षणमात्र प्रतिष्ठा अथवा भरभराट झाली असतां, त्या वृत्तीच्या प्रख्यापनाकरितां हे भाव उत्पन्न होतात. क्षुधादि शारीरवेग, मनोविकार, पूर्वग्रह, आवड, नावड, व्यंगें, सहानुभूति, द्वेष—हे भाव सर्व प्राण्यांमध्यें सारखे नसले तथापि मनुष्यमात्रास सर्वसाधारण असतात. मनुष्य या नात्यानें पहातां त्याच्यामध्यें कांहींएक श्रेष्ठपणा नसतो. फक्त दैविक गुणांमुळेंच मनुष्य महत्त्वास चढतो, आणि हे गुण अंगीं असले म्हणजे इतर बांधवांपेक्षां तो इतक्या श्रेष्ठप्रतीचा होतो कीं ऐहिक प्रतिष्ठा मिरविण्यांत त्याला कांहींएक अर्थ वाटत नाहीं. वरचढपणा, अंकितपणा या अवस्था सुशिक्षित मनुष्याकरितां मुळींच निर्माण झालेल्या नाहींत. सांप्रतचा मानवी समाज व्यवस्थित व पूर्ण रहावा, म्हणूनच केव्हां केव्हां अधिकार चालवावा लागतो, पण अडाणी व दांडगे अशा लोकांना ताब्यांत ठेवण्याकरितांच ह्या अधिकाराचा उपयोग करणें भाग आहे, आणि अधिकारसंपन्न पुरुष जर दूरदर्शी व आपली योग्यता जाणून असला, तर, सर्व जगाला प्रकाशित केल्याबद्दल जसा सूर्याला अभिमान वाटत नाहीं, त्याप्रमाणें अशा पुरुषाला अधिकाराबद्दल प्रतिष्ठा वाटणार नाहीं. जीवितांतील इतर अवस्थांप्रमाणें, वरचढपणा व अंकितपणा—ह्या क्षम्य व फायदेशीरच होतील, परंतु त्यांपासून अनिष्ट भाव

उत्पन्न होतां उपयोगी नाहीं, आणि परस्परसंबंध सहानुभूतिपूर्वक व प्रेमरूप असला पाहिजे.

परस्परांबद्दल मान व पूज्यबुद्धि असल्याशिवाय, या पृथ्वीवर कोणत्याहि अवस्थेमध्यें कल्याण होणार नाहीं. एक पक्ष दुसऱ्यापेक्षां श्रेष्ठपणा सांगू लागला कीं सौख्याची स्वाभाविक स्थिति नष्ट होते, आणि वरचढपणासाठीं कलह सुरू होतो. मग जो पक्ष विरोधीगुण जास्त प्रमाणावर दाखवूं शकेल, त्याला तेवढ्यापुरता विजय संपादन होतो. पुरुषांपुरुषांमध्यें, स्त्रीपुरुषांमध्यें किंवा स्त्रियांस्त्रियांमध्यें, जे नानाप्रकारचे ऐहिक संबंध उत्पन्न होतात, त्यांमध्यें जेव्हां हा कलह अवश्य होतो, तेव्हां प्रत्येक पक्षानें शक्य तितक्या निष्पक्षपातबुद्धीनें व उत्साहानें तो चालविणें भाग आहे. परंतु, समरांगणावर विरुद्ध योद्ध्यांमध्यें तात्पुरता तह जेव्हां होतो, तेव्हां सहानुभूति, औदार्य वगैरे विलोभनीय गुणांचा अव्हेर होत नाहीं व मनोवेगांचा पगडा बुद्धीवर बसत नाहीं. तद्वत् जीवनकलह चालू असतां श्रेष्ठप्रतीची वागणूक राखण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

# प्रकरण ३

## जयाचीं साधनें व अपजयाचीं कारणें

( श्लोक )

विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा ।
सदसि वाक्पटुता युधि विक्रमः ॥
यशसि चाभिरुचिर्व्यसनं श्रुतौ ।
प्रकृतिसिद्धमिदं हि महात्मनाम् ॥ १

( श्लोक )

विपत्काळीं धैर्य, प्रभुपणिं सहिष्णुत्व बरवें ।
सभे पांडित्याचा प्रसर, समरीं शौर्य मिरवे ॥
स्वकीर्तीच्या ठायीं प्रचुर, रति विद्याव्यसन जें ।
तयांचे हे स्वाभाविक गुण सहा सत्पुरुष जे ॥ १

## प्रकरण ३

### जयाचीं साधनें व अपजयाचीं कारणें

व्यक्तिमात्राच्या जीवनकलहामध्यें जय मिळण्याकरितां तीन गोष्टी अवश्य आहेतः––

( १ ) ज्या कलहांत पडावयाचें त्याला उचित असा स्वभाव

( २ ) कांहीं काल अपयश आलें असतां, पराभव कबूल न करण्याचें धैर्य

( ३ ) उतावीळपणा न होतां मनोविकारांपासून दूर रहाण्याइतकी अक्कल

हे गुण साहजिकपणें प्रकट झाले असतां, सामान्य श्रम करणारासहि यशःप्राप्ति होईल आणि सर्व प्रकारच्या व्यवहारांमध्यें मेहनत करणारांच्या उदाहरणावरून हें सिद्ध होतें. पाहिजे त्या प्रयत्नांत यश हवें असेल, तर असें लक्षांत आणावें कीं निसर्गानें सर्वांस सारखी संधी दिलेली असते व अशा प्राप्त झालेल्या संधीचा जो जसा उपयोग करील त्यावर त्याचें यश किंवा अपयश अवलंबून रहातें आणि एक मनुष्य जें करूं शकतो तें करण्यासाठीं दुसऱ्याच्या अंगीं तितकेंच सामर्थ्य असतें. कोणतेंहि काम हुशारीनें, प्रतिस्पर्ध्याबद्दल द्वेष न बाळगितां आणि विवेकबुद्धीपासून उद्भवणाऱ्या हक्काची जाणीव राखून केलें असतां, साधारण मनुष्यास देखील कल्पनेबाहेर इष्टसिद्धि होऊं शकते. जो चित्ताचें साम्य व प्रसंगावधान बाळगतो, व कर्तव्यापासून पराङ्मुख

होऊन आपले विचार इष्टलाभाकडे, महत्त्वाकांक्षेकडे किंवा सूड उगविण्याकडे वळूं देत नाहीं, अशा पुरुषास अत्यंत शहाणा समजला पाहिजे. कोणत्याहि उद्योगामध्यें असतां, स्वार्थ तरो किंवा बुडो, हातीं घेतलेल्या पक्षाचाच होईल तितका उपयोग करावयाचा असा जो निश्चय करितो आणि प्रसंग पडल्यास आपला जीव देखील धोक्यांत घालितो——तो पुरुष मानवजातींत खरा श्रेष्ठ मानिला पाहिजे.

जीवनसंग्रामांत जय मिळविण्याकरितां, नैतिक कवचाची अत्यंत जरूरी आहे. बाळपणीं व तरुणपणीं योग्य शिक्षणानेंच हें कवच तयार होतें. चैतन्यामध्यें जे मर्दानी गुण व बुद्धि उपजतच असतात, त्यांचा विकास करून हलकट मनोवेगांचा व वृत्तींचा स्पर्शहि चैतन्यास होऊं न देणें—हा उपयुक्त शिक्षणाचा मुख्य हेतु होय. दुष्ट मनोवृत्तींपैकीं अत्यंत गर्हणीय व सिद्धीस विघातक म्हटल्या म्हणजे——( १ ) भय ( २ ) निराशा ( ३ ) मत्सर ( ४ ) संशय ( ५ ) लोभ ( ६ ) काम ( ७ ) हव्यास आणि ( ८ ) आलस्य—ह्या होत. स्तिमितपणा, क्रोध व दीर्घसूत्रीपणा ह्या वृत्ति त्यांच्या खालोखाल आहेत.

( १ ) भय——‘ चोराच्या मनांत चांदणें ’ ह्या प्रमाणें अनीती मागें भय ठेवलेलेंच असतें. ज्या पुरुषास उपयुक्त विद्या अवगत असतात, जो अनीतीच्या मार्गाविषयीं अजाण तरी असतो किंवा अशा मार्गाचें जाणून बुजून उल्लंघन करितो——अशा पुरुषाच्या वाऱ्यास देखील भय रहात नाहीं. अशा मनुष्यास कोण-

त्याहि प्रकारच्या मानवी अथवा दैवी शिक्षेचा धाक वाटत नाहीं, कारण त्याचे आचार व विचार वरच्या पायरींचे असतात. जो पापकर्म करितो त्याला कोणत्या तरी रूपानें शासन होतेंच; जर कांहीं ऐहिक प्रसंगांमुळें कृतापराधांबद्दल त्याला देशबांधवांकडून शासन मिळालें नाहीं, तर तें मुळींच होणार नाहीं अशी मात्र त्यानें समजूत करून घेऊं नये. त्याच्या हृदयांत जो परमात्मा वास करितो व ज्याच्यामुळें त्याचे चलनवलनादि व्यापार घडूं शकतात, तो परमात्मा अशा मनुष्यास शासन करण्यास समर्थ असतो. तो परमात्मा शारीरशिक्षा अथवा छल करण्याचे मानवी उपाय योजीत नाहीं, तरि अपराध्याची बुद्धि व ज्ञानशक्ति नष्ट करितो, आणि अशा रीतीनें तो मनुष्य आपल्यासच शासन करून घेतो. सर्पापासून कधीं कोणाचें हित होत नाहींच, झाला तर नाशच होतो, कारण जे प्राणि आपलीच संतति खातात, त्यांच्याकडून तिऱ्हाइताबद्दल दया किंवा विचार होण्याची आशा नको. तद्वत् जो पुरुष पापाचरण करून इहपरलोकीं आपलेंच नुकसान करून घेतो, तो जातिबांधवांबद्दल दया दाखवील व कर्तव्यदक्ष होईल हें सर्वथैव अशक्य आहे.

भय या वृत्तीशीं अगदीं संलग्न अशी भित्रेपणा म्हणून एक वृत्ति आहे. हें एक आप्पलपोटेपणाचें व शुद्ध अज्ञानाचें स्वरूप आहे. भित्रेपणा जगांत कसा अस्तित्वांत आला ही मोठी विचार करण्यासारखी गोष्ट आहे. लहान बालकाची स्थिति पहावी, तर उपजल्यापासून हा गुण अंगीं जडलेला नसतो, तेव्हां हा शिक्षणाचा

व परिस्थितीचा परिणाम असला पाहिजे. भय किंवा अडचण उत्पन्न झाली असतां, दूर पळून जाऊन त्यापासून आपली सुटका करून घ्यावयाची—ही क्षुद्र वृत्ति भित्रेपणाची होय. प्राणिमात्राचा नाश अवश्य व्हावयाचा, मग तो टाळण्याचा माणसानें कितीहि प्रयत्न केला, तरी अगदीं सुटका म्हणून होणें नाहीं, याकरितां योग्य शिक्षणाच्या साधनांत भित्रेपणाच्या वृत्तीला बिलकुल थारा देतां कामा नये. चैतन्यास असें वळण लाविलें पाहिजे कीं, भय अथवा संकट याचा प्रतिकार दूर पळून जाण्यानें होत नाहीं, तर त्याशीं झगडूनच आपली सुटका करून घेतली पाहिजे, मग या उद्योगांत त्याचा तरी नायनाट होवो अथवा आपला होवो. भयानें ग्रस्त असलेला मनुष्य साऱ्या जन्मभर मृत्यूच्याच वेदना भोगीत असतो, म्हणून बाळपणापासून उत्कृष्ट शिक्षणानें आणि लहान मुलें ज्यांचें अनुकरण करितात अशा लोकांच्या उपदेशानें व उदाहरणानें मानवी व्यवहारांतून भित्रेपणाचें उन्मूलन अवश्य केलें पाहिजे. आपल्या देशावर परशत्रु चालून आला असतां, पळून जाऊन निरंतर दास्यांत आपणास व देशबांधवांस लोटणारा शिपाई; रोजच्या धंद्यांत वारंवार येणारीं संकटें टाळण्याकरितां झटणारा मनुष्य; आपल्या स्वाधीन असलेल्या बालकाच्या निराधारपणाचा फायदा घेऊन त्याला छळणारा गुरु अथवा पालक; स्वसंरक्षण करण्यास असमर्थ अशा आपल्या ताब्यांतील प्रजाजनांस गांजणारा राजा; उलट प्रतिकार करण्यास नालायक अशा दुर्बल पुरुषावर किंवा स्त्रीवर जुलूम क-

रणारा दांडगा धिप्पाड मनुष्य; स्वतःचा राज्यकारभार चालविण्यास अयोग्य अशा प्रजेवर अनियंत्रित सत्ता गाजविणारे जुलमी लोक; अशा दुष्ट मनुष्यांमध्यें पहिल्या प्रतीचा भित्रा कोण हें ठरविणें फार अवघड आहे. हे सर्व भित्रेपणाचे नमुने नेहमीं जगांत आढळण्यांत येतात, आणि देशबांधवांचे निराधारपणाचा फायदा घेऊन त्याचा छळ करण्याचें सोडून दिल्या शिवाय कोणाहि मनुष्यास सुख व शान्ति या ईश्वरी गुणांचा लाभ होणें अशक्य आहे.

( २ ) निराशा——भयाप्रमाणेंच, निराशेलाहि मानवी व्यवहारांत जागा मिळूं नये हें रास्त आहे. जोंपर्यन्त शरीरांत श्वासोच्छ्वासक्रिया चालू आहे, तोंपर्यन्त जीवित कायम आहे; जीवित असेतोंपर्यन्त आशा ही आहेच; आशा आहे तों प्रयत्न केलाच पाहिजे; आणि प्रयत्न योग्य तऱ्हेनें चालविला असतां, यशःप्राप्ति होणारच.

( ३ ) मत्सर——मत्सर व संशय या हलकट भावना आहेत, तेणेंकरून मनुष्याच्या उपयुक्ततेस हरकत होते आणि असंमिश्र अथवा शुद्ध कल्याणाचा लाभ घडत नाहीं. चैतन्याचें पूर्वापर वळण, शिक्षण व सहभाव हीं अशीं आहेत कीं एकदां त्यांना कल अशुभाकडे वळला, म्हणजे त्या दिशेनें तशीच प्रगति चालते. सुसंस्कृत आणि थोर पुरुष अशा भावना कह्यांत ठेवितात आणि ह्या त्यांच्या प्रवृत्तीवरून असें सिद्ध होतें कीं जीवनकलहांत या भावना अवश्य नाहींत. इतरांच्या ताब्यांत ज्या स्पृहणीय वस्तु असतील, त्या मि-

ळविण्याबद्दल उद्योग करण्याची योग्यता ज्यांच्या अंगीं नसते, अशा मनुष्यांच्या अन्तःकरणांत मत्सराला स्थल सांपडतें. प्रत्येक चैतन्यांत अनुस्यूत झालेला व कधीं काळीं गूढ असलेला—जो पौरुष गुण, तो जागृत केला असतां शुद्ध स्पर्धेनेंच इष्ट पदार्थाचा लाभ होऊं शकेल, परंतु मत्सरप्रेरित होऊन दुसऱ्याच्या मालकीची वस्तु नाहींशी करण्यानें, आपल्याला ती मिळाली नाहीं तरी 'दुसऱ्याचें तर नुकसान केलें' एवढें क्षुद्र समाधान मात्र त्यांना होतें, आणि यदाकदाचित् ती वस्तु त्यांना मिळाली, तर लोक हिरावून नेतील या भयानें ते पीडितच रहातात. कांहीं झालें तरी सुख व शान्ति म्हणून नाहींतच; आणि दुसऱ्याचें नुकसान करण्यांत जरी यश येऊन समाधान वाटलें, तरी तें घटकाभरच समजावयाचें.

( ४ ) संशय—संशयखोरपणा हा दोष कांहीं अनिर्वचनीय कारणांमुळें बहुतेक सर्व मनुष्यांत आढळतो आणि जीवितरहस्यांत ज्यांची गति झालेली आहे असे अगदीं थोडे लोक खेरीज करून, मानवी व्यवहाराचा विचार करितां, इतरांमधून हा दोष काढून टाकणें दुर्घट आहे. अशी स्थिति असल्यामुळें, जीवनकलहामध्यें संशयखोरपणापासून नफा किंवा नुकसान काय होतें त्याचा शोध करणें अवश्य आहे. अहंकार सर्वत्र प्रचलित असल्यामुळें प्रत्येक व्यक्ति दुसऱ्याबद्दल सावध राहून आपलें संरक्षण नुकसानीपासून वारंवार करीत असते. नवीन व परका पदार्थ सहवासांत आला असतां, संशयखोरपणा अंगीं असेल, तर नैतिक अथवा भौतिक अनिष्टापासून बचाव होतो हें खास आहे. दुसरे पक्षीं,

व्यवहारांत अत्यंत उपयुक्त अशा ओळखींनाहि संशयखोरपणामुळें मुकावें लागतें. सुधारलेल्या राष्ट्रांतील फौजदारी कायद्याचें तत्त्व असें आहे कीं—नऊ अपराधी मनुष्य सुटले असतां चालेल, परंतु एकाहि निरपराधी मनुष्याला शिक्षा होतां उपयोगी नाहीं. इतर राष्ट्रांमध्यें कायद्याचें तत्त्व असें मानिलें आहे कीं प्रत्येक आरोपी मनुष्य अपराधी असतो आणि एक गुन्हेगार मनुष्य सुटून जाण्यापेक्षां नऊ अपराधी मनुष्यांना शिक्षा झालेली बरी. या दोन विरुद्ध उपपत्तींपैकीं राष्ट्राच्या कल्याणास कोणती उपयोगी आहे, तें सुज्ञ वाचकांनीं ठरवावें.

एका प्राचीन ऋषीनें अशी आज्ञा केली आहे कीं—अतिथि किंवा अभ्यागत यांचा अनादर कधींहि करूं नये, कारण कधीं कधीं देवगंधर्वहि त्यांच्या रूपानें प्रकट होतात. प्राचीन काळापासून आर्य लोकांची रीति अशी आहे कीं—अतिथीनें अन्न मागितलें असतां कदापि नाहीं म्हणूं नये, तसेंच अभ्यागत आश्रयासाठीं आला असतां त्याचा धिक्कार करूं नये. याप्रमाणें वागलें असतां, कदाचित् अपात्रीं दान केलें जाईल किंवा आळसाला उत्तेजन मिळेल, कदाचित् आदरसत्काराचा दुरुपयोग होईल. परंतु, असें बहुधा आढळून येतें कीं—उपकार विसरून अपकाराची मात्र आठवण ठेवावयाची हा स्वभाव कुत्सित मनुष्याचा असतो आणि एकाददुसऱ्या उदाहणावरून सामान्य नियम स्थापावयाचा हा तर हलकट मनुष्याचा विशेष गुण आहे. वास्तविक स्थिति अशी आहे कीं—जो मनुष्य विश्वा-

सास पात्र नसतो त्याचा संशयखोरपणा हा स्वभावच बनून जातो. कावीळ झालेल्या मनुष्यास जसें सर्व जग पिवळें दिसूं लागतें, त्याप्रमाणें संशयग्रस्तास सर्व वस्तु संशययुक्त वाटतात, पित्तप्रकोप झाला असतां सर्व जग फिरत आहे असेंच वाटतें.

सर्व प्रकारच्या लौकिक व्यवहारांत, इतर देशबांधव लबाडलुच्चे आहेत असें मानिल्याशिवाय कोणाचेंच चालत नाहीं. आतां हें खरें आहे कीं कांहीं लोक दुष्ट स्वभावाचे असतात आणि गुन्ह्याची शाबिती झाल्यावर त्यांना शासन झालेंच पाहिजे, परंतु कांहीं लोक अप्रामाणिक आढळले, म्हणून सर्व राष्ट्राला किंवा मानवजातीला अविश्वसनीय समजणें अगदीं मूर्खपणाचें आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं विश्वासानें विश्वास उत्पन्न होतो; आणि आपणावर कोणी वहीम घेत नाहीं असें दुष्ट लोकांस आढळून आलें असतां, त्यांना जर योग्य शिक्षण मिळालें असेल, तर ते आपलें वाईट आचरण सोडून देतील आणि असें जरी त्यांनीं केलें नाहीं, तरी त्यांचे मित्र त्यांना वाईट मार्गापासून निवृत्त करितील असा फार संभव आहे.

औदार्याच्या अभावामुळें संशयखोरपणा उत्पन्न होतो. गुन्ह्यांत सांपडेतोंपर्यन्त प्रत्येक इसम चांगलाच आहे असें मन मोठें करून मानिलेंच पाहिजे. राष्ट्रीय प्रश्नांत या तत्त्वाचा अंगीकार केल्यामुळें अतिशय फायदे झालेले आहेत, परंतु सामाजिक बाबतींत बहुशः उलट तत्त्व अंमलांत आलेलें आढळतें. संशयापासून, संशयापन्न मनुष्यापेक्षां संशयखोराचेंच अधिक नुकसान

होतें. जर संशयापन्न मनुष्य खरोखर संशयास पात्र असेल, तर थोड्याच काळांत तो खचित गुन्ह्यांत सांपडेल, कारण आपणावर कोणाची नजर नाहीं असें त्याला समजलें कीं तो धीट होईल, आणि थोड्याच काळांत त्याचा अपराध उघडकीस येईल, व मग त्याला बहुशः शिक्षा चुकवितां येणार नाहीं. आतां संशयखोराविषयीं विचार करितां, असें दिसतें कीं त्याच्या चित्ताची शान्ति बिघडते आणि विशेषेंकरून त्याचें व्यावहारिक नुकसान फार होतें. ज्या ज्या मनुष्याची गांठ पडते, त्याचा त्याला वहीम येऊं लागतो; तो जागा असो, निजलेला असो, आपल्याला कोणी लुटील किंवा मारील किंवा फसवील किंवा दुखापत करील या भीतीपासून क्षणभर देखील त्याची सुटका होत नाहीं. अशा संशयापासून संशयखोराचा किंवा संशयापन्न मनुष्याचा यत्किंचित् फायदा होतो किंवा दोन्ही पक्षांपैकीं एकाला तरी थोडें सुख होतें असें म्हणणें म्हणजे केवळ उतावीळपणा किंवा चित्तस्वरूपाचें अज्ञान होय. संशयामुळें व्यक्तींचें व समाजांचें नुकसान कायमचें होतें, याकरितां कायावाचामनेंकरून त्यापासून दूर राहिलें पाहिजे. हाच सदाचाराचा खरा मार्ग होय. लौकिक व्यवहारामध्यें कधीं कधीं सावधगिरीनें वागणें अवश्य असतें, जसें एकादे प्रसंगीं क्रोधाचा आविर्भाव आणावा लागतो; पण संशयवृत्ति वारंवार उत्पन्न होऊं देतां उपयोगी नाहीं, कारण चित्ताच्या विशिष्ट स्वरूपामुळें एकदां लागलेली संवय झुगारून देणें कठीण पडतें. लौकिकव्यवहारांत सुद्धां, प्रामाणिक मनुष्यावर विश्वास न ठेवण्या-

पेक्षां संशयास पात्र अशा मनुष्यावर विश्वास ठेविल्यानें कमी नुकसान होईल. जगांतील सर्व अवस्था मनाच्या कल्पनेनेंच उत्पन्न होत असतात, म्हणून झालेल्या नुकसानीकडे लक्ष न दिलें तर कांहीं अनिष्ट घडणार नाहीं, अथवा आपल्याच हातून तें नुकसान झालें असेल, तर स्वतःला थोडासा दोष देऊन किंचित् त्रास सोसला म्हणजे झालें; पण जर कां एकाद्या देशबांधवाकडून यत्किंचित् नुकसान झालें आणि तें जर आपणाला नावडत्या किंवा नापसंत अशा मनुष्याच्या हातून घडलें, तर मात्र अशा मनुष्याचा केव्हां सूड घेऊं असें आपणास होऊन अंगाची लाही होऊन जाते. तेव्हां अशा सर्व अवस्थांमध्यें सुख व शान्ति नांदावी, यासाठीं एका महंतानें असा उपदेश केला आहे कीं—उजव्या गालावर कोणीं थप्पड दिली तर त्याच्यापुढें डावा गाल लागलींच करावा. अशा रीतीनें क्षमा केली असतां थप्पड लगावलेल्या मनुष्याचें कांहींच नुकसान होणार नाहीं; पण त्याला जर विवेकशक्ति नसेल, तर थोड्याच काळांत तो दुसऱ्यालाहि थपडा लगावणारच, आणि मग आजपर्यन्त लोकांना थप्पड दिल्याबद्दल सव्याज फेड करण्यास तो दुसरा कधीं कमी करणार नाहीं. तात्पर्य, लौकिकी व्यवहार व उपयुक्तता या दोन्ही संबंधानें विचार करितां, इतरांपेक्षां आपणालाच ज्यापासून अधिक पीडा होते अशी गोष्ट करूं नये व संशय ही अशाच प्रकारची गोष्ट आहे.

( ९ ) लोभ—सर्व मनुष्यांस साधारण अशा दोषांपैकीं लोभ हा एक आहे. इष्ट वस्तूच्या लाभाचें द्रव्य

हें एक साधन आहे; पण संपत्ति मिळवावयाची हाच जन्माचा हेतु होऊन बसला, म्हणजे त्या हेतूच्या तृप्तीला मर्यादा रहात नाहीं. आपल्या व आपणावर अवलंबून असणाऱ्या निराश्रित लोकांच्या उपजीविकेकरितां व जीवितास लागणाऱ्या अवश्य वस्तूंकरितां द्रव्य मिळविणें स्तुत्य असून इष्टहि आहे; परंतु या मर्यादेपलीकडे गेलें कीं द्रव्यापासून फायदा होतोसा दिसत नाहीं. अपार संपत्तीला मान द्यावयाचा हा एक मनुष्यमात्राचा दोष आहे, आणि तो मान मिळविण्याकरितां द्रव्यप्राप्ति करून घेणें हा ज्याचा त्याचा हेतु बनून जातो. आपल्या सदाचरणाला व नैतिक सामर्थ्याला इजा न होतां व दुसऱ्याच्या हक्कावर धाड न घालितां द्रव्य संपादन करितां आलें, तर ती कामना पूर्ण करावी; परंतु थोर कुळांत जन्म झाल्याशिवाय किंवा कांहीं आकस्मिक प्रसंगाशिवाय अतुल लक्ष्मी प्राप्त होणें बहुधा अशक्य आहे. जे लोक गरीब स्थितींत असून द्रव्य व संपत्ति मिळवूं शकतात, अशा लोकांस बुद्धिमान् व हुशार समजण्याची जगाची वहिवाट आहे. पण असें कोणाला समजत नाहीं कीं संपत्ति जी मिळते, ती हुशारीपेक्षां अनुकूल प्रसंगांमुळेंच मिळत असते. अर्थात् कांहीं बुद्धिमत्ता निःसंशय हवीच, आणि रास्त मार्गानें पैसा मिळाला असतां, मिळविणाराचे धन्यवाद गावे. पण ही बुद्धिमत्ता केवळ निसर्गाचीच देणगी असेल, तर त्या इसमाची वाखाणणी न करितां निसर्गाचीच केली पाहिजे. मानसिक व नैतिक क्षेत्रांमध्यें मात्र स्वतःच्या प्रयत्नानेंच मोठाले लाभ घडूं शकतात; परंतु ज्या अ-

वस्थांचें साक्षात् नियमन करणें मानवीशक्तीच्या बाहेरचें काम आहे, अशा अनेक अवस्थांच्या संयोगानेंच विपुल द्रव्य व संपत्ति प्राप्त होतात. शारीर सौंदर्याबद्दल प्रतिष्ठा मिरविणें हें जितकें सयुक्तिक आहे, तितकेंच विशाल संपत्ति मिळविल्याबद्दल आपला गौरव करणें मनुष्यास शोभण्यासारखें आहे. कांहीं विवक्षित धंद्यांत, व्यापारांत व कामकाजांत, चातुर्य व दैव यांच्या साहचर्यानें अपार ऐश्वर्य प्राप्त होतें; परंतु बौद्धिक उन्नतीमुळें आणि मानसिक परिश्रमामुळें व नैपुण्यामुळेंच मुख्यत्वेंकरून संपत्तीचा लाभ घडला असेल, तर त्याबद्दल प्रतिष्ठा मिरविणें योग्य दिसेल. थोर कुळांत जन्म झाल्यानें, चातुर्यानें अथवा दुसऱ्या कांहीं परिस्थितीनें विपुल ऐश्वर्य प्राप्त झाल्याबद्दल एकाद्याची वाजवी प्रशंसा केली तर चालेल, पण अनेक गोष्टींचा विचार करितां, असा लाभ हटकून फायदेशीर होईलच याची वानवा आहे.

प्रथमतः मनुष्यानुकंपा अथवा माणुसकी सर्वथैव सोडून दिल्याशिवाय लोभाला पूर्ण वाव सांपडतच नाहीं. एकास प्राप्ति व्हावयाची असेल, तर दुसऱ्याचें तितकें नुकसान झालें पाहिजे. चाकरी केल्याबद्दल किंवा दुसऱ्या कशाबद्दल मोबदला म्हणून मिळालें असेल, तर तें धन रास्त व निर्दोष समजलें पाहिजे; असें नसेल तर तें लोकांला फसवून मिळविलें असें होईल. द्यूताप्रमाणें, एकादें जोखीम अंगावर घेऊन, दुसऱ्याचें धन हिरावून घेतलें असतां, तेवढ्यानें तें धन क्षम्य होणार नाहीं. जेव्हां सर्व पक्षाचे लोक सरळपणानें व सारख्या अहमहमिकेनें एकाद्या कामांत पडतात व कोणत्याहि प्रतिस्पर्ध्यास अथवा

गिऱ्हाइकास किंवा पक्षकारास बुडविण्याची इच्छा करीत नाहींत, तेव्हां लोभाचे दुष्परिणाम कमी होतात.

दुसरें असें कीं—लोभ या वृत्तीचा योग्य उपयोग केल्यास, द्रव्य मिळविणाऱ्यामध्यें फार झालें तर अभिमान उत्पन्न होईल अथवा किंचित् नीतिभ्रंश होईल पण याहून अधिक नुकसान होणार नाहीं, तथापि इतर लोकांवर बहुधा वाईट परिणाम घडतो. मिळविलेल्या धनाचा उपयोग स्वतःच्या उपयोगाकडे किंवा मित्रमंडळीच्या किंवा देशबांधवांच्या फायद्याकडे करावा—अशी इच्छा द्रव्य मिळविणाराला क्वचित् होते किंवा तसें करण्याची संधीच सांपडत नाहीं; याचें कारण असें कीं ज्या व्यापारधंद्यावर त्याच्या चित्ताचें ऐकाग्र्य सर्वकाल झालेलें असतें त्याशिवाय दुसऱ्या कशावरहि विचार करण्यास त्याला फुरसद सांपडत नाहीं; संवयीमुळें त्याच्या चित्ताची स्थिति अशी बनून जाते कीं लोभ व संपत्ति याशिवाय कशाचाहि संस्कार त्यावर घडत नाहीं; अथवा द्रव्य मिळविण्यांतच त्याला इतकें समाधान वाटूं लागतें कीं त्या द्रव्याचा उपयोग अथवा व्यय करावा या गोष्टीकडे त्याच्या मनाचा कलच होत नाहीं. म्हणून त्या द्रव्याचा उपयोग करणें दुसऱ्यांच्याच नशिबीं येतें, आणि मिळविणाऱ्याहून त्यांची द्रव्यावरील दृष्टि अगदीं निराळ्या तऱ्हेची होते, म्हणजे तें द्रव्य ताब्यांत आल्यावर त्यांचीं डोकीं फिरून जातात आणि आपल्या किंवा देशबांधवांच्या फायद्याकडे त्या द्रव्याचा विनियोग न करितां, तेणेंकरून ते आपलाच विनाश करून घेतात.

तिसरें असें की—विपुल संपत्ति मिळविल्यापासून मिळविणाराचा किंवा ज्या समाजामध्यें तो राहतो त्या समाजाचाहि फायदा होऊं शकत नाहीं. मिळविणाराच्या संबंधानें विचार करितां, द्रव्याचा जो परिणाम घडतो त्या मानानें मिळविण्याचे श्रम अत्यंत होतात, आणि तेच श्रम मानसिक सुधारणेच्या कामांत केले असते, तर योग्य पारितोषिक तरी मिळालें असतें.

आये दुःख व्यये दुःखं ।
धिगर्थाः कष्टसंश्रयाः ॥

या सर्वमान्य वचनाप्रमाणें, द्रव्यलाभापासून जे फायदे होतात त्यामानानें पहातां, त्याचें रक्षण करण्याची काळजी अधिक होते आणि द्रव्य खर्च झालें किंवा नाहींसें झालें असतां, जीव गेल्याप्रमाणें नैराश्यवृत्ति होऊन जाते. बरें, समाजाच्या संबंधानें पहातां, द्रव्याच्या योगानें अधिकार प्राप्त होतो व अपकार करण्याचेंहि सामर्थ्य अंगीं येतें, म्हणून अशी विपुल संपत्ति एका हातीं गेली असतां तिचा जर योग्य उपयोग केला नाहीं, तर त्यापासून समाजाचें हित मुळींच होणार नाही. एका व्यक्तीच्या हातीं संपूर्ण राजसत्ता अथवा सामाजिक सत्ता प्राप्त झाली असतां, जे अनर्थ घडतात, तेच अशा प्रसंगीं घडूं शकतात, म्हणजे, अशा श्रीमान् व्यक्तीला आपल्या महत्त्वाची व अधिकाराची अतिशयोक्त जाणीव होऊं लागते आणि बाकीचे लोक त्याच्या एकतंत्री इच्छेवर फारच अवलंबून रहातात. बरें, त्याला शास्त्रोक्त वारस किंवा दायाद नसून, तो जर नष्ट झाला किंवा मरून गेला, तर झोटिंगपादशाही माजून

रहाते. एकंदरींत, राष्ट्राच्या कल्याणाकरितां व मनुष्यमात्राच्या सुखाकरितां, कांहीं थोड्या लोकांच्या हातांत पुष्कळ संपत्ति येणें इष्ट नाहीं. संपत्ति सारख्या प्रमाणानें विभागली असतां अधिक फायदेशीर होईल यांत संशय नाहीं. उत्साही व उद्योगी अशा थोड्या लक्ष्मीपुत्रांच्या हातीं अपार संपत्तीचा संचय होऊं न देतां, आळशी व दुर्दैवी लोकांना जागृत करून, जीवितास अवश्य अशा इष्ट वस्तूंचा संग्रह करण्यास त्यांना उत्तेजन कसें द्यावें--सर्व देशांत अत्यंत उपयुक्त अशा विद्यावृद्धीच्या कामाकडे सांठलेल्या विपुल द्रव्याचा विनियोग कसा होईल—ह्या जीवनकलहाच्या बिकट प्रश्नांचा निकाल मानवी बुद्धीला अजून करितां आलेला नाहीं. सुशिक्षित लोकांना व्याजबट्ट्याचा व्यापार आवडत नाहीं, तरुण चैनी लोकांच्या हातीं वडिलोपार्जित संपत्ति येतांच ती उडवून टाकण्याकडे जी त्यांची प्रवृत्ति होते ती महानुभाव लोकांस कधींहि पसंत होत नाहीं, आणि वारसांना पूर्वार्जित दौलत मिळतांना त्याचा कांहीं भाग घेण्याची सरकारची वहिवाट पडून गेली आहे. यावरून पहातां, ऐहिक संपत्ति मिळविण्याच्या कामांत व्यक्तिमात्राच्या फायदेशीर स्वातंत्र्याच्या आड न येतां, अमर्याद लोभाचें नियमन करण्याची कांहीं तरी युक्ति पुढें मागें निघाल्यास राष्ट्राचा अत्यंत फायदा होईल हें उघड आहे.

( ६ ) काम—काम हा एक मनाचा धर्म असून इतर वेगांप्रमाणेंच मनुष्याला व प्राणिमात्राला लागू आहे. तिर्यग् योनीमध्यें श्रेष्ठ प्रतीच्या प्राण्यांत जसें जसें वर जावें, तसा तसा कामविकार कमी आढळण्यांत येतो.

तेव्हां, मनुष्यजातीमध्यें ह्या विकाराचें प्राबल्य व्यक्तीस किंवा समाजास प्राप्त झालेल्या शिक्षणाच्या मानानें असतें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. सर्व शास्त्रग्रंथांमध्यें असें लिहिलें आहे कीं प्रजावृद्धीकरितांच कामविकार विशेषेंकरून उत्पन्न केलेला आहे, यासाठीं निरोगी संतति निर्माण होण्यापलीकडे या विकारास उत्तेजन दिलें असतां मातापितरांच्या व बालकांच्या शारीरिक व नैतिक आरोग्यास धक्का बसतो हें उघड आहे. कामविकार व त्याचें नियमन एतद्विषयीं यथार्थ ज्ञान होण्याच्या मार्गांत कांहीं अडचणी आहेत, त्यांपैकीं मुख्य अडचण अशी आहे कीं—पूर्वापार चालत आलेल्या खोट्या विनयशीलपणामुळें, या विषयावर उपयुक्त शिक्षण देण्याची योग्यता बहुतेकांच्या अंगीं नसते आणि बीभत्स वाङ्मय प्रसिद्ध करितां येत नाहीं. शिक्षणाची सुधारणा व फैलाव झाला असतां अनेक उपाय शोधून काढितां येतील, तेणेंकरून प्रत्येक मनुष्यास असें कळूं लागेल कीं—ज्याप्रमाणें शिपायाच्या हातांतील तरवारीचा उपयोग फक्त राजाच्याच कार्याकरितां होतो, पण तिजपासून मालकास किंवा त्याच्या मित्रास कधींच त्रास होत नाहीं, त्याप्रमाणें कामविकाराचा उपयोग ईश्वरनिर्मित कार्यासाठींच केला पाहिजे.

या कामविकारासंबंधानें व एकंदरींत गुन्हे, संकटें व जीविताच्या अनेक विपत्ति यांसंबंधानें विचार करितां, असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, अशा गोष्टी प्रसिद्ध केल्यापासून फायदा आहे किंवा कसें? फौजदारी खटल्यांची व दुष्ट कृत्यांची प्रसिद्धी करण्याचा मुख्य

हेतु असा असतो कीं, अनिष्टाकडे व दुर्विचाराकडे प्रवृत्त असलेल्या अन्तःकरणास दहशत बसावी आणि कांहीं लोकांच्या मनास तसा आळाहि बसतो; तथापि इतर लोकांच्या मनावर त्या प्रसिद्धीपासून असा दुष्परिणाम घडतो कीं--गुप्त असलेली नैसर्गिक जिज्ञासा त्यांच्यामध्यें जागृत होते व ज्या गोष्टी अज्ञात असलेल्या बऱ्या अशा गोष्टींचें स्वानुभवपूर्वक ज्ञान व्हावें असें त्यांस वाटूं लागतें. शास्त्रवचनें व उत्तम समागम यांच्या योगानें सुसंस्कृत न झालेलें मन बहुधा दुर्बल असतें व शुभापेक्षां अशुभाकडेच त्याची सहसा प्रवृत्ति होते. अशी चित्ताची दुर्बलता असल्यामुळें, अज्ञान तितकें सौख्य व शहाणपण तें वेडेपण—असेंच म्हणावें लागतें. गुन्हे, दुराचरण आणि इतर मनुष्यकृत आपत्ति यांविषयीं विचार करितां, मनुष्याचें मन जितकें अज्ञानांत राहील तितका अधिक फायदा होईल. वाईट गोष्टी समजल्यापासून उपयोग कोणता व परिणाम काय घडतो हें जाणण्याची योग्यता अंगीं येण्याच्या अगोदर, निरपराधी मनुष्यांच्या अन्तःकरणांत तद्विषयक चौकसपणा उत्पन्न करणें यास कोणी शहाणपणा म्हणणार नाहीं. यासाठीं, सर्व प्रकारचे गुन्हे व आपत्ति नाहींशा होण्याचा प्रयत्न सौम्य उपायांनीं व संथपणानें अवश्य करावा, परंतु त्यांची प्रसिद्धि व फैलाव भाषणांनीं किंवा वृत्तपत्रद्वारा न होण्याबद्दल फार काळजी घेतली पाहिजे. भयंकर गुन्ह्यांची चवकशी न्यायकचेऱ्यांतून होत असतांना, जनसमाजास तेथें जाण्याचा प्रतिबंध असावा आणि तेथील वृत्तांताची हकीकत प्रसिद्ध करण्याची

बंदी असावी. मानवी जिज्ञासा वाढविणाऱ्या किंवा हृदयद्रावक अशा खटल्यांची बारीक सारीक माहिती वांचून चित्तास नेहमीं उद्वेग होतो व खुनी मनुष्यास प्रसिद्ध ठिकाणीं सुळावर चढविलेला पाहून अन्तःकरणास जसा त्रास होतो, तसा ह्याहि प्रसंगीं वाटतो. मानवी समाजाविषयीं सांप्रत ज्या कल्पना आहेत त्यांस अनुसरूनच, अशुभाचें निवारण, शुभाचा फैलाव व विवक्षित गोष्टींमध्यें गोपनमर्यादा—इत्यादिकांविषयीं उपाय योजिलेले असतात. वस्तुस्थितीच्या निरीक्षणानें व अनुभवाच्या शिकवणीनें सर्व व्यवहारांत शुभाधिक्याकडे नेणाऱ्या मार्गाचा अवलंब केलेला असतो आणि सर्वच गोष्टींची प्रसिद्धि झाल्यापासून मानवी सौख्याची वाढ हटकून होते असें आढळून येत नाहीं.

( ७ ) हव्यास ( Greediness ) ( ८ ) आलस्य ( Lethargy )—हव्यास व आलस्य ह्या मानसिक अवस्था न मानितां शारीरिकच समजणें योग्य आहे, तथापि मनाच्या कर्मशील सहकारितेशिवाय कोणतेंहि शारीरिक कर्म किंवा कर्मशून्यत्व संभवत नाहीं हें खरें आहे. हव्यास व आलस्य हे जरी विरुद्ध धर्म असले, तरी एकापासून दुसऱ्यास साहाय्य मिळतें व विरुद्धभावामुळें प्रत्येक धर्म प्रतिक्रियेचा प्रकार असतो. व्यक्तीसंबंधानें किंवा समाजासंबंधानें विचार करितां, हव्यासापासून मनुष्याचें हित होत नाहीं. प्रथमतः अन्नाविषयीं विचार करितां, आपण असें पाहतों कीं अन्नाच्या हावरेपणापासून रोग व मृत्यु यांची समृद्धि होते. द्रव्य, घनगात्रत्व अथवा दुसऱ्या कांहीं वस्तु किंवा गु-

ण—अशाविषयीं लालसा उत्पन्न झाली असतां, जर मनाप्रमाणें सिद्धि झाली तर गर्व आणि अभिमान यांचा उद्भव होतो, व सिद्धि झाली नाहीं तर नैतिक गुण मंद पडतात, आणि दोन्ही पक्षीं अनेक शत्रूंची व प्रतिस्पर्ध्यांची रेलचेल उडून जाते. आतां मानसिक व बौद्धिक क्षेत्रामध्यें हव्यास दिसून आला, तर कदाचित् सम्य होऊन फायदेशीर देखील होऊं शकेल. अशा स्थितींत तीव्र लालसेपासून कोणास इजा होत नाहीं व उलट उपयोगहि होतो. परंतु हव्यास करणाराचें शारीरिक नुकसान होतें आणि तेणेंकरून त्याच्या स्तुत्य उद्योगामध्यें व महत्वाकांक्षेमध्यें बिघाड होतो. चांगली वस्तु जरी असली तरी तिचा अतिरेक होऊं देणें कधींहि इष्ट नाहीं, म्हणून उपयुक्त व उपादेय वस्तूविषयीं हावरेपणाला देखील मर्यादा राखिली पाहिजे. जेव्हां हावरेपणाची तृप्ति करीत असतां, इतर देशबांधवांच्या हिवास विघ्न होईल, तेव्हां कांहींकाल एका पक्षाला जरी सुखप्राप्ति झाली तरी एकंदरींत दोन्ही पक्षांस पीडा झाल्याशिवाय रहाणार नाही. जेव्हां मनुष्याचें मन व सर्व मानवी संस्था एकाच सीमेकडे वळत असतील, तेव्हां सृष्टिनियमानुरूप प्रतिक्रियेचा कल विरुद्ध दिशेकडे झालाच पाहिजे. यामुळें कोणत्याहि गोष्टीचा हव्यास दीर्घकालपर्यन्त चालविला असतां, आलस्य उत्पन्न झाल्याशिवाय रहातच नाहीं. शारीरिक किंवा मानसिक श्रमाचा अतिरेक झाला असतां किंवा सदोष घटनेमुळें अथवा साहचर्यामुळें शरीरास आणि चित्तास स्तिमितपणा आला असतां, उपरिनिर्दिष्ट स्थिति प्राप्त होते.

जर मनुष्याचें अन्तःकरण सुसंस्कृत असेल व सर्व वस्तू-विषयीं लालसा टाकून देईल, तर त्याला आलस्य कधीं येणार नाहीं. व्यक्तिमात्राच्या गरजेप्रमाणें अन्न, वित्त, श्रम आणि इतर गोष्टी यांची व्यवस्था होईल, तर सृष्टीमध्यें आलस्याचा उद्भव कधींच होणार नाहीं.

स्तिमितपणा—जेव्हां स्तिमितपणा शारीरिक किंवा मानसिक अशा नैसर्गिक क्षीणतेमुळें उत्पन्न होतो, तेव्हां कांहीं उपाय चालत नाहीं. अशा प्रसंगीं सुद्धां स्वाभाविक शक्तींच्या मानानें ज्ञानप्रकाशाकडे चैतन्याचा कल होण्यास जी जी संधी सांपडेल तिचा फायदा घेण्यास कधीं कमी करूं नये.

दीर्घसूत्रीपणा—जीवनकलहामध्यें दीर्घसूत्रीपणा कधींच फायदेशीर होत नाहीं हें पक्कें लक्षांत ठेवावें. असे कांहीं प्रश्न उत्पन्न होतात कीं त्यांमध्यें कोणता मार्ग स्वीकारणें इष्ट आहे याबद्दल विचार करून कांहीं विलंब करावा लागतो, परंतु कांहीं तरी निकाल होईपर्यन्तच असा विलंब करणें योग्य होईल. असे कांहीं प्रसंग येतात कीं विचार अथवा विलंब करण्यास मुळीं अवसरच सांपडत नाहीं, आणि यश येणें किंवा जीविताचें रक्षण होणें हें सर्वस्वीं तात्कालिक स्फूर्तीवर अवलंबून रहातें. तसेंच असे प्रसंग येतात कीं ज्या वेळीं आपले संशयच आपला विश्वासघात करितात आणि जो लाभ होणें आपणास शक्य असतें तोच लाभ प्रयत्न न केल्यामुळें नाहींसा होतो. जेव्हां एकादी क्रिया मनानें किंवा शरीरानें करावयाची असते, तेव्हां दीर्घसूत्रीपणापासून कोणतेंहि शुभ होणें शक्य नसतें. संश-

यापासून किंवा अनिश्चित हेतूपासून दीर्घसूत्रीपणा उत्पन्न होतो व शेवटीं निराशा होते आणि जीवनकलहामध्यें तर हा मृत्यूच समजला पाहिजे. यासाठीं दीर्घसूत्रीपणापासून चित्त जितकें दूर राखवेल तितकें राखण्याचा अवश्य प्रयत्न केला पाहिजे.

क्रोध—क्रोध हा असा कांहीं प्रबल मनोविकार आहे कीं तो अन्तःकरणास व्यापून टाकून स्वनाशास प्रवृत्त करितो. जेव्हां क्रोध स्वाधीन असून त्याची अनिवार गति होत नाहीं, तेव्हां कधीं कधीं त्यापासून लाभ होऊं शकतो. सर्व प्रकारच्या आपत्तींनीं व स्वार्थपरतेनें भरलेल्या या जगामध्यें, सत्याच्या प्रतिष्ठापनेसाठीं व असत्याच्या निर्मूलनासाठीं क्रोध अवश्य आहे, परंतु अशा प्रसंगीं इष्ट हेतूकरितां नुसता अविर्भाव करावयाचा याच्या पलीकडे त्याला जाऊं देतां उपयोगी नाहीं. जर चित्त क्रोधास वश होईल, तर कदाचित् सिद्धि होणार नाहीं अथवा क्रोधविषयास पीडा होईल किंवा होणार नाहीं, परंतु चित्तास अत्यन्त त्रास झाल्याशिवाय रहाणारच नाहीं. प्राचीन ऋषि असें प्रतिपादन करितात कीं आत्मघातामुळें नरकप्राप्तीचीं तीन द्वारें आहेत—(१) काम, (२) लोभ व (३) क्रोध. यांपैकीं काम व लोभ यांचा सदुपयोग केला असतां फायदा होऊं शकेल आणि पूर्वीं लिहिल्याप्रमाणें ते जीवितरक्षणास अवश्य होतील. परंतु क्रोध हा बुद्धीच्या स्वाधीन रहात नसल्यामुळें अगदीं अवश्य नाहीं, आणि त्यापासून क्रोधवश होणारास व क्रोधविषयास सारखीच पीडा होते.

# प्रकरण ४

## कर्तव्यबुद्धि

( श्लोक )

श्वः कार्यमद्य कर्तव्यं पूर्वाह्णे वा पराह्णिके ॥
न हि प्रतीक्षते मृत्युः कृतमस्य न वा कृतम् ॥ १

( आर्या )

दुसरे दिवशीं करणें अनलस होवोनि आजि सारावें ॥
मृत्यू कधीं न पाहे केलें कीं कृत्य वा न परिसावें ॥ १

# प्रकरण ४

## कर्तव्यबुद्धि

ज्या शारीरवेगांमुळें व मनोवृत्तींमुळें चैतन्याची उपयुक्तता कमी होऊन त्याची दुर्मार्गाकडे प्रवृत्ति होते आणि चैतन्याच्याच कल्याणासाठीं ज्यांस स्वाधीन ठेवणें अवश्य आहे—त्या वेगांविषयीं व वृत्तींविषयीं एथपर्यंत विचार झाला. आतां जीवनकलहामध्यें ज्या मर्दानी गुणांमुळें चैतन्यास जयप्राप्ति होते, त्यांविषयीं विवेचन करावयाचें. या गुणांपैकीं अत्यंत महत्त्वाचा गुण म्हटला म्हणजे कर्तव्यबुद्धि हा होय. तथापि हा गुण इतका लवचीक व स्थितिस्थापक आहे कीं, प्रत्येकजण त्याचा पाहिजे तो अर्थ करूं शकतो. एकाद्याला लुटावयाचें असेल किंवा त्याचा जीव घ्यावयाचा असेल, तरी त्या कृत्याची गणना कर्तव्यांत करितां येते, तसेंच स्वतःला कांहीं द्रव्यलाभ करून घ्यावयाचा असेल तरी त्याचाहि अन्तर्भाव कर्तव्यांतच होतो. कर्तव्यबुद्धीचा हा लवचीकपणा मनाच्या शिक्षणावर अवलंबून रहातो, म्हणजे मनाला जसें शिक्षण मिळालें असेल, तसा कर्तव्यबुद्धीचा अर्थ फिरवितां येतो. एकादें दुष्ट कृत्य करावयाचें जरी झालें, तरी तें आपलें कर्तव्य आहे अशी बुद्धि जरी झाली नाहीं, तरी त्यांत कांहीं दोष नाहीं असें निदान वाटल्याशिवाय, कोणाच्या हातून तें घडूं शकेल काय ? मन जरी दुर्वृत्त असलें, तरी विवेकबुद्धीनें पसंत केल्याशिवाय दुष्टकर्माचें आचरण मनुष्या-

च्या हातून कधीं घडणार नाहीं, इतका मोठेपणा दुष्ट मनुष्याच्या मनास दिलाच पाहिजे. तेव्हां, शिक्षणाच्या किंवा संस्कृतीच्या मानानें कर्तव्यबुद्धि जरी भिन्न असली, तरी पूर्वनिरूपित वेगांचा व वृत्तींचा पगडा ज्यांवर बसलेला नाहीं, अशा अन्तःकरणांत तरी कर्तव्याची इयत्ता स्वाभाविकपणें एकच असली पाहिजे.

कर्तव्यकर्माचे चार वर्ग करितां येतात, ते येणेंप्रमाणें—

( १ ) स्वतःचें कर्तव्य.

( २ ) बांधव किंवा इष्टमित्र यांविषयींचें कर्तव्य.

( ३ ) ज्या राज्याचे आपण नागरिक आहों, त्याविषयींचें कर्तव्य.

( ४ ) देशबांधवांविषयींचें कर्तव्य.

भूतदयेप्रमाणें, कर्तव्याचा उगम स्वगृहींच झाला पाहिजे. जो मनुष्य स्वतःचें कर्तव्य जाणत नाहीं किंवा त्याची हयगय करितो, तो इतरांविषयींचें आपलें कर्तव्य बजावील असा संभव थोडाच असतो. जीवनकलहामध्यें न्याय्य हेतूच्या लाभासाठीं योग्य साधनांचा फायदा घेणें ह्यालाच कर्तव्यकर्म म्हणावें. शिक्षण, साहचर्य व नैसर्गिक स्वभाव यांमुळें जीं जीं नैतिक ध्येयें बनतात त्यांच्या मानानें साधनांच्या न्याय्यतेसंबंधानें भिन्न भिन्न मतें प्रचलित होतात. तथापि साधारण नियम असा आहे कीं ज्या साधनांपासून स्वतःला एकंदरींत पीडा होते, व उदाहरण समजून ज्याला अनुसरून वागलें असतां दुसऱ्यास देखील पीडा होऊं शकते, तीं साधनें न्याय्य नव्हत; हें तत्त्व प्रपंचासक्त पुरुषांसहि मान्य होईल. कांहीं काल इष्टसिद्धि जरी झाली असली, तरी

उपयोगांत आणावयाचीं साधनें अत्यंत न्याय्य व मान्य अशीं जर नसतील, तर कर्त्याच्या नैतिक स्वभावास हटकून बाधा होईल आणि हें तर मोठेंच नुकसान आहे. त्यापासून इतर मनुष्यांच्या आचरणासहि संसर्ग घडतो, अशा संसर्गापासून कधीं कधीं मूळ अपराध्यास व त्यांना स्वतःस त्रास होऊं शकतो व अशा रीतीनें वाईट परिणाम घडत जातात. यासाठीं साधनांची निवड करण्यांतच सर्व शहाणपणा असतो, म्हणजे साधनांपासून तत्काल जरी गुण आला नाहीं, तरी तीं शेवटीं गुणावह असावींत, आणि क्षणिक लाभाच्या नादानें कायमचें नुकसान होऊं नये. एकादा मनुष्य क्षुधेनें किंवा तृषेनें मरत असला, तरी आपला जीव जगविण्याकरितां सुद्धां, जें अन्न अथवा पेय विषारी आहे व कदाचित् मरणहि आणील असें तो जाणतो, त्या अन्नाचा किंवा पेयाचा स्वीकार तो कधींहि करणार नाहीं.

जीविताचा हेतु न्याय्य व स्तुत्य असला पाहिजे. सरासरीनें पहातां, जीविताचा उद्देश असा असतो कीं शरीराच्या पोषणाकरितां पोटभर अन्न पाहिजे. शरीराचें उत्तम प्रकारें पोषण झालें, म्हणजे सर्व तऱ्हेचें ऐहिक व पारमार्थिक क्षेम संपादन झालें असें मानितात. याशिवाय लहानसान गरजा असतातच, म्हणजे वस्त्रपात्र, घरदार, विश्रान्ति हीं पाहिजेत, आणि विवक्षित मर्यादेपर्यन्त तीं अवश्य असतात, परंतु त्या मर्यादेपलीकडे मात्र तो ऐषआराम बनून जातो. अवश्य वस्तु कोणत्या व ऐषआराम अथवा चैनबाजी कोणती यांची मर्यादा ठरविणें फार दुर्घट आहे. तथापि कांहीं

तरी मर्यादा राखिल्याशिवाय, ऐषआरामाच्या गोष्टीच अवश्य होऊन बसतील, गरजा वाढत जातील, जीवनकलह प्रखर वाटेल, आणि भौतिक गरजा तृप्त करण्यांतच जीवितसर्वस्व गढून जाईल. वास्तविक पहातां, शरीरास: ज्या गोष्टी अवश्य असतात, त्यांची तृप्ति, चैतन्यास आपलें काम करण्यास समर्थ करण्यासाठींच, व्हावी लागते. जीवाचें पोषण होऊन, उतार वयांत मान, संपत्ति व सौख्य प्राप्त व्हावींत—एवढाच सामान्य मनुष्यांचा हेतु असतो, पण इतकाच उद्देश जरी स्तुत्य असला, तरी त्याच्या मार्गांत असे कांहीं अडथळे येतात कीं, या तिहींपैकीं एकाची सुद्धां प्राप्ति न होतां जीविताचे सर्व प्रयत्न फुकट जातात. पण ह्याच प्रयत्नांचा उपयोग मानसिक संपत्ति मिळविण्यांत केला असतां अत्यन्त फायदा होईल यांत संशय नाहीं, कारण अशा व्यापारांत कोणाचें कांहींएक हिरावयाचें नसतें, अशा संपत्तीचें रक्षण करण्यांत कोणावरहि अवलंबून रहाण्याची गरज नाहीं आणि आपणास कोणी लुटून नेतील ही भीति मुळींच रहात नाहीं.

जो मनुष्य मनाच्या संस्कृतीसंबंधानें स्वतःविषयींचीं कर्तव्यें योग्य रीतीनें बजावतो, त्याला आई-बाप, नवरा-बायको, मुलें, बांधव व इष्टमित्र यांविषयींचीं कर्तव्यें करण्यास कांहीं एक अवघड वाटत नाहीं. स्वतःप्रमाणेंच अशा प्रसंगींहि भौतिक गरजा अगोदर भागविल्या पाहिजेत, कारण मग चैतन्याचा विकास होण्यास हवी तितकी सवड सांपडते. अशा लोकांकरितां पुष्कळ द्रव्यसंचय करण्याचा मात्र उद्देश धरूं

नये, कारण तेणेंकरून ते लोक आळशी व कुचकामाचे ठरतात, आणि त्यांच्या मानसिक ऐश्वर्यास विघ्न येतें. म्हणून अशा लोकांस मानसिक व बौद्धिक वैभवाची प्राप्ति जेणेंकरून होईल असा प्रयत्न अवश्य करावा, म्हणजे कधींहि नष्ट न होणाऱ्या शान्तीचा व सुखाचा लाभ त्यांस कायमचा होईल.

# प्रकरण ५

## राष्ट्राविषयीं कर्तव्य

## ( श्लोकचरण )

राजा कालस्य कारणम्।

## ( आर्या )

काल असे सर्वांचा कारण तो पतित विनतांचा ॥
परि कालाचा कारण राजा होई समस्त भूतांचा ॥ १

## प्रकरण ५

### राष्ट्राविषयीं कर्तव्य

ज्या राज्यामध्यें किंवा देशामध्यें मनुष्य जन्मास येतो किंवा आश्रयास असतो, त्या विषयींचें जें त्याचें कर्तव्य असतें, तें स्वतःविषयींच्या कर्तव्यापेक्षां श्रेष्ठ मानावें किंवा नाहीं ह्याचा निश्चय होणें कठीण आहे. आत्मावच्छिन्न अनेक व्यक्तींचेंच बनलेलें असें राज्य असतें, म्हणून त्या व्यक्तींस जर राज्याचे उपयुक्त अवयव म्हणजे योग्य नागरिक बनावयाचें असेल, तर स्वतःविषयींचें कर्तव्य त्यांस समजणें अगदीं अवश्य आहे. तथापि देशाच्या कल्याणासाठीं स्वतःचे हिताचा त्याग करणें अवश्य होतें, आणि दोन्ही हितांचा विरोध येतो तेव्हां श्रेष्ठ कर्तव्य कोणतें हें ठरविण्यास ज्ञान व मार्गदर्शन यांची जरूरी भासते. कोणतेंहि आधुनिक राज्य घेतलें असतां, मानवी चैतन्य एकाच दिशेनें जुटीनें प्रयत्न करूं लागलें म्हणजे काय संपादन करण्यास समर्थ होतें—याची कल्पना सहज होते.

धर्मसंस्थापना व राज्यस्थापना या दोहोंची तुलना खरोखर मनोरंजक आहे. धर्मसंस्थापनेमध्यें चैतन्यावर संस्कार घडून पारमार्थिक विश्वबंधुत्व स्थापावयाचें असतें. राज्यस्थापनेमध्यें जडद्रव्यांच्या साहाय्यानें देशबंधुत्व मिळवावयाचें असतें. नामांकित धर्मसंस्थापकांनीं प्रचलित केलेल्या पारमार्थिक बंधुत्वामुळें चैतन्याचा निश्चय होत नाहीं व इष्टकार्यहि घडत नाहीं, कारण जड-

द्रव्य व चैतन्य यांचा संबंध इतका निकट असतो व चैतन्याच्या क्रियेपेक्षां जडद्रव्याची क्रिया जनसमूहास इतकी स्पष्ट दिसते कीं ज्या संयोगामध्यें जडद्रव्याचें आधिक्य असतें व त्याच्या हिताचें रक्षण होतें—अशा संयोगावर प्रस्थापित केलेल्या देशबंधुत्वाचा पगडा धर्मसंस्थापकापेक्षां लोकांच्या कल्पनेवर अधिक कार्यक्षमतेनें बसतो. विचारशील मनुष्यास असेंहि वाटेल कीं—निसर्गानुरूप जडद्रव्याचा लय होऊन विनाश होणार, म्हणून जडद्रव्याच्या संयोगामध्यें उपयुक्त असलेली बुद्धि व प्रदर्शित केलेला उत्साह—यांचा प्रयोग शुद्ध मानसिक दिशेकडे होणें शक्य नाहीं. परंतु संयोगबुद्धि मुळींच नसण्यापेक्षां भौतिक हितसंबंधी संयोगाच्या उपयुक्ततेविषयीं चैतन्याचा निश्चय होणें अधिक श्रेयस्कर आहे, कारण भौतिकक्षेत्राचा अनुभव प्राप्त झाल्यानंतर नैतिकक्षेत्रांत संचार करण्यास बुद्धीचा विकास हळूहळू होऊं शकेल.

राष्ट्र म्हणून जो राजकीय संयोग प्रसिद्ध आहे तो मानवी बुद्धीचें भौतिक क्षेत्रांतील एक अद्भुत कार्य होय. विवक्षित अवस्थेमध्यें विवक्षित स्थलास नियमित केलेल्या सामान्य बंधुत्वाचा राष्ट्र हा विकास होय. राष्ट्रामध्यें शारीरसंबंधाच्या ऐक्याची गरज नाहीं, कारण शारीरसंबंध हटकून मिश्र होतो व तो शुद्ध रहाण्याकरितां हयात असलेल्या प्राचीन जातींमध्यें सामाजिक स्थितीचे नियामक असे जे कठीण निर्बंध आढळतात, तसले नियम अंमलांत आणले पाहिजेत. राष्ट्रामध्यें धर्मसंबंधी ऐक्य असावें लागत नाहीं; जरी त्याच्या

भरभराटीच्या एका अवस्थेमध्यें छळ करून धर्मैक्य करण्याचा जारीनें प्रयत्न चालला होता, तथापि भलभलते प्रकार घडल्यामुळें ते प्रयत्न सिद्धीस गेले नाहींत. राष्ट्र म्हणजे मानवी घटकांचा एक समुदाय असतो, आणि तो भावना, स्वहित व त्या त्या कालीं प्रचलित असलेल्या जीविताच्या कल्पना यांनीं बद्ध झालेला असतो. राष्ट्रामध्यें जनसमूहाच्या हितासाठीं व्यक्तिमात्र आपलें खासगी हित कसें दूर करितो याचें उदात्त ध्येय नजरेस पडतें, तसेंच जीविताला काळिमा आणणारा व मनुष्यामनुष्यांच्या व्यवहारांत राहून सुखाचा नाश करणारा असा जो संशयरूपी कीटक त्याचा पूर्ण अभाव तेथें असतो, आणि अनेक शक्तींच्या योगानें सृष्टीमध्यें उत्पन्न होणारें सामर्थ्य दृष्टीस पडतें. प्राचीनकाळीं राष्ट्र म्हणजे श्रेष्ठ व्यक्तींचा किंवा कुटुंबांचा विशिष्ट वर्ग असा अर्थ असून त्या व्यक्ति किंवा कुटुंबें जरी कांहीं कालपर्यन्त एकमेकाचा नाश करण्यास प्रवृत्त असत, तथापि हुशार व सुसंस्कृत पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं त्याच व्यक्तींनीं व कुटुंबांनीं आपलें राष्ट्र उन्नतीस चढवून त्याचें वर्चस्व स्थापित केलेलें असतें. अशा पुढाऱ्यांस सामान्य लोकांचा आश्रय पाठीशीं असावा लागतो, त्यांचा शब्द झेलण्यांत त्या लोकांना फुशारकी वाटत असते, आणि त्या लोकांच्या हिताचें रक्षण करणें हें ते पुढारी आपलें श्रेष्ठ कर्तव्य मानीत. हा अन्योन्याश्रय जेव्हां आदर, स्वार्थत्याग व आत्मसंयमन यांवर अवलंबून रहातो, तेव्हां इष्टसिद्धि हटकून होते आणि परस्परांचा संयोग कार्यक्षम होतो. परंतु आत्म-

संयमन कमी होऊन दोन्ही पक्ष आत्मप्रतिष्ठापन करूं लागल्या बरोबर, त्यांच्यामध्यें विरोध उत्पन्न होऊन नाश होण्यास उशीर लागत नाहीं. सांप्रतकालीं देखील, धर्माच्या संशोधक संस्थांमुळें उदयास आलेल्या बंधुत्वाच्या शक्तीमुळें विकास पावलेली राष्ट्रीय जीविताची कल्पना प्रचलित असूनहि, कोणत्याहि राज्याची किंवा राष्ट्राची भरभराट होण्याकरितां सर्व वर्गांमध्यें व व्यक्तींमध्यें अन्योन्यावलंबन व परस्परांविषयीं आदरभाव असावा लागतो आणि हितसंबंधांमध्यें विरोध झाला असतां आत्मसंयमन करावें लागतें.

ज्या शाश्वत नियमांवर मानवी कल्याण अवलंबून असतें ते नियम सर्वांस पसंत होऊन प्रत्येक व्यक्तीकडून साहजिकपणें मान्य होईतोंपर्यन्त प्रत्येक मानवी समाजास कांहीं प्रमाणभूत राज्यस्थापना अवश्य पाहिजे. हा अधिकार, एका जातीनें दुसऱ्या जातीवर, एका कुटुंबानें दुसऱ्या कुटुंबावर, एका श्रेष्ठचैतन्यानें इतर चैतन्यांवर चालविलेला असूं शकेल. जेथें श्रेष्ठ अधिकारी आपली योग्यता व कर्तव्यें जाणतो, जेथें क्षणिक लाभाकरितां तो दुर्मार्गवर्ती होत नाहीं, जेथें भावी संततीच्या सुखवृद्धीसाठीं प्रत्येक संधीचा उपयोग करण्याची त्याला दूरवर अक्कल असते—अशा तऱ्हेची उपयुक्तता ज्या राज्यामध्यें सिद्ध असते, त्या राज्याचा लय किंवा नाश होण्याची मुळींच भीति नाहीं.

प्रगतीच्या आरंभापासूनच, कायदा व व्यवस्था अंमलांत आणण्याकरितां राज्याची कल्पना सर्वकाल प्रचलित झालेली आहे. सुसंस्कृत व श्रेष्ठ अशा पुरुषसंघां-

नींच ही कल्पना प्रचारांत आणिली होती आणि आपलें कल्याण कशात आहे हें जनसमुदायास कळत नसल्यामुळें, अशा संघांनीं समाजव्यवस्था केली, अपकाराचे व संरक्षणाचे मार्ग शोधून काढिले, आणि स्थापित केलेल्या तत्त्वांस देशबांधवांनीं अनुसरावें अशाबद्दलहि निर्बंध केले. एकाद्या भरभराटीच्या व नमुनेदार राज्यामध्यें जे कांहीं वरिष्ठ लोक अंमल चालविनात, ते त्या कामासाठीं सर्वोत्कृष्ट असेच असतात. हे लोक स्वार्थासाठीं राष्ट्रीयहिताचा कधीं नाश करीत नाहींत, ईश्वरानें जें बुद्धिसामर्थ्य दिलें असेल त्याचा पूर्ण उपयोग करून हे लोक आपलें कर्तव्य बजावतात, आणि ज्या राज्यसंस्थेचे सेवक असूनहि खरोखरीचे ते धनी असतात ती संस्था तत्कालीन राष्ट्रांमध्यें श्रेष्ठ व अत्यन्त सुखी होण्यासाठीं ते लोक आपली संपूर्ण ज्ञानशक्ति व वीर्य हीं अर्पण करितात. मोठ्या कुलांत जन्म पावून किंवा इतर परिस्थितिमुळें ज्या लोकांस एकाद्या राज्याचें प्रभुत्व प्राप्त होतें, अशा लोकांच्या शीलावर व गुणांवर त्या राज्याचा मोठेपणा अवलंबून रहातो. उच्च कुळांत जन्म पावल्यानें, लोकांच्या पसंतीनें, नेमणुकीनें अथवा निवडणुकीनें प्रभुत्व चालविण्याची सत्ता प्राप्त झालेली असो, त्यापासून राष्ट्राच्या कल्याणामध्यें कांहीं एक फरक होऊं शकत नाहीं. सुसंस्कृत व सुशील असे जे लोक असतात, ते कोणत्याहि अवस्थेंत असोत किंवा त्यांचा उद्योगधंदा कांहींहि असो, त्यांची कर्तव्यबुद्धि एकसारखीच रहाते. एकाद्या राज्यांतील अधिकारीवर्ग कर्तव्यबुद्धीमध्यें किंवा कर्तव्य बजावण्यांत कमकुवत झा-

ला आणि वरिष्ठ लोक लभ्य असतील, तर, तें राष्ट्र प्रजासत्ताक किंवा अल्पसत्ताक असेल त्या मानानें शान्ततेची किंवा बलात्काराची क्रान्ति अनुक्रमें घडून येते आणि ते वरिष्ठ लोक त्या कमकुवत लोकांचे अधिकार हिरावून घेतात; परंतु वरिष्ठ प्रतीचे लोक लभ्यच नसतील, तर त्या राज्याचा नाश होतो. आणि ज्या राज्यामध्यें कर्तृत्ववान् मनुष्यें मुबलक असतात अशीं राज्यें त्या दुर्बल राज्यास पादाक्रान्त करितात आणि अशा रीतीनें पुढाकार घेऊं शकतात. यावरून पहातां, राष्ट्राचें महत्त्व व उपयुक्तता हीं ज्या थोड्या लोकांच्या हातीं खरोखर सत्ता असते त्यांच्यावरच सर्वस्वीं अवलंबून रहातात. साप्रतकालीं, अंशतः प्रजासत्ताक अशा कांहीं राष्ट्रांमध्यें राज्य चालविणारे लोक वस्तुतः लोकांकडूनच निवडलेले असतात. आणि नियमित अवधीनंतर सर्व लोकांचीं मतें घेऊन त्यांस कामावरून दूर करितां येतें, परंतु मुख्य अधिकारिवर्ग नेहमीं कायम नेमणुकीचा असतो. याहून अधिक प्रजासत्ताक अशा राष्ट्रामध्यें सार्वजनिक अधिकारावर असणारे व राज्य चालविणारे मुख्य अंमलदार, विरुद्ध मत मिळालें असतां, बदलून जातात. तिसऱ्या प्रकारच्या प्रजासत्ताक राष्ट्रामध्यें, जरी एका तऱ्हेनें सार्वजनिक मत असलें आणि दुसऱ्या तऱ्हेनें पूर्ण साम्राज्य असलें, तरी व्यवहारतः राज्याचीं सूत्रें मूर्धाभिषिक्त राजा किंवा त्याचे मंत्री यांच्याच हातांत असतात आणि बहुधा परकीय अरिष्टामुळें उत्पन्न झालेली लष्करी क्रान्ति घडून आल्याशिवाय, या अधिकाऱ्यांस दूर करितां येत नाहीं.

राष्ट्रामध्यें राज्य चालविण्याचा कोणताहि प्रकार असो, त्याचें सुख, सुरक्षितपणा व भरभराट हीं नेहमीं थोड्याच लोकांच्या हातीं असतात व ते थोडे लोक जर इतर राष्ट्रांतील पुढाऱ्यांपेक्षां अधिक शहाणे व कर्तृत्ववान् असतील, तर जेणेंकरून त्या राष्ट्राचें सर्व तऱ्हेनें कल्याण होईल अशाच स्थितीमध्यें तें राखतील. राष्ट्रामध्यें उत्कृष्ट व हुशार मनुष्यें पैदा होण्यासारखीं असून, जर तशीं माणसें तयार झालीं नाहींत, तर तें एक जीविताचें रहस्यच समजलें पाहिजे. किंवा असेंहि होऊं शकेल कीं हुशार व बुद्धिमान् मनुष्यें प्रत्येक राष्ट्रांत निपजतातच, परंतु विवक्षित समयीं असें वातावरण प्रचलित होतें कीं त्यामुळें असले लोक पुढें येऊं शकतात किंवा अजीबात मागेंच रहातात. तेव्हां एकाद्या राष्ट्रांत कांहीं काल हुशार पुढारी विपुल असतात व कांहीं काल त्यांची वाण होते, अशा एकामागून एक घडणाऱ्या गोष्टींचीं कारणें कांहीं असोत, त्यांत रहाणाऱ्या प्रत्येक रहिवाशाचें व नागरिकाचें कर्तव्य असें आहे कीं, त्या राष्ट्राच्या उपयोगाकरितां जितकीं उत्तम मनुष्यें पैदा होतील तितकीं मिळवून देण्यांत साहाय्य करून शक्य तितक्या उत्कृष्ट स्थितींत राखण्यासाठीं कायावाचामनेंकरून प्रत्येकानें झटलें पाहिजे. राष्ट्र दृष्टीनें किंवा व्यक्ति दृष्टीनें—कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें, तरी हें कर्तव्य बजावण्यांत हयगय किंवा आळस झाला कीं जीविताच्या शर्यतींत पराभव व संकट हीं आलींच म्हणून समजावें, आणि हा आळस जर टाळतां आला नाहीं, तर निसर्गशक्तीचा जोर सं-

पला आणि बरेच दिवस काम केल्यामुळें त्या राष्ट्राला आतां विसावा पाहिजे याची ती खूणच समजली पाहिजे,—मग हा विसावा कांहीं दशकें असो कीं शतकें असो,—आणि या अवधीमध्यें इतर राष्ट्रें पुढाकार घेऊन अनेक मानवी संस्थांना उत्कृष्ट वळण देउं शकतीलच.

स्वतःविषयींचें किंवा देशबांधवांविषयींचें आपलें कर्तव्य बजावीत असतांना, जीविताच्या अत्युच्च तत्त्वांचा अवलंब प्रत्येकानें केला पाहिजे. त्याप्रमाणेंच राष्ट्रसंबंधी व्यक्तिशः कर्तव्य बजावीत असतां, श्रेष्ठ तत्त्वांचा अंगीकार अवश्य आहे. राष्ट्रीय कर्तव्याचे तीन विभाग करितां येतात.—

( १ ) राजाचें प्रजेविषयीं कर्तव्य.

( २ ) प्रजेचें राजाविषयीं कर्तव्य.

( ३ ) राजा व प्रजा यांचें राष्ट्राविषयीं कर्तव्य.

जो आपलें अधिकारनियुक्त कर्तव्य करितांना स्वतःस विसरतो, कोणतेंहि कर्तव्य बजावतांना खासगी हेतूनें प्रेरित होत नाहीं, श्रेष्ठ लोकांच्या कल्याणाप्रमाणें अगदीं हलक्या प्रतीच्या लोकांच्या हितासाठीं जो चिंता बाळगतो, जो असें अनुभवानें जाणतो कीं राष्ट्राचें ऐक्य व सुरक्षितपणा हीं प्रत्येक नागरिकाच्या सुखावर अवलंबून रहातात, पूर्वग्रहामुळें किंवा अविचारानें कोणीं गडबड केली असतां जो तिकडे लक्ष देत नाहीं, लौकिक प्रीति संपादन करण्याकरितां देशभक्तीच्या नांवावर दुष्ट लोक समाजामध्यें पापाचें बीज किती खोल रोवूं शकतात हें जो जाणतो, तसेंच पापाचें बीज उपडून कसें टाकावें हेंहि जो जाणतो, जे लोक आपलें

रक्षण करूं शकतात आणि प्रसंग पडल्यास आपलें गाऱ्हाणें सांगून विजयी होतात अशा लोकांपेक्षां निराश्रित व दुर्बल प्रजेची जास्त काळजी घेऊन त्यांचें रक्षण केलें पाहिजे असें जो जाणतो,—त्यालाच श्रेष्ठ व उत्कृष्ट राज्यकर्ता असें म्हणावें. असें बहुधा पाहण्यांत येतें कीं राज्यसूत्रें हातीं घेण्याकरितां जे मुत्सद्दी राजानें किंवा प्रजेनें निवडलेले असतात, ते बहुशः श्रेष्ठ व उत्कृष्ट प्रतीचेच असतात, अशा न्यायनिपुण लोकांस आवडनावड हीं मुळींच नसतात, हे लोक विवेकबुद्धि बाजूस ठेवून आपल्या अधिकाराचा दुरुपयोग कधीं करीत नाहींत, मानवी स्वभावामुळें हातून चुका घडल्यास त्या लपवून न ठेवितां किंवा त्यांबद्दल सबबी न सांगतां हे लोक त्या चुका कबूल करून त्यांची दुरुस्ती करण्यास नेहमीं तयार असतात. अशा लोकांची राजनीति विवेकबुद्धीनें प्रकाशित असल्यामुळें, सर्व राष्ट्राचा प्रतिनिधिभूत जो राजा, त्याला अधिक समर्थ व शक्तिमान् करण्याकडे त्यांचा सर्व प्रयत्न चाललेला असतो. अशा रीतीनें जे मुत्सद्दी राजाची व प्रजेची प्रीति संपादन करितात त्यांचा हुकूम प्रजाजन मोठ्या आनंदानें पाळितात, भीतीनें नव्हे.

प्रजेचें कर्तव्य असें आहे कीं राज्यकर्त्यानें जे कायदे व हुकूम केले असतील, त्यांचें प्रतिपालन आनंदानें करणें हें होय. प्रजेनें असें मानावें कीं हे कायदे आपल्या कल्याणाकरितांच आहेत आणि हे कायदे झुगारले असतां, सर्वांच्या कल्याणामध्यें ज्या राज्याचें कल्याण मुरून जातें, त्याचें सामर्थ्य कमी होईल. जर एकादा कायदा किंवा हुकूम प्रजेला अप्रिय होईल, तर त्याबद्-

ल मनांत द्वेष कधींहि बाळगूं नये, कारण तेणेंकरून राज्यांत अस्वस्थता माजून नाश होईल. अशा प्रसंगीं उत्कृष्ट उपाय हाच कीं योग्य अधिकाऱ्यांपाशीं दाद मागावी, म्हणजे जर ते हुशार व कर्तव्यदक्ष असतील, तर त्यांच्या तक्रारींची चौकशी होऊन, सर्वांचें कल्याण जेणेंकरून होईल अशा रीतीनें दाद लागेल. प्रजाजनानें सर्वकाल अधिकाऱ्यांपुढें नम्र होऊन आपला पूज्यभाव प्रकट करूं नये, तरि आपण तो जाणून आहों असें दाखवावें. अधिकाऱ्यांपुढें सर्वदां नम्र झालें असतां त्यांस गर्व चढतो. प्रजाजनानें असें ध्यानांत ठेवावें कीं, राष्ट्राचा मोठेपणा व आदर रहाण्यासाठीं उद्दाम मनोवेग व वक्रवृत्ति यांचें नियमन केलें पाहिजे, इतकेंच नव्हे, तरि राज्यकर्त्यांमध्येंहि तशा वृत्ति व अभिमान हीं उत्पन्न न होतील अशाविषयीं झटलें पाहिजे.

नागरिक या नात्यानें प्रजाजनाचें राष्ट्राविषयींचें कर्तव्य व त्या राष्ट्राचा नागरिक व सेवक या नात्यानें राज्यकर्त्यांचें कर्तव्य—हीं फारच महत्त्वाचीं असतात. कायदे, व्यवस्था, सौख्य, संस्कृति, प्रगति—ह्या जीवितांतील वैयक्तिक व राष्ट्रीय स्पृहणीय वस्तु या कर्तव्यप्रकारांचें नीट पर्यालोचन करण्यावरच अवलंबून असतात. सांप्रत सृष्टीमध्यें एकटा मनुष्य कांहीं करूं शकत नाहीं. इतरांपासून त्याला मिळणारा आश्रय व त्याच्याकडून घडून येणारा संयोग—ह्यांवर त्याची कर्तव्यक्षमता अवलंबून असते. प्राचीन काळीं इतरांपेक्षां धैर्यवान्, चाणाक्ष व हुशार असा एक पुरस्कर्ता मिळाला कीं त्याशीं सहानुभूति बाळगणारे अनेक लोक तयार

होऊन राजवंशवृक्ष जोमांत येई आणि राज्यकर्त्यांच्या गुणांप्रमाणें तो वंश अनेक वर्षे चालत असे. या राजकीय समुदायामध्यें सर्व सत्ता, अधिकार व संस्कृति व्यापून राही आणि इतर लोकांचें काम म्हटलें म्हणजे, त्याचे हुकूम मानावे, त्याच्याबद्दल लढावें आणि त्याच्याकडून मिळेल तें बक्षीस घ्यावें, इतकेंच असे. अलीकडील काळामध्यें, दयाशील धर्माची स्थापना होत असल्यामुळें आणि राजसत्ता नियमित करण्याकरितां सनदीलोक सार्वजनिक पक्ष उचलीत असल्यामुळें, अनेक क्रान्त्या घडून आल्या आहेत व लोकपक्षाला नानाप्रकारचे हक्क संपादित झालेले आहेत. कांहीं राष्ट्रांमध्यें साम्राज्याचे व अल्पसत्ताक राज्याचे नमुने दृष्टीस पडतात, व इतरांमध्यें प्रतिनिधिनिक्षिप्त राज्याचेहि प्रकार आहेतच. जेथें अनुयायांच्या दुर्बलतेमुळें, एकजुटीच्या अभावामुळें किंवा विश्वासघातामुळें नाश झालेला नसतो तेथें कोणताहि पक्ष पराभूत होत नाहीं. जर अनुयायी दुर्बल असले, तर ती गोष्ट मानवी उपायांच्या पलीकडील होते, कारण अवश्य लागणारी नैतिकशक्ति व सामर्थ्य हीं मनुष्यास हवीं तेव्हां प्राप्त होत नाहींत. एकजुटीचा अभाव व विश्वासघात हीं दुसरीं विनाशक कारणें उत्पन्न होण्यास एखाद्या वजनदार समूहामध्यें स्वार्थसाधूपणा व आत्मसंयमनाचा अभाव हीं व्हावीं लागतात. ह्या आप्पलपोटेपणाचीं चिन्हें दिसूं लागल्याबरोबर जर तो दबविला नाहीं, तर इतर अरिष्टांप्रमाणेंच तो वाढत जाईल आणि जेथें तो उत्पन्न झाला असेल त्या संस्थेचाहि नाश होऊन जाईल.

सार्वजनिक कल्याणाच्या अभिवृद्धीसाठीं, भावना ( Sentiment ) आणि हितसाधन ( Interest ) या बंधनांनीं एकवटलेला जो व्यक्तिशक्तींचा संयोग त्यास 'राज्य' किंवा आधुनिक संज्ञेनें 'राष्ट्र' असें म्हणतात. एकाद्या व्यापारांतील भागीदारीप्रमाणें हा संयोग फायदेशीर होऊन, जोंपर्यन्त त्यामध्यें कर्ते पुरुष असतात व जुटीनें काम चाललेलें असतें, तोंपर्यन्त त्याची भरभराट होते. राजकीय संस्थांचे तीन विभाग करितां येतात:—( १ ) पहिलें शुद्ध साम्राज्य असून मानवी चैतन्याची हीच पहिली कल्पना होय. ( २ ) दुसरी संस्था पूर्णपणें प्रजासत्ताक असून, हेंच अगदीं अलीकडचें ध्येय होय. ( ३ ) तिसरी संस्था म्हटली म्हणजे सार्वजनिक प्रतिनिधिस्वरूप व साम्राज्य यांचें मिश्रण होय. देश, काल, वर्तमान यांशीं अनुरूप असा या संस्थांचा कोणताहि प्रकार असो, जर अधिकारीवर्ग आपल्या अधिकाराचा दुरुपयोग न करितां आत्मसंयमनाची किंमत जाणून राहील, तर हव्या त्या संस्थेपासून सुखोत्पत्तिच होईल. जोंपर्यन्त समाजामध्यें शिक्षणाचा प्रसार सर्वत्र झालेला नसतो, तोंपर्यन्त सुसंस्कृत व प्रामाणिक लोकांनीं चालविलेलें साम्राज्य किंवा अल्पजनसत्ताक राज्य इष्ट परिस्थितीस योग्य असतें. परंतु जे लोक विद्यासंपन्न व अब्रूदार नाहींत, जे लोक पूर्वग्रहानें ( Prejudice ) किंवा आकस्मिक वेगानें ( Impulse ) प्रवृत्त होऊं शकतात, सनातन तत्त्वांस किंवा शाश्वत हितसंबंधास झुगारून देऊन क्षणिक लोकप्रियता संपादन करण्याची ज्यांची महत्त्वाकांक्षा असते—अशा लोकांच्या हातीं

जर राज्यसूत्रें पडतील, तर त्या राज्यावर भयंकर अरिष्टें येतील यांत संशय नाहीं. कितीहि मागसलेलें राष्ट्र असलें, तरी त्यामध्यें कांहीं थोडे लोक तरी श्रेष्ठ मताचे, विद्यासंपन्न व अब्रूदार असणरच. असे लोक जर माघार घेतील, व खाजगी कारणांमुळें पुढें न येतां राष्ट्राची चाकरी करणार नाहींत, तर त्या राष्ट्राची धडगत नाहीं असें समजावें. अनियंत्रित साम्राज्याचें किंवा अल्पजनसत्ताक इच्छाप्रभुत्वाचें ( Despotism ) संकट असें आहे कीं, त्याबद्दल सहानुभूति नसेल किंवा विरुद्ध मत असेल, व वाटतील तसे कायदे बनून त्यांची बजावणी होऊं लागेल, तर प्रजाजन नाखुष होतील व प्रेमानें राजनिष्ठ न राहतां राजसत्तेस आश्रयहि देणार नाहींत; राजा व प्रजा यांच्यामध्यें संशय उत्पन्न होईल, एका बाजूस कपटव्यूह, दांडगाई व धाकदपटशा सुरू होऊन दुसऱ्या बाजूस राजनिष्ठेच्या ऐवजीं द्वेष आणि भीति यांची समृद्धि होईल; अधिकाऱ्यांचे अपराध प्रसिद्ध झाले तर दीर्घरूढ प्रतिष्ठा गमावेल या भीतीनें ते छपविण्याचा प्रयत्न होईल आणि तेणेंकरून प्रजेच्या मनाची आढी दूर न होतां वृद्धि पावेल; मग राजा व प्रजा यांच्या हितसंबंधांत बिघाड होऊन परस्परांत अधिकाधिक अन्तर पडत जाऊन त्याचें स्वरूप व जोम हीं नष्ट होतील; आणि प्रजाजन जुलमामुळें संतप्त व निःसत्त्व बनून, अशा त्रासांतून आपली सुटका करून घेण्याकरितां परकीय प्रभूची मदत घेतील किंवा स्वतःच्या मनगटांत जोर राहिला असल्यास गुप्त कारस्थानें किंवा उघड बंडावा करून जुलमाचें राज्य उलथून

पाडण्याचा प्रयत्न करितील. प्रजासत्ताक राज्य उत्कृष्ट रीतीनें चालण्यास समाजाची स्थिति अत्यन्त परिपक्क असली पाहिजे—म्हणजे कर्तव्यबुद्धि व संस्कृति यांचा फैलाव झाला पाहिजे, प्रत्येक मनुष्यानें आपल्या हक्कांच्या महत्त्वापेक्षां जबाबदारीकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे, खाजगी व स्थानिक हितसंबंध सार्वजनिक कल्याणामध्यें बुडून गेले पाहिजेत,—थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे बहुतेक लोक आत्मनियमन करण्यांत गुंग झाले पाहिजेत. प्रजासत्ताक राज्यास मोठें भय आत्मप्रतिष्ठापन, कायदे व हुकूम यांची हेटाळणी, मनोवृत्ति व आकस्मिक वेग यांचा जोर, आणि लोकांनीं निवडलेल्या अधिकाऱ्यांस तुच्छ मानण्याची प्रवृत्ति—यांपासून उत्पन्न होतें.

जर प्रजासत्ताक राज्यामध्यें उत्कृष्ट संस्कृति व श्रेष्ठ कर्तव्यबुद्धि हीं नसतील, तर ती स्थिति मुलांच्या हातांत कोलीत देण्यासारखी किंवा रस्त्यांत वेडे लोक सोडून देण्यासारखीच होय. मानवी स्वभावांत अहंकाराचें वास्तव्य असल्यामुळें, राष्ट्राच्या कल्याणाकरितां खाजगी विचार एकीकडे ठेवणारी आणि सार्वजनिक हिताकरितां स्वार्थत्यागास प्रवृत्त करणारी अशी कर्तव्यबुद्धि श्रेष्ठलोकांमध्येंहि आढळून येणें कठीण आहे. ज्यांच्यामध्यें नैसर्गिक बुद्धिशक्ति, शिक्षण व परिस्थिति यांच्या संयोगानें मुत्सद्यांचेहि गुण असूं शकतील व जे राज्यसूत्रें हातीं घेण्यास पात्र असतील, असे लोक अशिक्षित समाजामध्येंहि सांपडतील; परंतु ज्यांच्या जीविताचें ध्येय केवळ अन्नवस्त्राची ददात भागणें व लो-

भाची पूर्तता होणें एवढेंच असतें, आणि प्राचीन व अर्वाचीन थोर लोकांशीं परिचय नसल्यामुळें जीविताचा उच्च उद्देश ध्यानांत न येतां फक्त शारीरभोगांकडेच ज्यांचें लक्ष असतें—अशा लोकांत वर लिहिलेले स्पृहणीय गुण आढळणें बहुतेक अशक्य आहे.

स्वातंत्र्य याची खरी कल्पना मनुष्याला पूर्णपणें अजून येतच नाहीं. देशबांधवांवर कोणत्याहि गोष्टीबद्दल जो अवलंबून रहातो त्याला तर स्वातंत्र्य म्हणजे काय हें समजतच नाहीं.

( श्लोक )

सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता ।
परो ददातीति कुबुद्धिरेषा ॥
अहं करोमीति वृथाभिमानः ।
स्वकर्म सूत्रग्रथितो हि लोकः ॥ १

या सन्मान्य वचनाप्रमाणें, इतर लोकांचें सुखदुःख जसें कोणाहि मनुष्यावर अवलंबून रहात नाहीं, त्याप्रमाणें त्याचेंहि सुखदुःख दुसऱ्यावर अवलंबून नसतें. एक दुसऱ्याच्या आधीन झाला कीं जगताशीं संबंध आलाच म्हणून समजावा, आणि जगसंबंधी सुख योग्य विनिमयावर अवलंबून रहातें. शाश्वतसुख किंवा दुःख स्वतःपासूनच संभवतें आणि इतरांच्या आधीन रहाण्याची बुद्धि नष्ट झाली कीं खऱ्या स्वातंत्र्याचा उदय झालाच.

साम्राज्यांत व प्रजासत्ताक राज्यांत अत्यंत स्पृहणीय वस्तु म्हटली म्हणजे कर्तृत्ववान् नायक होय. असा नायक मिळाला असतां प्रजासत्ताक राज्याप्रमाणेंच अनियंत्रित साम्राज्य फायदेशीर होऊं शकतें आणि प्रजा-

सत्ताक राज्यास लोकप्रिय व विश्वसनीय पुढारी मिळाला असतां, ती वस्तुतः साम्राज्य-संस्थाच बनून जाते. प्रजासत्ताक राज्याच्या पुढाऱ्यामध्यें प्रजाजनांस आत्मकल्याणाकडे प्रवृत्त करणारे श्रेष्ठ गुण व इच्छास्वातंत्र्य हीं नसतील व तो अभिमानांत आणि महत्त्वाकांक्षेंतच गर्क राहील, तर, अल्पजनसत्ताक राज्यामध्यें इच्छाप्रभुत्वामुळें व लोकांची सहानुभूति नसल्यामुळें जीं संकटें येतात, तींच उपस्थित होतील. लोकांचे खरे पुढारी शिशिरऋतूंतील वाळलेल्या पानांप्रमाणें मुबलक असत नाहींत, ते जर मुबलक असतील तर त्यांच्यामध्यें अशी स्पर्धा वाढेल कीं कोणाला नायक समजावा ह्याचें लोकांना गूढच पडेल. यावरून पहातां, पुढाऱ्यांमध्यें मत्सरबुद्धि वाढूं लागली म्हणजे राष्ट्राचा नाश होतो असें सिद्ध होतें.

एकदां उत्कृष्ट पुढारी मिळाला किंवा निवडला म्हणजे जोंपर्यन्त तो पुढारी आहे तोंपर्यंत तो जसा वागेल तसें त्याच्या नेतृत्वाखालीं वागण्यास लोकांची तयारी पाहिजे. कोणताहि शक्तिसंयोग कार्यक्षम होण्यासाठीं विश्वास व कर्तव्यपरता यांचा आश्रय दोन्ही पक्षांनीं केला पाहिजे आणि अनुयायांस चांगल्या किंवा वाईट परिणामाकडे नेण्यांत पुढाऱ्यास जसा आनंद वाटतो, त्याप्रमाणेंच त्याच्या नेतृत्वाखालीं वागण्यास अनुयायांना आनंद झाला पाहिजे. सर्व मानवी कलहांत जय किंवा पराजय यांशिवाय तिसरा पंथच नाहीं असें समजलें पाहिजे. स्वाधीन होणें ही कल्पना सुद्धां मनुष्याच्या मनांत येतां उपयोगी नाहीं. त्यापासून जित व जेते या दोघांस पीडा होते व निसर्गामध्यें तरी ती कल्पना वसतच

नाहीं. स्वाधीन होण्याचे असे कांहीं प्रकार आहेत कीं त्याचा परिणाम मृत्यूच असतो, परंतु ती प्रक्रिया इतकी लांबलचक असते व दुर्बल पक्षाला इतकी त्रासदायक होते व सबल पक्षाला इतकी नीतिभ्रंशक होते कीं परिणाम लवकर घडेल तर दोघांनाहि फायदेशीर व सुखकारक वाटेल. चांगल्यावाइटामध्यें कलह सुरू झाला, तर क्षमेचें नांवच काढावयास नको, कारण जर यत्किंचित् अनिष्ट निर्मूलन केल्याशिवाय राहील, तर कांहीं कालानें सगळ्या संस्थेचा बिघाड होण्यास चुकणार नाहीं.

एकजातीय देशांत किंवा राष्ट्रांत साम्राज्य किंवा प्रजासत्ताक राज्य यांपैकीं पाहिजे त्यापासून मानवी सुखाचें कार्य घडण्यास अडचण पडत नाहीं. शुद्ध प्रजासत्ताक राज्य सर्वत्र प्रचलित होण्यास अजून मनुष्यमात्राची संस्कृति पूर्ण झालेली नाहीं. ज्या राष्ट्रांत ही पद्धति बहुतकालपर्यन्त चालू आहे, तेथें तिजपासून व्हावा तितका फायदा झाला असें म्हणतां येत नाहीं; कांहीं ठिकाणीं तर एकाच व्यक्तीच्या हातीं अगदीं अनियंत्रित नसले तरी साम्राज्याचे अधिकार ठेवणें अवश्य झालेलें आहे. आधुनिक मानवी प्रगतींत उत्कृष्ट मार्ग म्हटला म्हणजे तिसऱ्याच प्रकाराचा अवलंब करणें इष्ट आहे, तो असा कीं साम्राज्याचें व लोकप्रतिनिधित्वाचें मिश्रण असावें. शुद्ध साम्राज्यामध्यें सुद्धां प्रतिनिधित्वाचा कांहीं प्रकार राष्ट्रास इष्ट आहे, म्हणजे तेणेंकरून लौकिक मत समजण्याचा मार्ग राज्यकर्त्यांस रहातो, सार्वजनिक ध्येय कोणतें, उद्दिष्ट कोणतें हें समजून येतें, आणि प्रजेचे व राज्यकर्त्यांचे हितसंबंध एक-

च आहेत असें लोकांस कळून येतें. दोन्ही पक्षांनीं कपटप्रयोग न केल्यास दोघांमध्यें गैरसमजूत होण्याचें कारण उरत नाहीं, आणि प्रसंगोपात्त हेतूंविषयीं तंटाबखेडा झाल्यास परस्परांनीं तडजोड केली असतां एकी होईल व राष्ट्राचें सामर्थ्य वाढेल.

चैतन्याच्या भौतिक आच्छादनाप्रमाणें, जेव्हां एकादें राष्ट्र प्रबल होऊन आपलें प्रतिष्ठापन करूं शकतें, तेव्हां जीवनसंग्रामामध्यें त्याचें इतर राष्ट्राशीं संघर्षण बहुधा होतें. ( १ ) त्या राष्ट्राच्या अस्तित्वाकरितांच हा कलह वारंवार अवश्य होतो, ( २ ) इतर प्रसंगीं त्या राष्ट्राच्या आवांक्याबाहेरच्या परिस्थितीमुळें त्या कलहांत पडणें भाग होतें, ( ३ ) कधीं कधीं तर त्या राष्ट्राच्या साहसामुळें किंवा दुसऱ्या राष्ट्राच्या कारभारांत विनाकारण घुसडण्याच्या इच्छेनें हा कलह उत्पन्न होतो.—प्रथम पक्षीं जितकीं म्हणून साधनें कह्यांत असतील तितकीं सिद्ध करून व वश म्हणून व्हावयाचें नाहीं अशा निश्चयानेंच झगडा चालविला पाहिजे, कारण दुसऱ्यास वश होणें हा खरोखर मृत्युच होय. दुसरे पक्षीं इतर राष्ट्रानें आपण होऊन कुरापत काढिली असेल, तर अग्रेसरामध्यें फिरून अपकार करण्याचें सामर्थ्य न राहील अशी त्याची खोड मोडली पाहिजे. तिसरे पक्षीं, ( १ ) वस्तुस्थिति आहे तशी राहूं दिली असतां राष्ट्राच्या हितसंबंधांत बिघाड होईल किंवा ( २ ) सुराज्याचे फायदे अन्यबांधवांस भोगावयास लावणें हें त्या राष्ट्रास अवश्य असेल—ह्या दोन अवस्थांमध्यें मात्र संग्राम चालविणें रास्त होईल.

या दोन्ही अवस्थांमध्यें कलह सुरू करण्यांत कांहीं सूक्ष्म धोक्याचीं कलमें आहेत. जर नीति, सत्य व सत्ता एतद्विषयक श्रेष्ठ तत्त्वांचें यथोचित अनुसरण केलें नाहीं, इतरांचें नुकसान करून एकाच वर्गाचा स्वार्थलाभ किंवा फायदा होऊं दिला नाहीं, आणि आपल्या प्रजाजनाप्रमाणें त्या बांधवांसाठीं समान कायदे, शिक्षण व न्याय देण्याचा स्तुत्य हेतु बाळगिला नाहीं, तर दुसऱ्या राष्ट्राच्या कारभारांत अगदीं थोडा वेळच हात घालावा. मनुष्यामनुष्यांतील दळणवळणाप्रमाणेंच, स्पृहणीय वस्तूंची देवघेव परस्परांत घडेल तरच एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रास जिंकणें न्याय्य व फायदेशीर होईल. थोर महात्म्यांची गोष्ट मात्र निराळी, बाकी स्वतःला प्राप्ति न होतां दुसऱ्याचाच फायदा करून देणें असा मनुष्याचा स्वभाव नाहीं. देवघेव न्याय्य झाली किंवा नाहीं याबद्दल मतभेद असूं शकेल आणि मग दोन्ही पक्ष ओढाताण करोत. दोन्ही पक्ष समान स्थितींत असतील, तर होऊन गेलेला सौदा दोघांस फायदेशीर झाला असेंच गृहीत धरलें पाहिजे. परंतु जर एक पक्ष दुसऱ्याच्या मुठींत राहील, आणि तो दुसरा पक्ष आपल्याला लाभदायक असेल तें सर्व मिळविण्याचा प्रयत्न करील व त्याचा मोबदला मात्र कांहीं देणार नाहीं, तर ही देवघेव न्याय्य न होतां केवळ चोरी समजली जाईल, आणि त्यापासून प्रबल पक्षाला कायमचा लाभ होणार नाहीं. ज्या कलहामध्यें एका पक्षाचा बींमोड होऊन विजयी पक्षावर दाब ठेवण्याची ताकद त्याचे अंगीं उरणार नाहीं, अशा कलहापासून फारशी पीडा होणार

नाहीं; परंतु जेव्हां दोन विषमशक्तींचे पक्ष एकत्र रहातात, तेव्हां ते जर एकजीव झाले नाहींत, तर दुर्बलापासून प्रबलावर प्रतिकूल परिणाम झाल्यावांचून रहाणार नाहीं. अशा संसर्गापासून प्रबल पक्षांमध्यें अभिमान उत्पन्न झाला व तेणेंकरून दुसऱ्यावर अवाढव्य कर लादण्याची बुद्धि झाली, तर त्या संसर्गापासून प्रबलास होणारा लाभ फार दिवस टिकत नाहीं; कारण तेणेंकरून प्रबल पक्ष नीतिभ्रष्ट होतो आणि इतरांस वाईट उदाहरण घालून देतो व त्यापासून त्या प्रबलाला जिंकून शिक्षा करण्याची स्फूर्ति इतर राष्ट्रांस होते. अशा रीतीनें मानवी व्यवहारांत अशुभ कायम रहातें आणि जाति, वय, स्त्रीपुरुषभेद, देश, धर्म—असा भेदभाव न बाळगितां मनुष्यमात्रास समतेनें लेखण्याचा, उत्साहाचा व दूरदर्शीपणाचा प्रयत्न मुळींच होत नाहीं—आणि वास्तविक पहातां पापाचा नाश होऊन शाश्वतसुखाची प्राप्ति होण्यास समबुद्धि एवढाच मार्ग उरला आहे.

जोंपर्यन्त सर्व मनुष्यें व राष्ट्रें हीं नैतिक सामर्थ्यांत समान झालीं नाहींत आणि प्रबल राष्ट्रें इतरांस जिंकण्यासाठीं प्रवृत्त असणारच, तोंपर्यन्त युद्धें व जयविजय हीं सतत चालणार. जेव्हां इतर देश जिंकून आपली सरहद्द वाढविण्याचा प्रयत्न होतो, तेव्हां शांतता, सुख आणि जोडलेल्या देशांचा व जिंकलेल्या प्रांतांचा कायमचा लाभ व्हावा असेल, तर तीन उपाय आहेत—( १ ) श्रेष्ठपणा व कनिष्ठपणा ह्या भावना दूर झाल्या पाहिजेत, ( २ ) समान कायदे व संस्था यांच्या योगानें जित व जेते यांच्यामध्यें एकवटपणा झाला पाहिजे,

( ३ ) शांततेच्या काळांत चिंता दूर होऊन संकटाच्या दिवसांत सामर्थ्य प्राप्त होईल अशा रीतीनें दयाळूपणानें राज्यकारभार चालविला पाहिजे.—सांप्रत राज्यकारणाची प्रवृत्ति अशी झाली आहे कीं, विशाल व प्रबल राष्ट्रें बनावीं, त्यांनीं पौरुष पराक्रमानें दुर्बल राज्यें जिंकावीं, मग सामील केलेल्या प्रांतांस स्थानिक स्वराज्याचे व स्वातंत्र्याचे हक्क मिळावे, परंतु राष्ट्रीय प्रश्नांमध्यें मध्यवर्ति राज्यकर्त्यांचा हुकूम मानावा. इतउत्तर एका राष्ट्रास मानव जातीवर अंमल चालवावयाचा असेल, तर राजकीय बंधुत्व व न्यायाचा एक कांटा, हे दोन हक्क जाति, पंथ, स्त्रीपुरुषभेद, रंग, जन्म, शिक्षण—या भेदभावांकडे न पहातां सर्वांस सारखे अर्पण केले पाहिजेत. बौद्ध धर्म, ख्रिस्ती धर्म, महंमदी धर्म यांचा प्रसार होण्याचें मुख्य बीज असें आहे कीं त्यांमध्यें समाजांतील जाति, रंग वगैरे भेद न मानितां सर्व लोकांस उच्च प्रतीचीं तत्त्वें सारखींच लागू केलेलीं आहेत. म्हणून समबुद्धीशिवाय देश काबीज करण्याच्या इतर सर्व प्रकारांमध्यें, कांहीं काल जय संपादन केल्यापासून जरी अभिमान वाटला आणि अशुभाचा प्रसार करण्यांत आनंद झाला, तथापि भीतीची भावना कायम राहील आणि ईश्वराची अवज्ञा केल्यापासून होणारी विपत्ति उत्पन्न होईल. ईश्वर जेव्हां दुष्टांस शासन करण्याचें मनांत आणितो, तेव्हां तो चाबूक मारीत नाहीं किंवा तुरुंगांत घालीत नाहीं, तरी त्यांची बुद्धि भ्रष्ट करूनच शिक्षा करितो.

व्यक्तींमध्यें अतिशय अभिमान उत्पन्न होऊन अहंप-

णाचा अवाढव्य विकास होतो आणि रोजच्या नव्या नव्या लाभानें गर्व होऊन त्यांचें सुख नाहींसें होतें, त्याप्रमाणेंच राष्ट्राची स्थिति होऊन शेवटीं विनाशहि होऊन जातो. तसेंच व्यक्तींप्रमाणें राष्ट्राच्या चालकांमध्यें जर आत्मसंयमनाचा प्रभाव होईल व मूळ स्थापकांनीं सुविचारानें व सहानुभूतीनें जसें राज्य चालविलें तसें जर सतत चालेल, तर कोणत्याहि राष्ट्रास लय पावण्याची भीति नाहीं. एकदां क्षणिक सुखाचा मार्ग सांपडला, म्हणजे अति होईपर्यन्त मनुष्याचें मन तिकडे लागणारच आणि मग आपण शुभाकडे चाललों कीं अशुभाकडे चाललों याचा सुमार रहात नाहीं. कांहीं अंतरावर गेल्यावर आत्मप्रीतीमुळें परत फिरण्याचें धाडस करवत नाहीं, मग त्याच मार्गानें जाण्याचा आग्रह करणारे अनेक लोक भेटतात आणि अशा वेळीं आत्मसंयमन न केल्यास, सृष्टिनियमाप्रमाणें उत्क्रांतीपासून प्रगति व निरंतर सुख न मिळतां, विनाश मात्र ठेवलेला असतो. मृत्यु ज्यांस ताब्यांत घेऊं शकत नाहीं असे सीझर नांवाचे जे बादशहा प्राचीन रोमन राष्ट्रांत होऊन गेले त्यांच्या उदाहरणांवरून, नैतिक साम्राज्य व आधिपत्य हीं कशीं स्थापितां येतात व तीं शाश्वत नसलीं तरी चिरस्थायी कशीं करितां येतात, हें सहज ध्यानांत येतें. सृष्टिनियमांप्रमाणें रोमन राष्ट्राचा भौतिक भाग वृद्ध होऊन इतर शक्तींपेक्षां दुर्बल झाला व नाश पावला, परंतु रोमन संस्कृतीनें, कायदेकानूंनीं व संस्थांनीं ज्या नैतिक साम्राज्याचा अनुभव जित प्रजाजनांस प्राप्त झाला, तें नैतिक सामर्थ्य आधुनिक प्रधान राष्ट्रांमध्यें अजून कायम

आहे, व त्याचा नमुना भविष्यत् राष्ट्रें गिरवितील यांत संशय नाहीं. यावरून असें सिद्ध होतें कीं जर जीविताचें नैतिक व अध्यात्मस्वरूप अजरामर करावयाचें असेल, तर ज्या व्यक्तिशक्तींच्या हातीं मनुष्यमात्रावर अधिकार चालविण्याचीं सूत्रें कांहींकाल असतात त्यांस परमात्मस्वरूपाची ओळख असली पाहिजे, म्हणजे ज्या शाश्वत सर्वव्यापक परमात्म्याचे आपण एक भाग असून त्याच्या संभाव्य सामर्थ्याचें आपण केवळ आविष्करण आहों, असा अनुभव त्या अधिकारी व्यक्तिशक्तींस अवश्य झाला पाहिजे. शिवाय, केवळ नियमित वर्षें टिकणारा व आत्मप्रतिष्ठेपासून उत्पन्न होणारा असा जो अशाश्वत आनंद त्याच्या प्राप्तीसाठीं प्रयत्न करण्याचें सोडून देऊन, अशा व्यक्तिशक्तींनीं स्वबांधवांच्या संस्कृतीसाठीं पराकाष्ठेचें आत्मसंयमन केलें पाहिजे. अशुभाचें उन्मूलन जर सर्वथैव घडलें नाहीं, तर कांहींकाल दाबून ठेविलें असतांहि दबावणाराचें वर्चस्व आज उद्यां तें हटकून उलथून पाडीलच—ह्या सिद्धान्ताचें यथायोग्य विज्ञान झालें तरच तो शहाणपणा व दूरदर्शीपणा समजला जाईल.

अध्यात्म सामर्थ्याच्या निराळ्या प्रकारांचीं आणखी दोन उदाहरणें दृष्टीस पडतातः—एक, इस्त्रायल देशांतील यहुदी लोकांचें व दुसरें, ज्याला परकीय लोक हिंदुस्थान म्हणतात तेथील आर्य लोकांचें. शतकेंच्या शतकें चालू असलेल्या नैसर्गिक कारणांमुळें यहुदी व आंर्य लोकांचें भौतिक वैभव नष्ट होऊन सध्यां त्यांस विपरीत काळ आला आहे. यहुदी लोकांस तर आपली

अशी अभिमानानें म्हणण्यास पृथ्वीवर सुईच्या अग्राइतकी देखील जमीन उरली नाहीं, पण व्यवहार व काटकसर यांमध्यें चतुर असल्यामुळें प्रत्येक देशांतील पूर्वींच्या छळवाद्यांच्या वंशजांस व्याजबट्यामध्यें आपला हात दाखविण्यास त्यांनीं सोडलेलें नाहीं. आर्य लोकांस जरी नांवाचा स्वदेश असला, तरी अनार्य लुटारू टोळ्यांस तो एक विचित्र खेळखाना शतकेंच्या शतकें होऊन बसला होता. आर्यलोक जात्या शूर व सुस्वभावाचे असल्यामुळें परकीयांसहि बंधूप्रमाणें मानितात, आणि आर्यदेश अध्यात्मविद्येचें माहेरघर असल्यामुळें तेथें कोणाचा अनादर होत नाहीं, या कारणामुळें अनार्य लोकांचें लक्ष या देशाकडे फारच वेधून गेलेलें आहे. परंतु या स्थितीचा असा एक असंतोषकारक परिणाम घडून आला आहे कीं या देशाशीं ज्याचा म्हणून संबध येतो तो नष्टवीर्य होऊन जातो कारण या पवित्र देशांत पाय ठेविल्याबरोबर, परकीयांच्या मनःसृष्टीमध्यें चमत्कार दिसूं लागतो. सांप्रतकालीं उदयास येणाऱ्या कांहीं राष्ट्रांप्रमाणें, येथें परकीयांवर बहिष्काराचा लेप होत नाहीं इतकेंच नव्हे, तर अनादिकालापासून आर्यदेशाची अशी सांगणी सर्व लोकांस आहे कीं—शत्रु असो मित्र असो, कोणालाहि या देशांत येण्यास प्रत्यवाय नाहीं, पण त्यानें आपल्या वीर्यास फार जपलें पाहिजे, कारण या देशाच्या दीर्घ व निकट संसर्गानें अविकल रहाण्याचा संभव फार कमी आहे. अशा रीतीनें आर्य व यहुदी लोकांची भौतिक भ्रष्टता होत चालली आहे, तथापि हजारों वर्षें राजकीय उलाढाली सुरू असल्यामुळें परकीय

संपर्कापासून आपल्या प्राचीन, सामाजिक व धार्मिक संस्थांचें रक्षण करण्यांत या लोकांनी जसें अध्यात्म सामर्थ्य प्रगट केलें आहे, तसें मानवी इतिहासांत कोणत्याहि देशांत व काळांत नजरेस येत नाहीं. हजारों परकीय लोक सहस्रावधि वर्षे छळ व जुलूम करीत असतां व सामोपचारानेंहि अनेक प्रयत्न करीत असतां, आर्य लोकांनीं आपल्या श्रेष्ठधर्माबद्दल व सामाजिक घटनांबद्दल जी अद्वितीय चिकाटी दाखविली आहे, ती खरोखर थक्क करणारी आहे. अशा थोर पूर्वजाचें रक्त रतिमात्र जरी अंगांत खेळत आहे व सर्वप्रकारचा भ्रष्टाकार माजत चालला आहे, तरी आधुनिक आर्यलोक शुद्ध रक्ताबरोबर प्राचीन संस्कृतीचें तेज कायम राखण्याकरितां जीवापाड यत्न करीत आहेत, हें खरोखर अत्यन्त भूषणावह आहे.

आधुनिक राष्ट्रांमध्यें, राष्ट्रीयत्वाचा पाया स्थापण्यासाठीं शुद्धरक्ताची किंवा धर्माची कांहींएक जरूर नसल्यामुळें रक्तांच्या मिश्रणानें व धर्मभेदानें अनेक निरनिराळे वर्ग बनत चालले आहेत. तेव्हां आर्यलोकांची प्राचीन वस्तूंची आवड जरी स्तुत्य आहे, तथापि जीवनसंग्रामांत केवळ अध्यात्म सामर्थ्यानें सर्व गोष्टींत यश येण्याचा संभव नाहीं, कारण हें सामर्थ्य कार्यक्षम होण्याकरितां श्रेष्ठ व स्वतंत्र जीवित संपादण्यासाठीं समूह बनविण्याची अक्कलहि अवश्य पाहिजे. अशा अकलेची उदाहरणें आशिया खंडांतच एक प्राचीन वर्ग व इतर ठिकाणीं दुसरे वर्ग घालून दाखवीत आहेत. आधुनिक पद्धतीवर संघ बनविण्याची अक्कल जर आर्यलोकांस

प्राप्त होईल, तर संकटें टाळण्याची व मानवी सुख वाढविण्याची जिवन्त शक्ति त्यांच्यामध्यें निर्माण होईल. या कामीं इतर लोक फार झालें: तर मार्ग दाखवितील, पण याशिवाय दुसरें कांहीं करूं शकणार नाहींत. आत्मसंयमनाशिवाय व योग्य दिशेनें एकाग्रचित्तपूर्वक प्रयत्न केल्याशिवाय कांहींएक सिद्धीस जाणार नाहीं. प्राचीन वर्ग आपलें अध्यात्म सामर्थ्य अजून कायम राखितात यावरून असें सिद्ध होतें कीं शरीर झिजून जाऊन लयास पावलें तरी चैतन्याची शक्ति कायम रहाते.

अल्पजनसत्ताक राज्याविषयीं विचार करितां, उच्चकुलामुळें, संस्कृतीमुळें किंवा अधिकारामुळें प्रसिद्धीस आलेल्या लोकांच्या हातीं राज्यसूत्रें असतील व त्यांचे अंगीं थोर गुण असतील, तर त्या राज्यास उतरती कळा किंवा संकट कधींहि येणार नाहीं. अशा अधिकारी लोकांचें मुख्य कर्तव्य म्हटलें म्हणजे आत्मसंयमन होय व अशा लोकांनीं आपल्या अधिकाराचा उपयोग न्यायास अनुसरून दयाळूपणानेंच केला पाहिजे. त्यांनीं कोणावरहि फुकट मेहेरबानी करूं नये आणि आपलें कर्तव्य बजावतांना ज्यांच्या कल्याणाचीं सूत्रें त्यांचे हातीं पडलेलीं असतात, त्यांखेरीज आपले कोणी सोयरेधायरे आहेत असें मानूं नये. सार्वजनिक कल्याणासाठीं योग्य न्याय करितांना आपल्या प्राणाहूनहि प्रिय अशा मित्रांना दोषी ठरविण्यास त्यांनीं भिऊं नये. एकाद्या नाटकांतील पात्रांप्रमाणें, पडद्यामागें असतांना क्षणिक सुखाचा जरी त्यांनीं अवलंब केला, तरी पडद्याबाहेर आल्यावर त्यांनीं आपापलीं कामें शान्तपणें उत्कृष्ट रीतीनें

बजावलीं पाहिजेत. त्यांनीं आवडनावडीच्या भानगडींत पडतां कामा नये, फक्त न्यायाच्या मार्गानें जर कोणी उद्योग करीत असेल तर मात्र सहानुभूतीनें त्याला मदत करण्यास तयार असावें आणि अपराधी व दुष्ट लोकांचा द्वेष करावा. त्यांच्या कह्यांत जे जे लोक वागत असतील त्यांच्या अन्तःकरणावर असें ठसवावें कीं वाईट शब्द, कृत्य व विचार यांपासून समाजाचें जितकें नुकसान होतें तितकें स्वतःचें देखील होत असतें आणि सार्वजनिक कल्याण करावयाचें असल्यास उतावीळपणा व मनोवेग यांचें नियमन केलें पाहिजे. अधिकारीवर्गानें असें ध्यानांत वागवावें कीं मनुष्यमात्र चुकीस पात्र आहे आणि मनुष्य तसा नसेल तर अधिकारीवर्गाचीच मुळीं गरज नाहीं. राज्यकर्त्याचा मुख्य गुण हाच कीं देशबांधवांत आढळून येणाऱ्या दोषांपासून त्यानें अलिप्त राहिलें पाहिजे. हलक्या प्रतीच्या लोकांवर ज्या मनोवृत्तींचा व पूर्वग्रहांचा अंमल चालतो त्यांवर जर अधिपतीला दाब ठेवितां आला नाहीं, तर ज्यांचे हेतु व उद्देश त्याला मुळींच कळत नाहींत व ज्यांचें शिक्षण व कर्तव्यभावना त्याच्याहून अगदीं भिन्न असतात, अशा असंख्य परकी लोकांवर त्याला नीट अधिकार बजावतां येणार नाहीं. व्यक्ति, राष्ट्र किंवा वर्ग यांपैकीं कोणत्याहि दृष्टीनें विचार केला, तरी भौतिक, नैतिक किंवा बौद्धिक क्षेत्रामध्यें अधिकाऱ्यास यश संपादन करणें असेल, तर ज्या मानानें त्यास स्वतःच्या वृत्तीवर दाब ठेवितां येईल त्यावर तें अवलंबून राहील. सांप्रत काळीं अगदीं पूर्वेकडे एक प्राचीन राष्ट्र उदयास येत चाललें

आहे. ह्या राष्ट्रास चाळीस वर्षांपूर्वी अगदीं अडाणी समजत असत, परंतु थोडक्याच कालांत पृथ्वीवरील अत्यन्त प्रमुख राष्ट्रांपैकीं तें एक असें गणलें जात आहे. तेणेंकरून गतकालीं अतिशय अभ्युदयास आलेल्या दुसऱ्या एका राष्ट्राचें पुनरुज्जीवन होण्याचा संभव दिसत आहे. हें दुसरें राष्ट्र शतकेंच्याशतकें घोर निद्रेस वश झाल्यामुळें पृथ्वीवरील सर्व भागांतील साहसी लोकांस आपलें शौर्य गाजविण्यास उत्कृष्ट समरांगण झालें आहे. नवीनच पुढें सरसावलेल्या राष्ट्रास जें हें ऐश्वर्य प्राप्त झालें आहे, तें कांहीं लढाईत पराक्रम गाजवून मिळालेलें नाहीं. हें राष्ट्र उदयास येण्याचें मुख्य कारण असें आहे कीं, त्यामध्यें संघ बनविण्याचें अपूर्व सामर्थ्य असून आत्मसंयमन करण्यामध्यें इतर प्रबल राष्ट्रांस त्यानें अगदीं मागें टाकिलें आहे, व हा गुण इतर समर्थ राष्ट्रांच्या संपर्कानें जर नाहींसा झाला नाहीं, तर हें राष्ट्र याहूनहि अधिक उदयास चढेल यांत बिलकूल संदेह नाहीं.

मानवी व्यवहारांत अशी वहिवाट पडून गेली आहे कीं उच्च कुलास मान द्यावयाचा आणि राज्याधिकार चालविण्याचे उदात्त गुण उपजत निर्माण होत असतात असें समजावयाचें. हें जर खरें असेल, तर प्राचीन कालापासून ज्याचे पूर्वज राज्याधिकारावर नसतील तो अधिकारी होण्यास पात्रच नाहीं व उत्कृष्ट अधिकाऱ्याचे पुत्र व इतर वंशज सुद्धां तसेच यशस्वी असले पाहिजेत. खरोखर पहाता, बौद्धिक किंवा इतर भौतिक क्षेत्रांतील सामर्थ्याप्रमाणेंच, अधिकार चालविण्याची शक्ति उच्च

कुलांत जन्म झाला म्हणून प्राप्त होत नाहीं. राज्य करण्याचें सामर्थ्य जर वंशपरंपरागत असेल, तर त्याबद्दल शिक्षण देण्याचेंहि कारण मुळींच रहाणार नाहीं, आणि उपजल्यापासून एकाद्याला जरीं कैदेंत ठेवला, तरी तो राज्यकर्त्यांच्या कुलांत जन्मलेला असला म्हणजे उत्कृष्ट राज्यकर्ता होणारच. उच्च कुलांतील जन्मास महत्व देतात त्याचें कारण असें कीं राज्यकर्त्यांच्या प्राविण्याचा योग्य विकास होण्यासाठीं जें शिक्षण व साहचर्य लागतें तें अशा जन्माबरोबर गृहीतच असतें. प्रजासत्ताक राज्यांत, उच्च कुलांतील जन्मामध्यें मोठेपणा मानीत नाहींत आणि राज्याधिकार प्राप्त व्हावे अशी ज्यांची इच्छा असते त्यांना बौद्धिक परीक्षा द्याव्या लागतात, तथापि लोक जेव्हां निवड करितात तेव्हां बुद्धीपेक्षां उच्च कुलांतील जन्म किंवा ऐश्वर्य यासच महत्त्व देतात. परंतु निसर्ग व शिक्षण या दोहोंनीं तयार झाल्याशिवाय, थोर जन्म किंवा परीक्षा एवढ्यानेंच देशबांधवांवर राज्य करण्याचें सामर्थ्य प्राप्त होत नाहीं. राष्ट्राप्रमाणें व्यक्तींमध्यें सुद्धां अनेक शक्तींचा संयोग जेव्हां होतो, तेव्हांच विवक्षित गुणांची उत्पत्ति होत असते. हा संयोग कसा घडून येतो व नष्ट कसा होतो, हें मानवी शक्तीस ठरवितां येत नाहीं. मनुष्याचें काम इतकेंच कीं त्या शक्तींचा उद्भव कसा होतो हें ठरवावयाचें व मानवी सुखास अवश्य असणारा संयोग प्राप्त होण्यासाठीं झटावयाचें, आणि अशा रीतीनें योग्य प्रयत्न केला असतां यशप्राप्ति बहुधा ठरलेलीच असते.

राज्यकर्त्यांचीं कर्तव्यें येणेंप्रमाणें असतातः—( १ )

अन्तर्व्यवस्था राखून बाहेरून संकट न येण्याविषयीं जपणें ( २ ) निष्पक्षपातपणें न्याय देणें ( ३ ) सर्वांस फायदेशीर होतील असे कायदे करणें ( ४ ) आरोग्यकारक भौतिक व नैतिक परिस्थिति संपादन करणें ( ५ ) विद्यावृद्धि करणें ( ६ ) जाति, पंथ, कुल इत्यादि भेदभाव न पहातां प्रजाजनांचा संतोष व सुख होण्याकरितां राज्याची बळकटी राखणें आणि ( ७ ) प्रजेचा असंतोष झाला कीं सर्व राज्यास धोका आला म्हणून समजणें. आतां प्रजाजनांचें मुख्य कर्तव्य हेंच कीं देशांतील कायद्यांप्रमाणें वागून वरिष्ठ अधिकाऱ्यांचा हुकूम मानणें. ज्या राष्ट्रामध्यें राजा व प्रजा कर्तव्यदक्ष असतात आणि त्यांचें एकमेकांवर अकृत्रिम प्रेम असतें, जेथें नियमित अवधीनंतर ते आपापलीं स्थानें बदलूं शकतात, म्हणजे प्रजाजनांपैकीं कांहीं राज्यकर्ते व कांहीं अधिकारी प्रजाजन होतात, जेथें अन्याय किंवा विरुद्ध हितसंबंध राहूं शकत नाहींत, जेथें तक्रार पुढें येण्याचा अवकाश कीं लागलींच तडजोड होऊन जाते—सारांश जेथें दोन्ही पक्षांच्या लोकांत आत्मसंयमन हा गुण प्रबल असतो, तें राष्ट्र फार सुखी व शक्तिमान् असतें.

राष्ट्राचा एकवटपणा, संस्कृति, सत्ता व मोठेपणा—इत्यादिकांचें जें प्रतिरूप तो राजा होय. आपल्या राष्ट्राचें कल्याण व मोठेपणा याशिवाय बाकी सर्व विचार जो एकीकडे ठेवतो अशा राजाची चाकरी करीत असतां गमावलेलें आयुष्य स्वर्गप्राप्ति करून देतें असें प्राचीन ऋषींचें मत आहे. जर राजा स्वतः थोर असेल व त्याला सर्व प्रजेची पूर्ण मदत असेल, तर तें रा-

ष्ट्र लहान असलें तरी आपल्या शत्रूला जिंकून टाकील. देशामध्यें मोठी फौज असली म्हणजे त्याचें मोठें महत्त्व समजतात, परंतु ती कार्यक्षम होण्यास इतर गुण अवश्य आहेत. ते गुण म्हटले म्हणजे कडक शिस्त, वरिष्ठ अधिकाऱ्यांचें आज्ञापालन, एकच हेतु आणि व्यक्तिमात्राचें आत्मसंयमन. ह्या गुणांच्या अस्तित्वामुळें लहानशा सैन्यानें मोठाल्या सैन्याचा पराभव केल्याचीं उदाहरणें जगाच्या इतिहासांत सांपडतात. असें जर न घडेल, तर ज्या राष्ट्राचा विस्तार मोठा व लोकसंख्या अधिक अशा राष्ट्राचा पराजय कधींच होणार नाहीं. व्यक्ति, राष्ट्र, वर्ग—कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी

( श्लोक )

आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥

बंधुरात्माऽऽत्मनस्तस्य येनाऽऽत्मैवात्मना जितः ॥ १

या गीतावचनाप्रमाणें, ज्याचा सखा केवळ आत्मा असतो, जो अन्तःशत्रूंचें निर्दलन करूं शकतो, त्याला बाह्य शत्रु कांहींएक पीडा करणार नाहींत, कारण त्याचे अन्तःशत्रु नियमित केलेले असतात.

प्राचीन रोमन राष्ट्रास जेव्हां उतरती कळा लागली होती तेव्हांच्या कांहीं अंशीं रोमच्या नमुन्यावरच प्रजासत्ताक राज्याचा एक प्रकार आधुनिक राष्ट्रांमध्यें स्थापित केलेला आढळतो. तो प्रकार अजून प्रयोगावस्थेंतच आहे, आणि स्वरक्षणास अवश्य असे गुण जर त्यामध्यें उत्पन्न झाले नाहींत, तर इतर मानवी संस्थांप्रमाणेंच त्याचीहि दशा होऊन जाईल. तो प्रकार असा कीं—प्रत्येक राष्ट्रांत निर्दिष्ट केलेल्या भिन्न गुणांच्या

मानानें प्रजेपैकीं शेंकडा अमुक अशा विवक्षित संख्येला प्रतिनिधि निवडण्याचा हक्क असतो आणि राज्यसूत्रें चालविणाऱ्या लोकांची निवड करण्याचा अधिकार त्या प्रतिनिधींच्या हातीं येतो. व्यक्तिशः पहातां, हा अधिकार खरोखरीचा नसून नुसता भावनामय असतो, कारण पुष्कळांचें बहुमत झाल्याशिवाय त्यांना आपल्या मनाप्रमाणें प्रतिनिधींची निवड करितां येत नाहीं. शिवाय सर्व प्रतिनिधि एकमताचे झाल्यावांचून त्यांच्या हातून कोणतीहि चांगली गोष्ट होऊं शकत नाहीं. एकाद्या राज्याची उलथापालथ करण्यास मात्र अशा प्रतिनिधींची जूट झालेली दिसते, पण सुव्यवस्थित राष्ट्र असल्याशिवाय त्याच्या रक्षणासाठीं त्यांच्यामध्यें एकोपा झालेला क्वचित् आढळतो. हें देखील एक आत्मसंयमनाचें उदाहरण आहे. निवडणारे व प्रतिनिधि यांनीं आपले खाजगी भेद व विचार जर सार्वजनिक कल्याणामध्यें नाहींसे केले, राज्यकर्ते निवडण्यास आपणाला अधिकार आहे ह्या आत्मप्रतिष्ठेच्या अभिमानांत किंवा महत्त्वाकांक्षेंत जर ते बुडून गेले नाहींत, दुसरी निवडणूक होईतोंपर्यन्त प्रस्थापित राज्यास जर त्यांनीं जुटीनें आश्रय दिला, तर त्या राष्ट्राची उत्तम बळकटी झाली असें समजावें, मग सुराज्य घटकव्यक्तींवर अवलंबून असलें तरी हरकत नाहीं.

मुलें जशीं आपल्या खेळण्याशींच खेळत असतात, त्याप्रमाणें राजकीय संस्थांशीं, धर्माशीं व सामाजिक स्थितीशीं मनुष्यमात्र खेळत असतो. नवीन एकादी मनोरंजक वस्तु त्यांच्या पुढें ठेविली कीं त्यांना आनंद

होतो, पण लागलींच तिचा त्यांना कंटाळा येतो आणि ती मनासारखी नाहीं असें त्यांना वाटूं लागतें. हा कांहीं त्या संस्थेचा किंवा खेळण्याच्या वस्तूचा दोष नाहीं, तरि हा मानवी स्वभावच होय. नाना तऱ्हेचे संकल्प-विकल्प करणें ही मनाची तऱ्हाच आहे. मनुष्य नेहमीं संकेत करितो आणि मोडून टाकितो. जोंपर्यन्त तो अंतःकरणाच्या स्वाधीन आहे, तोंपर्यन्त अशीच स्थिति रहाणार. स्वर्गांत ज्या संस्था असतात असा आपला समज आहे, तशा संस्था जर पृथ्वीवर सुरू केल्या आणि देवगंधर्वांना राजे बनविले, तरी सुद्धां मनुष्याला त्याचा कंटाळा येईल. जेव्हां गंधर्वांचा मनुष्याशीं संसर्ग होईल आणि मानवी संस्था निर्माण करण्याचें किंवा नाहींसें करण्याचें पर्याप्त सामर्थ्य आपल्या अंगीं आहे असें मनुष्यें समजतात हें जर त्यांना आढळेल, तर ते गंधर्व सुद्धां मानवी बनतील आणि न्यायाच्या व सत्याच्या तत्त्वांना चिकटून न रहातां, मुलांप्रमाणेंच मानवी संस्थांशीं खेळूं लागतील व इच्छेनुरूप त्यांचा विध्वंस करितील. परंतु जर त्यांनीं गंधर्वस्वरूप कायम राखिलें, आवडनावडीच्या मानवी संसर्गापासून ते अलिप्त राहिले आणि केवळ आपल्याच हक्कांचा विचार न करितां स्वकर्तव्याविषयीं जागृत राहिले, तर सर्व संस्था पूर्वींप्रमाणेंच फायदेशीर होतील. सुसंस्कृत अशा परकीय लोकांची सत्ता किंवा एका वर्गाच्या हातांतील अधिकार सुराज्यास कारणीभूत होईल, परंतु असें होण्यास राज्यकर्त्यांचे खाजगी हितसंबंध असतां उपयोगी नाहीं, नातलगांचा फायदा करितां कामा नये, अशिक्षित व स्वा-

र्थसाधू अशा मित्रमंडळीचा सल्ला घेतां उपयोगी नाहीं; प्रजाजनांस फसविण्याची प्रवृत्ति असूं नये आणि दुर्वर्तनानें आपली अब्रू घालवितां उपयोगी नाहीं.

तथापि मनुष्याचा स्वभाव संवयीनें व कानगोष्टीनें बदलतो आणि न्यायाकरितां नातलगपणाचे हक्कांस बळी देण्याची थोर प्रवृत्ति कुसंगतीनें डळमळण्याचा संभव असतो. असे परिणाम घडूं नयेत म्हणून प्रजासत्ताक राज्याची स्थापना करण्याचा आरंभ झाला. ज्या दयाशील धर्मामुळें विश्वबंधुत्वाचें संकीर्तन झालें, त्याच धर्मावर हा राज्याचा प्रकार स्थापिलेला आहे. आपण सर्व समान आहों, बंधु आहों, हें म्हणणें सोपें आहे, परंतु त्याचे नियम पाळणें स्वार्थसाधू मनुष्याच्या शक्तीबाहेर आहे. प्रजासत्ताक राज्यापासून राष्ट्राला इतकेंच भय आहे कीं, तेणेंकरून फाजील व अविचारी प्रजानायकांस ( Demagogues ) लोकांच्या मनावर आपलें महत्त्व व सामर्थ्य बिंबवून त्यांची मर्जी संपादन करण्याची चटक लागते. अल्पजनसत्ताक राज्यापासून राष्ट्राला भय इतकेंच कीं, विशिष्ट वर्गांना हक्क व पदव्या प्राप्त होतात, हे वर्ग आपणाला अमोघ समजतात व त्यांना टीका केलेली खपत नाहीं, आणि त्यांनीं चालविलेल्या मार्गांत विघ्न आल्यास ते ज्याच्या त्याच्यावर तोंड टाकतात. अल्पजनसत्ताक राज्यांत अविचार झाल्यास क्रान्ति घडून किंवा दुसऱ्या कांहीं अन्यायाच्या व जुलमाच्या उपायांनीं ती स्थिति बदलून टाकितां येते आणि चांगले राज्यकर्ते निवडिले जातात, पण अडाणी, पूर्वग्रहप्रेरित व विकारग्रस्त प्रजासत्ताक राज्यामध्यें को-

णींहि नियन्ता किंवा फेरफार करणारा मिळत नाहीं. यासाठीं साम्राज्यामुळें किंवा अल्पजनसत्ताक राज्यामुळें राष्ट्रास होणारें भय टाळतां येतें, पण प्रजासत्ताक राज्यामध्यें इच्छाप्रभुत्त्व, मनोवेग व उन्मत्तपणा वाढल्यास विनाश ठेवलेलाच असतो. तेव्हां खरें प्रजासत्ताक राज्य किंवा स्वराज्य जर शक्य व सुरक्षित व्हावें असेल, तर सर्वत्र विद्याप्रसार झाला पाहिजे, आत्मा आत्म्याचा बंधु कसा बनतो हें समजून उमजलें पाहिजे, व्यक्तीनें राज्याऐवजीं आपली शेखी मिरवितां कामा नये, प्रत्येक मनुष्य राष्ट्राचा आधारस्तंभ होऊन न्याय व व्यवस्था यांचा रक्षक बनला पाहिजे,—न्यायाधीश, माजिस्ट्रेट व कायदे यांची फारशी गरज नसावी, व राष्ट्रीय संकटाप्रमाणेंच खाजगी, कुटुंबीय व सामाजिक व्यवहारामध्यें एकसारखा एकोपा व विचार हीं असलीं पाहिजेत. स्वातंत्र्य हें ज्ञानाशीं संलग्न असतें, व विद्यासंपन्न लोकांमध्यें रहातें. स्वातंत्र्याच्या हातांतील राजवेत्र विवेकबुद्धि होय आणि कायदा हें शस्त्र होय. ह्या हेतूच्या सिद्धीकडेच मनुष्यमात्राचा उद्योग चालू असतो, पण हा उद्योग कार्यक्षम होण्यास त्याच्या मार्गांत आजपर्यंत आलेल्या अडचणी दूर झाल्या पाहिजेत. सर्वांत मुख्य अडचण हीच आहे कीं, आत्म्याची व्यापकता भ्रमामुळें कळत नाहीं आणि मनोवेगाच्या व उच्छृंखलतेच्या प्रसंगीं भ्रमाला असें विपरीत रूप चढतें कीं, आपलें नाक कापून दुसऱ्याला अपशकून करण्याप्रमाणें, इतराचा सूड घेण्यांत आनंद वाटूं लागतो आ

दुसऱ्याचा नाश करून स्वतःचा फायदा करून घ्यावा अशी बुद्धि उत्पन्न होते.

वरील विचारावरून पहातां, उत्कृष्ट प्रकारची विद्यावृद्धि सर्वत्र नांदेतोंपर्यन्त, साम्राज्य व प्रजासत्ताक राज्य यांचें मिश्रण हेंच सुराज्याचें श्रेष्ठ ध्येय मानिलें पाहिजे. प्रथम राजा सुसंस्कृत व बुद्धिमान् असून देशांतील व्यवस्थेनुरूप कायद्यांप्रमाणें वागणारा असावा आणि लोकांनीं निवडलेला, नीतिनिपुण असा मुत्सद्दीवर्ग त्यांच्या गरजा समजावण्यास व सल्लामसलत देण्यास तयार असावा, म्हणजे श्रेष्ठ सुराज्याचें काम झालें असें मानावें. राष्ट्राच्या हितास अपायकारक अशी गोष्ट पुढें आल्यास, आपला नकार दर्शविण्यापुरती जबाबदारी राजानें ओळखिली पाहिजे. आपआपल्या बुद्धिसामर्थ्याप्रमाणें कोणत्याहि हितकारक बाबीचा पुरस्कार करण्याचा हक्क चालदिण्यास लोकनियुक्त मंडळानें कधींहि मागें घेऊं नये. संकट काय तें एवढेंच कीं, दोन्ही पक्ष अधिकाधिक अधिकार बळकावण्यास प्रवृत्त होतात आणि हें टाळण्यास उपाय एवढाच कीं सर्वांनीं आपलें राष्ट्रीयकर्तव्य ओळखिलें पाहिजे आणि आत्मसंयमनाचा अवलंब केला पाहिजे.

# प्रकरण ६

## विद्यावृद्धि

( श्लोक )

काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ॥
व्यसनेन च मूर्खाणां निद्रया कलहेन वा ॥ १

( आर्या )

काव्याच्या शास्त्राच्या नादें तो काल जाय सुज्ञांचा ॥
व्यसनीं निद्रेमाजीं कलहीं तो जातसेच अज्ञांचा ॥ १

# प्रकरण ६

## विद्यावृद्धि

साम्राज्य, स्वराज्य, अल्पजनसत्ताक अथवा प्रजासत्ताक—यांपैकीं राज्याचा प्रकार कोणताहि असो, जर विद्येचा प्रसार सर्वत्र होईल, तरच मनुष्याचें ध्येय जें परमसुख तें सिद्ध होईल. कांहीं राष्ट्रांत समजतात त्याप्रमाणें शिक्षण म्हणजे नुसतें लिहितां वाचतां येणें नव्हे, किंवा भिकार संवेदनात्मक वाङ्मय वाचणें नव्हे, किंवा परकीयांना ठराविक पत्रें लिहिणेंहि नव्हे. प्रथमतः, थोर महात्म्यांचे प्रसिद्ध विचार व कल्पना वाचून त्याचा मथितार्थ समजणें—हा लाभ शिक्षणापासून झाला पाहिजे. दुसरें, या वाचनाच्या व अर्थज्ञानाच्या पायावर, ज्या निसर्गदत्त शक्तींच्या योगानें आपलीं जीवितसंबंधी कर्तव्यें कोणतीं व शाश्वतसुख प्राप्त करून देणारें ज्ञान कोणतें हें कळूं लागतें, अशा अद्भुत शक्तींचा विकास जेणेंकरून मनुष्यामध्यें होऊं लागतो, तें सुशिक्षण मिळालें पाहिजे. ज्याप्रमाणें शरीरास हवें तसें वळण देतां येतें, तद्वत् चैतन्यास हवें तसें वळविणें हा शिक्षणाचा उद्देश होय. मुलाच्या मुखांतून बोबडे बोल निघूं लागल्यापासून म्हणजे अगदीं बाळपणापासून, मुलाच्या ग्राहकशक्तीप्रमाणें, लहान शब्द, वाक्यें, कविता वगैरे शिकवाव्या व त्यामध्यें उच्च प्रतीचीं नैतिक तत्त्वें अशीं असावीं कीं तेणेंकरून मानवी चैतन्यास हळू हळू उपजत स्फूर्ति होऊन प्रौढ वयांत तीं मुलें

थोर व उदात्त स्वभावाचीं व्हावीं. तसेंच कोणत्याहि प्रकारचा भित्रेपणा व निर्दयपणा—हे दोष मुलांस न जडतील अशी बाळपणापासून खबरदारी घेतली पाहिजे. एकादी चांगली गोष्ट मुलांना सांगितली, पण त्यावेळेस ती करण्याची त्यांची लहर नसली, तर आई-बाप, पालक किंवा शिक्षक धाकानें किंवा जुलुमानें त्यांना वारंवार करावयास लावितात. ह्या प्रवृत्तीपासून मुलाच्या शिक्षणास फार धोका येतो, व भय, द्वेष, क्रोध, प्रतीकार वगैरे दुष्ट मनोवृत्ति मुलांमध्यें उत्पन्न होतात. जर लाडीगोडीनें कोणतीहि गोष्ट करण्यास मुलें तयार न झालीं, तर ती करण्याची लहर त्यांना येईपर्यन्त त्यांच्या कारभारांत हात घालूं नये. तान्हेपणापासून मनुष्याचे शिक्षणास आरंभ होतो, म्हणून त्यावेळेस सुद्धां किंवा त्याच्या मनावर बाह्य वस्तूंचा संस्कार होऊं लागेपर्यन्त, जो कोणी त्यांच्या देखत दुष्टपणाचें किंवा अयोग्य भाषण किंवा कृत्य करितो, तो त्यांचा परम शत्रू समजला पाहिजे. कांहीं समजूतदार लोकांस असें वाटतें कीं पाप म्हणजे काय तें मुलांस शिकवावें म्हणजे त्या ज्ञानानें पाप करण्यास मुलें प्रवृत्त होणार नाहींत, परंतु वस्तुस्थिति पहातां ही गोष्ट खोटी ठरते. शरीराप्रमाणेंच, मनुष्याच्या मनास संसर्गाचा दोष तत्काल बाधूं शकतो. या विषाचीं बाधा होण्यास कांहीं मनुष्यांस अधिक काल लागतो, कांहींस थोडा लागतो, पण बाधा मुळींच होत नाहीं असे फारच थोडे लोक आढळतील; आणि तत्काल प्रतिकार करण्यास जे समर्थ होतात त्यांच्या अन्तःकरणांत हळू हळू विषाचा प्रवेश झाल्यावांचून रहात

नाहीं. या कारणासाठीं, एक विद्वान् मनुष्य असें म्हणतो कीं, कोणत्याहि प्रकारच्या वाईट गोष्टीची ओळख मुलांस होऊं देऊं नये, माणसें मोठीं झाल्यावर त्यांना जगाचें ज्ञान होऊं लागतें आणि अक्कल येते. मनुष्य वयांत येऊन त्याला समजूं लागलें तरी सुद्धां दुष्ट संगतीपासून अलिप्त रहावेल तितकें त्यानें रहाव. दुसरा एक साधु म्हणतो कीं, दुर्गुण हा राक्षस अशा भयंकर स्वरूपाचा आहे कीं त्याला पाहिल्याबरोबर भय वाटलेंच पाहिजे, पण तो नेहमीं दृष्टीं पडूं लागला, तर तो नित्य परिचयांतला होऊन प्रथम आपण त्यास सहन करितो, मग त्याची दया येते आणि शेवटीं त्याला मगरमिठी घालितों.

भयंकर सांथ वगैरे एकादें भौतिक संकट प्राप्त झालें असतां, राष्ट्रामध्यें त्याचें निवारण करण्यासाठीं संसर्गी माणसांस एकीकडे बंदोबस्तांत ठेवण्याची चाल आहे, परंतु नैतिकविषाचे प्रकार दीर्घप्रयत्नानें नाहींसे केले पाहिजेत. हें कर्तव्य अजून पूर्णपणें ध्यानांत येऊं लागलें नाहीं. भौतिक संकटांसंबंधानें, शास्त्रोक्त जे जे विषघ्न असे उपाय योजिले आहेत त्यांपासून विषाचा प्रतिकार व नाश बराच होऊं लागला आहे, व केव्हां केव्हां त्या उपायांचा परिणाम म्हणून निराळींच अरिष्टें उत्पन्न होत आहेत. तथापि असें म्हणणें भाग आहे कीं, अनुसरलेला मार्ग शास्त्रोक्त व रास्त असून जसजसें ज्ञान व अनुभव जास्त होत जातील, तसतसे अधिक श्रेयस्कर व समर्पक उपाय योजिले जातील यांत संशय नाहीं. परंतु नैतिक संकटासंबंधानें पहातां, जरी बरीच सुधा-

रणा झाली आहे, तरी मनुष्याचें मन अजून बाल्याव-स्थेंतच आहे. जन्मापासून वाईट शिक्षण व संगति हीं प्राप्त झालीं असतां, संसर्गाचा परिणाम तत्काल होतो आणि वाईट संवयीनें व प्रकृतिसिद्ध दोषांमुळें मनुष्यास पापाची आवड उत्पन्न होते व लाडक्या कुत्र्याप्रमाणें तो त्याला चिकटून रहातो. वयानें मनुष्य वाढूं लागला आणि त्याच्या वाईट छंदाचें उन्मूलन करण्याचा अन्तर्बाह्य प्रयत्न केला तर त्याच्या स्वातंत्र्याच्या आड येऊन खाजगी कारभारांत हात घातल्याचा दोष माथीं येऊं पहातो. तेव्हां नैतिक विष दूर करण्यासाठीं धर्म व ईश्वरी ज्ञान यांचा उपाय योजण्यांत आलेला आहे. कांहीं थोड्या लोकांच्या मनावर यांचा इष्ट परिणाम घडतोच, परंतु प्रपंचासक्ति व संशय यांचा प्रभाव असा विलक्षण आहे कीं बहुजन समाजाचा धर्माबद्दल अत्यंत पूज्यभाव असला तथापि त्याच्या हातून प्रबल झालेल्या विषसंसर्गाचा प्रतिकार होतच नाहीं.

परिपक्व शिक्षणासाठीं बळकट पायाची रचना करावयाची असेल, तर पापबीजाचें निर्मूलन करणें अति अवश्य आहे, कारण चैतन्याच्या घनीभूत द्रव्यामध्यें जर त्याचा एकदां प्रवेश होऊं दिला तर तें बीज वाढून इमारतीमध्यें छेद होऊं लागतील. राष्ट्रामध्यें दंगेधोपे झाले असतां, परचक्र आलें असतां किंवा द्रव्यसंबंधी हितसंबंधांचें रक्षण करावयाचें असतां, योग्य उपाय योजण्यांत कधींहि हयगय होत नाहीं. ज्यामुळें मानवी दुःख व विपत्ति कायम होतात, अशा नैतिक अरिष्टासंबंधानें विचार करितां, उद्भवलेल्या अरिष्टाचा प्रतिकार होण्या-

साठीं हितकारक व सौम्य उपाय योजिले जातीलच, परंतु अगदीं सोपा व मृदु असा मार्ग म्हटला म्हणजे सांप्रतच्या व पुढील पिढीमध्यें मानवी चैतन्यास पापाचा संपर्कच न होईल अशी तजवीज करणें हा होय, आणि ही जबाबदारी संस्थापित अधिकारीवर्गावरच येऊन पडते असें नसून, प्रत्येक आईबापावर, पालकावर, मित्रावर, शिक्षकावर, किंबहुना घरीं येणाऱ्या पाहुण्यावर सुद्धां येते. जाणपणें किंवा अजाणपणें हें अरिष्ट न वाढण्यासाठीं कांहीं प्रकारचें नियमन शोधून काढिलें पाहिजे. भौतिक अपराध हातून घडला असतां कैद भोगणें व सक्तीनें काम करणें हीं मनुष्याच्या अंगवळणीं पडलीं आहेत. मूल बाळपणापासून वयांत येईपर्यन्त त्याच्या हातून नैतिक अपराध घडूं नयेत म्हणून आईबापांनीं, पालकांनीं व शिक्षकांनीं दीर्घ प्रयत्न करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. जीं मुलें व तरुण माणसें कायमचीं दुर्व्यसनांत असतील त्यांच्यासाठीं शोधनालयें स्थापिलीं पाहिजेत आणि तेथें अपराधाच्या मानानें वाईट संवय मोडण्याकरितां अल्पकालिक किंवा दीर्घकालिक कैदेचीहि तजवीज केली पाहिजे. म्हणून या दिशेने आरंभ करून सौम्यपणानें व निश्चयानें कांम चालविलें पाहिजे, नाहींतर आपल्या बुद्धिसामर्थ्याचा इतका अभिमान असूनहि हें अरिष्ट आपल्या प्रकृतींतून काढून टाकण्यास आपण असमर्थ आहों असें कबूल केलें पाहिजे.

शिक्षणाचे मुख्य उद्देश तीन आहेतः—( १ ) पापाचें ज्ञान न व्हावें म्हणून प्रथमतः अभावरूपी शिक्षण दिलें पाहिजे. निष्कलंक व सुशिक्षित मुलाकडे पाहिलें

असतां असें सिद्ध होतें कीं मानवी प्रकृतींत ईश्वरी अंश असल्यामुळें, कलीचा प्रादुर्भाव होईपर्यन्त, त्याला पापाची ओळख देखील नसते. हें निषेधरूपी शिक्षण सुलभ होण्यासाठीं दुष्टसंगती टाळतां आली पाहिजे व जेणेंकरून मुलें बिघडतील असें कृत्य किंवा भाषण करण्यापासून आईबाप, पालक वगैरे निवृत्त झाले पाहिजेत. बऱ्यावाईटाची निवड करून अनिष्टाचा प्रतिकार करण्यास मुलांचे अंगीं सामर्थ्य येईतोंपर्यन्त हा निषेधरूपी क्रम चालू असेल तरच तो कार्यक्षम होईल. वर लिहिल्याप्रमाणें नेहमींच्या संपर्कानें तरुण लोकांसहि संसर्गाची बाधा होण्याची भीति असते, म्हणून दुष्ट संगती सर्वथैव वर्ज करावी.

दुसरें, लिहिण्यावाचण्यास येऊं लागलें, म्हणजे हळू हळू थोर महात्म्यांच्या ग्रंथांचें परिशीलन करण्याचा अभ्यास वाढवून आपले विचार व कल्पना विषयानुरूप भाषेमध्यें प्रकट करण्यास शिकलें पाहिजे. ज्ञानास मर्यादा नाहीं आणि मानवी चैतन्य निसर्गानें व परिस्थितीनें समर्याद असून कालसंबंधानेंहि परिच्छिन्न आहे, म्हणून एका मनुष्यास आपल्या आयुष्यांत विवक्षित विषयांवर विवक्षित पुस्तकेंच वाचणें शक्य आहे. तसेंच बुद्धीमध्येंहि पुष्कळ अंतर पडतें. अनेक विषयांचा अभ्यास थोड्यांसच साधतो व त्याच विषयांचें उत्कृष्ट परिज्ञान होण्यास अवश्य अशी प्रगल्भ बुद्धि फार थोड्यांस असते. पूर्वकालच्या उदाहरणांवरून असें दिसतें कीं एका चैतन्यास अनेक विषयांमध्यें पारंगत होणें सुखसाध्य नाहीं. यासाठीं मुख्यत्वेंकरून एकाच विषयांत

प्राविण्य संपादण्यासाठीं झटणें इष्ट आहे, तथापि अनेक शास्त्रांच्या मूलतत्त्वांची ओळख होण्याचीं साधनें सर्वांस शक्य व सुलभ होणें अवश्य आहे. जसजशी जगाची प्रगति होत आहे, तसतसे भौतिक शास्त्रांच्या विस्तृत प्रदेशांत नवे नवे शोध होऊं लागले आहेत व पुढेंहि असेच होत जाणार. प्रथम मानवी चैतन्य व आत्मा यांचें उत्कृष्ट ज्ञान संपादन करावें, कारण यांतच जीविताचें रहस्य सांठलें आहे व अनेक वर्षे सतत परिश्रम केले असतांहि हें ज्ञान पुरण्यासारिखें आहे. नंतर आपल्या व जगाच्या उपयोगासाठीं पुढील विषयांचा व्यासंग सवडीनुसार करावाः—( १ ) प्राचीन काळीं प्रसिद्धीस आलेल्या राष्ट्रांतील उत्कृष्ट ग्रंथ ( २ ) अनेक राष्ट्रांच्या उदयास्तसंबंधी इतिहास ( ३ ) धर्मशास्त्र व ललितकला ( ४ ) उद्भिज्जकोटि व प्राणिकोटि यांचे व्यापक नियम ( ५ ) संख्या व गति एतत्प्रतिपादक शास्त्रें ( ६ ) भूपृष्ठ—परिज्ञान ( ७ ) सेंद्रिय व निरिंद्रिय कोटींचे धर्म ( ८ ) सर्वव्यापक संगतीचे नियम ( ९ ) सचेतन व अचेतन वस्तूंचे जीवितव्यापार ( १० ) सृष्टपदार्थांची अन्तर्घटना, रोगांची उत्पत्ति, लक्षणें व कारणें ( ११ ) परमाणुनिष्ठ गुरुत्वाकर्षणाचे नियम ( १२ ) पृथक्करणाचे व संयोगीकरणाचे नियम ( १३ ) समाजशास्त्र व राजकारण. ह्या व अशाच प्रकारच्या अनेक विषयांवर बुद्धिमान् लोकांनीं रचलेले ग्रंथ अवश्य वाचावे. शिवाय अनेक समकालीन पंडितांनीं प्रसिद्ध केलेले दैनिक, पाक्षिक किंवा मासिक वृत्तपत्रांतील लेखांचेंहि अध्ययन केलें पाहिजे. विद्यामंदिरांत प्रवेश करून

तेथें आराधना करण्यास जो सज्ज होतो, तो तेथील विविधभूषणमंडित देवतांचा थाट पाहूनच आश्चर्यचकित होण्याचा संभव असतो, आणि ज्या ज्या देवतेची त्याला कृपा संपादावयाची असते ती इतकी मत्सरग्रस्त असते कीं एकेवेळीं एकाहून अधिक देवतेची भक्ति होणें अशक्य होतें. अशा स्थितींत एकवार एकाच विद्येची आराधना करावी लागून, उपासकांच्या तोंडांतून पुढील उद्गार निघतातः—"मनुष्याच्या एक दिवसांत चोवीस तासां ऐवजीं अठ्ठेचाळीस तास झाले तर किती बरें फायदा होईल? व चरितार्थाची सोय करण्यामध्यें तसेंच निद्रेमध्यें जो अवाढव्य काल फुकट जातो, तो जर न जाईल व मनुष्याच्या आयुष्याचें प्रमाण अनेक पटीनें वाढेल, तर कितीतरी ज्ञान संपादन होईल?" परंतु उगीच निराश होण्यांत व संकटाबद्दल फाजील काळजी करण्यांत मुळींच अर्थ नाहीं. मनुष्याची स्थितिच अशी आहे कीं जें स्वाधीन असेल त्याला उत्तम स्वरूप देऊन जेवढें हातून घडण्यासारिखें असेल तेवढें अवश्य करावें. तसेंच, विद्यापर्वताच्या शिखरावर बसून सर्व देवतांची आराधना करणें शक्य नसेल, तर दीर्घ श्रमानें व उत्साहानें मिळेल तेवढें ज्ञान संपादन करावें आणि पाहिजे तर पुढील जन्मामध्यें आपल्या वासना सफल करून घ्याव्या.

तिसरें, जीवनसंग्रामांतून उत्कृष्ट रीतीनें पार पडण्यास जे जे गुण अवश्य असतील, त्यांचा विकास करावा. प्रथमतः अत्यन्त महत्त्वाच्या गोष्टी म्हटल्या म्हणजे शरीर निरोगी व बळकट राखावें आणि अंगीं

उत्कृष्ट नीतिमत्ता असावी, कारण हे दोन गुण नसतील तर ज्ञानप्राप्ति होणार नाहीं व जीवनकलहांतून पार पडतां येणार नाहीं. नंतर नित्याचा चरितार्थ चालण्यासाठीं व तद्विषयीं कोणतीहि काळजी पडूं नये यासाठीं मनुष्याच्या स्वाभाविक कलाप्रमाणें जें विशिष्ट ज्ञान उपयोगीं असेल तें मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. परंतु जीवनकलहाकरितां शरीर व बुद्धि हीं सुदृढ होईतोंपर्यन्त विशिष्ट ज्ञानप्राप्तीचें काम लांबणीवर पडलें तरी हरकत नाहीं. व्यवहारांत आपण असें पहातों कीं शरीर व बुद्धि यांची पूर्ण वाढ होण्याच्या अगोदरच मुलांना शाळेंतून काढितात, तेथें असतांहि त्यांना अपूर्ण शिक्षण मिळतें आणि त्यांना द्रव्य मिळविण्याच्या एकाद्या उद्योगांत घालितात. ह्या प्रवृत्तीस आळा घालण्याची जर कांहीं तजवीज झाली नाहीं, तर मनुष्याला सुख होण्याची व मानवी प्रगति होण्याची आशाच सोडून दिली पाहिजे.

योग्य दिशेनें थोडासा प्रयत्न केल्यास ही प्रवृत्ति बंद होईल. ( १ ) प्रथमतः योग्य व पुष्टिकारक शिक्षण दिलें पाहिजे, ( २ ) बाळपणीं विवाह करण्याची चाल मोडली पाहिजे, ( ३ ) कामविकारास उत्तेजन न देतां आत्मसंयमन शिकविलें पाहिजे, ( ४ ) आईबापांस, मुलांस व राष्ट्रासहि उपयोगीं पडेल असें योग्य शिक्षण पुरें होण्यासाठीं विवक्षित वयापर्यन्त मुलांना शाळेंत ठेविलें पाहिजे असा निर्बंध असावा. राष्ट्राच्या कल्याणासाठीं श्रीमंतांच्या व सुखवस्तु लोकांच्या मुलांप्रमाणें गरीब लोकांच्या मुलांसाठीं उत्कृष्ट व पहिल्या प्रतीचें

शिक्षण देण्याची तजवीज अवश्य झाली पाहिजे. उच्च विद्यापीठांप्रमाणें, सर्व प्रकारच्या विद्यांचा अभ्यास होण्यासाठीं विद्यालयें स्थापून तेथें गरीब लोकांच्या मुलांनीं पूर्ण शिक्षण होईतोंपर्यन्त राहिलें पाहिजे असा निर्बंध असावा. प्राचीन कालीं आर्य लोकांमध्यें गुरुगृहीं दोन तपेंपर्यन्त रहावें अशी सक्ति असे आणि विद्यार्थिदशा संपल्यानंतर गृहस्थाश्रम स्वीकारण्यास परवानगी मिळे. गृहस्थाश्रमामध्यें असतां प्रपंचांतील साधनें संपादण्याकरितां पुष्कळ वेळ घालवावा लागतो, तथापि देखील मनुष्याच्या स्वभावानुरूप व परिस्थितीप्रमाणें विद्यार्जनाचें काम चालू ठेवणें भाग आहे. संसाराकरितां द्रव्यार्जन करण्यासाठीं इतका काल घालवावा लागतो व इतक्या शक्ति खर्च होतात कीं सत्यान्वेषणासाठीं व बुद्धिविकासाकरितां मुळींच वेळ किंवा उत्साह रहात नाहीं—अशी सबब सांगण्यांत कांहीं हंशील नाहीं. प्रपंचाकरितां श्रम करून व संपत्ति मिळवूनहि झोंपेमध्यें, जेवण्याखाण्यांत, किरकोळ गोष्टींत, आळसांत, दुखण्याबहाण्यांत किती वेळ फुकट जातो याचा अंदाज केला असतां, केवळ विद्यार्जनाकरितां संधि सांपडत नाहीं हें म्हणणें मूर्खपणाचें दिसतें. वर सांगितलेल्या गोष्टींपेक्षां बुद्धीचा विकास कमी महत्त्वाचा आहे काय, व त्याची हेळसांड केल्यास हरकत आहे किंवा नाहीं आणि तसें करण्याला पुरेसा वेळ मिळेल किंवा नाहीं—हें ठरविणें प्रत्येक मनुष्याच्या नैतिक कल्पनांवर अवलंबून आहे. मनुष्याची वर्तणूक स्वार्थावर अवलंबून असते, तेव्हां असें आढळून येईल कीं आध्यात्मिक विषयांमध्यें घालविलेला

काळ द्रव्यार्जनांत गेलेल्या काळापेक्षां एकंदरींत अधिक श्रेयस्कर होतो. मोठमोठ्या सुधारणांप्रमाणेंच, ह्या बाबीमध्यें संवयी व पूर्वग्रह यांशीं झगडणें भाग आहे. सामान्य जनसमूहास आपलें हित कळत नाहीं म्हणून ते विरुद्ध होतात इतकेंच नव्हे—तर अधिकार व विद्या यांचा उपभोग ज्यांना स्वतंत्रपणें घेतां येतो व आपली सत्ता नष्ट होईल म्हणून इतरांस जे अज्ञानदशेंत ठेवूं पहातात, असे वर्ग सुद्धां नवीन सुधारणेला विरोध करितात. परंतु असें लक्षांत ठेवावें कीं कांहीं वर्गास विशिष्टाधिकार देण्यांत राष्ट्राचें सामर्थ्य रहात नाहीं, तरि सर्व प्रजाजनांस सर्व बाबतींत सारखी संधि देऊन त्यांचें ऐक्य व समाधान राखण्यांतच राष्ट्राची बळकटी असते. जुन्या संवयी बदलल्या असतां व कायदेशीर किंवा बेकायदेशीर रीतीनें एकाद्याला मिळालेली वस्तु हिरावून घेतली असतां तक्रार करणें हा मनुष्याचा स्वभावच आहे. अनेक देशांच्या इतिहासावरून असें सिद्ध होतें कीं विद्या व तद्विषयक अधिकार एकाच वर्गाच्या स्वाधीन ठेविले असतां त्या वर्गाची अपकृष्ट दशा होत जाते आणि अशा राष्ट्राचा नाश हटकून होतो.

राष्ट्रामध्यें सक्तीचें शिक्षण चालू ठेवावें किंवा नाहीं या प्रश्नाचा विचार करितां, दोन अडचणी पुढें आणतां येतात. ( १ ) एक अशी कीं तेणेंकरून मनुष्याच्या स्वातंत्र्यांत हात घातल्यासारिखें होतें व ( २ ) दुसरी अशी कीं राष्ट्रावर खर्चाचा बोजा विनाकारण लादला जातो. पहिल्या अडचणीसंबंधानें असें म्हणतां येईल कीं ज्या प्रजाजनांचे हिताहितसंबंध राखण्याकरितां व

सुधारण्याकरितां राष्ट्र बनलेलें असतें, त्यांहून तें भिन्न मानितां येत नाहीं, तसेंच जेव्हां जीविताच्या कोणत्याहि बाबींत लोकांना तजवीज करितां येत नाहीं, तेव्हां राष्ट्रास व्यवस्था ठेवणें भाग आहे आणि तत्कालीन समजुतीप्रमाणें एकादी गोष्ट राष्ट्राच्या आंवाक्या बाहेर असेल किंवा ती राष्ट्राची बाबच मानिली जात नसेल, तेव्हां सुद्धां ज्या गोष्टीमुळें राष्ट्रास बळकटी येईल किंवा मानवी सुखाची वृद्धि होईल, अशा गोष्टींत हात घालण्याचा राष्ट्रास पूर्ण अधिकार आहे. दुसऱ्या खर्चाच्या अडचणींत कांहीं अर्थ नाहीं, कारण एकाद्या मनोवेगाच्या किंवा पूर्वग्रहाच्या जोरावर जेव्हां एकादें काम लोक अंगावर घेतात, तेव्हां खर्चाच्या विचारानें कांहीं अडथळा होत नाहीं. परंतु, एकाद्या कायमच्या राष्ट्रहिताची बाजू पुढें आली, म्हणजे नूतन पद्धतीविरुद्ध अन्तःकरणांत मुरून गेलेल्या अज्ञानमूलक वृत्ति एकदम उसळतात आणि कर्तव्यबुद्धीविषयीं ज्यांच्या कल्पना प्रगल्भ असतात असे विद्वान् व समजूतदार पुढारी देखील त्याच वळणावर जातात. अशी स्थिति व्यक्तिमात्राच्या चरित्रांतहि घडून येते आणि त्यावरून असें सिद्ध होतें कीं, जड द्रव्यापेक्षां चैतन्याचेंच प्राबल्य जीवितावर अधिक घडून येतें. असें पहा कीं अज्ञात किंवा अनायत्त असें द्रव्यसंबंधी किंवा दुसऱ्या प्रकारचें भयंकर अरिष्ट मनुष्यावर गुदरलें असतां तो तें निमूटपणें सहन करितो, परंतु त्याच्या नुकसानीचा दशांश फायदा एकाद्या देशबांधवाला झाला किंवा तें नुकसान जाणून बुजून अथवा जुलमानें झालें असलें, तर तें त्याला

असह्य होऊन फार जड जातें. यावरून जीवित किती क्षणभंगुर आहे हें सिद्ध होतें आणि मनुष्य जरी अशाश्वत वस्तूंचें रक्षण करीत असला, तरी जेथें यश मिळणें संशयित आहे असें कार्य करण्यास तो सहसा धजत नाहीं.

असेंहि वारंवार पहाण्यांत येतें कीं एकाद्या कामधंद्यांत, व्यापारांत, उद्योगांत किंवा विद्येंत ज्यांना यशप्राप्ति होते ते बहुधा साहसी असतात आणि उतावीळपणास किंवा क्षणिक आवेगास वश होणारे नसून आरंभापासून शेवटपर्यन्त शान्तीनें, थंडपणानें व धैर्यानें वागणारेच असतात. म्हणून राष्ट्रीय शिक्षणाच्या बाबतींत नुसता खर्च अधिक होतो ही सबब सांगण्यांत हंशील नाहीं. कुल, शील, संपत्ति—इकडे लक्ष न देतां, प्रत्येक कुटुंबास व समाजांतील अवयवास उत्कृष्ट शिक्षणाचा फायदा मिळण्यासाठीं इतर दिशेनें खर्चांत कांटकसर करणें सुलभ आहे, तेणेंकरून मानसिक उन्नति होऊन जीविताच्या कार्यास अतिशय साहाय्य होईल. सुसंस्कृत जीवितापासून व्यक्तिमात्रास होणार फायदे वगळले, तथापि राष्ट्रीय शिक्षणापासून खुद्द राष्ट्रासच अपरिमित लाभ होऊं शकतात. राष्ट्रांतील बहुतेक लोकांस उत्कृष्ट शिक्षण मिळालें असतां त्यांची कर्तव्यबुद्धि जागृत रहाते आणि त्या राष्ट्रावर परचक्र येऊन शत्रूच्या दास्यांत पडण्याची मुळींच भीति नसते. अशा संपन्न राष्ट्रावर स्वारी करून आत्मघात करून घेणारे शत्रु विरळाच आढळतील.

पूर्वीं सांगितलें आहे कीं ज्ञानप्रसार करितांना, कुल-

शीलाकडे, द्रव्याकडे किंवा दुसऱ्या कोणत्याहि गोष्टी-कडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. उत्पत्ति, स्थिति, लय, उद्देश व क्षणिक आवेग, मनोवृत्ति व पूर्वग्रह, सुख व दुःख, बरीं-वाईट फळें—वगैरे घटकावयव प्राणिमात्रास समान असतात. क्षणभंगुर परिस्थिति व अशाश्वत कारणें भिन्न असूं शकतील, तथापि विद्यासंपन्न जीवितापासून देशबांधवांस गोड फळें चाखण्यास मिळतात आणि तीं फळें टिकणारीं असतात. म्हणून जो जो उत्तम पदार्थ मनुष्यास हवासा वाटतो, त्याचे भागीदार प्रथम देशबांधवांस करून नंतर जगतीतलावर त्याचा प्रसार अवश्य करावा.

# प्रकरण ७

## राष्ट्रीय शिक्षण

( श्लोक )

वरमेको गुणी पुत्रो नच मूर्ख शतान्यपि ॥
एकश्चंद्रस्तमो हन्ति नच तारागणैरपि ॥१

( आर्या )

एक गुणी पुत्र बरा देई संतोष मूर्खशतही न ॥
नाशी चंद्र तमातें तारागण तो न करि रुचिहीन ॥१

# प्रकरण ७

## राष्ट्रीय शिक्षण

अनेक व्यक्तींचेंच राष्ट्र बनतें, म्हणून ज्या सद्गुणांपासून व्यक्तीचें कल्याण होतें, त्यांपासूनच राष्ट्राचें हित होतें, व ज्या दुर्गुणांपासून व्यक्तीचा नाश होतो त्यांपासूनच राष्ट्राला अपाय घडतो. म्हणून आपल्याच भरभराटीसाठीं राष्ट्रानें प्रजाजनामध्यें श्रेष्ठ गुणांचा प्रसार करावा आणि ज्या दुर्गुणांमुळें मनुष्य आपल्या योग्यतेपासून च्युत होऊन पशूंच्या स्थितीस पोहोंचतो त्यांचा नायनाट केला पाहिजे. कमी प्रतीच्या लोकांशीं अभिजात व्यक्तीच्या वागणुकीप्रमाणें, संस्कृतीमध्यें आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या राष्ट्रांशीं संसर्ग झाला असतां, उच्च राष्ट्रास त्यांना तुच्छ मानण्याचा मोह पडेलच. साधुवृत्तीनें राष्ट्र योग्यतेस चढतें असें जरी प्रतिज्ञापूर्वक म्हटलें, तरी त्या धर्माप्रमाणें वागणूक राहणें कठीण आहे. तथापि ज्या अर्थीं मनुष्याची वर्तणूक स्वार्थलाभावर अवलंबून रहाते, त्या अर्थीं हलक्या व्यक्तीशीं थोर व्यक्तीच्या वागणुकीप्रमाणें, हलक्या राष्ट्राशीं थोर राष्ट्रानें आचाराच्या उदात्त तत्त्वांस अनुसरूनच वर्तणूक राखिली पाहिजे; नाहींतर वाईट गुणाच्या संसर्गानें उत्तम नीतितत्त्वांचाहि लय होण्याची भीति असते. याकरितां बलाढ्य राष्ट्राचा दुर्बल राष्ट्राशीं संपर्क झाला असतां, दुर्बल राष्ट्राचा नाश न होण्यास उपाय हाच कीं दोन्ही राष्ट्रांचा एकजीव झाला पाहिजे. संपर्कानें होणारा अपाय टाळण्यास दुसरा मार्ग नाहीं.

व्यक्तिशिक्षण व राष्ट्रीय शिक्षण यांमध्यें महत्त्वाचा भेद असून राष्ट्रीय शिक्षणावर फार मोठी जबाबदारी पडते. प्रथमतः, व्यक्तिशिक्षणाचा एकट्या स्वतःशींच संबंध पोहोंचतो आणि जगांतील त्या व्यक्तीच्या योग्यतेच्या मानानें व स्नेहीसंबंध्यांवरील त्याच्या वजनाच्या मानानें तें शिक्षण महत्त्वास चढतें. तो मनुष्य मृत्यु पावला किंवा नष्ट झाला असतां, त्याच्या दुर्गुणांचा, दोषांचा, अभिमानाचा, तिरसटपणाचा लोप होऊन जातो आणि देशबांधवांवर परिणाम घडण्याचें बंद होतें. परंतु राष्ट्राचें जीवित शाश्वत असतें. व्यक्तीविषयीं पहातां, मरण्यापूर्वीं त्याच्या दुष्कृत्यांबद्दल नशिबानें शिक्षा होणार नाहीं, परंतु राष्ट्राविषयीं विचार करितां, तें अमर असतें आणि केव्हां ना केव्हां तरी स्वार्थसाधूपणाच्या किंवा दुष्टपणाच्या कृत्यांबद्दल प्रायश्चित्त मिळालेंच पाहिजे. म्हणून जगाच्या दृष्टीनें, उत्कृष्ट शिक्षण संपादन करणें व जीवनकलहामध्यें सुखानें पार पडण्याचीं साधनें मिळविणें हीं व्यक्तीपेक्षां राष्ट्रासच अधिक आवश्यक आहेत. धातूंचीं बनविलेलीं शस्त्रास्त्रें व चिलखतें—हीं जर शत्रूच्यापेक्षां श्रेष्ठ असतील, तर कांहीं काल विजय होईल; पण तीं गंजून जातील व योग्य उपकरणांशिवाय निरुपयोगी होतील. परंतु परिपक्व शिक्षणामुळें जी नैतिक सामग्री लब्ध होते, ती कधीं गंजून जात नाहीं व राष्ट्र बळकट, मान्य व श्रेष्ठ होण्यास दुसऱ्या साधनांची फारशी गरज नाहीं.

व्यक्तिमात्रास प्रसंगीं हुशार होण्यास अभ्यासाची अपेक्षा आहे. राष्ट्रांतील सर्व लोक सुशिक्षित होईतोंप-

र्यन्त, त्याचें दैव थोड्या व्यक्तींच्या हातांत रहातें आणि वेळोवेळीं होणाऱ्या राज्यकर्त्यांच्या बुद्धिसामर्थ्याप्रमाणें त्या राष्ट्राचा उदय किंवा अस्त होईल; परंतु एकाद्या मोठ्या प्रवाहाप्रमाणें, निरनिराळ्या प्रदेशांस सुपीक करीत करीत, त्या राष्ट्रास आपला मार्ग संथपणें चालविला पाहिजे. व्यक्तिमात्राची जगांतील योग्यता कांहींहि असो, आपण क्षुद्र आहों व मृत्यु कधीं तरी ठेवलेलाच आहे अशी जाणीव रहाणें त्याच्या फायद्याचें आहे, कारण तेणेंकरून लाभाची आशा न धरितां आपल्या मागें आपलीं सत्कृत्यें रहावीं अशी बुद्धि त्यामध्यें उत्पन्न होईल. परंतु राष्ट्राचा मोठेपणा व उपयुक्तता हीं त्याच्या अमरत्वाच्या जाणिवेवर अवलंबून रहातात, तसेंच त्याचें सामर्थ्य किंवा नाश त्याच्या नैतिक गुणांवर आणि कल्याणकारित्वावर अवलंबून असतात. जीविताचा बराच काल लोटेपर्यन्त व्यक्तिमात्राचें शिक्षण त्याच्या सहचरांच्या आधीन असतें आणि उत्कृष्ट व श्रेष्ठ गुरूंच्या हाताखालीं विद्या शिकावी असें जरी त्याच्या मनांत असलें, तरी तें त्याला साध्य होत नाहीं. शहाणपणाचा मार्ग कोणता व रसातळाकडे नेणारा कोणता—हें दाखविणारे अनेक प्रकारचे गुरु व नायक राष्ट्रामध्यें मुबलक असतात. यांपैकीं राष्ट्रानें कोणताहि मार्ग पत्करला, तरी दोष लावावयास किंवा स्तुति करण्यास, सुख भोगण्यास किंवा दुःख सोसण्यास दुसरा कोणी तयार नसतो. दुर्दैवानें व्यक्तीवर संकटें येतात व कधीं कधीं मृत्युहि येतो, परंतु राष्ट्रावर जेव्हां संकटें येतात, तेव्हां आपला आळस व दुर्गुण टाकून दे-

ण्यास तें समर्थ होतें व आपलें नित्यत्व स्थापित करितें.

यावरून पहातां व्यक्तिमात्रापेक्षां, राष्ट्रामध्येंच त्याचें कल्याणकारित्व राखण्यासाठीं पौरुष, उद्योग, धैर्य वगैरे श्रेष्ठ गुण अवश्य आहेत. मनुष्याचे नैतिक गुण व सदाचाराचें उदाहरण हीं त्याच्या मागें शिलक रहातात आणि देशबांधवांस सन्मार्ग दाखवितात, पण त्याचें जड शरीर निसर्गनियमास वश होऊन त्याचा मागमूसहि रहात नाहीं. राष्ट्रानेंच जर आपला घात करून घेतला तर गोष्ट निराळी, बाकी राष्ट्र अमर असतें आणि शरीरानें व नैतिक स्वरूपानें आपलें जीवित वैभवशाली करूं शकतें. वाङ्मय हें राष्ट्राचें जीवित होय आणि शिक्षण हेंच त्याचें सामर्थ्य व वीर्य होय. जेणेंकरून राष्ट्राचें महत्त्व द्रव्यमय संपत्तीमध्यें किंवा परदेश जिंकण्यामध्यें न होतां, निरंतर नैतिक सामर्थ्याच्या स्थापनेमध्येंच घडतें, तोच मुत्सद्दीपणा श्रेष्ठ, तेंच शहाणपण स्तुत्य, व तीच राजनीति थोर होय यांत संशय नाहीं.

राष्ट्रीय शिक्षणाच्या खालोखाल, पण त्याशीं सलग्न असलेला दुसरा विषय सुधारणांचा होय. परिस्थितींत जसजसा फरक होईल, तसतशी जीविताच्या सर्व शाखांमध्यें सुधारणा होणें अवश्य आहे. आलस्याची प्रवृत्ति जर तशीच कायम ठेविली आणि नव्या स्थितीला जुळेल अशी सुधारणा करण्यास प्रतिबंध झाला, तर जीविताच्या शर्यतींत लोक मागें रहातील आणि इतर राष्ट्रांतील लोक जास्त हिम्मतवान् व कल्पक असल्यामुळें पुढें जातील. मनुष्याच्या प्राचीन इतिहासावरून

असें दिसतें कीं कांहीं वर्षे प्रतिष्ठा व विजय संपादन केल्यावर, चैतन्यास विशिष्ट स्थिति प्राप्त होऊन तें झोंपीं जातें, आणि निराळ्या क्षेत्रांतील चैतन्य जागें होऊन झोंपीं गेलेल्या राष्ट्राची उद्योगशीलता चालू ठेवितें. पुष्कळ व्यवसाय केल्यावर जी स्वाभाविक विश्रान्ति हवी असते, तीहून निराळ्याच कारणांनीं ही गोष्ट घडून येते. त्यांपैकीं मुख्य कारण दोन स्वरूपांनीं नजरेस पडतें. उच्च प्रतीचें शिक्षण व राजसत्ता हीं बहुधा लहानशा वर्गासच साध्य होतात, मग कांहीं काळ गेल्यानंतर त्या वर्गाला आपल्या पराक्रमाचा अभिमान चढतो, नव्या रक्ताचें व कल्पनांचें मिश्रण आवडत नाहीं, तें राष्ट्र आपलीच खाजगी मालमत्ता आहे असें वाटूं लागतें, आणि आपल्या सत्तेला कोणी प्रतिबंध करीत नाहीं असें आढळून आल्याबरोबर तो वर्ग झोंपीं जातो. तसेंच, जनसमुदायास खाऊनपिऊन सुखांत दिवस काढावे यापलीकडे कांहीं महत्त्वाकांक्षा उरत नाहीं आणि सुधारणा करण्यांत पुढाकार घेण्यास पुरतें शिक्षण नसल्यामुळें, थोड्या अधिकारीवर्गाकडेच सर्व गोष्टींचा भार सोंपविला जातो. म्हणून जसजसा शिक्षणाचा प्रसार होईल, अधिकारीवर्गाची सत्ता हळू हळू कमी होईल, राष्ट्राच्या कल्याणांत व सार्वजनिक कामांत पुष्कळ नागरिक जसजसा हात घालूं लागतील, तसतसे एका विशिष्ट वर्गाच्या हातांत पूर्ण सत्ता ठेविल्याचे दुष्परिणाम, म्हणजे आलस्य व नाश हीं टाळतां येतील. अशी स्थिति होण्यास कांहीं गोष्टी अवश्य आहेत. नवीन अधिकाऱ्यांनीं अल्पकालिक सत्ताधाऱ्यांचे दोष अंगीं जडूं

देतां कामा नये, देशबांधवांचा सोक्षमोक्ष हातीं आल्यामुळें आपण श्रेष्ठलोक झालों अशी प्रतिष्ठा मिरवूं नये, व आपण हक्कदार व सनदी वर्गाचे लोक व्हावें एवढीच महत्त्वाकांक्षा बाळगूं नये. आजपर्यन्त ज्या सुधारणा घडलेल्या आहेत त्यांचे परिणाम फारसे उत्तेजक झालेले नाहींत. दास्यस्थितींतील लोक स्वतंत्र झाले म्हणजे त्यांना आपल्या मोठेपणाचें फाजील महत्त्व वाटूं लागतें, आणि पाळीनें तेच पूर्वस्थितिरक्षक बनून लोकांमध्यें किंवा राष्ट्रकल्याणाच्या प्रमुख शाखांमध्यें सुधारणा करण्यास मागें घेतात, कारण देशभक्तीच्या गप्पा झोंकून हुशारी दाखवावयाची व हातून कांहीं घडावयाचें नाहीं—ही तर वहिवाटच पडून गेली आहे.

असें पहाण्यांत येतें कीं योग्य शिक्षण न मिळाल्यास केवळ लोकांच्या मताधिक्याच्या जोरावर अवलंबून राहून राजकीय व सामाजिक सुधारणा अमलांत आणतां येत नाहींत. आजपर्यन्त ज्या सुधारणा घडून आल्या आहेत, त्या कांहीं थोड्या कर्तृत्ववान् पुढाऱ्यांच्या अव्याहत श्रमाचें व इच्छाशक्तीचेंच फल होत. राष्ट्राचें चिरंतन कल्याण कशांत आहे हें जाणून पूर्वस्थितिरक्षक व दक्ष अशा लोकांचें मताधिक्य संपादन करण्यास हे पुढारी एकदिलानें समर्थ होतात. नवीन सुधारणांस सर्वच विरुद्ध होतात. अधिकारीवर्गास वाटत असतें कीं सुधारणांमुळें आपले उपभोग बंद पडतील व इतर लोकांस वाटतें कीं नवीन आपत्तींत पडण्यापेक्षां असेल तें भोगणेंच बरें. ही कल्पना म्हणजे एकप्रकारचा संशय असून भित्रेपणाहि आहे, कारण नवीन गोष्टी उपयोगी

आहेत हें ठरण्याच्या अगोदर आपल्या जीविताशीं त्यांचा मिलाफ करणें बरें नव्हे या समजुतीवर ती रचिलेली दिसते. या मताप्रमाणें वागावयाचें म्हटल्यास मनुष्य उपजतांना व मरतांना जसा एकटा व असहाय असतो तसेंच त्यानें सर्वकाल राहिलें पाहिजे आणि राष्ट्रामध्यें कालानुरूप कांहींच नवीन सुधारणा करितां येणार नाहींत. नेहमींच्या कल्पना बदलण्याच्या भीतीनेंच मागसलेले वर्ग मागेंच रहातात आणि जीवनसंग्रामांत प्रधानवर्गहि मागें पडतात.

तेव्हां राष्ट्रास जर भरभराटीस येणें असेल व प्रमुख स्थितींत राहून मनुष्यमात्राचें कल्याण संपादावयाचें असेल, तर उच्च प्रतीचें व सर्वसाधारण शिक्षण अखिल नागरिकांस अविच्छिन्न प्राप्त होईल अशी तजवीज झाली पाहिजे. दुसरें, उत्कृष्ट आरोग्य, सुखकारक गृहरचना, श्रम करण्याच्या तासांचें प्रमाण, अन्न व जीवनाच्या गरजा लोकांस स्वस्त मिळण्यासाठीं अप्रतिबद्ध व्यापाराची सोय, सर्व प्रकारच्या अनीतीचा संकोच, मादक पदार्थांवर दाब—वगैरे प्रश्नांचा उत्कृष्ट निकाल लागला पाहिजे. पूर्वग्रह व लोकप्रियता इकडे लक्ष न देतां एकदिलानें व निश्चयानें ह्या सुधारणा अमलांत आणण्याचा प्रयत्न जर झाला नाहीं, तर इतरांप्रमाणेंच, राष्ट्रांत पोकळ अभिमान, निरुद्योग, स्तिमितता उत्पन्न होऊन, शेवटीं विनाश होईल.

व्यक्तीचें आयुष्य थोडेंच असतें आणि त्याच्या हातून पापकर्म, विचार अथवा भाषण घडलें असतां, अनुकूल परिस्थितीमुळें कदाचित् त्याला या जन्मीं शिक्षा

होणार नाहीं. परंतु राष्ट्राची स्थिति निराळी असते. बाळपणापासून वृद्धावस्थेपर्यन्त अनेक स्थितींमध्यें नानाप्रकारचे शारीरभेद घडत असतांहि मानवी चैतन्यास सारूप्याचा अनुभव जसा येत असतो, तद्वत् जुन्या पिढ्या जाऊन नव्या पिढ्या उत्पन्न होत असल्यामुळें भौतिक स्वरूपांत भेद होत असतांहि राष्ट्रीय जीविताचें सारूप्य दीर्घकालपर्यन्त, अनेक शतकें सुद्धां, अनुभवास येतें. तसेंच, ज्या राष्ट्रांत आपण जन्मास येतों, तें अमर बनविण्याचा थोर महात्म्यांचा उद्देशच असतो. म्हणून, राष्ट्राचें जीवित शाश्वत नसतें तरी अमर्याद असतें, यासाठीं त्याचे आचार, उच्चार व विचार, व्यक्तिमात्रापेक्षां अधिक व्यवस्थित व अवधानपूर्वक असून, न्याय, सत्य व नीति यांशीं अधिक संमीलित असले पाहिजेत, कारण राष्ट्राचें जीवित दीर्घ असल्यामुळें स्वार्थपरता व अनीति यांपासून होणारें शासन टाळतां येत नाहीं. एक साधुपुरुष म्हणतो कीं कर्तुमकर्तु शक्ति ज्याचे हातीं असते, त्याला ईश्वराप्रमाणेंच पवित्र व कठोर झालें पाहिजे.

व्यक्तीला एकदां नैतिक सामर्थ्य प्राप्त झालें, म्हणजे शाश्वत तत्त्वांकडे बुद्धिपूर्वक दुर्लक्ष केल्याशिवाय, त्याच्या आयुष्यांत त्या सामर्थ्याला उतरतीकळा लागत नाहीं, तथापि त्याची भौतिक स्थिति व भरभराट हीं कितीहि प्रयत्न केला असतां कमी होऊं शकतात. त्याप्रमाणेंच, राष्ट्राच्या भौतिक स्वरूपांत सृष्टिनियमानुसार फरक होऊं शकतो, परंतु ज्या आचारतत्त्वांस अनुसरून त्यास महत्त्व व सामर्थ्य प्राप्त झालेलीं असतात, त्यांचें

योग्य परिपालन केलें असतां, त्या राष्ट्राचें महत्त्व व प्राबल्य दीर्घकालपर्यन्त अबाधित राहूं शकतात. ज्याप्रमाणें उच्च कुळांत जन्म झाल्यामुळें किंवा निवडणुकीमुळें प्रत्येक राष्ट्रांतील विवक्षित व्यक्तींस सरकारची चाकरी करण्याची किंवा आपल्या देशाचें नशीब काढण्याची अथवा बिघडविण्याची संधि मिळते, त्याप्रमाणेंच विवक्षित राष्ट्रें विवक्षित काळीं संयोगशक्तीनें किंवा दुसऱ्या कांहीं राष्ट्रीय गुणांनीं मानवी दैव फिरविण्यास आणि मागसलेल्या राष्ट्रांस सुसंस्कृतीच्या व सुखाच्या कळसास पोहोंचविण्यास समर्थ होतात. जोंपर्यन्त प्रमुख राष्ट्राच्या अंगीं आत्मसंयमन असतें, तोंपर्यन्त आत्मनिष्ठ मुत्सद्द्याप्रमाणें राजकारणविद्येंत आणि मार्गदर्शनांत त्याला हटकून विजय प्राप्त होतो, परंतु आत्मसंयमनाचा अभाव झाल्याबरोबर, त्या राष्ट्राचा विनाश होतो.

व्यक्तीच्या शुभाचरणानें जन्मभर सुखाची व मोक्षाची प्राप्ति होते. राष्ट्राच्या शुभाचरणानें व वीर्यानें ऐहिक अमरत्व व अभ्युदय हीं मिळण्यास तें राष्ट्र समर्थ होतें.

# प्रकरण ८

## संग्रामसमाप्ति

( श्लोक )

आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥
आत्मात्मना नचेत् त्रातस्तदुपायोऽस्ति नेतरत् ॥१

( आर्या )

अपुला बंधू आत्मा आत्माचि असे असह्य शत्रु खरा ॥
आत्मा न होय अपुला त्राता तरि मार्ग तो नसे दुसरा ॥ १

# प्रकरण ८

## संग्रामसमाप्ति

प्रापंचिक दृष्टीनें संग्राम हा फार फायदेशीर होतो, कारण तेणेंकरून मानसिक शक्ति कार्यशील रहातात आणि मनुष्याला जन्मभर उद्योगधंदा मिळतो. कामधंद्याशिवाय मानवी जीवित आळसामध्यें व तज्जन्य दुःखांमध्यें फुकट जाईल. कांहीं व्यवसाय नसेल तर चैतन्य वातग्रस्त, स्तिमित व निद्रावश होऊन जाईल. कलहाशीं झगडतांना मुख्य टाळावयाचें संकट म्हटलें म्हणजे अत्यंत प्रपंचासक्ति होय. जाणपणें किंवा अजाणपणें जेव्हां चित्ताला एकादें वळण पडून जातें किंवा शिक्षणामुळें, स्वार्थामुळें अथवा हटवादीपणामुळें चित्तास एकादा मार्ग लागून रहातो, तेव्हां तें वळण किंवा तो मार्ग सोडून देण्याचें फार कठिण होतें आणि दीर्घ प्रवर्तनानें व निग्रहानेंच तसें घडून येतें. अशा निरंतर उपायांनींच चैतन्यादर्शामध्यें इष्ट प्रतिबिंब उत्पन्न होईल. शक्य असेल तर, जीवनकलहाशीं झगडणें मानवी चैतन्यास प्रशस्त होईल, परंतु उदकांतील कमलपत्राप्रमाणें तें अलिप्त राहिलें पाहिजे. निरंतरसुख हवें असेल तर बाह्य व अल्पकालिक शत्रूंशीं लढत असतांनाहि मनोवेग व मनोवृत्ति ह्या आन्तरशत्रूंस जिंकिलें पाहिजे. युधिष्ठिरानें श्रीकृष्णास अखेरची जी विनन्ति केली आहे ती येणेंप्रमाणेंः—सर्वज्ञा, परमेश्वरा, मला नेहमीं संकटांत ठेव, म्हणजे तेणेंकरून तुझी आठवण कायम

राहील. अभ्युदयामध्यें तुझा विसर पडतो आणि आपणच सर्वज्ञ व सर्वकल्याणकर्ते आहों असा अभिमान वाटूं लागतो. केवळ विपत्तीमध्येंच आपण ईश्वराचें संकीर्तन करितों, म्हणून मला नेहमीं संकटांत ठेव म्हणजे तुझें स्मरण अक्षय्य होईल.

कलह व विपत्ति देखील फायदेशीर होतात, कारण तेणेंकरून अन्तःकरणशुद्धि होते. अनेक ठेंचा लागल्या म्हणजे मनुष्य सावध होतो. जीविताच्या व दैवाच्या चक्रावर असतां, जो खालीं येतो तो वर जातो, आणि जो वर जातो त्याला त्याहून वर जाण्यास कांहीं एक नसल्यामुळें, अर्थात् तो आत्मसंतुष्ट व आळशी बनतो. व्यक्तींस व जातींस खालीं असलेलेंच बरें, कारण त्यास पौरुष दाखवून उच्च स्थितीस पोहोंचणें सुलभ असतें. भौतिक क्षेत्रामध्यें जय प्राप्त झाला असतां चित्ताचा उत्साह कमी होऊन त्यास स्तिमितता येते; परंतु नैतिक क्षेत्रामध्यें मनोवेग व मनोवृत्ति यांचा पूर्ण लय न होऊन तीं नेहमीं जागृत रहातात, म्हणून जयप्राप्तीनें चैतन्यास अधिकाधिक प्रतिष्ठा लब्ध होत जाते आणि त्याचें व्यवसायाचें क्षेत्र कधींच नाहींसें होत नाहीं. कांहीं लोकांस सांसारिक व वैषयिक आनंदाकरितां खटपट करणें योग्य वाटतें, आणि नैतिक आनंद हा केवळ भ्रम आहे अशी त्यांची समजूत असते. नैतिक व अध्यात्म जीविताची गोडी ज्यांना लागते ते इतरांस मायावश झालेले असे म्हणत नाहींत, पण त्यांशी वादविवाद केला असतां, साक्रेतिसाप्रमाणें पुढील रीतीनें प्रतिपादन करितातः—आपण आपआपल्या मार्गानें जाऊं.

तुम्ही जगा, आह्मी मरूं, पण यांपैकीं श्रेष्ठ मार्ग कोणता तें एका परमेश्वरासच ठाऊक आहे. तसेंच, आर्य साधु म्हणतो—संसारसुखांत तुमच्या दृष्टीनें जास्त आनंद दिसत असेल, तर तो खुशाल मिळवा. पण मन मोठें करून असें ध्यानांत आणा कीं जीविताच्या द्वैताचा उगम एकाच निरंतर प्रवाहापासून होतो, म्हणून मला जो गोड वाटतो त्या मार्गानें मला जाऊं द्या.

जर जीविताचा संग्राम प्रामाणिकपणानें चालविला, विरुद्ध पक्षाच्या दुर्बलपणाचा फायदा दुसऱ्या पक्षानें घेतला नाहीं, आणि जयांत व पराजयांत चित्ताचा समतोलपणा राखिला, तर तो संग्राम श्रेष्ठ मानिला पाहिजे. कोणाचा द्वेष न करितां, सर्वांशीं समतेनें वागावें, व सत्याचा अवलंब करून वर्तन ठेवावें, म्हणजे कलह हेंच जीवित, सुख व वैभव होऊन जातें. पण असा संग्राम चालविण्यांत औदार्य प्रकट झालें पाहिजे.

# भाग ३
# जीवितसुख

# प्रकरण १

## सिद्धीचे उपाय

( श्लोक )

यत्र न स्वदते वस्तु स्वदते च यथागमत् ॥

अवासनात्वं तद्विद्धि साम्यमाकाश कोमलम् ॥ १

( आर्या )

वांछा न धरी जरि, तरि स्वीकृति करि त्याचि लब्ध वस्तूची ॥

आकाशाची समता होई बापा विशुद्ध विमलाची ॥ १

# प्रकरण १

## सिद्धीचे उपाय

मनुष्याचें अन्तिम साध्य सुखप्राप्ति असल्यामुळें पूर्वीं निरूपित केलेल्या साधनानें म्हणजे आत्मसंयमनानेंच तें सौख्य लब्ध होतें. हा लाभ कसा करून घ्यावा याविषयीं एकंदर मनुष्यमात्राबद्दल एकच पर्याप्त नियम करितां येत नाहीं, कारण मनुष्याचे स्वभाव परस्परांहून भिन्न असून अखिल सृष्टि अशी चमत्कारिक निर्माण झाली आहे कीं भौतिक किंवा नैतिक क्षेत्रांत म्हणजे जड द्रव्याच्या किंवा चैतन्याच्या क्षेत्रांत ज्यांस एकच प्रमाण लागू करितां येईल अशा अगदीं सारख्या दोन व्यक्ति, शक्ति किंवा वस्तु आढळत नाहींत. तथापि मनुष्याच्या शारीर अथवा अध्यात्म स्वरूपास लागू होणारीं विवक्षित सनातन तत्त्वें आहेत आणि सौख्यप्राप्तीसाठीं याच तत्त्वांस अनुसरून वागलें पाहिजे. जीवितास आवश्यक मुख्य गोष्ट म्हटली म्हणजे हीच कीं शरीर व चैतन्य यांचा विकास स्वतंत्र व अनियंत्रित रीतीनें होऊं दिला पाहिजे. हा विकास अध्यात्म क्षेत्रांत पूर्ण होऊं देण्यासाठीं शक्य त्या तऱ्हेनें बाळपणापासून मनुष्याच्या चैतन्यविकासांत हात घालूं नये. आईबापांस, पालकांस, शिक्षकांस असें वाटत असतें कीं आपल्या ताब्यांतील मुलांचे आपणच काय ते रक्षक आहों. पण ही समजूत चुकीची आहे. ज्या श्रेष्ठ सूत्रानें संपूर्ण जीवित बद्ध झालेलें असतें, ज्या सूत्रानें मुलें जन्मास येऊन

लय पावतात, त्यानेंच प्रौढ व वृद्ध मनुष्यांप्रमाणें लहान मुलांचें रक्षण होतें. सामाजिक व नागरिक जीवितांत जसे न्यायाधीश व पोलीस, तसेच आईबाप व पालक हीं केवळ ईश्वराच्या हातांतील यंत्रें असून, सर्व प्राण्यांस सनातन सूत्रांचें अनुशासन योग्य रीतीनें होतें किंवा नाहीं हें पहाण्याचें काम या यंत्रांचें असतें. अडाणी व कर्तव्यहीन न्यायाधीशाप्रमाणें किंवा पोलिसाप्रमाणें, आईबाप व पालक या चिरंतन सूत्राचा अर्थ वारंवार भलताच करितात आणि तेणेंकरून आपल्या ताब्यांतील मुलांचें व आपल्या स्वतःचें नुकसान करून घेतात. परंतु राष्ट्रामुळें जसें प्रजाजनांचें रक्षण होतें, तद्वत् ईश्वराच्या अगाध व अतर्क्य सूत्रामुळें नवीन संततीच्या पूर्वकर्मास अनुरूप असे पालक अवश्य निर्माण होतात. मानवी समाजाच्या सांप्रत झालेल्या प्रगतीकडे पहातां, आईबाप, पालक किंवा परकीय लोक यांपैकीं कोणाच्याहि हातून मुलांस शारीरिक इजा न होईल अशी राष्ट्राकडून तजवीज झालेली असते. राष्ट्राची कर्तव्यमर्यादा याहून वाढविणें शक्य आहे. आईबाप व पालक यांचें शिक्षण व संस्कृति अशी असावी कीं तेणेंकरून मुलांस योग्य नागरिक बनवितां येईल असेच लायक व आदर्शभूत ते असले पाहिजेत, व हा निर्बंध राष्ट्रानें केला पाहिजे. हें काम आईबापांकडून व पालकांकडून न होईल तर बाळपणापासून मुलांस वाढविण्याचा बंदोबस्त राष्ट्रानें केला पाहिजे. राष्ट्राचा मोठेपणा व मानवी सुख कायम रहाण्यास हाच उपाय योजण्यालायक आहे. मन स्वाधीन कसें ठेवावें हें जो जाणतो तोच समाज किंवा

तीच व्यक्ति स्वातंत्र्य भोगण्यास लायक होते. ज्यांचा प्रामाणिकपणा व खरेपणा निःसंशय असतो त्यांवरच लोक विश्वास ठेवितात, आणि बाळपणापासून उत्कृष्ट शिक्षण मिळून कर्तव्यबुद्धि व जबाबदारीची जाणीव ज्यांच्यामध्यें जागृत रहाते, असेच लोक राष्ट्राचा मान वाढवूं शकतात. नागरिकांमध्यें कर्तव्यबुद्धि जागृत न होईल, तर प्राचीन स्पार्टनलोक ज्या पद्धतीचा स्वीकार भौतिक क्षेत्रांत करीत असत, त्याच पद्धतीचा अवलंब करून राष्ट्राचा व मनुष्यमात्राचा फायदा करून घेतला पाहिजे. आपलें कर्तव्य बजावून विवेकबुद्धीची पसंति मिळविणें यापेक्षां अधिक सुख मनुष्याच्या आयुष्यांत सांपडणार नाहीं—याचें उदात्त उदाहरण म्हणजे स्वदेशाच्या शत्रूंशीं लढणाऱ्या वीराचेंच होय. म्हणून आईबापांस व पालकांस जर असें वाटेल कीं पशूहून सर्वथैव भिन्न अशा ' मनुष्य ' पदवीस लायक असाच वर्ग आह्मी निर्माण करीत आहों, तर त्या सुखास पारावार नाहीं; तसेंच, अशा रीतीनें तयार झालेलीं मुलें प्रौढ होऊन त्यांस कळेल कीं आपले पालक देवदूतांसारिखे होते व मुलांच्या निरंतर कल्याणासाठीं अल्पकालिक दुःख त्यांनी सहन केलें—तर त्या सुखासहि अन्त नाहीं.

नवीन संततीचा स्वतंत्र विकास योग्य देखरेखीखालीं होण्यासाठीं, प्राचीन कालचा अनुभव नीट समजून घेऊन तो अमलांत आणण्याचा प्रयत्न केला म्हणजे झालें. शारीरसामर्थ्याचा विचार करितां असें आढळतें कीं पूर्वजांचें आरोग्य आतांपेक्षां अधिक चांगलें होतें आणि

आधुनिक कालीं आरोग्याचे जे नियम शोधून काढून परिपक्क झालेले आहेत त्यांचें जरी त्यांस अज्ञान होतें तरी प्राचीन लोक अधिक दिवस जगत हें निर्विवाद् आहे. सांप्रतकालीं त्यांच्या संततीस जो जीवनार्थ कलह चालवावा लागत आहे, तसा त्यांचे वेळीं नसून त्यासाठीं त्यांना फार चढाओढ करावी लागत नसे, ही गोष्ट ध्यानांत आणिली म्हणजे ते रोगनिर्मुक्त कां असत व दीर्घकाल कां जगत याच बीज समजून येईल. ही चढाओढ त्यांस करावी लागली नाहीं याचें कारण काय असावें बरें? त्यांचे वेळीं नियमांत कांहीं पक्षपात होता, किंवा त्यांना चांगलें वागवीत असत किंवा त्यांवर ईश्वरी कृपा होती अशांतली गोष्ट नाहीं. तरि त्याचें मुख्य बीज हेंच कीं भौतिक व अध्यात्म या दोन्ही बाजूंनीं आत्मसंयमन कसें करावें हें त्यांस पूर्णपणें अवगत असून त्यांची वागणूक त्याबरहुकूम असे.

बाळपणापासून मानवी शरीराचा स्वतंत्र विकास होत असतां, अन्नवस्त्रादि ज्या ज्या वस्तूंची पुढें गरज लागणार त्यांसंबंधानें आत्मसंयमनाची संवय केली पाहिजे. शारीरिक व्यायाम घेण्यांतहि त्याच प्रकारचा नियमितपणा राखला पाहिजे. श्रम किंवा त्रास न वाटेल अशा तऱ्हेचें शारीरिक किंवा मानसिक काम प्रत्येक देहास सोसवेल त्या मानानें ठरवून ठेविलें पाहिजे. कामापासून त्रास किंवा जिकीर वाटूं लागल्याबरोबर, झोंपेमध्यें किंवा मोकळ्या हवेमध्यें विश्रान्ति घेतली पाहिजे. गुरु सर्व विद्यार्थ्यांना सारखेच धडे नेमून देतात, पण असें करण्यानें हितापेक्षां नुकसानच अधिक होतें. जर एकादा

विद्यार्थी बुद्धिमान् असेल तर त्याच्याकरितां इतर विद्यार्थ्यांवर जास्त अभ्यासाचें ओझें लादणें ठीक नव्हे. असाच नियम शारीरिक व्यायामाविषयीं पाळणें अवश्य आहे.

तारुण्यामध्यें व प्रौढावस्थेमध्यें शरीर व चैतन्य हीं जोमांत असून त्यांची एकसारखी वाढ होत असते, म्हणून या वयामध्येंच अवघड काम केलें पाहिजे. यावेळीं सुद्धां फार नसली तरी पुरे इतकी विश्रान्ति घेतलीच पाहिजे आणि अतिशय दमल्यासारखें वाटलें कीं काम बंद ठेवून फिरून उमेद आल्यावर सुरू करणें रास्त आहे. वयाच्या व शक्तीच्या मानानें योग्य असे श्रम केले, जीविताच्या प्रत्येक क्षेत्रांत आत्मसंयमनाचा अभ्यास ठेविला आणि आधुनिक शास्त्रामध्यें सांगितलेले नियम पाळिले, तर स्त्रीपुरुषांस पूर्ण आयुष्य होईपर्यन्त म्हणजे शंभर वर्षें जगून स्वतः आरोग्याचा व सुखाचा अनुभव घेतां येईल व स्वकीयांस आणि इतर मनुष्यांस तोच अनुभव आणून देतां येईल. असें वारंवार पहाण्यांत येतें कीं एकाद्या मनुष्यास सार्वजनिक किंवा खाजगी काम करावयाचें असेल अथवा स्वतःकरितां किंवा आश्रितांकरितां उपजीविकेसाठीं श्रम करावयाचे असतील, तर तो जरी दमून गेला असला तथापि त्याच्यानें काम सोडवत नाहीं, कारण त्याला असें वाटत असतें कीं आपल्यासारिखें दुसऱ्या कोणाचेहि हातून तें काम तडीस जावयाचें नाहीं. अशी समजूत होणें म्हणजे निवळ पोकळ अभिमान व सृष्टिनियमांचें अज्ञान होय. कोणत्याहि कार्याकरितां एकच व्यक्ति अथवा एकच शक्ति

निर्माण झालेली असते असें कधीं घडत नाहीं. एक व्यक्ति नाहींशी झाली किंवा दुर्बल झाली, तर तिच्या जागीं दुसरी तयार असतेच, जसें एकाद्या यंत्रांतील एक कीलक बिघडला असतां त्याचे जागीं दुसरा घातल्यावर तें यंत्र फिरून चालू होतें. जर तें काम चालण्यासारिखें मुळीं नसलेंच, तर विरोधी शक्ति जोरांत येऊन अनुकूल शक्तींचा ऱ्हास होतो. मनुष्य अभिमानानें इतर विचार सोडून देऊं लागला, तरी देखील सामान्य दूरदर्शीपणानें त्याला असें समजेल कीं जीविताविषयीं सर्वकाल संशय असल्यामुळें, तो मनुष्य नष्ट झाला किंवा मेला तरी तें काम पुढें चालावयाचेंच, मग एकादा मनुष्य कांहीं दिवस नसला, पण लवकरच निरोगी व धट्टाकट्टा होण्याचा संभव असला, तर तेवढ्यानें त्या कामाला व्यत्यय येणार नाहीं किंवा त्याची उपयुक्तताहि कमी होणार नाहीं.

आत्मसंयमनाचा पाया बाळपणांतच तयार होऊन किशोर अवस्थेंत बळकट केला पाहिजे, परंतु जबाबदारीचीं व अवघड कामें तारुण्यांत व प्रौढदशेंतच संपविली पाहिजेत. कुटुंबाचा निर्वाह व पोषण करणें हें जरी त्या वयास इष्ट असलें, तरी तारुण्यांत व प्रौढ दशेंत एवढाच विचार करून भागणार नाहीं. जागृतींत व निद्रेंत, जिवन्तपणीं किंवा अनन्त कालपर्यन्त, जेणेंकरून शान्ति व आनन्द यांची प्राप्ति होईल, आणि सहचरांसहि शास्त्राच्या आज्ञेवरून व स्वतःच्या उदाहरणांवरून अखंडानंदाचा अनुभव येईल, असें आत्मसंयमन करण्याचा पूर्ण प्रयत्न झाला पाहिजे.

शारीरवेग व मनोवेग या शत्रूंस जिंकण्यासाठीं सदोदित यत्न चालविला पाहिजे. अनावश्यक अन्न किंवा पेय यांची इच्छा दाबून टाका, क्रोधास जिंका, प्रत्येक वस्तूचा समागम करा, पण कशासहि चिकटून राहूं नका, कारण वरिष्ठ शक्तीनें ती केव्हां नाहींशी होईल याचा नेम नाहीं. इंद्रियांस भलतीकडे जाऊं देऊं नका, सर्व जगत् ज्यांवर अवलंबून रहातें त्या विरोधांस ओळखून रहा, जीवात्म्याचा परमात्म्यामध्यें लय करा, स्वार्थबुद्धीचा त्याग करा, कोणतेंहि कृत्य केलें किंवा कर्तव्य बजावलें, तरी त्याबद्दल कांहीं बक्षीस अथवा लाभ होईल अशी आशा सोडून द्या.

विवेचकबुद्धीचा उपयोग करून राष्ट्र, द्रव्य, शरीर व इतर ऐहिक सामग्री यांचा खरा उपयोग काय होतो तें शिकावें. उच्च-नीच, वृद्ध-तरुण, सुख दुःख, रोग-आरोग्य, शान्ति-युद्ध, विपत्ति-अभ्युदय, वगैरे द्वंद्वें आणि प्राणिकोटींतील विविध भेद पाहून, इंद्रधनुष्याच्या निरनिराळ्या रंगांप्रमाणें या अशाश्वत वस्तु शाश्वत चिदाकाशामध्यें क्षणैक भासमान झाल्या, तरी त्यांचा त्यास कधींहि लेप होणार नाहीं हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. सर्व उपभोगांस आदि व अंत असून, ते बाह्य वस्तूंपासूनच उत्पन्न होतात, तेव्हां त्यांपासून सुखाची आशा बाळगणें व्यर्थ आहे. द्रव्य, आप्त, मित्र, सेवक, परिवार, आणि ज्या ज्या वस्तूंमुळें जीवित सुखकर होतें, हे सर्व पदार्थ मृत्यूचा तडाका बसेपर्यन्तच आनंददायक होतात. जलप्रवाहाबरोबर लांकडाचे तुकडे एकत्र होतात व चोहोंकडे वाहून जातात. वाऱ्याच्या योगानें वाळले-

लीं पानें जमतात व पसरून जातात. सर्व पदार्थांची गात याप्रमाणें असल्यामुळें, मनुष्यास आशा किंवा भय वाटण्याचें कारण काय?

मनामध्यें नानाप्रकारचे तरंग उठतात, केव्हां आशा उत्पन्न होते, तर केव्हां निराशा होते, कधीं आपण सुरक्षित व विजयी आहों असें वाटतें, तर कधीं भीति व पराजय हे तरंग उठतात, आज आनंद तर उद्यां दुःख,—तेव्हां सर्व सृष्टि बनविणारें जें मन त्यामध्यें अशा रीतीनें अनेक प्रकार उत्पन्न होतात व रंगभूमी-वरील नटाप्रमाणें त्याची स्थिति होते, मग जीवितांत चिन्ता कशाची व काय म्हणून करावी?

शरीरामध्यें प्रतिक्षणीं नाना प्रकारचे फरक होत असतात, आणि पूर्वींची गतस्थिति परत येण्याची मुळींच आशा रहात नाहीं. बाळपण कांहींकाल राहून तारुण्यांत लीन होतें, तारुण्याचा लय प्रौढदशेंत, प्रौढदशेचा वार्धक्यांत, तर वार्धक्याचा लय सर्व नाशांत होतो. जर भौतिक शरीरामध्यें तीच अवस्था फार वेळ राहूं शकत नाहीं, तर शरीराहून भिन्न शक्तींवर दाब कसा राहील? याप्रमाणें शरीरास अनेक दशा येतात आणि सर्व नाशाचे वेळीं चैतन्यास कर्माप्रमाणें दुसरा देह प्राप्त होतो किंवा सर्व चिन्ता दूर होऊन, तें परमात्म्यामध्यें लीन होतें. मग असल्या देहनाशापासून जर लाभच होतो, तर त्यापासून दुःख कां व्हावें? रात्र पडली कीं भिन्न प्रकारचे पक्षी एका वृक्षावर आश्रयासाठीं जमतात, सकाळीं त्यांचा वियोग होतो, जो तो आपल्या उपजत-बुद्धीप्रमाणें, लहरीप्रमाणें किंवा अचिंत्य गुह्यशक्तीनें

प्रेरित होतो. एकाला त्याच्या इच्छेप्रमाणें समाधान होऊन आनंद वाटतो, दुसरा क्षुधेनें मरून जातो, तिसरा महाभूतांच्या तडाक्यांत सांपडून नाश पावतो, कांहींना किंचित् कालपर्यन्त एकमेकांची आठवण होते, कांहीं आपले नाहींसे झालेले मित्र शोधण्याकरितां इकडे तिकडे तडफड करितात; परंतु प्रत्येकानें कोणताहि मार्ग स्वीकारला असला, तरी वाफेनें चालणाऱ्या यंत्राप्रमाणें सृष्टीचा धोपट मार्ग चालूच रहातो. अशा यंत्रामध्यें कांहीं पदार्थ कमी जास्त उपयुक्ततेचे तयार होतात, तर ज्यांच्या अणूंमधील परस्पराकर्षण किंवा रचना ठीक नसते, ते पदार्थ फुटून जातात.

# प्रकरण २

## अभ्युदयाचे मार्ग

( श्लोक )

विवेकेन परिक्लिश्यन्नल्पभोगेन तृप्यति ॥
अन्यथाऽनन्त भोगेऽपि नैव तृप्यति कर्हिचित् ॥१

( आर्या )

खिन्न विवेकें होई तरि भोगें अल्प, तृप्तिला पावे ॥
ज्ञानाभावीं तृप्ती अनन्त भोगें न होय हें ध्यावें ॥ २

# प्रकरण २

## अभ्युदयाचे मार्ग

जीविताची काळी बाजू म्हटली म्हणजे दुःख, संताप, विपत्ति ही होय. ज्यास हे अनुभव आले नाहींत असा एकहि प्राणि पृथ्वीवर सांपडणार नाहीं. या संकटांपासून सुटण्याकरितां मनुष्यांनीं नाना तऱ्हेचे उपाय योजिले आहेत. कोणी विषयासक्त बनतात, कोणी द्रव्य मिळविण्यांत निमग्न असतात, कोणी ऐषआरामांत काळ दवडितात, कोणी कीर्ति संपादन करितात, कोणी मादक द्रव्यांचा आश्रय घेतात, कोणी तत्त्वज्ञानांत गर्क होतात व कोणी धर्मकृत्यें करून समाधान पावतात. अशा नानाप्रकारांनीं आपणास खऱ्या सुखाचा मार्ग सांपडला असें ज्याला त्याला वाटूं लागतें व कांहीं काल त्यांचा जीव स्थिर होतो, परंतु एकाएकीं एकादी विपत्ति किंवा भयंकर प्रसंग त्यांजवर गुदरतो आणि त्यांच्या कल्पित सुखाचा लय होऊन जातो.

यावरून असें वाटेल कीं ऐहिक विपत्तीपासून सुटका होण्यास मार्गच नाहीं, पण ही समजूत चुकीची आहे. अशा नानाप्रकारच्या यातनांतून पार पडण्यास ईश्वरानें मार्ग दाखवून दिले आहेत. अशुभाचीं बंधनें कशीं तोडावीं, शाश्वतसुख कसें प्राप्त करून घ्यावें,—रोग, दारिद्र्य, अनिष्ट परिस्थिति यांचें निर्मूलन कसें करावें, चिरकाल शान्तीचा लाभ कसा होईल—असे अनुभव येण्यासाठीं अशुभाचें खरें स्वरूप काय आहे हें समजून घेणें एवढाच उत्कृष्ट उपाय आहे.

अशुभ हें कांहीं नाहीं असें म्हणून या प्रश्नाची टाळाटाळी करण्यांत हंशील नाहीं, तरि अशुभ हें काय आहे हें उत्तम रीतीनें कळलें पाहिजे. आत्मपरीक्षणावरून असें समजतें कीं आपली अन्तःशुद्धि होऊन पूर्णता संपादन करावी यासाठीं ईश्वरानें विपत्ति निर्माण केली आहे. विपत्ति म्हणून सृष्टींत कांहीं एक स्वतंत्र तत्त्व नसून, तें आपल्या अनुभवाचेंच क्षणिक रूप आहे. विपत्ति आली असतां नुसता देवाचा धांवा करून उपयोग नाहीं, तरि तिजपासून आपणास धडा काय मिळतो हें शिकलें पाहिजे. आत्मनिरीक्षणावरून असें सिद्ध होतें कीं अशुभ म्हणून जगांतील विशिष्ट शक्ति किंवा देवता नसून, तो एक हृदयांतील अनुभवाचा किंवा प्रतीतीचाच एक प्रकार ठरतो आणि तेणेंकरून आपण शहाणे होतो.

सर्व प्रकारचें अशुभ अज्ञानजन्य आहे, व वस्तुस्थितीचें अज्ञान हीच विपत्ति होय. सर्व दुःखें अज्ञानापासून उत्पन्न होतात व त्यांपासून मिळालेलें ज्ञान जर आपण विसरलों, तर तीं आपणास कधींच सोडणार नाहींत. विस्तवांत हात भाजला म्हणजे मुलास अग्नीचें ज्ञान होतें व फिरून अग्नींत हात घालूं नये असें शहाणपण त्यास प्राप्त होतें, पण हें ज्ञान व शहाणपण मिळून देखील जर फिरून विस्तवांत हात घालील, तर त्याला दुःख होईल. या एका उदाहरणावरून सर्व पापाचें व अशुभाचें खरें स्वरूप काय आहे व शेवट कसा होतो हीं कळून येतात. अग्नीच्या स्वरूपाच्या अज्ञानामुळें प्रथम मुलाचा हात भाजला, नंतर खरें ज्ञान झालें

असतांहि फिरून हात भाजेलच. हीच अवस्था मनुष्यमात्राची असते. प्रथम वस्तुस्थितीच्या अज्ञानानें मनुष्यास दुःख होतें, नंतर तो धडा मिळाला असतांहि फिरून अज्ञान प्रगट केल्यामुळें दुःख होतें. यावरून दोन्ही प्रकारच्या विपत्तींचें कारण अज्ञान होय हें सिद्ध होतें. जेव्हां मनुष्यास विपत्ति येते तेव्हां असें समजावें कीं वस्तुस्थिति समजली नाहीं किंवा त्या स्थितीचें ज्ञान झालें असून हयगय केली असावी.

अज्ञानाची तुलना अंधकाराशीं व प्रकाशाची तुलना ज्ञानाशीं करण्याचा सांप्रदाय असून या तुलनेंत सत्य भरलेलें आहे. बाह्य वस्तूंवर सूर्याचा प्रकाश पडतो, तद्वत् ज्ञानाचा प्रकाश चैतन्यावर पडतो. प्रकाशाच्या आड एकादा पदार्थ आला असतां अंधकार होतो. सर्वत्र प्रकाश असून अंधकार ही केवळ छाया म्हणजे प्रकाशाचा अभाव होय. अभावरूप मिथ्या असतें या न्यायानें अंधकार मिथ्या ठरतो. हीच गोष्ट विपत्तीस लावून पहातां ज्ञानसूर्याच्या आड वासना व असत्कल्पना येऊन अज्ञानरूपी अंधकार होतो आणि आपणास विपत्ति प्राप्त होते. अंधकाराप्रमाणें विपत्ति अभावरूप होऊन मिथ्या ठरते. प्रत्येक दुःख अज्ञानजनित असतें, सबब अज्ञाननिवृत्ति करून घेऊन ज्ञान संपादन केलें असतां सुख होतें, आणि ‘ आत्यंतिक दुःखनिवृत्ति म्हणजे मोक्ष ’ हें शास्त्रवचन यथार्थ आहे असें सिद्ध होतें.

विपत्ति हा एक अनुभवाचा प्रकार असून ती नुसती छाया आहे—हा केवळ शास्त्रोक्त सिद्धान्त किंवा नुसती उपपत्ति आहे असें मात्र कोणी समजूं नये, तरि

प्रत्येकानें सूक्ष्म विचार करावा, अनुभव घेऊन आत्मनिरीक्षण करावें म्हणजे या सत्याची खात्री होईल. ईश्वराच्या सर्वव्यापक नियमाप्रमाणेंच विपत्ति येतात, त्या आकस्मिक गोष्टी नसून ठरीव नियमाचेच परिणाम होत. तसेंच प्रत्येक दुःख जें आपणावर येतें, तें आपणामध्यें धैर्य, शहाणपण व थोरवी उत्पन्न करण्याकरितांच येत असतें. हें ज्ञान झालें असतां प्रत्येक अशुभाचें शुभ होईल व आपलें दैव बनविण्यास आपण समर्थ होऊं.

मनुष्यावर संकटें कां येतात या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं भूतमात्राचा हा धर्म आहे, प्राणिमात्राची ही नियति होय. कोणतीहि वस्तु उत्पन्न झाली, तरी ती कायम रहाण्यासाठीं टक्केटोणपे सोसण्यास समर्थ झाली पाहिजे. नाना प्रकारचे अनुभव येऊन घट्ट झालेली वस्तु टिकते व जगण्यास योग्य होते. हें एक जीवनाचें रहस्य होय. वनस्पति अनेक तऱ्हेच्या यातना सोसतात, वारा-ऊन्ह-पाऊस यांचा मारा अहोरात्र सहन करण्यास समर्थ होतात, तेव्हांच त्या जगतात. तसेंच, शीतोष्णादि द्वंद्वें, सुखदुःखें, संयोगवियोग इत्यादि विपत्ति जे प्राणि सहन करूं शकतात, तेच जिवन्त रहातात. तेव्हां हा वस्तुस्वभाव होय असें सिद्ध होतें.

सर्व जगाची उत्पत्ति चैतन्यापासून होते. मानवी कृतीच्या सर्व वस्तु मनुष्याच्या कल्पनेप्रमाणेंच घडतात हें उघड आहे आणि तद्व्यतिरिक्त पदार्थ ईश्वराच्या इच्छेप्रमाणें झालेले आहेत. तेव्हां जग हें अन्तर्यामींच्या स्थितीचेंच प्रतिबिंब आहे. आर्य साधु म्हण-

तात कीं संपूर्ण जग हें कांहीं नसून केवळ मनाचेंच कार्य आहे, आणि हें प्रमेय सामान्य जनांस जरी अग्राह्य वाटलें, तथापि आपण जसे आहों तसें जग दिसतें हें विधान बहुतेकांस मान्य होईल यांत संशय नाहीं. जसे आपले विचार असतात, तसें आपलें जीवित बनून जातें व तशीच आपली बाह्य परिस्थिति बनते. स्वार्थपर व अशुद्ध विचारांत जो गर्क असतो तो दुर्दैवी रहातो आणि शुद्ध व उदात्त विचारांत निमग्न असणाऱ्या पुरुषास सुखप्राप्ति होते. ज्या वस्तु जीवात्म्यास अनुकूल असतात त्यांचेंच त्याकडे आकर्षण होतें. मनुष्याच्या आयुष्यांत ज्या ज्या गोष्टी नित्य घडून येतात त्या त्या त्याच्या चैतन्यशक्तीस अनुरूप अशाच असतात. जसा ज्याचा अन्तर्याम तसे त्याचे विचार, आणि त्या विचारांस अनुकूल असेंच बाह्य जगाचें स्वरूप होऊन जातें.

आपलें सर्व ज्ञान अनुभवात्मकच असलें पाहिजे, आणि विचार वासना-आशा एतन्मय आपलें चित्त असतें, म्हणून जगांतील सर्व सौंदर्य, आनंद, विरूपपण, दुःख हीं प्रथम आपल्या अन्तःकरणांत अन्तर्भूत असली पाहिजेत. मनुष्य सुखी-दुःखी-भयग्रस्त वगैरे होतो याचें कारण बाह्य गोष्टी नसून, त्या प्रकारचे त्याचे विचार असतात म्हणूनच तो परिणाम घडतो. यावर कोणी अशी शंका घेईल कीं—तर मग बाह्य परिस्थितीचा आपल्या मनावर मुळींच परिणाम घडत नाहीं कीं काय? यास उत्तर असें आहे कीं बाह्य गोष्टींचा संस्कार आपल्या चित्तावर घडतो हें खरें आहे, पण तो जितका जसा घडूं द्यावा तितका तसाच घडतो, म्हणजे तो सं-

स्कार होऊं देणें आपल्या स्वाधीन रहातें. ज्यास आत्मविचाराचें सामर्थ्य कळत नाहीं, त्यावर परिस्थितीचा परिणाम तत्काळ होतो. बाह्य स्थितीमुळें आपल्या जीविताची दिशा अगदीं बदलून जाते असें म्हटलें तर आपण त्या स्थितीचे दास आहों असें सिद्ध होतें, आणि तसें सिद्ध करूं लागलों तर बाह्य गोष्टींमध्यें भलतीच शक्ति उत्पन्न करून आपण आपला सर्वस्वीं नाश करण्यास पात्र होऊं.

खरी गोष्ट अशी आहे कीं आपलें जीवित सुखकारक होणें हें पूर्णपणें आपणावरच अवलंबून रहातें. एकाच परिस्थितीचे भिन्न परिणाम निरनिराळ्या मनुष्यांवर घडूं शकतात याचीं शेकडों उदाहरणें जगामध्यें दृष्टीस पडतात. दोन तरुण गृहस्थ मित्र होते व त्यांचे ऐवज एका ब्यांकेमध्यें ठेविलेले होते. कांहीं दिवसांनीं ती ब्यांक बुडाल्यामुळें दोघांचेंहि नुकसान झालें. तेव्हां त्यांपैकीं एकजण अत्यंत कष्टी होऊन खेद करीत बसला, परंतु दुसरा गृहस्थ आशावादी होता म्हणून त्यानें उमेद बाळगून दीर्घ प्रयत्नानें पूर्वीप्रमाणें द्रव्य संपादन केलें. या उदाहरणामध्यें दोघांची स्थिति सारखीच होती व दुःखाचें कारण एकच होतें, तथापि एकाचे हाल झाले व दुसरा सुखी झाला. तेव्हां ज्याच्या त्याच्या मनःस्थितीमुळें एकाच गोष्टीचे भिन्न परिणाम घडून येतात हें सिद्ध होतें. याकरितां आपलें अन्तःकरण उत्तम प्रकारचें बनविणें प्रत्येकाचें कर्तव्य असून जगांतील गोष्टींस चांगलें किंवा वाईट स्वरूप देणें हें त्याचे स्वाधीन रहातें. म्हणून आत्मसंयमनाचा अभ्यास बाळपणापासून

केला पाहिजे, आणि चित्तरूपी देवालय शान्त व सुंदर बनविण्याचा प्रत्येकानें प्रयत्न करणें अवश्य आहे.

जगांत घडणाऱ्या गोष्टींस जसें आपण पाहिजे तें रूप देऊं शकतों, त्याप्रमाणेंच पृथ्वीवरील पदार्थांस वाटेल तसें बनविण्यासहि आपण समर्थ होतो. एकास जें सुंदर दिसतें तें दुसऱ्यास कुरूप वाटतें. सृष्टिशास्त्रवेत्त्यांस घाणेरडें पाण्याचें डबकें रमणीय वाटतें, कारण त्यांतील कुजणाऱ्या वनस्पतींपासून व उत्पन्न होणाऱ्या असंख्य किड्यांपासून देखील सृष्टचमत्कारांचें अपूर्व ज्ञान तो मिळवूं शकतो, परंतु तेंच एकाद्या अडाणी मनुष्यास अत्यन्त त्याज्य होऊन जातें. अरण्यांतील नानाविध पुष्पें पायाखालीं तुडवून टाकणारे अनेक प्रवासी भेटतात, परंतु त्याच वन्य पुष्पांस देवदूत मानण्याची स्फूर्ति कवीच्या प्रतिभेंत सहज उत्पन्न होते. समुद्रावर जहाजें चालतात व कित्येक बुडूनहि जातात एवढीच सागराची कल्पना सामान्यजनास असते. परंतु त्यांतील नानाविध जलचरांचा व द्रव्यांचा व्यासंग करणाऱ्या शास्त्रज्ञांस तो एक आश्चर्याचा सांठाच होऊन जातो. सृष्टींतील अनन्त देखाव्यांमध्यें स्वरशास्त्रज्ञांस नानाप्रकारच्या गायनाचा भास होतो, पण तेथें गांवढळास कांहींच वाटत नाहीं. सामान्य मनुष्यास जेथें अनर्थ व उत्पात दिसतात, तेथें तत्त्वज्ञास अनेक कार्यकारणभावांची परंपरा अनुभवास येते. जेथें अनीश्वरवाद्यास नुसते मृत्यूचे प्रकार नजरेस येतात, तेथें गुह्यज्ञास जीविताचे अनंत प्रकार आविर्भूत होतात.

जगांत घडणाऱ्या गोष्टींस व पृथ्वीवरील पदार्थांस

जशीं आपण निरनिराळीं रूपें देतों, त्याप्रमाणेंच लोकांच्या अन्तःकरणासहि पाहिजे तसें बनविण्यास आपण समर्थ होतों. संशयखोरास सर्वजग संशयखोर दिसतें. लबाडास असा अभिमान वाटतो कीं लोकांस सत्यवादी समजण्याइतके आपण मूर्ख नाहीं, मत्सरग्रस्तास सर्वत्र मत्सराचाच प्रभाव दिसूं लागतो, द्रव्यलोभ्यास सर्वलोक द्रव्य मिळविण्यांत गर्क झालेले दिसतात. तसेंच, ज्यांची वर्तणूक सर्वांशीं प्रेमाची असते व जे परोपकारामध्यें रत असतात, त्यांस सर्वत्र सहानुभूति दिसते, प्रामाणिक मनुष्यास लोकांविषयीं संशय येत नाहीं, उदार पुरुषास दुसऱ्याचें वैभव पाहून सुख होतें आणि द्वेष म्हणजे काय याची कल्पनाहि नसते. ज्यास ईश्वरस्वरूपाची ओळख असते, त्यास तिर्यग्योनीमध्यें व सर्व भूतांमध्यें ईश्वराचा महिमा नजरेस येतो. स्वर्गसुखाची इच्छा करणाऱ्या ईश्वरपरायण पुरुषांचा सहवास केला असतां, प्रत्येकास असें वाटूं लागतें कीं परमात्मस्वरूपाशीं सलग्न झालेल्या जीवाच्या सामर्थ्यापुढें बाह्य पदार्थांची कांहींच प्राज्ञा चालत नाहीं.

वरील विवेचनावरून दोन सिद्धान्त ठरतात, ते असे कीं—( १ ) ईश्वरस्वरूपाच्या आड वासनामय अहंकार आल्यामुळें जी अल्पकालिक छाया पडते, ती अशुभ होय आणि ( २ ) सर्व जग हें चित्ताचें प्रतिबिंब असतें. आतां ईश्वरस्वरूपाचें ज्ञान होण्यास ईश्वरी नियमाची माहिती पाहिजे. ईश्वरीसूत्र व मनुष्यकृत नियम यांमध्यें मुख्य भेद असा आहे कीं,—मनुष्यकृत नियम सर्वत्र प्रसिद्ध असतात, पण ईश्वरीसूत्र गुह्य असतें; मनु-

व्यक्त नियमाचें उल्लंघन केल्यास तत्काल प्रसिद्धपणें शासन घडतें, परंतु ईश्वरीसूत्राची अवज्ञा केल्यास अपराध्यास किंवा त्याच्या संततीस शासन तर घडतेंच, व तें या जन्मीं किंवा जन्मान्तरीं होऊं शकतें, पण तें कसें व केव्हां घडतें हें बहुधा अज्ञातच रहातें. ईश्वरीसूत्र तत्त्वज्ञास सुवर्णाक्षरांनीं सर्वत्र लिहिलेलें दिसतें, परंतु इतर लोकांस तें ज्ञात असलें तरी, त्यांची वागणूक अजाणपणेंच घडत असते. तेव्हां ईश्वरी सूत्राविषयीं विचार करणें अवश्य आहे.

सर्व जगाचा नियन्ता एकच असून, सृष्टीची उत्पत्ति, स्थिति, लय हीं कार्यें चालविण्यासाठीं अनेक शक्ति त्याच्या स्वरूपापासून निर्माण होऊन शेवटीं त्यामध्येंच लय पावतात. त्याप्रमाणें ईश्वरी सूत्र किंवा सनातन रहस्य एकच असून त्यापासून अनुमानानें अनेक नियम सिद्ध होतात. सनातन सूत्र असें आहे कीं—वस्तुस्वभाव एकच असून कार्यकारणभावानें बद्ध असतो. या सूत्राचें उत्कृष्ट परिज्ञान होण्यासाठीं आपण त्याचे दोन नियम करूं—

( 1 ) Nature is uniform.

( १ ) निसर्ग म्हणजे वस्तुस्वभाव एकच म्हणजे सर्वत्र सारखाच असतो.

( 2 ) Every cause has an effect.

( २ ) प्रत्येक कारणापासून कार्य अवश्य घडतें.

यांपैकीं पहिल्या नियमावरून असें सिद्ध होतें कीं एका पदार्थामध्यें जे गुणधर्म अनुस्यूत असतात, तेच तज्जातीय सर्व पदार्थांमध्यें राहूं शकतात. एका आम्रफलाची

जशी रचना व जे गुणधर्म असतात, तसेच सर्व आम्र फलांमध्यें रहातात, सर्व प्रकारच्या उदकांमध्यें शीत' मधुर, प्रवाहि हे धर्म असतात, इत्यादि. दुसऱ्या नियमावरून असें समजतें कीं मिठाचा संसर्ग झाला कीं क्षारत्व उत्पन्न होतें, आम्लाच्या संसर्गानें आंबटपणा येतो' इत्यादि. वस्तुस्वभावाचीं व कार्यकारणभावाचीं ही उदाहरणें भौतिक क्षेत्रातील आहेत. या नियमांचा नैतिक क्षेत्रांत जो परिणाम घडतो, त्याचा मानवी जीविताशीं निकट संबंध आहे, म्हणून मनुष्याच्या आचरणाचा विषय निघाला असतां, या नियमांचीं अनेक रूपान्तरें व्यवहारांत लागू करण्याचा परिपाठ पडून गेला आहे. उदाहरणार्थ, ( १ ) लोकांनीं आपणाशीं जसें वागावें अशी आपण इच्छा करितों, तसेंच आपण त्याशीं वागावें; ( २ ) जसें करावें तसें भरावें.

( ३ ) भद्रकृत्प्राप्नुयाद्भद्रमभद्रं चाप्यभद्रकृत्।

( ४ ) भद्रकृन्नहि सीदति

—**कथासरित्सागर**

याचा अर्थ असा कीं—( ३ ) चांगलें करणाराचें चांगलें होतें आणि वाईट करणाराचें वाईट होतें. ( ४ ) चांगलें करणारास दुःख होत नाहीं.

यावरून असें ध्यानांत येईल कीं, निसर्ग सारखा असून कार्यकारणभावानें बद्ध असतो—हें सनातन सूत्र मनुष्याचा विचार, उच्चार, आचार यापासून तों भूगोल, खगोल यापर्यन्त सर्वत्र लागू पडतें. सृष्टींत हवी ती गोष्ट एकाएकीं घडणें अशक्य आहे. भौतिक क्षेत्राप्रमाणेंच, हा नियम नैतिक क्षेत्रास लागू होतो. काम, क्रोध, लोभ,

मोह, मद, मत्सर यांची तुलना अग्नीशीं करण्याचा बहुतेक कवींचा सांप्रदाय आहे. हे मनोवेग उत्पन्न करण्यांत ईश्वराचा जो नियम आहे तो मोडला असतां त्यांस अग्नीचें स्वरूप प्राप्त होतें आणि मग तें दाह केल्याशिवाय सोडीत नाहींत. या सर्व मनोवेगांस अशुभ म्हणण्याची चाल आहे, कारण अज्ञानामुळें ईश्वरी सूत्राचें उल्लंघन होतें व अन्तस्ताप होऊन रोग, असमाधान, दुःख, विपत्ति, शोक वगैरे बाह्य परिणाम घडतात. सर्वांशीं सहानुभूति, प्रेम, शुभेच्छा, शुद्धभाव इत्यादि श्रेष्ठ गुण संपादन केले असतां आपली वागणूक ईश्वरी सूत्राशीं संगत होते आणि त्यापासून आरोग्य, शान्त परिस्थिति, विजय, अभ्युदय वगैरे परिणाम होतात. ईश्वरी सूत्र सर्वकाल गुप्त राहिल्यानें मनुष्याची वागणूक मात्र उलट होते.

( श्लोक )

पुण्यस्य फलमिच्छन्ति पुण्यं नेच्छन्ति मानवाः ॥
न पापफलमिच्छन्ति पापं कुर्वन्ति यत्नतः ॥ १

—विद्यारण्य

म्हणजे, ज्याला त्याला चांगल्या फलाची हांव असते, पण चांगलें कर्म करण्याचा तिरस्कार वाटतो. तसेंच, वाईट कर्म करावयाचें, पण चांगल्या फलाची इच्छा करावयाची. ज्ञानी पुरुष मात्र ईश्वरीसूत्राविषयीं सदोदित जागरूक रहातो.

सर्व विश्वास व्यापून टाकणाऱ्या सनातन नियमाचें परिपालन सर्वांनीं अवश्य केलें पाहिजे. न्याय, प्रेम, भूतदया, संमीलन हे आज्ञापालनाचे परिणाम समजल्या-

बरोबर, आज्ञेचें उल्लंघन केलें असतां विपरीत दुःखावस्था येणार हेंहि कळलें पाहिजे. सर्व अवस्थांमध्यें सहनशक्ति प्रकट करणें, सर्व अवस्थांपासून शहाणपण शिकणें, आणि सर्व अवस्थांतून सुटण्याचा मार्ग काढण्यास झटणें हेंच ईश्वरीसूत्राचें खरें पालन होय. सर्व सामर्थ्याचा व दुर्बलपणाचा उगम अन्तर्यामीं असतो, तसेंच सर्व सुखदुःखांचा प्रभाव चैतन्यापासून होतो. म्हणून व्यवस्थित रीतीनें ज्ञानप्राप्ति झाल्याशिवाय अभ्युदय व शान्ति यांचा लाभ होण्याचा संभव नाहीं. लहान थोर, श्रीमंत-गरीब, यजमान-चाकर,—कोणीहि मनुष्य घ्या, जो तो आपल्या परिस्थितीचा कंटाळा करितो आणि त्यास समाधान मुळींच वाटत नाहीं. यासाठीं अनेक अवस्थांचें परीक्षण करून त्यांतून सुटण्याचा मार्ग काढणें अवश्य आहे.

सर्व लोकांची अशी तक्रार असते कीं—काय करावें, परिस्थिति फार वाईट आहे, भौतिक अवस्था सुधारेल, तर पाहिजे तें करून दाखवितां येईल, नशीबच खोटें त्याला उपाय नाहीं. यास उत्तर एवढेंच आहे कीं— अगोदर आपल्या अन्तर्यामींची स्थिति सुधारण्याचा निश्चय केला पाहिजे. चैतन्याची अवस्था नीट केली, म्हणजे इष्ट परिस्थिति घडून येण्यास उशीर नाहीं. सर्व सत्याचे मार्ग प्रथमतः अवघड वाटतात, त्याप्रमाणें हा उपाय प्रथमदर्शनीं अशक्य वाटेल, परंतु जर मनाला शिस्त लावून दिली, दोष काढून टाकिले, चैतन्यशक्तीस प्रकट होण्यास योग्य संधि दिली, तर परिस्थितींत अपूर्व फरक दृष्टीस पडेल. पुढें पुढें उत्तम संधि प्राप्त

होतील व त्यांचा उपयोग करण्याची शक्ति येईल. न बोलावतांहि मित्रमंडळी प्रेमानें येईल आणि जसा लोहचुंबक लोखंडाकडे धांव घेतो, तद्वत् उत्तम ग्रंथ हातांत पडतील व सर्व प्रकारचें साहाय्य मिळेल.

समजा तुम्ही गरीब आहां, तुम्हांस मित्रांचें साहाय्य नाहीं व दुःखाचें ओझें कमी व्हावें अशी तुमची इच्छा आहे. कदाचित् तुम्ही म्हणत असाल कीं चांगल्या आईबापांच्या पोटीं जन्मास आलों असतों तर बरें झालें असतें, तुमचा धनी निर्दय असेल, आपल्या दारिद्र्याबद्दल व विपत्तीबद्दल तुम्ही ईश्वरास नांवें ठेवीत असाल. तरि, तुम्ही या तक्रारी सोडून द्या, असा त्रास करून घेऊं नका, कारण तुम्हीं ज्या गोष्टी सांगितल्या त्यांपासून तुमचें दारिद्र्य व विपत्ति उत्पन्न झालेल्या नाहींत, मुख्य रोग तुमच्याच अन्तःकरणास झालेला आहे, म्हणून उपाय सुद्धां तेथेंच केला पाहिजे. तुम्ही तक्रार करीत आहां यावरूनच तुम्ही त्या स्थितीस योग्य आहां असें ठरतें. सर्व उद्योगाचें व प्रगतीचें बीज जी ईश्वराविषयीं श्रद्धा तीच तुम्हांमध्यें नाहीं असें सिद्ध होतें. नियमबद्ध अशा विश्वांत तक्रारीस जागा नाहीं व आपल्या स्थितीचा कंटाळा करणें हाच आत्मघात होय. तक्रार केल्यानें बंधनें दृढ होतात आणि अंधकारांत व्याप्ति होते, जीविताविषयींची कल्पना सुधारली म्हणजे सर्व परिस्थिति आपोआप सुधारते. ज्ञान व श्रद्धा वाढवून चांगल्या परिस्थितीस आपण योग्य झालें पाहिजे, चांगली संधि येण्यास आपल्या अंगीं पात्रता आणिली पाहिजे, व हळू हळू मनःस्थिति सुधारून जें लब्ध असे-

ळ त्याचा चांगला उपयोग करण्यास शिकलें पाहिजे. लहान वस्तूंचा उपयोग नीट रीतीनें केल्याशिवाय, मोठ्या वस्तु एकदम कधीं प्राप्त होणार नाहींत. मुलें यत्तावारीं शिकलीं म्हणजे हुशार होतात, त्याप्रमाणें जें जवळ असेल त्याचा सदुपयोग करण्यास शिकल्याशिवाय अधिक श्रेयस्कर वस्तु प्राप्त होणार नाहींत. ज्या वस्तु संग्रहीं असतील त्या क्षुल्लक असल्या तरी नीटनेटक्या केल्या नाहींत तर अस्तंगत होतील, जीं माणसें प्राप्त झालीं असतील त्यांस नीट वागविलें नाहीं तर तींहि नाहींशीं होतील, कारण तुमच्या वाईट वागणुकीमुळें तुम्ही त्यांच्या उपयोगास सर्वस्वीं अपात्र ठराल.

तुम्ही लहानशा झोंपडींत रहात असाल व भोंवतालीं घाण असून दुर्व्यसनी लोक रहात असतील, आणि प्रशस्त व आरोग्यकारक घराची तुम्ही इच्छा करीत असाल, तर प्रथम तीच झोंपडी निर्मल व नीटनेटकी राखून स्वर्गभूमीप्रमाणें स्वच्छ व सुंदर करा. आपलें साधें अन्न उत्कृष्ट रीतीनें शिजलेलें राहील अशी तजवीज ठेवा आणि जेवण्याखाण्याची नीट व्यवस्था राखा. घरामध्यें उंची गालीचे नसले, तरी घरांतील माणसांच्या मुखावरील हास्यानें शोभा आणा. जो कोणी घरीं येईल त्याचें स्वागत करून त्याशीं नीट बोलून त्याच्या चित्ताचें आकर्षण करा. असे गालीचे कधीं फाटणार नाहींत किंवा निरुपयोगी होणार नाहींत. अशी गृहव्यवस्था व लोकांशीं वागण्याची रीति ठेविली असतां, ईश्वर तुम्हांस श्रेष्ठ सदन व मनोहर परिस्थिति देईल यांत संशय नाहीं.

तुम्हास असें वाटत असेल कीं फार वेळ श्रम करावे लागतात आणि विचार करण्यास व उद्योग करण्यास संधि सांपडत नाहीं. तरि, जेवढा वेळ सांपडत असेल, तेवढ्याचाच उत्कृष्ट उपयोग करण्यास शिकावें. जो काल स्वाधीन असतो तोच जर फुकट घालविला तर अधिक वेळाची आशा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, त्यामुळें तुम्ही आळशी मात्र व्हाल.

दारिद्र्य व कालाचा अभाव हीं तुम्हास वाटतात तशीं संकटें नाहींत, आणि एवढ्यामुळेंच जर तुमची प्रगति होत नसेल तर तुम्ही त्यांवर आपल्या दोषांचें पांघरूण घालितां असें होतें व जें संकट तुम्हाला त्यांमध्यें दिसतें तें खरोखर तुमच्याच अन्तर्यामींचें असतें. तुम्ही अशी खात्री बाळगा कीं—तुम्हीच आपली चित्तवृत्ति पाहिजे तशी बनवितां म्हणून आपल्या दैवाचे कर्ते होतां, आणि चैतन्यास चांगली शिस्त लाविली म्हणजे कसें सामर्थ्य प्राप्त होतें याचा तुम्हास अनुभव येऊं लागला म्हणजे जीं तुम्हांस संकटें वाटत असतील तींच लाभदायक होतील. ज्या दारिद्र्याबद्दल तुम्हास तळमळ लागली असेल त्याच्यांतून सुटण्याकरितां सहनशक्ति, धैर्य, आशा या अमोल गुणांचा लाभ होईल, आणि कालाचा अभाव म्हणून जो तुम्ही समजत होतां त्यामुळें शीघ्रकर्तव्यता व निश्चयात्मकता या श्रेष्ठ गुणांची प्राप्ति होऊन, जी जी संधि सांपडेल तिचा उपयोग करण्याचें अद्भुत सामर्थ्य तुम्हांस येईल. अगदीं घाणेरड्या जमिनींत अत्यंत सुंदर पुष्पें निर्माण होतात, त्याप्रमाणें अतिशय गरीब व विपन्न स्थितीमध्यें देखील पृथ्वीचे केवल अलंकार

अशीं नररत्नें उत्पन्न झालेलीं आहेत. तात्पर्य, जेथें संकटांशीं झगडावयाचें असतें व अनिष्ट स्थितींतून डोकें वर काढावयाचें असतें, अशा स्थलीं सदाचाराची भरभराट होऊन बुद्धीचें पूर्ण वैभव दृष्टीस पडतें.

असेंहि होईल कीं एकाद्या जुलमी धन्याच्या हाताखालीं तुम्हाला काम करावयाचें असेल व तो तुम्हाला वाईट रीतीनें वागवीत असेल. तरि, ही अवस्था देखील तुम्हाला शहाणपण शिकविणारी समजली पाहिजे. धन्यानें क्रूरतेनें वागविलें तथापि तुम्ही त्याशीं सौम्यपणानें व गरिबीनें वागून, आत्मसंयमन व सहनशीलता यांचा अभ्यास सतत ठेविला पाहिजे. अशा विनयसंपन्न वर्तनानें तुमच्या धन्यासच आपल्या दुष्टपणाची लाज वाटेल आणि तुम्हांस चांगला धनीहि लवकर मिळेल. ह्या अनिष्ट स्थितीचा उपयोग असा होईल कीं तुमचे मानसिक व अध्यात्म सामर्थ्य वाढेल व तुम्हास इष्ट स्थिति प्राप्त होईल. तसेंच, तुम्हाला गुलामाप्रमाणें वागवितात अशी तक्रार करूं नका. आपल्या प्रतिष्ठित वागणुकीनें गुलामाच्या वरच्या पायरीचे तुम्ही आहां असें दाखवून स्वतः अहंकाराचे दास नाहीं अशी आपली खात्री करून घेतली पाहिजे. आपल्या चित्ताची बारकाईनें परीक्षा करा आणि दुष्ट विचार, संवयी किंवा वासना जर आढळल्या तर त्यांचें निर्मूलन करून टाका. जर तुम्ही कामक्रोधादिकांचे दास झाला नाहीं, तर तुम्हास कोणी गुलाम करूं शकणार नाहीं. अहंकारास वश केलें कीं प्रतिकूल अवस्था दूर होतील यांत शंका नाहीं.

श्रीमंत लोक तुम्हाला छळतात असें म्हणूं नका.

तुम्ही जर श्रीमंत झालां तर असे वागणार नाहीं कशावरून ? ईश्वरी सूत्र लक्षांत ठेवा कीं आज जो दुसऱ्याला छळतो त्याला उद्यां दुसरा छळीलच, यावांचून गत्यंतर नाहीं. कदाचित् तुम्ही पूर्वीं श्रीमंत असतांना लोकांना छळिलें असेल, म्हणून आज लोक तुम्हाला छळीत आहेत, आणि ईश्वरीसूत्राचें ऋण आज तुम्ही फेडीत आहां. यासाठीं धैर्य व श्रद्धा यांचा अवलंब केला पाहिजे. सनातन नियमाचा नीट विचार करून

( श्लोकार्ध )

सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता ।
परो ददातीति कुबुद्धिरेषा ॥

या सन्मान्य वचनाचा अर्थ ध्यानांत आणा. लोक आपल्या सुखदुःखाचें कारण होतात हा नुसता भ्रम आहे, खरोखर आपणच आपल्या सुखदुःखाचें निमित्त होतों. हें जीविताचें परम-रहस्य होय. आपल्या दोषांवर पांघरूण घालून आपली दया करण्याचा प्रघात अत्यन्त दुष्टपणाचा आहे, त्यापासून जीवात्म्याचा नाश होतो. जोंपर्यन्त हा कीटक तुमच्या हृदयास लागला आहे, तोंपर्यन्त श्रेष्ठ जीविताचा लाभ होणें दुर्घट आहे. दुसऱ्यास दोष लादण्याचें सोडून देऊन आपल्या पापी विचाराची, उच्चाराची किंवा आचाराची कधीं क्षमा करितां कामा नये. शुद्ध ज्ञानाची व निर्मल मंगलस्वरूपाची प्राप्ति याच मार्गानें होईल.

दारिद्र्य व इतर अनिष्ट अवस्था यांतून सुटण्यास एवढाच उपाय आहे कीं आपण सदाचरणी व्हावें आणि अध्यात्मसामर्थ्य संपादावें. जो सद्गुणी व संतुष्ट असतो

तोच खरा श्रीमान् होय व ज्याच्या हृदयांत सर्वकाल चिन्ता असते तो दरिद्री समजावा. खरा अभ्युदय हवा असेल, तर सर्वकाल सद्गुणाचा आश्रय केला पाहिजे. नेहमीं भरभराट पाहिजे हाच जीविताचा उद्देश बाळगणें वेडेपणाचें आहे, कारण तेणेंकरून आपणच आपलें नुकसान करून घेतों. आत्मीय पूर्णता व्हावी व परोपकारांत रत असावें असा हेतु धरल्यास, सद्गुणाचा लाभ होऊन श्रद्धा वृद्धिंगत होईल. सद्गुणांचा संचय हीच खरी संपत्ति होय. चित्तशुद्धि झाली कीं जीविताची शुद्धि झाली म्हणून समजावें. काम, क्रोध, द्वेष, मद, गर्व, दुर्व्यसन, लोभ—हें दारिद्र्य होय आणि प्रेम, अनुकंपा, सहानुभूति, सहनशीलता, औदार्य, नम्रता, सौम्यपणा, विनय, क्षमा—हीं संपत्ति होय.

गरीब लोक जसे आपल्या स्थितीस कंटाळलेले असतात, त्याप्रमाणेंच श्रीमंत लोकांचेंहि आपल्या स्थितीबद्दल समाधान होत नाहीं. यावरून असें प्रमेय सिद्ध होतें कीं खरें सुख बाह्य स्थितीवर अवलंबून न रहातां अन्तर्यामींच्या अवस्थेच्या स्वाधीन असतें. समजा, तुम्ही धनी आहां आणि हाताखालच्या लोकांपासून तुम्हाला नेहमीं त्रास होत असतो. चांगले चाकर मिळत नाहींत, यदाकदाचित् मिळाले तरी लवकर सोडून जातात. जास्त पगार देऊन व आणखी फायद्याच्या सवडी देऊन सुद्धां स्थिति सुधारत नाहीं. यावर उपाय हाच कीं या सर्व त्रासाचें बीज चाकरांमध्यें नसून तुमच्या अन्तर्यामांतच आहे असें समजलें पाहिजे. तुम्ही सूक्ष्म विचार केला असतां या सर्वाचें कारण तुम्हाला लवकर सांपडेल.

तुम्ही जरी आपल्या भाषणांत दाखविलें नाहीं, तरी चाकरांशीं वागतांना कांहीं तरी खाजगी फायद्याची इच्छा किंवा गुप्त संशय किंवा दुष्टपणा तुम्ही प्रगट करीत असाल, म्हणून त्याची प्रतिक्रिया तुम्हांवर घडत असेल. यासाठीं चाकरांस ममतेनें वागवा, त्यांच्या सुखसमाधानाचा विचार करा आणि जबरीनें काम घेऊं नका. मग तेच चाकरलोक आपले श्रम विसरून तुमच्या कल्याणाची इच्छा करितील आणि जो धनी आपणावर पोटासाठीं अवलंबून रहाणाऱ्या चाकरांच्या बऱ्यासाठीं झटत असतो, तो खरोखर धन्य समजला पाहिजे. मग अशा धन्याला कुरकूर करण्यास जागाच रहाणार नाहीं.

तुम्हाला कोणी मित्र मिळत नाहीं असें वाटत असेल, तर लोकांशीं स्नेहभावानें वागा म्हणजे स्नेह्यांची गर्दी होऊन जाईल. ज्या ज्या अनिष्ट स्थितीमुळें जीवितांचें ओझें वाटत असेल, त्यांतून सुटण्याकरितां आत्मसंयमन व चित्तशुद्धि करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्वार्थपर वृत्तींवर दाब ठेविल्यानें दारिद्र्य वगैरे विपत्ति दूर होतात. तसेंच द्रव्याचा किंवा द्रव्योत्पादक स्थितीचा नाश झाला म्हणून धैर्याचा व प्रामाणिकपणाचा लय होण्यास कांहीं एक कारण नाहीं, आणि चमत्कार हा आहे कीं असा कांहीं जबरदस्त नाश झाला, तरच संपत्ति, अधिकार, सुख हीं मिळूं शकतात. जो अहंकाराच्या स्वाधीन होतो, तो आपला शत्रु होय आणि त्याचे भोंवतालीं शत्रु जमतात. जो अहंकाराला जिंकतो तो स्वसंरक्षक होऊन संपूर्ण विश्वाला जिंकून टाकितो. यासाठीं चित्ता-

ची शुद्धि करण्यास प्रत्येकानें अहर्निश झटलें पाहिजे.

चित्त स्वाधीन होऊन शुद्ध झाल्यावर त्यामध्यें अपूर्व सामर्थ्य उत्पन्न होतें व त्यामुळें शुभाचे किंवा अशुभाचे प्रवाह विश्वामध्यें कसे पसरतात हें एक मोठें जीवितांचें रहस्य होय. ह्या चैतन्यशक्ति प्राचीनकाळीं इतक्या प्रबल असत कीं तेणेंकरून अपूर्व ज्ञान प्राप्त होऊन भूत, वर्तमान, भविष्यत् गोष्टी देखील कळत असत. ह्याच चैतन्यशक्तींस अनिष्ट दिशा लागली असतां राष्ट्रीय संकटें उद्भवतात. युद्धें, अवर्षण, भयंकर साथी हे अशाच प्रकारचे परिणाम होत.

सर्व विश्व चैतन्यापासून झालेलें आहे. जड द्रव्याच्या शेवटच्या पृथक्करणावरून असें सिद्ध होतें कीं तें चैतन्याचेंच कार्य होय. मानवी कृतींचे सर्व पदार्थ प्रथम मनुष्याच्या चित्तांत आकार पावून नंतर व्यक्त झालेले आहेत. ग्रंथकार, चित्रकार, शिल्पकार—कोणीहि घेतला तरी चित्ताच्या पातळीवर सर्व वस्तु अगोदर बनवीत असतो, मग त्यांस पूर्ण व मनोहर रूप देऊं लागतो आणि शेवटीं त्यांस इंद्रियग्राह्य पातळीमध्यें आणून सोडितो.

ईश्वराचें सर्वशक्तिमत्व व श्रेष्ठत्व यांवरील पूर्ण श्रद्धेशीं आपले विचार जुळविण्याचा अभ्यास ठेविला असतां शुद्ध सत्त्वाशीं समकार्यता होऊन अशुभाचा नाश कसा होतो याचा अनुभव येऊं लागतो, मग मोक्षाचें खरें ज्ञान होऊन मंगलस्वरूप ईश्वराचें तेज चमकूं लागतें. अशी स्थिति प्राप्त होण्यास भय, चिंता, संशय, निराशा, द्वेष, त्रास यांपासून निर्मुक्त झालें पाहिजे. ह्या

मनाच्या अशुभ वृत्ति केवळ अज्ञानापासून व ईश्वराव-रील अश्रद्धेपासून उठतात. त्यांचा साक्षात् उगम अहंकारापासून होतो, आणि या वृत्ति उत्पन्न झाल्या असतां अशुभाचें सामर्थ्य कबूल केल्यासारखें होतें. अशुभाचें सामर्थ्य कबूल करणें हें नास्तिकपणाचें व्यवहार्य स्वरूप होय. अशा अभावरूपी व आत्मघातक चैतन्यावस्थेंत राहून तदधीन होणें हाच खरा अनीश्वरपणा होय. अशा चैतन्यावस्थेंतून निर्मुक्त होणें अत्यन्त इष्ट असून हीच मोक्षप्राप्ति आहे, आणि जोंपर्यन्त मनुष्य या चित्तवृत्तींचा दास बनलेला असतो तोंपर्यन्त मोक्षाची आशा व्यर्थ आहे. आपल्या स्थितीचा कंटाळा येणें किंवा भय वाटणें हें दुसऱ्यास शाप देण्याइतकेंच पापकारक आहे. ईश्वराच्या न्याय्यतेवर, सर्वमंगलत्वावर व प्रेमस्वरूपावर जो श्रद्धा ठेवितो तो आपल्या स्थितीविषयीं कधीं कंटाळणार नाहीं किंवा भयत्रस्त होणार नाहीं. दुष्ट चित्तवृत्तींपासून सर्व प्रकारचें दौर्बल्य व पराजय उत्पन्न होतात आणि त्यांच्या अस्तित्वावरून शुद्ध चैतन्यशक्तींचा नाश झाला आहे असें सिद्ध होतें, कारण जर त्या शक्तींचा जोर अप्रतिहत चालला असता, तर चैतन्यास विमल स्वरूप प्राप्त झालें असतें.

या नाशकारक वृत्ति झाडून टाकण्याचा दीर्घ प्रयत्न केला असतां, प्रभावशाली जीविताचा लाभ होतो, दास्याचा लय होतो, व मनुष्यास अपूर्व सामर्थ्य प्राप्त होतें. अन्तर्यामीं व्यवस्थित ज्ञानाचा उदय होऊं लागला कीं या दुष्ट वृत्ति पळून जातात. अशुभ मुळीं नाहींच असें नुसतें विधान करण्यानें इष्टसिद्धि होत नाहीं, तरि

दृढ अभ्यासानें त्याचा नाश करण्यास शिकलें पाहिजे. तसेंच जगांत मंगल आहे एवढें म्हणण्यानें कार्य होत नाहीं, तरि दीर्घ प्रयत्नानें शुभाचा समागम करून आपलेसें करून घेतलें पाहिजे.

संयमाचा विधिपूर्वक अभ्यास केल्यानें अन्तर्गत चैतन्यशक्तींचें ज्ञान होऊं लागतें आणि मग त्यांस योग्य वळण कसें लावावें व त्यांचा यथार्थ उपयोग कसा करावा हें सामर्थ्य प्राप्त होतें. ज्या मानानें अहंकाराचा पराजय होईल व आन्तरशक्तींवर दाब बसेल, त्या मानानें बाह्य परिस्थिति आपल्या स्वाधीन होऊं लागेल. वर लिहिलेल्या दुष्ट चित्तवृत्ति नजरेस पडूं लागल्या म्हणजे आत्मसामर्थ्याचा पूर्ण अभाव सिद्ध होतो. यासाठीं या वृत्ति व्यवहारांत कसा अनर्थ करितात तें पाहूं. एकादा पुरुष ज्या त्या वस्तूचा व मनुष्याचा संशय घेऊन चरफडत रहातो, भलभलतीं भयाचीं कारणें योजून त्यांमध्यें गुंतून पडतो, व नाना तऱ्हेचे विचार मनांत आणून उगीच काळजी करीत बसतो—हीच गुलामगिरी होय, आणि बाहेरून जरी भरभराट दिसला तरी अन्तर्यामीं या वृत्तींस थारा मिळाला तर तें गुलामाचेंच जीवित होय यांत संदेह नाहीं. अशा पुरुषामध्यें श्रद्धेचा व संयमाचा पूर्ण अभाव असतो, म्हणून सामान्य व्यवहार त्याचे स्वाधीन रहात नाहींत आणि तो परिस्थितीचा दास बनून जातो. असे लोक विपत्तीपासून शहाणपण शिकतात व खडतर अनुभवानें दुर्बलाचे समर्थ होऊन जातात.

ईश्वराविषयीं परम श्रद्धा व निश्चित उद्देश ह्या जी-

विताच्या संचालक शक्ति होत. पूर्ण श्रद्धा व अढळ हेतु यांच्या योगानें सिद्धीस जात नाहीं असें कांहींच नाहीं. एकान्त श्रद्धेच्या नित्य अभ्यासानें चैतन्यशक्तींचें एकीकरण होतें, आणि जीविताच्या उद्देशास नित्य बळकटी येत गेल्यानें सिद्धीच्या विषयाकडे सर्व चैतन्यशक्तींचा प्रवाह चालू रहातो. म्हणून, जगामध्यें कोणत्याहि अवस्थेंत तुम्ही असलां, तथापि परमशान्तीच्या अभ्यासानें चैतन्यशक्तींची एकाग्रता संपादन केल्याशिवाय, यशाची, उपयुक्ततेची किंवा सामर्थ्याची आशा करणें सर्वस्वीं व्यर्थ आहे. समजा, तुम्ही व्यापारी आहां आणि अकस्मात् एकादें भयंकर संकट येण्याचा प्रसंग दिसूं लागला आहे. अशा वेळीं चिंताग्रस्त व भयभीत होऊन तुम्हास कांहीं सुचेनासें होईल. ही मनाची स्थिति अत्यन्त हानिकारक आहे, कारण जेव्हां चिन्तेचा जोर होतो तेव्हां अक्कल गुंग होऊन जाते. अशा प्रसंगीं यशप्राप्तीसाठीं पुढील उपाय योजणें अवश्य आहे. सकाळीं, दिवसां, व रात्रीं—केव्हां तरी एकान्त स्थलीं किंवा जेथें कोणाचाहि संपर्क होणार नाहीं अशा जागीं तुम्ही स्वस्थ बसावें आणि चिन्तेचा विषय अजीबात सोडून देऊन तुमच्या आयुष्यांत पूर्वी ज्या आनंददायक गोष्टी घडल्या असतील त्यांचाच विचार करावा, म्हणजे तुमच्या चित्तास शान्ति व सामर्थ्य प्राप्त होऊन तुमची काळजी दूर होईल. पूर्वीचे त्रासदायक विचार मनांत येऊं लागले, तर चित्तास शान्तीच्या पातळींत फिरून आणावें. हा प्रयत्न सिद्धीस गेला म्हणजे तुम्हास जी अडचण आली असेल,

तिजवर सर्व चैतन्यशक्तींचा संयम करावा, म्हणजे जें तुम्हास चिन्तेमुळें अवघड वाटलें असेल तें सुकर होऊन तुमची दृष्टि साफ होईल, अवधारणाशक्ति शुद्ध होईल आणि त्या प्रसंगीं कोणते उपाय योजावेत तें सुचूं लागेल. चित्ताची शान्ति व समता होण्यास असाच प्रयत्न कांहीं दिवस करावा लागेल, तथापि केव्हां तरी या कामांत यश येईल. अशा रीतीनें क्रम चालविला असतां, शान्त वेळीं योग्य उपायाची स्फूर्ति होईल व हळू हळू सिद्धि प्राप्त होईल. नित्य व्यवहारांत गुंतल्यावर, सुचलेला उपाय खोटा व मूर्खपणाचा आहे अशा विचाराची लाट तुम्हावर येईल, परंतु तिकडे बिलकुल लक्ष देतां कामा नये. चिन्तेच्या छायेनें ग्रस्त न होतां, शान्त वेळीं सुचलेल्या मार्गानेंच गेलें पाहिजे. मग तुम्हास कळूं लागेल कीं चित्ताचें साम्य राखिलें असतां प्रकाशाचा उदय अवश्य होतो व निर्णायक शक्तीस वीर्य येतें. अशा रीतीनें चित्तास शिस्त लागत गेली म्हणजे इकडे तिकडे फिरणाऱ्या चैतन्यशक्ति, शोधक दीपाच्या किरणांप्रमाणें, इष्ट विषयावर एकाग्र होतील आणि योग्य दिशेनें स्फुरण पावतील.

यावरून असें सिद्ध होतें कीं चित्ताचें साम्य व एकाग्रता हीं साधिलीं असतां पाहिजे ती अडचण दूर होते, आणि चैतन्यशक्तींस अभियुक्त दिशा लागून त्यांचा यथार्थ उपयोग केला असतां हवा तो न्याय्य हेतु शीघ्र तऱ्हेनें सिद्धीस जातो. अन्तर्यामीं प्रवेश करून तदन्तर्गत शत्रूंचें निर्दालन केलें असतां, चैतन्यशक्तींचें गुह्य सामर्थ्य कळूं लागतें, बाह्य जड पदार्थांशीं

चित्ताचा नित्य संबंध कसा असतो तें समजतें आणि त्या शक्तींची योग्य रीतीनें जोपासना केल्यास जीवितांतील नानाविध अवस्थांचें रूपान्तर व पुनर्घटना हीं कशीं होऊं शकतात हें सहज ध्यानांत येईल.

आपल्या मनांत येणारा विचार ही एक बाहेर प्रसृत होणारी शक्तीच असते आणि तिच्या प्रभावाप्रमाणें अनुकूल चैतन्यांमध्यें प्रवेश होऊन तिची शुभ किंवा अशुभ प्रतिक्रिया परत आपणावरहि घडते. चैतन्याचैतन्यांत हा निरंतर परस्परसंबंध रहातो आणि येणेंप्रमाणें चैतन्यशक्तींचा विनियम घडत असतो. जे जे स्वार्थपर व क्षोभकारक विचार उत्पन्न होतात, तितक्या विनाशकारक दुष्ट शक्तीच होत, ते अशुभाचे केवळ दूत असतात, आणि दुसऱ्या चित्तांमध्यें अशुभास उत्तेजित करण्याकरितांच बाहेर पडून तेथून ते अधिक वीर्य संपादून आपणाकडेच परत फिरतात. निःस्वार्थपर, शान्त, शुद्ध असे जे विचार असतात ते केवळ देवदूत असून अशुभ शक्तींच्या निवारणाकरितां निरामय, मंगल, आरोग्य यांचाच प्रसार आपल्या पंखांनीं करीत असतात, चिंताग्रस्तांस व दुःखितांस आनंददायक होतात व जे भग्नाशय व हतवीर्य झालेले असतात अशा लोकांस शाश्वतसुखाचा लाभ करून देतात.

यासाठीं सुविचारांचेंच चिन्तन करावें म्हणजे आपल्या बाह्य जीवितांत शुभावस्थांमध्यें त्यांचें रूपान्तर होऊन जाईल, चैतन्यशक्तींचा संयम केला असतां परिस्थितीस हवें तें रूप देण्यास आपण समर्थ होऊं. पुण्यवान् व पापी पुरुष ह्यांमध्यें असें अन्तर आहे कीं पुण्य-

वान् पुरुष अन्तर्यामींच्या सर्व शक्ति पूर्णपणें कह्यांत ठेवितो व पापी पुरुष सर्वस्वीं त्यांच्या स्वाधीन रहातो.

आत्मसंयमन, आत्मशुद्धि, आत्मसाम्राज्य यांशिवाय खरें सामर्थ्य व निरंतर शान्ति यांचा लाभ होणें दुर्घट आहे. आपल्या स्वभावास जो बळी पडतो तो अशक्त, दुःखी व जगामध्यें निरुपयोगी होऊन जातो. आपली आवड, नावड, हेय, उपादेय,—क्रोधामुळें, संशयामुळें किंवा मत्सरामुळें प्रेरित झालेल्या लहरी, क्षणोक्षणीं बदलणाऱ्या चित्तवृत्ति—यांस जिंकून टाकणें हेंच आपलें अवश्य काम आहे, आणि तें केलें असतां जीवितपटामध्यें सुखाचे व कल्याणाचे तन्तु विणले जातील. अन्तर्यामीच्या चंचल वृत्तींचा दास झाल्यानें आपणास जीवितयात्रेमध्यें लोकांचा आश्रय करून त्यांचें साहाय्य घेणें भाग पडेल. अशा रीतीनें दृढनिश्चयाची वागणूक ठेविली असतां पाहिजे तें सिद्ध होईल, इतकेंच कीं चित्तामध्यें विनाशकारक जी उचल होत असते ती बंद झाली पाहिजे. चिदाकाशांतील गुहेमध्यें चैतन्यास विश्रान्ति देण्याचा नित्य अभ्यास केला पाहिजे, म्हणजे त्रासदायक विचारांच्या जागीं शान्तिप्रद विचार स्थापिले जातील आणि दौर्बल्याच्या ठिकाणीं सामर्थ्य प्राप्त होईल. या कामांत सिद्धि मिळाल्याशिवाय जीविताच्या अनेक कार्यांवर चैतन्यशक्तींचें ऐकाग्र्य संपादण्याची आशा व्यर्थ आहे. जसा एकादा चतुर पुरुष पाणथळ प्रदेशांतील इकडे तिकडे पसरलेले उदकाचे प्रवाह एका बांधून काढलेल्या नाल्यामध्यें युक्तीनें सोडून देऊन त्या प्रदेशाचें सुपीक शेत अथवा सुंदर उपवन ब-

नवितो, त्याप्रमाणें शान्तीचा अभ्यास करून व आपल्या चैतन्यशक्ति स्वाधीन ठेवून त्यांस योग्य दिशा जो महात्मा लावूं शकतो, तोच आत्म्याचा बंधु होऊन जीवितार्चे साफल्य संपादन करितो.

क्षणिक आवेग व विचार ह्यांवर दाब ठेवण्यांत सिद्धि येउं लागली म्हणजे आपणामध्यें नवीन अद्भुत सामर्थ्य उत्पन्न होत आहे असा अनुभव येईल. जेथें पूर्वीं सर्व प्रयत्न निष्फळ होत असत तेथें नवीन गुह्यशक्ति प्रादुर्भूत होऊं लागतील आणि आत्मविश्वासानेंच तुम्ही हवें तें काम करूं शकाल. ह्या नूतन शक्तींच्या प्रादुर्भावाबरोबर ज्योतिर्मय व शुद्ध प्रकाश जागृत होईल आणि अंधकार लयास जाईल. ह्या आत्मप्रकाशाच्या विकासाबरोबर दिव्य दृष्टि व अपूर्व अवधारणाशक्ति वृद्धिंगत होऊन भविष्यत्कालाचेंहि ज्ञान होईल. ज्या मानानें असा विलक्षण फरक अन्तर्यामीं होत जाईल, त्या मानानें जीविताविषयींची तुमची कल्पना बदलेल. इतरांविषयीं तुमची मनोवृत्ति बदलली असतां, त्यांच्याहि वागणुकींत फरक पडेल. क्षुद्र विचारांवर दाब बसूं लागला म्हणजे वीर्यवान् विचार उद्भवतील आणि जितात्म्या व आत्मविद् पुरुषास होणाऱ्या अपूर्व आनंदाचा अनुभव येउं लागेल. प्रयत्नाशिवाय अजाणपणें असा आनंद व सामर्थ्य उद्भवूं लागलें, म्हणजे बलवान् लोक देखील आकर्षिले जातील, लोकांवरील आपली सत्ता वाढेल आणि बदललेल्या आन्तर जगताबरोबर बाह्य स्थितींत सुद्धां फरक पडत जाईल.

मनुष्याचे रिपु घरांतच असतात, म्हणून ज्याला

बलवान्, सुखी व उपयुक्त व्हावयाचें असेल, त्यानें भिकार, अशुद्ध, घाणेरड्या विचारांस रजा दिली पाहिजे. जसा एकादा शहाणा गृहस्थ आपल्या चाकरांवर अंमल चालवितो आणि पाहुण्यास आपणच आमंत्रण करितो, तद्वत् आत्मज्ञ पुरुष वासनांवर हुकूम चालवितो आाणि चित्तहर्म्यामध्यें इष्ट विचारांसच अधिकारानें येऊं देतो. आत्मजयाच्या कामांत यत्किंचित् यश आलें तरी मनुष्याचें सामर्थ्य वाढतें व ह्या दैविक गुणाच्या प्राप्तीमध्यें जो पूर्णपणें विजया होतो त्यास अश्रुतपूर्व ज्ञानाचा लाभ होतो आणि अन्तःसामर्थ्य व शांति पावून त्याला असा अनुभव येऊं लागतो कीं जितात्म्या पुरुषास विश्वांतील सर्व शक्ति सहाय होतात व त्याचें रक्षण करितात.

यावरून पहातां खरी श्रद्धा व पूर्ण शुद्धि जेथें रहातात, तेथेंच आरोग्य, यश व सामर्थ्य हीं उत्पन्न होतात आणि रोग, अपयश व विपत्ति यांस भक्ष्य न सांपडल्यामुळें त्यांचा प्रादुर्भाव होतच नाहीं. मानसिक स्थितीवरून भौतिक अवस्था विकार पावतात हें प्रमेय आधुनिक शास्त्रकारांसहि पटत चाललें आहे. मनुष्य म्हणजे केवळ शरीर होय हें जडवाद्यांचें प्राचीन मत लुप्त होत आहे आणि त्याचे जागीं असें तत्त्व स्थापिलें जात आहे कीं मनुष्य आपल्या शरीराहून अत्यंत श्रेष्ठ असून तें शरीर देखील विचारसामर्थ्यानेंच बनलें जातें. मनुष्य क्षयी झाला म्हणजे निराश होतो या वचनावर विश्वास न ठेवितां, लोक असें मानूं लागले आहेत कीं मनुष्याचें मन निराश झालें म्हणजे तो क्षयी होतो.

भविष्यत्कालीं सर्व लोक असें म्हणूं लागतील कीं संपूर्ण रोगांचें बीज फक्त चित्तांतच आहे.

विश्वांतील कोणतेंहि अशुभ घेतलें, तरी त्याचा उगम चैतन्यामध्यें सांपडेल. पाप, रोग, दुःख, विपत्ति हीं सृष्टींतील नियमानुसार खरोखर घडत नाहींत आणि निसर्गधर्मांत अनुस्यूत नसून वस्तुगत संबंधांच्या साक्षात् अज्ञानामुळेंच उत्पन्न होतात.

प्राचीन काळच्या ऋषींची रहाणी इतकी शुद्ध व साधी होती कीं शंभर वर्षांहून अधिक काल देखील ते जगत. ते असें समजत कीं रोग म्हणजे केवळ ईश्वरी सूत्राचें उल्लंघन असून रोगी मनुष्य सकलांच्या उपहासास पात्र आहे. यासाठीं रोग हा क्रुद्ध झालेल्या देवाचा कोप आहे असें न मानितां आपल्या चुकीचें किंवा पापाचें प्रायश्चित्त आहे असें समजावें म्हणजे निरामयाची प्राप्ति आपणास लवकर होईल. जे रोगास आमंत्रण करितात त्यांकडेच तो येतो, ज्यांचें शरीर व मन रोगास अनुकूल असतें तेच रोगी होतात, आणि ज्यांच्या वीर्यशाली शुद्ध चैतन्यकोशापासून अनामयकारक व जीवनोत्पादक प्रवाह निघतात अशा लोकांजवळून रोग दूर पळून जातात.

क्रोध, जीविताचा कंटाळा, मत्सर, हव्यास अशा प्रतिकूल मनोवृत्तींच्या अधीन होऊन पूर्ण आरोग्याची आशा करणें म्हणजे अशक्य गोष्टीचीच इच्छा करणें आहे, कारण अशा मार्गानें रोगाचीं बीजेंच चैतन्यामध्यें आपण पेरीत असतों. शहाणा मनुष्य अशा वृत्ति मुळींच टाळीत असतो, कारण तो असें जाणतो कीं

वाईट मोऱ्या किंवा दूषित घरें यांपेक्षांहि अशा वृत्ति भयंकर आहेत. आपण भौतिक रोग व दुःखें यांपासून दूर रहावें आणि पूर्ण अनामयाचा उपभोग घ्यावा अशी इच्छा असेल, तर आपल्या चित्तास व्यवस्था लावून विचारांची जुळणी केली पाहिजे. मंगलदायक व प्रेमपूर्ण असेच विचार असावे, शुभेच्छारूपी अमृताचें अभिसरण सर्व नाड्यांतून होऊं द्यावें, म्हणजे दुसऱ्या औषधाची गरज नाहीं. द्वेष, मत्सर, त्रास, संशय हीं टाकून दिलीं असतां पित्त, अपचन, अशक्ति, संधिवात वगैरे पळून जातील. ह्या विनाशकारक व अनीतिवर्धक चित्ताच्या संवयींस चिकटून राहिलें असतां शरीर रोगग्रस्त झाल्याची तक्रार करण्यांत हंशील नाहीं.

मानसिक संवयी व शारीर अवस्था यांचा किती निकट संबंध असतो तें पुढील गोष्टीवरून चांगलें लक्षांत येईल. एका गृहस्थास भयंकर रोग जडला होता. त्यानें नामांकित वैद्यांचा आश्रय केला, अनेक उपाय केले, परंतु रोग हटला नाहीं. एका रात्रीं त्याला स्वप्नांत साधुपुरुषाचें दर्शन झालें. साधूनें सांगितलें कीं मजबरोबर चल आणि एका तीर्थांत स्नान कर म्हणजे रोगनिर्मुक्त होशील. तो गृहस्थ साधुपुरुषाबरोबर गेला आणि त्यानें दाखविलेल्या जलप्रवाहांत मज्जन करिता झाला. उदकाबाहेर डोकें काढल्याबरोबर तो रोगनिर्मुक्त झाला, पण त्याला जवळच्या भिंतीवर ‘ त्याग कर ’ हे दोन शब्द दिसले. जागा झाल्यावर त्याला स्वप्नाचा अर्थ समजला आणि तेव्हांपासून, त्याला जी एक पापी सं-

वय जडली होती, तिचा त्यानें त्याग केल्यामुळें थोड्या दिवसांत तो खरोखर रोगनिर्मुक्त झाला.

पुष्कळ लोकांची अशी तक्रार असते कीं अतिशय काम करावें लागत असल्यामुळें त्यांची प्रकृति ढांसळली आहे. बहुधा ह्या स्थितीचें कारण असें असतें कीं ते लोक आपल्या शक्तीचा दुरुपयोग करितात. तंटाबखेडा न करितां काम करण्यास शिकलें असतां शरीरप्रकृतीस कांहींएक इजा होणार नाहीं. उगीच काळजी करीत बसणें किंवा क्षुब्ध होणें, किंवा बारीक सारीक गोष्टींबद्दल विनाकारण त्रास करून घेणें म्हणजे प्रकृतीच्या अस्वास्थ्याला आमंत्रण देणें होय. शारीरिक किंवा मानसिक, कोणतेंहि काम असो, त्यापासून फायदा होऊन आरोग्याचा लाभ होतो, आणि जो शान्तीनें व सातत्यानें झटून काम करितो, काळजी किंवा त्रास करून घेत नाहीं व हातीं घेतलेल्या कामाशिवाय ज्याला दुसऱ्या कशाची आठवण होत नाहीं, त्याच्या हातून जितकें काम होतें, तितकें उगीच धडपड व घाई करणाराचे हातून घडत नाहीं आणि दुसऱ्यापेक्षां त्याची प्रकृति निरोगी रहाते.

आरोग्य व यश यांचें सर्वकाल साहचर्य असतें, कारण चैतन्य-कोशाशीं तीं समवाय-संबंधानें रहातात. चित्त निष्पाप झालें असतां शरीरास आरोग्य प्राप्त होतें इतकेंच नाहीं, तरि मनुष्याच्या योजनेप्रमाणें सर्व कार्यें एकामागून एक घडून येतात. याकरितां विचारांची व्यवस्था लाविली असतां जीवित सुद्धां व्यवस्थित होतें. पूर्वग्रह व मनोवेग उत्तेजित झाले असतां त्यांवर

शान्तीनें दाब ठेवावा म्हणजे संकटें आपला अंमल करीत नाहींत, आणि श्रद्धेची जोड मिळाली असतां कोणतीहि विपत्ति येऊं शकत नाहीं. ईश्वरभक्तीनें पाहिजे तें चिरस्थायि कार्य सिद्धीस जातें. ईश्वरावर श्रद्धा, सनातन सूत्रावर श्रद्धा, अंगीकृत कार्यावर श्रद्धा व तें काम सिद्धीस नेण्याबद्दल आपल्या सामर्थ्यावर श्रद्धा—अशा भक्कम पायावर हवी ती इमारत उठेल यांत संदेह नाहीं. अन्तर्यामींच्या श्रेष्ठ प्रेरणे बरहुकूम चालणें, ईश्वरावर भक्ति ठेवणें, अन्तःप्रकाशावर व विवेकबुद्धीच्या सांगणीवर विश्वास राखणें, निर्भयपणें व शान्तीनें उद्योग चालविणें, ईश्वरीसूत्र अबाधित असून जें आपलें आहे तें मनोरथाप्रमाणें खास मिळणारच अशी खात्री बाळगणें—हीच श्रद्धा होय, हेंच श्रद्धासंपन्न जीवित होय. अशा श्रद्धेच्या सामर्थ्यानें सर्व प्रकारचे संशय व अडचणी दूर होतात. याकरितां असामान्य श्रद्धेची अमूल्य संपत्ति मिळविली पाहिजे, कारण ह्याच रत्नापासून सौख्य, यश, शान्ति, सामर्थ्य हीं प्राप्त होतात. या श्रद्धेमुळें जीविताचें महत्त्व वाढून विपत्तीचा मुळींच अंमल चालत नाहीं. या श्रद्धेवर उभारलेली इमारत—शाश्वत पायावर शाश्वत द्रव्यांनीं बांधलेली असते—म्हणून ती कधीं ढासळत नाहीं, व मृत्तिकेमध्यें लय पावणाऱ्या द्रव्यांहून व पदार्थांहून ती श्रेष्ठ असते. विपत्तीच्या गर्तेमध्यें लोळत असतां किंवा संपत्तीच्या शिखरावर उड्या मारीत असतां, या श्रद्धेवर अवलंबून रहाणें भाग आहे, कोणताहि प्रसंग आला तरी श्रद्धेचा आश्रय सोडितां कामा नये. या

श्रद्धेस चिकटून राहिलें असतां असें सामर्थ्य प्राप्त होईल कीं तेणेंकरून अशुभ शक्तींचें सहज निवारण होऊं शकेल आणि प्रपंचामध्यें कधींहि न मिळणाऱ्या यशाचा लाभ अवश्य होईल.

ही प्रभावशाली श्रद्धा प्राप्त झाली असतां पुढें यश येईल किंवा अपयश येईल याबद्दल संशय घेण्याचें मुळींच कारण नाहीं, अशा मार्गानें यश ठेवलेलेंच असतें. तसेंच परिणामाबद्दल सुद्धां काळजी नको. कारण सुविचार व सदुद्योग यांपासून चांगले परिणाम होणारच. नुसती इच्छा करण्यांत अर्थ नाहीं, कारण निराशा होणारच; जशी रहाणी असेल तशीं फळें येतील. मूर्ख लोक नुसती इच्छा करितात आणि मग रडत बसतात, पण शहाणे लोक अगोदर उद्योग करितात आणि मग परिणामाची वाट पहातात.

यश, अपयश, सामर्थ्य, जीवित—हीं सर्व आपल्याच हातांत असतात, कारण प्रबल विचारांमुळें दैव निश्चित होतें. याकरितां विशुद्ध, प्रेमळ, सुखकारक असेच विचार बाहेर पडूं द्यावे, म्हणजे चोहोंकडून आशीर्वाद मिळतील, आणि आपल्या घरीं शान्तता नांदेल. दुष्ट, अशुद्ध, दुःखकारक—असे विचार बाहेर आले तर आपणावर शिव्याशापांचा पाऊस पडेल, आणि भय व त्रास यांमुळें झोंप सुद्धां येणार नाहीं. आपणच आपल्या नशीबाचे निःसंशय कर्ते आहों, मग तें नशीब कांहीं असो. आपलें अन्तःकरण मोठें, प्रेमळ व निःस्वार्थपर केलें पाहिजे, म्हणजे आपलें सामर्थ्य वाढेल आणि निरंतर यश प्राप्त होईल. स्वार्थाच्या म-

र्यादेमध्यें चित्त अडकून राहील, तर आपण लक्षाधीश झालों तरी आपलें सामर्थ्य व यश हीं अल्पच रहातील. यासाठीं आपलें चित्त शुद्ध व निःस्वार्थपर असूं द्यावें आणि एकदिलानें श्रद्धेचा अवलंब करावा म्हणजे आरोग्य व यश हीं प्राप्त होऊन महत्त्व आणि सामर्थ्य यांचाहि लाभ होईल.

तुमची स्थिति तुम्हास आवडत नसेल किंवा कामांत मन लागत नसेल, तरी देखील तुम्हीं आपलें कर्तव्य अत्यन्त तत्परतेनें केलें पाहिजे. चांगली स्थिति प्राप्त होईल व चांगले दिवस येतील अशी आशा तुम्हीं सर्व काल बाळगिली पाहिजे. कोणतेंहि काम असलें, तरी त्यावर चित्ताचें ऐकाग्र्य करावें आणि जितका उत्साह अंगीं असेल तितका कामीं लावावा. लहान कामें बिनचूक करितां आलीं, म्हणजे मोठालीं कामें सहज मिळूं शकतात. हळू हळू वर चढावें म्हणजे अधःपात होणार नाहीं, व हेंच खऱ्या सामर्थ्याचें बीज होय. साधनांचा व्यवस्थित उपयोग करण्यास शिकावें आणि पाहिजे तेव्हां सर्व शक्ति एका बिंदूमध्यें आणण्याचा अभ्यास करावा. मूर्खलोक भलभलत्या कामांमध्यें आपलें शरीरसामर्थ्य दवडितात आणि हलकट भाषणांत, धंद्यांत किंवा स्वार्थपर वादविवादांत आपलें मानसिक व अध्यात्म सामर्थ्य फुकट घालवितात.

जेव्हां इतर लोक एकाद्या मनोवृत्तीच्या किंवा मनोवेगाच्या स्वाधीन होतात, तेव्हां जो मनुष्य शान्त व स्थिर असतो तोच समर्थ समजावा. तसेंच जो मनुष्य आत्मसंयमन करून आपल्या चित्तावर अंमल चा-

लवितो तोच दुसऱ्यास हुकूम करण्यास किंवा त्यावर दाब ठेवण्यास योग्य होतो. अविचारी, लहरी, भित्रे, हलकट अशा लोकांनीं दुसऱ्याचा आश्रय करून राहिलें पाहिजे, नाहीं तर त्यांचे हाल होतील. जे शांत, निर्भय, विचारी व गंभीर असतात अशा लोकांनीं अरण्यांत किंवा पर्वतावर जाऊन एकान्ताचा आश्रय केला, तरी त्यांचें सामर्थ्य वाढतच जाईल आणि मनुष्यमात्रास उद्विग्न करून टाकणाऱ्या चित्तप्रवाहास तेच लोक आंवरून धरितील.

मनोवेग ( Passion ) म्हणजे शक्ति नव्हे, तरि शक्तीचा दुरुपयोग आहे. मनोवेगामुळें शक्तीचें एकीकरण न होऊन ती प्रसरण पावते. एकाद्या पर्वतशिखरावर किंवा प्रचंड खडकावर जोरानें आदळणाऱ्या वादळाप्रमाणें मनोवेगांची गति असते, परंतु त्या खडकाप्रमाणें किंवा शिखराप्रमाणें शक्ति शान्त व अचल असते. अशी शक्ती तुम्हांमध्यें नसेल, तर तुम्ही ती अभ्यासानें संपादन करूं शकाल आणि ह्या सामर्थ्याला आरंभ झाला कीं शहाणपणाला आरंभ झालाच असें समजावें. हा आरंभ करण्याचा मार्ग असा आहे कीं पोरकट व हलकटपणाची वागणूक सोडून दिली पाहिजे. मंडळींत बसून क्षुद्र भाषण करणें, दुसऱ्याची निंदा करणें, थट्टा-मस्करी करून हंशा पिकविणें— अशा कृत्यांनीं स्वशक्तीचा व्यय मात्र फुकट होतो असें समजून तीं वर्ज करावीं, कारण अशा मार्गानें अध्यात्म शक्तीचा व जीविताचा नाश मात्र होतो. मानसिक शक्तींचा असा दुरुपयोग करणें सोडून दिलें अ-

सतां खरें सामर्थ्य कसें असतें हें कळून येईल आणि ज्या प्रचंड शारीरवेगांनीं व मनोवेगांनीं चैतन्य बद्ध होऊन गेलें आहे त्यांवर जय मिळविण्यास तुम्ही समर्थ व्हाल व मग तुमची प्रगति सुलभ होईल.

सर्वांत उत्कृष्ट उपाय असा आहे कीं—जीविताचा एक उद्देश कायम ठेवावा, आणि तो हेतु न्याय्य व उपयुक्त असून त्याच्या सिद्धतेकडे सर्व शक्ति अर्पण कराव्या. कशानेंहि चित्तविक्षेप होऊं देऊं नये आणि असें ध्यानांत ठेवावें कीं संशयात्मा पुरुष चंचल असून नाश पावतो. पाहिजे त्यापाशीं शिकावें पण याचना करूं नये, आपल्या कामाची पूर्ण माहिती करून घेऊन तें आपलेंसें करावें, म्हणजे विवेक बुद्धीस वश होतां होता यशप्राप्ति होईल, तुमची दृष्टि विस्तृत होईल आणि जीविताची रम्यता व खरा उद्देश हळू हळू समजूं लागतील. चित्तशुद्धि झाल्यावर पूर्ण आरोग्य प्राप्त होईल, श्रद्धेचें पाठबळ मिळालें असतां यश येईल, जितात्मा होऊन सामर्थ्य मिळेल, आणि हातीं घेतलेल्या कामाचा भरभराट होईल. ईश्वरी सूत्राशीं संमेलन होऊन परमेश्वराशीं एकरूपता झाली असतां तुम्ही एकीकडे पडणार नाहीं व अहंकाराचे दास होणार नाहीं. तुमचें आरोग्य कायम राहील, कल्पनातीत असें निरंतर यश प्राप्त होईल, तुमचें सामर्थ्य वाढत जाईल आणि विश्वचालकाच्या तत्त्वांत तुम्ही मिळून जाल.

यावरून पहातां, शुद्ध अन्तःकरण व व्यवस्थित चित्त हें आरोग्याचें बीज होय, पूर्ण श्रद्धा व श्रेष्ठ उद्देश हें

यशाचें बीज होय, आणि दृढनिश्चयानें वासनांवर दाब ठेवणें हें सामर्थ्याचें बीज होय.

मनुष्यमात्रास सुखाचा हव्यास अतिशय असतो, तथापि जिकडे तिकडे सुखाची वाण दृष्टीस पडते. बहुतेक गरीब लोकांस द्रव्याची फार हौस असते, कारण त्यांस असें वाटत असतें कीं द्रव्यानेंच पूर्ण सुखाची प्राप्ति होऊं शकते. बहुतेक श्रीमंत लोकांच्या सर्व इच्छा तृप्त होतात व लहरीप्रमाणें गोष्टी घडून येतात, परंतु हवें तें मिळाल्यानेंच जीविताचा कंटाळा येतो आणि गरिबा इतकी सुद्धां त्यांस सुखाची प्राप्ति होत नाहीं. अशी स्थिति कां होते याचा सूक्ष्म विचार करून पहातां, असें दिसतें कीं नुसत्या बाह्य वस्तूंवर सुख अवलंबून रहात नाहीं आणि त्या वस्तु नसल्या म्हणजे दुःख होतें असेंहि नाहीं, कारण असें जर घडेल तर गरीब लोक नेहमीं दुःखी होतील व श्रीमंत लोक सर्वदां सुखांत रहातील, पण उलट स्थिति मात्र खरी असते. अनेक श्रीमंत लोक असें कबूल करितात कीं द्रव्यप्राप्तीमुळें व्यसनासक्ति होऊन जीविताची गोडीच नाहींशी होते आणि गरीब स्थिति असतांना जी सुखप्राप्ति होत असते ती देखील श्रीमन्ती आल्यावर नष्ट होते. मग असा प्रश्न उत्पन्न होतो कीं—सुख हें आहे तरी काय व तें कसें मिळवावें ? दुःख नित्य असून सुख केवळ मायिक असतें—असें मानावयाचें कीं काय ?

एकंदर जगाचें उत्साहपूर्वक निरीक्षण व चिन्तन हीं केलीं असतां असें कळतें कीं शहाणपणाच्या मार्गाविषयीं जे अडाणी असतात तेवढे लोक मात्र असें समज-

तात कीं वासनातृप्तीनेंच सुखप्राप्ति होते. अहंकारापासून उत्पन्न झालेलें व स्वार्थपरवृत्तीमुळें वाढीस लागलेलें हें मत जगांतील सर्व दुःखांचें बीज होय यांत संदेह नाहीं. येथें वासना म्हणजे स्थूल शारीरवेग एवढाच अर्थ समजूं नये, तरि ज्या सूक्ष्म मनोवेगांनीं बौद्धिक व अध्यात्म स्वरूप आच्छादित होऊन जातें त्यांचा देखील अन्तर्भाव केला पाहिजे. आनंदमय जो आत्मा त्याचें सौंदर्य व शुद्ध स्वरूप मनोवेगांमुळें कशीं मलिन होतात याचा अनुभव प्राणिमात्रास येऊं शकतो.

अन्तर्यामीची आनन्दरूप व शान्तिरूप पूर्णतेची जी स्थिति व जीमध्यें वासनेचा लेशहि नसतो, तिला सुख असें म्हणावें. वासनातृप्तीपासून होणारें समाधान अल्प व मायिक असतें, आणि त्या तृप्तीपासून वासना अधिकच वाढत जातात. वासनांचें पूर्ण समाधान कधींच होत नाहीं आणि जसजशा त्या तृप्त करीत जाव्या, तसतशा अग्नींत तेल ओतल्याप्रमाणें वृद्धिंगत होतात. मूढ भक्तांकडून वासना अधिकाधिक भक्तीची इच्छा करितात आणि त्याचा शेवट शारीरिक किंवा मानसिक दौर्बल्यांतच होतो. वासना हें नरकाचें द्वार असून सर्व विपत्तींचें माहेरघर आहे. वासनात्याग केला असतां स्वर्गाचा अनुभव येतो व सर्व आनंदाची प्राप्ति होते.

स्वर्ग व नरक ह्या अन्तर्यामींच्याच अवस्था आहेत. अहंकारामध्यें व वासनातृप्तीमध्यें बुडून गेलें म्हणजे नरकाचा अनुभव येतो, तसेंच अहंकाराचा विसर जेणेंकरून होईल अशा आत्मस्वरूपांत निमग्न झालें असतां स्वर्गांत प्रवेश होईल. अहंकार अगदीं अंधळा आहे,

त्यास अवधारणा नाहीं, सत्यज्ञान नाहीं, व त्याचा परिणाम दुःखांत होतो. यथार्थ प्रत्यक्षीकरण, निर्मळ अवधारणा व शुद्ध ज्ञान हीं दैविकस्थितींतच प्राप्त होतात आणि ज्या मानानें ईश्वरी स्वरूपाचा अनुभव येईल त्या मानानें खरें सुख काय आहे तें कळेल. केवळ स्वतःचें सुख मिळविण्यास जों जों मनुष्य झटेल, तों तों तें त्यापासून दूरच राहील आणि दुःखाचीच पेरणी केली जाईल. ज्या मानानें परोपकार करण्यांत मनुष्य आपणाला विसरून जाईल, त्या मानानें त्याला सुखाची प्राप्ति होईल व आनंदवृक्षाचीं फळें चाखण्यास मिळतील.

अहंकारास चिकटून राहिलें असतां दुःखाचीच गांठ पडेल व अहंकाराचा त्याग झाला म्हणजे शान्ति प्राप्त होईल. स्वार्थपर होऊन उद्योग केल्यानें सौख्य नाहींसें होतें इतकेंच नव्हे, तरि ज्याला आपण सुखाचें मूळ समजतों तें सुद्धां नाहींसें करण्यासारिखें आहे. एकादा खादाड मनुष्य आपली मंद झालेली क्षुधा प्रखर होण्यासाठीं नाना तऱ्हेचे प्रयत्न करीत असतो, तरी तो इतका फोपसा व रोगग्रस्त होऊन जातो कीं त्याला कोणतेंहि अन्न गोड लागत नाहीं. परंतु ज्यानें क्षुधावेग स्वाधीन ठेविलेला असतो व ज्याला सुग्रास खाद्याची चटक लागलेली नसते, त्याचें साध्या अन्नानें समाधान होतें. अहंकाराच्या दृष्टीनें वासनातृप्तींतच सर्व सुख सांठलें आहे अशी ज्यांची समजूत झालेली असते, त्यांना शेवटीं दुःख होतें हें उघड आहे.

स्वार्थपरतेस चिकटून रहाण्याचें सोडून देऊन, ति-

चा त्याग करण्यास जो उद्युक्त होतो, त्यालाच शाश्वत आनंदाची प्राप्ति होईल. जी अशाश्वत वस्तु आपणाला प्रिय वाटते व जी पोटाशीं धरिली असतांहि सोडून जाते, त्या वस्तूचा त्याग केला असतां, जें प्रथम परमावधीचें अनिष्ट वाटत असतें तोच मोठा लाभ झाला असें आपणास पुढें कळून येईल. लाभाकरितां त्याग करणें यासारिखा दुसरा मोह नाहीं, पण त्याग करून नुकसान करून घेणें हाच अभ्युदयाचा खरा मार्ग होय.

ज्या वस्तूंचा धर्मच नष्ट होण्याचा असतो, अशा वस्तूंमध्यें गुरफटून जाण्यापासून शाश्वत सुखाची मुळींच आशा नको. ज्या वस्तु शाश्वत असतात त्यांना चिकटून रहाण्यांतच खरें सुख मिळतें. म्हणून अशाश्वत वस्तूंचा जर स्वीकार केला नाहीं, तर अहंकाराहून श्रेष्ठ अशा परमात्म्याची जाणीव होऊं लागेल, आणि स्वार्थत्याग व विश्वात्मकता यांमध्यें जसजसे आपण गढून जाऊं, तसतसा अविनाशि सुखाचा अनुभव येत जाईल. परहित साधण्यांत जो आपणास विसरतो त्याला परमानंद प्राप्त होतो इतकेंच नव्हे, तरि ईश्वरी स्वरूपाचा व अमरत्वाचा लाभ घडतो. गत जीविताचा विचार करितां, असें आढळतें कीं, ज्यावेळीं आपण एकादें दयाशील कृत्य किंवा प्रेमपूर्वक भाषण केलें असेल त्या कालाची आठवण झाली असतां आपणास परम आल्हाद होतो. अध्यात्म दृष्टीनें पहातां संमेलन व सुख हीं एकच आहेत. प्रेम हें ज्याचें अध्यात्म आविष्करण असतें, त्या ईश्वरी सूत्राचा संमेलन हा एक प्रकार आहे.

स्वार्थपरता त्या सूत्राशीं अगदीं विरुद्ध आहे, म्हणून स्वार्थपर होणें म्हणजे ईश्वरी सूत्राशीं विरोध करणें होय. अहंकाराचा अभाव हीच भूतदया होय, म्हणून जसजसा भूतदयेचा अनुभव येईल, तसतशी ईश्वरस्वरूपाशीं एकरूपता होऊन शाश्वत आनंद मिळूं लागेल.

आपण असें म्हणतों कीं स्त्रीपुरुषें सुखासाठीं इकडे तिकडे व्यर्थ फिरत असतात पण त्यांना तें प्राप्त होतच नाहीं. सौख्य त्यांच्या अन्तर्यामीं आहे आणि भोंवतालीं अखिल विश्वास भरून राहिलें आहे, पण आपल्या स्वार्थपर उद्योगानें तेच त्यास दूर लोटीत असतात— हें तत्त्व जोंपर्यन्त त्यास समजलें नाहीं, तोंपर्यन्त सौख्याचा लाभ कधीं होणार नाहीं. स्वार्थपर व क्षणभंगुर वस्तूंचा त्याग करावा म्हणजे परहितकारक व शाश्वत वस्तूंचा लाभ अवश्य होतो. सर्व पदार्थ केवळ आपल्या हितासाठीं उत्पन्न झालेले आहेत अशी संकोचित कल्पना करणाऱ्या अहंकाराचा त्याग केला असतां भूतदयेचें तत्त्व स्वाधीन होतें. दुसऱ्याचें दुःख दूर करण्यांत आपणास विसरलें असतां ईश्वरी आनंद प्राप्त होतो. शुद्ध विचार, निष्कलंक आचार व निर्मल उच्चार यांच्या साहाय्यानें स्वर्गलाभ होऊन, याचि देहीं याचि डोळां आपण स्वरूपाकार बनून जातो. शुद्धचित्त पुरुषासच अशा स्थितीचा पूर्ण अनुभव येतो.

निःस्वार्थपर प्रेमाचें उच्च ध्येय पुढें ठेवून, उपासना केली असतां या अपार-सुखाचें विज्ञान होईल. उपासना म्हणजे ईश्वराजवळ असणें व ईश्वराकडे वासनांची प्रवृत्ति करणें आहे. आपला उगम जो ईश्वर त्याकेडच

जीवात्म्याचा कल सर्वकाल राहिला पाहिजे, कारण ईश्वरामध्येंच पूर्णानंदाचा ठेवा सांपडणार आहे. उपासनेनें वासनान्तर्गत शक्ति ईश्वररूप बनतात आणि वासनोपाधींपासून दूर रहाण्याचा जो प्रयत्न तीच प्रार्थना समजावी. परहितसाधनामध्यें अहंकाराचा त्याग करून प्रत्येक कृतीमध्यें आपणास विसरलें असतां शाश्वत सुखाचें मर्म ध्यानांत येतें. यासाठीं स्वार्थपरतेस फार जपून आत्मयज्ञाचीं दैविक फलें समजून घ्यावीं म्हणजे अमरत्त्वाचें चिलखत व पूर्णानंद प्राप्त होतील.

प्रामाणिकपणा, विश्वास, औदार्य व प्रेम या गुणांनीं भरलेल्या हृदयास खऱ्या अभ्युदयाचा लाभ होतो. ह्या गुणांचा जेथें अभाव असतो अशा हृदयास अभ्युदयाची कल्पनाहि होणार नाहीं, कारण सौख्याप्रमाणेंच, अभ्युदय बाह्य वस्तूंवर अवलंबून न रहातां आन्तर स्थितीच्या स्वाधीन असतो. लोभी मनुष्य लक्षपति झाला तरी दुःखीच असणार, कारण आपणापेक्षां लोक श्रीमान् आहेत अशा भावनेमुळेंच तो भिकारी रहाणार. प्रामाणिक व उदार अशा पुरुषांपाशीं संपत्ति नसली तरी ते सर्वकाल अभ्युदयाचा अनुभव घेतात. आपल्या स्थितीविषयीं ज्याच्या हृदयास समाधान वाटत नाहीं तो दरिद्री होय आणि ज्याचें चित्त सर्वदां संतुष्ट असतें त्यासच श्रीमान् समजावें.

जड व अध्यात्म अशा पदार्थांनीं विश्व भरलेलें आहे हें पाहून आणि थोड्याशा द्रव्याकरितां किंवा जमिनीच्या तुकड्याकरितां मनुष्य किती झटत असतो याचा विचार केला असतां स्वार्थपरतेसारिखें अज्ञानच नाहीं

असें कळून येतें आणि मग असें समजतें कीं वासनांची तृप्ति करणें हा केवळ आत्मघात होय. ईश्वर सर्वांस हवें तितकें देतो, तरी त्याचें कांहीं कमी पडत नाहीं, परंतु मनुष्य मात्र सर्व घेण्याच्या प्रयत्नांत सगळें गमावून बसतो. प्रामाणिकपणा, औदार्य व भूतदया या ईश्वरी गुणांमुळें अभ्युदयाची प्राप्ति अवश्य होते, कारण ईश्वरी गुण म्हणजे एक चिलखत असून त्यावर अशुभाची शक्ति चालत नाहीं. सहनशील, दयाशील, शुद्धचित्त असा पुरुष ईश्वराशीं एकरूप होतो व आत्मत्यागाच्या सामर्थ्यानें जीवितरहस्याचा उलगडा सहज करूं शकतो.

# प्रकरण ३

## ज्ञान व तप

( श्लोक )

समस्तेषु वस्तुष्वनुस्यूतमेकं ।
समस्तानि वस्तूनि यं न स्पृशन्ति ॥
वियद्वत्सदा शुद्धमच्छस्वरूपं ।
स नित्योपलब्धि स्वरूपोऽहमात्मा ॥१

( आर्या )

समस्त वस्तूंमाजी एक असे परि तयाहि स्पृश्य नसे ॥
आत्मा आकाशापरि नित्य व्यापक सदा विशुद्ध वसे ॥१

## प्रकरण ३

### ज्ञान व तप

सर्व चेतनवस्तूंस व्यापून रहाणारा व अनेकांमध्यें एकरूपानें असणारा अशा आत्म्याचा अनुभव जेणेंकरून येतो, तेंच ज्ञान खरें व कार्यसाधक होय. असें ज्ञान प्राप्त होण्यास पराकाष्ठेचें चित्तैकाग्र्य व पौरुषप्रयत्न अवश्य आहेत. राष्ट्राचा मोठेपणा व कार्यक्षमता हीं राखण्यास तेथील थोर व कर्तृत्ववान् लोकांनीं सतत उद्योग केला पाहिजे आणि हा यत्न जर ढिला पडला अथवा त्याला भलती दिशा लागली, तर राष्ट्राचा नाश होतो. एका शहराची स्वच्छता व आरोग्य राखण्यास अनेक लोकांना त्याच कामासाठीं प्रयत्न करावे लागतात आणि इतकी काळजी घेऊन सुद्धां दुखणीं बहाणीं व अकाल मृत्यु टाळतां येत नाहींत. कुटुंबांतील मनुष्यें सुखी होण्यासाठीं प्रत्येक असामी स्वार्थत्याग करीत असतो, तरी देखील त्यांना कायमचें सुख मिळत नाहीं. अल्पकालिक लहानशा झाडाची वाढ सुद्धां पुष्कळ परिश्रम केल्याशिवाय होत नाहीं. मनुष्याला आपलें पोट भरण्यासाठीं, मुंग्यांमाशांप्रमाणें, सारा दिवसभर खपावें लागतें, तरी देखील बाह्य परिस्थिति ठेवील त्यापेक्षां अधिक काल जगण्याची त्याला आशा नाहीं. मोठमोठ्या योद्ध्यांनीं व वीरांनीं अनुकूल प्रसंग पाहून सर्व शत्रु जिंकून स्वार्थासाठीं अवाढव्य राज्यें व राष्ट्रें स्थापिलीं, पण त्यांच्या मागें तीं किती दिवस टिकली आहेत बरें?

तथापि बुद्धिमान् पुरुषांनीं अचाट कल्पना व तत्त्वें शोधून काढून त्याबरहुकूम मनुष्यमात्राच्या ज्ञानवृद्धीसाठीं व सुखासाठीं जीं राज्यें स्थापन केलीं आहेत तीं अजून भरभराटींत आहेत व पुढेंहि अशींच रहाणार. मुलें आईबापांचे उपकार फेडतात व त्यांच्या ऋणांतून मुक्त होतात. राजे लोक संकटांतून मुक्त होण्यास शिपाई बाळगितात, मग त्यांस शत्रूची किंवा प्रतिपक्षाची भीति उरत नाहीं. परंतु अज्ञानाच्या व दुष्ट वासनांच्या बंधनांतून सुटण्यासाठीं आपल्याच आत्म्याशिवाय मनुष्यास दुसऱ्या कोणाचें साहाय्य मिळत नाहीं. हें बंधन एकदां दूर झालें, म्हणजे इतर बंधनाप्रमाणें किंवा शत्रूप्रमाणें त्याची फिरून पीडा होत नाहीं.

अज्ञानाचा व अशुभाचा परिणाम फार भयंकर असून सार्वत्रिक आहे. शुभाचा वास थोडक्यामध्यें होतो आणि दुसऱ्याचें शुभ करण्याचें सामर्थ्य थोडक्यांतच असतें. जर पापाचा लय होईल तर जीवित सुखमय होऊन सर्व आयुष्य समाधानांत जाईल. पण शुभाबरोबर अशुभ, संपत्तीबरोबर विपत्ति, सुखाबरोबर दुःख—हीं जशीं ठेवलेलीं असतात, त्याप्रमाणें पाप नेहमीं उभें असतें, म्हणूनच आपलें कर्तव्य काय, शुद्धि कशानें होते, वीर्याचें रक्षण कसें होतें, आपलें निरंतर कल्याण कशांत आहे—वगैरे गोष्टी मनुष्यास समजूं लागतात. अविनाशी व निर्विकार आनंद भोगण्यांतच आत्म्याचें निरंतर कल्याण असतें व हा आनंद केवळ स्वसंवेद्य असतो. हा आनंद जर इतर वस्तूंवर अवलंबून राहील, तर तो अशाश्वत समजला पाहिजे. दुष्ट वासना आव-

रण्यास किंवा चित्त सन्मार्गाकडे वळविण्यास फार कठिण पडतें, तेव्हां आपल्या स्वतःच्या वृत्तीवर जर अधिकार चालत नाहीं, तर दुसऱ्याच्या क्रियेवर कसा चालेल ? एका क्षणांत मनुष्य जन्मास येतो व क्षणांत अनंतामध्यें नष्ट होतो. यासाठीं जीविताचें स्वरूप स्वप्नवत् समजणें, परमात्म्यामध्यें लीन होईतोंपर्यन्त जीवात्म्याचें क्षुद्रत्व जाणणें, आणि आपणामध्यें अल्पत्व असून परमात्म्याच्या शक्तिमत्वाचा अनुभव घेणें—हेंच मनुष्याचें कर्तव्य होय.

राजानें उत्कृष्ट राज्य करावें, कामगारानें त्याचे हुकूम मानून आपलें कर्तव्य चोख बजवावें, शिपायानें लढाईंत जय मिळवावा, संसारी मनुष्यानें सुखाचा व अभ्युदयाचा मार्ग स्वीकारावा, शिल्पकाराला धंद्याचें मर्म कळावें—अशा गोष्टी सिद्ध होण्यास बरेंच शिक्षण पाहिजे, पुष्कळ चातुर्य असावें लागतें, आणि आत्मसंयमन पूर्ण झालें पाहिजे. शरीर व मन ताब्यांत ठेवून, वर्तमान, भूत, भविष्यत् हीं ज्या तत्त्वांत लीन होतात त्याचा अनुभव घेण्यासाठीं, ऐहिक वस्तूंच्या सिद्धीस लागणाऱ्या शिक्षणापेक्षां अधिक शिक्षण अवश्य पाहिजे. चरितार्थाचीं साधनें मिळवून नित्याच्या गरजा व क्षणिक आनंद संपादण्यासाठीं आपला सर्व वेळ, उत्साह व विचार अर्पण करण्यास मनुष्य तयार होतो, तथापि त्याच्या गरजा संपत नाहींत, चिरकाल आनंद होत नाहीं व एका जन्मापुरताहि चरितार्थ मिळत नाहीं.

दुखणें येऊन उपभोगांस व्यत्यय होण्याची भीति असते, सुखाचा नाश होण्याचा धाक वाटतो, संपत्ति

नष्ट किंवा कमी होईल असा संशय येतो, यजमान रागावेल अशी चाकराला भीति वाटते, चाकर अवज्ञा करील असा यजमानाला धाक पडतो, जय मिळाला तरी शत्रु फिरून चढाव करील असा संशय रहातो, संतति किंवा बांधव कुलाला बट्टा लावितील अशी भीति संसारांत असते, सन्मान झाला तरी बेअब्रूचा किंवा प्रतिस्पर्धेचा धाक वाटतो, कीर्तीला निंदेचें भय पडतें आणि शरीर व जीवित नष्ट करण्यास मृत्यु सर्वदा तयार आहेच. अशा रीतीनें मनुष्य जें जें इच्छितो किंवा मिळवितो तें जर भयाचें किंवा चिंतेचें कारण होईल, तर ज्या जीविताच्या अवस्थेंत भय नसून चित्तास पूर्ण शांति मिळेल अशी अवस्था प्राप्त करून घेणें मनुष्याचें कर्तव्य होय यांत संदेह नाहीं. सर्व लोक प्रपंचामध्यें गढून गेलेले असतात, म्हणून श्रेष्ठ व आनंदमय जीविताची ते थट्टा करणारच. शेक्स्पीअर कवीच्या एका नाटकांत भिकाऱ्याचें पात्र आणलें आहे व तो श्रीमंतीची थट्टा करीत आहे असें दाखविलें आहेः—

भिकारी म्हणतो—खरोखर पहातां, श्रीमंत होण्यासारखें दुसरें पाप नाहीं, आणि मी यदाकदाचित् श्रीमंत झालोंच तर असें सांगत फिरेन कीं भिकारपणासारखें पापच नाहीं.

प्रापंचिक मनुष्य असें असंबद्ध भाषण करूं लागला असतां शहाणा मनुष्य म्हणेल कीं—तुम्हाला गोड वाटेल तो मार्ग तुम्ही स्वीकारा, पण उगीच भ्रमांत पडून असें म्हणूं नका कीं इतर मार्ग कोणाला सांपडणार नाहींत. शिवाय हा भ्रम होणें तुम्हाला साहजिकच

आहे, कारण अडाणी माणसाला शहाण्याचे मार्ग समजावयाचे नाहींत, पापी मनुष्याला सदाचाराचा रस्ता कळणार नाहीं व मद्यपी लोकांना मिताहार म्हणजे चेष्टाच वाटणार आहे.

तपश्चर्या हा ज्ञानाचा मार्ग अत्यंत कठिण असून संसारी मनुष्याला तर तो कधींच प्राप्त होणार नाहीं. ज्याला रसायनशास्त्राचा नाद आहे तो वेधशाळेंत प्रयोग करीत असतो, ज्याला अभ्यासाचा छंद आहे तो पुस्तकालयांत एकटा वाचीत बसतो, ऐहिक लाभ करून घ्यावा असें ज्याला वाटतें त्याला आपल्या कामांत कोणी हात घातलेला खपत नाहीं, जो धर्मशील असतो त्याला भक्तिमार्गांत कोणीं अडथळा केलेला आवडत नाहीं, त्याप्रमाणेंच तपश्चर्येचें रहस्य व सुख समजावें असें जो इच्छितो त्याला एकटेंच राहिलें पाहिजे व प्रपंचाचा गंध सुद्धां खपणार नाहीं. संसारी मनुष्यास तपश्चर्या बिलकुल कामाची नाहीं, त्याला प्रापंचिक सुखच आवडणार आहे. तपश्चर्या व प्रपंच यांपैकीं अधिक फायदेशीर कोणतें तें ज्यानें त्यानें आपआपल्या विचाराच्या व शिक्षणाच्या मानानें ठरविलें पाहिजे. तथापि ज्याला थोडीशी संस्कृति मिळाली आहे अशा पूर्ण प्रापंचिकाला देखील असें कबूल करणें भाग आहे कीं जीविताच्या सर्व शाखांमध्यें शाश्वतसुख आत्मसंयमनादर व स्वार्थत्यागावर अवलंबून असतें आणि जर स्वच्छंदीपणाला अधिकाऱ्यांकडून किंवा मित्रांकडून आळा बसला नाहीं, तर त्याच्या भक्ताचें नुकसान हटकून होणार. तसेंच, संसाराचा यत्किंचित् सुद्धां गंध

नाहीं अशी तपस्वीवृत्ति मनुष्याहून श्रेष्ठ प्रतीच्या प्राण्यासच साध्य होऊं शकेल, तथापि प्रापंचिक स्थितीमध्यें जन्मास आलेल्या व वाढलेल्या मनुष्यानें तपश्चर्या केली असतां त्याला कांहीं तरी संसाराचा संपर्क होणारच.

बंध व मोक्ष या दोन्ही चित्ताच्याच वृत्ति आहेत, त्यांचा देहाशीं कांहीं संबंध नाहीं, आणि जोंपर्यंत शरीरांत प्राण आहे तोंपर्यंत त्याला अन्न, वस्त्र व इतर गोष्टींची गरज लागणार, शिवाय इतर प्राण्यांवरहि अनेक प्रकारें तें अवलंबून रहाणारच. बाह्य परिस्थितीच्या स्वाधीन न होतां चित्त स्वतंत्र व्हावें हाच तपश्चर्येचा उद्देश असतो, मग शरीराची वाढ होवो, क्षय होवो, नाश होवो. कांहीं दर्शनकारांच्या मताप्रमाणें शरीराबरोबर जरी चित्ताचा नाश झाला, तरी निसर्गनिर्मित अवस्थांतून शरीराच्या गतीला कोणत्याहि उपायांनीं प्रतिबंध होत नाहीं, पण शरीराशीं संबंध आहे तोंपर्यंत निदान चित्ताची एकरूपता व निर्विकारता कायम राहूं शकते. म्हणून उत्तम प्रकारच्या नैतिक संस्कृतीप्रमाणेंच तपश्चर्येपासून निर्विकार व प्रसन्न चित्तवृत्तीचा मार्ग कळून येतो.

संवय, संगति व सांप्रदाय—यांमुळें, जीवनसंग्रामांत पडल्याबरोबर चैतन्याची स्थिति चमत्कारिक होऊन जाते. चित्तास दोन भिन्न मार्ग दिसूं लागतात. यांपैकीं एक मार्ग जरी आरंभीं उदासीन व भयप्रद वाटला, तरी शेवटीं आनंद, शुभेच्छा, श्रेष्ठहेतु व पौरुष यांनीं भरलेला असतो. दुसरा मार्ग प्रथमतः जरी तेजस्वी

आशापूर्ण व तात्कालिक सुखदायक दिसला, तरी शेवटीं भयंकर व दुःखदायक होतो. पहिला मार्ग झुडपांनीं भरलेला व अगम्य दिसेल, पण अखेर ऐहिक अरिष्टांतून सुटका होईल. दुसरा मार्ग उत्साहजनक व आनंदपरिप्लुत वाटेल, पण परिणामीं दीर्घ संकटांत पडावें लागेल. जीवनसंग्रामांत पडल्यावर चित्ताला वारंवार असें वाटूं लागतें कीं अखंड तेजोरूप परमात्म्याच्या सहवासांत ज्या स्वातंत्र्याचा निरंतर उपभोग घेतला त्याचा लय होणार आणि बंधनाच्या जाळ्यांत मर्यादित झालेल्या क्षणिक सुखांतच काळ घालविला पाहिजे, म्हणून चकचकित अशा दुसऱ्या मार्गांतच चित्त गुंतून रहातें. कांहीं लोक मात्र आपलें एकान्त स्वरूप राखण्यासाठीं आणि आपलें धैर्य व वीर्य सिद्ध करण्यासाठीं पहिल्या मार्गाचा स्वीकार करितात. जनसमाजाची स्थिति अशी आहे कीं दुसऱ्या मार्गांत नाना तऱ्हेचीं सुखदुःखें भोगल्यानंतर पश्चात्ताप होतो, आणि कांहीं लोक मात्र दीर्घ प्रयत्न करून मग पहिल्या मार्गाकडे वळतात. प्रवेशक अवस्थेमध्यें कोणत्या तरी मार्गाचा सहभाव घडल्यानंतर, कोणता मार्ग इष्ट व सुखावह आहे हें ठरविण्यापुरतें स्वातंत्र्य व योग्यता हीं प्रत्येक मनुष्यास प्राप्त होतात.

या दोन मार्गांपैकीं तपश्चर्या हा पहिला होय. जीविताच्या इतर शाखांतील शिक्षणाप्रमाणेंच, शरीर व मन यांच्या निग्रहाचाच हा एक प्रकार आहे. सर्वत्याग करून किंवा एकान्तवास पत्करून कांहीं स्वार्थ साधावा हा या निग्रहाचा हेतु नसतो, तरि अहंकार, म-

नोवेग, दुष्टवासना अशा वृत्तींवर प्रभुत्व संपादणें हाच त्याचा उद्देश असतो. अनुकूल अवस्थांमध्यें जन्मास येऊन वाढलेल्या मनुष्यास या दिखाऊ स्वार्थाच्या एकान्ताशिवाय हे हेतु साध्य होतील, तर तपश्चर्येच्या निग्रहाची कांहीं गरज नाहीं. विद्यालयांत, कारागृहांत, लष्करांत, संयम व निग्रह हीं अवश्य आहेतच. कांहींना यांची गरज पुष्कळ असते, कांहींना थोडी असते. ज्यांना त्यांची पुष्कळ गरज असते त्यांना त्यांपासून जशी पीडा होत नाहीं, तशीच ज्यांना मुळींच गरज नसते किंवा थोडीच असते त्यांनाहि पीडा होत नाहीं. यासाठीं कोणताहि आश्रम, धंदा किंवा उद्योग असो, तपश्चर्येच्या रूपानें निग्रह किंवा संयम करणें अपायकारक होणार नाहीं. रोजच्या व्यवहारांत सर्व मनुष्यांस कमीजास्त मानानें निग्रह करावाच लागतो. जितकी संस्कृति जास्त, तितका जास्त निग्रह शीलामध्यें दिसून येतो. आधुनिक काळीं माया, ममता, मान, विचार— यांकडे दुर्लक्ष होत चाललें आहे, तथापि मनोनिग्रहाकडे जास्तच ओढा दिसत आहे आणि द्रव्यलोभ तर अधिकच होत चालला आहे.

तपश्चर्येचे अथवा मनोनिग्रहाचे दोन मार्ग प्रसिद्ध आहेत. सूर्यचंद्रादि खगोल, पंचमहाभूतें, यांपासून किडा, मुंगी, अन्न म्हणून ज्या वनस्पती आपण खातों तेथपर्यंत सर्व भूत पदार्थांचा अंमल शरीरावर चालतो, परंतु इतर कशानेंहि चैतन्याचें संयमन होत नाहीं किंवा त्याला स्वतंत्रता प्राप्त होत नाहीं. चित्ताची शुद्धि किंवा बंधनापासून मुक्ति करण्याकरितां दोन मार्ग

शोधून काढिले आहेत, एक श्वासनिरोध व दुसरा सम्यग्ज्ञान, पण दीर्घपरिश्रम व परमधैर्य यांशिवाय दोन्ही साध्य होत नाहींत. मनुष्याचें मन कितीहि क्षुद्र, नीच व शक्तिहीन दिसलें, तरी निश्चयानें, उत्साहानें व चातुर्यानें प्रेरणा केली असतां अशाश्वत व्यवहारांत त्याची गति उत्तम प्रकारची होते इतकेंच नव्हे, तरि सर्व जगतावर अधिकार चालविण्याचें सामर्थ्य त्याचे अंगीं येऊं शकतें. उत्साहशून्य प्रयत्नापासून सिद्धि होत नाहीं. विद्यामंदिराकडे जाण्यास मुलांना गुरूची मदत हवी असते, तरुणांना इष्टकार्य सिद्धीस वाटाड्या पाहिजे, तद्वत् इष्टप्राप्ति लवकर होण्यास विवक्षित अवस्थेंत चित्तास मार्गदर्शक लागतो. हें उपनयन परम-गुरूनेंच केलें पाहिजे. तथापि शिष्याला मार्गास लावण्यास मदत केली असतां, गुरूनें आपली किंवा आपल्या पराक्रमाची प्रतिष्ठा मिरविणें गैर आहे. निश्चयी पुरुषास मार्गदर्शक सांपडतोच आणि जरी सांपडला नाहीं तरी इच्छा, धैर्य व दृढनिश्चय यांच्या साहाय्यानें अन्तर्यामींच प्रकाश उद्भवतो आणि त्या प्रकाशाच्या उगमापासून गुरूचें ज्ञान व भूत-भविष्यत्, दृष्ट-अदृष्ट इत्यादिकांचें ज्ञान हीं उत्पन्न होतात.

प्राण असें ज्याला म्हणतात त्या श्वासनिःश्वासामुळें चित्ताचा शरीराशीं संबंध रहातो. जोंपर्यंत श्वासनिःश्वास चालू आहेत तोंपर्यंत ज्ञानशक्ति, मनोवेग व शारीरवेग जागृत रहातात. चित्ताचें स्वरूप व सामर्थ्य नाहींशीं करण्यास उत्कृष्ट मार्ग म्हटला म्हणजे श्वासनिरोध हा होय. श्वासनिरोधानें अपकारशक्तीबरोबर उपकार-

शक्ति देखील नष्ट होते, म्हणून या मार्गास नियंत्रणात्मक तपश्चर्या असें म्हणतात. उपकारशक्ति कायम राखून अपकारसामर्थ्य तेवढें नष्ट व्हावें अशा नियंत्रणेचा उपाय अजून निघालेला नाहीं. एकाद्या नागरिकावर जुलूम केला असतां जशी त्याच्या मनाची स्थिति बिघडते, त्याप्रमाणें कोणत्याहि निरोधानें चित्ताची समता नष्ट होऊन उपकारक व अपकारक या दोन्ही शक्ति निष्फल होतात. शिवाय निरोध अल्पकालिक असतो, कारण फारवेळ राहिल्यानें शरीरास अपाय घडतो. हीच गोष्ट श्वासनिरोधाची आहे. हळू हळू धिमेपणानें श्वासाचें नियमन केलें असतां, चित्ताचा निरोध होतोच, पण हा किती झालें तरी जुलमाचा प्रकार असल्यामुळें मागाहून थकवा येतो आणि त्याचा परिणाम असा होतो कीं निरोध कमी होऊन मोहकारक पदार्थ पुढें आल्याबरोबर चित्त प्रपंचांत व्यग्र होऊं लागतें. यासाठीं मनुष्यास अगम्य अशा गिरिगव्हरामध्यें किंवा अरण्यामध्यें एकान्तवास पत्करल्यानंतर प्राणनिरोधाचा अभ्यास करणें इष्ट आहे. अशा स्थलीं कांहींएक अडचण किंवा मोह उत्पन्न होण्याचा संभव नाहीं, आणि या अभ्यासानें चित्तवृत्ति बंद होऊन हळू हळू अन्तःप्रकाशाचा अनुभव येऊन त्यामध्येंच चैतन्य बुडून जातें. कोणी असा आक्षेप घेतात कीं हा मार्ग केवळ अशुभ टाळण्याचा असून, त्यापासून नित्य येणाऱ्या अरिष्टांचें नियमन करण्याचें सामर्थ्य प्राप्त होत नाहीं. हा आक्षेप केवळ अडाणी लोकांचा असून त्यामध्यें कांहीं अर्थ नाहीं, कारण ह्यापैकीं बहुतेक लोक

आपत्तींतच राहून तिचा प्रतिबंध करण्याचें सामर्थ्य मिळवीत नाहींत आणि जे समर्थ असतात ते दुर्बल मनुष्यास आपलें अनुकरण करण्यास शिकवीत नाहींत. व्यक्तिलाभाच्या दृष्टीनें पाहिलें असतां, वीर्यवान् मनुष्यास जसा प्रपंच सुखकर वाटतो, त्याप्रमाणें साधुपुरुषास तपश्चर्येपासून अत्यन्त उपयोग होतो. स्वार्थसाधूपणाचा आरोप दोघांसहि सारखाच लागू पडतो, कारण प्रपंचासक्त पुरुष वीर्यवान् असला तरी शाश्वत कल्याण करूं शकत नाहीं, उलटपक्षीं तो दुर्बलांच्या संसर्गापासून दूर न राहिला, तर नष्टवीर्य होण्याचा संभव असतो.

शाळेंत किंवा विद्यालयांत राहिल्याशिवाय विद्या किंवा संस्कृति मिळणें शक्य असेल, क्षुद्र चित्तवृत्तींचा निरोध केल्याशिवाय सौजन्य प्राप्त होणें शक्य असेल अथवा आरंभीं कोणत्याहि प्रकारचा निरोध केल्याशिवाय जीविताच्या कोणत्याहि शाखेंत शिस्त व शिक्षण संपादन करणें शक्य असेल, तरच प्रपंचांत अथवा गृहस्थाश्रमांत राहून तपश्चर्या करणें शक्य होईल. सर्वप्रकारच्या निग्रहाचा व संस्कृतीचा उद्देश आत्मसंयमन एवढाच आहे. कांहींएक श्रम किंवा स्वार्थत्याग न करितां जर तो साध्य होईल, तर कांहींच प्रत्यवाय नाहीं, पण भूलोकींच्या वस्तुस्थितीचें निरीक्षण करितां वीर्याचा प्रयोग केल्याशिवाय कोणत्याहि इष्टसिद्धीची आशाच नाहीं. कृत्रिमरीतीनें जडलेली एकादी शरीराची अथवा मनाची खोड घालविण्यास श्रम व त्याग करावीं लागतात, तेव्हां जीव ज्यावर अवलंबून रहातो, नव्हे

तो प्रत्यक्ष जीवच असतो, अशा प्राणाचा निरोध कर-ण्याचें सामर्थ्य येणें सोपें काम नाहीं. शरीराप्रमाणेंच चित्तामध्येंहि हव्या त्या दिशेनें वळण्याचें सामर्थ्य असतें, फक्त ती क्रिया योग्यकालीं उत्साहानें व धैर्यानें आरंभिली पाहिजे. सामान्य व्यवहारांत आपण असे लोक पहातों कीं त्यांचे स्नायु अत्यंत सशक्त, सहनशील व पीळदार असतात व त्यांच्या सारखीं शरीराचीं कामें जर इतरांनीं केलीं तर त्यांना दुखापत होईल किंवा ते मरून जातील. दुसरें, कांहीं लोकांच्या मानसिक व बौद्धिकशक्ति इतक्या तीव्र व परिपक्व असतात कीं इतरांना हवी तितकी खटपट करून सुद्धां त्या संपादन करण्याची आशा वाटत नाहीं. तिसरें, कांहीं लोकांची वागणूक इतकी व्यवस्थित असते व स्वभाव असा बनून जातो कीं इतर लोकांना त्याची कल्पना न होऊन ते चेष्टा करूं लागतात आणि सगळा वेडेपणाचा कारभार समजतात. म्हणून मनुष्यानें कोणताहि मार्ग स्वीकारला तथापि त्याचा अभ्यास योग्य कालीं व अनुरूप परिस्थितींतच केला पाहिजे, नाहीं तर निराशेचा किंवा अपयशाचा संभव फार असतो.

प्राणनिरोधाचा आरंभ योग्य वेळीं करून तो अभ्यास हळू हळू वाढवीत गेला पाहिजे, म्हणजे एका नाकपुडीनें आंत श्वास घेऊन कुंभक करावा आणि दुसऱ्या नाकपुडीनें सोडून द्यावा. निरोधाचा काल अभ्यासावर अवलंबून रहातो आणि तो हळू हळू वाढविला पाहिजे. उतावीळपणा किंवा घाई केली तर अपयश येतें इतकेंच नव्हे, तरि शरीराची स्थिति बिघड-

ते आणि रोग होतो. श्वासनिरोधाच्या कामांत वर लिहिल्याप्रमाणें बहुधा आरंभ होतो व शरीरांत कुंभक केला जातो. प्रत्येक शरीराच्या सामर्थ्याप्रमाणें व उपजत धर्माप्रमाणें हा अभ्यास वाढवीत नेला असतां शरीराची रोगोन्मुखता नष्ट होते, आणि योग्य संस्कृति झाली असेल, तर चित्ताची शुद्धि होऊन अखंड प्रकाशाचा अनुभव येतो. ही क्रिया चालली असतां आहार, विहार व निद्रा यांचें नियमन करून मनोवेग व शारीरवेग यांचाहि निग्रह झाला पाहिजे, म्हणजे कोणतीहि अपायकारक संगति न मिळून चैतन्याचा विकास स्वतंत्रतेनें होऊं शकतो. पहिल्या प्रयत्नांत यश आलें आणि उतावीळपणा केला नाहीं, तर कांहीं कालानें अनेक तास किंवा दिवस कुंभकावस्था साध्य होते, शरीर आकाशांत उचलून धरितां येतें, महत्तत्त्वाचा अनुभव येतो, दुसऱ्याचें मनोगत समजतें आणि चित्स्वरूपानें हवें तिकडे व हवें त्यापुढें प्रकट होतां येतें. ही वर्णिलेली अवस्था शेवटची असून अत्यन्त कठिण आहे आणि प्रापंचिकास तर दुःसाध्यच आहे. म्हणून ही स्थिति प्राप्त होण्याची ज्यांना इच्छा असेल, त्यांनीं मनुष्यास अगम्य अशा एकान्तवासाचा आश्रय केला पाहिजे. सामान्य लोकांचें लक्ष आरोग्याकडे व जीवरक्षणाकडेच असतें म्हणून त्यांनीं प्राणनिरोधाचा अभ्यास माफक करावा, म्हणजे शरीर वर उचलण्याचें किंवा दुसऱ्याचें मनोगत समजण्याचें सामर्थ्य जरी प्राप्त झालें नाहीं, तरी रोग दूर होतील, आयुष्य वाढेल आणि चित्तास समाधान वाटेल.

हठयोगाच्या अभ्यासानें श्वासनिरोध कसा करितां येतो व जड पदार्थांवर अंमल कसा चालवितां येतो हें आर्यभूमींतील कांहीं सिद्ध पुरुषांच्या उदाहरणावरून सिद्ध होतें, इतकेंच कीं अविश्वास, जडवाद व पाश्चात्य विद्या यांमुळें असे पुरुष क्वचित् दृष्टीस पडतात. पंजाबचा राजा रणजितसिंग याच्या दरबारांत एका साधुपुरुषानें चमत्कार करून दाखविल्याची गोष्ट प्रसिद्ध आहे. आतां हठयोगांत प्राविण्य संपादन केलें तरी मृत्यु ठेवलेलाच असतो या म्हणण्यांत फारसा अर्थ नाहीं, कारण हें विधान पाहिजे त्या मानवी पराक्रमाविषयीं करितां येईल. शरीराची कितीहि काळजी घेतली तरी अखेरीस मृत्यु सुटत नाहीं, उत्कृष्ट शिक्षण मिळालें तरी प्रापंचिक विपत्तींनीं चित्ताचें स्वास्थ्य बिघडून जातें, मोठाल्या इमारती निसर्गशक्तीनें जमीनदोस्त होतात, शेंकडों वर्षें यत्न करून उभारलेलीं भरभराटीचीं राष्ट्रें अचानक हल्ले येऊन रसातळास जातात. भूतमात्र लयास जाऊन नाश पावतें. मनुष्याचें कर्तव्य एवढेंच कीं जितके दिवस वस्तु राहूं शकतील तितके दिवस त्या जगविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

वर लिहिल्याप्रमाणें प्राणाचा, चित्ताचा व इंद्रियांचा जो निरोध तोच हठयोग समजावा. जीविताच्या कष्टमय दिवसांत जे लोक जन्मास आले व वाढले त्यांनाच हा अभ्यास साधून गेला आणि शरीरास कांहीं-एक अपाय न घडतां त्यांच्या अंगवळणीं ही क्रिया पडली होती. जे लोक सुखाच्या अवस्थेंत जन्मून वाढलेले असतात त्यांना बाळपणापासून ऐषआरामांत उप-

भोग घेण्याची संवय असते म्हणून हा अभ्यास जड जातो. शिवाय जुलमानें जरी कोणीं हा योग साध्य करण्याचा प्रयत्न केला तरी, अवघड कसरतीच्या प्रकारांप्रमाणें, धोका येण्याचा संभव असतो. आकाशांत टांगलेल्या एका खांबावरून दुसऱ्या खांबावर मल्ल लोक उड्या घेतात व त्यांना खांब सांपडला नाहीं तर फार झालें असतां ते भुईवर पडतील. तसेंच कांहीं खेळांमध्यें जाळ्याचीहि सोय केलेली असते. पण तपश्चर्येच्या कामांत संरक्षण करणारा ज्याचा तोच असतो, म्हणून घाईनें किंवा मोहानें जर कांहीं बिघाड झाला तर पृष्ठवंशाचा छेद होऊन पूर्व अवस्था प्राप्त होण्याचाहि संभव रहात नाहीं. या कारणासाठीं दुसरा एक सोपा व खात्रीचा मार्ग प्रचारांत आलेला आहे.

पाठशाळेमध्यें गुरु मुलांना असें शिकवितात कीं विद्याप्राप्तीसाठीं राजमार्ग नसतो. पण संसारी लोकांस योग्य असा जो मार्ग निघालेला आहे त्याला राजयोग हेंच नांव दिलेलें आहे. तो मार्ग असा आहे कीं त्या मार्गानें हवें तितकें जावें, वाटेल तेथें विश्रान्ति घ्यावी किंवा तो मार्ग अजीबात सोडून द्यावा, तथापि अपाय म्हणून घडावयाचाच नाहीं. उपासकाला पुढें जरी जातां आलें नाहीं, तरी आक्रमिलेल्या मार्गापासून फायदा झाल्यावांचून रहात नाहीं, शिवाय मोहकारक पदार्थांपासून शरीराच्या किंवा चित्ताच्या घटनेस विकृति घडत नाहीं, कारण या मार्गांत नियंत्रणेशिवाय नुसत्या बुद्धिप्रयोगानें मोहजनक विषयांचा त्याग होऊं शकतो. वास्तविक पहातां मुलांस उत्तम गुरूच्या शिक्षेखालीं किंवा तरुण

मंडळीस राजकारणामध्यें जो अनुभव येतो तशाच प्रकारचा हा राजयोग असून त्यामध्यें प्रेमाचें व स्वातंत्र्याचें राज्य असतें व जुलमाचें नांव सुद्धां घेण्याचें कारण नाहीं. म्हणूनच या क्रियेला राजयोग हें अभिधान अन्वर्थक आहे, आणि चित्ताला जगांतील अशुभ वस्तूंचा संपर्क होण्यापूर्वीं जर बाळपणींच हा अभ्यास झाला, तर यशप्राप्तीचा संभव पुष्कळ असतो. या मार्गांत एकदां सिद्धि झाली म्हणजे दुष्ट मोहांनीं ग्रस्त झालें असतांहि त्यांपासून अलिप्त रहाण्या इतकें निर्भेद्य व प्रचंड असें कवच प्राप्त होतें. यदाकदाचित् लवकर प्रारंभ झाला नाहीं आणि जगाचा थोडाबहुत अनुभव येऊन चुकला, तरी देखील हा अभ्यास अत्यन्त महत्त्वाचा व फायदेशीर होतो. कारण संसारांतील सुखदुःखांचा अनुभव येऊन

सुख पहातां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ॥

या सन्मान्य उक्तीचें विज्ञान झालें असतां, न चाखलेल्या फलाचा अनुभव कसा असतो हें पहाण्याचा स्वाभाविक मोह उत्पन्न होत नाहीं. दीर्घ कालाच्या संवयीमुळें आस्वादित मोहांस लुब्ध होण्याचा संभव असला, तरी ज्ञानयोगाच्या वृद्धीबरोबर हें भय कमी होत जाईल आणि तें जरी सर्वथैव नष्ट झालें नाहीं, तरी पूर्वींचा सुखोपभोग शरीरास घडला असतां ज्ञानोद्दीपित अशा चित्तास कांहींच पीडा होऊं शकत नाहीं, कारण तेणेंकरून फार झालें तर शरीराचा नाश होईल पण चैतन्य अलिप्त रहाणारच. इतर ज्ञानाची प्राप्ति ज्या कालांत घडते त्याच दहापासून पंचवीस वर्षेंपर्यन्त वयांत

ह्या योगाचा आरंभ करून तो चालू ठेविला पाहिजे.

ह्या मार्गांत तीन गोष्टी आवश्यक आहेतः—(१) सद्गुरु (२) उत्कृष्ट ग्रंथ (३) स्वपराक्रम. यांपैकीं पहिली गोष्ट स्वेच्छेनें मिळणें हें उपासकाच्या शक्तीबाहेरचें काम आहे. हा लाभ कदाचित् पालकांकडून होतो किंवा तीव्र वासना झाल्यास परमेश्वर करून देतो. अध्यात्म विद्येंत पूर्ण सिद्धीसाठीं शास्त्रप्रतीति व आत्मप्रतीति या क्रिया अवश्य मानिल्या आहेत, म्हणून त्यांचें मर्म पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल. श्रीव्यासांचा शुकाचार्य नामक पुत्र होता, व त्यानें बापापाशींच संपूर्ण विद्यांचें अध्ययन संपादिलें होतें तेणेंकरून तो महाज्ञानी झाला व संसारस्थितीचा विचार करितां करितां त्याच्या चित्तांत परम वैराग्य व विवेक यांचा उद्भव झाला. त्या महा बुद्धिमानानें आपल्याशींच विचार करून तत्त्वनिश्चय केला. त्याला सत्यप्राप्ति झाली, पण पर वस्तूचा लाभ झाला तरी त्यामुळें त्याचें चित्त स्थिर व शान्त होईना, आणि आपणास जें तत्त्व समजलें आहे तेंच सत्य आहे असा त्यास विश्वास पटेना. तत्त्वविचारामुळें इतकें मात्र झालें कीं त्याची विषयासक्ति पार नाहींशी झाली व भोगाविषयीं तो अत्यंत विरक्त झाला. एकदां तो महात्मा एकान्तांत बसलेल्या आपल्या पित्याजवळ गेला आणि त्यास जीवितरहस्याविषयीं नाना प्रकारचे प्रश्न त्यानें मोठ्या भक्तीनें केले. प्रिय बालकाचे सर्वोत्तम प्रश्न ऐकून ज्ञानी व्यासानें शुकास सर्व तत्त्वार्थ सांगितला. तो ऐकून शुक म्हणालाः—
"हें तर मी पूर्वीं समजलों होतों. आपण यापेक्षां कांहीं

निराळेंच सांगाल या आशेनें मी आपणाजवळ आलों." पुत्राचे हे शब्द कानीं पडतांच अनुभवी व्यासानें जाणलें कीं अशानें याचें समाधान होणार नाहीं, याला चांगलाच अनुभव आला पाहिजे. मग व्यास म्हणाले— "बाळा, मी बरोबर जाणत नाहीं. मिथिला नगरींत जनक या नांवाचा राजा आहे, तो हें तत्त्व चांगलें जाणतो. त्याच्याकडे तूं जा, म्हणजे तुझें समाधान होईल." पित्याचें हें म्हणणें ऐकून शुक जनकाकडे गेला. त्या विदेहाधिपतीच्या द्वारपालांनीं शुकाचें आगमन त्यास कळविलें. पण त्याची परीक्षा पहाण्याकरितां "बरें आहे, आला तर येऊं दे" इतकेंच बोलून जनक मुकाट्यानें बसला. सात दिवस त्याची त्यानें विचारपूस केली नाहीं. आठव्या दिवशीं त्यानें त्यास अंगण्यांत येण्यास सांगितलें. तेथेंहि तो व्यासपुत्र गंभीर मनानें सात दिवस राहिला. त्यानंतर जनकानें त्यास अंतःपुरांत पाठविलें, आणि त्या सुंदर व तरुण व्याससुतास तेथें तरुण व सुंदर स्त्रियांच्या हातून नानाप्रकारचें भोजन घातलें व अनेक मनोहर भोग्य पदार्थ देवविले. पण ते भोग व पहिल्या चवदा दिवसांत झालेले कष्ट यांतील एकानेंहि त्याच्या मनास विकारयुक्त केलें नाहीं. तें पर्वताप्रमाणें अचल होतें. सर्व प्रसंगीं मौन धरून तो प्रसन्नचित्तानें राहिला. हा त्याचा प्रभाव पाहून जनकास आनंद झाला. त्यानें त्या पूर्ण चंद्राप्रमाणें आल्हाद देणाऱ्या ब्राह्मणास जवळ आणविलें व मनोभावानें वंदन करून विचारिलें— "हे दयासागरा, आपलें आगमन कसें झालें? आपल्या मनांत काय आहे?" त्याबरोबर शुकानें जीवित-

रहस्याविषयीं तेच प्रश्न त्यास केले. जनकानेंहि व्यासाप्रमाणेंच उत्तर दिलें. तें ऐकून शुक म्हणाला—" राजन्, मीं पुष्कळ विचार करून हेंच पूर्वीं ठरविलें होतें. पित्याला जेव्हां विचारिलें तेव्हां त्यानेंहि असेंच सांगितलें आणि आपल्या तोंडूनहि मी तेंच ऐकत आहें. शास्त्रामध्येंहि असेंच वर्णन आढळतें. हा संसार आपल्या विकल्पामुळेंच उत्पन्न होऊन तो विकल्पाचा त्याग केल्यानेंच क्षीण होतो. अर्थात्, हा निःसार आहे असा सर्व तत्त्वज्ञांचा अभिप्राय आहे. श्रवणादि साधनांचा परिपाक होऊन तत्त्वाचा साक्षात्कार झाला असतां वासना व अविद्या यांचा नाश होतो व मूळाचाच नाश झाल्यामुळें अन्तःकरण सर्वथैव नाश पावतें. अन्तःकरणाचा उदय हीच संसाराची उत्पत्ति किंवा बंध व त्याचा अत्यंत नाश म्हणजे संसाराचा क्षय किंवा मोक्ष होय आणि अनेक वासना हें त्याचें बीज आहे. हा सिद्धान्त मीं जरी पूर्वींच ठरविला आहे, तरी खरें काय आहे तें आपल्या तोंडून ऐकावें अशी माझी इच्छा आहे. अनेक कल्पना करून व्याकुल झालेलें हें माझें चित्त स्थिर होईल व मला परम शान्ति मिळेल असें करा." हें ऐकून जनक म्हणाला—" मुने, तुला जें समजलें आहे तेंच खरें तत्त्व आहे, त्यापेक्षां दुसरा कांहीं निश्चय राहिलेला नाहीं. तें तूंच स्वतः जाणलें आहे व गुरूपासूनहि त्याचेंच श्रवण केलें आहे. पण तोच निश्चय दृढ होण्याकरितां मीहि तुला पुनः सांगतों. अखंड चैतन्यरूप पुरुषावांचून या सृष्टींत दुसरें कांहींएक नाहीं. प्राणी आपल्या संकल्पानें बद्ध झाला आहे व

तो आपल्या संकल्पानेंच मुक्त होणार आहे. सर्व दृश्य पदार्थांविषयीं तूं पूर्ण विरक्त झाला आहेस आणि त्यामुळेंच तें दुर्ज्ञेय तत्त्व तुला आपोआप समजलें. तूं जरी अल्पवयस्क आहेस तरी या भोगरूपी दीर्घ रोगांपासून आपली सुटका करून घेतली आहेस. आतां यापेक्षां आणखी काय पाहिजे ? प्राप्त करून घेण्यास योग्य असलेलें सर्व कांहीं तुला प्राप्त झालें आहे. तुझें चित्त परिपूर्ण झालें आहे. या दृश्य वस्तूंमध्यें तें आसक्त होत नाहीं. आतां तूं आपली सर्व भ्रांति सोड व सुखानें रहा. " जनकानें याप्रमाणें उपदेश केला असतां शुक परम वस्तूंमध्यें स्थिर होऊन राहिला. त्याचा शोक, संशय, आयास, इच्छा, भय इत्यादि सर्व नाहींसें झालें. तो महात्मा चित्ताच्या ऐकाग्र्याचा अभ्यास करून शेवटीं तत्त्वांमध्यें लीन झाला.

दुसरी आवश्यक गोष्ट ग्रंथ होत. ते हवे तितके मिळतात, फक्त प्रयत्न करून त्यांचा अभ्यास केला पाहिजे. तिसरी गोष्ट स्वपराक्रम असून,—ज्ञानेच्छा, योग्य शिक्षण, आत्मसंयमन, सत्संगति, अनिष्टनिवृत्ति— इत्यादि साधनांनीं तो साध्य होतो.

ज्याच्या प्रकाशानें सर्व शंका दूर होतात, दुःख व भय हीं नष्ट होतात, मनुष्य संसारसमुद्रांत बुडत नाहीं, आणि इहपरलोकीं अखंड आनंदाचा व परम शान्तीचा अनुभव येतो—तें सत्यज्ञान होय. जेणेंकरून कोणतेंहि बंधन प्राप्त होत नाहीं तोच सदाचार होय, जेणेंकरून मोक्षप्राप्ति होते तीच विद्या होय, आणि याहून भिन्न जें कर्म तो केवळ आयास होय, कारण त्यामुळें

शारीरिक व मानसिक सामर्थ्याचा क्षय होतो. जो पुरुष, मोहकारण उत्पन्न झालें असतां, काम-क्रोध-लोभ या मनोवेगांस वश होत नाहीं आणि मृत्यूस किंवा संकटास भीत नाहीं—तो मुक्त होय. खरें व खोटें यांतील भेद अन्तःप्रकाशानेंच समजतो. परमेश्वराचें अविकारित्व व सर्व पदार्थांचें आणि अवस्थांचें चंचलत्व यांचा जो अनुभव तेंच भेदज्ञान होय. अभ्युदयामध्यें व विपत्तीमध्यें, उत्सवामध्यें व दुःखामध्यें समचित्तत्व रहाणें हें चित्प्रकाशाचें लक्षण होय. अमृतस्रावी चंद्राप्रमाणें, ज्याचें दर्शन झालें असतां प्राणिमात्रास प्रकाश प्राप्त होतो—तोच मोक्षाधिकारी होय. जो चित्ताची शान्ति ठेवितो, कोणासहि पीडा करीत नाहीं, कशामुळेंहि त्रास पावत नाहीं, जो शरीरानें व मनानें प्रत्येकाच्या उपयोगीं पडतो, जो शरीराचा व मनाचा नाश सर्वदा पहातो, सूर्यतेजाप्रमाणें ज्याच्या बुद्धीचा प्रकाश राजवाड्यावर किंवा गरिबाच्या झोंपडीवर सारखाच पडतो, सुख व दुःख ह्या मनाच्या वृति असून जीविताच्या नानात्वास त्या अवश्य आहेत असें जो जाणतो, अन्तःशत्रू ज्या दुष्ट वासना त्यांचें निर्दालन प्रथम करून नंतर जगामध्यें पापाचा प्रसार करणाऱ्या बाह्य शत्रूंचा उच्छेद जो करितो,—तोच खरा शूर व पुण्याची मूर्ति होय. जेणेंकरून संकट टाळतां येईल तो खरा बुद्धिवाद होय, 'प्रत्येक पदार्थ नाशवंत आहे' हें त्रिकालाबाधित सत्य जेणेंकरून कळतें ती खरी दृष्टि होय, आळसामुळें आपलाच नाश होतो हें ज्ञान होईल तरच ती प्रपंचोन्मुखता शहाणपणाची मानावी. सशक्त किंवा अशक्त, ग-

रीब अथवा श्रीमंत, विद्वान् किंवा अज्ञानी, शहाणा अथवा मूर्ख—सर्वांबद्दल ज्याला सहानुभूति वाटते त्यालाच खरें ज्ञान झालें असें समजावें.

बांधवांवर आसक्ति ठेविल्यानें सशक्त, श्रीमान् व विद्वान् लोक सुद्धां मद या मनोविकारास वश होतात. आत्म्याची यथार्थ उपासना केली असतां सर्व दोष नष्ट होतात आणि स्वभाव सौम्य व शांत होतो. शरीरांत अहंकाराची जाणीव झाली म्हणजे चित्ताचा प्रादुर्भाव होऊं लागतो, आणि ही जाणीव वाढूं लागली म्हणजे चित्त जडमय होतें आणि शारीरभोग अवश्य होतात. शरीरभोगांचा असा चमत्कार आहे कीं जों जों त्यांची तृप्ति करावी तों तों त्यांची वासना प्रबल होत जाते व त्यांचें दमन केलें असतां दुःख होऊन मृत्युहि येतो. ज्ञानानें व शहाणपणानें नियमन केल्याशिवाय, चित्त कधींहि स्वस्थ बसत नाहीं आणि इंद्रियें जरी स्तब्ध राहिलीं तरी त्यांचे मानसिक व्यापार चालू रहातात व हे व्यापार शिक्षणाच्या व संगतीच्या मानानें पुण्यात्मक अथवा पापात्मक होऊं शकतात. जेव्हां शुभ किंवा अशुभ असा कोणताहि ऐहिक विचार मनांत येत नाहीं, तेव्हां जेथून त्याची उत्पत्ति झाली त्या परमात्मस्वरूपांत तें लीन होतें.

ग्रंथवाचनानें व सत्समागमानें जीविताचें रहस्य कळून येतें, पण शारीरभोग सतत व दीर्घकाल चालू राहिल्यानें नुसत्या चित्ताच्या निरोधानें त्यांचा त्याग संभवत नाहीं. मनाची घटना अशी आहे कीं ज्या वस्तूची आवड व सतत अभ्यास हीं घडतात, ती वस्तु का-

लान्तरानें त्याच्या स्वरूपांत इतकी मुरून जाते कीं ती मिळाली नाहीं तर अतिशय दुःख होतें. ज्या ज्या वस्तूचा हव्यास उत्साहानें व तत्परतेनें मनाला लागतो, ती प्राप्त करून घेण्याचें सामर्थ्य चित्ताला येऊं शकतें. मोक्षकारक ज्ञानाच्या लाभासाठीं, जन्मामुळें किंवा परिस्थितीमुळें प्राप्त झालेल्या वस्तूंचा त्याग करण्याची गरज नाहीं. सत्य, न्याय व नीति या तत्त्वांस चिकटून राहिलें म्हणजे झालें, मग त्यामुळें ते पदार्थ मिळोत अगर न मिळोत. या तत्त्वांचा त्याग करूनच मिळणाऱ्या पदार्थांचा लोभ सोडून देणें असेल, तर सर्व ऐहिक गोष्टी नश्वर आहेत अशी मनाची खात्री करून घ्यावी म्हणजे सर्व प्रकारची आवड-नावड नाहींशी होते. अन्तःकरणामध्यें ज्ञानाचा पूर्ण प्रकाश पडेतोपर्यन्त इंद्रियनिग्रह केलाच पाहिजे. जेव्हां ज्ञानप्राप्ति होते तेव्हां सर्व भेद नष्ट होऊन कशाची काळजी उरत नाहीं. इष्ट पदार्थांपासून सुख होतें व अनिष्ट वस्तूपासून दुःख होतें, जर इष्ट असेल तर अनिष्टहि असूं शकेल, यासाठीं दोहोंचा अभाव झाला असतां अत्युत्तम अवस्था प्राप्त होते.

प्रवृत्ति किंवा निवृत्ति यांपैकीं कोणत्यातरी एका हेतूकडे जीवात्म्याचा कल असतो. प्रवृत्ति म्हणजे संसार व निवृत्ति म्हणजे मोक्ष. हे हेतु साध्य होण्याकरितां रथाची कल्पना केली आहे. तो रथ शरीर होय, त्याचा स्वामी जीवात्मा, सारथि बुद्धि, मन लगाम होय. पंचेंद्रियें हे तेजस्वी घोडे असून शब्दस्पर्शादि विषय हे मार्ग होत. शरीर, इंद्रियें, मन इत्यादिकांसहित जो आत्मा तो सृष्टीचा स्वामी बनतो आणि अखिल विश्व त्याच्याच

सुखाकरितां किंवा दुःखाकरितां उत्पन्न केलेलें आहे. ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें, मन, बुद्धि हीं निसर्गनिर्मित मार्ग क्रमीत असतात. अज्ञानानें अंध झालेल्या अहंकारामुळेंच शरीर काम करितें असें वाटतें किंवा अनिष्ट घडल्यास आपण दुसऱ्यास दोष लावितों, परंतु ह्या गोष्टी निसर्गाचींच रूपें आहेत. निसर्गाचें वास्तविक ज्ञान होण्यासाठीं, सुख-दुःख, उपादेय-त्याज्य कोणताहि पदार्थ प्राप्त झाला असतां चित्त शिलेप्रमाणें निर्विकार राहिलें पाहिजे.

लाभ किंवा हानि झाली असतां शान्ति राखणें हें थोरपणाचें लक्षण होय, कारण प्रत्येक मनुष्य किंवा पदार्थ—आपलें शरीर सुद्धां एका क्षणीं प्राप्त झालें असतां दुसऱ्या क्षणीं त्याचा वियोग होणार हें निश्चित आहे. संयोगाचा अन्त जो वियोग तो ठेवलेलाच असतो, प्रत्येक कारणापासून कार्य झालेंच पाहिजे, व उत्पन्न झालेल्या पदार्थाचा नाश होणारच. इच्छा-द्वेष आवड-नावड—ह्या कल्पना सर्वथैव टाकून दिल्याशिवाय मनाला शान्ति व सुख हीं प्राप्त होणार नाहींत. मनुष्य निजला असतां स्वप्नामध्यें कधीं राजा होतो कधीं भिकारी होतो, केव्हां दुःखी होतो केव्हां सुखी होतो, पण जागा झाल्यावर सर्व नाहींसें होतें, त्याप्रमाणें जगत् मायिक आहे असें मानिलें पाहिजे. मानवी व्यवहारांत शुभाशिवाय अशुभ नाहीं, तसेंच अशुभाशिवाय असंमिश्र शुभ सांपडत नाहीं, म्हणून आनंद किंवा खेद न मानितां, असेल त्या स्थितीमध्यें आपलें कर्तव्य करावें मग परिणाम कांहीं होवो—यांतच शहाणपण आहे.

# प्रकरण ४

## प्रकाशोत्पत्ति

( श्लोक )

ज्ञानं सतां मानमदादिनाशनं ।
केषां चिदेतन्मदमानकारणम् ॥
स्थानं विविक्तं यमिनां विमुक्तये ।
कामातुराणामतिकामकारणम् ॥ १

( आर्या )

ज्ञानानें सुज्ञांच्या मानमदांचाचि होतसे नाश ॥
ज्ञानानें मूर्खांना मानमदांचाचि होतसे पाश ॥ १

एकान्तवास नेतो मोक्षपदा असति जे यमी सर्व ॥
कामातुरासि होई एकान्तें कामवासना गर्व ॥ २

# प्रकरण ४

## प्रकाशोत्पत्ति

परमात्म्याचा अंश जो जीवात्मा त्याचें वसतिस्थान शरीर होय. मनुष्य ज्याला पूज्य मानितो असें देवालय किंवा दुसरें एकादें पवित्र स्थान जोंपर्यन्त अस्तित्वांत आहे तोंपर्यन्त त्याची योग्य काळजी घेतलीच पाहिजे, तद्वत् शरीराचें रक्षण उत्कृष्ट रीतीनें केलेंच पाहिजे. शरीराच्या संगतीनें पृथ्वीवरील सर्व सुखानुभव व ज्ञानप्राप्ति होण्याची योग्यता चैतन्यास येते, इतकेंच नव्हे तरि ईश्वरी स्वरूपाचा देखील लाभ होऊं शकतो. शरीराचा लय पंचमहाभूतांमध्यें होऊन गेला, तरी चैतन्याचा नाश न होतां, त्यास आपल्या इच्छेप्रमाणें पाहिजे त्या शरीरांत प्रवेश करितां येतो. कांहीं झालें तरी ज्याचा संबंध केव्हां तरी तुटणार अशापासून वियोग झाल्यानें चैतन्याचें कांहींच नुकसान होत नाहीं. कोणत्याहि सहचरावर फारसें अवलंबून न रहातां, जोंपर्यन्त तो अस्तित्वांत आहे तोंपर्यन्त त्याचा उत्कृष्ट उपयोग करून घ्यावा यांतच सर्व पौरुष आहे. तसेंच ज्या सहचराचा त्याग करणें आपल्या शक्तीबाहेरचें काम आहे अशाचा तिरस्कार करून दु:खांत पडणें अगदीं प्रशस्त नाहीं. विपत्तीप्रमाणेंच, एकाद्या पदार्थाविषयीं जी नावड उत्पन्न होते तिजमुळें मनुष्याची परीक्षा होते आणि त्याचें वीर्य व स्थैर्य हीं कसोटीस लागतात. जीवितामध्यें नेहमींच सुदैव राहील आणि खटपटीचें कांहीं का-

रण उरणार नाहीं, तर तें अगदीं नीरस होऊन जाईल. संकटासाठीं तयार रहाण्यांतच मानवी शक्तींचा प्रयोग करण्यास उत्तम सवड सांपडते. अभ्युदय, आरोग्य व सुदैव—हीं अनुकूल असतांनाच असें ध्यानांत ठेवावें कीं केव्हां तरी तीं नष्ट होणार म्हणून नेहमीं सावध राहिलें पाहिजे. विपत्ति आली असतां सर्वदा आशापूर्ण असावें, कारण मनुष्याचें जेव्हां कल्याण व्हावयाचें असतें. तेव्हांच दैव त्याच्याकडे टवकारून पहातें.

अशुभ हें मनुष्यास सर्वकाल चिकटून रहातें, म्हणून त्याच्या चित्ताला तें इतकें आवडतें कीं अशुभाला प्रतिबंध करीन किंवा त्यापासून सुटेन ही गोष्ट अति अवघड होऊन बसली आहे. अशुभाचा प्रतिकार सर्वांना इष्ट आहे, आणि पुष्कळ लोक या कामासाठीं जर आपले सर्व विचार व हिंमत खर्च करितील, तर तें साधेल यांत संशय नाहीं. शिवाय शरीराच्या स्नायूंवर फारसा विश्राम ठेविता उपयोगी नाहीं, कारण फार श्रमामुळें व वयामुळें ते निःसत्त्व होतात आणि नष्ट झाल्यावर त्यांच्या जागीं दुसरे मिळणार नाहींत. परंतु मानसिक वीर्य कमी न होतां उलट वारंवार उपयोग झाल्यानें तें वृद्धिंगत होतें आणि योग्य शिष्यमंडळीहि तयार होते. मनुष्यमात्रास नेहमीं आनंद व समृद्धि देणाऱ्या कामाचा संबंध जडाशीं व चैतन्याशीं असतो. जडाच्या प्रदेशांत काम करणारे पुष्कळ असतात, कारण कल्पनाशक्तीशीं जडाचा संबंध तत्काल होतो आणि त्याचे परिणाम स्पष्ट असतात. तथापि जडाच्या क्षेत्रांतील कोणताहि लाभ घेतला तरी, तो जर चैतन्याच्या विकासाशीं संबद्ध न-

सेल तर शाश्वत होत नाहीं व विस्तार पावत नाहीं. नाम व रूप हीं क्षणभंगुर आहेत. दोन्ही मनाचीं कार्यें असून त्यांस फारसें महत्त्व देतां येत नाहीं, कारण दोहोंचा उदय कांहीं दिवस होऊन त्यांचा अनंतामध्यें लय होतो. परंतु चैतन्य सर्वकाल कायम रहातें.

भूतमात्रावरील प्रेमाचें वर्णन साधुसंतांनीं करून अडाणी बांधवांच्या मनावर स्वतःच्या उदाहरणांनीं तें उत्तम रीतीनें ठसविलें आहे, म्हणून अशा प्रेमानेंच जीवितसुखाची प्राप्ति तत्काल होते. अशुभ कशामुळेंहि उत्पन्न होवो, त्याचें उन्मूलन करितांना कठोरपणा व न्यायबुद्धि यांचा जरी अवलंब केला, तरी शान्ति व सुख प्राप्त करून देणाऱ्या समदृष्टीचा त्याग करितां उपयोगी नाहीं. वाईट संगतीमुळें किंवा शिक्षणामुळें जर मुलांच्या हातून अपराध घडला, तर जेणेंकरून मुलांचाच फायदा होईल अशा योग्य रीतीनें शिक्षा करण्यास कर्तव्यदक्ष आई-बाप किंवा पालक कधींच मागें घेत नाहींत, कारण त्यांस असें वाटत असतें कीं अशी शिक्षा केली नाहीं तर मुलांच्या भविष्यत् कल्याणास धोका येईल. मुलांस शिक्षा करितांना सुद्धां आईबापांची मुलांवरील ममता कमी होत नाहीं, कारण तेवेळीं निष्ठुरपणाचा नुसता आविर्भाव केलेला असतो. ही क्रिया मुलांस आणि आईबापांस व पालकांसहि हितावह आहे, कारण आईबापांचें किंवा पालकांचें सुख उतारवयांत मुलांवरच अवलंबून असतें. दया, माया, कर्तव्यनिष्ठा इत्यादि सद्गुणांप्रमाणेंच, मनुष्याच्या प्रेमाचा आरंभ घरींच व्हावा लागतो, म्हणजे मुलांवर आणि घरांतील इतर नातलगांवर

तें प्रेम असलें पाहिजे. नंतर ज्या गांवांत किंवा शहरांत मनुष्य रहात असेल तेथील शेजाऱ्या-पाजाऱ्यांवर त्या प्रेमाचा विस्तार झाला पाहिजे. तिसरें, ज्या देशांत तें गांव किंवा शहर असेल आणि ज्या देशांतील कायदे-कानू, राज्यव्यवस्था, संस्था—इत्यादिकांकडून त्याला सुख होत असेल, तिकडे या प्रेमाचा फैलाव झाला पाहिजे. चवथें, मनुष्यकृत किंवा निसर्गनिर्मित सीमेमुळें विभागलेले जे देश त्याला स्वदेशासारिखेच वाटत असतील अशा देशांवर त्याचें प्रेम बसलें पाहिजे. केवळ हितसंबंधानें पाहिलें, तरी स्वदेशाप्रमाणें व स्वबांधवाप्रमाणेंच, परदेशाबद्दल सुद्धां सहानुभूतीची भावना बाळगणें इष्ट आहे. एकदां अशुभाचा अतिरेक झाला म्हणजे तो जेथें होतो त्या प्रदेशाशीं संबंध तोडण्याचा जरी निश्चय केला, तरी तो बाधल्याशिवाय आपणाला सोडीत नाहीं, तसेंच एकादी गोष्ट परकीय म्हणून पूर्वग्रहामुळें किंवा द्वेषानें तिचा त्याग करण्याचा प्रयत्न केला, तथापि कोणत्या तरी मार्गानें ती आपणास फायदेशीर झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

सूर्यचंद्रादि सर्व निसर्गशक्ति सकल प्राण्यांसाठीं सारख्याच निर्माण झालेल्या असतात. सद्गुण, दुर्गुण वगैरे मानसिक अवस्था मनुष्यमात्रास सर्वसाधारण आहेत. अखिल वस्तूंची उत्पत्ति, स्थिति, लय समान होतात. सुख-दुःख, पाप-पुण्य हीं सर्वांच्या कपाळीं असतातच. अशा प्रकारची जीवितसंबंधी प्रत्येक गोष्ट समान असतां, संप्रदायरूप व तमःस्वरूप भेदभाव मानवी चित्तांत कसे उत्पन्न होतात हें समजणें दुर्घट आहे. या परि-

स्थितीचें स्पष्टीकरण होण्यास अशी कल्पना केली पाहिजे कीं सुख, दुःख, शुभ, अशुभ वगैरे भौतिक व मानसिक क्षेत्रांत जे जे विरोध दृष्टीस पडतात, ते जर समुद्राच्या भरती-ओहोटीप्रमाणें मनुष्याचें मन व्यग्र करून त्याची सुखशान्ति नष्ट न करितील, तर जसें जगत् आपणास गोचर होत आहे तसें कदापि रहाणार नाही.

अशुभाचें उन्मूलन करीत असतांना असें लक्षांत ठेवावें कीं त्याचे यत्किंचित् लाड केले किंवा त्याच्या निवारणांत थोडी कसूर केली तर मनुष्यमात्राचें कायमचें नुकसान झालें म्हणून समजावें. नुसत्या शिकवणीपेक्षां उदाहरणाचा पगडा मनुष्याच्या मनावर अधिक बसतो. शिक्षणानें व सहवासानें उत्कृष्ट उदाहरण घालून देतां येतें, यासाठीं शिक्षक व मित्र पहिल्या प्रतीचे असावे लागतात. ज्या ज्या वस्तूमध्यें निसर्गतः चलनवलन किंवा जीविताचें चिन्ह नजरेस येतें त्याची संगति मनुष्यमात्र करीत असतो. अग्नीच्या ज्वाला किंवा निर्झर-स्रोतसादि जलप्रवाह यांच्यामध्यें स्वाभाविक चलनवलन असल्यामुळें त्यांपासून मनुष्यास आनंद होतो व त्याच्या वृत्ति उचंबळून जातात. स्थिर पदार्थांपेक्षां चंचल वस्तूंनींच मनुष्याचें अन्तःकरण वेधून जातें. अत्यंत प्रिय मनुष्य जरी असला तरी त्याचें शरीर निर्जीव झालें असतां त्याचा समागम क्षणभर देखील सहन होत नाहीं. यासाठीं जेव्हां व्यक्ति अथवा राष्ट्र उन्नत स्थितीप्रत येऊन किंवा पराक्रम गाजवून जिवंतपणाचीं लक्षणें व्यक्त करितात, तेव्हांच जगाचें कल्याण किंवा नाश करण्याचे प्रसंग त्यांस येतात. याविषयीं ज्या गोष्टी नित्य व्यव-

हारांत दृष्टीस पडतात त्यांवरून असें सिद्ध होतें कीं प्रमुख व्यक्तीच्या किंवा वर्गाच्या अंगीं अत्यंत उदात्त व दयाशील असेच गुण असावे लागतात. व्यक्ति किंवा वर्ग हे नैतिक संस्कृतींत किंवा बौद्धिक प्रगतींत जितके मागसलेले रहातील, तितकी बांधवांशीं अथवा तदाश्रित मनुष्याशीं त्यांची वर्तणूक हलकटपणाची होईल. ज्या राष्ट्राचे अधिपति अनियंत्रित, जुलमी व केवळ लष्करी पेशाचे असतात, त्यांतील प्रजाजनांचा संबंध ज्या ज्या व्यक्तींशीं किंवा वर्गाशीं येतो, त्याशीं ते अविचारानें व उद्धटपणानेंच वागतात. तसेंच दुसऱ्याच्या नोकरींत किंवा ताब्यांत असतांना ज्या व्यक्तींस त्यांचे धनी किंवा वरिष्ठ क्रूरपणानें वागवितात, त्या व्यक्ति त्याचा वचपा जुलूम करणारावर न घेतां आपल्या मुलांमाणसांवर व चाकर-नोकरांवरच काढितात. मानवी अन्तःकरणाच्या या प्रवृत्तीवरून असें दिसतें कीं जसें उदाहरण घालून द्यावें तसें अनुकरण घडतें, आणि जुलूम करणारावर जरी सूड घेतां आला नाहीं, तरी शिक्षेचें भय न उत्पन्न होतां ज्या देशबांधवांना पीडा करितां येईल त्यांना छळण्यांत मनुष्याच्या चित्तास मौज वाटते. सुधारणा किंवा संस्कृति विशिष्ट प्रकारच्या अंगवर्णांत किंवा विशिष्ट आकाराच्या कपड्यांत नसते, तसेंच विवक्षित हवेला उचित किंवा विवक्षित काली प्रचलित असलेल्या संभावितपणाच्या कल्पनेस शोभणाऱ्या पोषाखानें शरीरास नटविण्यांत नाहीं, किंवा ईश्वरविषयक विशिष्ट मतें स्वीकारण्यांत नाहीं. मनुष्य कोणत्याहि प्रकारचा असला तरी त्याची वागणूक शिष्टा-

चाराची असणें, निसर्गशक्ति व कलाविषयक शोध यांचा उपयोग जीवितामध्यें शाश्वत आनंदाकडे जेणेंकरून होईल असा चैतन्याचा विकास ज्ञानाच्या सर्व शाखांमध्यें घडून येणें,—कोणत्याहि रीतीनें, कोणत्याहि स्थलीं अथवा कोणत्याहि कालीं अशुभाचा नाश करण्यास अवश्य असें सामर्थ्य मनुष्यमात्रांत उत्पन्न करणें—यासच सुधारणा अथवा संस्कृति म्हणणें योग्य आहे. अशुभ गोष्टीमध्येंच शुभाचें सर्वस्व भरलेलें असतें, इतकेंच कीं मनुष्यानें तें फार चातुर्यानें शोधावें लागतें. अशुभापासून दुसरा कांहीं फायदा झाला नाहीं तरी त्यामुळें मनुष्यास आपलें पौरुष दाखविण्यास अवसर सांपडतो, कारण ज्या अशुभाचा प्रतिकार करावयाचा असतो त्याच्या स्वरूपाप्रमाणें पराक्रम करणें अवश्य आहे.

सर्व संस्कृतीचा, सुखाचा, व शान्तीचा पाया हाच कीं कोणत्याहि प्रकारच्या अशुभाचें निर्दलन होऊन एक व अद्वितीय अशा परमेश्वराची ओळख झाली पाहिजे. हें सत्य समजून घेऊन कायावाचामनेंकरून तदनुरूप वागणूक झाली पाहिजे, नुसती बडबड व्यर्थ आहे. तेणेंकरून ईश्वराची निंदा मात्र होते.

# प्रकरण ५

## उपदेशपर कथा

( श्लोक )

अनागतानां भोगानामवांछनमकृत्रिमम् ।
आगतानां च संभोग इति पंडितलक्षणम् ॥ १

( आर्या )

अप्राप्त असति वस्तू नैसर्गिक त्यांवरी नसे इच्छा ॥
वस्तू प्राप्त अशांचा होई संभोग धीर तो अच्छा ॥ १

# प्रकरण ५

## उपदेशपर कथा

एका संसारी मनुष्यानें साधूस विचारिलें कीं ज्ञान म्हणजे काय? साधूनें त्यास एक पत्र देऊन शेजारच्या गांवीं एका व्यापाऱ्याकडे पाठविलें. तेव्हां वाटेनें जात असतां त्या मनुष्याला राजाची स्वारी चाललेली आढळली आणि एका शिपायाचा धक्का लागून संन्यासी भूमीवर पडलेला त्यानें पाहिला. हा अपघात झालेला ऐकून राजानें त्या संन्याशास आपणाकडे आणण्याचा हुकूम चाकरांस केला. मग राजानें संन्याशाची क्षमा मागितली आणि त्याला एक शाल व कांहीं रत्नें देऊन तो आपला मार्ग क्रमूं लागला. राजाची स्वारी गेल्यानंतर कांहीं दुष्ट लोक संन्याशापाशीं गेले आणि ती शाल व रत्नें हिरावून घेऊं लागले. त्या वस्तु मिळाल्या तेव्हां ज्या उदासीन वृत्तीनें त्यांचा स्वीकार केला होता, त्याच वृत्तीनें संन्याशानें देऊन टाकिल्या आणि म्हणाला कीं माझ्यापेक्षां तुम्हाला या वस्तूंचा उपयोग अधिक होईल यांत संशय नाहीं.

संसारी मनुष्यानें हा चमत्कार पाहिला आणि प्रावेशिक पत्र घेऊन वाटेनें जात असतां एका झाडाखालीं विश्रांतीसाठीं बसला. त्या झाडावर एक कपोतांचें जोडपें रहात होतें. त्या मनुष्यास पाहून स्त्री आपल्या पतीला म्हणाली—" पहा, वृक्षाखालीं पाहुणा येऊन बसला आहे, तेव्हां त्याचें आदरातिथ्य केलें पाहिजे. "

मग त्यांनीं गवतकाडी जमा करून पाहुण्यापुढें ठेविली आणि त्यानें विस्तव पेटविला. ज्वाला निघालेल्या पाहून स्त्री म्हणाली—"आतां याला खायला काय द्यावें? घरट्यांत तर कांहीं नाहीं, आणखी कांहीं आणायला जाईन तर हा कदाचित् उपाशीच निघून जाईल. तेव्हां मीच आगीमध्यें पडतें म्हणजे तो मला भाजून खाईल." हें तिचें भाषण ऐकून पति म्हणाला "मी तुला एकटीला कां म्हणून विस्तवांत पडूं देईन? मीच अग्नींत उडी घालून पाहुण्याचें भक्ष्य होतों." मग अग्नींत कोणीं पडावें याबद्दल दोघांमध्यें भांडण सुरू झालें. दोघेंहि अग्नींत पडलीं आणि अतिथीनें जेवण केलें."

संसारी मनुष्य पुढें चालला, आणि व्यापाऱ्याचे घरीं पोहोंचल्यावर त्यानें त्याचे हातीं प्रवेशपत्र दिलें. व्यापारी म्हणाला—"सध्यां मला फार काम आहे. पण तूं जर एकदोन दिवस वाट पहाशील, तर मी तुमचें काम करीन. सध्यां मला निकडीचें काम असें आहे कीं आप्तांकरितां व मित्रमंडळीकरितां और्ध्वदेहिक पोषाख तयार करणेचा आहे. उद्यां माझा मुलगा लग्नाला जाणार आहे आणि परत येतांना अपघातानें तो मरेल. यासाठीं और्ध्वदेहिक क्रियेकरितां कपडे जलदीनें तयार केले पाहिजेत."

संसारी मनुष्यास रहाण्याची सवड नव्हती, म्हणून तो परत गेला आणि घडलेला सर्व वृत्तांत त्यानें साधूस निवेदन केला. तेव्हां साधु म्हणाला—"तुला जें ज्ञान हवें होतें तें प्राप्त झालें आहे. तुला खरा संन्यासी व्हावयाचें असेल, तर राजाला जो भेटला त्याचें अनुकरण

कर; तुला उत्कृष्ट संसार करावयाचा असेल, तर कपोताच्या जोडप्याप्रमाणें वाग; आणि शहाणपण पाहिजे असेल, तर व्यापाऱ्यासारिखें रहा. "

## कथा २ री

हिमवान् नामक पर्वतावर जीमूतकेतु या नांवाचा विद्याधरांचा राजा होता. त्याच्या घराजवळच्या बागेंत एक वडिलार्जित कल्पवृक्ष होता. जो कोणी जें जें इच्छीत असे तें तें तत्काल त्याच्यापासून प्राप्त होई. कल्पवृक्षाच्या प्रसादानें जीमूतकेतूस एक पुत्र झाला; राजानें त्याचें नांव जीमूतवाहन ठेविलें. तो पुत्र गुरुशुश्रूषेमध्यें तत्पर, दानशूर, महाधीर व सर्व भूतांवर दया करणारा होता. तो तरुण झाला तेव्हां पित्यानें त्याला युवराज केलें.

यौवराज्यावर स्थित असतां जीमूतवाहन पित्याला म्हणाला—" बाबा, या संसारांतील सर्व पदार्थ नाशवंत आहेत, केवल महात्म्यांचें निर्मलयश स्थिर रहाणारें आहे. परोपकार मात्र या संसारामध्यें अनश्वर असून, शेंकडों युगांपर्यन्त साक्ष देणारा धर्म व यश यांस तो उत्पन्न करितो. यास्तव आपला जो हा कामना पूर्ण करणारा कल्पवृक्ष आहे त्याचा जर दुसऱ्यांच्या कल्याणाकडे विनियोग केला, तर मोठें फल मिळेल. " पुत्राचें हें भाषण ऐकून विरक्त पित्यानेंहि ' बरें आहे ' असें म्हणून कल्पवृक्षाचा यथेच्छ विनियोग करण्याची त्याला आज्ञा दिली. तेव्हां जीमूतवाहन कल्पवृक्षाजवळ जाऊन म्हणाला—" देवा, तूं आह्मांला सतत अभीष्ट देणारा आहेस. यास्तव माझा आतां एकच मनोरथ पूर्ण

कर. ही सर्व पृथ्वी दारिद्र्यरहित करून सोड. तुझें कल्याण होवो. जा, धनार्थी लोकांस मीं तुझें दान केलें आहे. " त्या धीरानें असें सांगितलें असतां कल्पवृक्षानें भूलोकीं अतिशय सुवर्णवृष्टि केली, त्यामुळें सर्व लोक श्रीमान् होऊन आनंद भोगूं लागले. कल्पवृक्षहि देऊन टाकणाऱ्या जीमूतवाहनासारिखा दयाळु दुसरा कोण असणार? त्याचें यश सर्व दिशा व उपदिशा यांमध्यें पसरून गेलें.

एकदां जीमूतवाहन मित्रावसु मित्रासहवर्तमान भ्रमण करीत समुद्राच्या तीरावर गेला. तेथील महावनांत हाडांच्या राशि पाहून तो दयाळु म्हणाला—" मित्रा, कोणाच्या हाडांचे हे एवढाले ढीग येथें पडले आहेत?" तेव्हां मित्रावसु म्हणाला—" नागांची माता कद्रु व गरुडाची माता विनता यांजमध्यें वैर उत्पन्न होऊन, गरुड नागांना भराभर खाऊं लागला. तेव्हां नागराज वासुकीनें अशी प्रार्थना केली कीं प्रतिदिवशीं समुद्रतीरावरील एका विस्तीर्ण शिलेवर एकेक नाग पाठवावा व तेवढ्यावर निर्वाह करावा. ती प्रार्थना गरुडानें मान्य केली आणि त्या दिवसापासून एकाच नागाला खाऊन गरुड रहात असतो. रोज खाल्ल्या जाणाऱ्या नागांच्या हाडांचे हे ढीग पडले आहेत. "

हें वर्तमान ऐकून दुःखित झालेल्या विद्याधरकुमारानें असा निश्चय केला कीं गरुडाला स्वशरीर अर्पण करून एका तरी नागाचें रक्षण करावें म्हणजे असार देहाचें कांहीं तरी सार होईल. नंतर इष्ट मनोरथ पूर्ण करण्यासाठीं दयाळु जीमूतवाहन एकटाच इतस्ततः फिरूं

लागला, तों दुरून रडण्याचा करुणस्वर एकाएकीं त्याच्या कानांवर आला. तेव्हां जिकडून तो ध्वनि ऐकूं येत होता तिकडे तो गेला, इतक्यांत एका उंच शिलेपाशीं त्याला एक सुंदराकृति शंखचूड नांवाचा तरुण नाग दृष्टीस पडला. त्याला राजपुरुषानें तेथें आणून सोडिलें होतें व तो रडत असलेल्या एका वृद्ध स्त्रीला सांत्वनपूर्वक परत जावयास विनवीत होता. करुणाकुल जीमूतवाहनाच्या लक्षांत एकदम सर्व प्रकार येऊन तो वृद्ध स्त्रीला म्हणाला- "माते, मी तुझ्या पुत्राचें रक्षण करितों. आई, तुझ्या पुत्राला सोडविण्याकरितां मी येथें आलों आहे. वस्त्रानें झाकून मी हें आपलें शरीर भुकेलेल्या गरुडाला अर्पण करितों." हें भाषण ऐकून शंखचूड म्हणाला- —"हे महाधैर्यवान् पुरुषा, तूं आपली कृपालुता दाखविलीस हें खरें आहे, तुझ्या शरीराचा नाश करून मी आपलें शरीर राखूं इच्छित नाहीं. कारण, रत्न खर्चून पाषाणाचें रक्षण करण्याची इच्छा कोण करील? केवळ आपल्या शरीरावरच प्रेम करणाऱ्या माझ्या सारख्या असंख्य प्राण्यांनीं जग भरलेलें आहे, परंतु ज्यांना सर्व जग अनुकंप्य वाटत असतें, असे तुझ्या सारखे लोक फार विरळ होत. इतकें बोलून त्यानें जीमूतवाहनाचा निषेध केला व अंतकालीं समुद्रतीरीं असलेल्या गोकर्ण नामक शिवास नमस्कार करण्याकरितां तो निघून गेला असतां, त्याच्या मातेनेंहि प्रयाण केलें.

इतक्यांत प्रचंड वारा सुटून तें सर्व अरण्य हलूं लागलें, तेव्हां गरुडच येत आहे असें अनुमान करून दुसऱ्यासाठीं प्राण देणारा जीमूतवाहन वध्यशिलेवर चढू-

न बसला. लागलींच गरुडानें आकाशमार्गानें येऊन त्यावर झडप घातली आणि त्याला चोंचींत धरून नेलें. चंचुप्रहारामुळें त्याच्या अंगांतून रक्ताच्या धारा वाहूं लागल्या आणि त्याच्या योगानें ती शिला व ज्या मार्गानें गरुड गेला तो मार्ग हीं रक्तचिन्हित होऊन गेली. शेवटीं महावेगानें त्या धीर पुरुषाला पर्वताच्या शिखरावर नेऊन गरुड खाऊं लागला असतांना तो मनांत असें चिंतन करीत राहिला कीं—मला परोपकाररहित स्वर्ग व मोक्ष नकोत, तर असाच परोपकार करण्याकरितां प्रतिजन्मीं असेंच पुष्ट शरीर प्राप्त होवो.

इकडे शंखचूडहि गोकर्णास नमस्कार करून भगवच्चिंतन करीत त्या शिलेजवळ आला. पण ती रक्तानें भरलेली आहे असें पहातांच “ अरेरे, धिक्कार असो. मोठाच प्रमाद घडला. त्या महात्म्यानें मजकरितां स्वशरीर गरुडाला खचित अर्पण केलें असावें ” असें मनांत म्हणून, तो साधुनाग भूमीवर गळत चाललेली रक्तधारा पहात त्वरेनें निघाला.

इतक्यांत तिकडे जीमूतवाहनाला खाणाऱ्या गरुडानें तो मोठा आनंदित दिसत आहे असें पाहिलें. त्याबरोबर गरुड त्याला खावयाचें सोडून थांबला व मनांत म्हणाला—“ अहो, हें काय आश्चर्य आहे ? हा कोणी अपूर्वच प्राणि मला भेटला आहे, कारण मी खात असतांनाहि तो महाधीर आनंदित होत आहे, मरत नाहीं. मीं खाऊन राहिलेल्या त्याच्या अंगावर रोमांच स्पष्ट दिसत आहेत. एकाद्या उपकार करणाऱ्याकडे जसें पहावें. त्याप्रमाणें हा मजकडे पहात आहे. यास्त-

व हा नाग नसून दुसराच कोणी साधु आहे." गरुड याप्रमाणें विचार करीत आहेसें पाहून, जीमूतवाहन म्हणाला "अहो पक्षिराज, माझ्या शरीरांत अजून रक्त व मांस पुष्कळ आहे. अजून तुझी तृप्ति झाली आहे असें दिसत नाहीं. मग अकस्मात् मला भक्षण करावयाचें सोडून देऊन स्वस्थ कसा बसतोस?" जीमूत वाहन गरुडाला इतकें बोलत आहे, तोंच तेथें आलेला शंखचूड दुरूनच आपल्या भक्षकाला म्हणाला— "विनतासुता, नको नको, असलें महापातक करूं नको. आज हा तुला भ्रम कसा पडला? हा नाग नव्हे, मी तुझ्या भोजनाकरितां आलेला नाग आहें."

येणेंप्रमाणें सर्व गोष्टींचा उलगडा होऊन गरुडाला मोठा पश्चात्ताप झाला आणि सर्व भूतांवर दया करणाऱ्या विद्याधराचें क्षतयुक्त अंग त्यानें अमृतसिंचनानें व्रणरहित केलें. कृतकृत्य व महापुण्यात्मा अशा जीमूतवाहनाचें यश त्रिभुवनांत पसरलें. ज्यांचें चरित्र त्रिभुवनांतील लोकांच्या हृदयांत चमत्कार उत्पन्न करणारें असतें त्यांच्याकडे कल्याणपरंपरा आपोआप धांवत येतात.

## कथा ३ री

एका तबेल्यांत रात्रीं पुष्कळ घोडे बांधलेले होते. आणि त्याला एकाएकी आग लागली. कांहीं घोडे गरीब असल्यामुळें मोकळेच होते, म्हणून त्यांपैकीं बहुतेक पळून गेले; एकदोन मात्र आगीची पर्वा न करितां तेथेंच राहिले आणि गडबड न करितां जळून गेले. कांहीं घोडे जरा नाठाळ असल्यामुळें सैल बांधले होते, ते अंमळ भाजले आणि मग पळून गेले. पण घट्ट बांध-

लेल्या घोड्यांपैकीं कोणीच सुटून गेले नाहींत, म्हणून ते सर्व उड्या मारून, लाथा झाडून, धडपड करून जळून मेले.

हे घोड्यांचे चार वर्ग मानवी चैतन्याच्या प्रकारांचे निदर्शक होत. पहिला प्रकार शहाण्या व सुज्ञ लोकांचा असतो, म्हणून त्यांना प्रतिबंध होतच नाहीं. दुसरा प्रकार पूर्ण वैराग्यसंपन्न तपस्व्यांचा होय. अर्धे चांगले व अर्धे वाईट अशांचा तिसरा प्रकार होय आणि ते सर्वथैव विश्वसनीय नसल्यामुळें थोडेसे भाजून बाहेर निघतात. चवथ्या प्रकारचे लोक अगदीं मूर्ख व दुष्ट असतात.

## कथा ४ थी

अग्नीचे तीन प्रकार माणसाला माहीत असतात. पहिला अग्नि अत्यन्त उपयुक्त असून मनुष्याला सुख होईल इतकीच उष्णता जवळ येणाऱ्याला प्राप्त होते. अशा अग्नीपासून दूर जावेंसें वाटत नाहीं किंवा तो विझवावा असेंहि वाटत नाहीं. दुसऱ्या प्रकारचा अग्नि कधी उपयोगी असतो, कधीं त्यांतून ज्वाला निघतात, कधीं उपयोगी नसल्यामुळें विझवून टाकावा लागतो. तिसरा अग्नि नेहमीं भडाभड इतका जळत रहातो की तो लवकर विझून जातो, नाहीं तर कोणी तरी शेजारीपाजारी त्याला बंदोबस्तांत ठेवितो किंवा तसा न राहील तर विझवून टाकितो.

पहिला प्रकार सदाचारसंपन्न मनुष्यांचा दर्शक असतो, दुसरा शुद्धचित्त संसारी मनुष्याचा आदर्श होतो, व आपल्याच अभिमानांत गर्क अशा मनुष्यांचा प्रतिरूपक तिसरा प्रकार असतो.

## कथा ५ वी

पूर्वीं भरतखंडांत एका राजाला सुंदर मुलगी होती. तिच्या रूपाचें वर्णन एका भाटानें येणेंप्रमाणें केलें होतें--

( श्लोक )

कमलिनी मलिनी दिवसात्यये ।
शशिकला विकला रजनीक्षये ॥
इति विधिर्विदधे रमणीमुखं ।
भवति विश्वतमः क्रमशो जनः ॥ १

याचा अर्थ असा कीं---दिवस संपला असतां कमलिनी निस्तेज होते, रात्र गेली असतां चंद्राचा प्रकाश विनष्ट होतो, यासाठीं विधात्यानें स्त्रियांचें मुख निर्माण केलें आहे. मनुष्य हळू हळू शहाणा होत जातो.

मुलीचें अप्रतिम सौंदर्य पाहून आणि आपल्या उच्च कुलाचा अभिमान धरून राजानें असा निश्चय केला कीं आपल्यापेक्षां योग्यतेनें अधिक असा वर मिळाल्याशिवाय कन्येचा विवाहच करावयाचा नाहीं. पण हा आग्रह सिद्धीस जाण्याचा रंग दिसेना. एके दिवशीं अरण्यांत राजा शिकारीस गेला असतां त्याची आणि परिवाराची चुकामूक पडली, व वाट चुकल्यामुळें इकडे तिकडे हिंडतां हिंडतां दिवस मावळावयाची वेळ आली. सायंकाल झाला तेव्हां एक तपस्वी भेटला. राजा अगदीं घाबरून जाऊन निराश्रित झाल्यामुळें त्या योग्याकडे गेला आणि आपलें सर्व वर्तमान कळवून रानांतून बाहेर पडण्यास वाट विचारूं लागला. तपस्व्यानें त्याच्या बरोबर जाऊन नीट मार्ग दाखविला. रस्त्याला लागल्यावर राजाला असें वाटलें कीं संकटकालीं देहभान विसरून आपण त्या त-

पस्व्याशीं परम आदरानें भाषण केलें. तेव्हां अर्थात् आपण श्रेष्ठत्व कबूल केल्यासारखें झालें. म्हणून कन्येचें दान तपस्व्यासच करणें उचित आहे. तेव्हां मुलीचें पाणिग्रहण करण्याविषयीं त्यानें योग्यास विनंति केली. योग्यानें अनेक सबबी सांगून म्हटलें कीं संसारसुखांत राहून तपश्चर्या साधणार नाहीं आणि मनोनिग्रहास कांहींएक मदत होणार नाहीं. राजानें फारच आग्रह धरिला. म्हणून राजाची मर्जी सुप्रसन्न राखण्याकरितां योग्यानें मोठ्या संकटानें रुकार दिला.

राजकन्येबरोबर स्त्रीधन या रूपानें राजानें अर्धें राज्य तपस्व्यास देऊं केलें, पण तो घेईना. आणि म्हणाला कीं प्रपंचाची चिन्ता उत्पन्न झाली आहे तेवढी पुरे झाली, आणखी राज्याची भर करण्याचें कारण नाहीं. शिवाय राजकन्येशीं विवाह होण्यापूर्वीं त्यानें अशी अट केली कीं तिनें दरबारी पोषाख व रहाणी सोडून देऊन तपस्व्याच्या स्थितींत आनंदानें राहिलें पाहिजे. तपस्व्याची वृत्ति सोडावयाची नाहीं व राजवैभवाचा त्याग करावयाचा---हा योग्याचा निश्चय कायम झालेला पाहून राजाला तो कबूल करणें भाग पडलें.

विवाहसमारंभ आटोपल्यानंतर. राजानें तपस्वी जामातास व कन्येस आपल्या महालांत बोलाविलें, आणि तपश्चर्येचें मर्म मुलीस समजलें म्हणजे नवीन आचरणानें व परिस्थितीनें तिच्या सुखांत बिघाड होऊं नये या उद्देशानें योग्याला पुढील प्रश्न केले:- -तप म्हणजे काय? संसारसुखापेक्षां तपश्चर्या श्रेष्ठ कशी? माझ्या राज्याचा किंवा संपत्तीचा दहावा हिस्सा मिळाला असतां बहुतेक

लोक अत्यन्त सुखी होण्याचा संभव असून, आपण अर्ध्या राज्याचा स्वीकार कां केला नाहीं ?—तेव्हां योगी म्हणाला "आपण महाराजच आहां, तेव्हां अर्थात् मानवी हेतु, कायदे, राज्य करण्याचे नियम वगैरे रहस्यें आपणास विदित आहेतच. यासाठीं राज्य करण्यापासून प्राप्त होणारे हक्क व जबाबदारी यांपासून राजाला काय सुख मिळतें तें अगोदर सांगा म्हणजे माझ्या स्थितीविषयीं माहिती कळवीन."

राजा म्हणाला "ज्यांचें हिताहित ईश्वरानें माझ्या हातांत ठेविलें आहे, त्या प्रजाजनाहून शरीराच्या बाबतींत मी मुळीच भिन्न नाहीं. उत्पत्ति, स्थिति. लय, जीविताचीं सुखदुःखें, शारीरवेग, मनोवेग— इत्यादि गोष्टींमध्यें मी अगदीं त्यांच्यासारखा आहे, परंतु त्यांजवर राज्य करण्यासाठीं व त्यांनीं माझा योग्य मानमरातब राखण्यासाठी कांहीं गुणांत तरी माझा श्रेष्ठपणा सिद्ध झाला पाहिजे. म्हणून अखिल प्रजेविषयीं निष्पक्षपातबुद्धि मला ठेविली पाहिजे. सर्वांचे हक्क संभाळून एकाच कांट्यानें न्याय केला पाहिजे, आणि सर्वांच्या कल्याणाबद्दल समान चिन्ता वाहिली पाहिजे. जर अशी समत्वबुद्धि बाळगली नाहीं, तर त्यांचा राजा होण्यास मी लायक होणार नाहीं व फार दिवस राज्याधिकारहि भोगणार नाहीं, कारण राज्यकर्ता अयोग्य ठरेल तर राज्याचा नाश ठेवलेलाच असतो. प्रजाजन राजाच्याच छंदानें वागतात; तो सद्गुणी तर ते सद्गुणी ! तो दुर्गुणी, स्वच्छंदी किंवा पक्षपाती असेल तर तेहि दुर्गुणी बनून कायदे-कानू झुगारून देतात. राजा जसें उदाहरण घालून देईल, तसा

आपला आयुष्यक्रम व आचरण ठेवण्याचा प्रजाजनांचा शिरस्ता आहे. जुलूम किंवा कपट करून कधीं कधीं राज्य व संपत्ति प्राप्त होतात, पण अशा उपायांनीं झालेले लाभ फार दिवस टिकत नाहींत. राजा जरी कायदे करितो, तरी ज्यांच्या कल्याणाकरितां ते केलेले असतात त्या प्रजाजनांप्रमाणेंच आपणहि त्यांनीं बांधलेले आहों असें राजानेंहि मानिलें पाहिजे. सृष्टीच्या आरंभीं जे नियम ईश्वरानें केलेले असतात, त्यांनीं सृष्टपदार्थांप्रमाणेंच तोहि बद्ध झालेला असतो, कारण ईश्वर जरी सर्व शक्तिमान् असला तरी न्यायबुद्धीमुळें एकदां प्रसिद्ध केलेले नियम मोडण्याचें त्याच्या मनांत येतच नाहीं. या सनातन सूत्रावर जगाचा सुरक्षितपणा व नैरंतर्य हीं अवलंबून रहातात. राजकारणाचीं मूलतत्त्वें, निष्पक्षपाती कायदे, न्यायबुद्धि, सकलांच्या हिताची चिन्ता वगैरे ज्या गोष्टी मूळ संस्थापकांनीं कायम रहाण्याकरिता घडविलेल्या असतात, त्या जर राज्यकर्त्यांनीं पाळिल्या नाहींत, तर राज्यांची व राष्ट्रांची उलथापालथ होऊन जाते. व्यक्तींमध्यें फरक झाला तरी, हे राजे एकामागून एक उदार, न्यायी व निष्पक्षपाती होतील, पापसंस्कारामुळें घडणारा चैतन्याचा व्याहोम झुगारून देऊन आपला क्षुद्र स्वभाव विसरून जातील, कांहीं प्रजाजनांवर कृपा करून इतरांची हयगय किंवा निर्भत्सना करणार नाहींत, राष्ट्राच्या निरंतर कल्याणाकडे व सामर्थ्याकडे लक्ष देऊन स्वतःचें सुख किंवा हित विसरतील——तर अशा राजांनीं अलंकृत केलेलीं राष्ट्रं कदापि नष्ट होणार नाहींत, व त्यांस प्रतिस्पर्ध्यांची किंवा

शत्रूची भीति उरणार नाहीं. ज्या राष्ट्रांत राजे व प्रजा परस्परांचे धर्म व कर्तव्यें जाणतात, जेथें सर्व सद्गुण वास करितात, जेथील लोक आत्मसंयमन करून समाधानांत रहातात—असें राष्ट्र म्हणजे पृथ्वीवरील स्वर्गच होय. कांहीं राजांमध्यें ईश्वरी गुण वास करीत असल्यामुळें, ते आपलीं राज्यें अनुकरणास लायक करितात, पण जीवित क्षणभंगुर असल्यामुळें राज्य करण्याच्या उदात्त कल्पना अनेक राजवंशजामध्यें टिकणें फार कठीण आहे. व्यवस्थित उपवनांत झुडपें माजल्यावर तीं लवकर उपटलीं नाहींत तर बागेचा नाश होतो, किंवा ईश्वराच्या श्वासाबरोबर स्वर्गाचा नरक बनून जातो. त्याप्रमाणेंच राज्याची स्थिति आहे. राजाचें कर्तव्य म्हटलें म्हणजे सद्गुणांची जोपासना करून दुर्गुणांचें छेदन करणें, पराक्रमास उत्तेजन देऊन भयाचें उन्मूलन करणें, विपत्ति दूर करणें, आनंदाचा उपभोग घेणें—हें होय. प्रजेशीं वागतांना राजानें अभ्युदयकालीं सर्वांशीं मिळून असावें, परोपकारांत सुख मानावें, विपत्तीमध्यें दया करावी, व दुष्टांस शिक्षा करावी. राजानें ध्यानांत ठेवावें कीं—जसजशी स्थिति पालटेल तसतसे वेळोवेळीं फेरफार केले पाहिजेत; निरनिराळ्या लोकांनीं सुचविलेल्या फेरफारांचा विचार झाला पाहिजे, आणि सामान्य लोक, मंदबुद्धीचे व स्वार्थसाधु असल्यामुळें, ते फेरफार अव्यवहार्य समजतात म्हणून ते एकीकडे काढूं नयेत, तरि सर्व प्रकारच्या फेरफारांत व्यक्तीच्या किंवा वर्गाच्या सुखापेक्षां सार्वजनिक कल्याणाकडेच नजर असावी. ज्याप्रमाणें, लहानशा किड्यापासून सृष्टीचा स्वामी जो मनुष्य तेथ-

पर्यन्त सर्व प्राण्यांचा फायदा निसर्ग व निसर्गाचे नियम यांपासून होऊन सर्वांचा चरितार्थ चालतो, त्याप्रमाणें राजापासून रंकापर्यन्त सर्व मनुष्यांच्या विद्यावृद्धीवर आणि सुशिक्षणावर राष्ट्राचें सामर्थ्य व मोठेपणा हीं अवलंबून रहातात. उत्तम प्रकारचे लोक आपलें कर्तव्य बजावतात, याचें बीज बक्षिसाची आशा किंवा शिक्षेची भीति हें नसून, येथें उपजतस्वभाव किंवा विवेकबुद्धीची पसंती—हीच चालकशक्ति होय. परंतु आशा, भय. गर्व, अभिमान—ह्याबरहुकूम सामान्य जनांची प्रवृत्ति असते, आणि त्यांनीं सदाचाराच्या मार्गानें वागावें व पापापासून निवृत्त व्हावें यासाठीं राज्य चालवितांना पारितोषिक व शिक्षा हीं अवश्य झालीं आहेत. चांगले लोक कोणते, वाईट कोणते हा भेद दाखविण्याकरितां संपत्ति व किताब यांच्या रूपानें बक्षिसें देणें अवश्य आहे. कारण चैतन्याची रचना आरंभापासून संवयीनें व संप्रदायामुळें अशी झाली आहे कीं पुढारी व अधिकारी लोकांवर कांहीं महत्त्वदर्शक खुणा असल्याशिवाय व्यवस्था राखण्यासाठीं व सामान्य स्थिति सुधारण्यासाठीं त्यांना जो मान मिळणें अवश्य आहे, तो मिळत नाहीं. तसेंच दुष्ट कृत्यें बंद होण्याकरितां शिक्षा अवश्य पाहिजेत. गुन्हा, दुखापत किंवा बळजबरी केली असतां न्यायाचा कडकपणा दाखविला पाहिजे, मग तो गुन्हेगार राजा असो किंवा रंक असो. मोठ्या दर्जाच्या मनुष्यानें गुन्हा केला असतां, जर त्याबद्दल त्याला शिक्षा झाली नाहीं, तर तें राष्ट्र कितीहि बलाढ्य असलें तरी रसातळास जाणार यांत शंका नाहीं.

" मनुष्यनिर्मित राजकीय संस्थांमध्यें, व्यवस्था व कर्तव्यबुद्धि यांशीं स्वातंत्र्याचा मेळ बसविणें कठीण आहे. मानवी चैतन्य व शरीर यांस जन्मापासून योग्य मार्गानें वृद्धि पावण्यास पूर्ण मोकळीक असली पाहिजे आणि जोंपर्यन्त तमोगुणाच्या प्राबल्यानें स्वच्छंदीपणा व इतर प्रजाजनांशीं उच्छृंखलपणें वागण्याची प्रवृत्ति हीं उत्पन्न झालीं नाहींत, तोंपर्यन्त त्यांस त्या स्वातंत्र्याचा उपभोग घेऊं दिला पाहिजे. तुरुंगांतील कैद्याप्रमाणें, आपले दुष्ट विकार कह्यांत ठेवण्यासाठीं मानवी चैतन्यास शृंखलांनीं बद्ध केलें पाहिजे. हें बंधन चैतन्यानेंच निर्माण केलें असेल आणि अशीं मनुष्यें राष्ट्रांत पुष्कळ असतील, तर तें राष्ट्र इतर राष्ट्रांस खचीत ताब्यांत ठेवील. व्यक्तींस अथवा वर्गास विशेष हक्क देण्यापासून राष्ट्रीय कल्याण होत नाहीं; परंतु उच्च तऱ्हेचें मानसिक किंवा बौद्धिक शिक्षण जर एकाद्यानें संपादन केलें अथवा श्रेष्ठ कामगिरी केली, तर त्यास विशेष अधिकार दिल्यानें कांहीं बिघडत नाहीं, कारण त्याच्या श्रेष्ठ गुणाबद्दल तें योग्य बक्षीस समजलें पाहिजे. राजानें किंवा राष्ट्रांतील प्रमुख अंमलदारानें देशांतील कर्तव्यनिष्ठ व सुसंस्कृत लोकांमधून मंत्री निवडावे आणि त्यांच्या सल्ल्यानें राज्य चालवावें. मनुष्याचें मन दुर्बल व मर्यादित असतें, म्हणून राष्ट्रकल्याण करण्यांत तरबेज असलेल्या इतर माहितगारांकडून पूर्तता करून घेतल्याशिवाय कोणत्याहि विषयाचा सर्व बाजूंनीं विचार होऊन तो अंमलांत आणितां येत नाहीं. जबाबदारीशिवाय हक्क मिळत नाहीं, आणि जसजसा जास्त अ-

धिकार संपादिला जातो, तसतशी जबाबदारीहि वाढत जाते. पित्याचा पुत्राशीं जो संबंध तोच राजाशीं प्रजेचा असतो, म्हणून राजानें प्रजाजनांस सुखी राखिलें पाहिजे, त्यांच्याकरितां उत्तम कायदे केले पाहिजेत, त्यांस उत्कृष्ट शिक्षण देऊन कर्तव्यबुद्धि जागृत केली पाहिजे आणि जीवनसंग्रामामध्यें यश मिळविण्यासाठीं त्यांस समर्थ केलें पाहिजे. ज्या राष्ट्रांत नमुनेदार राजा असतो आणि प्रजाजन कर्तव्यदक्ष व समाधानांत असतात, त्या राष्ट्रास शत्रूचें किंवा प्रतिस्पर्ध्याचें भय नसतें. शिवाय त्यापासून इतर राष्ट्रांस उत्तम उदाहरण सांपडतें आणि तेथील प्रजाजन या राष्ट्राचा आश्रय करितात."

हें राजाचें भाषण ऐकून तपस्वी जामातानें प्रश्न केला—"राष्ट्रांतील प्रजाजनांची चित्तवृत्ति बहुधा किती प्रकारची असते?" तेव्हां राजा म्हणाला—"मनुष्याच्या चेहऱ्याप्रमाणेंच चित्तवृत्तीचे प्रकार अनेक आहेत, दोन देखील एकमेकांशीं जुळत नाहींत, परंतु कांहीं मुख्य लक्षणांचें सामान्य वर्गीकरण करितां येतें. ( १ ) पुष्कळ लोक शान्त असून, सरलता, सुस्वभाव व खरेपणा यांचा पगडा त्यांच्या शारीरिक व मानसिक क्रियांवर बसलेला असतो. ( २ ) कांहीं लोक अभिमानी असतात आणि वास्तविक स्थितीपेक्षां त्यांना अधिक डौल करावासा वाटतो. ( ३ ) कांहीं लोक रसिक असून ज्या त्या गोष्टीची विनोदी बाजू तेवढी घेतात आणि इष्टमित्रांस अनुकरण करण्यास लावितात. ( ४ ) कांहीं लोक गर्विष्ट असतात, आणि जे प्रतिबंध करीत नाहींत किंवा फार गरीब असतात अशा बांध-

वांवर वर्चस्व स्थापण्यास कमी करीत नाहींत. ( ५ ) कांहीं लोक दांडगे असतात आणि जन्मापासूनच किंवा वाईट शिक्षणामुळें त्यांचें वर्तन चांगलें नसतें, ते दुसऱ्याच्या मनोवृत्तीची मुळींच पर्वा करीत नाहींत आणि दुसऱ्यास अशुभ वळण लावितात. चवथ्या व पांचव्या प्रकारचे लोक देशांत फार झाले तर त्यांना ताब्यांत ठेवण्यास समर्थ असे राज्यकर्ते पाहिजेत, नाहीं तर अशुभाचा संसर्ग मानवी चैतन्यास लवकर बाधत असल्यामुळें, ते सर्व लोकांना बिघडवून टाकतील आणि राष्ट्राचा मोठेपणा घालवितील. ( ६ ) कांहीं लोक चैनी असून त्यांची आळसाकडेच प्रवृत्ति असते. ते दुसऱ्याच्या कारभारांत पडत नाहींत व दुसऱ्याला आपल्या कारभारांत हात घालूं देत नाहींत. आपलें किंवा राष्ट्राचें बरें करावयास झटावें असें त्यांच्या मनांत सुद्धां येत नाहीं आणि जर फूस दिली तर मुळींच काम न करितां खेळण्याकडेच त्यांची प्रवृत्ति होते. जसजशी राष्ट्राची संपत्ति वाढते, भरभराट होत जाते व ऐषआराम आवडूं लागतो, तसतसा कामाचा कंटाळा येतो. फार झालें तर द्रव्यप्राप्तीसाठींच काम करावेंसें वाटतें, थोड्या कामासाठीं पुष्कळ पैशाची हांव सुटते, आत्मप्रतिष्ठेची कल्पना उद्भवते, आणि योग्य कालीं अधिक वीर्यवान् लोक येऊन देश काबीज करितात. जर राज्यकर्ते खरे देशभक्त असतील, तर राज्यांत आळसाचीं किंवा कर्तव्यांत हेळसांडपणाचीं चिन्हें दिसूं लागल्याबरोबर अशा दुर्गुणांचा बींमोड करण्यास अवश्य झटतील. ”

इतकें बोलून, तपश्चर्येचीं मर्मे काय आहेत तीं समजावून देण्यासाठीं राजानें जामातास विनंति केली. तेव्हां योगी म्हणाला—" तपश्चर्येचें मर्म, उद्देश, नियम व क्रिया काय आहेत तें पूर्णपणें समजावून देण्याची योग्यता अजून माझ्यामध्यें आलेली नाहीं, तथापि इतकें सांगतां येईल कीं जसे राजे आपल्या ज्ञानाप्रमाणें आपलीं कर्तव्यें उत्साहानें करूं शकतात, त्याप्रमाणें तपस्वीलोक स्वीकारलेल्या आयुष्यक्रमांत आपलीं कर्तव्यें उत्कृष्ट रीतीनें बजावतात.

" संसारी लोक यथेच्छ उपभोग घेऊन जें सुख मिळवितात तेंच आत्मसंयमनानें संपादन करण्याचा प्रयत्न तपस्वी करितात. बाळपणीं व तरुणपणीं इतर ज्ञानाच्या प्राप्तीसाठीं ज्या मार्गाचा अवलंब करितात तसाच मार्ग तपश्चर्येमध्यें स्वीकारिला जातो. मुलांस व मुलींस शाळेंत घालून नियमित शिक्षणक्रमांत तयार करितात आणि मग जीविताचीं कर्तव्यें अंगावर घेण्यास तीं योग्य होतात. अवज्ञा करणाऱ्या व हट्टी विद्यार्थ्यांनीं आपले दुर्गुण टाकावे म्हणून त्यांस शोधनालयांत ठेवितात. तपस्व्याचा मार्ग स्वीकारणें असेल तर एकान्तवास पत्करिला पाहिजे, म्हणजे तो उद्देश सिद्धीस जाईल. अभिमानानें ग्रस्त झालेले पुरुष व स्त्रिया, राजे, राजपुत्र, सरदार, बडेलोक हे विवक्षित कारणासाठीं एकेकटे रहातात. ज्या कारणाकरितां संसारी लोक एकटे राहूं शकतात, त्याच कारणासाठीं तपस्वी लोक एकान्तवास पत्करीत नाहींत, तरि प्रपंच टाकून आश्रमधर्म चालवावा आणि आपला हेतु लवकर सिद्धीस

न्यावा, हाच त्यांचा उद्देश असतो. जेव्हां तपस्वी आपलें ध्येय संपादन करितो आणि आन्तर व बहिश्चर शत्रूंच्या हल्ल्यापासून चित्ताचें रक्षण करण्यास अवश्य असें कवच नीट धारण करितो, तेव्हां तो योगी जगामध्यें निर्भयपणें हिंडतो आणि शत्रू जिंकल्यावर राजा जसा स्वस्थपणें राज्यकारभार चालवितो, तद्वत् त्याला कशाची बाधा होऊं शकत नाहीं.

" हा उद्देश सिद्धीस नेण्यासाठीं मी आश्रमधर्माप्रमाणें वागत असतां, आपण माझें एकान्तवासव्रत मोडिलें आणि माझा सत्कार केला. या व्रतांत मीं जर पूर्णता मिळविली असती, तर कोणत्याहि राजापासून किंवा सैन्यापासून मला पीडा झाली नसती, आणि आपल्या दिव्य कन्येचा स्वीकार मीं कधींच केला नसता. ती आतां खुषीनें तपस्विनी होण्यास तयार झाली आहे, आणि असा एक दिवस येईल कीं जेव्हां सर्व दुःखांपासून व संशयापासून सुटून आह्मी दोघेजण आपणापुढें येऊं आणि ते वेळीं मोठ्या सदाचारी राजाची प्रजा बनण्यास आह्मी समर्थ होऊं."

इतकें बोलून तो जामात राजकन्येसह राजवाड्यांतून निघाला व तपस्व्याच्या एकान्तांतील पर्णकुटिकेंत गेला. ताड वृक्षांच्या बनविलेल्या झोंपडीमध्यें भार्येस ठेवून, नेहमींप्रमाणें कंदफलें आणण्याकरितां तो वनांत गेला आणि जीं कंदफलें मिळालीं तीं आणून स्त्रियेस तीं खाण्याचा आग्रह करूं लागला. राजकन्येनें भूक लागली नाहीं असें सांगून कशालाहि स्पर्श केला नाहीं. मग तपस्व्यानें त्यापैकीं वाटेल तें खाऊन बाकीचें दुस-

ऱ्या दिवसाकरितां जपून ठेविलें. हें पाहून राजकन्या बेशुद्ध झाली. तिला शुद्धीवर आणून योगी म्हणाला— " तपस्व्याचे खाण्याचे पदार्थ पाहून जर तुला घेरी येते, तर ते खाऊन तुझी अवस्था काय होईल कोण जाणे. " तेव्हां राजकन्या म्हणाली—" हे खाण्य चे पदार्थ पाहून माझी बेशुद्धि झाली नाहीं, तरि स्त्रीधन म्हणून अर्धे राज्य माझा बाप देऊं लागला असतां तुम्हीं स्वीकार केला नाहीं आणि दुसऱ्या दिवसाकरितां एवढेसे खाण्याचे पदार्थ जपून ठेवितां याचा मला फार चमत्कार वाटतो. हा तपश्चर्येचा प्रकार खरोखर विचित्र दिसतो. "

या गोष्टीचें तात्पर्य असें आहे कीं—मोठा अभिमानी पुरुष जरी झाला, तरी संकटांत किंवा अडचणींत सांपडला असतां निराधार होऊन आपली योग्यता विसरून जातो. दुसरें असें कीं तपस्व्याचा बाह्य पोषाख अंगावर घेतला म्हणजे तेवढ्यानें तपस्वी बनत नाहीं. तिसरें, कोणत्याहि कुलांत जन्म होवो व कसेंहि शिक्षण मिळो, जी स्थिति प्रारब्धानें प्राप्त होईल तिच्याशीं एकात्मता करून घेऊन संतोषांत राहिलें पाहिजे. तीच खरी संस्कृति होय.

# प्रकरण ६

## प्रधान तत्त्वें

( श्लोक )

सर्वस्यैव जनस्यास्य विष्णुरभ्यन्तरे स्थितः ॥
तं परित्यज्य ये यान्ति बहिर्विष्णुं नराधमाः ॥ १

( आर्या )

सर्व जनांच्या हृदयीं व्यापक तो विष्णु सर्वदा राहे ॥
त्यासी सोडुनि अन्या देवा भजणार अधम तो आहे ॥ १

# प्रकरण ६

## प्रधान तत्त्वें

ज्या मूलतत्त्वांप्रमाणें वागलें असतां मनुष्यमात्रास सुखप्राप्ति होऊन त्याच्या संततीसहि आनंदाचा लाभ होऊं शकतो, तीं येणेंप्रमाणें आहेत:—

१. सनातन, सर्वशक्तियुक्त, सर्वज्ञ असें ईश्वरी तत्त्व सर्व जगास व्यापून राहिलें आहे.

२. दृश्य, अदृश्य, ज्ञात, अज्ञात, व्यक्त, अव्यक्त, प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष अशा सर्व शक्ति याच तत्त्वांत उत्पत्ति, स्थिति व लय पावून इतर शक्तींस उपयोग होईल अशा कालीं व स्थलीं, अशा परिस्थितीमध्यें व संयोगामध्यें पुनः आविर्भूत होतात.

३. या शक्तींमध्यें अत्यंत अद्भुत व श्रेष्ठ अशी शक्ति म्हटली म्हणजे मनुष्य होय. कारण तिजमध्यें शरीर व चैतन्य यांचा संयोग असून, इतर अनेक शक्तींवर अंमल चालविण्यास नानाप्रकारचे उपाय योजण्याचें सामर्थ्य असतें आणि आपणास यदृच्छेनें सुखी किंवा दुःखी करण्याचा अद्भुत गुणहि रहातो.

४. पृथ्वीवरील संस्थांस वाटेल तें रूप देण्याची श्रेष्ठ व प्रधान शक्ति अंगीं असल्यामुळें, मनुष्याचीं कर्तव्यें येणेंप्रमाणें होतात:—( अ ) सृष्टीच्या उत्पत्तीपासून अन्तापर्यन्त आपण सतत अस्तित्वांत आहों अशी प्रतीति होणें, ( ब ) परिच्छिन्न जीवाच्या आध्यात्मिक अंशाच्या अमरत्वाचा अनुभव घेणें, ( क ) जगांतील

सचेतन व्यक्तींस सुख होण्याकरितां सर्व शारीरिक व मानसिक वीर्याचा उपयोग होईल असें जीविताचें नियमन करणें.

५. मानवी प्रयत्नानें पुढील कार्यें साध्य होतातः—( अ ) धैर्य, आशा, श्रद्धा, अनुकंपा इत्यादि चैतन्याच्या मर्दानी गुणांचा परिपोष व वृद्धि करणें. ( ब ) भय, निराशा, मत्सर, क्रूरपणा वगैरे दुष्ट चित्तवृत्तींचें निर्दालन करणें. ( क ) मानवी व मानवेतर स्वभावांच परिशिलन करून आणि कोणत्याहि भाषेंत थोर महात्म्यांनीं प्रकट केलेल्या विचारांचा व प्रतिपादित केलेल्या सिद्धान्तांचा अभ्यास करून आपली संस्कृति संपादणें. ( ड ) सुख व पूर्णता यांच्या प्राप्तीसाठीं सतत चाललेल्या मनुष्याच्या प्रगतीस विघ्न करणाऱ्या व कोणत्याहि रूपानें प्रकट होणाऱ्या अशुभाचें उन्मूलन करणें.

६. मानवी चैतन्याचे प्रबल शत्रू म्हटले म्हणजे भय व अशुभ हीं होत. थोडेंसें शिक्षण व थोडासा विचार असला कीं भय नष्ट होतें. मानवी कल्पनेप्रमाणें मृत्यूसारिखा दुसरा घातच नाहीं, तथापि या अवश्यंभावि नाशासारखी निश्चित गोष्ट मनुष्याच्या जीवितांत दुसरी कोणतीहि संभवत नाहीं अशी एकदां मनाची समजूत होऊन ती कायमची बाणली असतां, या अपरिहार्य संकटाचें भय कधींच वाटणार नाहीं. मृत्यूचें भय एकदां नाहींसें झालें म्हणजे दुसऱ्या कोणत्याहि प्रकारच्या भयाला अन्तःकरणांत थारा मिळणार नाहीं, कारण अनिवार्य अशा मृत्यूचें भय नष्ट झालें असतां मनुष्यासारिखा परिच्छिन्न असा कोणताहि प्राणि किंवा

शक्ति त्याला पीडा करूं शकणार नाहीं हें उघड आहे. खऱ्या मर्दाला भयाचा गंधहि नसतो.

अशुभाविषयीं असें आहे कीं—आपणच त्याचे लाड करून व त्याचें मूळ उपटून टाकण्याची हयगय करून त्याला अस्तित्वांत आणितो—अशी एकदां खात्री पटली पाहिजे म्हणजे क्षणिक सुखाकरितां व चैनीकरितां अशुभाशीं लाडीगोडी केल्यापासून निरंतरचें नुकसान होणार हें निगमन टाळतां येणें अशक्य आहे. घराचा मालक शहाणा असला म्हणजे आपल्या बसावयाच्या जागा तेवढ्याच स्वच्छ व नीटनेटक्या करून ठेवीत नाहीं. त्याला ठाऊक असतें कीं, चाकरांच्या खोल्या, तळघरें, छपराजवळच्या जागा, कोनाकोपरा व रस्त्यांतल्या नळांत सोडून दिलेल्या घरांतल्या मोऱ्या—इतक्या सर्व ठिकाणीं जर उत्तम प्रकारची स्वच्छता राखिली नाहीं, तर रोगाचें बीज उत्पन्न होऊन त्याला योग्य संधि मिळाली असतां तें वाढत जाईल आणि आपला व मुलाबाळांचा नाश झाल्यावांचून रहावयाचा नाहीं. सैन्य अफाट असलें, त्यांतील शिपाई अंगापिंडानें मजबूत असले, म्हणजे हुशार सेनापति संतुष्ट होत नाहीं. त्याला ठाऊक असतें कीं त्यांची शिस्त नीट नसेल, त्यांच्या अंगीं धैर्य, सहनशक्ति व अक्कल हीं नसतील तर लढाईमध्यें त्यांची योग्यता मेंढरांच्या कळपाप्रमाणेंच होईल. यासाठीं जे शिपाई कूच करितांना इतरांच्या रांगांमध्यें घोंटाळा करितील अथवा ज्यांच्यामुळें भित्रेपणाची बाधा इतर शिपायांस होण्याचा संभव असतो अशा शिपायांस उत्तम सेनापति काढून टाकितो.

नमुनेदार विद्यालयाचा अधिकारी आळशी व वाईट मुलांस हांकून देतो, नाहीं तर चांगल्या मुलांस वाईट वळण लागून शाळेची अप्रतिष्ठा होण्याचा संभव असतो. आर्य साधु म्हणतात कीं, संसारामध्यें ग्रस्त झालेल्या चित्तांत ज्ञानप्रकाशाचे किरण शिरत नाहींत, यासाठीं अन्तरात्म्याचें व बहिर्मुख इंद्रियाचें नियमन झाल्याशिवाय व सत्समागमाशिवाय संसाररूपी मेघ वितळत नाहींत. म्हणून, आपणास व मुलांबाळांस शाश्वत सुख व्हावें अशी इच्छा असेल, तर अशुभ व पाप जेथें दिसतील तेथून तीं नष्ट केलीं पाहिजेत. मनुष्याला असें वाटेल कीं देशबांधवांस अज्ञानांत किंवा दुःखांत ठेवून अथवा अनिष्ट सहचरांस दूर राखून आपणास संसर्ग टाळतां येईल व सुखांत रहातां येईल, परंतु भोंवतालीं सृष्टीचें निरीक्षण केलें असतां, हा त्याचा मोह नष्ट होईल. ज्योतिःशास्त्रावरून असें समजतें कीं एकमेकांपासून हजारों कोस अंतरावर असलेल्या ग्रहांचा परिणाम परस्परांवर घडतो. इतर शास्त्रांवरून असें सिद्ध होतें कीं नैतिक व भौतिक संकटें, अति प्राचीन कालापासून अगदीं भविष्यत् कालापर्यन्त आणि पृथ्वीच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यन्त, चोहोंकडे पसरत जातात. पृथ्वी व आकाश हीं अतिशय दूर असून दिसण्यांत त्यांचा कांहीं संबंधहि नाहीं, तथापि पृथ्वीपासून अनेक वायु निघून स्वच्छ आकाशास काळिमा आणितात आणि आकाशहि जलप्रलय व वादळें उत्पन्न करून त्याचा वचपा काढून घेतें. कोणत्याहि विद्यमान वस्तूचा सृष्टिशक्तींवर थोडा तरी परिणाम घडल्याशिवाय रहात नाहीं.

स्वसंरक्षणाकरितां, प्रबल शक्तींना दुर्बल शक्तींस आपणांस मिळून तरी घ्यावें लागतें, नाहीं तर त्यांचा नायनाट तरी करावा लागतो. ह्यापासून प्रबळांचा व दुर्बलांचा फायदा होतो. अशा क्रियेनें प्रबलांस संसर्गाचें व पुढील धोक्याचें भय नाहींसें होतें आणि दुर्बलांस छल व द्वेष या दुष्ट वृत्ति जन्मभर सोसाव्य लागत नाहींत.

७. भय व अशुभ नष्ट झाल्यावर, मानवी चैतन्यास शुभप्राप्तीकडे आपल्या वीर्याचा उपयोग करण्यास अवसर सांपडतो आणि हा तर ज्ञानाचा परिणाम होय. व्यक्तीच्या, वर्गाच्या, राष्ट्राच्या—कोणाच्याहि हातून शुभ घडो, त्याचें लक्षण भेदाभेद न करितां सूर्याप्रमाणें सर्वांस सारखा प्रकाश देणें हें होय. आपला प्रकाश खुलून दिसण्याकरितां इतरांस अंधारांत ठेवण्याचा उपक्रम केला असतां त्याचें शुभत्व नष्ट होतें. निसर्गाचा असा नियम आहे कीं जडद्रव्य किंवा चैतन्य प्रच्छन्न राहिलें असतां, त्याचा नाश होणारच. त्यास सर्वकाल कर्मशील राहिलें पाहिजे, मग त्यापासून शुभ होवो कीं अशुभ होवो. दुसऱ्यास पीडा करून आपला फायदा करून घेणें असेल, तर दुसऱ्याचा नाश झाल्याशिवाय वाईट परिणाम टाळतां येणार नाहींत. अज्ञानांत व स्वार्थसाधूपणांत आयुष्य घालविलें असतां, इहपरलोकीं आपणास व दुसऱ्यास दुःख होणें हेंच त्याचें फल होय. अशा प्रकारच्या जीवितांत शान्तीची प्राप्ति मुळींच नाहीं, कारण शुभ म्हणजे काय हेंच कळत नाहीं आणि हवा असतो तो क्षणिक आनंद एका मार्गापासून झाला

नाहीं कीं दुसऱ्याचें अवलंबन करावें लागतें. बुद्धिशक्तीचा उचित प्रयोग होण्यासाठीं ज्ञानप्रकाश अवश्य आहे. अज्ञानी मनुष्याला बुद्धीचा उपयोग करितां येत नाहीं, कारण बीज जरी असलें तरी त्यावर प्रकाश पडून कर्मशीलता उत्पन्न झाली पाहिजे. बुद्धीचें वीर्य हेंच कीं शरीरांतून स्वार्थपरतेचें विष काढून टाकिलें पाहिजे व विषयानंदाची वासना कधींच तृप्त होत नाहीं अशी बालंबाल खात्री झाली पाहिजे. ज्या मार्गापासून शेवटीं दुःख किंवा संकट येणार असा मार्ग टाळण्यांतच हुशारी असते. स्वार्थसाधूपणाची मैत्री अस्थिर समजावी. जो आपल्या चैतन्याची व बुद्धीची सांगणी ऐकतो व तदनुरूप वागतो त्यानें असें मानावें कीं आपणास निरंतरचा व खरा मित्र मिळाला आहे.

८. प्रत्येक वस्तु ज्या कामाकरितां उत्पन्न झालेली असते तेवढ्यापुरतें तिजमध्यें सामर्थ्य असतें. हें सामर्थ्य कमी करून त्याचा नाश करण्यासाठीं विरुद्ध शक्ति झटत असतात. जी शक्ति प्रबल असेल ती आपल्या प्रतिस्पर्ध्याला जिंकून टाकिते. मनुष्याच्या शरीरांत निसर्गदत्त विवक्षित शक्ति असून ती विवक्षित कालपर्यन्त टिकणारी असते. जेव्हां मनुष्य, पशु, शारीरिक किंवा मानसिक रोग---अशा एकाद्या शत्रूनें ग्रस्त होऊन त्याचा प्रतिकार करण्यापुरतें देहांत त्राण असेल, तर तो जगतो, नाहीं तर नाश पावतो. मित्र, औषध, उपाय---वगैरे बाह्य साधनांनीं त्या वेळेपुरता कमी-जास्त गुण येऊं शकेल, परंतु शरीरांत पूर्वस्थितिप्रापक हवें तितकें सामर्थ्य असल्याशिवाय कोणत्याहि गोष्टीचा उपयोग

होणार नाहीं. अशा तऱ्हेचा ग्रास न व्हावा यासाठीं वीर्यरक्षण हाच उपाय आहे. वीर्यरक्षणाचा मार्ग हाच का हलकट व क्षयकारक नादांमध्यें पौरुषाचा नाश करूं नये व मानवी आचाराचे जे निसर्गनिर्मित नियम आहेत त्यांचें प्रतिपालन केलें पाहिजे, शिवाय ही आचारव्यवस्था मनुष्याच्या आत्मसंयमनावर अवलंबून रहाते.

९. व्यक्तीचें पूर्वस्थितिप्रापक सामर्थ्य म्हणजे त्याची नैसर्गिक प्राणशक्ति होय आणि ती जपून ठेविली असतां धोक्यापासून व नाशापासून त्या व्यक्तींचें संरक्षण होतें. राष्ट्रांतील पूर्वस्थितिप्रापक सामर्थ्य म्हणजे तेथील बुद्धिमान् व हुशार लोकच होत आणि अन्तर्बाह्य स्वार्थसाधूंच्या अभियोगाचा प्रतिकार करण्यास समर्थ इतके ते लोक असले, म्हणजे तें राष्ट्र जिवन्त राहून त्याची भरभराट होते. अशा लोकांची संख्या कमी होऊन ते आळशी व राष्ट्राच्या कल्याणाकडे दुर्लक्ष्य करणारे झाले, तर अन्तर्गत बेबंदशाही माजते किंवा बाह्य शत्रु प्रबल होऊन राष्ट्राचें महत्त्व कमी होतें. यासाठीं राष्ट्राचें भय नाहींसें करण्याकरितां मुख्य अंमलदारांचा मोठेपणा व शक्ति हीं राखिलीं पाहिजेत, तसेंच अंमलदारांच्या सामर्थ्याचें रक्षण करण्यासाठीं सर्वांशीं अन्तर्बाह्य व्यवहार करितांना न्याय व नीति हीं शाश्वत तत्त्वें पाळिलीं पाहिजेत आणि खाजगी किंवा राष्ट्रीय हेतूसाठीं प्रजाजनांच्या दुर्बलपणाचा फायदा घेतां कामा नये. ही पूर्वस्थिति प्रापकशक्ति क्षीण होऊन अन्तर्बाह्य विरोधकारक शत्रूशीं झगडण्यास असमर्थ झाली म्हणजे व्यक्तीची

किंवा राष्ट्राची घटना नाश पावते आणि आपल्या घटक-द्रव्यांत लीन होते.

व्यक्तीच्या शारीरघटनेचा नियम असा आहे कीं ज्या अन्नाचा व पेयाचा उदरामध्यें प्रवेश होतो त्यांचे अंगीं शरीरपोषण करण्याचे धर्म असून त्यांचें रूपान्तर रक्त, मांस, स्नायु, मांसपिंड, मज्जा, हाडें व शुक्र यांच्यामध्यें योग्य प्रमाणानें झालें पाहिजे. जोंपर्यन्त शरीरपुष्टीला अवश्य अशीं द्रव्यें अन्नापासून मिळतात, तोंपर्यन्त शरीराची वाढ होऊन रोग व क्षय टाळतां येतात. जेव्हां अन्नापासून अवश्य अशीं द्रव्यें उत्पन्न होत नाहींत किंवा शरीराचा समतोलपणा राखण्यास अवश्य असलेलीं द्रव्यें कमीजास्त प्रमाणांत तयार होतात, तेव्हां शरीर जोमांत असेल तर त्याचे परिणाम हळू हळू अनुभवास येतात व शरीर खंगत चाललें असेल तर ते परिणाम लागलींच घडतात आणि अनुकूल संधीची सतत वाट पहाणाऱ्या प्रतिरोधी विकारांस शेवटीं शरीर बळी पडतें.

व्यक्तीप्रमाणेंच, राष्ट्राच्या घटनेंत समतोलपणा राखण्यासाठीं त्याला योग्य पोषण मिळालें पाहिजे राष्ट्राचें पोषण पुढील प्रकारांनीं होतें—सुसंस्कृत मुत्सद्दी, स्वार्थत्यागी कामगार व पुढारी, थोर व ज्ञानसंपन्न शिक्षक, असामान्य धैर्य व शान्ति, राष्ट्रकल्याणासाठीं अविश्रान्त तत्परता, प्रामाणिकपणानें मिळविलेली पुष्कळ संपत्ति, नैतिक महत्त्व वाढविण्यास व उच्छृंखल प्रजाजनांस ताळ्यावर आणण्यास लागणारा राष्ट्रीय उत्साह—ह्या मार्गांनीं राष्ट्राचें पोषण घडतें. वार्धक्यामुळें, बुद्धि-

हीनतेमुळें, किंवा मृत्यूमुळें होणारी पोषक द्रव्यांची उणीव जोंपर्यंत नवीन पुरवठ्यानें भरून जात असते, तोंपर्यंत राष्ट्राचा जोम व भरभराट हीं कायम असतात. वरील उणीवा भरून काढण्यांत कांहींमध्यें फाजीलपणा झाला व कांहींमध्यें कमीपणा आढळला, अथवा कांहीं वर्गांत कोणत्याहि प्रकारचा अनाचार किंवा अनीति आढळली आणि अधिकारी लोकांनीं त्याचा कानाडोळा केला, तर राष्ट्रकल्याणास अवश्य असा समतोलपणा नष्ट होतो, व राष्ट्राचा विनाश होऊन कावळ्याप्रमाणें टपून बसलेल्या शत्रूंस त्यावर हल्ला करण्यास उत्तम संधि सांपडते.

१०. धर्मग्रंथांत आचार्य असें प्रतिपादितात कीं सृष्टीचा सर्गस्थितिलयकर्ता जो अचिंत्य परमेश्वर त्याची भक्ति देवळामध्यें जाऊन अवश्य करावी. मूर्ख लोक याचा अर्थ भलताच करितात. ते असें समजतात कीं देवळाबाहेर कोणतेंहि पाप केलें तरी चालतें, देशांतील संरक्षक कायदे मोडले नाहींत म्हणजे झालें; देशबांधवांनीं आपणास कांहीं एक पीडा केली नसून त्यांचा द्वेष मनांत गुप्तपणें केला तरी हरकत नाहीं; कारणाशिवाय त्यांजवर खोटेपणाचा व अप्रामाणिकपणाचा आरोप आणला तरी चालतो; पाहिजे त्या उपायांनीं देशबांधवांचें नुकसान करून आपला फायदा करून घ्यावा; क्रोध, मत्सर, निंदा, द्वेष वगैरे दुष्ट वृत्तींचा परिपोष, वाचेनें नाहीं, तरी मनानें व कृतीनें केला असतां हरकत नाहीं; आपला लाभ होत असला व शिक्षा होण्याचा संभव नसला म्हणजे संधि सांपडल्या-

बरोबर लोकांच्या मनाची शान्ति दवडावी, बेअब्रू करावी, द्रव्याचा अपहार करावा. इतक्या जरी मूर्खपणाच्या गोष्टी केल्या, तथापि जोंपर्यन्त एकाद्याची भरभराट होत असते व तो नियमानें देवळांत जात असतो, तोंपर्यन्त त्याला सद्गुणी व लोकनायक समजण्यास हरकत नाहीं.

पण ही कांहीं परमेश्वराची भक्ति खास नव्हे. विशिष्ट स्थळीं जाऊन पुराणें व व्याख्यानें ऐकण्यांत, किंवा श्रद्धेच्या व पावित्र्याच्या बाह्य चिन्हांत भक्ति रहात नाहीं. असल्या आचारानें लोक सद्गुणी म्हणतील परंतु तदनुरूप सत्कृत्यें व सद्विचार घडत नसतील, तर असल्या पांघरुणाखालीं ढोंगीपणास व कपटास मात्र उत्तेजन मिळूं शकेल. प्राणिमात्र जागा असो, निद्रिंत असो, त्याच्या शारीरिक व नैतिक कल्याणासाठीं निसर्गसिद्ध सनातन नियमास अनुसरण्यांतच खरी भक्ति असते. निद्रिंत असो—असें म्हणण्याचें बीज हेंच कीं सदाचारी मनुष्य निद्रिंत असतांहि त्याचे चित्तास स्थैर्य, शान्ति वगैरे सद्गुणांचा अनुभव येऊन स्वप्नेंहि उत्तम प्रकारचीं पडतात.

११. आपलें चित्त सर्वदा शुद्धावस्थेंत ठेवून वडील पुरुषांस बापाप्रमाणें व धाकट्या पुरुषांस भावाप्रमाणें मानावें, तसेंच वडील स्त्रियांस मातेप्रमाणें व धाकट्या स्त्रियांस बहिणीप्रमाणें मान द्यावा. एक साधु म्हणतो—

( श्लोक )

मातृवत्परदारेषु परद्रव्येषु लोष्ठवत् ॥
आत्मवत्सर्वभूतेषु यः पश्यति स पंडितः ॥ १

म्हणजे, दुसऱ्या बायकांस आईप्रमाणें, दुसऱ्याच्या धनास मातीच्या ढिकळाप्रमाणें, प्राणिमात्रास स्वतःप्रमाणें जो समजतो तो पंडित होय. आपण सदाचारी, निरोगी, उदार व ज्ञानी होण्यास जें जें अवश्य आहे तें या श्लोकांत वर्णिलें आहे. बाह्य पदार्थांशीं व्यवहार करितांना, अन्तःकरणांतील दुष्ट विचार पूर्णपणें नष्ट होईतोंपर्यंत, आत्मसंयमनाचा अभ्यास निग्रहानें केला पाहिजे, म्हणजे त्या संवयीनें दुसरा निसर्ग उत्पन्न होईल. इंद्रियांचें व चित्ताचें नियमन केल्याशिवाय कोणतेंहि सुख टिकणार नाहीं आणि निरंतर कल्याण होणार नाहीं.

१२. कोणाचा द्वेष करूं नये, कोणाच्याहि सुखाचा मत्सर करूं नये, दुसऱ्याच्या कल्याणापासून आनंद मानावा आणि आपलें नुकसान झालें असतांहि समाधानांत रहावें. हाच विचार पुढील श्लोकांत दिला आहे—

पूर्वमिष्टमनिष्टं त्व-
मनिष्टं चेष्टमित्यपि ॥
परिकल्प्य तदभ्यासात्
तत्ततोऽपि परित्यज ॥ १

—योगवासिष्ठ

म्हणजे पूर्वीं जें इष्ट वाटतें तें पुढें दुःखकारक होतें, तसेंच जें प्रथम अनिष्ट वाटतें तें नंतर सुखकारक होतें—ही गोष्ट ध्यानांत आणून तोच अभ्यास ठेवावा, म्हणजे सुखदुःखांचा विसर पडेल.

या वचनांत जीवितसुखाचें तत्त्व भरलें आहे. हें तत्त्व एकदां समजून घेऊन ध्यानांत ठेविलें असतां कोणत्याहि अशुभापासून पीडा होणार नाहीं. कितीहि अ-

डचण, अपाय, प्रत्यवाय, हानि झाली तरी मनाची हुशारी कायम राहील आणि जीविताच्या कोणत्याहि शाखेंत गुंतलें तरी भय न वाढतां व शंका न येतां मन आपलें काम चालू ठेवील. चित्ताची अशी खात्री असते कीं कोणतीहि अवस्था निरंतर असत नाहीं आणि शुभ जें आहे तें चित्तांत राहील तितका वेळ ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे व अशुभाविषयीं कधीं निराश होऊं नये, कारण आज नाहीं उद्यां केव्हां तरी त्याचा पतिकार होणारच. वीर्याचा प्रयोग करून अशुभाचा प्रतिकार लवकर होतो अशी खात्री असली म्हणजे अशुभाचा नाश हटकून होतो.

आत्मसंयमनाचा एक मार्ग असा आहे कीं निषिद्ध पदार्थांकडे वासना जाऊं देऊं नये, आणि असें लक्षांत ठेवावें कीं वासनांच्या अनुरोधानें वागलें असतां दुःख होणारच, मग त्यांची तृप्ति होवो किंवा न होवो. दुसरा मार्ग असा कीं सर्वदां चित्ताची शान्ति व समाधान राखून सर्व व्यक्तींमध्यें, चालक शक्तींमध्यें व सृष्टींतील नानाविध पदार्थांमध्यें परमेश्वराचें स्वरूप कसें व्यक्त होत असतें तें अवलोकन करावें.

१३. शुद्धि दोन प्रकारची आहे:—( अ ) बाह्य किंवा भौतिक आणि ( ब ) आन्तर अथवा मानसिक. बाह्य शुद्धि कांहीं कालपर्यन्त सहज प्राप्त होते; पाणी, माती, स्पंज, साबण इत्यादिकांचा उपयोग केला असतां बाह्य पदार्थांच्या संसर्गानें किंवा मांसांतून बाहेर निघून त्वचेवर जो मळ सांचतो तो नाहींसा होतो. त्वचेच्या रंध्रांतून पदार्थांचें बहिर्गमन नेहमीं चालू असतें आणि

कितीहि संशोधन केलें तरी पुष्कळ वेळपर्यन्त त्वचा शुद्ध रहात नाहीं. तथापि ज्याची पूर्ण शुद्धि होतच नाहीं त्याला स्वच्छ ठेवण्याकडे मानवीप्रयत्न चालू असतो, यावरून असें सिद्ध होतें कीं शहाणपण व अनुभव यांपेक्षां संवय व संप्रदाय यांनींच मनुष्याचें आचरण नियमित होतें. बाळपणापासून मिळालेल्या शिक्षणाप्रमाणेंच कांहीं अंशीं शारीरिक शुद्धि करणें इष्ट असतें, कारण अमुक गोष्ट सुखाकरितां अवश्य आहे असें एकदां मनाला वळण लागलें म्हणजे तें प्राप्त झालेंच पाहिजे, नाहींतर दुःखांत परिणाम होईल. वारंवार शरीर शुद्ध केल्यानें सुखाची किंवा आरोग्याची प्राप्ति अवश्य होते असें नाहीं, कारण मनुष्याच्या जीवितासाठीं अवश्य होणारें घाणेरडें काम कांहीं व्यक्ति व वर्ग जन्मतः अथवा शिक्षणामुळें करीत असतात, तथापि बाह्यतः स्वच्छ परिस्थितींत जन्मापासून रहाणाऱ्या व वागणाऱ्या लोकांपेक्षां ह्या व्यक्ति व वर्ग लवकर आजारी पडतात किंवा अकालीं मरतात असा प्रकार मुळींच नाहीं. शिवाय, शरीर शुद्ध अवस्थेंत कधींच राखितां येत नाहीं, कारण तें अशुभ पदार्थांचेंच बनलेलें असतें आणि ज्या अन्नावर त्याची उपजीविका चालते, तें तर जीवकोटीच्या किंवा उद्भिज्ज कोटीच्या मलविसर्गामुळें तयार होणाऱ्या खतापासूनच उत्पन्न होतें, आणि एका विवक्षित अवस्थेंत त्या मलाची दुर्गंधि देखील मनुष्यमात्राला असह्य होते. चैतन्याप्रमाणेंच, शरीराला जी शुद्धि खरोखर हवी असते ती हीच कीं ज्या मूलस्थानापासून म्हणजे महाभूतांपासून देहाची उ-

त्पत्ति झाली आहे, त्या स्थानाच्या समागमानें शरीराचा जोम तरतरीत राहिला पाहिजे. शरीर निरोगी व बळकट राखण्यासाठीं पृथिवी, आप्, तेज व वायु या भूतांशीं समागम घडला पाहिजे, आणि जसजसा हा संसर्ग अधिक होत जाईल तसतसें आरोग्य वृद्धिंगत होईल. बाहेरील स्वच्छता व झगझगीत पोषाख याचा श्रीमंत लोकांना मोठा डौल वाटत असतो, परंतु सामाजिक कार्यासाठीं त्यांना घरामध्येंच अडकून रहावें लागत असल्यामुळें, गरीब लोकांपेक्षां त्यांना दुखणीं व अकालीं मृत्यु येण्याचा संभव जास्त असतो, कारण त्यांच्या शरीराचा संबंध जनक महाभूतांशीं फार थोडा रहातो. जे लोक रानावनांत रहातात व ज्यांस अशा संसर्गाचा लाभ अधिक होत असतो, ते शहरांत वस्ती करणाऱ्या लोकांपेक्षां अधिक तेजस्वी व बळकट असतात. स्वच्छ पोषाख वगैरे बाह्य शुद्धीची हयगय करितां कामा नये, तथापि शारीरिक स्वच्छतेची मुख्य बाजू संभाळली पाहिजे, म्हणजे मोकळ्या हवेंत फिरणें, स्नानें करणें, पोहणें, शुद्ध मातीनें किंवा साबणानें त्वचा घासणें, त्रिस्तवापाशीं शेकत बसणें इत्यादि गोष्टी अवश्य केल्या पाहिजेत. ज्या महाभूतांचा देह बनलेला असतो त्यांशीं संसर्ग नेहमीं होऊं दिला व चैतन्याच्या व्यापारामुळें होणाऱ्या क्षयापासून त्याचें रक्षण केलें, तर शरीराचा नाश लांबणीवर टाकितां येईल आणि प्राचीन ऋषींप्रमाणें सहस्रावधि नसली तरी शतावधि वर्षें आयुष्याची मर्यादा वाढूं शकेल.

मानासिक क्षेत्रामध्यें शुद्धि होणें कठीण आहे, पण

ती एकदां झाली म्हणजे कायम रहाते. शुद्ध व निर्दोष अशा उगमापासून चैतन्याची उत्पत्ति होते, म्हणून तें निसर्गतः अशुद्ध द्रव्यांपासून मुक्त असतें, परंतु, पर्वतापासून सपाट मैदानावर वहात जाणाऱ्या निर्झराप्रमाणें, घाणेरड्या द्रव्यांच्या संपर्कानें त्याची शुद्धि नष्ट होते. अशा संपर्कापासून चैतन्याचें रक्षण केलें असतां, त्याला शुद्धीकरणाची खरोखर गरज नसते, परंतु ऐहिक संप्रदाय व संगति यांपासून त्याला असा रंग चढतो कीं तेणेंकरून त्याचें स्वाभाविक परंपरागत धन आच्छादित होतें आणि स्वत्वप्राप्तीसाठीं अनेक विपत्ति भोगून योग्य शिक्षण व मार्गदर्शन यांचें साहाय्य घ्यावें लागतें. इतक्या कसोटींतून पार पडल्यानंतर, शरीराप्रमाणें त्याची शुद्धि फिरून नष्ट होत नाहीं.

१४. जीवितानंदाच्या प्राप्तीसाठीं श्रेष्ठ तत्त्व असें आहे कीं सर्वदां हुशारीनें रहावें आणि काळ फुकट घालवूं नये. जीवित अल्प असल्यामुळें अशाश्वत ऐहिक क्षेत्रामध्यें मनुष्य जे जे उद्योग करीत असतो त्यामुळें त्याची तृप्ति होत नाहीं, आणि नित्य व्यवहाराच्या कामाला अक्षय्यानंद प्राप्तीसाठीं कराव्या लागणाऱ्या दीर्घ प्रयत्नांची जोड केली, म्हणजे खरोखर काळ अगदींच मर्यादित वाटूं लागतो. सर्व साधु म्हणतात कीं आळस हा आपला वैरी आहे आणि कोणतीहि गोष्ट लांबणीवर टाकणें अत्यन्त धोक्याचें आहे. प्रपंचामध्यें यशप्राप्ति हवी असेल, तर नेहमीं उद्योग केला पाहिजे आणि काळ व धन यांचा मितव्यय केला पाहिजे. शाश्वत आनंदाच्या प्राप्तीसाठीं जीविताचीं व कर्तव्याचीं जीं उच्च

तत्त्वें आहेत त्यांचा बिघाड करणारा असा एकहि विचार मनांत येऊं देतां उपयोगी नाहीं. अशा श्रेष्ठ जीविताचा आनंद सूर्यतेजाप्रमाणें असतो, म्हणजे त्याचा प्रकाश अन्तर्बाह्य पसरलेला असतो.

१९. शाश्वत आनंद मिळविण्यासाठीं दोन मार्ग शक्य आहेत. पहिला मार्ग असा कीं एखाद्या पदार्थाबद्दल शुभवासना उत्पन्न झाली असतां, ती दृढ व उत्कट असली पाहिजे. बुद्धि व इच्छा या शक्तींचा प्रयोग त्याच लाभाकडे तत्परतेनें केला पाहिजे, आणि त्या वासनेचा जोर कमी करणारी दुसरी वासना उठूं देऊं नये. इतकी एकाग्रता संपादन केल्यावर इष्ट सिद्धि होणारच, पण वासनेपेक्षां बलवत्तर अशी एखादी प्रतिरोधक शक्ति आली असतां मात्र उपाय नाहीं. अशी गोष्ट घडली असतां असिद्धीचा दोष उद्योग करणारास न लागतां, बलवान् दुर्बलांना ग्रासून टाकितो हा जो निसर्गाचा शाश्वत नियम आहे, त्याच्या माथीं बसतो. तथापि अशा असिद्धीमुळें यत्न करणाराची हिम्मत खचतां कामा नये, कारण आपण दीर्घ प्रयत्न केलेला आहे एवढें समाधान राहील, आणि तसाच उद्योग चालवून अनुकूल संधीची वाट पाहिली तर असाहि काल येईल कीं जेव्हां बलवत्तर शक्तीचा जोर कमी होऊन पूर्वींची निर्बल शक्ति आपला प्रभाव चालवूं शकेल. येणेंप्रमाणें सृष्टीमध्यें विविध शक्ति चक्राकार फिरत असतात, बलिष्ठ शक्ति वर येते आणि तिचें वीर्य अर्थात् कमी झालें म्हणजे तिच्याहून बलवत्तर शक्ति तिच्या जागीं येते. जेव्हां अनेक समान शक्ति एका कालीं राहून, त्यांपैकीं प्रत्येक

बाकीच्यांचा पाडाव करण्याचा प्रयत्न करील. तेव्हां त्या ज्या शाश्वत तत्त्वाचे प्रविभाग असतात. त्या तत्त्वाचें वैभव प्रकट करणाऱ्या शक्तिसमूहाचा सुंदर देखावा नजरेपुढें येईल.

दुसऱ्या मार्गामध्यें संपूर्ण वासनांचा क्षय करून एकसुद्धां चित्तांत शिलक राहिली नाहीं म्हणजे अक्षय्यानंद प्राप्त होतो. चित्ताचें स्वरूप वासनेवरून कळतें आणि एक वासना जरी राहिली तरी ती तृप्त झाली तर सुख होतें आणि अतृप्त राहिली तर दुःख होतें. स्वातंत्र्य हेंच चैतन्याचें स्वाभाविक लक्षण आहे. पण वासनेमुळें त्यास बद्ध व्हावें लागतें. याकरितां पहिल्या मार्गांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें वासनेचा जोर कमी असून यश व आनंद यांच्या प्राप्तीची आशा नसेल, तर शान्ति मिळण्याचें साधन एवढेंच की वासना उत्पन्न झाल्याबरोबर तिचा त्याग करावा. शरीरावर निर्दयपणें केलेले शस्त्राचे आघात सहन करणें व शारीरिक किंवा मानसिक दुःखें निमुटपणें सोसणें यांमध्यें जर शौर्य वाटत असेल. तर जेव्हां मनुष्याला स्पष्ट कळत असतें कीं वासनांची तृप्ति न होईल तर त्या सर्वकाल जागृत राहून चित्ताची शान्ति नाहींशी करितील. अशा वेळीं वासनांशीं लढून त्यांवर जय मिळविण्यांत कमी शौर्य असतें असें नाहीं. विपत्ति भोगतांना काल दीर्घ वाटतो, सुखामध्यें तो लवकर निघून जातो, पण निर्वासन स्थितीमध्यें कालाची नैसर्गिक मर्यादा अनुभवास येते. निश्चिन्त रहाणें हें शुभ दैवाचें बीज होय, चिन्ता किंवा उत्कंठा टाकून दिली असतां वासनाक्षय होतो आणि कितीहि

संपत्ति मिळविली तरी या लाभापुढें ती कस्पटासमान आहे. सर्व बंधनांपेक्षां वासनेचें बंधन कष्टतर होय, कारण जो वासनाबद्ध होतो, त्याला, इतर बंधनांत असतां अधिकाऱ्यांकडून जीं सुखें प्राप्त होतात, तीं देखील मिळत नाहींत. वास्तविक पहातां सुखदुःखें शरीरास होत नाहींत, आत्म्यास तर तीं बाधत नाहींत, परंतु अज्ञानामुळें पुष्ट झालेल्या वासनांपासून तीं उत्पन्न होतात, आणि तें अज्ञान नष्ट झालें असतां सुखदुःखेंहि नष्ट होतात. अज्ञान हेंच पाप असून त्याचें क्षालन बुद्धिसामर्थ्यानें होतें; पण वीर्यवती अशी बुद्धि नसेल, तर अज्ञानरूपी पाप वृद्धिंगत होतें. ज्ञानाच्या योगानें वासनामेघाचा समूळ नाश झाला असतां अन्तःकरणामध्यें ईश्वरी तेज चमकूं लागतें. बाह्य पदार्थ नश्वर आहेत अशी खात्री पटल्याशिवाय ज्ञानापासून व मार्गदर्शनापासून शान्ति किंवा आनंद होत नाहीं. जीवितसुखास कारणीभूत जे जे पदार्थ आहेत त्यांमध्यें स्वार्थत्यागी व स्थिर असा मित्र श्रेष्ठ होय. आणि जो पुरुष आत्मरत असतो त्याला असा मित्र अन्तर्यामींच सांपडतो.

आपणास इष्ट अशी वस्तु दुसऱ्यापासून हिराऊन घेतली असतां आपण कांहीं वाईट करीत नाहीं अशी जी दुष्ट वासना अज्ञानापासून व द्वैतप्रतीतीपासून उत्पन्न होते, तिचा नाश झाला असतां वासनाक्षय सिद्ध होतो. वासना उत्पन्न होऊन विवेकबुद्धीनें शुभ ठरल्यास, ती सफल करावी. अशा रीतीनें सतत वागणूक ठेविली असतां अशी खात्री होईल कीं सर्व वासना व्यर्थ आहेत, आणि इष्ट असेल त्याचें ग्रहण करावें व अनिष्ट असेल

तें टाळावें असें आपलें कर्तव्य नसून कोणत्याहि स्थितींत असतां शक्तीप्रमाणें वागावें एवढेंच आपलें कर्तव्य असतें. प्रथम विवेकबुद्धीचा उपयोग करून शुभ वासना तेवढ्या धराव्या, म्हणजे क्रमानें वासनाक्षय होत जाऊन ईश्वरप्राप्ति होते.

संसारांत अज्ञानी मनुष्याप्रमाणेंच शहाण्या मनुष्याची बाह्य वर्तणूक असून, फरक कायतो वासनाबंधनांतच रहातो. प्रवृत्ति व निवृत्ति हे दोन जीविताचे मार्ग आहेत. प्रवृत्त मनुष्यास प्रपंचांत आनंद वाटतो व निवृत्ति म्हणजे शुद्ध आळस आहे असें तो समजतो. निवृत्त मनुष्यास सर्व पदार्थ असार व क्षणभंगुर भासतात, म्हणून परम शान्तीचीच तो इच्छा करीत असतो. कोणत्याहि मार्गांत मनुष्यास आनंद वाटो, त्यानें आपलें कर्तव्य उत्साहानें केलें पाहिजे आणि असें ध्यानांत ठेवावें कीं कर्तव्य केल्याशिवाय ऐहिक किंवा पारमार्थिक हेतु सिद्धीस जात नाहीं. सुशिक्षण, इंद्रियनिग्रह, संस्कृति, समदर्शन, आत्मसंयमन —इत्यादि उपायांनीं मानवी जीवित श्रेष्ठ प्रतीचें व उदात्त होऊन स्वरूपप्राप्तीस लायक होतें.

# प्रकरण ७

## उपसंहार

( श्लोक )

अयं निजः परोवेति गणना लघुचेतसाम् ॥
उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम् ॥ १

( आर्या )

हा अपुला तो परका होतो ऐसा विचार मूर्खांचा ॥
वसुधा कुटुंब ऐसा निश्चय होई उदारचरितांचा ॥ १

# प्रकरण ७

## उपसंहार

मनुष्य म्हणजे काय व तो कशाकरितां निर्माण झाला आहे हें निश्चित करणें असेल, तर प्रथम मनुष्याचा एकंदर सृष्टीशीं संबंध कसा आहे हें ध्यानांत आणिलें पाहिजे. ज्ञातापासून अज्ञाताकडे वळणें हेंच मुख्य तर्काचें काम आहे. फार झालें तर आपणास जगांतील एकाच शाखेचें ज्ञान होऊं शकतें, पण इतर शाखांचें, वस्तूंचें व त्यांच्या परस्परसंबंधांचें ज्ञान होणें कठीण आहे. विश्वामध्यें प्राण्यांच्या अनेक पायऱ्या असतात. आणि सर्व जगत् आपल्या सुखाकरितां निर्माण झालें आहे असा अभिमान मनुष्यास वाटतो. वास्तविक पहातां मनुष्यामध्यें अपूर्ण असें कांहीं नाहीं. ईश्वराच्या एकंदर व्यवस्थेमध्यें मनुष्याच्या योग्यतेप्रमाणेंच त्याची स्थिति आहे, परंतु त्यांतील हेतु मात्र मनुष्यास अज्ञात असतात. ईश्वराच्या व्यवस्थेस मनुष्यानें सर्वथैव मान दिला पाहिजे आणि ती त्यास अज्ञात असली, तथापि ईश्वरी रचना पूर्ण आहे असें त्यानें मानिलें पाहिजे.

पुढें काय होणार हें मनुष्यास कळत नाहीं व भविष्यत् कालच्या स्थितीची आशा असते—या दोन कारणांमुळेंच इहलोकीं मनुष्यास सुखप्राप्ति होते. अधिकाधिक ज्ञान मिळविण्याची हांव आणि अधिकाधिक पूर्णत्वास चढण्याची ईर्ष्या—या दोन गोष्टींमुळेंच मनुष्याच्या हातून चुका घडतात आणि त्यास अनेक वि-

पत्ति येतात. सर्व सृष्टि मनुष्याकरितांच उत्पन्न झालेली आहे ही समजूत वेडेपणाची आहे, तसेंच भौतिकक्षेत्रांमध्येंहि जी पूर्णता नजरेस पडत नाहीं ती नैतिक व्यवहारामध्यें असावी अशी आशा करणें केवळ मूर्खपणा होय.

आपण ईश्वराच्या ठिकाणीं आहों अशी कल्पना करून सृष्टपदार्थांमध्यें अमुक पूर्ण किंवा अपूर्ण, अमुक योग्य किंवा अयोग्य असें ठरविण्याचा प्रयत्न करणें अधर्म होय. गंधर्वादि देवयोनींची पूर्णता व पशूंची शारीरिक शक्ति हीं आपणास दिलीं असतीं तर बरें झालें असतें अशी भलतीच आशा करून ईश्वराविरुद्ध तक्रार करणें युक्तिसिद्ध नाहीं, कारण सध्यांपेक्षां अधिक इंद्रियशक्ति अथवा अवयवशक्ति जर मनुष्यामध्यें असती, तर तो अधिक दुःखी झाला असता यांत संशय नाहीं. संपूर्ण विश्वामध्यें इंद्रियशक्तींत व बुद्धिसामर्थ्यांत व्यवस्था व परंपरा दृष्टीस पडतात, तेणेंकरून प्राणिवर्गांची परस्पर गौणता आणि सर्व प्राण्यांची मनुष्यांशीं पराधीनता सिद्ध होतात. इंद्रियें, उपजतबुद्धि, विचारशक्ति, मननशक्ति, विवेचकबुद्धि—अशा प्रकारचा बुद्धिसामर्थ्याचा अनुक्रम असून, फक्त विवेचकबुद्धि सर्वांत श्रेष्ठ होय.

ईश्वराच्या सृष्टींत वस्तुमात्राची व्यवस्था व पराधीनता इतक्या परिपूर्ण दशेला पोहोंचल्या आहेत कीं एका शाखेला धक्का बसला असतां तेवढ्या शाखेचाच नाश न होतां सर्व सृष्टीचा देखील लय होऊं शकेल. अखिल विश्व ही एकवटलेली पूर्ण रचना असून प्रत्येक वस्तु त्याचा प्रविभाग होय. सर्व जगत् एक शरीर असून ईश्वर

त्याचा आत्मा होय. मनुष्यास असें वाटण्याचा संभव आहे कीं—या जगांत सर्वत्र एकोपा व सदाचार असते, समुद्रावर किंवा वातावरणांत झंझावात सुटला नसता, मनुष्याच्या अन्तःकरणांत मनोवेगांनीं खळबळ उडवून दिली नसती, तर आपलें सर्वस्वीं कल्याण झालें असतें, पण सनातन सूत्र असें आहे कीं महाभूतांच्या परस्परविरोधांमुळेंच सर्व जगाची स्थिति चाललेली आहे आणि मनोविकार हीं तर जीविताचीं मूलतत्त्वें होत. पृथ्वी निर्माण झाल्यापासून अशाच रीतीनें सकल विश्वाची व प्राणिमात्राची व्यवस्था होत आहे.

सर्व सृष्टि म्हणजे एक चातुर्याची खाण असून ज्याला आपण निसर्ग समजतों तो केवल कलात्मक होय, पण त्याचें विज्ञान मनुष्याला यथार्थ होत नाहीं. आकस्मिक म्हणून जें आपणास वाटत असतें त्यामुळें कोणत्याहि नियमाचा भंग न होतां, ती एकप्रकारची दिशाच असते, फक्त मनुष्यास मात्र कळत नाहीं. जेथें अपस्वर वाटत असतो, तेथें खरोखर स्वरमाधुर्य असतें. कधीं कधीं एका शाखेचें अशुभ होऊन जगाचें शुभ होतें. यासाठीं जें जें दोषमय किंवा अपूर्ण दिसेल त्याचा एकंदर विश्वरचनेशीं मेळ घालण्याचा प्रयत्न अवश्य केला पाहिजे. हें कर्तव्य बजावलें असतां मानवी जीवित सुखमय होईल यांत संदेह नाहीं.

अशा रीतीनें जगाशीं मनुष्याचा सामान्य संबंध असून व्यक्तिरूपानें मनुष्याचें स्वरूप काय आहे व त्याची स्थिति कशी असते याविषयीं विवेचन करणें अवश्य आहे. ईश्वराच्या व्यवस्थेंत दोष काढीत बसण्यापेक्षां,

ईश्वरानें आपणास कोणतीं ज्ञानसाधनें दिलीं आहेत, कोणत्या शक्ति अर्पण केल्या आहेत, त्या शक्तींच्या मर्यादा कोणत्या, इत्यादि गोष्टींचा विचार मनुष्यानें केला पाहिजे. एकंदर पहातां, मनुष्याची मध्यम स्थिति आहे असेंच ठरतें. मनुष्याला संशयात्मा म्हणावें तर त्यामध्यें बरेंच ज्ञान आढळून येतें, सर्वज्ञ म्हणावें तर अत्यन्त दौर्बल्य त्यामध्यें नजरेस येतें, असा तो धड संशयात्मा नाहीं व सर्वज्ञहि नाहीं. कर्म करीत रहावें किंवा स्वस्थ बसावें, शरीर श्रेष्ठ किंवा चैतन्य श्रेष्ठ, याचा त्याला निश्चय होत नाहीं. मनुष्य जन्मास येतो पण मरतो, तर्कशास्त्र लढवितो पण चुकतो, कधीं त्यांमध्यें विचारांचा संकर होतो तर कधीं विकारांचें काहूर माजतें, असा सर्वत्र घोंटाळा उडून जातो. मोठमोठ्या वस्तूंचा मालक बनतो तर ज्या त्या गोष्टीची काळजी करावी लागते, सत्य काय तें यालाच समजतें म्हणावें तर अनन्त चुकांनीं व्याप्त होतो, एक वेळ मनुष्यास सर्व विश्वाचें वैभव प्राप्त होतें, तर दुसरे क्षणीं तो थट्टेस पात्र होतो अशा तऱ्हेनें मानवी प्राणी जगाचें एक कोडें बनून राहिला आहे. ग्रहांचे व शेंडे नक्षत्राचे नियामक सिद्धान्त जरी मनुष्याला समजले, तरी आपली उत्पत्ति व विनाश हीं कशीं होतात तें त्याला सांगतां येत नाहीं. तसेंच चैतन्याचे व्यापार कसे चालतात व षड्ऊर्मी कशा क्षुब्ध होतात ह्याचा त्याला थांग लागत नाहीं. मनुष्यानें महत्त्वाच्या कामास आरंभ केल्याबरोबर, जी गोष्ट विवेचकबुद्धीनें सिद्ध होते ती मनोवेगांमुळें नष्ट होते.

मनुष्याच्या सर्व क्रिया मन आणि बुद्धि यांच्या अ-

नुरोधानें चालत असतात, यासाठीं त्यांचें साम्य राखिलें असतां सर्व व्यवस्था नीट रहाते. मनोविकार व षडूर्मी यांमध्यें गोचर होणाऱ्या अपूर्णतेमुळेंच ईश्वराचे जगांतील हेतु सफल होतात. हे विकार व या उर्मी प्राणीमात्रांत वाटल्या असून, व्यक्तीस व समाजास अत्यंत उपयोगी आहेत.

प्रेरणा करणें हें मनाचें काम असून दाब ठेवणें हें बुद्धीचें कार्य होय. अमुक गोष्ट चांगली व अमुक वाईट असें आपणास स्वतंत्र रीतीनें ठरवितां येत नाही. पाहिजे ती वस्तु, कोणत्याहि उद्देशानें उपयोगांत आणिली असो, तिचा सार्वत्रिक कल्याणाशीं संबंध असलाच पाहिजे. तेव्हां योग्य क्रियेसाठीं जिचा उपयोग केला जातो ती वस्तु चांगली, आणि वाईट क्रियेसाठीं जी उपयोगांत येते ती वाईट, असा सिद्धान्त ठरतो.

मानवी हालचालीचें बीज जें मन तें आत्म्यास प्रेरणा करितें आणि बुद्धीचा समतोलपणा सर्व वस्तूंवर अंमल चालवितो. मन व बुद्धि या दोहोंमध्यें मनच बलवत्तर आहे, कारण त्याचे विषय संनिध असतात, पण बुद्धीचे विषय दूर असून आशामय होतात. इंद्रियांच्या उपभोगासाठीं तात्कालिक हिताची अपेक्षा मनास असते, पण बुद्धीचें लक्ष्य भविष्यत् कालाकडे व परिणामाकडे असतें. बुद्धिवादापेक्षां विषयाची भूल जोरदार ठरते, तथापि अभिनिवेश, अभ्यास व अभ्युदय यांच्या योगानें बुद्धीस सामर्थ्य प्राप्त होऊन मन ताब्यांत राहतें. मन व बुद्धि यांचा उद्देश एकच असतो, म्हणजे दोहोंसहि सुख हवें असतें आणि दुःखाचा तिटकारा

येतो. मनाची हांव इतकी जबरदस्त असते कीं विषयाचा नाश झाला तरी बेहेत्तर, पण उपभोग सोडावयाचा नाहीं; परंतु पक्षी जसे फुलास धक्का न लावतां मध चाखण्याचा प्रयत्न करितात, त्याप्रमाणें बुद्धीचें कार्य फार नाजुक असतें. अर्थात्, सुखाचा उपभोग अक्कलेनें घेतला तर अत्यंत हित होतें. पण गैरशिस्त रीतीनें होऊं लागला असतां सर्वस्वीं अकल्याण होतें.

मनुष्याची तुलना घड्याळाशीं केली असतां, मन ही मुख्य कमान ( main spring ) होय व बुद्धि ही शासन-पट्टिका ( Regulator ) होय. मुख्य कमानीला वेढे दिले म्हणजे घड्याळ चालू रहातें. तद्वत् मनाच्या प्रेरणेनें देहाची हालचाल होऊं शकते. घड्याळामध्यें शासनपट्टिका या कमानीच्या गतीवर दाब ठेविते म्हणजे ती फार जलद किंवा फार हळू होऊं देत नाहीं. त्याप्रमाणें मनुष्याची बुद्धि त्याची वागणूक अव्यवस्थित होऊं देत नाहीं. मनाच्या प्रेरणेशिवाय मनुष्याच्या हातून कांहींएक क्रिया घडणार नाहीं, आणि बुद्धीच्या नियमनाशिवाय निश्चित हेतूकडे कोणत्याहि क्रियेची दिशा फिरणार नाहीं. यावरून पहातां मन व बुद्धि या दोन्ही तत्त्वांची अवश्यकता सिद्ध होते.

कामक्रोधादि विकारांस मनाचेच प्रकार किंवा धर्म म्हणतां येईल. त्यांची प्रेरणा होण्यास खरें हित किंवा निदान दर्शनी हित तरी असावें लागतें. सर्व गोष्टींमध्यें हिताहिताचा विचार मनुष्यमात्रास असत नाहीं, पण बुद्धीला मात्र खऱ्या हिताची चाड असते, म्हणूंन जरी मनोविकार अहंकारप्रेरित असले, तथापि ते बुद्धीच्या

ताब्यांत असले पाहिजेत. मनोविकारांस जर चांगली दिशा लागली तर ईश्वराचा श्रेष्ठ उद्देश सिद्धीस जातो, मनुष्याची उन्नति होते आणि सद्गुणांचें बीजारोपण होऊं लागतें.

कांहीं तत्त्ववेत्ते असें म्हणतात कीं कामक्रोधादि विकार हे आपले रिपु आहेत आणि निर्विकार स्थिति हीच श्रेष्ठ होय. म्हणून पूर्ण वैराग्य बाणणें हेंच परमानंदाचें लक्षण होय. या विचारसरणींत अशी चूक आहे कीं ज्या निर्विकार स्थितीची प्रतिष्ठा मिरविण्यांत येते ती स्थिति बहुतेक अशक्य आहे, शिवाय ज्या जगतांत आपण निर्माण झालों आहों त्या जगांत तरी मनावांचून रहातां येत नाहीं आणि षड्विकार हे मनाचे धर्म आहेत. जर बुद्धिशक्तीचें साहाय्य हवें असेल, तर मनःस्थैर्यहि संपादन केलें पाहिजे. खरी मनाची बळकटी जगांतील व्यापार करण्यांतच आहे, निवान्त स्वस्थ बसण्यांत नाहीं. चित्ताचा क्षोभ झाला म्हणजे आत्म्यास धक्का बसतो, मग अशा क्षोभामुळें, समुद्रांतील वादळाप्रमाणें, कांहीं अनर्थ घडतो, पण एकंदर स्थिति कायम रहाते. भवसागरामध्यें आपलें जहाज चाललें असतां मनोविकार हे झंझावातासारिखा दंगा करितात, पण बुद्धि होकायंत्राप्रमाणें योग्य दिशा दाखविते. अर्थात् परमेश्वर सुद्धां केवल शान्तीमध्यें स्वस्थ बसत नाहीं, तरि वादळामध्यें प्रवेश करून, प्रचंड वायूच्या साहाय्यानें सर्वत्र संचार करितो. वायूमुळें जशी जहाजाला गति प्राप्त होते, तद्वत् मनुष्यामध्यें चलनवलन करणारे षड्विकार होत. तथापि

होकायंत्रामुळें जशी जहाजाला योग्य दिशा लागते, त्याप्रमाणें बुद्धि ही कर्तव्याचा मार्ग बरोबर दाखविते.

सृष्टींतील महाभूतांप्रमाणें, केव्हां केव्हां मनोविकारांचा क्षोभ झाला, तरी त्यांची शुद्धि व योग्य मिश्रण हीं केलीं असतां ईश्वराचा हेतु सिद्धीस नेण्यास त्यांचा उपयोग अवश्य होतो. मनोविकारांचें नियमन करूनच ते उपयोगांत आणिले पाहिजेत. जर षड्विकार जीविताचीं घटकतत्त्वेंच आहेत, तर त्यांच्या नाशास प्रवृत्त होणें बुद्धिमान् मनुष्यास शोभत नाहीं. यासाठीं मानवी बुद्धीनें सृष्टींतील नियमांचा अवलंब केला पाहिजे, म्हणजे मनोविकारांचें योग्य नियमन व मिश्रण करून सृष्टिक्रमास व ईश्वरी सूत्रास अनुसरलें पाहिजे. प्रेम, आशा, हर्ष या सुखाच्या हसतमुख मंडळीस व द्वेष, भय, शोक या दुःखाच्या रडव्या मंडळींस कृत्रिम उपायांनीं ताब्यांत ठेविलें असतां चित्तास समतोलपणा येऊन तो कायम रहातो. प्रकाश व छाया यांच्यामध्यें जरी वास्तविक विरोध आहे, तरी त्यांच्या योग्य संमेलनानें जसे चित्रामध्यें अपूर्व रंग चढतात, तद्वत् मनोविकारांस योग्य वळण लाविलें असतां जीवितक्रम सुखावह होतो.

मनुष्यमात्राचें लक्ष सर्वकाल सुखप्राप्तीकडे असतें आणि तें खरोखर मिळेनासें झालें तर त्याच्या आशेमध्येंच मन तल्लीन होऊन जातें.

नश्वर, कोमल, फुलाहुनी हि हृदय होय वनितांचे ॥
वियोगकालीं केवल आशा रक्षण करी तयांचें ॥१

—पद्यरत्नावलि

या साकीमध्यें वर्णन केल्याप्रमाणें मनुष्यमात्र आशेवर अवलंबून रहातो. वर्तमानकालीं सांपडेल तें मिळवावयाचें आणि भविष्यत्कालीं फिरून मिळेल ही आशा करीत बसावयाचें—एवढा काय तो उद्योग शरीराला व मनाला सर्वकाल लागलेला असतो. जगांतील साऱ्या वस्तु मनुष्याला भुलवावयास तयार अततात, पण त्यांच्यावर सर्व मनुष्यांचें सारखें लक्ष असत नाहीं. निरनिराळ्या वस्तु इंद्रियांवर आपली छाप निरनिराळ्या तऱ्हेनें बसवितात, या कारणानें शरीरांतील इंद्रियें प्रबल किंवा दुर्बल असतील त्या मानानें भिन्न भिन्न मनोविकार क्षुब्ध होतात. शिवाय असें देखील घडतें कीं एकच विकार अत्यंत प्रबल होऊन इतरांस ग्रासून टाकितो.

मनुष्य उत्पन्न होतांक्षणींच त्याचा मृत्यु निश्चित झालेला असतो. कांहीं तरी शारीरिक रोग जडून मनुष्याच्या वाढीबरोबर तोहि वृद्धिंगत होतो आणि मनुष्य शक्तिमान् होऊं लागला कीं तो रोग बलवत्तर होऊन शेवटीं मनुष्यास मृत्यूच्या स्वाधीन करितो. त्याप्रमाणें मनालाहि रोग जडतो व तो मनुष्याचा प्रधान विकार समजला जातो. असें झालें म्हणजे अन्तर्यामींचे सर्व रस त्याच विकाराचा परिपोष करितात. याचीं उदाहरणें अनेक आहेत. एकादा मनुष्य अधिकार किंवा कीर्ति याच्याच मागें लागलेला असतो, कोणास ज्ञान किंवा द्रव्य याची हौस वाटते, कोणी वैभवाच्या पाठीस लागतो तर कोणास स्वस्थ बसण्यांतच आनंद होतो. अशा प्रसंगीं बुद्धि मार्गदर्शक न झाली तरी संरक्षक होते, म्हणून अशा प्रबल विकारास (Ruling passion)

आपला शत्रु न समजतां मित्र मानिला पाहिजे. व्यापाऱ्याची चिकाटी, साधूची तंद्री, चैनीची आवड, जोग्याचा विनय, शूराचा अभिमान, वगैरे शब्दप्रयोगांवरून प्रधान विकारांचेंच निदर्शन होतें.

निसर्गाचा धर्म असा आहे कीं अशुभांतून शुभ निष्पन्न होतें, म्हणून असा जरी विकार प्रबल झाला तरी तो शुद्ध सत्त्वाशीं मिश्रण पावून एकादा अप्रतिम गुण बनून जातो. अशा रीतीनें मनोविकारापासून अनेक विलोभनीय गुण जन्मास येतात व मुळाशीं असलेल्या निसर्गसिद्ध वीर्याच्या साहाय्यानें ते गुण वृद्धि पावतात. उदाहरणार्थ पिशुनता, दुराग्रह, द्वेष, भय या वृत्तींपासून कितीतरी विद्वत्ताप्रचुर व सर्वांगसुंदर असे लेख निर्माण झालेले आहेत, आणि क्रोधाविष्ट पुरुषांचे उद्योगी व धैर्यवान् असे लोक बनलेले आहेत. लोभापासून दूरदर्शी लोक निष्पन्न होतात, आळसापासून तत्त्वज्ञानी, कामासक्तीपासून अनुरागी लोक तयार होतात. मत्सराचें रूपान्तर स्पर्धेमध्यें होऊन कितीतरी ग्रंथकार व शूर पुरुष बनलेले आहेत. अभिमान व लज्जा या वृत्तींपासून अनेक मर्दानी व जनानी गुण उत्पन्न झाले आहेत. महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन देशभक्त बनलेल्या पुरुषांचे दाखले इतिहासामध्यें अनेक आढळतील यांत संदेह नाहीं.

अशा रीतीनें निसर्गशक्तीच्या प्रभावानेंच उच्छृंखल अशा कामक्रोधादि विकारांचें व दौर्बल्यदर्शक अशा दोषांचें महनीय गुणांमध्यें रूपान्तर होऊं शकतें हा ईश्वराचा मनुष्यावर केवढा अनुग्रह आहे बरें? अशुभाचा कल शुभाकडे वळविणें हें मानवी बुद्धीचें असामान्य

सामर्थ्य समजलें पाहिजे. मनोवेगांमुळें मानवी चैतन्यांत जेव्हां वादळ सुटल्याप्रमाणें एकाएकीं खळबळ उडून जाते, तेव्हां अशा घोटाळ्यांत प्रकाश व अंधकार यांमध्यें निवड करण्यास बुद्धिशक्ति मात्र समर्थ होते. सृष्टींतील परम दुर्ज्ञेय जें रहस्य तें हेंच कीं विरुद्ध धर्माच्या पदार्थांपासून देखील एकच फलावाप्ति होऊं शकते आणि मनुष्यांमध्यें तर अशा पदार्थांचा अद्भुत उपयोग करितां येतो. सद्गुण व दुर्गुण यांची जेव्हां भेसळ होते, तेव्हां सद्गुण कोणता व दुर्गुण कोणता हें ठरविणें दुरापास्त असतें. जसें एकाद्या अत्यंत सुंदर चित्रामध्यें प्रकाश व छाया यांची अशी मिसळ होऊन जाते कीं प्रकाश कोणता व छाया कोणती याचा निश्चय करणें अवघड पडतें, तीच सद्गुणांची व दुर्गुणांची स्थिति होय.

यावरून असें मात्र म्हणूं नये कीं सद्गुण व दुर्गुण यांमध्यें भेदच नाहीं. पहा, काळें व पांढरें——यांचें हजारों प्रकारांनीं मिश्रण होतें, तें एकमेकांमध्यें विलीन होऊन त्यांची एकरूपता होते, म्हणून काळें व पांढरें हे भिन्न धर्मच नाहींत असें म्हणतां येईल काय? तुम्ही आपल्या जिवाला विचारा म्हणजे तोच सांगेल कीं दोन्ही अगदीं भिन्न आहेत.

दुर्गुण हा असा भयंकर राक्षस आहे कीं त्याचें स्वरूप चांगल्या तऱ्हेनें समजलें तरच त्याचा तिटकारा येईल. पण असा चमत्कार आहे कीं त्याचा सहवास घडून नित्य परिचय झाला असतां प्रथम तो सहवास सोसण्याचा परिपाठ पडतो, मग केवळ दया वाटूं लागते आणि शेवटीं आपण त्याला मिठी घालतों. असें आहे

तरी दुगुण कशास म्हणावें, दुर्गुणाची अन्तिम स्थिति कोणती असें विचारा म्हणजे कोणाचा कोणाशीं मेळ म्हणून बसत नाहीं. उत्तर दिशा कोणती ? हा प्रश्न विचारिला असतां जो तो आपल्या देशांतील उत्तर सीमा सांगणार, म्हणून एक उत्तर येण्याचा संभव नाहीं. तीच गोष्ट सद्गुण व दुर्गुण यांस लागू पडते.

प्रत्येक मनुष्य सद्गुणी व दुर्गुणी असतो, मग तो अन्तिम अवस्थेंत नसला, तथापि कांहीं अंशानें तरी असतोच. पक्का लुच्चा किंवा अगदीं मूर्ख मनुष्य जरी घेतला तरी तो लहर येईल तेव्हां समंजस व शहाणा होऊं शकतो. तसेंच, कितीहि उत्तम मनुष्य घेतला तरी तो लहरींत असतां त्याच्या हातून भलतीं कृत्यें घडणारच. प्रत्येक मनुष्याची अवसानभूमि स्वतंत्र निराळी असते, परंतु ईश्वराचा उद्देश एकच असून तो समस्त विश्वासंबंधानें असतो. कितीहि मूर्खपणाचें किंवा लहरीचें कृत्य असलें, तरी ईश्वर त्याचा पाडाव करून टाकितो, कोणताहि दुर्गुण असला, तरी ईश्वर त्याचा परिणाम घडूं देत नाहीं. सर्व प्रकारच्या मनुष्यांमध्यें ईश्वर हितकारक दोष निर्माण करितो. उदाहरणार्थ, कन्येच्या अंगीं लाज, पोक्त बाईच्या अंगीं अभिमान, मुत्सद्यामध्यें संशय, सरदारामध्यें धाडस, राजेलोकांत धाष्टर्य, लोकसमाजामध्यें विश्वास—असे हितावह दोष उत्पन्न केलेले आहेत आणि तेणेंकरून ईश्वराचे श्रेष्ठ हेतु साध्य होतात. मद म्हणून जो मनोविकार आहे त्याचा प्रयोग करितांना जर स्वार्थबुद्धीची आशा ठेविली नाहीं, बक्षिसाची किंवा स्तुतीची पर्वा केली नाहीं, तर सद्गुणाचे हेतु सिद्धीस

जातात. एवंच विश्वाचा कारभार चालवितांना ईश्वराचें धोरण असें असतें कीं मनुष्याच्या स्वरूपांत जो जो कमीपणा वाटतो किंवा जीं जीं व्यंगें दृष्टीस पडतात, त्यांचा फायदा घेऊन मानव जातीस जेणेंकरून आनंद होईल, शान्ति मिळेल व वैभव संपादन होईल—अशी-च व्यवस्था सर्वत्र राखिलेली असते.

ईश्वराची अशी रचना आहे कीं सर्व वस्तूंमध्यें अन्योन्याश्रय असावा. तेणेंकरून धनी, चाकर, मित्र इत्यादि संबंध उत्पन्न होतात. धन्यास चाकराची मदत होते. चाकरास धन्यापासून लाभ होतो, एक मित्र दुसऱ्या मित्राचा उणेपणा भरून काढितो. अशा रीतीनें काहीं व्यक्तींच्या हीनतेमुळें समस्तांस बळकटी येते. ही जी परस्परांस गरज लागते, हीं जीं एकमेकांत न्यूनें आढळून येतात व शत्रूसारखे दिसणारे अत्यंत प्रबल मनोविकार उत्पन्न होतात—त्यांच्या संयोगानें सामाजिक संबंध घट्ट होतात, व परस्पर बंधनांची मनुष्यास गोडी वाटूं लागते. ह्या गरजांमुळें, व्यंगांमुळें व मनोवेगांमुळें खरा स्नेहभाव, शुद्ध प्रेम व जीवितांतील घरगुती आनंद—हीं अनुभवास येतात. त्याप्रमाणेंच, उतारवयामध्यें हा आनंद, हें प्रेम, हीं बंधनें सोडून देण्यास आपण तयार होतों आणि संसारांत होणारा सर्व वस्तूंचा लय पाहून बुद्धीच्या शिकवणीनें आपण मरण्यास सिद्ध होतों आणि स्वस्थपणें मरून जातों.

प्रबल मनोवृत्ति कोणतीहि असो, ज्ञान किंवा कीर्ति मिळविण्याची चाड असो, द्रव्याची हांव असो, एकाची बरोबरी दुसऱ्यास कधींच होणार नाहीं. सृष्टितत्त्वें शो-

धून काढण्यांत विद्वान् लोकांस परमानंद होतो, ईश्वरानें जें ज्ञान दिलें आहे तेवढ्यांतच मूर्ख लोक सुख मानितात, श्रीमान् लोक संपत्तीच्या विलासांत गर्क असतात, गरीब लोक जवळ कांहीं नसलें तरी ईश्वरावर हवाला ठेवून समाधान पावतात. रस्त्यांत तमाशा करून पोट भरणारे लोक सुद्धां मजेंत असतात,—अंधळा भिकारी नाचतो, लंगडा गातो, छाकटा वीराची बतावणी करितो आणि वेडा मनुष्य राजाचें सोंग घेतो. तांबें वगैरे हलक्या धातूंचें सोनें बनविण्यांत किमयागार दंग असतात. कविश्रेष्ठ नानाविध कल्पना आलंकारिक भाषेनें शोभविण्यांत रंगलेले असतात. अशा तऱ्हेनें कोणतीहि अवस्था घेतली, तरी मनुष्याला विचित्र आनंद होत असतो. निदान मनुष्यमात्राचा दोस्त जो अभिमान तो सर्वांस अर्पण केला असल्यामुळें, सुखाची कमतरता कधींच पडत नाहीं, प्रत्येक मनुष्यास कशाचा तरी अभिमान वाटत असतो, म्हणून सुखाची वाण होतच नाहीं. कोणत्याहि वयाचा मनुष्य असो, त्याला शोभेल असें व्यसन किंवा कोणती तरी आसक्ति असतेच, निदान आशा तर सर्वांच्या स्वाधीन आहेच आणि प्राण गेला तरी ती मनुष्याला सोडीत नाहीं. आशेच्या जिवावर जो तो सुखांत निमग्न असतो.

प्रथम लहान अर्भकांची गोष्ट घ्या. दयाघन ईश्वराच्या कृपेनें मुलें खुळखुळ्यानेंच तृप्त होतात आणि भिंटाचीं खेळणीं करून दिलीं तरी तेवढ्यानें त्यांस अपूर्व मौज वाटूं लागते. तारुण्यांत आल्यावर, अंमळ सरस व झोकदार, पण अगदीं निःसत्त्व, अशाच खेळण्यांनीं त्यांची

चैन उडते. प्रौढ दशा प्राप्त झाली असतां, शेले, पदकें, गळपट्टे, शाली, पायमोजे, मोजेबंद—अशा जिनसांनीं त्याला सुख वाटूं लागतें. रुद्राक्षाच्या, पोंवळ्याच्या, पुत्रवंतीच्या—वगैरे मण्यांच्या माळा, स्मरण्या, व गीता, सहस्रनामें इत्यादि म्हातारपणचीं खेळणीं होतात आणि असल्या अल्पमूल्य आभरणांनीं व दिखाऊ वस्तूंनीं या वयांत पूर्वींप्रमाणेंच आनंद होतो. मग सरतेशेवटीं अखंड निद्रा येऊन जीविताचें कार्य संपून जातें.

अजून मनुष्यास सर्वसाधारण असा एक सुखाचा मार्ग सांगावयाचा राहिला. त्या मार्गाच्या प्राप्तीसाठीं बिलकूल श्रम पडत नाहींत किंवा पैका खर्च होत नाहीं. कादंबरीकार, संगीतकार, नाटककार—अशा प्रतिभासंपन्न लोकांचें दास्य स्वीकारलें म्हणजे सगळें कार्य सहज होऊन जातें. हा उपाय म्हणंजे मनोराज्यांत गर्क असणें होय. सुखाची उणीव जेव्हां होईल तेव्हां ती आशेनें भरून काढावी आणि अकलेची पोकळी अभिमानानें भरून टाकावी. खऱ्या ज्ञानानें विनाश होईपर्यंत अशाच घटना चालवावी. एक विचार फुकट गेला तर त्याचे जागीं दुसरा आणावा. निदान एवढी आशा रहाते कीं—मनुष्य जरी अपूर्ण असला तरी सर्व शक्तिमान् परमेश्वर त्याचें न्यून पडूं देणार नाहीं.

अशा रीतीनें, मनुष्याच्या स्वरूपाचा व्यक्तिशः विचार करितां असें दिसतें कीं तो मध्यम स्थितींत आहे. मनुष्याच्या दोषांचा एकंदर समाजास उपयोग होतो आणि मनोविकार बुद्धीच्या ताब्यांत राहिले असतां ईश्वराचा श्रेष्ठ उद्देश सिद्धीस जातो. आतां मनुष्य हा

सामाजिक प्राणी असल्यामुळें, समाजसंबंधानें त्याचें स्वरूप काय व स्थिति कशी असते याविषयीं विवेचन करणें अवश्य आहे.

सार्वत्रिक कल्याण हें ईश्वरी व्यवस्थेचें बीज असून अखिल विश्व हा एक प्रचंड समाजच बनलेला आहे. कोणताहि प्राणि सर्वस्वीं स्वतःकरितां किंवा सर्वस्वीं दुसऱ्याकरितां उत्पन्न झालेला नसून, प्राणिमात्राचें सुख परस्परावलंबी असतें. सर्व विश्वाचें आदिकारण एका विवक्षित उद्देशाकडे प्रवृत्त झालेलें आहे, परंतु त्याची क्रिया विविध नियमांनीं बद्ध झालेली असते. उपरिष्टात् व अधस्तात् म्हणजे वर आणि खालीं सर्व एकाच प्रेमशृंखलेनें निगडित झालेलें आहे. ह्या हेतूच्या सिद्धीसाठीं जेव्हां सृष्टिक्रम सुरू होतो, तेव्हां प्रथमतः सर्व परमाणु एकमेकांकडे आकर्षिले जातात, आणि जीवितविशिष्ट द्रव्यांची चोदना एका मध्याकडेच होत जाते आणि तो मध्य म्हणजे सार्वत्रिक कल्याण होय. मृत झालेल्या वनस्पति जीवधारणा करितात आणि जीव नष्ट झाल्यावर फिरून उद्भिज्जरूपानें वाढतात. ज्या ज्या मूर्ति लयास जातात त्या नव्या मूर्तींची उत्पत्ति करितात. जडद्रव्यरूपी समुद्रावर मूर्त पदार्थ बुडबुड्याप्रमाणें निर्माण होतात, फुटतात आणि त्याच समुद्रांत लय पावतात, त्याप्रमाणेंच अनेक परमाणूंचे समुदाय सजीव होऊन निर्जीव होतात, फिरून सजीव होऊन मरून जातात. यावरून पहातां, सृष्टिक्रमासंबंधानें पाश्चिमात्य विचारसरणीमध्यें परमाणु यदृच्छेनें संघ पावून त्यांस मूर्त स्वरूप येत येत कांहीं परमाणुसमुदाय सजीव होतात, मग त्यांचें उद्भि-

ज्जकोटीमध्यें व प्राणिकोटीमध्यें क्रमानें रूपान्तर होत जातें, असें जरी म्हटलें आहे, तथापि आदिकारणाची प्रवृत्ति एका उद्देशाकडे मानिली असल्यामुळें ईश्वरेच्छेचें जगत्कर्तृकत्व सिद्ध होतें.

प्राणिकोटीमध्यें तिर्यग्योनि व मनुष्यें यांचें परस्परांस साहाय्य होतें. पशूची मदत मनुष्यास होते व मनुष्य पशूला मदत करितो. कोणताहि पदार्थ एकाकी निर्माण होत नाहीं, सर्व भाग समस्ताशीं संयुक्त असतात आणि अखिल पदार्थ एका सांखळीनें बांधलेले रहातात. या सांखळीचा पहिला दुवा कोणता हें जरी कळलें, तरी शेवटचा कोणता एवढें मात्र समजत नाहीं.

ईश्वरानें अखिल विश्व केवळ मनुष्याकरितां निर्माण केलेलें नाहीं. हरिणाचें मांस काढून त्यावर मनुष्य उपजीविका करितो हें जरी खरें आहे, तरी मृगशावकास उडण्याबागडण्यासाठीं लतापुष्पांनीं सुशोभित अशीं मैदानें ईश्वरानें उत्पन्न केलीं आहेत. कोकिल पक्ष्याच्या मंजूळ स्वरानें मनुष्य आनंदित होतो, तर माधुर्यानें त्याचा कंठ उल्हसित होतो, व प्रेमानें तो पक्षी आपले पंख फडफडवीत असतो. उमद्या घोड्यावर बसून आपण सहल करूं लागलों, तर तो सुद्धां कान ताठ करून आनंदांत मोठ्या वेगानें भरधांव पळत सुटतो. मनुष्यें शेतांत धान्य पेरितात, पण तेथील कणसांचा उपयोग पशुपक्ष्यांस मिळतो. लोंकरीचा उपयोग फक्त जनावरांस न होतां मनुष्यासहि होतो, कारण लोंकरीचीं फार उंचीं वस्त्रें तयार होतात.

तिर्यग्योनी व मनुष्ययोनि हीं दोन्हें परस्परांस सहाय

होऊन एकमेकांचें जीवित सुखकर करितात. बुद्धिशक्तीमुळें मनुष्य श्रेष्ठ असून तिर्यग्योनीवरहि अंमल चालवितो, तथापि त्याच्या वर्चस्वास ईश्वरानें मर्यादा ठेविली आहे. चतुष्पादांच्या व पक्ष्यांच्या गरजा व दुःखें त्याला कळतात व तो त्यांचें साहाय्य करितो, परंतु त्यांच्यात्यांच्यामध्यें जेव्हां कलह माजतो तेव्हां त्याचे हातून निवारण होत नाहीं. बहिरीससाणा जेव्हां कबुतरावर झडप घालितो तेव्हां तेथें पाठीराखा कोण असतो? गृध्र पक्षी जेव्हां चंडोल पक्ष्याला चोंच मारितो तेव्हां त्याचें रक्षण कोण करील? हें काम मनुष्याचे हातून घडत नाहीं. फार झालें तर मनुष्य पक्ष्यांना रानांत फळें खाऊं देईल, जनावरांना शेतांत चरूं देईल, माशांना तलावांत निर्वाह करूं देईल आणि अशा रीतीनें कधीं आपल्या उपजीविकेकरितां, कधीं कर्मणुकीकरितां, तर कधीं निवळ चैनीकरितां मनुष्य पशुपक्ष्यांस खाऊं घालून त्यांचें संरक्षण करूं शकेल. यापेक्षां त्याचे हातून कांहीं होणार नाहीं.

सर्व बुद्धिहीन प्राण्यांचा हितकर्ता परमेश्वर असून त्यांना मृत्यु कधीं येणार हें कळूं देत नाहीं, कारण त्यापासून त्यांना कांहीं उपयोग नाहीं. आपणास केव्हां तरी मृत्यु गांठणार एवढें मात्र मनुष्याला समजतें, पण मौज अशी आहे कीं मृत्यूची भीति जरी त्याला असते तरी तो इष्ट वाटूं लागतो. मृत्यु अमुक वेळीं येणार हें कधींच कळत नाहीं, तरी नुसती भीति कायम रहाते. सर्व सृष्टीमध्यें बुद्धिमान् प्राणि काय तो एकटा मनुष्य आणि त्याचें सुद्धां मृत्यूविषयीं अशा प्रकारचें ज्ञान असतें हा खरोखर अद्भुत चमत्कार आहे.

ईश्वरानें उपजतबुद्धि दिलेली असो किंवा विवेचकबुद्धि अर्पण केलेली असो, प्रत्येक प्राण्याच्या अंगीं आपल्या स्थितीस योग्य असें सामर्थ्य अवश्य असतें. तथापि उपजतबुद्धि ( Instinct ) व विवेचकबुद्धि ( Reason ) यांच्या क्रियेमध्यें फार अन्तर आहे. उपजतबुद्धि प्रामाणिकपणानें स्वयंसेवकाचें काम करण्यास नेहमीं तयार असते, तिचें काम तंतोतंत असून त्यांत कमीजास्त प्रकार कधींच घडत नाहीं. विवेचकबुद्धीमध्यें कितीहि सामर्थ्य असलें, तरी ती जात्या थंड आहे आणि तिला वेठीला धरावें तेव्हांच तिचा उपयोग होणार. उपजतबुद्धीची सल्लामसलत सर्वदा यथायोग्य असत, पण विवेचकबुद्धीचा हितवाद प्रसंगीं चुकलेला असतो. उपजतबुद्धि क्षिप्रकारी असून विवेचकबुद्धी तुलाकारी असते. अशा जरी या शक्ति भिन्न असल्या तरी दोहोंचें स्वरूप एकच असतें व दोन्ही सुखप्राप्ति करून देणाऱ्या आहेत, आणि हा हेतु निरनिराळ्या प्राण्यांमध्यें भिन्न साधनांनीं तडीस जातो. मनुष्यास तेवढी विवेचकबुद्धि समर्पण केली असून उपजतबुद्धि इतर सर्व प्राण्यांस दिली आहे. दोन्ही शक्ति जरी ईश्वराच्या देणग्या आहेत, तरी असें म्हणणें भाग आहे कीं उपजतबुद्धीचा चालक साक्षात् ईश्वर असून विवेचकबुद्धीचा शास्ता मनुष्य होय. या कारणांमुळें पशु व पक्षी आपणास हितावह तेवढेंच अन्न खातात आणि विषकारी पदार्थांचें कधींच ग्रहण करीत नाहींत. पहा, आंखणी व पट्टी यांच्या मदतीशिवाय समान्तर व वर्तुलाकार दोरे बसवून आपलीं घरें तयार करण्यांत कोळी तरबेज अस-

तात. क्रौंच पक्षी व गरुड पक्षी दूरदूरच्या प्रदेशांत जाऊन निरनिराळ्या ऋतूंत उपयोगी पडण्यासारखीं घरटीं बांधितात आणि मोठमोठे जमाव करून लमाणासारखे समुद्रांवरून व खडकांवरून प्रवास करितात. मुंग्यांचीं, पक्ष्यांचीं व पशूंचीं संमेलनें देखील नियमित कालीं भरतात. हे सर्व चमत्कार उपजतबुद्धीनेंच घडून येतात.

प्रत्येक प्राण्याच्या स्वभावांतच त्याच्या कल्याणाचें बीजारोपण ईश्वर करितो आणि त्याची मर्यादाहि राखून ठेवितो. ईश्वरानें सकल वस्तु निर्माण केल्या आहेत आणि समस्तांचें कल्याण संपादण्याकरितां परस्परांच्या गरजांवर त्यांच्या सुखाची इमारत बांधिली आहे. परमेश्वरानें प्राणिवर्गामध्यें व मनुष्यवर्गामध्यें ही कायमची व्यवस्था आरंभापासून करून ठेविली आहे, म्हणून प्रत्येक प्राणि दुसऱ्याशीं चिकटून रहातो. उंच आकाशांत, वातावरणांत, पृथ्वीवर, समुद्रांत—जेथें जेथें जीव म्हणून असतात, तेथें त्यांच्यामध्यें एक विशिष्ट स्वभाव कायम रहातो, तेणेंकरून प्राणिवर्गाचें रक्षण व वृद्धि हीं होतात. पशु, पक्षी, मनुष्य, सर्प, मासे, मुसरी—या समस्त वर्गांतील प्रत्येक प्राणि आपणावर प्रेम करितो इतकेंच नव्हे, तरि प्रत्येकास भिन्न लिंगाची जोड हवीशी वाटते. हीं स्त्रीपुरुषाचीं जोडपीं प्रत्येक वर्गांत उत्पन्न होऊन एकमेकांवर प्रेम करूं लागतात, त्यांचा एकजीव होऊन जातो आणि तीं अत्यंत सुखी होतात. पुढें याचा शेवट परस्परालिंगनसुखांतच न होतां, तदुत्पन्न प्राण्यांवर ममता करण्यांत प्रेमा-

ची तिसरी उसळी येते. अशा रीतीनें पशुपक्षी आपलीं कामें उत्तम रीतीनें बजावतात, म्हणजे स्त्री बालकांचें पोषण करिते आणि पुरुष त्यांचें रक्षण करितो. पिलें स्वतः उदरनिर्वाह करण्यास समर्थ झालीं आणि आकाशांत किंवा पृथ्वीवर भटकूं लागलीं, म्हणजे तीं पाहिजे तिकडे निघून जातात आणि मग आईबापांच्या उपजतबुद्धीचें व त्याबरोबर पिलांच्या संरक्षणाचें काम संपून जातें. परस्परांमधील सांखळी तुटून जाते व मायलेकरांचे संबंध इतके तुटक होतात कीं एकमेकांमध्यें मिथुनीभाव देखील घडूं लागतो. फिरून नरमादींचीं दुसरीं जोडपीं जमतात, नवीन प्रेम उत्पन्न होतें आणि नवीन प्रजा निर्माण होऊं लागते.

परंतु मनुष्यजातीची स्थिति अशी नाहीं. मनुष्यवर्गांत गरीब बापड्या निराश्रित मुलाबाळांची काळजी फार दिवस घ्यावी लागते, आणि या दिवसगतीमुळें परस्परांमधील प्रेमबंधनें दृढतर होतात. विचारशक्ति व विवेचकशक्ति यांच्यामुळें हीं बंधनें वृद्धि पावतात, मातापितरांचें चित्त मुलांकडे अधिक वेधून जातें आणि प्रीति अतोनात वाढते. मनुष्य जाणून बुजून मोहांत पडतो व सहानुभूतीनें ग्रस्त होतो. प्रत्येक मनोविकारांतील स्पृहणीय धर्म विकास पावतात, नव्या गरजा व नव्या संवयी उत्पन्न होतात आणि औदार्यावर उपकाराचीं कलमें बांधलीं जातात. मग एकामागून एक अशा पिढ्या बनत जातात, जवळच्या पिढीवर नैसर्गिक प्रेम बसतें व दूरच्या पिढीवर परिपाठांतील प्रेम जडूं लागतें. अगदीं खालच्या पिढींतील माणसें कोठें वयांत येऊं

लागतात, तों आपला मूळ पुरुष निराधार झालेला त्यांच्या दृष्टीस पडतो. पूर्वकाल व भविष्यत्काल यांना योग्य मोबदला हवा असतो, म्हणून आठवण होते पूर्व वयांतली आणि चिन्ता लागते उतारवयाची. सुख, कृतज्ञता व आशा एकत्र होतात, चित्तवेध वाढतो आणि मनुष्यजातीचें रक्षण होतें.

यावरून असें समजूं नये कीं हे सर्व सृष्टिव्यापार प्राण्यांच्या हातून अजाणपणें कसे तरी घडत असतात, कारण सृष्टीच्या प्राकृतिक अवस्थेमध्यें ईश्वराचेंच साम्राज्य होतें. संयोग हाच मनुष्याचा व सर्व पदार्थांचा संघटक धर्म असून, सृष्टीच्या उत्पत्तीबरोबर आत्मप्रीति व समाजप्रीति हे दोन भाव उत्पन्न झाले. सृष्टीच्या उत्पत्तिकालीं अभिमान ही वृत्ति मुळींच नव्हती व ह्या वृत्तीस साहाय्य करणारीं शास्त्रेंहि निपजलीं नव्हतीं. त्या कालीं पशु व मनुष्यें वृक्षछायेखालीं एकत्र रहात असत, आणि मनुष्याचे भोजनाचें व निजण्याचें स्थल एकच होतें. अरण्य हेंच देवालय असून, त्या ठिकाणीं सर्व सुस्वर प्राणि एका देवाचीं स्तोत्रें गात व त्या आलापांनीं अरण्य दुमदुमत असे. त्या कालीं देवायतनामध्यें भूमि रक्तपातानें अपवित्र होत नसे, कनकालंकार विराजत नव्हते, आचार्यास किंवा पुजाऱ्यास दक्षिणा मिळत नसे व पशुहत्या करून पापहि लागत नसे. सृष्टीच्या प्रथम अवस्थेमध्यें ईश्वराचा प्रधान गुण म्हटला म्हणजे सर्व प्राण्यांची चिन्ता हाच होता व मनुष्याचा मुख्य अधिकार म्हणजे कोणासहि पीडा न करितां आपलें वर्चस्व राखावयाचें हा होता.

सृष्टपदार्थ व सृष्टींतील व्यापार यांच्या सूक्ष्म निरीक्षणानें मनुष्यास हळू हळू नाना प्रकारच्या कलांचें व शास्त्रांचें ज्ञान होतें. प्रथमतः तर विवेचकबुद्धि उपजतबुद्धीचेंच अनुकरण करूं लागते. सृष्टिदेवी मनुष्यास असें म्हणाली—" हे मानवा, जा, इतर प्राण्यांपासून अगोदर धडा घे. रानांत कोणते खाण्याचे पदार्थ निर्माण झालेले आहेत, तें पक्ष्यापासून शीक, शेतांत रोगनिवारक वनस्पति कोणत्या उगवल्या आहेत तें पशूपासून समजून घे, घर कसें बांधावें हें ज्ञान मधमाशांपासून मिळीव, जमीन कशी नांगरावी तें चिचुंद्रीपासून शीक, विणावें कसें आणि समान्तररेषा व वर्तुळें कशीं काढावीं हें कोळ्यापासून समजून घे,—नॉटिलस नांवाच्या माशापासून जहाज कसें हाकारावें, पातळ शीड कस उभारावें व त्यांत वारा कमा धरावा याचें ज्ञान मिळीव. तसेंच सामाजिक ऐक्याच्या बाबतींत पशुपक्ष्यांस गुरु कर आणि मग विवेनकबुद्धीच्या सामर्थ्यानें मनुष्यजातीस या सर्व ज्ञानाचा लाभ करून दे. पृथ्वीच्या पृष्ठभागाखालीं इमारती कशा बांधाव्या, शहरें कशीं वसवावीं हें पाहून घे. झाडांच्या फांद्या वाऱ्याच्या सोसाट्यानें हालत असतांहि त्यांवर मोकळ्या हवेमध्यें नगरांची रचना कशी करितात त्याचें सूक्ष्म अवलोकन कर. अनेक लहानग्या पशुवर्गांची व पक्षिवर्गांची उपजतबुद्धि व सामाजिक नीति हीं कशीं असतात त्याची माहिती मिळीव. मुंग्यांची लोकसत्तात्मक कारकीर्द व मधमाशांचा राजसत्तात्मक कारभार अवलोकन केल्यावर मानवी राज्यपद्धतीस अपरिमित फायदा होईल यांत शंका नाहीं.

मुंग्यांच्या राज्यांत सर्व संपत्तीवर सगळ्यांचा सारखा हक्क पोहोंचतो आणि अराजकस्थितींत देखील यत्किंचित् अव्यवस्था नजरेस येत नाहीं. मधमाशांच्या राज्यांत जरी एकजण राजा म्हणून मानिलेला असतो, तरी पोळ्यांतील खण व मालमत्ता हीं प्रजाजनासाठीं निरनिराळीं राखिलीं असतात.

“ हे मानवा, उपजतबुद्धि व विवेचकबुद्धि यांमधील मुख्य अन्तर ध्यानांत ठेव. विवेचकबुद्धीमध्यें कितीहि सामर्थ्य असलें, तरी ती जात्या थंड आहे; तिला उपयोगीं पडण्याची चाड नाहीं, तिला वेठीला धरावें तेव्हांच ती काम करणार. कोणी बोलावील तोंवर ती थांबेल, आणि थांबली तरीसुद्धां ती जवळ रहाणार थोडीच. उपजतबुद्धीची स्थिति निराळी आहे. ती प्रामाणिकपणें स्वयंसेवकाचें काम करण्यास सर्वदा तयार असते, आणि तिचें काम तंतोतंत असावयाचें कमी नाहीं, जास्त नाहीं. पण मानवी बुद्धीची गोष्ट तशी नाहीं, तिचें काम कधीं फाजील तर कधीं अपुरतेंच रहाणार. सृष्टिनियमाप्रमाणें तंतोतंत वागणारी उपजतबुद्धि चपल असल्यामुळें तिच्यापासून सुखप्राप्ति हटकून होते, पण विवेचकबुद्धि फार जड असल्यामुळें, कितीहि धडपड केली, तरी तशी सुखप्राप्ति तिच्यापासून होणें दुरापास्त आहे. उपजतबुद्धि शुश्रूषा करण्यास नेहमीं एका पायावर तयार असते, विवेचकबुद्धीचा उपयोग झाला तरी फार वेळ होतच नाहीं. उपजतबुद्धीची सल्लामसलत सर्वदा यथायोग्य असते, विवेचकबुद्धीचा हितवाद प्रसंगीं चुकलेला असतो. यावरून असें पहा कीं, उपजतबुद्धि

क्षिप्रकारी व विवेचकबुद्धि तुलाकारी अशा जरी असल्या, तरी दोहोंचें स्वरूप एकत्र असून दोन्ही सुखप्राप्ति करून देणाऱ्या आहेत. मनुष्यास मात्र विवेचकशक्ति अर्पण केली असून इतर सर्व प्राण्यांस उपजतबुद्धि दिलेली आहे. उपजतबुद्धीपेक्षां विवेचकबुद्धीची कितीहि वाखाणणी केली तरी एवढें म्हणणें भाग आहे कीं उपजतबुद्धीचा चालक साक्षात् ईश्वर असून विवेचकबुद्धीचा शास्ता मनुष्य होय. हें दोहोंमधील अन्तर ध्यानांत ठेविलें असतां असें समजेल कीं उपजतबुद्धीसारखी पदार्थरचना किंवा न्यायनिर्णय विवेचकबुद्धीस कधींच साधावयाचा नाहीं. पशुपक्ष्यांमध्यें एकाच प्रकारचे नियम संरक्षणासाठीं ठरविलेले असतात. या नियमांमध्यें निसर्गाप्रमाणेंच अपूर्व शहाणपण दृष्टीस पडतें आणि दैवाप्रमाणेंच हे नियम त्रिकालाबाधित असतात. मनुष्यांमध्यें सर्व कायदे दर्शनीं एकतऱ्हेचे असले, तरी न्याय करण्याची रीति अशी चमत्कारिक असते कीं बारीक कीस काढितां काढितां सत्याचें असत्य आणि असत्याचें सत्य होऊन जातें. बा मानवा, अशी स्थिति असून, अखिल प्राण्यांवर आपली सत्ता चालीव, महाभूतांवर सुद्धां अंमल गाजीव आणि उपजतबुद्धीस ज्या कला अवगत होतात त्यांच्या ज्ञानानें राजाच्या सिंहासनावर बैस अथवा देवासारखी पूजा-अर्चा करून घे. ”

सृष्टिदेवीचें हें भाषण ऐकून शहाण्या मनुष्यानें तिच्या आज्ञेप्रमाणें वागण्याचा निश्चय केला. शहरें वसविलीं, समाज स्थापन केले, आणि अनेक देशांमध्यें अनेक संस्थानें उत्पन्न झालीं. प्रेमामुळें म्हणा अगर भया-

मुळें म्हणा, बहुतेक संस्थानांचा मिलाफ झाला. दोन संस्थानांमध्यें स्नेहभाव वाढूं लागला म्हणजे त्यांतील रहिवाशांना अनेक तऱ्हेचे लाभ होतात. एका संस्थानांतील उत्पन्नाचे पदार्थ दुसऱ्या संस्थानांतील लोकांस उपभोगावयास सांपडतात. लढाई करून परदेशांतून मालमत्ता लुटून आणण्यापेक्षां व्यापारानेंच अधिक संपत्ति प्राप्त होते, आणि लढाईच्या उद्देशानें परदेशांत गेलेले लोक त्याच देशांतील लोकांचे पक्के मित्र बनतात. दोन देशांतील लोकांचें संघट्टन झालें कीं त्यांच्यामध्यें प्रेमभाव वाढतो. येथें प्रेमभाव म्हणजे स्वातंत्र्य आणि निसर्ग म्हणजे कायदा असें समजलें पाहिजे. राजाचें नांव सुद्धां प्रथम ठाऊक नसतें, पण सर्वांच्या कल्याणासाठीं कोणाएकाला मुख्य अधिकार अर्पण करावे लागतात. बापाचे अंगीं सदाचार असला म्हणजे जशीं मुलें त्याची आज्ञा पाळितात, तद्वत् सदाचार या गुणावरून राजाची प्रथम निवड होते.

अशा रीतीनें राजावर सर्वांचें प्रेम जडतें आणि प्रेमाची कल्पना वाढत जाऊन ईश्वराचें ज्ञान होऊं लागतें आणि ईश्वर सर्व प्रेमाचें आस्पद बनून जातो. अजूनपर्यंत ईश्वराच्या कल्पनेंत भीतीची छटाहि नव्हती. श्रद्धेमुळें ईश्वरावर निर्विकल्प प्रेम असे, तद्वत् राज्यव्यवस्थेमुळें राजावर प्रेम बसे

याप्रमाणें जगाची उत्तम स्थिति असून, काय झालें असेल तें असो, संस्थानिकांस एकमेकांवर वर्चस्व स्थापण्याची बुद्धि झाली. प्रजापीडक राजे होऊं लागले आणि भयामुळें प्रजेमध्यें मूढ विश्वास ( superstition )

जागृत झाला. जिंकणारे राजे देवासारखे बनले आणि प्रजाजन गुलाम झाले. मूढ विश्वासापासून देवदानवांच्या कल्पना निघाल्या, त्यांपैकीं आशा या वृत्तीपासून देव आणि भय या वृत्तीपासून दानव निर्माण झाले. मग मनुष्याचे गुणधर्म व वृत्ति देवांमध्यें गोचर होऊं लागल्या. राग, द्वेष, पक्षपात, मदांधपणा, क्रोध,—ह्या वृत्ति देवांमध्यें भासूं लागल्या. गर्व या वृत्तीपासून स्वर्गाची व द्वेष या वृत्तीपासून पातालाची कल्पना निघाली. पापी दानव पातालांत रहातात व पुण्यवान् देवांचा वास स्वर्गांत होतो असा समज झाला. नंतर नभोमंडलाचा पवित्रपणा जात चालला, संगमरवरी स्थंडिलें रचिलीं गेलीं, आणि त्यांमध्यें मांसांच्या आहुति पडूं लागल्या. पुरोहित, ऋत्विज, अध्वर्यु मांस भक्षण करूं लागले आणि भेसुर मूर्तींवर मानवी रक्ताचे पाट वाहूं लागले.

यावरून असें उघड होतें कीं आत्मप्रीतीचा प्रवाह कधीं न्याय्य तर कधीं अन्याय्य अशा मार्गांनीं वाहत जातो, आणि एकच मनुष्य अधिकारावर चढतो, मदांध बनतो, हिऱ्यामोत्यांचा मालक होतो आणि त्याची महत्त्वाकांक्षा इतकी वाढते कीं सारें जग मिळालें तरी त्याला पुरेसें होत नाहीं. हीच आत्मप्रीति समस्तांमध्यें जागरूक झाली म्हणजे राज्यव्यवस्था व कायदे यांच्या रूपानें त्यालाच प्रतिबंधक होते. कारण, एकादी गोष्ट जर सर्वांना आवडूं लागली, तर त्याला एकट्याला ती आवडून उपयोग काय ? तसेंच पुष्कळ लोक जेव्हां नाखुष होतात तेव्हां तो एकटा खुष होऊन फायदा काय ?

आपल्यापेक्षां कमी बलवान् जर हल्ला करावयाला तयार असेल किंवा आपल्यापेक्षां जास्त बलवान् हिरावून घ्यावयास उद्युक्त असेल, तर आपल्या वस्तूंचें रक्षण कसें करितां येईल? यासाठीं स्वसंरक्षणाकरितां प्रत्येकाचें स्वातंत्र्य कमी होऊन, प्रत्येकाला जें हवेंसें वाटतें त्याचें रक्षण करण्यास सर्वांनीं झटलें पाहिजे. अशा रीतीनें स्वसंरक्षणासाठीं सदाचारानें वागणें भाग पडतें, आणि राजे लोक देखील न्याय व परोपकार करण्यास शिकूं लागतात. मग सामाजिक व सार्वजनिक कल्याणानेंच व्यक्तीचें हित साधून घेणें हें आत्मप्रीतीला इष्ट वाटतें आणि आपला पूर्वींचा मार्ग सोडून देणें भाग पडतें.

व्यक्तीचें हित साधावयाचें असल्यास अगोदर समाजाचें हित साधलें पाहिजे, हा सिद्धान्त ठरल्यावर एखादा ईश्वरभक्त, उदार, मानवजातीचा हितकर्ता असा पुरुष निर्माण होतो आणि सृष्टिदेवीनेंच पूर्वीं अर्पण केलेली श्रद्धा व नीति फिरून अस्तित्वांत आणितो. असा पुरुष कवि असो किंवा स्वदेशभक्त असो, तो नवीन प्रकाश उत्पन्न करीत नाहीं तरी सृष्टिदेवीचाच लोपलेला प्रकाश प्रज्वलित करितो, आणि ईश्वराचें स्वरूप नसलें तरी त्याची छाया लोकांपुढें मांडितो. असा पुरुष राजाला व प्रजेला अधिकाराचा खरा उपयोग कसा करावा हें शिकवितो, म्हणजे अधिकाराचीं सूत्रें ढिलीं सोडूं नये किंवा ताणूं नये आणि अशीं चालवावीं कीं एक सूत्र हललें कीं दुसरें हललेंच पाहिजे. ही स्थिति प्राप्त झाली असतां विरुद्ध पदार्थांपासून देखील आपोआप शुद्ध स्वरूपाचा मेळ घडून येतो. सर्व पदार्थांच्या

ऐक्यापासून, व्यवस्थेपासून, संमेलनापासून विश्वाचें परिपूर्ण समरसत्व सिद्ध होतें. विश्वांतील लहानमोठ्या, प्रबल–निर्बल वस्तु अशा रचल्या आहेत कीं त्यांचा नाश न होतां उपयोगच व्हावा आणि एकमेकांच्या हद्दींत न शिरतां त्यांस बळकटी यावी. कांहीं पदार्थांच्या अंगीं इतरांस उपयोग व्हावा म्हणून अधिक सामर्थ्य ठेविलेलें असतें आणि त्यांपासून जसजसें दुसऱ्याचें हित होत जातें, तसतसें त्यांचें स्वतःचें कल्याण होतें. पशु, पक्षी, मनुष्य, गंधर्व, चाकर, धनी, राजा—सर्वांचा रोख एका मध्यबिंदूकडे म्हणजे सार्वत्रिक कल्याणाकडे असला पाहिजे.

एकसत्तात्मक, विशिष्टसत्तात्मक, लोकसत्तात्मक —कोणतीहि राज्यपद्धति असो, यांमध्यें अमुक चांगली, अमुक वाईट असा निश्चय करणें फार अवघड आहे. या बाबतींत खरा निर्णय असा आहे कीं जी सुरळित चालेल ती राज्यपद्धति उत्तम होय. तसेंच श्रेष्ठ धर्म कोणता याबद्दल अभिमानी लोकांनीं पाहिजे तर भांडावें. जो मनुष्य सदाचारसंपन्न असतो, त्याच्या हातून प्रमाद कधींहि घडणार नाहीं, शिवाय मूलतत्त्वांत चूक नसली म्हणजे एकादें कृत्य जरी हातून वाईट घडलें तरी हरकत नाहीं. धर्मश्रद्धा व पारलौकिक कल्पना यांविषयीं मतभेद होऊं शकेल, पण मनुष्यमात्राचें लक्ष्य भूतानुकंपेकडेच असलें पाहिजे. या श्रेष्ठ हेतूच्या आड जें जें येईल तें मिथ्या समजावें आणि मनुष्याचें हित जेणेंकरून होतें किंवा मनुष्याची प्रगति ज्यापासून घडते तें सर्व ईश्वरास प्रिय होणारच.

लतांप्रमाणें, इतरांचा आश्रय केल्यानें मनुष्याचें जीवित सुखकर होतें, आणि मनुष्य जों जों दुसऱ्यास चिकटून राहील तों तों त्यास अधिक बळकटी येत जाईल. सर्व ग्रह अगोदर आपल्या अक्षाभोंवतीं फिरतात, तेव्हां सहज सूर्याची प्रदक्षिणा करूं शकतात, त्याप्रमाणें परस्परांस अनुकूल अशा दोन गति मनुष्याला प्राप्त होतात, त्यांपैकीं पहिल्या गतीनें त्याचें स्वःचें हित होऊन दुसऱ्या गतीनें समस्तांचें कल्याण घडून येतें.

विश्वरचनेचें बीज सार्वत्रिक कल्याण होय, हें तत्त्व पशुपक्ष्यांच्या उपजतबुद्धीच्या व्यापारावरून व मनुष्याच्या विवेचकबुद्धीच्या प्रवृत्तीवरून सिद्ध होतें. उपजतबुद्धीपासून समाज उत्पन्न होतो आणि तेंच कार्य विवेचकबुद्धि वृद्धिंगत करिते. उपजतबुद्धीमुळें पशुपक्ष्यादिकांमध्यें नानाप्रकारचे समाज बनून जातात व विवेचकबुद्धीमुळें मनुष्यांमध्यें राज्यव्यवस्था व धर्मप्रचार अस्तित्वांत येतात. राजनीति व धर्म यांची उत्पत्ति प्रीतीच्या तत्त्वापासून होते, आणि आत्मप्रीति व समाजप्रीति हीं एकच होत.

सुखप्राप्ति हा मनुष्यमात्राचा हेतु होय. हें सुख आहे तरी काय? शुभ विषयप्राप्ति, स्वास्थ्य, समाधान— अशा अनेक प्रकारांनीं सुखाची कल्पना व्यक्त करितां येते. ज्याच्या लाभाकरितां मनुष्यमात्र जीवापाड धडपड करीत असतो, ज्याच्यासाठीं जीव धारण करितो, पाहिजे तो प्रसंग कंठितो, आणि मरावयास तयार होतो, जें अगदीं जवळ आहे असें वाटतें पण हातीं लागत नाहीं, ज्याची कधीं कधीं उपेक्षा होते, ज्याच्याविषयीं

मूर्ख व शहाणे नाना तऱ्हेच्या कल्पना करितात—अशा प्रकारचा अगम्य व विचित्र पदार्थ 'सुख' होऊन बसला आहे. सुख हा तर देवतरु खचित आहे, तेव्हां तो मृत्युलोकीं कोठें बरें सांपडतो? मुत्सद्दीलोक सुखी असतात काय? श्रीमंतलोक, ग्रंथकार किंवा रणशूर सुखी आहेत काय? सुख सांपडतें तरी कोठें? सुख सांपडत नाहीं कोठें? या बाबतींत जर आपले श्रम फुकट गेले, तर जमिनीला दोष न लावितां, मशागतींतच दोष आहे असें समजलें पाहिजे. शाश्वतसुख कोणत्याहि एका अवस्थेस चिकटून राहिलेलें नाहीं आणि तें कोठेंच सांपडावयाचें नाहीं असें म्हणावें, तर सर्व ठिकाणीं आढळतें. मोबदला देऊन असें सुख मिळतच नाहीं, तरि हवें तिकडे मोकळेपणें सांपडतें.

विद्वान्लोकांना सुखाच्या प्राप्तीचा मार्ग विचारिला असतां चमत्कार आढळून येतो. कोणी म्हणतात कीं परोपकारांतच सुख आहे, कोणी म्हणतात एकान्तवासांतच आहे. कांहीं तत्त्ववेत्ते असें मानितात कीं विषयोपभोगांतच सुख आहे, कांहीं समाधानांतच सुख मानितात. कांहीं केवळ पशुवत् आचरण करितात आणि त्यांच्या सुखाचा शेवट दुःखांतच होतो. कांहीं स्वतः देव बनून सदाचाराची देखील प्रतिष्ठा मानीत नाहींत कांहीं लोक असे संशयग्रस्त होतात कीं ज्या त्या गोष्टीची ते अतिशयोक्ति करितात, म्हणजे जेव्हां ते श्रद्धाशील होतात तेव्हां पाहिजे त्या गोष्टीवर विश्वास ठेवितात आणि जेव्हां नास्तिक बनतात तेव्हां कशावरहि भरंवसा ठेवीत नाहींत.

एकंदरींत विद्वान्लोकांमध्यें सुखाविषयीं व त्याच्या प्राप्ती-विषयीं मतभेद फारच आहे.

यासाठीं वेडसर मतांची रजा घेऊन केवळ निसर्गाच्या मार्गाचें अनुसरण केलें पाहिजे. हा मार्ग सर्व अवस्थांतील लोकांस आणि सर्वांच्या बुद्धीस आकलन होण्यासारखा आहे. निसर्गापासून जे लाभ होतात ते उघड असून त्यामध्यें अतिशयोक्ति मुळींच नसते, फक्त सद्विचार व सद्धेतु असले म्हणजे झालें. विवेकबुद्धि व स्वास्थ्य हीं सर्वांमध्यें सारखीं वांटलेलीं असतात.

ईश्वर नेहमीं सामान्य नियमानेंच वागतो, व त्याच्या कायद्यांत पक्षपात घडत नाहीं. आपण जें सुख म्हणून समजतों त्याचा अन्तर्भाव व्यक्तीच्या हितांत न होतां समस्तांच्या कल्याणांतच होतो. व्यक्तीस होणारा पाहिजे तो लाभ जरी घेतला, तरी त्याचा कल मनुष्यजातीच्या कल्याणाकडे असतोच. सामान्य व विशेष यांचा परस्पर-संबंध नीट लक्षांत आणिला पाहिजे. विशेष सामान्यावर अवलंबून असतें, पण विशेषाकरितां सामान्य बदलत नाहीं. अभिमानामुळें चढलेला राजा असो किंवा गुहेंत बसलेला बैरागी असो, तो कधीं आत्मसंतुष्ट होत नाहीं. मनुष्यमात्राचा तिटकारा येऊन असंग राहिल्याचा जो आव आणितो त्याला सुद्धां कोणी तरी चहाता किंवा मित्र हवासा वाटतो. दुसऱ्याच्या जिवाला काय वाटतें किंवा दुसऱ्याच्या मनांत काय विचार चालतात हें समजून घेण्याचा प्रयत्न केला असतां सुखाचा थांग न लागतां सर्व वैभव नष्ट होईल.

व्यवस्था राखणें हाच ईश्वराचा पहिला नियम आहे,

आणि ही गोष्ट एकदां मान्य केली म्हणजे कांहीं लोक इतरांपेक्षां श्रीमंत, शहाणे, बळकट, बुद्धिमान् असतात व असले पाहिजेत हें उघड आहे. पण जर कोणी म्हणूं लागेल कीं असे श्रीमंत किंवा शहाणे लोक अधिक सुखी असतात तर मात्र हें म्हणणें विवेकबुद्धीच्या अगदीं उलट आहे. जर सर्वांस सारखें सुख होईल, तर ईश्वर निःपक्षपाती आहे असें म्हणतां येईल. परस्परांच्या गरजांमुळें हें सुख वाढतें आणि निसर्गभेदामुळें सृष्टीमध्यें शान्ति वास करिते. बाह्य परिस्थिति, विशेष अवस्था—यांमध्यें कांहीं मतलब नाहीं, म्हणजे संपत्ति, प्रतिष्ठा, कीर्ति वगैरे गोष्टींमध्यें सुख सांपडत नसून या गोष्टी तर जगामध्यें विषम रीतीनें वांटलेल्या आहेत. ईश्वरानें सर्व प्राण्यांस समान आत्मा दिला आहे, त्याप्रमाणें सुखहि सर्वांस सारखें असलें पाहिजे असाच ईश्वराचा हेतु आहे, म्हणून बाह्य परिस्थितीवर सुखाचें अवलंबन करितां आलें नाहीं. प्रारब्धाच्या योगानें संतति, संपत्ति, प्रतिष्ठा वगैरे गोष्टी कमी-जास्त प्रमाणानें वांटल्या जातात, तेव्हां त्या मानानें अमुक सुखी, अमुक दुःखी असें समजण्याची जगाची रीति आहे. ही सुख तोलण्याची मानवी तऱ्हा झाली, पण ईश्वराचा कांटा सारखा असतो, तो पाहिजे तिकडे झुकत नाहीं. यासाठीं विषम परिस्थितींत सुखाचा समतोलपणा राखण्याकरितां आशा व भय हे दोन भाव ईश्वरानें उत्पन्न केले आहेत. म्हणजे गरीब व अनाथ लोक ईश्वरावर हवाला ठेवून चांगले दिवस येतील या आशेवर काल कंठितात, पण जवळ असेल तें नाहींसें होईल या भयानें श्री-

मंत लोक ग्रस्त होतात. म्हणून प्राप्त झालेल्या बऱ्यावाईट स्थितीवर सुख-दुःखांचा अनुभव अवलंबून न रहातां, भविष्यत्कालीन गोष्टींच्या बऱ्यावाईट स्वरूपाचा जो अजमास होतो, त्याच्याशीं तो अनुभव सँलग्न रहातो.

सर्व व्यक्तींस मिळणारें, ईश्वरानें व निसर्गानें मनुष्यजातीस अर्पण केलेलें, विवेचकबुद्धीच्या आटोक्यांत असणारें, इंद्रियांस गम्य होणारें—असें सुख तीन शब्दांत संकलित होतें—म्हणजे, आरोग्य, शांति व निर्वाहापुरतें अन्नवस्त्र. यांपैकीं आरोग्य हें फक्त नियमितपणावर अवलंबून असतें, आणि आत्मसंयमन व समाधान ह्यांपासूनच शान्तीचा लाभ होतो. चांगली किंवा वाईट परिस्थिति ही केवळ प्रारब्धाची देणगी होय. वाईट मनुष्याला कितीहि सुख प्राप्त झालें, तरी त्याला कोणी चांगला म्हणणार नाहीं.

यावरून असें सिद्ध होतें कीं—सुख प्राप्त व्हावें हा सर्वांचा हेतु असून, ईश्वराचा संकेत असा असतो कीं सर्वांस सारखें सुख प्राप्त व्हावें. संपत्ति, प्रतिष्ठा, कीर्ति वगैरे बाह्य परिस्थितीवर सुख अवलंबून नसतें, म्हणून या गोष्टी विषम रीतीनें वांटलेल्या असतात. आशा व भय यांच्या साधनानें ईश्वर मनुष्यांमध्यें सुखाचा समतोलपणा राखितो. कधीं कधीं साधु पुरुषास देखील विपत्ति येऊं शकेल, पण सर्वांत सुखी होण्यास साधु पुरुषच पात्र आहेत. सदाचार हेंच सुख होय व ईश्वराला शरण जाऊन आचरलेला शुद्ध मार्ग हेंच सुखाचें साधन होय. म्हणून

" आत्मसंयमनासारखा दुसरा विजय नाहीं."